भाऊसाहेबांची बखर

सन १९५५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. नं. ६२५८

१९५५

REFBK-0008701

चितळे–जोशी

सन १९५५

मराठी ग्रंथ ... ठा. स्थळप्रत.
अनुक्र. १९८२२ वि. २१. इति...
क्रमांक ...६५५... नों. दि. .....
२८।३।५६

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ५३

आपटे स्मारक मंडळ प्रकाशन, पुस्तक ४ थें

भाऊसाहेबांची बखर

—व्यक्ति–स्थळ सूची, शब्दसूची, बखर प्रसंग काल-पट,
—भाऊसाहेब मुक्काम यादी, व्याकरण—व इतिहास-
विषयक छोटे प्रस्ताव व नकाशा यांसह—



संपादक

कै. वि. सि. चितळे, एम्.ए.,बी.टी.,डी.डी.

व

श्री. शं. ना. जोशी

सभासद, भारत इतिहास संशोधक मंडळ.

मराठी ग्रंथ ... ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि. इतिहास ...
... नोंद दि. ...

REFBK-0008701

REFBK-0008701

शुक्रवार
धनत्रयोदशी
शक १८७७

साडे पांच रुपये

भारत इ. सं. मंडळाचे सभासदांस ५ रु.

११-११-१९५५

प्रकाशक
शं. दा. चितळे, एम्.ए.,बी.टी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं
६२४ सदाशिव, पुणें २.

[प्रकाशनाचे सर्वाधिकार
आपटे स्मारक मंडळ, (भा. इ. सं. मं.) पुणें २.
यांजकडे आहेत]

मुद्रक
दि. दा. गांगल, एम्.एस्सी.
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव, पुणें २.

श्रीः

महाराष्ट्राच्या इतिहासाचा व भाषेचा आस्थापूर्वक
अभ्यास करूं पाहणाऱ्या सज्जनांस हा
ग्रंथ परम प्रीतीनें अर्पण करितों.

ग्रंथ संपादक

निवेदन

प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध करतांना, तो वाचकांच्या हातीं देत आहों, ह्यांत एक प्रकारें आनंद वाटतो, असें कांहीं लिहून सांगण्याऐवजीं, सहकारी संपादक मित्र गमावल्याचे दुःखोद्‌गार प्रथम निघणें स्वाभाविक आहे. स्वतः पानिपत-प्रसंगाच्या दुर्दैवाप्रमाणें त्याविषयींचें लेखन-प्रकाशनहि तशासारख्याच धक्क्यांनीं थोडेसें हादरावें असा योग आहे कीं काय न कळे ! कारण, राजवाडे ह्यांच्या ह्याच पानिपत-प्रसंगाचीं अनेक पत्रें छापलेल्या व त्यांचें ओजस्वी प्रस्तावलेखन असलेल्या पहिल्या खंडाच्या प्रती वांई येथें छापून व बांधून तयार होतांच एकाएकीं छापखान्यासह 'अग्नये स्वाहा' झाल्या (इ. १८९८). छापखान्याबाहेर अगदीं एकच प्रत होती. तीवरून लगेच पुनर्मुद्रण झालें व त्या आज प्रती वाचकांच्या हातीं आहेत. ह्या पुस्तकाच्या संपादनाबाबत असाच प्रकार घडला. संपादनार्थ ग्रंथ हातीं घेऊन कांहीं लेखन होतें न होतें तोंच संपादक श्री. **वि. सि. चितळे** एम्.ए., बी.टी.,टी.डी. (लंडन) हे एकाएकीं मुंबईस गेले असतां अकस्मात् हृदयविकारानें मृत्युमुखीं पडल्याचें कळलें ! आतां त्याविषयीं अधिक व वेगळें काय सांगावयाचें ! पुढें हें काम मजकडे आलें व तें इतर कामें संभाळून यथामति पुरें करून **गुरुवर्य दत्तोपंत आपटे** ह्यांच्या स्मृतिदिनीं वाचकांस सादर करीत आहे.

'**भाऊसाहेबांची बखर**' ह्या पुस्तकाच्या हस्तलिखित प्रती भा. इ. सं. म. च्या दप्तरखान्यांत पांच-सहा आहेत. त्यांतील दोन सामान्यतः पूर्ण आहेत व बाकीच्या त्रुटित वा आद्यन्तरहित अशा आहेत. ह्यांपैकीं कांहीं साने यांजकडीलच आहेत. मं०च्या प्रतींतील एका पूर्ण प्रतीची नकल, इ. सं. श्री. कृ. वा. पुरंदरे मास्तर ह्यांनीं केली आणि इतर प्रतींतील पाठभेद त्यांनीं, मी व श्री. चितळे यांसह त्याच नकल प्रतीवर लिहून काढले. बाकीच्या प्रतींतील पाठभेद साने ह्यांच्या छापील प्रतींत पाद-टीपांतून आहेतच. ते सर्व लक्षांत घेऊन ही प्रत पाठभेदांसह तयार केली आहे. म्हणजे एकूण दहा-अकरा हस्तलिखित व मुद्रित प्रती ह्या प्रसंगीं विचारांत घेण्यांत आल्या.

मुद्रणार्थ प्रत सिद्ध करीत असतां साने ह्यांनीं स्वीकारलेलें धोरणच योग्य होतें व तेंच ह्याहि प्रसंगीं स्वीकृत करून प्रत सिद्ध केली. म्हणजे अमुक एक प्रत न स्वीकारतां हातीं असलेल्या प्रतींतील पाठांचा विचार करून त्यांतील एक पाठ घेऊन प्रत सिद्ध केली. असेंच करणें इष्ट कां, हें तशा प्रतींतील पाठांचा तक्ता देऊनच सांगणें अवश्य व तसे तक्ते ह्या बखरींतील कांहीं प्रकरणांचे तयारहि केले. सर्व प्रकरणांचे तक्ते तयार करणेंहि पुढें घडलें नाहीं आणि केलेल्या तक्त्यांतील कांहीं भाग नमुना म्हणूनहि पुस्तकांत देण्याचें वेळेच्या व पैशाच्या दारिद्र्यामुळें

करतां येत नाहीं. ग्रंथांत सांप्रत दिलेले कांहीं पाठ उगाच दिले असें एका विद्वान् व साक्षेपी तज्ज्ञांनीं, त्यांस छापील पानें कांहीं वाचावयास दिलीं असतां वाचून सांगितलें. (श्री. य. गो. फफे) ह्याचा एक अर्थ हा कीं, अशा जेथें नकला प्रती असतात कीं ज्यांतील लेखन, पाठ म्हणून सुद्धां टीपांतून देणें न करावें, तेथें एक प्रत घेणें अशक्य व गैरच होय, हें उघड होतें. पण ह्यावरून दुसरा एक बोध लक्षांत येतो तो हा कीं, बखरींची मूळ प्रत मिळविण्याच्या कामीं लक्ष पुरविलें पाहिजे; मिळतील तितक्या नकलाहि अभ्यासार्थ संग्रहीत केल्या पाहिजेत. आणि अभ्यास-मंडळाच्या जागीं तरी असे तक्ते तयार केले पाहिजेत. अभ्यासांत नेमकेपणा येण्यास अशी तुलना आवश्यक आहे. पण वेळ, पैसा व सहकार ह्यांच्या दारिद्र्यापुढें चोख व अधिकृत कार्याची अपेक्षा वृथा होय. अशा स्थितींत झालेलें काम ह्या प्रतीच्या रूपानें पुढें ठेवीत आहें.

आतांपर्यंत म्हणजे इ.स. १८७९ पासून तों १९५५ पर्यंत ह्या बखर ग्रंथांच्या ५ आवृत्त्या निघाल्या. व ही सहावी आवृत्ति प्रसिद्ध होत आहे. पहिल्या पांचहि आवृत्ति पाहतां, तोच एक ग्रंथ मुद्रित होत असतां नुसत्या ग्रंथ-मुद्रण-प्रकारांतहि सारखी सुधारणा व प्रगति होत गेली आहे. पहिल्या आवृत्तींत परिच्छेद दिले; पण त्यांना क्रमांक दिले नव्हते. दुसऱ्या व तिसऱ्या आवृत्तींत अनुक्रमणिका नव्यानें दिली; पण ती पृष्ठानुसार. तिसऱ्या आवृत्तीला शुद्धिपत्र जोडलें. चवथ्या आवृत्तींत परिच्छेदांची वाढ होऊन परिच्छेदांना क्रमांक दिले; अर्थात् अनुक्रमणिका परिच्छेदानुसार विस्तृत झाली. शिवाय पहिल्या तिन्ही आवृत्तींत टीपांचा आंकडा ४६९ तर ह्या चवथ्या व पांचव्या आवृत्तींत ९७१ टीपा आल्या. व प्रस्तावना ३,४ पानांच्या जागीं १० पानें झाली आणि नकाशा देऊन फारशी शब्द कोशहि जोडला. आणि **ह्या ६ व्या आवृत्तींत** हें सर्व असून म्हणजे फारसीच तेवढा शब्दकोश जोडला नसून सर्वच दुर्बोध शब्दांचा (१) कोश जोडला आहे. शिवाय, (२) व्यक्ति (३) स्थल सूची, आणि **विशेष म्हणजे** (४) **प्रकरणें पाडून प्रकरणवार** (५) **१८ कालपट दिले आहेत** व भाऊसाहेबांच्या पानिपत-प्रयाणाचा (२३) मार्ग दाखविणारा मुक्कामासह नकाशा जोडला. शेजारच्या पानावर त्या मुक्कामांच्या (२४) तारखा दिल्या आहेत. अशा प्रकारें ३ ऐवजीं २४ परिशिष्टें जोडून ही आवृत्ति शक्य तों बरीच पूर्ण करण्याचा यत्न केला आहे.

ह्या पुस्तकांत मूळ बखर ग्रंथाचीं १८ प्रकरणें आहेत. त्यांतील **पहिलीं सात कै. वि. सि. चित्तळे ह्यांनीं तयार केलेलीं आहेत.** बाकीचीं अकरा प्रकरणें व त्याशिवाय इतर सर्व वर लिहिल्याप्रमाणें (प्रकरणें २४) ह्या ग्रथांतील काम सहकाऱ्यांसमवेत माझ्या हातचें आहे. **ह्या ग्रंथाचें वैशिष्ट्य ग्रंथास जोडलेले १८ कालपट हें आहे.** बखरींतून आलेल्या ऐतिहासिक प्रसंगासंबंधानें प्रत्यक्ष त्या त्या व्यक्तींनीं लिहिलेल्या पत्रांतून काय आलें आहे तें ताडून पाहतां यावें हा असे

कालपट देण्यांतील हेतु आहे. बखरींचा व पत्रांचा अभ्यास कांहीं ऐतिहासिक बखरींच्या बाबतींत आतां असा व्हावयास पाहिजे.

ही बखर आणि कालपटांत दिलेला प्रसंग व त्याचे आधार पाहून विवेचनात्मक भाग लिहिण्यानें हचा बखरीचा व पत्रांचाहि विचार अधिक होऊन त्यामुळें एकंदर पानिपत प्रकरणासंबंधानें आपण त्या कालाच्या अधिक जवळ जाऊं हें निश्चित. हचांत कांहीं ठिकाणीं बखरहि पूर्ण विश्वसनीय म्हणजे सुसंगत, कांहीं ठिकाणीं विसंगत आणि कांहीं ठिकाणीं असंगत मजकूर सांगणारी अशीं आतां वाटेल. पत्रांच्या नवीन उपलब्धीनें आणि प्रकाशनानें हचांतहि पुढें बदल होईल व तो ते ते पुढील अभ्यासक पाहतील. –पत्र–बखर विवेचनाची जोड हा स्वतंत्र निबंधाचा विषय होईल. येथें आणखी एका अभ्यासाचा भागाची आवश्यकता सुचते तीहि सांगून ठेवतों म्हणजे पुढील आवृत्तीचे वेळीं जमल्यास याची जोड देण्यांत यावी. हचा बखरीप्रमाणें पानिपतसंबंधीं अन्य बखरी प्रसिद्ध आहेत. विशेषत: '**भाऊसाहेबांची कैफियत**' ही हचा बखरीचें मूळ होय, म्हणजे या कैफियतीची वाढविलेली आवृत्ति म्हणजे ही भाऊसाहेबांची बखर (सभासद व चित्रगुप्त बखरीप्रमाणें) होय असें जें तज्ज्ञांचें म्हणणें ती कैफियत आणि इतर पानिपत संबंधाच्या बखरी त्यांतील प्रसंग वर्णनाची तुलना होऊन त्यासंबंधीचें स्वतंत्र विवेचन व्हावयास हवे. निदान भाऊसाहेबांची कैफियत हा ग्रंथ स्वतंत्रपणें पुनर्मुद्रित करून हचा ग्रंथाची वाढ हचा बखरींत कोठें किती झाली हें दर्शित व्हावें. हचामुळें इतिहासकालीं ही वाङ्मयरचना कसकशी होत गेली हेंहि कळून येण्यास सहाय्य होईल. असो.

ग्रंथाला जोडलेले कालपट हा नव्या आवृत्तीचा जसा विशेष तसा तो हचापुढें कोणत्याहि ऐतिहासिक बखर ग्रंथ प्रकाशनाचा आवश्यक भाग व्हावा हचा योग्यतेचा आहे. बखरपत्रसंयोगामुळें ऐतिहासिक ग्रंथ-प्रकाशनांत एक नवाच उपयुक्त पायंडा पडला आहे. हचापूर्वी असा उपक्रम मुळींच झालेला नाहीं असें नाहीं. निराळचा रूपानें झाला आहे. सप्तप्रकरणात्मक बखरीस कै. साने यांनीं टिपणें जोडलीं किंवा 'होळकर कैफियती'स श्री. य. न. केळकर हचांनीं पत्रेंच दाखल केलीं, हा हचा संयोगांतीलच भाग होय. हा बखर ग्रंथ एका दृष्टीनें त्यापेक्षां सुरस आणि सरस; व त्याला पत्रदर्शित कालपटाची जोड दिल्यामुळें बखरींतील इतिहासरसास अधिकच विश्वसनीयता आली आहे. मात्र त्या दृष्टीच्या भोक्त्यांचीच वाण आहे. पण विकासशील महाराष्ट्रांत तीहि उणीव भरून निघेल हा भरंवसा बाळगून आहों. 'बोला आदि झोंबिजे प्रमेयासि' हचा ज्ञानेश्वराच्या उक्तीप्रमाणें हा बखररंथ भाषा व इतिहास हचा दोन्ही दृष्टीनें आतां साक्षेपी वाचकांना अधिक आवडेल. विद्यापीठांनीं हा ग्रंथ अभ्यासास अवश्य लावावा, आणि भाषा व

इतिहास ह्यांची चर्चा स्वतंत्र व विस्तृत व्हावी एवढें सांगणें भाग आहे. ह्या बखरीप्रमाणें पानिपत प्रसंगाचे बखरग्रंथ ठिकठिकाणीं आहेत व प्रसिद्धहि होत आहेत. मद्रास मॅन्स्क्रिप्ट लाय० तील अशी एक बखर मद्रास ओरि० च्या त्रै० तून क्रमशः आली आहे. तसेंच 'प्रतिष्ठान' मासिकांतूनहि वैजापुर येथें सांपडलीं म्हणून पण पानिपतचीच बखर छापून येत आहे. लंडन व धुळे येथील हस्तलिखित-संग्रहांतहि अशा बखरी आहेतच. त्यांचाहि अभ्यास अपेक्षित आहे.

ह्या पुस्तकाचे कामीं पुणें विश्वविद्यालयाकडून रु. ५०० आणि श्री. चं. गो. आगाशे यांजकडून रु. २०० द्रव्यसहाय्य मिळालें; श्री. आ. भा. फाळके यांजकडून कांहीं मर्यादेपर्यंत चर्चा सहाय्य लाभलें. ग्रंथछपाईच्या कामीं **अ. वि. गृहाच्या लोकसंग्रह मुद्रणालयानें** जबाबदारी उचलली म्हणूनच हा ग्रंथ अशाप्रकारें अनेकांगयुक्त होऊन इतिहासाभ्यासी संशोधक, उच्च शिक्षणालयीन गुरु-शिष्य, सर्वसामान्य साक्षेपी वाचक आदि सर्वांना उपयुक्त असा प्रकाशित होत आहे. भा. इ. सं. मं. व त्यांतील अधिकारी ह्यांच्या सहाय्याचा उल्लेख करणें हेंच दुजेपणाचें ठरेल म्हणून त्याविषयीं ह्यापेक्षां अधिक लिहीत नाहीं. सात प्रकरणांखेरीज इतर सर्व संपादकीय काम यथामति झालें तें महाराष्ट्र वाचकांच्या सेवेशीं सादर करून व सर्वांचे (**श्री. न. रा. तळेकर व श्री. वा. रा. जोगळेकर** ह्यांचेंहि) आभार मानून तूर्त रजा घेतो.

विद्यमान संपादक व चिटणीस
द. वि. आपटे स्मारक मंडळ, पुणें.

प्रस्तावना

येथें बखरीच्या नांवासंबंधानें किंचित् स्पष्टता केली पाहिजे. जो ग्रंथ छापावयाचा त्याच्या नांवाविषयींच कोणी अभ्यासकांनीं कांहीं म्हटलें असलें, तर अशी स्पष्टता इष्ट व आवश्यकच आहे. ग्रंथाचें नामकरण करण्याचा पहिला अधिकार ग्रंथलेखकाचा. अशा अधिकारीपणानें आपल्या ग्रंथास त्यानें जें नांव दिलें असेल तें सर्वस्वी मान्य. असें जर नांव नसलें तर ग्रंथाचे आद्यन्त पाहणें, त्या आद्यन्तानुसार ग्रंथांतील लेखन ध्यानांत घेणें, आद्यन्तच एखाद्या ग्रंथाचे दुर्दैवानें हातीं न आले तर ग्रंथान्तर्गत आदरोद्भूत आणि द्वेषमूलक उद्गार लेखकानें कोणाकोणाविषयीं कितीदां काढले हें पाहणें आणि कोणत्या प्रसंगाकडे वाचकास लेखक नेऊन सोडत आहे हें लक्षांत घेणें ह्यावरून ग्रंथनामाचा लेखकास अभिप्रेत असा अंदाज करणें भाग पडतें. प्रस्तुत बखर-ग्रंथाच्या अनेक नकलाप्रती हातीं येऊनहि ग्रंथास नांव काय द्यावें असा प्रश्न पहिल्या आवृत्तीचे वेळींच संपादक कै. साने ह्यांनीं ध्यानीं घेऊन यथार्थपणें आमच्या मतें तो तेव्हां सोडविला. ह्या सहाव्या आवृत्तीचे वेळींहि तोच प्रश्न जरा वेगळ्या प्रकारें पण विचारांत घेणें वर म्हटल्यानुसार प्राप्त आहे.

पहिल्या आवृत्तीच्या उपोद्घातांत (इ. स. १८७९) पांचव्या परिच्छेदांत पान ३ वर संपादक साने ह्यांनीं सांगितलें कीं, "शक १६७६–७७ पासून शक १६८३ पर्यंत हिंदुस्थानांत मराठ्यांनीं ज्या स्वाऱ्या केल्या त्या स्वाऱ्यांची बखर असें कांहींतरी नांव देणें योग्य दिसतें. आम्ही तर 'पाणिपतची बखर' असेंच नांव देणार होतों. पण पुणें येथील प्रतीच्या कांहीं बंदांचे डोकीवर 'बखर भाऊ-साहेबांची' असें लिहिलेलें आहे. खेरीज शेवटील प्रसंगाचा अतिनिकट संबंध श्री. सदाशिवरावभाऊ यांचे नांवाशींच आहे. अशाकरितां 'भाऊसाहेबांची बखर' हेंच ह्या ग्रंथाचें नांव कायम करून आम्ही तो प्रसिद्ध करितों." म्हणजे एक नव्हे अनेक बंदांवर हें नांव संपादकांना तेव्हां आढळलें व तें त्यांनीं ग्रंथास दिलें. पुढें दुसऱ्या व तिसऱ्या आवृत्तीचे वेळीं (इ. स. १८८६ व इ. स. १९००) साने ह्यांनीं हाच नामपरिच्छेद असाच प्रारंभीं दिला. मात्र ह्या आवृत्तींच्या वेळीं त्या कालच्या युक्ततेस अनुसरून मुखपृष्ठावर इंग्रजींत 'An account of the Maratha Campaigns from 1753–1761' अशी ओळ छापली व ती पुढीलहि म्हणजे चौथ्या व पांचव्या आवृत्तींतहि ठेवली. म्हणजे साने यांस जें नांव सुचलें व तें पहिल्या आवृत्तीच्या परिच्छेदांत त्यांनीं शकगणनेनें सुचविलें तें त्यांनीं ह्या रूपानें ग्रंथावर दर्शित केलें. मुख्य गोष्ट कीं, नामपरिच्छेदाचा भाग पुढल्या म्हणजे चौथ्या व पांचव्या आवृत्तींतहि पृ. ५ वर १० वा परिच्छेद म्हणून दिला व त्यांत थोडा पण लक्ष देण्याजोगा बदल केला. बदल हा कीं 'कांहीं

वंदांचे डोकीवर' ह्या जागीं '१२७ व्या बंदाच्या डोकीवर.' ह्या बदलामुळें थोडी संशयाला जागा झाली. म्हणजे एकाधिक बंदांवर हें ग्रंथनाम नसून नांव तेंच पण एका १२७ व्या बंदावर हें नांव आहे. सारांश, पांचहि आवृत्तींत 'भाऊसाहेबांची बखर' हेंच ह्या ग्रंथाचें नांव व तें स्वतः बखरग्रंथलेखकानें दिलेलें आहे; ह्या समजुतीनें संपादकांनीं साधार सांगून त्या नांवानें ग्रंथ प्रसिद्ध केला.

ग्रंथनामासाठीं त्याचे आद्यन्त पाहतांहि हेंच नांव ग्रंथलेखकास अभिप्रेत असावें असें दिसून येतें. 'भाऊ गर्दी होऊन प्यादेमात कशी झाली' असा प्रश्न प्रारंभीं ग्रंथलेखनासाठीं लेखकानें विषयदिग्दर्शनार्थ घेतला (पृ. २). आणि 'भाऊसाहेब गैब झाल्यावर' (पृ. १७४ व १८६) 'याप्रमाणें वर्तमान झालें. नजीबखान प्यादा होता तो फर्जी जाला व त्याने प्यादेमात केली.' हें त्या प्रश्नाचें उत्तर देऊन तो विषयलेख पूर्ण केला (पृ. १८७). अर्थात् ग्रंथलेखकास 'भाऊगर्दी' कथन करावयाची होती व ती त्यानें लिहून सांगितल्यानंतर म्हणजे ग्रंथाच्या प्रारंभीं व समाप्तीस ह्या आपल्या ईप्सितांचा निर्देश केला आहे.

ग्रंथकाराच्या उद्दिष्टाप्रमाणें ग्रंथांतील निरनिराळ्या व्यक्तींचे उल्लेख पाहतां असें दिसून येईल कीं, ग्रंथकारानें भाऊसाहेबांविषयीं जसे आदराचे उद्गार काढले तसे दुसऱ्या कोणाहि व्यक्तीबद्दल काढलेले नाहींत. 'भाऊसाहेब ईश्वरी अंश' इत्यादि (पृ. १७७–१३८) अशा आदराचे धनी असलेल्या भाऊसाहेबांवर गर्दी होऊन प्यादेमात कशी झाली, ह्या प्रसंगाकडे लेखक वाचकांस नेत आहे. हें लक्षांत घेतलें म्हणजे ग्रंथाला लेखकानें स्वतःच नांव दिलेलें असणें, त्या नांवाचा ग्रंथाचे आद्यन्तीं निर्देश केलेला असणें, ह्या दोन्ही गोष्टीलाच जुळेल असें ग्रंथान्तरीं लेखन येणें आणि नामनिर्दिष्ट जें मुख्य प्रतिपादन तेंच आपण क्रमानें पाहात व लक्षांत घेत आलों ह्याची वाचतांना प्रचीति येणें ह्या सर्व गोष्टींनीं 'भाऊसाहेबांची बखर' हेंच नांव सर्वतोपरी सुयुक्त आहे असें सहज दिसून येईल.

असें असतां कांहीं विद्वान् अभ्यासक ही शिंदे यांची बखर आहे, असा पक्ष आग्रहपुरस्सर मांडतात. ह्या त्यांच्या म्हणण्यास ते, लेखक ज्या अनेक व्यक्तींचा संबंध ग्रंथांत आला आहे त्यांपैकीं शिंदे–सरदार–मंडळीविषयीं अधिक आदरानें व आपलेपणानें लिहितो, हा पुरावा देतात. आमचें म्हणणें इतकेंच कीं, हा पुरावा, भाऊसाहेब सोडून इतर व्यक्ति व शिंदे–सरदार ह्यांच्या पुरता लक्षांत घेतां खरा आहे. मल्हारराव होळकर, राघोबादादा, विश्वासराव, इब्राहमखान, सुरजमल जाट इत्यादि प्रमुख व्यक्ति आणि शिंदे–सरदार मंडळी, ह्यांमध्यें पाहतांना शिंदे यांजविषयीं लेखकाचा जिव्हाळा अधिक आपुलकीचा आहे हें निश्चित व शिंदे मंडळी तशाच आदराची आहेत हेंहि खरें. पण एवढ्यावरून ग्रंथच शिंद्यांच्यासाठीं व त्यांचेंच नांव ग्रंथास पाहिजे, हें म्हणणें वरील आधार लक्षांत घेतां लेखकाच्याच

(११) क्रमांक ४८६ वि. इति. हा. नं. दि. 24-3-1

उद्दिष्टाला सोडून होतें असें वाटतें. तें चारहि आधार सोडून अभ्यासकांच्या पक्षदृष्टीनें पाहतां असेंहि म्हणतां येईल कीं, ग्रंथास सुरजमल जाटाची बखर असेंहि नांव दिलें असतां चालेल. कारण, शिंदे–सरदारांच्याप्रमाणें ह्या जाटाबद्दलहि लेखकानें अत्यंत आदरानें लिहिलेलें आहे. इतकेंच नव्हे तर शिंदे यांची एकदोन ठिकाणीं तरी जरा लंगडी बाजू वाटेल अशी लेखकानें सांगितली आहे. तितकीहि सुरजमल जाटाविषयीं नाहीं. आणि सुरजमल जाठाचा संबंध शिंदे–सरदार यांजप्रमाणें ग्रंथारंभापासून तों ग्रंथान्तापर्यंत आलाहि आहे. किंबहुना थोडा अधिकच आला आहे. पानिपत पळानंतर त्या पळांतील मंडळींना जाटाचें उदार मनानें झालेलें साहाय्य लेखकानें कौतुकानें व आदर उत्पन्न होईल असेंच वर्णिलें आहे. असें आहे म्हणून जाटाचें नांव ग्रंथाला हवें हें म्हणणें जसें अयुक्त तसेंच शिंद्यांची बखर हेंहि म्हणणें आवश्यक नाहीं. हा पक्ष मांडणारांनीं, भाऊसाहेबांची बखर' हें नांव आकर्षक म्हणून साने यांनीं दिलें इतकेंच; असेंहि तेथें म्हटलें आहे (हो. कै. प्रस्तावना य. ना. केळकर). पण हा मुद्दा तितकाहि सबल नाहीं. कारण 'शिंदे यांची कैफियत' अथवा 'शिंदे यांची बखर' हें नांव 'भाऊसाहेबांची बखर' या नांवाइतकेंच साधें वा आकर्षक आहे. आणि जर शिंदे यांजपेक्षां भाऊसाहेब ह्या व्यक्तीमुळें ह्या नांवांत आकर्षकता आली असेल तर मग ह्याहि दृष्टीनें भाऊसाहेबांची बखर हेंच नांव ह्या ग्रंथाला पाहिजे असें ओघानेंच येईल.

हचा ग्रंथाच्या नांवाविषयींची चर्चा शिंदेशाहीच्या इतिहासाचीं साधनें हचा मालेच्या तिसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत--भालेराई हें नांव तेथें आहे--पान २ ते ६ अशा ५ पानांवर विस्तृतपणें व चटकदार भाषेंत संपादकांनीं केली आहे. व तेथें 'शिंद्यांची बखर म्हणून कोणी स्वतंत्र ग्रंथ सांपडत नाहीं. तेव्हां वरील (म्हणजे सदर भाऊसाहेबांच्या) बखरीचेंच तर तें नांव नसेल ना असा स्वाभाविक शोध लावून बोध केला आहे. ही चर्चा करतांना 'भाऊगर्दी' हें नांव ग्रंथकर्त्यानें नवीन निर्माण करून भाऊसाहेबांविरुद्ध अथपासून इतिपर्यंत दोषच हचा बखर-ग्रंथांत दाखवून त्यांचें सार 'भाऊगर्दी' हचा नव्या नांवानें दिलें आहे असेंहि तेथें म्हटलें आहे. आमचें म्हणणें येथें इतकेंच कीं, पानिपतच्या यशापयशाची चर्चा वेगळी आणि ग्रंथांच्या नांवाची चर्चा वेगळी. ग्रंथाच्या नांवाच्या चर्चेतील मुद्दे वाटले ते प्रारंभीं दिले आहेत. पानिपत युद्धप्रसंगींच्या प्रारंभापासून तों अखेरपर्यंत भाऊसाहेबांच्या चुका झाल्या व शेवटीं 'भाऊगर्दी' हचा साररूपानें त्या फलित झाल्या, हें जरी चर्चेकरितां क्षणभर गृहीत धरलें तरी त्यामुळें फार झालें तर 'भाऊगर्दीची बखर' असें नांव देणें आवश्यक होईल. ग्रंथलेखकाचा सर्वच लेखनभाग आतां ससूचिक हचा आवृत्तींत आला आहे. वाचकांनीं तीं तीं व्यक्तिनामें अवश्य ताडून पाहावीं व तेथील संग-वर्णन ध्यानीं आणावें. असा भरंवसा वाटतो कीं, भाऊसाहेबांच्या हातून जो कांहीं केव्हां प्रमाद घडला असें ग्रंथलेखकानें सांगितलें आहे तेथें कोठेंहि

भाऊसाहेबांविषयीं दोषयुक्त शेरा देऊन उणा शब्द वापरला नाहीं. उलट असेंच आढळेल कीं, 'भाऊसाहेबांचे नेत्र दत्ताजीचा पराक्रम पाहून संतोषित जाले'; (४७–४३) 'भाऊसाहेब यांस तोंड काय दाखवावें' असें दत्ताजी म्हणतात (७९–७३) व हे भाऊसाहेब म्हणजे बखरलेखकाच्या मतें कोण तर 'भाऊसाहेब ईश्वरी अंश' (१७७–१३८). 'अंगावर ब्रम्हांड कोसळलें तरी हिंमत हरली नाहीं. भाऊसो यांजप्रमाणें पराक्रमी दुसरा होणें असाध्य गोष्ट.' १७३ इ.

बखर-ग्रंथलेखकानें 'रामचंद्रजी वनवासास गेल्यावर मागें दशरथास रघुनाथ वियोगाचें दुःख होऊन 'राम' 'राम' म्हणतां शोक करून प्राणत्याग केला त्याप्रमाणें नानासाहेब भाऊसाहेबांच्या शोकें निधन पावले', 'नानासो भाऊसो अवतारी पुरुष,' 'रामभरताची साम्यता', 'मनुष्यलोकीं यामागें कोठेंहि जाले नाहींत व पुढेंहि होणें कठीण' (पृ. १८६) इत्यादि जेथें लिहिलें तेथें त्या ग्रंथलेखकांसच भाऊसाहेब हें नांव अभिप्रेत नसावें असें मानणें कठीण आहे. (शि. इ. सा. भा. ३ प्र. पृ. २) असो.

आमच्या मतें 'गर्दी' ह्या शब्दाची जोड देऊन भाऊंच्या दोषांचें सार सांगण्याकरतां 'भाऊगर्दी' असा शब्दसंयोग बखर लेखकानें नवीन निर्माण केला असेंहि मानण्याचें कारण नाहीं. एकाद्यास त्याच्या मृत्यूसाठीं धुळीस किंवा भुईस मिळविणें व त्याकरतां गर्दी करून जाणें ह्या अर्थीं 'गर्दी' हा शब्द बखरवाङमयांत व पत्रांतूनहि आलेला आहे. 'गांव लुटून गर्दी करावी' म्हणजे गांवची लूट करून त्याच्या पुढची पायरी, गांवांतील माणसें मारावी ह्या अर्थी तो प्रयोग खं. १ ले. २८६ मध्यें आला आहे. दमाजी गायकवाड यांनीं राघोबादादांना लिहिलेल्या पत्रांतहि ह्या अर्थानें हा शब्द आला आहे. बडोदा वेंचे १ ले. ८०. हीं दोनहि पत्रें भाऊगर्दीच्या वर्षांतीलच आहेत. ह्यावरून गर्दी शब्दानें धूळदाण सांगणें हें नवीन नाहीं असें दिसून येईल.

घराण्याच्या बखर–किंवा कैफियत-लेखनासंबंधीं नियम म्हणून मानितां येईल असें एक वाक्य एका बखरीच्या प्रारंभीं आलें आहे. 'वंशाचा व कीर्तीचा विस्तार लिहितों' (हरिवं. ब. पृ. १) ह्या वाक्यांत घराण्याची बखर लिहिण्यास लेखक कां प्रवृत्त होतो हें ठेंठें चांगलें म्हणजे थोडक्यांत व संपूर्ण सांगितलें आहे. वंशाला, एका व्यक्तीला नव्हे, पिढ्यानुपिढ्या कीर्तीचें साहचर्य पाहिजे, तर तें घराणें, तें 'वंशानुचरित' मी लिहीन, असें लेखक सांगतो. (पुराणाच्या लक्षणांत 'वंशानुचरितं' हें गुणलक्षण आलें आहे, पुराणांतील वंशावळींतून कीर्तिहीन व्यक्ति वगळल्या आहेत). ज्या घराण्यानें कीर्तिमान माणसें समाजाला व देशाला, परंपरेनें पुरविलीं आहेत म्हणजे जो समाज अशा घराण्यांनीं किंवा व्यक्तींनीं संपन्न व युक्त राहण्याची काळजी वाहतो तो समाज व देश सुस्थित होय. अस्तु. तर होळकर घराण्याच्या कैफियतीप्रमाणें भाऊसाहेबांची बखर ही शिंद्यांची कैफियत किंवा बखर म्हणतां येणार नाहीं. श्री. फाळके अपेक्षितात तशी शिंद्यांची बखर

असावयास पाहिजे, तसे तें घराणें आहेहि. पण त्या घराण्याची बखर ती ही नाहीं. तसेंच, भाऊसाहेब, रघुनाथराव, नानासाहेब ह्यांच्या कामगिरीचाहि निर्देश प्रस्तुत बखरींत आला असला तरी ही पेशव्यांचीहि बखर नाहीं. ही 'भाऊगर्दीची' अथवा ह्यापेक्षां बरें नांव द्यावयाचें तर 'भाऊसाहेबांची बखर' आहे. पानिपतचीहि ही बखर नव्हे. कां, तर लेखक सांगतो नजीबखानासारखा अगदीं साधा प्यादा, वजीर असलेल्या भाऊवर फर्जी होऊन गर्दीची मात करतो हा काय प्रसंग! तर ती 'मात' मला सांगावयाची आहे. ही मात पानिपत ह्या पट-घरांत झाली, म्हणून कथनीयतेचे गुण 'भाऊगर्दी' ह्या शब्दयुगुलांत जसे आहेत तसे पानिपत ह्या अभिधेंत नाहींत. एवंच ह्या बखरीचें नांव 'भाऊसाहेबांची बखर' हेंच सुयुक्त वाटतें.

ग्रंथाच्या नांवाबद्दल ही स्पष्टता झाल्यानंतर ह्या बखरीच्या लेखकासंबंधानें थोडेसें लिहिणें आवश्यक आहे. प्रस्तुत आवृत्तीच्या प्रारंभींच ह्या बखरलेखकाबद्दल टीपेंत सांगितलेंच आहे कीं, ह्या गोष्टीचा अद्याप निर्णय लागलेला नाहीं. वर बखरीच्या नांवाबद्दल लिहिलें, त्यांत एके ठिकाणीं लिहिल्यावरून हें आपल्या ध्यानीं येईल कीं, लेखक शिंदे घराण्याविषयीं अधिक आत्मीयता असलेला असा आहे. बखरीच्या एका प्रतींत 'चिंतामण गोविंद' हें लेखक म्हणून नांव आलेलें आहे. शिंद्यांच्या पदरीं 'चिंतो कृष्ण' हा फडणीस म्हणून होता व त्याचीं पत्रेंहि ह्या पानपताप्रसंगावधींतील छापलीं आहेत. तेव्हां तोच हा 'चिंतो' असावा असा पक्ष शि. शा. इ. चीं साधनें भा. ३ च्या प्रस्तावनेंत संपादक श्री. आनंदराव भाऊ फाळके ह्यांनीं मांडला आहे. चिंतामणचें चिंतो होऊं शकतें; पण कृष्णाचें गोविंद कसें व्हावयाचें? बरें, दुसऱ्या एका प्रतींत ह्या बखरीचा लेखक 'कृष्णाजी शामराव' हा आलेला आहे. एकाच बखरीच्या नकला असलेल्या ह्या दोन्ही लेखकांच्या व त्याबरोबर ज्यांच्यासाठीं ही बखर लिहिली त्यांच्या नांवांत बदल होण्याचें कारण काय, ही पहिलीच मोठी अडचण वाटते. एखाद्या ऐतिहासिक मूळ पत्राची वा लेखाची नक्कलप्रत करतांना अक्षर लागलें नाहीं म्हणून मुळाशीं जवळ असलेलें अक्षरवळण ध्यानीं आणून कल्पनेनें दुसराच शब्द लिहिणें हें घडूं शकतें; पण 'व्यंकप्पा नाईक दिंडोरे' या जागीं 'गणेशपंत' आणि 'कृष्णाजी शामराव' ह्या जागीं 'चिंतामण गोविंद' इतका बदल नकलकार कसा करूं शकेल? नकल करतांना हवी असलेली भर घातलेलीं उदाहरणेंहि आहेत. आणि अक्षरें न लागल्यामुळें अगदीं वेगळें लिहिणें झालेलें अशींहि उदाहरणें आहेत. पण वरील फरक हा नकल करण्यांतला म्हणून अंतर्भूत होऊं शकणार नाहीं. फरक तर आहे. ह्या विरोधाचा परिहार श्री. फाळके ह्यांनीं लेखकापुरता वेगळा दर्शित केला आहे. त्यांचें म्हणणें कृष्णाजी शामराव हें चिंतो कृष्णाचें टोपण नांव मानावें आणि स्वतः चिंतो कृष्णाचें चिंतामण गोविंद. हें कसें? तर गोविंद व कृष्ण हीं एकाच श्रीकृष्णाचीं नांवें आहेत असें गृहीत धरावें. बरें, हा फेर फारच असला तरी तो क्षणभर मानला; पण व्यंकापा दिंडोरे या जागीं नुसतें गणेशपंत हें कसें

उलगडावयाचें ? ह्या नांवाबद्दल त्यांनीं कांहीं कल्पना चालविलेली दिसत नाहीं. आमच्या मतें ह्या असल्या विवेचनापेक्षां हा प्रश्न वादग्रस्त मानून अधिक संशोधन करवयास पाहिजे; असें म्हणणें हें अधिक प्रशस्त. ह्याबाबत चौकशी करतां पूर्वी वेळापूर (पंढरपूरजवळ) मेथें दिंडोरे घराणें होतें एवढें कळतें. (दिंड–चें दिंडोरे, वा दिंडोरी–चें दिंडोरे होईल.) पंढरपूर येथें दिंडोरे हें सावकारी व कापडाचा व्यापार करणारें घराणें आज असून त्यांच्या वंशावळींत व्यंकटेश हें नांव आणि तें पानपतप्रसंगकालांत येणारें असें आढळतें. ह्या नांवाची त्या वंशावळींत एकदां आवृत्तीहि दिसून येते.

दिंडोरवंश

भवानीपंत

व्यंकटेश

लक्ष्मण मनोहर विठल

व्यंकटेश व त्रिंबक

श्रीधर

रामकृष्ण व नारायण व केशव

विष्णु

रामकृष्ण

ह्या घरांण्यांत पूर्वीपासून कापडाचाच व्यापार चालत आला असून आजहि तो व्यवहार हें घराणें करीत आहे. सावकारी करणाऱ्या ब्राह्मण घराण्याला 'नाईक' ही पदवी इतिहासकालीं लाविली जात असे, हें सर्वश्रुत आहे. तसेंच सावकारी, हुंडयांची देवघेव करणारे हे कापडाचीं दिडें घेऊन खरेदी-विक्री करीत हिंडत हेंहि सांगणें नको. ह्या घराण्याचा वेळापूर गांवाशीं संबंध कसा हें त्यांजकडून कळलें नाही. तसेंच ह्या दिंडोऱ्यांची दिल्लींत एखादी पेढी असून तीवर कृष्णाजी शामराव असा कोणी गुमास्ता होता कीं काय, ह्याचा तपास घेतला पाहिजे. असा जरी नाममात्र सुगावा व्यंकापा नाइकांचा आज लागला तरी प्रत्यक्ष आधार म्हणून वहींतील उतारे वगैरे हातीं आले नाहींत. तसेंच एका प्रतींतील लेखकवाचकांची ही जोडी किंचिन्मात्र दर्शित झाली असें कल्पिलें तरी दुसऱ्या प्रतींतील गणेशपंत व चितामण गोविंद ह्या जोडीविषयीं काय म्हणावयाचें ? पहिला प्रश्न हा कीं आधीचें नांव व्यंकपा नाईक किंवा गणेशपंत ह्यांच्या जोडीपैकी कोणचेंहि असो; एकाच्या जागीं दुसरें, एकाच ग्रंथाच्या नकलेंत कसें यावें ? अशा फरकाला नकल म्हणण्यापेक्षां नवीच रचना म्हणणें हें अधिक सयुक्तिक. एकंदरींत ह्या बखरग्रंथाच्या लेखक-वाचकांची बाब ही अनिर्णीत व संशोध्य आहे इतकेंच म्हणून शोध करण्यास लागणें एवढेंच मुख्यतः सार म्हणून येथें सांगणें आवश्यक वाटतें.

ऐतिहासिक पत्रादिकांचा लेखक कोण हें, तसेंच तीं कोणच्या मायन्यांत कोणाला लिहिलीं, हें कळणें अति आवश्यक असतें. तसें ह्या बखरग्रंथाच्या बाबतीं-

तहि आहे; पण तितकें नाहीं. प्रत्यक्ष ग्रंथांत काय व कशा भाषेंत सांगितलें हाच ह्या ग्रंथाकडे पाहण्यांतला मुख्य भाग आहे. ह्या दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथाच्या भाषेबद्दल व ह्यांत आलेल्या इतिहासवृत्ताबद्दल थोडक्यांत लिहूं.

प्रस्तुत हें एक सांगणें येथें अवश्य वाटतें कीं, हा ग्रंथ 'बखर' ह्या नांवानें प्रसिद्ध होत आहे व परिचितहि आहे, ही एका अर्थीं उत्तम गोष्ट आहे. म्हणजे असें कीं, 'बखर', 'कैफियत' असें कांहीं म्हटलें कीं, नाक मुरडून बाजूस टाकण्याची ही वस्तु, असा जो समज कांहीं बखरींच्या योगानें झाला त्या समजाला उत्तर देणारे जें कांहीं बखरग्रंथ आहेत त्यांतील सर्वश्रेष्ठ असा हा बखर-ग्रंथ आहे. बखरीसंबंधानें असा जो समज झाला म्हणजे करून दिला तो वास्तव इतिहासाच्या आस्थेमुळेंच होय. इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्या इतिहास-विषयक लेखांनीं विशेषतः बखरींस अनुसरून जें त्यांनीं लिहिलें त्यामुळें बखर म्हटली कीं टाकाऊ, बखरीचा अभ्यास म्हणजे वृथा श्रम, असा सर्वसामान्य वाचकांचाहि ग्रह होऊन बसला व तो सर्वस्वी चूक असेंहि नाहीं. कारण कांहीं बखरी तशा आहेतहि किंवा कोणचीहि बखर ह्या समजाचें कांहीं कमीअधिक अंशानें कारण असेलहि. पण कांहीं बखरग्रंथ असेहि आहेत कीं त्याच राजवाडे यांना अशा बखरींविषयीं संतोषोद्गार काढावे लागले. राजवाडे यांनीं बखरींतील पंच विपर्यास--काल-स्थल-व्यक्ति, प्रसंग व कारण विपर्यास-- साधार आणि ओजस्वी भाषेंत स्पष्टपणें दाखवून दिल्यामुळें, चिपळूणकरांच्या निबंधमालेप्रमाणें महाराष्ट्र वाचकांची वृत्तीच बदलून म्हणजे बखरीवरील उठून अस्सल ऐ. पत्रांवर खिळून गेली. ऐतिहासिक घटनांचे अधिकृत असे पहिले अभ्यसनीय लेख म्हणजे [1]पत्रें; व तीं जमविणें, ती अभ्यासणें, तीं छापणें, त्या आधारें आत्मवृत्त ध्यानीं आणणें, हें निदान जाणत्या जनतेनें करावें, हा राजवाड्यांचा आग्रह. इतिहास-वाङ्मयाच्या बाबतींत श्रद्धा व अभ्यासाचें स्थानच त्यांना ह्याप्रमाणें महाराष्ट्रवाचकांचें बदलावयाचें असल्यामुळें तेव्हां म्हणजे पन्नास वर्षांपूर्वी तसा हल्ला बखर-ग्रंथांवर केला व वरील समज त्याअनुसार झाला. दुसरें हेंहि येथें लक्षांत घ्यावें कीं, ज्या राजवाड्यांनीं बखरीविषयीं असा समज करून दिला व पत्रें अभ्यासांत घ्या असें म्हटलें; त्याच राजवाड्यांनीं आपल्या इतिहाससाधनांतून बखरीहि छापल्याच म्हणजे पत्राच्या सापेक्षतेनें बखर-ग्रंथ हे दुय्यमतिय्यम इतकेंच. पत्रें व बखरी ह्यांचीं स्थानें ओळखून तो अभ्यास व्हावा असें त्यांचें म्हणणें.

---

१. काव्येतिहाससंग्रह-मासिकाच्या प्रसिद्धिपत्रकांत मासिकाचा उद्देश सांगतांना इतिहास म्हणजे बखरी छापणें (मोडक व साने इ. १८७८) एवढाच उल्लेख दोनदां पृ. १ व ३ वर दिला आहे. बखरग्रंथांना तेथें इतिहाससाधन म्हणून सांगून 'पत्रें' इत्यादि लेखांना 'किरकोळ' म्हटलें आहे.

पण आतां राजवाडे यांच्या अपेक्षेप्रमाणें ती कामगिरी सफल होत चालली आहे. ऐ०–पत्रांचे शेंकडों ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, निरनिराळ्या प्रकारें अभ्यासिले जात आहेत, त्या आधारें मोठमोठें प्रबंध-लेखन होऊं लागलें आहे आणि खरेशास्त्री यांनीं सांगितल्याप्रमाणें ज्यांनीं प्रत्यक्ष इतिहास घडविला व आपल्या लेखरूपानें तो लिहून सांगून टाकला अशीं त्यांचीं तीं मूळ पत्रेंच आतां इतिहासाभ्यासाचा प्रमुख भाग म्हणून मानलीं जात आहेत. आतां ह्या मूल-गामी इतिहासाभ्यासामुळें अशी वेळ आली आहे कीं, पत्रें जरी झालीं तरी इतिहास-घटना मर्यादितच कथन करणार आणि विश्वसनीय आणि मान्य बखर ग्रंथ हेहि मर्यादितच माहिती देणार. म्हणून दोहोंचाहि अभ्यास परस्पर-पूरक या नात्यानें व्हावयास हवा. शिवभारतांत दादाजी कोंडदेवांचा आणि सभासदी बखरींत कान्होजी जेध्यांचा निर्देशहि नाहीं आणि पत्राधारें दोघांचा उल्लेखच काय पण कामगिरीहि विस्तृतपणें सांगतां येते. सारांश, पत्रांतील तपशील––व वर्णन—पूर्ततेसाठीं बखरग्रंथ आणि बखरग्रंथांतील उल्लेखांना पत्रांचे आधार व अशा परस्परपूरक सहयोगानें दोघांचेंहि अभ्यसन व प्रकाशन व्हाव-यास पाहिजे. प्रस्तुत बखरग्रंथ अशा दृष्टीनेंच वाचकांपुढें सादर करण्याचा यत्न केला आहे. इत्यर्थ कीं, बखरग्रंथाविषयींचा नुसता समज बदलविणारी ही बखर प्रकाशित होत नसून पत्राधारें ती कोठें व किती सार्थ आहे अथवा कितपत सुसंगत वा विसंगत आहे आणि पत्रें कोठें कोणची अधिक माहिती देतात हें लक्षांत आणून देण्याच्या नात्यानें हें बखर-प्रकाशन होत आहे.

हचा 'भाऊसाहेबांची बखर' ग्रंथाचें हें सहावें प्रकाशन आहे. बखरीच्या नांवाची चर्चा प्रारंभीं केली त्यांत १८७९ ते १९३२ पर्यंत ५ आवृत्त्या हचा बखर-ग्रंथाच्या निघाल्या हें आलें आहे. म्हणजे पिढचानुपिढचा हचा ग्रंथाच्या आवृत्त्या निघत आहेत, हेंच एक हचा बखरग्रंथाच्या श्रेष्ठतेचें गमक आहे. हें महत्त्व हचा ग्रंथास जें लाभलें तें त्यांतील भाषा व रचना हचामुळें होय. बखरीची भाषा तेजस्वी, सरस, बहुविध दाखले–दृष्टान्तादिकांनीं विविध माहिती देणारी आणि साहित्यगुणपूर्ण आहे. ही बखर लिहिणारा माहिती-गुणांचा सराफ आहेच; पण वाङमयमूल्याचाहि तो सावकार आहे. अनेक संस्कृत, हिंदी, सुभाषितें दोहरे त्यानें वापरले आहेत आणि वाक्प्रचार व म्हणी हचांचाहि उपयोग तो सहज करतो. हचामुळें तो तो रस परिपुष्ट झाला आहे. वाक्यरचनेचेंहि कौशल्य त्याचें लक्षांत घेण्याजोगें आहे आणि शब्दभरणा तर अमूप आहे. म्हणून तेंच तेंच वर्णन पण नवीन वठलें आहे. युद्धवर्णनें तर हचा ग्रंथांत मुख्य व पुष्कळ. पण हा प्रत्येक संग्रामरस वेगवेगळचा शब्दभाजनांतून आणि त्या त्या युद्धस्थानाशीं निगडित राहून देत राहिल्यामुळें भोक्त्या वाचकास समाधानप्राप्तीची ढेंकर आपोआप येते व पुन्हां ग्रंथवाचनास तो लोभावतो.

ह्या ग्रंथांत जी वाक्यरचना आली आहे तींत तृतीयान्त कर्ता आणि कर्तरिप्रमाणें क्रियापद अशीं वाक्यें पुष्कळ. म्हणजे कर्मणि प्रयोगानें वाक्याला आरंभ पण कर्तरि प्रयोगानुसार वाक्याचा शेवट; अशी वाक्यें हा,अधिकारी साने ह्यांनीं एके ठिकाणीं भाषा–दोष म्हणून सांगितला आहे. (सप्तप्र. प्रस्ताव पृ. ८). पण केवळ असें नाहीं. ह्या बखरींत अशीं वाक्यें जेवढीं म्हणून आलीं आहेत तीं बारकाईनें लक्षांत घेतलीं असतां अशा वाक्यांतील कर्तरी तृतीया ऊन-प्रत्ययान्त धातुसाधित शब्द पुढें असलेली अशी असल्यामुळें म्हणजे तृतीयेचा चरितार्थ किंवा तृतीयेचें सार्थक ह्या धातुसाधितानें होत असल्याकारणानें आणि त्याच तृतीयेचें प्रथमान्तरूपी पद पुढें अध्याहृत कर्तृपद म्हणून घेतल्यानें सर्व वाक्य बरोबर लागतें उदा० 'भाऊसाहेब **यांणीं** मुकाम करून तेथें राहिले. (पृ.–१४०); **त्यानें** हिमत धरून सोबतीस **होता** (१७५–१३६) **तिनें** हत्ती बसवून पायउतारा होऊन बुणग्याचे सुमारें **पलों लागली** (१७५–१३६); तें दादासाहेब **यांणीं** न ऐकतां कूच करून कुंभेरीचे रोखें **चालिले** (परि २); **सर्वत्रांनीं** विवेक करून जनकोजी सिंदे यांजवर नजर देऊन **राहिले** (२४–२३); 'याप्रमाणें **बकिलानें** खचित करून माघारे **आले** (३३–२७); येसाजी भोइटे **यांणीं** जागा सोडून पळो **लागले** (१४४); सिंदे **यांणीं** ती जागा फते करून शाहादानें वाजवीत खेतीवर उभे **राहिले** (१५–१३) इ. इ. ह्या सर्व वाक्यांतून तृतीयाविभक्तिक कर्तृनाम त्यापुढील धातुसाधितानें सार्थकी लागलें आहे व वर सांगितल्याप्रमाणें त्याच तृतीयान्त नामाचें प्रथमान्त रूप हें त्यापुढें आलेल्या कर्तरी वाक्यासाठीं अध्याहृत समजणें योग्य होईल. ऊनप्रत्ययी धातुसाधित पद पुढें नसतें आणि क्रियापद मात्र कर्तरी, तर तो दोष मानणें सयुक्तिक होतें. अशीं वाक्यें १७०–२३२, १४२, २९–२६, ३५–२८, १५–१३, २८–२५, ८३–७५, १४१ इ. ह्या ठिकाणीं आढळतील.

पृ. १५९ वरील 'खंडेराव नाईक निंबाळकर यांणीं केवळ सती पडते तसे जाले आणि त्या मुडद्यावर पडला.' ह्या वाक्याची रचना मात्र वेगळी झाली आहे येथें 'यांणीं' व 'पडला' हे शब्द कायम ठेवून मधील संबंधित मजकूर जर जुळता करून घ्यावयाचा तर 'यांणीं'च्या पुढें 'त्यास' केवळ सती पडते तसें होऊन [तो] त्या मुडद्यावर पडला' असें समजावयास पाहिजे. म्हणजे 'त्यास' हा शब्द अध्याहृत घेऊन आणि–जाले–च्या जागी 'होऊन' शब्द घालून व जाले–पुढील 'आणि' शब्द गाळून टाकिला पाहिजे; पण इतकें करण्यापेक्षां 'यांणीं' हा एकच शब्द अभावांत काढला व क्रियापद अनेकवचनी केलें म्हणजे वाक्य व्याकरणशुद्धहि होतें व अर्थहि लागतो. त्याहिपेक्षां ह्या वाक्यावरील टीपेंतील पाठ घेणें हें सर्वांत उत्तम. कारण त्यामुळें बळवंतराव मेहेंदळे ह्यांच्या मुडद्यावर पडोन मुडदा सोडविला. ह्यापेक्षां, मेहेंदळयांचें शिर कापावयास आलेल्या शत्रूवर पडोन मुडदा शिरविहीन करून देतां तो सोडविला हा अर्थ सांगणारा पाठ उत्तम व स्वीकार्य होय. असो. प्रस्तुत

इत्यर्थ कीं कर्मणि प्रयोगाप्रमाणें प्रारंभ केलेल्या वाक्याचें ऊन प्रत्ययान्त धातुसाधितानें सार्थक साधून कर्तरी प्रयोगांत शेवट होतो व अशा प्रकारें बखरींत आलेलीं असलीं वाक्यें व्याकरणदुष्ट ठरत नाहींत.

इतिहास कालीन लेखनाचा हीं वरील वाक्यें हा विशेष आहे. '**त्याणीं** यास घेऊन साताऱ्यास **गेले.**' (ह. ब. पृ. ६) '**यांणी** निराळे एक्या पालांत जाऊन **निजले**' (हरि. वं. ब. पृ. १२). अशींच वाक्यें सप्तप्रकरणात्मक शिव-चरित्रांतहि आलीं आहेत. म्हणजे ह्या सर्व वाक्यांतून गौण व मुख्य अशीं दोन वाक्यें मानून ऊन-प्रत्ययान्ताशीं तृतीयेचा संबंध असलेले गौण किंवा उपवाक्य आणि पुढील कर्तरी हें मुख्य वाक्य समजावयाचें.

तृतीया विभक्तिक कर्तृपदाबद्दल विवेचन चालू आहे म्हणून येथेंच लिहितों, प्रथमार्थी तृतीया 'याणीं (त्याणीं) तो आपले भरावर गेले' असा एक पाठ पृ. ३ परिच्छेद ४ वर आला आहे. येथें कर्तरी प्रयोग स्पष्ट असून ऊन प्रत्ययान्त धातूसाधित म्हणजे उपवाक्य वगैरे कांहीं नसून तृतीया विभक्तिक कर्तृपद आहे. 'ज्या गोष्टीचा तो आर्ज आम्हीं साहेबांस करावा ते समयीं आपण अव्हेर करावा' (पृ. १३० परि. १०५) ह्या वाक्यांत जसें एकदम जर-तर ह्यांपैकीं तर हेंच एक अव्यय घालतात व मागें योग्य त्या जागीं जर-ची सूचना अपेक्षितात म्हणजे तें आहे असें समजलें जाते' त्याप्रमाणें येथील वाक्यांत प्रथमच 'तो' घातला आहे; आणि क्रियापदाचीं रूपें विध्यर्थी पण अर्थतः प्रयोग स्वार्थी आहे. ज्या गोष्टींसाठीं (जो आवश्यक) तो अर्ज० 'करतो' आपण ० 'करता'. म्हणजे रूप विध्यर्थी आणि रीतिदर्शक प्रयोग स्वार्थी अशींहि वाक्यें आहेत.

स्वार्थी प्रत्ययाचा संकेतार्थी प्रयोग :—'आसें करितां कोणी कुमक न करीत तरी तुम्ही मोगलाई मसलत करून यश संपादावें. (पृ. १७ परि. १५) ह्या ठिकाणीं 'करीत' हा स्वार्थी प्रयोग 'केली' ह्या अर्थी आहे. 'केली' हा संकेत भूत होय. ह्या वाक्यांत 'करितां' हें तां-प्रत्ययान्त वर्तमान-कृदंत अव्यय 'करून' ह्या ऊन-प्रत्ययान्त धातुसाधिताच्या अर्थीं आलें आहे. अशाच तां-प्रत्ययान्ताचा भाववाचक नामाप्रमाणेंहि उपयोग केला आहे. 'परंतु जाबसाल 'करतां' उत्तम आहे' (परि. ९ पृ. ७) म्हणजे जाबसाल 'करणें' हें उत्तम आहे.

प्रयोग व क्रियापदाविषयीं थोडासा विचार केल्यानंतर आतां इतर नाम, अव्यय इत्यादि विषयीं पाहूं. 'त्यांत वाचले ते दाहांनीं पाचांनीं आगरियास पोंचले.' (पृ. ११० परि. ९०) ह्यांतील 'दाहांनीं पाचांनीं' ही प्रथमार्थी तृतीया आहे. म्हणजे 'जे वाचले ते दहा-दहा, पांच-पांच याप्रमाणें आग्र्यास आले. अगदीं ह्याचप्रमाणें संस्कृतांत असे प्रयोग आले आहेत. 'प्रायेण याज्ञिकः।' 'गोत्रेण गार्ग्यः' किंवा 'शतेन शतेन वत्सान्पाययति पयः।' गुराखी शंभर शंभर वासरें नेऊन यांना पाणी पाजतों. 'अलं श्रमेण' इत्यादि. तृतीया विभक्ति ज्या सात आठ

प्रसंगीं आवश्यक म्हणून सांगितलें आहे, त्यांत 'हेत्वर्थे तृतीया स्यात्।' ह्या नियमाच्या पोटांत हें वरील वाक्य यथार्थपणें बसतें. 'ऐशा संकटांतून फौज भागीरथीस पार गेली' (६४–६०) येथील 'भागीरथीस ही षष्ठचर्थी चतुर्थी आहे. 'शहरांत दाहा हजार गिलज्यानीं मारिलें' (३६–३०). 'एवढें असाध्य दुर्ग निर्माण केलें होतें. (४०–३३) ह्या दोन्ही ठिकाणीं क्रियापद नपुंसकलिंगी आहे. पण त्याचीं कारणें वेगवेगळीं आहेत. पहिल्या वाक्यांत 'मनुष्य' हा शब्द अध्याहृत घेऊन तो नपुंसकलिंगी मानावयाचा आहे आणि दुसऱ्या वाक्यांत दुर्ग शब्द प्रत्यक्ष असून तो संस्कृतप्रमाणेंच नपुंसकलिंगी लेखकानें योजिला आहे. पहिल्या वाक्यांत 'मनुष्य' हा शब्द अध्याहृत न मानतां 'लोक' हा शब्द अध्याहृत मानला तर मारिलें ह्या क्रियापदावर अनुस्वार नको आणि जर अनुस्वार मानला तर, 'जातौ एकवचनं' व 'सामान्ये नपुंसकं' ह्या न्यायानें 'मनुष्य शब्द इष्ट मानावा लागेल. दुसऱ्या वाक्यांत 'दुर्ग' शब्द संस्कृत न मानतां मराठी मानिला तर तो पुल्लिंगी समजला पाहिजे आणि मग 'केलें होतें' ह्यांतील दोन्हीं अनुस्वार काढावे लागतील. परंतु 'आग्रा' ह्या एका किल्ल्याबद्दलच लेखकास सांगावयाचें असल्यामुळ दुर्ग शब्द एकवचनी आहे व मग तो संस्कृतप्रमाणें नपुंसकलिंगीं एकवचनीं धरला तर 'केलें होतें' हे दोन्ही अनुस्वार मराठीच्या नियमाप्रमाणें सार्थ होतात.

गळंत शब्द असलेली म्हणजे अध्याहृत शब्द घ्यावें लागतात अशी कांहीं वाक्यरचना आहे व हचा अध्याहृतांत सविभक्त नामांप्रमाणें (रघुनाथराव दादासाहेब यांस विषाद येऊन [त्यांनीं] कुंभेरीस मोर्चे लाविले (परि. ४) संयुक्त क्रियापदांतीलहि एकादें पद अध्याहृत घ्यावें लागतें––'परंतु, किल्ला कोणास आला नाहीं' (पृ. ३९ परि. ३३). हचा वाक्यांत 'घेतां' हा शब्द अध्याहृत घ्यावा लागतो व तो घेतल्यानें संयुक्त क्रियापद सकर्मक होतें. नुसतें 'आला नाही' हें अकर्मक आहे पण 'घेतां' ह्या तां-प्रत्ययान्त 'घे' धातूचा कृदन्त समाविष्ट केल्यानें हा प्रयोग सकर्मक होतो.

'पूर्ववतप्रमाणें' १९–१९, ३६–२९ असे एका अर्थीं दोन प्रत्यय लावलेलेहि शब्द आढळतात. फारसी-संस्कृत संयुक्तरचनाहि आढळते. 'मीं.....आटके आलिकडील मुलूख देखील दक्षिण देशास समुद्रवलयांकित पृथ्वीचें स्वामित्व केलें' (पृ. २६–२५). 'देखील दक्षिण' व 'दक्षिण देशासह' असे दोन्ही भाषेंतील एका अर्थी प्रयोगरचना आली आहे. आणि हचांतहि देशासह-हचांतील 'देशास' हा शब्द लक्षांत घेण्याजोगा आहे. सैन्येनसह हचाचें जसें सैन्यानिशीं झालें त्याचप्रकारें 'देशासह'चें देशास एवढेंच रूप झालें आहे. फारसी शब्दाला संस्कृत प्रत्यय-'निखालस-ता' देखिली (१६३). हाच शब्द 'निखालसपणें' ह्या अर्थीहि म्हणजे तृतीया विभक्तिकहि आला आहे. (पृ, १६४)

ह्या ग्रंथामधील 'तों' ह्या अव्ययाचे अर्थ पुष्कळच दिसून येतात. 'तों गिलज्या पलीकडे यमुनेचे तीरीं नदीपार कोळजळेश्वराजवळ मुकाम होता' (१२६–१०३) येथें 'करून' हें गळंत आहे. अथवा 'गिलज्या-चा' असें मानावयास पाहिजे. व 'तों' समानकालिकक्रियाबोधक किंवा एकसमयावच्छिन्नक्रियाबोधक अव्यय आहे. 'तों दिलीचे किल्यांत रोहिले व गारदी नजीबखान यांजकडील चार हजार लोक किल्यांत होते.' (१२७–१०४) येथें 'किल्यांत' शब्द वाक्याचें आद्यन्तीं आला आणि 'तों' हें अव्यय एककालिकस्थलवाचक आलें आहे. 'तों इकडे दत्ताजी शिंदे घायाळ खालीं उतरले' (८९–७८). ह्या वाक्यांतील 'तों' हें वाक्यारंभक आहे.

'म्हणोन' ह्या क्रियार्थक ऊनप्रत्ययाचा 'असा, असें' ह्या सामान्य नामासारखा उपयोग केला आहे. 'मग भाऊसाहेब याणीं विचार केला कीं, अंतर्वेद प्रांतीं फौज पाठवावी. भागीरथीचे पुलावरून दुराणी रसद आणील ती मना करावी म्हणोन मनसुबा करून हातरोखा पाठविला' (१४७); 'मल्हारराव याणी उत्तर केलें कीं, हा विचार बलवंतराव यांस विचारावा; आमची साठी बुद्धि नाठी जाली, म्हणोन बोलून कानावर हात ठेविले' (१४२). 'कीं व म्हणोन' ह्याचा कारणबोधक उभयान्वयी अव्ययाप्रमाणें उपयोग केलेला अशींहि वाक्यें ह्या ग्रंथांत आहेत व अन्यत्रहि आढळतात. पण तेथें पहिलें वाक्यार्थच पुनः उद्धृत केलेलें असतें. 'आपला भाऊ सुलतानखान यास खंदारास पाठविलें कीं, दिलीचे पातशहास तुमचे हस्तगत करून चंदाजमानी तुझ्या मुलास देऊन पातशाहीहि देईन म्हणोन भावास खंदाहारास पाठविलें' ३४–२७. 'भाऊसाहेब याणीं इमान दिलें कीं, तुम्ही जेथें उडीं टाकोन राहाल तेथें आम्ही कतल होऊन म्हणोन **इमान प्रमाण दिल्हें**' (१६३). ह्याप्रमाणेंच १६१ पानावर वाक्य आलें आहे.

'तर, तरी' हें अव्यय विरोधार्थक व संकेतार्थक ह्या दोन्ही प्रकारें वापरलें आहे व त्याच्या लेखनाविषयीं साने यांनीं भेदप्रकारहि दर्शित केला आहे. पण 'इदूदन्ते दीर्घः' ह्या त्यांच्याच नियमाप्रमाणें विरोध येतो. म्हणून नियम तो येथें पाळला नाहीं असें दिसतें. पण अपवाद म्हणून व इतर असे लेखनिक संकेत इष्ट आहेत.

'जनकोजी शिंदे जखमी बायकामुलें लुटल्या' व 'मुलें बायका आलीं आहेत.' अशीं दोन वाक्यें एकाच पानावर (पृ. १००) आलीं आहेत. '(१३९) 'त्यांचीं मुलें व माणसें द्रव्याचे आशेनें बोटास पलिते लाविले कीं, (१४०) युद्धाचे धुंदींत घाबरी होऊन अवघें लक्ष पुढेंच होतें' (१६८–१३१), 'ती पळोन लष्करांत दाखल जाले' (१४३) असे व्याकरणविषयक कितीतरी भिन्न भिन्न प्रयोग ह्या बखर ग्रंथांत आले आहेत. त्या सर्वांचा विचार करणें येथें आतां शक्य नाहीं.

व्याकरण विचारापेक्षां ह्या ग्रंथांत आलेले वाक्प्रचार व म्हणी आणि विशिष्ट शब्दयोजना फारच फार उद्‌बोधक आहेत. त्यांचा तत्कालीन व्यवसाय, सामाजिक नीतिनियम, राजकारणी वृत्ति, धार्मिक दृष्टि इ. समजून येण्यास फार उपयोग आहे. लेखकानें मुसलमान लोकांच्या तोंडीं जी भाषा घातली आहे ती लक्षांत घेतली पाहिजे. फारसी वा उर्दू इ. मुसलमानी भाषा न घालतां संस्कृत-मिश्र हिंदी किंवा मराठी हिंदी भाषा वापरली आहे. हीहि गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे.

ह्या ग्रंथांत 'विषाद' शब्द जितक्या ठिकाणीं आला बहुतेक तितक्या सर्व ठिकाणीं त्याचा अर्थ 'क्रोध' असा आहे. मूळचा अर्थ 'खेद, दुःख' हा आहे. भाऊसाहेबांस दत्ताजीचा वध करणाऱ्या कुतुबशहास पाहून विषादाग्नि शमेनासा झाला होता' (१३९–११०) 'पुत्रशोकाचा विषाद मल्हारराव यास येऊन प्रतिज्ञा करिता जाहाला कीं, सुरजमल जाट याचा सिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरीच जन्मास आल्याचें सार्थक. इ.' (५–५) 'तेव्हां किलीजखान यास (आपणास दक्षणी बंदर-वानर म्हटल्याचा) विषाद आला. तलव्याची आग मस्तकास जाऊन बोलिला कीं, आजपासून सहा महिन्यांत पातशहा आदिकरून कुल दिलीस कर दिखलाऊ' इ. (२९–२६) इ. इ. दत्ताजी शिंद्यांस अबदालीनें ठार केल्याचें ऐकतांच भाऊसाहेबांनीं म्हटलें 'ज्याचा सेवक गांजिला त्याच्या जालेपणाची निर्फलता' ११३–९१ त्या वेळचा स्वामी-सेवक-संबंध असा होता म्हणून "अमृतं स्वामिगौरवम्" असें त्या काळचें अभिलषित होतें. तात्पर्य, पदरच्या एकनिष्ठ सरदारमित्राचा मृत्यु वा पुत्रशोक वा अपमान ह्यामुळें नुसतें वाईट वाटणें हेंच वाईट होय. तें वाईट करणाऱ्याविषयीं संताप उत्पन्न होणें व प्रतिकाराला लागणें येथेंच त्या वाईट वाटण्याचें पर्यवसान आहे. विदुलेनें पुत्रास त्याचा बाप व राज्य गेल्याचा नुसता शोक काय करीत बसलास असें जें म्हटलें किंवा चुलता धोंडोपंत मेल्याची उत्तरक्रिया धोंडया वाघाला मारल्याशिवाय करण्याची अनुज्ञाच बापू गोखल्याच्या चुलतीनें दिली नाहीं ह्या गोष्टी येथें लक्षांत येतात. सारांश—विषाद म्हणजे दुःख देणाऱ्या अपराध्यास शिक्षा करण्यास लावणारा संताप, हाच अर्थ बखरलेखकानें सांगितला. तोच त्या त्या प्रसंगास उचित आहे. एन्हवीं लेखकानें जेथें अन्य शोकप्रसंग वर्णिले तेथें विलाप, रडणें असलेच शब्द दिले आहेत. तेथें विषाद शब्द क्वचितच घातला किंवा पतिमृत्यूमुळें पत्नी सती निघाली तेथेंहि हा शब्द त्यास सुचला नाहीं. मराठींतील हा विषाद शब्दार्थ जर संस्कृतमध्यें असता तर, युद्धास प्रवृत्त करणाऱ्या गीतेंत भगवंतांनीं तशा विषादीस तामस गुणाचा असें म्हटलें नसतें. 'वानरी तेल' हा एक असाच संकेत पृ. २–३ वर आला आहे. ह्याचा नेमका व पुरता उलगडा होत नाहीं. कोशगत अर्थ येथें सर्वस्वीं जुळत नाहींत– 'सर्वनाश' हा अर्थ पंचतंत्रकथेनुसार तेथें दिला आहे. पण त्या कथेनुसार येथें घडलेलें नाहीं

हया ग्रंथामधील 'तों' हया अव्ययाचे अर्थ पुष्कळच दिसून येतात. 'तों गिलज्या पलीकडे यमुनेचे तीरीं नदीपार कोळजळेश्वराजवळ मुकाम होता' (१२६–१०३) येथें 'करून' हें गळंत आहे. अथवा 'गिलज्या-चा' असें मानावयास पाहिजे. व 'तों' समानकालिकक्रियाबोधक किंवा एकसमयावच्छिन्नक्रियाबोधक अव्यय आहे. 'तों दिलीचे किल्यांत रोहिले व गारदी नजीबखान यांजकडील चार हजार लोक किल्यांत होते.' (१२७–१०४) येथें 'किल्यांत' शब्द वाक्याचें आद्यन्तीं आला आणि 'तों' हें अव्यय एककालिकस्थलवाचक आलें आहे. 'तों इकडे दत्ताजी शिंदे घायाळ खालीं उतरले' (८९–७८). हया वाक्यांतील 'तों' हें वाक्यारंभक आहे.

'म्हणोन' हया क्रियार्थक ऊनप्रत्ययाचा 'असा, असें' हया सामान्य नामासारखा उपयोग केला आहे. 'मग भाऊसाहेब यांणीं विचार केला कीं, अंतर्वेद प्रांतीं फौज पाठवावी. भागीरथीचे पुलावरून दुराणी रसद आणील ती मना करावी म्हणोन मनसुबा करून हातरोखा पाठविला' (१४७); 'मल्हारराव याणी उत्तर केलें कीं, हा विचार बलवंतराव यांस विचारावा; आमची साठी बुद्धि नाठी जाली, म्हणोन बोलून कानावर हात ठेविले' (१४२). 'कीं व म्हणोन' हयाचा कारणबोधक उभयान्वयी अव्ययाप्रमाणें उपयोग केलेला अशींहि वाक्यें हया ग्रंथांत आहेत व अन्यत्रहि आढळतात. पण तेथें पहिलें वाक्यार्थच पुनः उद्धृत केलेलें असतें. 'आपला भाऊ सुलतानखान यास खंदारास पाठविलें कीं, दिलीचे पातशहास तुमचे हस्तगत करून चंदाजमानी तुझ्या मुलास देऊन पातशाहीहि देईन म्हणोन भावास खंदाहारास पाठविलें' ३४–२७. 'भाऊसाहेब यांणीं इमान दिलें कीं, तुम्ही जेथें उडीं टाकोन राहाल तेथें आम्ही कतल होऊन म्हणोन इमान प्रमाण दिल्हें' (१६३). हयाप्रमाणेंच १६१ पानावर वाक्य आलें आहे.

'तर, तरी' हें अव्यय विरोधार्थक व संकेतार्थक हया दोन्ही प्रकारें वापरलें आहे व त्याच्या लेखनाविषयीं साने यांनीं भेदप्रकारहि दर्शित केला आहे. पण 'इदूदन्ते दीर्घः' हया त्यांच्याच नियमाप्रमाणें विरोध येतो. म्हणून नियम तो येथें पाळला नाहीं असें दिसतें. पण अपवाद म्हणून व इतर असे लेखनिक संकेत इष्ट आहेत.

'जनकोजी शिंदे जखमी बायकामुलें लुटल्या' व 'मुलें बायका आलीं आहेत.' अशीं दोन वाक्यें एकाच पानावर (पृ. १००) आलीं आहेत. 'अंग रोमांच जालें' (१३९) 'त्यांचीं मुलें व माणसें द्रव्याचे आशेनें बोटास पलिते लाविले कीं, (१४०) युद्धाचे धुंदींत घाबरी होऊन अवघें लक्ष पुढेंच होतें' (१६८–१३१), 'ती पळोन लष्करांत दाखल जाले' (१४३) असे व्याकरणविषयक कितीतरी भिन्न भिन्न प्रयोग ह्या बखर ग्रंथांत आले आहेत. त्या सर्वांचा विचार करणें येथें आतां शक्य नाहीं.

व्याकरण विचारापेक्षां हच्या ग्रंथांत आलेले वाक्प्रचार व म्हणी आणि विशिष्ट शब्दयोजना फारच फार उद्‌बोधक आहेत. त्यांचा तत्कालीन व्यवसाय, सामाजिक नीतिनियम, राजकारणी वृत्ति, धार्मिक दृष्टि इ. समजून येण्यास फार उपयोग आहे. लेखकानें मुसलमान लोकांच्या तोंडीं जी भाषा घातली आहे ती लक्षांत घेतली पाहिजे. फारसी वा उर्दू इ. मुसलमानी भाषा न घालतां संस्कृत-मिश्र हिंदी किंवा मराठी हिंदी भाषा वापरली आहे. हीहि गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे.

हच्या ग्रंथांत 'विषाद' शब्द जितक्या ठिकाणीं आला बहुतेक तितक्या सर्व ठिकाणीं त्याचा अर्थ ' क्रोध ' असा आहे. मूळचा अर्थ 'खेद, दुःख' हा आहे. भाऊसाहेबांस दत्ताजीचा वध करणाऱ्या कुतुबशहास पाहून विषादाग्नि शमेनासा झाला होता ' (१३९–११०) 'पुत्रशोकाचा विषाद मल्हारराव यास येऊन प्रतिज्ञा करिता जाहाला कीं, सुरजमल जाट याचा सिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरीच जन्मास आल्याचें सार्थक. इ.' (५–५) ' तेव्हां किलीजखान यास (आपणास दक्षणी बंदर-वानर म्हटल्याचा) विषाद आला. तलव्याची आग मस्तकास जाऊन बोलिला कीं, आजपासून सहा महिन्यांत पातशहा आदिकरून कुल दिलीस कर दिखलाऊ' इ. (२९–२६) इ. इ. दत्ताजी शिंद्यांस अबदालीनें ठार केल्याचें ऐकतांच भाऊसाहेबांनीं म्हटलें 'ज्याचा सेवक गांजिला त्याच्या जालेपणाची निर्फलता' ११३–९१ त्या वेळचा स्वामी-सेवक-संबंध असा होता म्हणून "अमृतं स्वामिगौरवम्" असें त्या काळचें अभिलषित होतें. तात्पर्य, पदरच्या एकनिष्ठ सरदारमित्राचा मृत्यु वा पुत्रशोक वा अपमान ह्यामुळें नुसतें वाईट वाटणें हेंच वाईट होय. तें वाईट करणाऱ्याविषयीं संताप उत्पन्न होणें व प्रतिकाराला लागणें येथेंच त्या वाईट वाटण्याचें पर्यवसान आहे. विदुलेनें पुत्रास त्याचा बाप व राज्य गेल्याचा नुसता शोक काय करीत बसलास असें जें म्हटलें किंवा चुलता धोंडोपंत मेल्याची उत्तरक्रिया धोंडच्या वाघाला मारल्याशिवाय करण्याची अनुज्ञाच बापू गोखल्याच्या चुलतीनें दिली नाहीं ह्या गोष्टी येथें लक्षांत येतात. सारांश—विषाद म्हणजे दुःख देणाऱ्या अपराध्यास शिक्षा करण्यास लावणारा संताप, हाच अर्थ बखरलेखकानें सांगितला. तोच त्या त्या प्रसंगास उचित आहे. एन्हवीं लेखकानें जेथें अन्य शोकप्रसंग वर्णिले तेथें विलाप, रडणें असलेच शब्द दिले आहेत. तेथें विषाद शब्द क्वचितच घातला किंवा पतिमृत्यूमुळें पत्नी सती निघाली तेथेंहि हा शब्द त्यास सुचला नाहीं. मराठींतील हा विषाद शब्दार्थ जर संस्कृतमध्यें असता तर, युद्धास प्रवृत्त करणाऱ्या गीतेंत भगवंतांनीं तशा विषादीस तामस गुणाचा असें म्हटलें नसतें. ' वानरी तेल ' हा एक असाच संकेत पृ. २–३ वर आला आहे. ह्याचा नेमका व पुरता उलगडा होत नाहीं. कोशगत अर्थ येथें सर्वस्वीं जुळत नाहींत– 'सर्वनाश' हा अर्थ पंचतंत्रकथेनुसार तेथें दिला आहे. पण त्या कथेनुसार येथें घडलेलें नाहीं

व तेथें 'वेल' व 'मेद' (कपीनां मेदसा०) दर्शित आहेत. तेव्हां वाटतें कीं येथील मूळ प्रतींतील लेखनच नकलकारांस लागलें नसावें. मुंगीस पंख फुटणें (४–५) हा दृष्टांत ठीक आहे. उत्तरेंतील राजकीय परिस्थिति सांवरण्याऐवजीं घसरत व चिघळतच चालली हें ह्या 'वानरी तेल' प्रकारानें लेखकास सुचवावयाचें आहे असें दिसतें. वानराला झालेल्या जखमेंत ती बरी होण्यासाठीं तेल घालताना ती जखम दुसरा वानर अधिकच फाडतो तसा प्रकार होणें म्हणजे वानरी तेल प्रकार हा अर्थ कोषांत दिला आहे व तो सामान्यतः जुळतो.

'शाळवाचे पिकाप्रमाणें शिरें कापली,' 'इक्षुदंडांतून शर्करा निघावी त्याप्रमाणें ऊधसांतूनच नवनीत मिळावें.' (ऊधस् = कांस. ऊधस ह्याचेंच चुकीचें वाचन तुदगीच तुपगीच हें झालेलें दिसतें) ८७–७७; 'भाणवसांत ससा सांपडावा' ५६–५२; 'रांडेनें सावलें हुसकलें' ९१–७९ टीप पहा. 'टांक्यांनीं दगड फोडावा तसा तटस्थ' (टांकीनें घाव घातला तरच एकादी कपरी निघावयाची, नाहींतर नाहीं असा धोंड्यासारखा तटस्थ) ११२–९१. इत्यादि इत्यादि किती तरी विविध चटकदार दृष्टांत ह्या बखरींत आले आहेत. ह्यांतील कांहीं शब्द कोशांतच समाविष्ट केले आहेत ते पाहावे.

बखरींतील ऐतिहासिक वृत्तान्ताविषयीं लिहिणें अवश्य. एका अर्थीं नकोहि, कारण प्रकरणवार काल-पट दिलेच आहेत.

हा बखर––ग्रंथ इतिहास कालीन गद्य सारस्वताचा प्रातिनिधिक ग्रंथ समजून त्या आधारें तत्कालीन मराठी गद्यभाषेचे व्याकरण-नियम आंखण्याचा सामुहिक यत्न झाला पाहिजे. मराठी भाषा ही वाहती असून प्रगत व समृद्ध होत्साती प्रवास करीत आहे. प्रवासांत झालें तरी मुक्काम होतच असतात. इतिहासकालीन व मध्य महाराष्ट्राच्या मुक्कामांतील तिचें रूपगुण ह्याच बखर ग्रंथांच्याद्वारां आपणांस समजून घ्यावयाचे आहेत. तशा बखर ग्रंथांतील हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. तो झाला ह्या प्रकारें साजरा करून वाचकांचें हातीं देत आहे.

बखरीच्या लेखकासंबंधानें किंवा कथक-पृच्छक जोडीसंबंधानें पृ. १३–१४ वर लिहिलें. त्याच बाबतींत हें एक सांगावेंसें वाटतें कीं, ग्रंथ एकच पण पृच्छक व कथक ह्यांचीं नांवें वेगवेगळीं येतात ह्याचें कारण, इतिहासकालीं ग्रंथादिकांच्या नकला लिहून देणें हा स्वतंत्र व प्रतिष्ठित व्यवसाय होता. अशी एखादी नक्कल-प्रत ज्यानें करण्यास सांगितली व म्हणून लेखकानें प्रत लिहून काढली ह्या दोघांचीं नांवें प्रतींत प्रारंभी दाखल केलीं व ह्यामुळें एकाच ग्रंथाचे भिन्न पृच्छक व कथक येणें संभवनीय आहे.

शं. ना. जोशी
संपादक

पुरस्कार

भारत इतिहास संशोधक मंडळानें बखरीचे चिकित्सक संपादन करून नवीन बखरमाला प्रकाशित करावी अशी कल्पना अनेक वर्षें डोळ्यासमोर होती आणि तिचा उच्चारहि पुष्कळ वेळां केला. तथापि तो योग अल्पांशानें का होईना सिद्धीस जात असल्याचें पाहून वाटणारें समाधान येथें प्रकट करणें उचित होईल.

मनुष्य कथाप्रिय आहे. अनेक प्रसंगीं त्याला स्वतःसंबंधीं आणि लोकांसंबंधीं मागील आठवणी आठवतात त्या तो लोकांस आवडीनें सांगतो. आणि ज्याचें सांगणें चटकदार असेल त्याच्या भोंवतीं लहानमोठें श्रोते नेहमींच गराडा घालून कौतुकानें ऐकत बसलेले आढळणारच. अशा श्रोत्यांपैकीं कोणी एखादा हौशी गृहस्थ अथवा स्वतः कथाकथकच ह्या हकीकती लिहून ठेवतो. त्यावेळीं अशीं लिखितें नकलून नेऊन दूरदेशी असलेले जिज्ञासूहि आपली तृप्ति करून घेतात. 'भाऊसाहेबांची बखर' म्हणून जी नाणावलेली व लोकप्रिय झालेली बखर आहे ती अशी प्रकारेच लपिबद्ध झालेली असली पाहिजे. आज उपलब्ध झालेल्या सर्व मराठी बखरींत. 'भाऊसाहेबांची बखर' ही सर्वाद्य म्हणून पहिल्या क्रमांकाला लागलेली आहे. या महत्त्वाला ती पावण्याचें कारण तिचा विषय पाणिपतचा वीरकरुणमिश्रित प्रसंग असें घटकाभर वाटलें तरी वास्तविकपणें या बखरीच्या कर्त्याचें कथनकौशल्य हेंच या घटनेचें खरें कारण आहे. बखर लिहिणाऱ्याची शैली फार चटकदार, रसानुकूल आणि परिणामकारक साधली आहे. असल्या गुणांनी भरलेली दुसरी बखर इच्या जोडीला बसणारी सांपडणार नाहीं. सांप्रत या बखरीची योजना विद्यापीठीय अभ्यासक्रमांतहि वारंवार होत असते हें लक्षांत घेऊन या बखरीचें संस्कारयुक्त प्रकाशन प्रथम हातीं घेतलें; आणि संपादकीय बोजा आमचे सुहृद्वर श्री. वि. सी. चितळे यांजवर सोंपविला. श्री. चितळे मोठ्या हुरूपानें कामाला लागले. विविध टीपा-टिपणें त्यांनीं तयार केलीं होती. परंतु मुंबईस गेले असतां एकाएकीं हा लोक सोडून गेले. या बखरींत दुःखार्णवाचे प्रसंग बहुत आहेत तसलाच प्रसंग बखर-प्रकाशनमंडळावर आला! पुढें श्री. शंकरराव जोशी यांजकडे संपादनाचा भार दिला. तो त्यांनी आपल्या अनुभविक अभ्यासी संस्कारांनीं सिद्धीस नेला!

या बखरीला पहिला मुद्रणसंस्कार झाल्याला सुमारें पाऊणशें वर्षें झालीं तेव्हां १८७९ चा डिसेंबर होता आणि आजचें प्रकाशन नोव्हेंबर १९५५ त होत आहे. इतक्या दीर्घ काल या बखरीची लोकप्रियता सतत वर्धमान आहे. चाल-कहीना भरंवसा वाटतो कीं त या बखरीला यथार्थपणें लाभलेली लोकप्रियता अधिका-

धिक वाढत जाईल आणि संवर्धित आणि संस्कारित अशा तिच्या अनेक वरचढ आवृत्या प्रकाशित करून वाचक-अभ्यासक यांची सेवा त्यांना बजावतां येईल.

मूळ क्रमानें सहाव्या परंतु आमच्या क्रमानें पहिल्याच अशा या आवृत्तीचे विशेष श्री. जोशी यांनीं विस्तारानें पुढें मांडलेचं आहेत. श्री. जोशी यांनीं नामचर्चा, लेखकशोध, बखरींतील भाषेचा रसास्वाद, भाषेच्या व्याकरणाची चिकित्सा, बखरींतील ऐतिह्याचें तुलनात्मक परीक्षण आणि व्यक्ति-काल-स्थल सूचि यांची जोड देऊन आपलें कष्टदायक आणि आनंददायक उभय परिणामकारक कार्य प्रशंसनीयरीत्या शेवटास नेलें आहे.

असें थोडेंच आहे कीं संपादकांचें म्हणणें आपण नेहमीं ग्राह्यच केलें पाहिजे ? मग चिकित्सा कसली आणि चर्चेला तरी वाव कोठला ? सत्याचा शोध जसा नाजूक तसाच कठोरहि असतो. संपादकांनी अवश्य ते कष्ट आणि काळजी दाखविली आहे किंवा नाहीं हाच काय तो खरा प्रश्न.

यथार्थपणें तयार केलेली चिकित्सक व शास्त्रीय नांवाला पात्र असलेली बखरीची मुद्रित प्रत म्हटली कीं तिच्या प्रारंभीं ठळकपणें पुढील सूत्रें जाड ठशांत छापलेलीं असावीं. नव्या पिढींतल्या अभ्यासकांस तर हें मार्गदर्शन फारच आवश्यक असतें आणि अनेक पढिक पंडितांनाहि भ्रमांत पाडण्याचें कार्य मोहवश होऊन कित्येक संपादकांनीं केलेलें आहे आणि अद्यापिहि दुसरे कित्येक तसें करीत असतात. सूत्रें येणेंप्रमाणें :—

(१) मूळ बखर मोडी लिपींत लिहिलेली आहे.

(२) या मोडी प्रतींत विरामचिन्हें नसतात (तीं आमचेकडे इंग्रजी राज्यांत आलीं.)

(३) शब्द, वाक्यें, वगैरे तोडलेले नसतात. सर्व मजकूर एक सरळ सलग रेघ ओढून मोडींत लिहीत असतात.

(४) मोडींत सारें दीर्घच लिहावें लागतें. तसेंच अनुस्वार देतां येतात पण पुष्कळवेळां देत नाहींत किंवा नको तेथेंहि आढळतो. मात्रांबद्दलहि शैथिल्य आढळतें. ल-ळ, अ-आ, ब-बा, क-ला, म-द-प; व-वा; ज—न; या-का; ह-ध; यांच्या सारखवटपणामुळें घोटाळ्याला जागा होते.

(५) प्रकरणें आणि परिच्छेद संपादकांनीं पाडलेले आहेत.

म्हणून वाचकांनीं वरील सूत्रें ध्यानांत वागवावीं आणि संपादकीय संस्कारांना मूळ कल्पून चालूं नये.

आपण बखर-शब्द आणि बखर हा प्रकारच घेऊं. बखर-खबर- किंवा भाष्-बक्-बकणें असे अनेक प्रकार सुचवून बखर शब्दाची व्युत्पत्ति साधण्याचे प्रयत्न झालेले आहेत. बखेर-बखैर अशीहि या शब्दाचीं रूपें लिहिलेली आढळतात. तें कसेंहि असो, एक अनुमान बळकटपणें करावेंसें वाटतें आणि तें हें कीं बखरींचा

प्रकार आणि उत्तरेकडे राजस्थानांत आढळणारा 'ख्यात' हा प्रकार, या दोहो पुष्कळ साम्य व संबंध आहे किंबहुना लावणी, पोवाडे, बखरी या सर्व प्रकारांचें मूत राजस्थानांत शोधणें उचित ठरेल असें निश्चयपूर्वक वाटतें. कही, वातवाताँळ वचनिका, इत्यादि जे अनेक प्रकार डॉ. टेसिटोरीनें नमूद केले आहेत त्यांच्या सूक्ष्म अभ्यासानें या कल्पनेवर चांगला प्रकाश पडेल.

तसेंच पूर्वी अलीकडे देतात अशीं मोठीं विचारपूर्वक नांवें लिहिलेल्या बखरींना कितपत देत असतील याची शंकाच वाटते. 'भाऊसाहेबांची बखर' या नांवाचे मूळ सुचवितांना सुप्रसिद्ध संपादक कै. रावबहादुर काशीनाथपंत साने यांनीं १९२२ च्या भा. ब. च्या प्रस्तावनेंत पुणें प्रतीच्या डोकीवर नांव असल्याचें दिलें आहे. तें नांव वास्तविक भा. ब. असें नसून 'बखर भाऊसाहेबांची' असे उलटें लिहिलेलें आहे. आणि तें जुन्या प्रणालीस अधिक जुळून दिसते.

त्याप्रमाणेंच अर्थाच्या टीपांत 'वानरी तेलाचा प्रकार' याचा उलगडा पूर्वी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेंत प्रसिद्ध झाला होता. अशा शब्दचर्चाच वगैरे या बखरीच्या निमित्तानें प्रसिद्ध झालेल्या टिपणांचेहि संदर्भ एका परिशिष्टांच्या रूपानें द्यावयास पाहिजे व त्या टिपणांवरहि नवीन चिकित्सा सादर केली पाहिजे.

श्री. शंकरराव जोशी यांनी भा. ब. तील कथनाचें प्रामाण्य तोलून पहातां यावें म्हणून मूळ पत्रांतून ज्या घटनांचे उल्लेख आढळतात त्यांचा व भा. ब. तील विधानांचा पडताळा पाहतां यावा म्हणून प्रकरणवार अठरा कालपटांची योजना केली आहे. हें काम बरेंच कष्टाचें होतें. पण आतां हे कालपट हातीं घेऊन बखरीचा ऐतिहासिक घटनाप्रामाण्याच्या दृष्टीनें चिकित्सक अभ्यास करण्यास मोठें साहाय्य होईल.

ऐतिहासिक मराठी साहित्यांत भाऊसाहेब, गोविंदपंत बुंदेले, नानासाहेब प्रभृतींचीं स्वदस्तुरचीं अनेक पत्रें आपणांस सुदैवानें उपलब्ध झालीं आहेत. तशीं अबदाली, जाट प्रभृतींची झालीं पाहिजेत. वाढत्या संशोधनाचें वाढतें फळ पदरीं पडेल तसें चिकित्सेचें क्षेत्रहि वाढेल आणि आमची बखर-आवृत्तिहि अधिक संपन्न करतां येईल. चित्रें, नकाशे वगैरेची जोड खर्चाचें भय कमी होईल तशी देतां येईल. आज केलें आहे तेंच आपण सर्व वाचक, चिकित्सक, अभ्यासक यांनीं गोड करून घ्यावें एवढी विनंति आहे.

आश्विन शु. १२, १८७७ **दत्तो वामन पोतदार**

व तेथें 'वेल' व 'मेद' (कपीनां मेदसा०) दर्शित आहेत. तेव्हां वाटतें कीं येथील मूळ प्रतींतील लेखनच नकलकारांस लागलें नसावें. मुंगीस पंख फुटणें (४–५) हा दृष्टांत ठीक आहे. उत्तरेंतील राजकीय परिस्थिति सांवरण्याऐवजीं घसरत व चिघळतच चालली हें ह्या 'वानरी तेल' प्रकारानें लेखकास सुचवावयाचें आहे असें दिसतें. वानराला झालेल्या जखमेंत ती बरी होण्यासाठीं तेल घालताना ती जखम दुसरा वानर अधिकच फाडतो तसा प्रकार होणें म्हणजे वानरी तेल प्रकार हा अर्थ कोषांत दिला आहे व तो सामान्यतः जुळतो.

'शाळवाचे पिकाप्रमाणें शिरें कापली,' 'इक्षुदंडांतून शर्करा निघावी त्याप्रमाणें ऊधसांतूनच नवनीत मिळावें.' (ऊधस् = कांस. ऊधस ह्याचेंच चुकीचें वाचन तुदगीच तुपगीच हें झालेलें दिसतें) ८७–७७; 'भाणवसांत ससा सांपडावा' ५६–५२; 'रांडेनें सावलें हुसकलें' ९१–७९ टीप पहा. 'टांक्यांनीं दगड फोडावा तसा तटस्थ' (टांकीनें घाव घातला तरच एकादी कपरी निघावयाची, नाहींतर नाहीं असा धोंड्यासारखा तटस्थ) ११२–९१. इत्यादि इत्यादि किती तरी विविध चटकदार दृष्टांत ह्या बखरींत आले आहेत. ह्यांतील कांहीं शब्द कोशांतच समाविष्ट केले आहेत ते पाहावे.

बखरींतील ऐतिहासिक वृत्तान्ताविषयीं लिहिणें अवश्य. एका अर्थीं नकोहि, कारण प्रकरणवार काल-पट दिलेच आहेत.

हा बखर––ग्रंथ इतिहास कालीन गद्य सारस्वताचा प्रातिनिधिक ग्रंथ समजून त्या आधारें तत्कालीन मराठी गद्यभाषेचे व्याकरण-नियम आंखण्याचा सामुहिक यत्न झाला पाहिजे. मराठी भाषा ही वाहती असून प्रगत व समृद्ध होत्साती प्रवास करीत आहे. प्रवासांत झालें तरी मुक्काम होतच असतात. इतिहासकालीन व मध्य महाराष्ट्राच्या मुक्कामांतील तिचें रूपगुण ह्याच बखर ग्रंथांच्याद्वारां आपणांस समजून घ्यावयाचे आहेत. तशा बखर ग्रंथांतील हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. तो झाला ह्या प्रकारें साजरा करून वाचकांचें हातीं देत आहे.

बखरीच्या लेखकासंबंधानें किंवा कथक-पृच्छक जोडीसंबंधानें पृ. १३–१४ वर लिहिलें. त्याच बाबतींत हें एक सांगावेंसें वाटतें कीं, ग्रंथ एकच पण पृच्छक व कथक ह्यांचीं नांवें वेगवेगळीं येतात ह्याचें कारण, इतिहासकालीं ग्रंथादिकांच्या नकला लिहून देणें हा स्वतंत्र व प्रतिष्ठित व्यवसाय होता. अशी एखादी नक्कल-प्रत ज्यानें करण्यास सांगितली व म्हणून लेखकानें प्रत लिहून काढली ह्या दोघांचीं नांवें प्रतींत प्रारंभी दाखल केलीं व ह्यामुळें एकाच ग्रंथाचे भिन्न पृच्छक व कथक येणें संभवनीय आहे.

शं. ना. जोशी
संपादक

पुरस्कार

भारत इतिहास संशोधक मंडळानें बखरीचे चिकित्सक संपादन करून नवीन बखरमाला प्रकाशित करावी अशी कल्पना अनेक वर्षें डोळ्यासमोर होती आणि तिचा उच्चारहि पुष्कळ वेळां केला. तथापि तो योग अल्पांशानें का होईना सिद्धीस जात असल्याचें पाहून वाटणारें समाधान येथें प्रकट करणें उचित होईल.

मनुष्य कथाप्रिय आहे. अनेक प्रसंगीं त्याला स्वतःसंबंधीं आणि लोकांसंबंधीं मागील आठवणी आठवतात त्या तो लोकांस आवडीनें सांगतो. आणि ज्याचें सांगणें चटकदार असेल त्याच्या भोंवतीं लहानमोठें श्रोते नेहमींच गराडा घालून कौतुकानें ऐकत बसलेले आढळणारच. अशा श्रोत्यांपैकीं कोणी एखादा हौशी गृहस्थ अथवा स्वतः कथाकथकच ह्या हकीकती लिहून ठेवतो. त्यावेळीं अशीं लिखितें नकलून नेऊन दूरदेशी असलेले जिज्ञासूहि आपली तृप्ति करून घेतात. 'भाऊसाहेबांची बखर' म्हणून जी नाणावलेली व लोकप्रिय झालेली बखर आहे ती अशी प्रकारेच लपिबद्ध झालेली असली पाहिजे. आज उपलब्ध झालेल्या सर्व मराठी बखरींत. 'भाऊसाहेबांची बखर' ही सर्वाद्य म्हणून पहिल्या क्रमांकाला लागलेली आहे. या महत्त्वाला ती पावण्याचें कारण तिचा विषय पाणिपतचा वीरकरुणमिश्रित प्रसंग असें घटकाभर वाटलें तरी वास्तविकपणें या बखरीच्या कर्त्याचें कथनकौशल्य हेंच या घटनेचें खरें कारण आहे. बखर लिहिणाऱ्याची शैली फार चटकदार, रसानुकूल आणि परिणामकारक साधली आहे. असल्या गुणांनी भरलेली दुसरी बखर इच्या जोडीला बसणारी सांपडणार नाहीं. सांप्रत या बखरीची योजना विद्यापीठीय अभ्यासक्रमांतहि वारंवार होत असते हें लक्षांत घेऊन या बखरीचें संस्कारयुक्त प्रकाशन प्रथम हातीं घेतलें; आणि संपादकीय बोजा आमचे सुहृद्वर श्री. वि. सी. चितळे यांजवर सोंपविला. श्री. चितळे मोठचा हुरूपानें कामाला लागले. विविध टीपा-टिपणें त्यांनीं तयार केलीं होती. परंतु मुंबईस गेले असतां एकाएकीं हा लोक सोडून गेले. या बखरींत दुःखार्णवाचे प्रसंग बहुत आहेत तसलाच प्रसंग बखर-प्रकाशनमंडळावर आला! पुढें श्री. शंकरराव जोशी यांजकडे संपादनाचा भार दिला. तो त्यांनी आपल्या अनुभविक अभ्यासी संस्कारांनीं सिद्धीस नेला!

या बखरीला पहिला मुद्रणसंस्कार झाल्याला सुमारें पाऊणशें वर्षें झालीं तेव्हां १८७९ चा डिसेंबर होता आणि आजचें प्रकाशन नोव्हेंबर १९५५ त होत आहे. इतक्या दीर्घ काल या बखरीची लोकप्रियता सतत वर्धमान आहे. चाल-कहीना भरंवसा वाटतो कीं‍ंत या बखरीला यथार्थपणें लाभलेली लोकप्रियता अधिका-

धिक वाढत जाईल आणि संवर्धित आणि संस्कारित अशा तिच्या अनेक वरचढ आवृत्या प्रकाशित करून वाचक-अभ्यासक यांची सेवा त्यांना बजावतां येईल.

मूळ क्रमानें सहाव्या परंतु आमच्या क्रमानें पहिल्याच अशा या आवृत्तीचे विशेष श्री. जोशी यांनीं विस्तारानें पुढें मांडलेचं आहेत. श्री. जोशी यांनीं नामचर्चा, लेखकशोध, बखरींतील भाषेचा रसास्वाद, भाषेच्या व्याकरणाची चिकित्सा, बखरींतील ऐतिह्याचें तुलनात्मक परीक्षण आणि व्यक्ति-काल-स्थल सूचि यांची जोड देऊन आपलें कष्टदायक आणि आनंददायक उभय परिणामकारक कार्य प्रशंसनीयरीत्या शेवटास नेलें आहे.

असें थोडेंच आहे कीं संपादकांचें म्हणणें आपण नेहमीं ग्राह्यच केलें पाहिजे ? मग चिकित्सा कसली आणि चर्चेला तरी वाव कोठला ? सत्याचा शोध जसा नाजूक तसाच कठोरहि असतो. संपादकांनी अवश्य ते कष्ट आणि काळजी दाखविली आहे किंवा नाहीं हाच काय तो खरा प्रश्न.

यथार्थपणें तयार केलेली चिकित्सक व शास्त्रीय नांवाला पात्र असलेली बखरीची मुद्रित प्रत म्हटली कीं तिच्या प्रारंभीं ठळकपणें पुढील सूत्रें जाड ठशांत छापलेलीं असावीं. नव्या पिढींतल्या अभ्यासकांस तर हें मार्गदर्शन फारच आवश्यक असतें आणि अनेक पढिक पंडितांनाहि भ्रमांत पाडण्याचें कार्य मोहवश होऊन कित्येक संपादकांनीं केलेलें आहे आणि अद्यापिहि दुसरे कित्येक तसें करीत असतात. सूत्रें येणेंप्रमाणें :—

(१) मूळ बखर मोडी लिपींत लिहिलेली आहे.

(२) या मोडी प्रतींत विरामचिन्हें नसतात (तीं आमचेकडे इंग्रजी राज्यांत आलीं.)

(३) शब्द, वाक्यें, वगैरे तोडलेले नसतात. सर्व मजकूर एक सरळ सलग रेघ ओढून मोडींत लिहीत असतात.

(४) मोडींत सारें दीर्घच लिहावें लागतें. तसेंच अनुस्वार देतां येतात पण पुष्कळवेळां देत नाहींत किंवा नको तेथेंहि आढळतो. मात्रांबद्दलहि शैथिल्य आढळतें. ल-ळ, अ-आ, ब-बा, क-ला, म-द-प; व-वा; ज-न; या-का; ह-ध; यांच्या सारखवटपणामुळें घोटाळ्याला जागा होते.

(५) प्रकरणें आणि परिच्छेद संपादकांनीं पाडलेले आहेत.

म्हणून वाचकांनीं वरील सूत्रें ध्यानांत वागवावीं आणि संपादकीय संस्कारांना मूळ कल्पून चालूं नये.

आपण बखर-शब्द आणि बखर हा प्रकारच घेऊं. बखर-खबर- किंवा भाष्-बक्-बकणें असे अनेक प्रकार सुचवून बखर शब्दाची व्युत्पत्ति साधण्याचे प्रयत्न झालेले आहेत. बखेर-बखैर अशीहि या शब्दाचीं रूपें लिहिलेली आढळतात. तें कसेंहि असो, एक अनुमान बळकटपणें करावेंसें वाटतें आणि तें हें कीं बखरींचा

प्रकार आणि उत्तरेकडे राजस्थानांत आढळणारा 'ख्यात' हा प्रकार, या दोहो पुष्कळ साम्य व संबंध आहे किंबहुना लावणी, पोवाडे, बखरी या सर्व प्रकारांचें मूत राजस्थानांत शोधणें उचित ठरेल असें निश्चयपूर्वक वाटतें. कही, वातवाताँळ वचनिका, इत्यादि जे अनेक प्रकार डॉ. टेसिटोरीनें नमूद केले आहेत त्यांच्या सूक्ष्म अभ्यासानें या कल्पनेवर चांगला प्रकाश पडेल.

तसेंच पूर्वी अलीकडे देतात अशीं मोठीं विचारपूर्वक नांवें लिहिलेल्या बखरींना कितपत देत असतील याची शंकाच वाटते. 'भाऊसाहेबांची बखर' या नांवाचे मूळ सुचवितांना सुप्रसिद्ध संपादक कै. रावबहादुर काशीनाथपंत साने यांनीं १९२२ च्या भा. ब. च्या प्रस्तावनेंत पुणें प्रतीच्या डोकीवर नांव असल्याचें दिलें आहे. तें नांव वास्तविक भा. ब. असें नसून 'बखर भाऊसाहेबांची' असे उलटें लिहिलेलें आहे. आणि तें जुन्या प्रणालीस अधिक जुळून दिसते.

त्याप्रमाणेंच अर्थाच्या टीपांत 'वानरी तेलाचा प्रकार' याचा उलगडा पूर्वी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेंत प्रसिद्ध झाला होता. अशा शब्दचर्चाच वगैरे या बखरीच्या निमित्तानें प्रसिद्ध झालेल्या टिपणांचेहि संदर्भ एका परिशिष्टांच्या रूपानें द्यावयास पाहिजे व त्या टिपणांवरहि नवीन चिकित्सा सादर केली पाहिजे.

श्री. शंकरराव जोशी यांनी भा. ब. तील कथनाचें प्रामाण्य तोलून पहातां यावें म्हणून मूळ पत्रांतून ज्या घटनांचे उल्लेख आढळतात त्यांचा व भा. ब. तील विधानांचा पडताळा पाहतां यावा म्हणून प्रकरणवार अठरा कालपटांची योजना केली आहे. हें काम बरेंच कष्टाचें होतें. पण आतां हे कालपट हातीं घेऊन बखरीचा ऐतिहासिक घटनाप्रामाण्याच्या दृष्टीनें चिकित्सक अभ्यास करण्यास मोठें साहाय्य होईल.

ऐतिहासिक मराठी साहित्यांत भाऊसाहेब, गोविंदपंत बुंदेले, नानासाहेब प्रभृतींचीं स्वदस्तुरचीं अनेक पत्रें आपणांस सुदैवानें उपलब्ध झालीं आहेत. तशीं अबदाली, जाट प्रभृतींची झालीं पाहिजेत. वाढत्या संशोधनाचें वाढतें फळ पदरीं पडेल तसें चिकित्सेचें क्षेत्रहि वाढेल आणि आमची बखर आवृत्तिहि अधिक संपन्न करतां येईल. चित्रें, नकाशे वगैरेची जोड खर्चाचें भय कमी होईल तशी देतां येईल. आज केलें आहे तेंच आपण सर्व वाचक, चिकित्सक, अभ्यासक यांनीं गोड करून घ्यावें एवढी विनंति आहे.

आश्विन शु. १२, १८७७ **दत्तो वामन पोतदार**

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	१	राजाश्रिया	राजश्रिया
४	४	होत आसेत	होत; आसें
४	७	बेहोष[५७]	बेहोष[३७]
५	१९	यासिवाय दुसरा	यासिवाय दुसरा[५८]
७	१०	घडणार	घडणार[८१]
,,	१२	कटाक्षें	कटाक्षें[८२]
८	११	दारूगोळी	दारूगोळी[९३]
,,	टीप ९२	लावन	लावून
१०	६	खुदरजावंदीनें	खुदरजावंदीने [११२]
,,	१४	नामोस्की	नामोस्की [११३]
,,	१५	ऐकतों	ऐकतों [११४]
१२	२	क न	करून
१४	१०	स्वस्तीसप्र	खेतीस
१५	३	होत	होतें
,,	४	मारवाडियांत	मारवाडियांस
,,	,,	तंबा	तंबी
,,	१३	डली	मोडली
,,	२३	राजवाड	राजवाडे
१६	१	यक	येक
१७	९	तीं	तों
१८	१२	तो	तों
,,	१६	होता.	होता,
,,	२०	तो	तों
१९	१२	एकोन	ऐकोन
२२	४–५	सवाई जयाजी	'सवाई जयाजी'
,,	१२	कारण	कारण–
२३	५	ठाणे याची	ठाणयाची
,,	,,	कच	कूच

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
,,	९	तिलक	शिलक
२४	७	लावावा.	लावावा [१३६]
	,,	पाऊण[१३६]	पाऊण
,,	९	कूच्य	कूच
२६	५	येख्तत्यारी	येख्त्यारी
,,	९	**लालगडी नजीक**	**लालगडीनजीक**
,,	१५	पादशाहाज्यादी–	पादशाहाज्यादी.
२९	६	अहमदशाहा [२९]	अहमदशाहा
,,	१२	तख्ती	तख्तीं
३०	३	दिळीपत	दिलीपत
३१	१६	शहाची	शहरची
३२	१	दिली	**दिल्ली**
३७	४	द्वाहीं	द्वाही
४२	३	ताहीं	नाहीं
,,	१८	तख्ती	तख्तीं
४४	१६	संदीपबग	संदीपबेग
४५	१०	यक	येक
४६	२१	भुतो	भूतो
५०	५	लाविले	लाविलें
,,	२३	सार्धक	सार्थक
५४	४	जगसिंगपुरा	जयसिंगपुरा
५७	७	ठिकच	ठीकच
५९	२२	जाग	जागा
६०	९	गेले. [	[गेले.
६४	५	उपज	उपजे
७१	७	तमास	तमाम
७२	शेवटची ओळ	वरस्त्रेंहि	वस्त्रेंहि
७६	११	नक	नाक
,,	२१	लष्करत	लष्करांत
८२	३	वाबळयाचा	वांबळयाचा
८३	२	मनुष्य	मनुष्यें
८७	५	सदे	सिंदे

पृष्ठ	ओळ	शुद्ध	अशुद्ध
९२	१	दुराणीची(अ)	दुराणीची(अ)
,,	,,	पाठीलागास(आ)	पाठीलागास(आ)
९६	१	साध	साधें
९९	३	**कासीबा–**	**कासीबाई**
,,	१९	तों १७४ अ	तों [१७४]–अ
१००	१४	बोलले १९० ई	बोलले [१९०]–ई
१०१	१५	कासीाई	कासीबाई
१०४	९	**तमाबाईचा**	**गौतमाबाईचा**
,,	११	गप्रसूत	प्रसूत
१०५	३	गमीन	गनीम
१०६	२	आंतवेद	आंतर्वेद
११५	९	तांम्रांचा	ताम्रांचा
१३०	१४	हुजर	हुजूर
१३१	५	राहिण	हा शब्द नको आहे.
१३३	११	**कटारी** १८६ अ	**कटारी** [१८६] अ
१३४	४	काळा	काना
१३९	१२	विषादग्नि	विषाद आग्न
१४७	शेवटची ओळ	खंडण्या	खंडण्या
१४८	३७	"नारोअ	"नारो [१८]अ
१५१	टीप ७४	७४. अ. 'कुशब्द बोलते जाहले' सगजो.	शें.
,,	,,	७४. अ.	अ.
१५६	९	असें	असें×
१५७	१४	शिद	शिंदे
१६६	८	नये	नये "
१७२	१२	फुटते	फुटतें
१८६	२५	**रामभारताची**	**राम भरताची**
१८७	१३	श्रीदत्तार्पणस्तु	श्रीदत्तार्पणमस्तु
१९२	११	रसदबंवी	रसदबंदी

अनुक्रमणिका

निवेदन ५–८

प्रस्तावना ९–२२

पुरस्कार २३–२५

शुद्धिपत्र २६–२८

परिच्छेद विषय

प्र० १ कुंभेरीचा वेढा. पृ. १–११

१. विषयावतरण व 'प्यादाचा फर्जी' आणि 'प्यादेमात'.

२. दादासाहेबांस हिंदुस्थानचे मोहिमेस पाठविलें.

३. सुरजमल जाट कुंभेरींत जाऊन राहिला.

४. दादासाहेबांनीं कुंभेरीस मोर्चे लाविले.

५. खंडेराव होळकराचा मृत्यु, मल्हाररावाची प्रतिज्ञा.

६. सुरजमल जाट, रूपराम कटारी व अनुसया यांची मसलत.

७. शिंदे व जाट पगडीभाई

८. होळकरांचा विषाद

९. दादासाहेब संकटांत पडले

१०. मारवाडबद्दल मसलत

११. जाटाशीं तह

पूरची स्वारी पृ. १२–२५

१२. शिंदे यांचा मारवाडयांशीं युद्ध करण्याचा निश्चय

१३. नागोरची लढाई

१४–२१. नागूरचा पुनः वेढा

२२. शिंद्यानें बुंदीच्या बालराजास तख्तावर बसविलें.

परिच्छेद विषय

२३. पेशवे शिंद्याचें समाचारास जातात.

२४. रघुनाथराव दादा व मल्हारराव होळकर यांची हिंदुस्थानचे मोहिमेस रवानगी

० ३ प्याद्यानें बार भरला पृ. २६–३४.

२५. मलकाजमानीची नजीबखानास मदतीबद्दल विनंती.

२६. नजीबखान व मलकाजमानी यांच्यामध्यें झालेला करार.

२७. नजीबखानामार्फत अबदालीशी राजकारण

प्र० ४ प्याद्याचा बार उडाला पण वायां गेला पृ. ३५–५२.

२८–३० अबदालीची दिल्लीवर चाल

३१. अंताजी माणकेश्वर यांचा पराभव

३२. गाजुद्दीखान आग्र्याच्या किल्यापाशीं जातो.

३३–३४. किल्लेदारानें गाजुदीखानास किल्लचांत घेतले.

३५. गाजुदीखान पळून गेल्यामूळें नजीबखानाचा जळफळाट

३६. आबदुलअली आग्रा शहर सोडून कुंभेरीच्या रोखे चाल करितो

परिच्छेद विषय

३७. जाठ याची रूपराम कटारी याशीं मसलत

३८–४०. आबदुलअली परत जातो दादासाहेब कुरुक्षेत्रास जातात.

४१. दादासाहेब अटकेस पोंचतात.

४२. पेशवे व नबाब निजामअली खान यांचा बिघाड

४३. दत्ताजी शिंदे यांची मर्दुमकी

४४–४५. जनकोजी शिंदे यांची हिंदुस्थानचे मोहिमेस रवानगी

४६–४८. जनकोजी शिंदे यांची रघुनाथराव व मल्हारराव होळकर यांशीं भेट

४९. मल्हारराव होळकरांचा दत्ताजी शिंदे यांस उपदेश

प्र० ५ प्याद्यानें क्रोड रुपयांचे आशेस गोंविलें पृ. ५३–७०

५०. शिंदे दिल्लीस जातात.

५१. नजीबखानाचें पारिपत्य करण्याचा सर्वांचा निश्चय

५२. शिंद्यांचें नजीबखानाशीं बोलणें

५३–५४. नजीबखानाची गुप्त मसलत

५५. नजीब शुक्रतालास जातो

५६–५७. शुक्रतालावर जनकोजी शिंदे यांचा हल्ला

५८. सहस्रचंडीचा होम

५९–६०. भागीरथी पलीकडे जाण्याचा शिंद्यांचा यत्न

६१–६२. रोहिल्याच्या खजिन्यावर हल्ला-गोविंदपंत बुंदेले यांची कसुरी

६३. सुजाउद्दवल्याचें कपट

परिच्छेद विषय

६४. नजीबखान व सुजातदौला यांची एकत्र मसलत

प्र० ६ 'मरणाहून अपेश वोखटें' पृ. ७१–७९.

६५–६६. गाजुदीखान आलमशाहाचा शिरच्छेद करितो

६७. सुजातउद्दवला याची मसलत फिसकटली. दत्ताजी शिंदे यांची निभावणी

६८. दत्ताजी शिंदे व इतर सरदार यांची मसलत

६९. त्रिंबक बापूजीचें पथकाचा दुराणीनें पराभव केला

७०–७२ शिंद्यांच्या फौजेची दुर्दशा; शिंदे दिल्लीस परत जातात

७३. दत्ताजी व जनकोजी शिंदे यांची वाटाघाट

प्र० ७ बचेंगे तो औरबी लढेंगे पृ. ८०–८८

७४–७५ दुराणी यमुनेच्या कांठीं येतो.

७६. दत्ताजी शिंदे यांचा रण सोडून न जाण्याचा निर्धार.

७७. 'बचेंगे तो औरभी लढेंगे' दत्ताजीचा शिरच्छेद.

प्र० ८ जनकोजी शिंदे ससैन्य कोटपुतळीस पळत येतात पृ. ८९–१०४.

७८–८० शिंद्यांच्या सैन्याची पीछेहाट

८१. नजीबखान आबदुल अलीस दत्ताजीचें शिर नजर करितो.

८२–८३ दत्ताजीच्या देहास अग्निसंस्कार. शिंद्यांच्या लष्कराचा पळ

परिच्छेद विषय

८४. भागीरथीबाईची हिंमत

८५–८६–८७. शिंदे-होळकर भेट

८८. शिंदे उज्जनीस राहिले व मल्हार राव होळकर इंदुरास राहिले

प्र० ९ मल्हारराव होळकरांचें अहमदशहा अबदालीशीं गनिमी युद्ध पृ. १०५–१११

८९–९०. होळकरांचें अबदालीशी युद्ध होळकरांचा पराभव.

प्र० १० उत्तर हिंदुस्थानांत जाण्या-संबंधीं वाटाघाट आणि भाऊंचा जाण्याचा निश्चय पृ. ११२–१२०.

९१. हिंदुस्थानांत स्वारीस जाण्याबद्दल पेशव्यांची वाटाघाट

९२–९५. भाऊसाहेबांचा हिंदुस्थानांत लढाईवर जाण्याचा निश्चय

९६–९८. भाऊसाहेबांची हिंदुस्थानांत मोहीम

प्र० ११. भाऊसाहेबांची दिल्ली घेऊन कुंजपुऱ्याकडे चाल पृ. १२१–१३५

९९. माळवा सोडून पुढें न येण्याबद्दल भाऊसाहेबांस होळकरांचीं पत्रें जातात.

१००. शिंदे व होळकर यांचा चमेली-पार मुकाम

१०१ शिंदे-होळकरांच्या पत्रांची हेटाळणी करून उत्तरें पाठविलीं.

१०२. मुचकुंद तीर्थावर भाऊ साहेबांचीं स्नानें व दानें

परिच्छेद विषय

१०३. तीर्थें करून भाऊसाहेब दिल्लीस येऊन पोंचतात. सरदार भेट.

१०४. दिल्लीचा किल्ला हस्तगत करून अलीगौर चकते याच्या मुलास भाऊसाहेबांनी तख्तीं बसविलें

१०५–१०६ दिली तख्तावरील चांदीचे छत काढून भाऊ सोा रुपये पाडतात

१०७–०८ सुरजमल जाठ शिंदे होळकर यांच्या सांगण्यावरून निघून जातो

प्र० १२. मराठ्यांचा कुंजपुऱ्यावर हल्ला व पाणिपतावर तळ. पृ. १३६–१४६

१०९. भाऊसाहेबांचा तीन टोळ्या करून कुंजपुऱ्यावर यशस्वी हल्ला

११०. कुतुबशहाचा ढालेपाशीं शिरच्छेद

१११. कुंजपुऱ्याची लूट व शिंदे-होळकरांचा दिल्लीस परत जाण्याविषयीं पेशव्यांस सल्ला

११२. अहमदशहा अबदली कर्णोल येथें यमुना उतरून अलीकडे येतो व पेशवे दिल्लीच्या रोखें जातात

११३. पेशवे यांजकडील बातमीदार पथकाची कत्तल

११४. पेशव्यांचा पाणिपत नजीक खंदक खणून तळ

११५. विश्वासराव व जनकोजी यांचें नानासाहेबांस मदत पाठविण्याविषयीं पत्र व त्याबद्दल भाऊसाहेबांचा राग

परिच्छेद विषय

प्र० १३. बुंदेले व मेहेंदळे यांचा शेवट व मराठ्यांची हलाखी पृ. १४७–१६१

११६. गोविंदपंत बुंदेले व दुंदेखान रोहिला यांचें युद्ध; गोविंद पंतांचा मृत्यु

११७. पेशव्यांच्या फौजेंत अन्नधासाची टंचाई

११८. पाराजी पंत वाघ खजीना घेऊन दिल्लीहून निघतात पण अबदालीच्या फौजेंत गेल्यामुळें खजिन्याची लूट व शिपायांची कत्तल

११९. बळवंतराव, जनकोजीची कुरापत काढतात, जनकोजी युद्धास निघतो

१२०. जनकोजीचें रोहिले व अहमद खान पठाण यांशीं यशस्वी युद्ध

१२१. जनकोजी व बळवंतराव मेहेंदळे यांचेंसंभाषण; मेहेंदळ्यांचा पश्चात्ताप

१२२. गोविंदपंत बुंदेल्यांचें शिर अबदलीकडून येतें व नंतर बुंदेले यांचें दहन

१२३–१२५. बळवंतराव मेहेंदळे यांचें दुराणीशीं युद्ध व मेहेंदळे यांचा मृत्यु व पत्नीचें सहगमन

प्र० १४. दिल्लीस जाण्याचा बेत बदलून लढाई व विश्वासरावाचा मृत्यु पृ. १६२–१६९

१२६. भाऊसाहेब व सरदारमंडळी यांचा विचारविनिमय

परिच्छेद विषय

१२७. गोल बांधून परत दिल्लीस जाण्याचा मराठ्यांचा बेत

१२८. त्या बेतांत बदल आणि इब्राहिम खान याची निराशा

१२९. अबदुल अलीची तयारी व सल्ला करण्याबद्दल बोलणें

१३०. विश्वासरावाचें पतन

१३१. पार्वतीबाईचा शोक

प्र० १५. इब्राहिमखान व भाऊसाहेब यांचा पराक्रम व शेवट पृ. १७०–१७४

१३२. इब्राहिमखान गाडदी याचा पराक्रम

१३३–१३४. भाऊसाहेबाचें धैर्य व पराक्रम

१३५. मल्हारराव निघून येतात.

प्र० १६. मराठी सैन्याची कत्तल व पराभवाची मीमांसा. पृ. १७५–१७९

१३६. पार्वतीबाईची असहाय स्थिति

१३७–१३८. मराठ्यांच्या सैन्याची पळापळ आणि गिलज्यानें केलेली लूट

१३९. उमरावगीर गोसावी विश्वासराव वगैरे यांचे मुडदे सोडवून आणितो व त्यांस अग्निसंस्कार करवितो

१४०. मल्हारराव होळकर इत्यादि दिल्लीस परतात

१४१. सोनपतनजीक मराठी सैन्याची कत्तल

परिच्छेद	विषय
१४२.	पळणाऱ्या लोकांचे वाटेंत झालेले हाल
प्र० १७. मराठी फौजेचा पळ व जाटाचें औदार्य पृ. १८०–१८४	
१४३.	पार्वतीबाई पळत पळत जाऊन दिल्लीस पोहोंचते
१४४.	प्रमुख सरदार दिल्लीस पळत येऊन पोहोंचतात
१४५.	दिल्लींतील लोकांनीं पळून आलेल्यांची केलेली लूटमार व छळ
१४६.	जाटाचें औदार्य
प्र० १८. नानासाहेबांचें सहाय्यार्थ आगमन पण शोकानें परत गमन व निधन. पृ. १८५–१८७	
१४७.	इब्राहिमखान दुराणीच्या हातीं सांपडतो
१४८–१४९.	नानासाहेब पुण्याहून भाऊसाहेबांचे मदतीस निघतात परंतु वाटेंत पराभवाचें वर्तमान ऐकून त्यांनी केलेला शोक व त्यांचा शेवट
१५०.	नानासाहेब व भाऊसाहेब यांचें परस्पर भ्रातृप्रेम
१५१.	माधवरावास प्रधानकीचीं वस्त्रें
१५२.	बखर-ग्रंथ समाप्ति.

परिच्छेद	विषय
कालपट प्रस्ताव पृ. १८८–१८९	
कालपट	
प्र० १	पृ. १९०
प्र० २	पृ. १९१
प्र० ३	पृ. १९५
प्र० ४	पृ. १९६
प्र० ५	पृ. १९९
प्र० ६	पृ. २००
प्र० ७	पृ. २०१
प्र० ८	पृ. ,,
प्र० ९	पृ. २०२
प्र० १०	पृ. २०३
प्र० ११	पृ. २०४
प्र० १२	पृ. २०५
प्र० १३	पृ. २०६
प्र० १४	पृ. २०७
प्र० १५	पृ. ,,
प्र० १६	पृ. ,,
प्र० १७	पृ. २०८
प्र० १८	पृ. २०९
ग्रंथनाम संक्षेप स्पष्टता	**पृ. २०९**
व्यक्तिसूची	**पृ. २१०**
स्थलसूची	**पृ. २१८**
शब्दसूची	**पृ. २२२–२४४**

अनुक्रमांक 1811 इतिहास
क्रमांक 1811 दि. 2013

॥ श्री गजानन ॥

भाऊसाहेबांची बखर

प्रकरण पहिलें

कुंभेरीचा वेढा

भारतीय इतिहास संशोधक मंडळ संग्रहालय विभाग दा. क्र. 1009

१. राजाश्रिया[1] विराजित राजमान्य राजश्री गणेशपंत[2] स्वामींचे सेवेशीं पोष्य चिंतामण गोविंद[3] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल तागाईत पौष वद्य १२ मुकाम दिल्ली इंद्रप्रहस्त जाणोन यथाथित वर्तमान असे. विशेष. आपण कृपा करून पत्र पा विलें. लिहिला मजकूर विदित जाला. पत्रीं आज्ञा जाली कीं, हिंदुस्थानांतील आदिअंतीं[4] वर्तमान [प्याद्याचा फर्जी नजीबखान रोहिला होऊन[5]] दक्षिण देशीं हिंदुपद [श्री राजा[6]] शाहु छत्रपती यांचा प्रधान

---

१. भाऊसाहेबांच्या बखरीचें मूळ हस्तलिखित, आजपावेतों उपलब्ध झालेलें नाहीं; सांपडल्या त्या सर्व नकलाच आहेत. त्या सर्वांत शक १७१२ च्या सुमारास (सवाई माधवरावाच्या वेळीं) नकललेली प्रत, सर्वांत जुनी प्रत, म्हणजे **तुंगार प्रत** होय. मूळ बखरीनंतर लौकरच तिची नकल झालेली असावी. या एका कारणास्तव तिचा आद्यंत येथें स्वीकारलेला आहे.

२. गणेशपंत हे कोण? त्या ऐवजीं व्यंकपा नाईक दिंडोरे, दिलनूरकर (‘दिडनूरकर’ **औंध** प्रत) असा सान्यांच्या कांहीं प्रतींत पाठ आहे. ते पंढरपूरचे वजनदार सावकार **सगजो** मध्यें व सा. १९२२ व १९३२ प्रतींत. ‘दिलनूरकर’ हा शब्द गाळला आहे. तसेंच ‘दिंडोरे’ या उपनांवापुढें सा. १८७९ प्रतींत ‘वालापूर’ व पुढें ‘कसबा वेळापूर’ असा पाठ आहे. **सगजो** तो पाठ देत नाहीं. गणेशपंत अगर व्यंकपा नाईक हा नकलकाराचा यजमान असावा. मूळ बखरींत हें नांव भिन्न असावें असा तर्क आहे.

३. ‘कृष्णाजी शामराज’ असा पाठ सा. औंध, सगजो वगैरे प्रतींत आहे. मूळ बखरींत भिन्न नांव असावें. चिंतामण गोविंद अगर कृष्णाजी शामराज हा नकलकार असावा.

४. ‘साद्यंत’ (सा), ‘साद्यांत’ सगजो ‘आद्यंत’ **औंध**.

५. हे कंसांतील शब्द बहुधा सर्व प्रतींत आहेत. प्याद्याचा फर्जी झाला तो हाच नजीबखान रोहिला. प्यादें, फर्जी, प्यादेमात, इरेस पडणें वगैरे बुद्धिबळाच्या खेळांत येणारे शब्द बखरकार मार्मिकपणें वापरतो.

६. हा पाठ साने प्रतींत व **औंध** प्रतींत आहे; **सगजो** मध्यें तो नाहीं.

मुख्य आदिकरून सवालक्ष फौजेनिशींही **भाऊगर्दी**[७] होऊन प्यादेमात कैशी जाली हें सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा केली. ऐशियास, महाराज [यांनीं] राजश्री **बाळाजी पंडित प्रधान** यांचे मस्तकीं हात ठेविला की, "तुम्ही माझे पश्चात स्वधर्मन्यायें समुद्रवलयांकित पृथ्वी आक्रमून प्रतापें राज्य चालवावें.[८] म्हणोन शिक्केकटार दिली.[९]

२. सत्पुरुषाचे[१०] आशीर्वादेकरून दिवसेंदिवस बिजेच्या चंद्राप्रमाणें चढते[११] कळें राज्य करीत असतां, पुढें विनाशकालें[१२] येणार भवितव्य[१३] आलें. तेव्हां वानरी[१४] तेलाचा जैसा प्रकार तैसा प्रकार घडला. गृहकलह लागण्यास कारण जाहालें कीं, राजश्री **रघुनाथराव दादासाहेब** प्रथम[१५] स्वारी, **हिंदुस्थानचे** मोहिमेस पाठविले. त्यासमागमें राजश्री **मल्हारराव होळकर** व **जयाजी शिंदे**[१६] व **विठ्ठल शिवदेव** व **अंताजी माणकेश्वर**[१७] व **गोविंदपंत बुंदेले** व **यशवंतराव पवार** वगैरे मोठमोठे उमराव, लहान थोर सरदार,[१८] पाऊण **लक्ष** फौजेनिशीं हिंदुस्थानांत रवाना[१९] केले. ते मजल दर मजल निघोन **नर्मदापार** जाहाले आणि **मालवे सोंदेवाडा** व **खेचीवाडा** व **बुंदीकोट** व **राजगड** व **पाटण** व **उदेपूर** व **जैनगर** व

---

७. 'भाऊशा गर्दी' औंध; 'भाऊसाहेब याची गर्दी' **सगजो** प्रत व राजवाडे सं. मंदिरांतील **आचार्य** प्रत.

८. इं सं ऐ स्फु. ले. ४.५ याच्याशीं हा मजकूर जमतो.

९. यापुढें 'असें सांगितलें' असें **शेंबवणे**-प्रतींत आहे.

१०. हा शब्द सा. १८७९ व १८८६ व **शेंबवणें** प्रतींत नाहीं.

११. 'चढते कळे' **शेंबवणे** प्रतींत नाहीं.

१२. 'येणार.....प्रकार घडला' **शेंबवणे** प्रतींत नाहींत.

१३. 'भविष्य' १८७९ व १८८६ मधील साने प्रतींतील पाठ.

१४. 'वानरी .....प्रकार घडला. गृह' १८७९ प्रतींत नाहीं.

१५. रघुनाथरावाची पहिली स्वारी ता. ३०-८-१७५३ ते ता. १०-८-१७५५. (दादाचे मुक्काम पेद २७।७९ पहा.) रा. खंड १।२७ पहा.

१६. जयाप्पा शिंदे दादाबरोबर गेला नव्हता, तो श्रीगोंद्यास होता. (पेद २।३४; २७।७८, ८२; रा. खं. ६।२९२; फा. ३।२५७).

दत्ताजी दादाबरोबर गेला होता (फा. १।२५६).

१७. 'अंताजी माणकेश्वर..... यशवतराव पवार वगैरे' हे शब्द **शेंबवणें** प्रतींत नाहींत; आणि तेंच बरोबर दिसतें. कारण तें तिघेही सरदार त्यावेळीं उत्तरेंतच होते.

१८. या स्वारींत सखाराम बापू दादाचा कारभारी असून विसाजीपंत लेले, रामचंद्र गणेश, बाबूजी नाईक बारामतीकर वगैरे मंडळी त्याच्याबरोबर उत्तरेंत गेली होती.

१९. दादास उत्तरेंत रवाना करण्याचें मुख्य कारण म्हणजे सुरजमल जाटानें पातशाही धोक्यांत आणली होती. तेव्हां दिल्लीच्या बादशहानें पेशव्यास लिहिलें कीं 'जाट खारिज करून पातशाहीचा बंदोबस्त करणें,' (पेद २१।६०) यावरून 'पृथ्वीपतीचें

नरवर व ग्वालेरी व झांशी व कालपी अशा खंडण्या घेत ढवळपूरचे घाट[२०] चमेलीपार जाहाले. तों पुढें सुरुजमल जाटाचा मुलूख लागला. ते समई सुरुजमल जाट याजकडील वकील रूपराम कटारी[२१] येऊन राजश्री रघुनाथराव दादासाहेब यांसी भेटले आणि खंडणीचा मजकूर बोलूं लागले. तों दादासाहेब यांची दृष्ट थोर जाहाली. जिवामाफक[२२] खंडणी घेईनात. क्रोड रुपये एक खंडणी मागों लागले. वकील यांचें बोलणें निदान चाळीस लक्ष रुपयेपर्यंत जाहालें. तें दादासाहेब यांणीं न ऐकतां कूच करून कुंभेरीचे रोखे चालिले.*

३. मग रूपराम कटारी[२३] याणें सुरजमल जाट यास वर्तमान येऊन सांगितलें कीं, "पेशवे ऐकत नाहींत; एक क्रोड रुपये खंडणी मागतात." तेव्हां सुरजमल जाट तोही द्रव्यबळें, फौजबळें, चांगला सामर्थ्यवान होता. वरकड किल्ले भरतपूर व डीग[२४] व रामदुर्ग व केवळ[२५] दुर्ग असाध्य, यांचा बंदोबस्त करून आपण खांसा कुंभेरींत[२६] बळ बांधोन राहिला. आणि राजश्री दादासाहेब यांस उत्तर पाठविलें कीं, "चाळीस लक्ष रुपये देतों ते घ्यावे,[२७] नाहीं तरी युद्धास उभें रहावें." म्हणोन पांच गोल्या व दारू पाठविली.

४. त्या समई रघुनाथराव[२८] दादासाहेब[२८] यांस विषाद येऊन कुंभेरीस मोर्चे लाविले.[२९] तमाम जिकडे[३०] तिकडे मोर्चेबंदी वांटून दिली. मोर्चे काईम जाहाले. परस्परें तोफा व हस्तनाला व सुतरनाला व जेजाला व बंदुकी व बाणांचे मार होऊं लागले. आसी[३१] लढाई[३१] पंधरा दिवस जाहले. दादासाहेब[३२] आपले भरावर

बोलावणें' आल्यावरून व एक कोट रुपये देतो असें त्यानें लिहिल्यावरून राघोबा उत्तरेंत गेला. (रा. खंड ३।४३३) या वेळीं बादशहा मराठ्यांस जाटाविरुद्ध मदत करणार होता; परंतु ती मदत मराठ्यांस मिळाली नाहीं. या हकीकतीचा उल्लेख बखरकारानें केला नाहीं. होळकर कैफीयतींत को. के. पृ. १८. हा उल्लेख आहे.

२०. 'माथा' साने प्रत.

२१. 'चौधरी' असा कांहीं प्रतींत पाठ आहे.

२२. 'जीवनमाफक' भाइसं प्रत.

*दादांची ही स्वारी, पैसेहि तितके न मिळाले, कलहहि न मिटविले यामुळें, अयशस्वीच झाली.

२३. 'चौधरी' असाहि पाठ कांहीं प्रतींत आहे.

२४. 'डिग' भाइसं प्रत. 'भरथपूर' भाइसं प्रत.

२५. 'केवलदुर्ग' भाइसं प्रत. १८७९ च्या साने प्रतींत 'कळवण'.

२६. 'कुंभारींत' असाही पाठ कांहीं प्रतींत आहे.

२७. 'घेण्यांत यावे' साने प्रत.

२८. 'रघुनाथदादा' साने प्रत.

२९. ता. २० जाने. १७५४ ला कुंभेरीस मोर्चे लागले.

३०. 'जिकडील तिकडे' साने प्रत.

३१. 'असें करितां' साने प्रत.

३२. 'त्यांनीं' साने प्रत. 'दादासाहेब' असा १८७९ व १८८६ च्या साने प्रतींत पाठ आहे.

गेले. तों दुर्ग असाध्य, सलाबत. मोर्चे चालवून सुरुंग लावावे[३३] तरी रान रेतीचे. सुरंगास यत्न नाहीं. तोफा नीच धरल्या तरी गोळा रेतींत जातो; चढत्या धरल्या तरी गोळा कुंभेरीपार[३४] होऊन यांजकडीलच दुसरे मोर्च्यांतील मनुष्यें जायां होत[३५] आसेत. संकट प्राप्त जाहालें. मोहोरा इरेस पडला. आतून कोणी सल्ल्यास येईनात. असा समग्र दीड महिना जाहाला.[३६]

५. [तों] येक दिवसीं राजश्री **मल्हारराव होलकर** याचा पुत्र **खंडेराव होलकर** केवळ बेहोष होता. त्याची आयुष्मर्यादा सरली[३८] म्हणोन[३९] जसे मुंगीस पक्ष[४०] फुटतात तैसा प्रकार जाहाला. भोजन करून मोर्चियांत निशाणापासीं आला. तों एकाएकींच किल्ल्यांतून जेजालीची गोली, प्रलयी[४१] वीज पडती[४१] तसी येऊन[४२] खंडेराव यास अकस्मात लागोन मोर्च्यांत ठार जाहाला. शुभ्रवर्ण चक्षु होऊन गतप्राण[४२] जाहाला. हें वर्तमान मल्हारराव यास कलतांच घाबरा जाहाला. त्यास पुत्र तेवढाच केवळ[४३] पढियंता होता.[४३] त्याची गती असी जाहाली [हें] जाणोन **मल्हारराव** यास असें जाहालें कीं आपले[४४] आंगावर वीज पडली किंव्हा परवत मस्तकी पडला[४४] आसे होऊन, प्राण व्याकूळ होऊन, देहभान[४५] विसरला. तेव्हां राजश्री **दादासाहेब** व आणखी थोर[४६] थोर सरदार येऊन ब्रह्मज्ञान व कांहीं हिमतीच्या गोष्टी सांगोन, क्षणभर शांत करून, मोर्च्यातून प्रेत[४७] आणोन त्याचे यथाविधी दहन सार्थक[४८] केलें. तेरा दिवस उत्तरकार्य होऊन दानधर्मही चांगला

---

३३. 'लावावें' **साने** प्रत.

३४. 'कुंभेरीच्या पार' **साने** प्रत. कुंभेरी भरतपूरच्या वायव्येस चार कोसांवर आहे.

३५. 'होतात' **साने** प्रत.

३६. बखरकारानें केलेली ही कालगणना बरोबर दिसत नाहीं. ता. २० जानेवारी १७५४ ला कुंभेरीस मोर्चे लागल्यावर ता. १९ मार्चला खंडेराव होळकरास गोळी लागून मृत्यु आला, त्या दिवसापर्यंत दीड महिन्यापेक्षां जास्त काळ होतो

३७. 'बेहूष' **शेंबवणे** प्रत व १८७९ **साने** प्रत.

३८. 'संपली' साने प्रत.

३९. म्हणोन या शब्दापुढें 'मोर्च्यांत आला' असे शब्द आहेत–भाइसं प्रत.

४०. 'पक्ष्य' **भाइसं** प्रत.

४१. 'प्रळयवीज पडते तैसें होऊन' **साने** प्रत.

४२. 'प्राण त्याग' **शेंबवणे** प्रत; साने १८७९ प्रत.

४३. हे शब्द १८८६ च्या आवृत्तींत गाळले आहेत. 'पुत्र पडतांच' १८७९ च्या प्रतींत. 'पढता' **सगजो** प्रत. मंडळ व भाइसं प्रतींत हा शब्द नाहीं. त्या ऐवजीं 'पुत्र पडतांच' असाच पाठ आढळतो.

४४. 'पर्वत मस्तकीं कोसळतो किंवा आंगावर विद्युल्लता पडते' असा **साने** प्रतीचा पाठ.

४५. 'देहभान' **साने** प्रत.

४६. 'लहान थोर' **साने** प्रत.

४७. 'शव' **साने** प्रत.

४८. खंडेराव होळकराचा मृत्यु ता. १९।३।१७५४. (फा. ३।२०५; रा.

जाहाला. पुत्रशोकाचा विषाद **मल्हारराव** यास येऊन **प्रतिज्ञा**[४९] करिता जाहाला कीं, "**सुरजमल जाट** याचे सिरच्छेद[५०] करीन व **कुंभारीची** माती **यमुनेंत** टाकीन तरीच जन्मास आल्याचें सार्थक. नाहीं तर प्राणत्याग करीन; म्हणोन दांतानें वोठ चाऊन दुराग्रहास प्रवर्तला.

६. हें वर्तमान वकील यार्णे **सुरजमल जाट** यास श्रुत केलें कीं, "**मल्हारराव** याचा येकुलता येक पुत्र होता तो मृत्यु[५१] पावला. त्यास, विषादें शफतपूर्वक प्रतिज्ञा केली कीं, जाट याचा वंश निर्मूल करीन. कुंभारी खणून[५२] यमुनेंत टाकीन तरीच बापाचे पोटीं जन्म घेतला:" असें वकिलाचे मुखें वर्तमान ऐकतांच त्यासहि **मल्हारराव** याची मर्जी ठावकीच होती की, "**मल्हारराव** जे बोलेल तें करील, यास संदेह नाहीं. तीन महिने जाहाले लढाई होतच आहे. आता आम्हांस **हिंदुस्थानांत** आश्रय कोणाचा नाहीं. आणि आम्हीं कोणाचे बळावर हिंमत बांधावी? आतां गलीम मागेल तितके रुपये द्यावे किंवा बायकामुलांचा त्याग[५३] करून चालून घ्यावे आणि मरावे, याचा विचार काय करावा? गांवांतील सरंजाम[५४] दाणा, तूप व मीठ व तंबाकू व दारुगोळी सरली, यास यत्न काय करावा?" [म्हणोन] तमाम लहान थोर सरदार व **रूपराम कटारी** व बाहेरील राणीवासांतील **आनुसया**[५५] म्हणोन त्याची जेष्ठ स्त्री परम चतुर व सुसील होती ती [यांस बोलाविले]. **रूपराम** व ती स्त्री येकत्र होऊन मनसोबा[५६] केला कीं, "गोष्ट तो साधेना, मसलत सुचेना, प्राणान्त[५७] समय गुजरला." आसें म्हणताच **आनुसयेनें** जाबसाल केला कीं, "यास यत्न येक आहे. यासिवाय[५८] दुसरा यत्न नाहीं". राजश्री **जयाजी सिंदे** यांचा आणि तुमचा स्नेह आहे. आणि तेहि

खं. ६, पृ. १०४). खंडेरावाचा पक्ष भाद्रपद वा. ९ स झाला. (मदबा. १।११०) असें आहे. पक्षतिथि मान-ण्यापेक्षां मृत्युतिथीच मानणें योग्य. याच वेळीं खंडेरावाबरोबर अकरा जणी (दोन लग्नाच्या बायका, ७ उपस्त्रिया व २ नाटकशाळा) सती गेल्या व गुलवदन कुत्री चितेंत उडी टाकून मेली (होइसा १।१२७; ऐसंसा. १।४५) लग्नीय स्त्री अहिल्याबाईस मल्हाररावानें सती जाण्यापासून निवृत्त केलें.

४९. ही प्रतिज्ञा व तिचें पालन याला अजून ऐतिहासिक आधार मिळत नाहीं.

५०. 'शिरच्छेद' **साने** प्रत.

५१. 'निधन' **साने** प्रत.

५२. 'खाणून' **साने** प्रत.

५३. 'बायका व मुलें यांची शाका करून' **साने** प्रत; 'यांची शका करून' **पुणें** प्रत.

५४. 'सामान' **भाइसं** प्रत.

५५. 'हणसया' **साने** प्रत.

५६. 'मनसुबा' **साने** प्रत.

५७. 'प्राणांताचा' **साने** प्रत. 'प्राणाचा' १८७९ प्रत.

५८. 'दुसरी यत्नास दृष्ट पोचत नाहीं' साने प्रत.

क्रियावान[५९] येकवचनी आहेत. त्यांस साध्य केलियास तुमचा तरणूपाय[६०] आहे. नाहीं तरी दुसरा उपाय[६१] मनसोब्यांत[६२] येत नाहीं.

७. हें ऐकून मसलत सर्वांचे ध्यानांत आली. हाच निश्चय करून **रूपराम कटारी** याचा पुत्र **तेजीराम** याजसमागमें पत्रें[६३] व **सुरजमल** याची सीरची पगडी असे रात्रौ राजश्री **जयाजी सिंदे** यांचे डेरियास येऊन केवळ अजीज[६४] होऊन बोलला कीं, "आजचे समई तुम्ही वडील बंधू आणि मी धाकटा बंधू आहें. कलेल त्या रीतीनें माझा बच्चाव करावा." म्हणोन वकिलानें विनंति करून समागमें जाटाची सिरची पगडी [आणिली होती] ती **सिंद्याचे** डोईस घातली आणि त्यांची पगडी आपणापासीं घेतली आणि उत्तर केलें कीं, "बहादरकी शरम पार[६५]पाडावे." असें ऐकोन **जयाजी सिंदे** यांसी निर्वाणसमय भासला[६६] आणि चित्तांत विचार केला कीं, "याचा पक्ष धरावा तरी स्वामिद्रोह पदरीं पडतो आणि [न धरावा तर] मित्रद्रोह[६७] पडतो. येकीकडून आड व येकीकडून विहीर; दुतर्फा मरण सारखें. हिंदुस्थानांतील धर्म[६८] कीं, पगडीभाई जाहल्यावर पोटचें द्यावें पण पाठीचें देऊं नये; त्यास रक्षावें. इकडून असा प्रकार. आणि हा पक्ष धरावा तरी सेवाचोर[६९] [होतो]. दोन्ही संकटें. यांतून सबळ निर्बळ पक्ष कोणता ? " म्हणोन चौघे मातबर जिव्हाळियाचे मुछदी होते त्यांस विचारणा केली. चौघांनीं सबळ निर्बळ पक्ष जाणोन, " शरण आलियाचा आंगिकार करावा, शरण येईल त्यास मरण चिंतूं[७०] नये, आसे धर्मशास्त्रीं वाक्य प्रमाण[७१]. सबळ पक्षीं होतच आहे." हें ऐकोन पुढील होणार भवितव्य गृहकलह–मधाचें बोट[७२]–लागावयास[७३] कारण हेंच जाहालें. **जयाजी सिंदे** केवळ साभिमानी, हा आंगिकार करून आपली पगडी व बेलभंडार

---

५९. 'सक्रियावान' **साने** प्रत.

६०. 'तरणोपाय' **साने** प्रत.

६१. 'विचार' **साने** प्रत.

६२. 'मनसबियांत' साने प्रत.

६३. 'पत्र' **साने** प्रत.

६४. 'अजीत' **भाइसं** प्रत.

६५. शूर वीराची लाज राखावी. 'बाहादारीकी' असा पाठ **भाइसं** प्रतीचा आहे. 'आम्हांस जीवदान दिलें पाहिजे' **सांगली** प्रत.

६६. 'सिंदे याणीं निर्वाण समय पाहिला' **भाइसं** व **मंडळ** प्रत.

६७. 'मित्र–द्रोही पडतो' **भाइसं** व **मंडळ** प्रती.

६८. 'स्वधर्म' साने प्रत.

६९. 'सावचोर' भाइसं व मंडळ प्रती. 'सेवाचार बुडतो' असा पाठ १८७९ व १८८६ प्रतींत आहे.

७०. 'देऊं' मंडळ प्रत.

७१. 'वाक्य प्रमाण' ऐवजीं 'प्रमाण' हा पाठ **भाइसं** प्रतींत.

७२. हे शब्द **'सगजो'त** नाहींत.

७३. 'मधाचे बोट लावावे यास इच्छितो' **भाइसं** व **मंडळ** प्रती.

व अभयपत्र आंत[७४] पाठविलें. **सुरजमल जाट** यांणें[७५] ऐकोन पुनर्जन्म[७६] [जाहाला] असें भासलें. दुपट हिंमत चढली[७७].

८. हें वर्तमान करणोपकरणीं **मल्हारराव** यांणीं ऐकून, परम विषाद येऊन **रघुनाथरावदादा** यांसीं येकांतीं सुचविलें कीं "आमचे अस्तनींतच[७८] आग्न आहे आणि जाट हस्तगत कसा होतो ?" म्हणोन चिढावून सांगोन आपले डेरियास गेले. **रघुनाथराव दादासाहेब**[७९] यांणीं **सखाराम बापू** यास सांगितलें[७९] की "**सिंदे** केवल एकनिष्ठ भीम[८०]–आर्जुन **नानासाहेबीं** आसें ध्यानांत आणलें. [ऐसें] असतां त्याजकडून हा प्रसंग घडला. यास उपाय काय करावा ? यास मसलत कोणती ?" असें म्हणतांच **सखाराम बापू** केवळ निधडा मनसबेबाज. याणें उत्तर केलें, कीं, "**सिंदे** यांजकडून आसी गोष्ट घडणार नाहीं आणि कदाचित घडली आसलियास साहेबाचें अनहित करणार नाहींत. ही खातरजमा आसो द्यावी. **मल्हारराव** यांणीं पुत्राचे कटाक्षें हे आदावत[८३] घेतली परंतु शरिरांचे[८४] दोन्ही हात आहेत, यांतील कोणता तोडावा ? आतां उभयतांचें एकीकडे ठेवून **सिंदे** यांचे हातानें कलेल तैसा सला करून घ्यावा. यासिवाय दुसरा अर्थ नाहीं." म्हणोन तोच मनसोबा निश्चयांत आणिला.

९. तों **सुरजमल जाट** यास दम पुरेनासा[८५] जाहाला, आणि **जयाजी सिंदे** यांसी सांगोन पाठविलें कीं, "आजून निर्वाण कोठवर पाहाल ? सला करणें आथवा हला करून मारून टाकणें." आसें उत्तर येतांच **जयाजी सिंदे** याणीं आपले आपले कारभारी बोलावून मनसोबा केला कीं, "**जाट** तों जेरीस आला. आतां या निमित्यें खावंदाचे गैरमर्जी[८६] जाहाली तरी पुरवली; परंतु जाबसाल करितां

---

७४. 'अंतस्थ' **सगजो** व **साने** प्रत. 'आंत' असा पाठ १८७९, १८७६ प्रतींत, **भाइसं, शेंबवणे, मंडळ** या प्रतींत. 'जाटास' सांगली प्रत.

७५. 'याप्रमाणें वर्तमान व पगडी पोचतांच' असा पाठ, 'याणें' या शब्दापुढें **सगजो** प्रतींत आहे.

७६. 'पुनर्जन्मसा भासला' **सगजो** प्रत.

७७. 'पडली' **भाइसं** प्रत.

७८. 'खिशांतच' **सांगली** प्रत.

७९. 'उभयतांनीं मसलत केली कीं' **भाइसं** प्रत 'रघुनाथराव आणि सखाराम बापू यांणीं मसलत केली'. **साने**.

८०. या विशेषणांस कागदोपत्रीं आधार मिळतो. (फा. ३।५८).

८१. 'घडावयाची' **साने** प्रत.

८२. 'लोभें' **भाइसं** व **मंडळ** प्रत

८३. 'अंदावळ' **साने** प्रत.

८४. 'होळकर व सिंदे हे शरिराचे' **सांगली** प्रत. शिंदे डावा हात व होळकर उजवा हात किंवा डावा नेत्र म्हणजे शिंदे व उजवा नेत्र होळकर अगर उजवी बाजू होळकर व डावी बाजू शिंदे असा त्यावेळीं संकेत होतासें वाटतें.

८५. 'पोचेनासा' **शेंबवणे** प्रत.

८६. 'बेमर्जी' **साने** प्रत.

उत्तम आहे." म्हणोन सिध[८७] होऊन कचेरीस गेले आणि राजश्री **दादासाहेब** यांसी जाबसाल केला कीं, "**दादासाहेब**, आम्ही धनियाचे बारगीर; निमकहराम नाहीं. आसें आसतां आम्ही जो मनसोबा सांगतो तो खावंदाचे मर्जीस आल्यास[८८] ऐकावा. आजिचे समई **जाटापासून** खंडणी घेऊन पुढें मसलत[८९] फते करावी. येक जागा राहिल्यास पदरीं फौज भारी, निभावणी होणें कठीण." आसे बोललियावर[९०] **दादासाहेब** यांसी परम संकट प्राप्त जाहालें. सला करावी तरी **मल्हारराव** हातचा जातो, सला न करावा तरी[९१] मसलतीस धका बसतो. यासी यत्न काय करावा? आसें मनांत आणून **जयाजी सिंदे** यांस उत्तर केलें कीं, "प्रस्तुत तुम्हीं डेरियास जावें. याचा निश्चय करून तुम्हांस काय तो मनसोबा सांगून पाठवितो." आसें म्हणतांच **सिंदे** डेरियास आले.[९२] [दादासाहेब] मोठें संकटांत पडले. मोर्चियांतून दाणा दारूगोळी आंत प्रविष्ट होऊं लागली. असे थोडे दिवस गुदरले.[९४]

१०. तों **मारवाड**[९५] प्रांती **आबेसिंग** व **ढोकलसिंग** दोघे भाऊ होते. वडील

---

८७. 'सिद्ध' **साने** प्रत.

८८. 'मर्जीस येत नाहीं' **साने** प्रत.

८९. 'पुढें मसलत' = पुढील कार्यक्रम, योजना.

९०. 'बोलतांच' **भाइसं मंडळ** प्रती.

९१. हा मजकूर १८७९ च्या सान्यांच्या प्रतीत नाहीं.

९२. 'लावन दिले' **साने** प्रत.

९३. दारूगोळी शब्दापुढें 'सरंजाम लागेल तो' असा **भाइसं** व **मंडळ** प्रतींत पाठ आहे.

९४ कुंभेरीच्या वेढ्याच्या वेळीं जयाप्पा शिंदे सुमारें महिनाभर आजारी होता (फा. १।१२२) दोघे दोही बाजूस धरून त्यास उठवीत. (फा. ३। १४९). तशाहि स्थितींत त्याचें दादाकडे जाणेंयेणें अशक्य वाटतें. रूपराम मात्र त्याच्याकडे सल्यासाठीं येत होता (फा. ३।१४८, १४९, २०६; फा. १।१११, ११२). यामुळें बखरीच्या वर्णनास फारसा दुजोरा मिळत नाहीं.

९५. मारवाड – जोधपूरचा राजा अजितसिंह ता. २४ जून १७२४ ला मरण पावल्यावर त्याचा वडील पुत्र अभयसिंह गादीवर बसला. तो अत्यंत विश्वासघातकी व दगेबाज होता. पिलाजी गायकवाडास त्यानेंच दग्यानें ठार केलें (१७३२ मार्च ३). त्याच्या असल्या स्वभावामुळें त्याला विनाशकर्ता म्हणजेच ढोकळसिंग असें म्हणत. त्याचा भाऊ बख्तसिंह यास बखरकार ढोकळसिंह असें म्हणतो तें चूक आहे. ता. १९ जून १७४९ ला अभयसिंह मरण पावल्यावर त्याचा पुत्र रामसिंह मारवाड जोधपूरच्या गादीवर बसला. परंतु त्याच्याशीं बख्तसिंहानें तंटा सुरू करून ता. ८ जुलै १७५१ ला गादी मिळविली. तेव्हां रामसिंह जयाप्पाकडे मदतीस गेला. ता. २१-९-१७५२ रोजीं बख्तसिंह मेल्यावर त्याचा पुत्र बिजयसिंह गादीवर बसल्यानें रामसिंहानें पुन्हां तंटा सुरू केला. इतक्यांत रघुनाथराव कुंभेरीच्या वेढ्यांत गुंतला असतां रामसिंहानें त्याची मदत मागितली. परंतु ती त्यास मिळाली नाहीं. पुढें दादा दिल्लीस असतां त्यानें जयाप्पास रामसिंहाच्या मदतीस पाठवून दिलें. (पेद २१।६०; रा. खं. १।३९; फाळके १।११५; ३।१५३).

भाऊ आबेसिंग याचा पुत्र **रामसिंग** व **ढोकलसिंग** याचा पुत्र **बिजेसिंग**, आसे दोघे. त्यांत वडील **रामसिंग** केवल अमली,[९६] बेहोष जाणोन **बिजेसिंग** याणें राजलोभें त्यास धुडावून आगदीं संस्थानें **नागपूर** व **भिकानेर** व **मेडतें** व **झालूर** अशीं भारी संस्थानें होतीं तीं हस्तगत केलीं. **रामसिंग** यास यक **अजमेर** मात्र राहावयास स्थल होतें. त्यासही नित्य[९७] उपद्रव. आसें जाणून त्याजकडील **चेतराम**[९८] वकील होता त्यास बोलावून विचार केला कीं, आतां याणीं[९९] राज्यलोभास गुंतोन आम्हांस निर्माल्यवत ठेविलें. आसें राहून जीव जगवावा[१००] याहून प्राणत्याग अथवा देशत्याग करावा, हें उत्तम. दोहींतून एक आर्थ करावा." तेव्हा **चेतराम** यानें उत्तर केलें कीं, "महाराजांची[१०१] हांडी उतरावी, आणि आपली हांडी चढवावी. प्राणत्याग स्त्रीजातीनें करावा आणि देशत्याग ब्राह्मण संन्यासी यांनीं करावा. तुम्ही संस्थानी, राजपुत्र, त्यांत जातीचे हटेले[१०२] हाडे रजपूत. 'हिंमत मर्दा मदत खुदा, मार्ता मार्ता मरावें. परंतु केवळ अजिज[१०३] होऊं नये. तुम्हांस मसलत करणें तरी मसलत येक मात्र आहे. दक्षण देशांतील गनिमांची प्रबलता जाहाली आहे. त्यास निमें राज्य द्यावें आणि आपलें [कार्य] साध्य[१०४] करून घ्यावें. त्यास प्रस्तुत गनिमाची फौज **कुंभेरीस** लागली आहे. **होळकराचे** हातून कार्य करून घ्यावें तरी ते **बिजेसिंगाचे** स्नेही होत. आती [१०५] लोभांत आहेत. आतां नेकजात येक **जयाजी सिंदे** मात्र आहेत. त्यास पगडभाई करून त्याचे हातोन कार्य करोन घ्यावे." म्हणोन मनसोबा खचित करून इमानप्रमाण,बेलभंडार, व शीरची पगडी **चेतराम** याजसमागमें **जयाजी सिंदे** याजकडे पाठविली. तो **कुंभेरीस** येऊन, **सिंदे** यांस भेटून येथील कचा पका वृतांत सर्व निवेदन केला. आणि राजियाचे शीरची पगडी आणली[१०६] होती ती **जयाजी सिंदे** याचे डोईस घातली आणि त्याची पगडी आपलेपासी घेतली कुर्निस करून जाबसाल केला कीं, "आम्ही रोड,[१०७] दुर्बळ म्हणोन तुम्हांस शरण आलों. आतां मान-अवमान[१०८] याचे धनी तुम्ही आहां." म्हणोन उत्तर केलें.

---

९६. 'अवलिया' **भाइसं** प्रत.

९७. '[कोणत्या तरी] निमित्तें' **साने** प्रत.

९८. 'चौत्रराम' **भाइसं** प्रत; 'चैत्रराम' **शेंबवणे** प्रत.

९९. 'वैरियानें अगदीं राज्यमदें लोभास गुंतोन' **साने** प्रत.

१००. 'असें जगावें' **साने** प्रत.

१०१. 'महारांची' **भाइसं, शेंबवणे, सगजो** प्रतीचा पाठ. राखं ४ पृ. ३

१०२. 'हाडाचे रजपूत' **शेंबवणे** प्रत.

१०३. 'अजीत' **शेंबवणें** प्रत.

१०४. 'साह्य' शेबवणें प्रत; सगजो प्रत 'साध्य' **भाइसं** प्रत.

१०५. हें वाक्य **सानें** व **सगजो** प्रतींत नाहीं.

१०६. 'आणली होती ती' हे शब्द साने प्रतींत नाहींत इतर प्रतींत आढळतात.

१०७. 'राजे' १८८६ **साने** प्रत. 'रोड' असा पाठ **सगजो** प्रतींत आहे. 'राजे' असा पाठ **मंडळ** व **भाइसं** प्रतींत आहे.

१०८. 'मान-अभिमान' **साने** प्रत.

११. तों **जयाजी शिंदे** यांणीं आधींच असाध्य[१०९] आंगिकार केला [होता]. त्यांत हें बोलणें दुसरें आलें. फार उत्तम आहे म्हणोन तेच समई राजश्री **रघुनाथराव दादा** यांचे कचेरीस[११०] जाऊन उत्तर केलें की, "तुम्ही थोर खावंद आहां. आपण या स्थळीं राहून[११०] **जाटाचें** पारिपत्य करावें. आम्हांस आज्ञा द्यावी, आम्ही **मारवाड** प्रांतीं जाऊन मसलत फते करितो. सर्वांनीं येक जागा राहून मसलत बुडवावी[१११] आणि पदरी फौज भारी यांस काय द्यावें? धणियांनीं खुदरजावंदीनें निरोप दिल्हा तरी उत्तम आहे; नाहीं तरी आपणास साफ राहातां पुरवत नाहीं." म्हणोन माघारें आपले डेरियास येऊन फतेनगारचीस आज्ञा केली कीं, "कुचाची नौबत सुरू करणें." म्हणतांच नगारचीनें नौबत सुरू केली. तमाम मोर्चे उठवून गोटांत आणिले. हें वर्तमान ऐकोन राजश्री **रघुनाथराव दादा** यांणीं राजश्री **मल्हारराव** यांस बोलाऊन सांगितलें कीं, "**शिंदे** तो कूच करून चालिले. तुम्ही वडील आहां. आम्हांस मनसोबा कोणता देतां?" हें ऐकतांच **मल्हारराव** याचे तलव्याची आग मस्तकास जाऊन क्षणभर दंग जाहाले आणि चित्तांत पुर्ता विचार केला कीं, केवळ आपणच दुराग्रह करावा, तरी अवघी नामोस्की आपणाकडे येईल. तत्रापि ऐकतो तरी 'इदं च नास्ति परं च न लभ्यते' दोहींसही नाडावें यांत रीत राहात नाहीं. अस्तु **जाट** कोठें जात नाहीं. आजिचे समई कालहरण करितां उत्तम आहे." म्हणोन मनसोबा योजून **दादासाहेब** यांस उतर केलें कीं, "तुम्ही खावंद आहां. ज्यास धन्याची मर्जी राजी त्यांस आम्ही राजी." आसे म्हणतांच पडल्या फळाची आज्ञा घेऊन[११५] **जयाजी शिंदे** यांचे डेरियास आले. त्यांचें समाधान करून, त्यांस राहाऊन घेऊन, त्याचे हातोन जाटाचा सला करून, साठ[११६]

---

१०९. 'आधिकच साधन' **भाइसं** प्रत. 'आधींच साध्य' **शेंबवणें** प्रत. 'शिंदे यांस आधींच असाह्य होतें' **तुंगार** प्रत. 'शिंदे यांस आधींच असाध्य अंगिकार केला आणि' **पुणें प्रत**.

११०. कुंभेरीस असतांच जयाप्पा व दादा यांच्यामध्यें सर्व बोलणीं-चालणीं झालीं असें सांगण्याचा बखरकारांचा हेतु दिसतो, तो बरोबर वाटत नाहीं.

१११. 'बुडविली' **भाइसं** व **मंडळ** प्रत.

११२. 'खुषीनें रजावतीने' **भाइसं** व **मंडळ** प्रत. 'खुषीरजावंदीनें' **साने** प्रत.

११३. 'नामोहरमी' **साने** प्रत.

११४. 'ऐकावें' साने प्रत; 'ऐकत' **मंडळ** प्रत 'ऐकता' **शेंबवणें** प्रत.

११५. 'होऊन' १८८६ **साने** प्रत; **मंडळ** व **भाइसं** प्रत.

११६. ही खंडणी तीस लक्ष रुपये झाली होती. पुढेंहि ठिकठिकाणीं बखरकार खंडणीची रक्कम फुगवून सांगतो. (जाटाची खंडणी पहा पेद २१।६०, ६२; पेद २७।८१; बाबारो १।२२५. वैद्य ५।११ (शके १६७६) हा तह ता. १८ मे १७५४ ला झाला. मात्र ठरलेली खंडणीहि रघुनाथरावाच्या स्वाधीन झाली नाहीं; पुढें फार कटकटी झाल्या. फा ३।४५.

लक्ष रुपये खंडणी घेऊन राजश्री रघुनाथराव देशास आले[११७]. मल्हारराव मालवें प्रातीं इंदुरास येऊन छावणीस[११७] राहिले. शिंदे यांणी कूच करून मजल दर मजल मारवाड प्रांतीं चाल केली[११७].

---

११७. बखरकाराचें हें वर्णन साफ चूक आहे. जाटाशीं तह झाल्यावर रघुनाथराव, मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे हे सर्व आपल्या फौजेसह मथुरा-दिल्लीकडे गेले (पहा पेद २१।६०; राख १।४२; फा १।११५, ११७; फा ३।१५३ वैद्य ५।११ शके १६७६). त्यानंतर दादासाहेब, मल्हारराव, जयाप्पा वगैरे मंडळी दिल्लीस असतां, दादासाहेबांची परवानगी घेऊन ता. २३ जुलै १७५४ ला जयाप्पा शिंदे मारवाडच्या स्वारीवर रवाना झाला. (फा ३।१५३, ४९; रा. खं १।३७, ३९ फा.१।११४, ११५, ११७; काव्यें. १२५; ऐसंसा १.४७, ४८). उत्तरेकडील कामकाज झाल्यावर दादासाहेब दक्षिणेस निघाला व ता. १०।८।१७५५ ला पुण्यास पोचला. मल्हाररावही त्यानंतर इंदुरास गेला (फा. ३।१८६).

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 9eh22 दि: 3/6/2014
क्रमांक ... 4er ... नों दि: 26/3/2015

प्रकरण दुसरें

शिंद्यांची मारवाड-जोधपूरची स्वारी

१२. [जयाप्पा आपल्यावर चालून येणार] हें वर्तमान **बिजेसिंग** यानें ऐकोन, आपली फौज जमा क न **नागूर** सोडून चार सा कोसावर येऊन राहिला. समागमें पंधरा हजार फौज व दाहा हजार पायदल व पन्नास तोफा व पंचवीस गंजिफियाच्या गाडचा व शंभर उंट, बाणांच्या कैच्या, पांच सातशें उंटावरील सुतरनाले व जेजाला बरकंदाज युध्धास सिध जाहाले. ते राठोड रजपूत हाडे, परम हाटेले, त्यांचे ध्यानांत गनिमाची फौज[1] नाहीं. हें वर्तमान **जयाजी शिंदे** यांणीं एकोन तमाम उमराव यांस बोलाऊन विचार केला कीं. " मारवाडी हाटेले रजपूत, माहापराक्रमी, सिरच्छेद जाहाला तरी कबंध नाचतें. त्यांचे मर्दुमकीची शर्थ तो या प्रकारची. त्यांणीं आपले हिमतीनें **खंदारचा**[2] पातशाहा दुरानी गिलज्या याची पगडी व घोड्याची दुमची[3] सोडविली ते मर्यादा आद्यापी चालती. गिलज्यास पगडी नाहीं. आणि घोड्यास दुमची नाही; आणि त्यांजपाशीं आगही भारी. आम्हाकडील आधींच गनीम यांचें कचे दिल, गोड हत्यारी, निसवले[4] तरी, झाडास बांधले असतां झाड घेऊन जातील. आम्ही तो प्रतिज्ञापूर्वक राजश्री **रघुनाथराव दादासाहेब** याजपासून निघालों. आणि जन्मादारभ्य **मल्हारराव** याचे जुगांतून[5] निघालों. येक जागां[6] होतों तेव्हां येश न आलें तरी त्याचा खेद नवता. आतां

---

१. 'त्याना तृणवत वाटली' सांगली प्रत.

२. खंदारचा=कंदाहारचा.

३. 'तुमची' असाहि पाठ कांहीं प्रतींत आहे.

४. 'निटवले' १८८६ साने प्रत.

५. 'जुरतीने' धोपेश्वर, भाइसं, मंडळ प्रत. 'जुगतीनें' पुणें प्रत.

६. कुंभेरीच्या वेढ्यापासूनच शिंदे–होळकरांत (गृह) कलहाचें बीज रुजलें असें बखरकार दर्शवितो; पण हें पूर्वीपासूनच मूळ धरून होतें. (राखं १।२; पेद २।३५) कुंभेरीच्या वेळीं तें जास्त खोलवर गेलें. होळकराच्या मनाविरुद्ध त्या वेळीं शिंद्याच्या मध्यस्थीनें जाटाशीं तह झाल्यानें जयाप्पाचा बोलबाला फार झाला. (फा ३।१११-१२) तें मल्हाररावास सहन झालें नाहीं. रघुनाथराव त्याच्या मुठींत असून तो त्याच्या धोरणाप्रमाणेंच वागत होता. कुंभेरीच्या तहानंतर सर्व जण दिल्लीस गेल्यावर जयाप्पा राघोबाची परवानगी घेऊन मारवाडच्या स्वारीवर-त्यास 'रामसिंगाचा दुरभिमान' असल्यानें निघून गेला. लगेच त्याचा करभारी रामाजी अनंत लिहितो कीं 'दिल्लीचें बरेवाईट श्रीमंत व सुभेदार यांच्या हातीं. मारवाडच्या स्वारींत जयाप्पास यश येईल असें कोणासही वाटत नव्हतें (पे.द. २१।६०) मात्र तेथें त्यास यश मिळतांच सर्वांनीं

आपेश आले तरी पुन्हां त्यांस तोड तरी कसें दाखवावें ? प्राण द्यावा किंवा देशत्याग करावा. दोही आर्थांतून येकाचा आंगिकार करावा. त्याजवरून **दत्ताजी सिंदे** भीमबहादर[७] व आणखी लहान थोर सरदार यांणीं मसलत[८] दिली कीं,"पुण्यप्रताप श्रीमंत **नानासाहेब** यांच्या पदरी आहे. आणि तुम्हीं येकनिष्ठ शेवक[९] आहां. ईश्वर तुम्हांस यश देईल, आम्ही येथून **रामसिंग** याचा आंगिकार करून आलों आणि **बिजेसिंग** युध्धास आला म्हणोन नामोहरम[१०] व्हावें तरी जालेपणाचें सार्थक काय ? नामर्दीची[११] जघन्यता होईल. युध्ध करावें. यांत यश आपेश शूराचा वांटा. याची क्षिती[१२] काय ?" युध्ध करावें असा निश्चय ठरला.

१३. [त्या वेळीं] त्यांस व यास दाहा कोशांची तफावत[१३] होती. त्यांणीं स्नानें करून तमाम ऐकमेकास निर्वानिरव करून तमाम आंगांत चिलखतें व बक्तरें घालून, जिरेटोप, पेटचा बांधोन, दारूगोळी लोकांस[१४] वांटून तंगबार करून, मुहूर्तें सिध्ध होऊन चालिले. मार्गी शकूनही चांगले जाहले[१५]. तीस हजार फौज होती. त्यांची निवड करून दोन भाग केले. येकीकडे **दत्ताजी सिंदे** जाहले आणि येकीकडे **जयाजी सिंदे** जाहले. दोन्ही सैन्यांच्या गांठी पडल्या. **बिजेसिंग** यार्णे तमाम आपले फौजेस ताकीद करून सामानसुध्धा[१६] सिध जाहाला. भोंवता[१७] जेजाला व तोफा वगैरे तयार होऊं लागले. जोंपर्यंत आंगाशीं अंग लागलें नवतें तोंवर तोफांचा मार व हस्तनाले व सुतरनाले व जेजाला व रेखले व गंजिफीयांच्या गाडचा व बरकंदाज आसी येकदांच सरबती जाहली व बाणांचा वर्षाव मेघ-

---

त्याच्यावर स्तुतीचा वर्षाव केला. (फा ३।२८३, ५८, २६९, २७०, ५४; काव्ये. १३१). परंतु रघुनाथरावानें होळकरांचें अंतरंग ओळखलें असावें. होळकराला वाटे कीं दादानें देशीं जावें. व दिल्लीस आपण एकटयानें राहून सर्व कार्यभाग उरकावा (फा ३।२७२). पुढें सर्व एकरूप व्हावें, जयाप्पाचें चित्तांत मनसबे आहेत ते मल्हाररावानीं ऐकावें' असाहि उपदेश होऊं लागला (फा ३। २९६, २९८). यावरून दिल्लीच्या राजकारणासंबंधीं धोरण काय असावें. याबद्दल दोघां सरदारांत तेढ उत्पन्न झाली व त्यांत स्वार्थ डोकावूं लागला हें स्पष्ट आहे.

७. हें पेशव्यानें शिंद्यांचें केलेलें कौतुक योग्य होतें.

८. 'हिंमत' **साने भाइसं** व **मंडळ** प्रत.

९. 'सेवा करीत आहां' **साने भाइसं** प्रत.

१०. 'नामोहार' **शेंबवणें** प्रत. 'नामोशेर' **भाइसं** प्रत.

११. 'नामर्दुमीची' **साने** प्रत.

१२. 'क्षित' **शेंबवणें** प्रत.

१३. 'कोशांचा छाटा होता' **सांगली** प्रत.

१४. 'करोलांस' **भाइसं** प्रत.

१५. याच्यापुढें 'तेव्हां अधिकच हिंमत येऊं लागली' असें वाक्य **साने** प्रतींत अधिक आहे.

१६. 'बमय सामान' **साने** प्रत 'सरंजाम सुद्धां' **क.** प्रत.

१७. 'भोंवताले भाले व तोफा' **मंडळ** प्रत. 'भोंवता रिसाले' **साने** प्रत.

मालाप्रमाणें[१८] जाहाला. मोठा कडाखा[१९] जाहाला. झुंजांत धुराची व धुळीची[२०] येकदांच गर्दी धुंदी जाहाली. कोणाचें तोंड कोणाचे द्रष्टीस पडेनासें जाहलें. यंत्रांच्या धडाकियाखालीं घोडीं मनुष्यें[२१] बधीर जाहलीं. क्षणभर आसी गर्दी होऊन दोनीकडून हर हर म्हणोन घोडीं घातलीं. दोहीकडून घोडियांचीं तोंडें आंत शिरकलीं[२२]. ते समईचें लाघव[२३] तेथील आनभविले आसेल त्यास ठाऊक आसेल. ऐसी आग जाहाली. नंतर आगीचा मार राहून तरवारीची खणाखणी[२४] जाहाली. त्यांत ते आधींच रजपूत, त्यांत मारवाडी[२५] हाडे, त्यांची मरदुमी,[२६] नवल नाहीं. परंतु मराठियांनीं फारच शर्त केली. एकच गर्दी जाहाली[२७]. आसें युद्ध जिवापरती अधिक केलीं गलिमांत कोणीं केलें[२८] नाहीं. मल्हारराव यांचे इरेनें[२९] मोठेमोठे स्वस्तीस येऊन मोठा प्रलय जाहाला. तो न भूतो न भविष्यति. पांचसातशें गलीम चांगलें ठार जाहाले[३०]. तसेंच जखमी घायाळ दोन अडीचशें[३१] मनुष्यें जालीं. पांच सातशें घोडींही पडलीं. मारवाडियाकडील

---

१८. 'मेघाप्रमाणें' **साने** प्रत, **शेंबवणें** प्रत. 'मेघकाळाप्रमाणें' पु. प्रत. 'मेघवृष्टीप्रमाणें' **क.** प्रत.

१९. 'कडड' **भाइसं** प्रत.

२०. 'धुक्याची' **सगजो** प्रत, एकच गर्दी धुराची होऊन धुंदी जाली.' **क.** प्रत.

२१. 'घोडीं मनुष्यें बाहेर गेली' **भाइसं** प्रत.

२२. 'शिरलीं' **साने** प्रत.

२३. 'कडाखा' **साने** व शेंबवणें प्रत.

२४. या वाक्याबद्दल साने प्रतींत कल्याण प्रतीचा पाठ दिला आहे तो असा. 'अग्नीचा वर्षाव जाहल्यानंतर उल्हाटयंत्रें बंद होऊन तरवारेची हातघाई चालली.'

२५. 'हाटेले' १८७९ **साने** व **सगजो** प्रत.

२६. 'त्यांचें मर्दुमीचें नवल नाहीं' **साने** प्रत.

२७. हें वाक्य साने प्रतींत नाहीं, **शेंबवणें** प्रतींत आहे.

२८. मल्हाररावाच्या जुगांतून फुटल्यावर जयाप्पा शिंद्यानें मारलेली मेडत्याची ही पहिलीच मोठी लढाई, ता. १५ सप्टेंबर १७५४ रोजीं झाली. बखरकारानें मेडतें व नागोर या दोनच लढायांचें वर्णन केलेलें आहे. मारवाडी राठोड मोठे लढवय्ये, त्यांचीं तरवार महशूर' ते अत्यंत गर्विष्ठ, मराठी फौजाशीं गांठ पडून ते 'श्रमग्रस्त' झाले नव्हते (काव्यें १२५, १३१). त्यामुळें मेडत्याची लढाई जिंकल्यावर जयाप्पावर स्तुतिवर्षाव झाला. (पहा. फा. ३।५४, ५५, ५८, ६०, २७०, २८२, २८३). ही लढाई जिंकल्यानें जयाप्पास स्वसामर्थ्याची बरोबर कल्पना आली व पेशवा, राघोबा, सखाराम बापू वगैरेंचा संशय नष्ट झाला. मेडत्याच्या लढाईसंबंधीं आधार—पहा फा. १।११५, ११६, ११८; काव्यें १४३, १२२, १२४; रा. खं. १।३९. फा ३।१५३, २०७.

२९. या पुढें साने प्रतींत पुढील पाठ आहे. 'दांत निकसीस येऊन मोठमोठे खेतास येऊन जिवाअधिक केली.'

३०. **साने** पाठ 'पांच सातशे भले, चांगले लोक गलिमाकडील ठार जाले.

३१. 'दोन अडीच हजार' १८७९ **साने** प्रत, **भाइसं** प्रत.

दोन हजार मनुष्यें ठार जाहाली. तोफा व रेखले[३२] कांहीं पाडाव केले. आसा प्रलय जाहाला. परंतु धन्य ? रजपुताची माय रजपुतास व्याली ! आसें गलिमास होत तरी धुरोळा[३३] द्रिष्टीस पडो न देते. गलीम याची उत्कृष्ट चलती[३४] जाली. मारवाडियांत तंबीं पोहोचवावी[३५] असें नव्हतें. त्यांतही हाटेलें रजपूत जैसा मोटेचा बैल सरतो तैसे मार खातच खेती सोडून, आपले मुरदे सांभाळोन, दोन कोश माघारे निघोन[३६] गेले. [सिंदे] यांणीं ती जागा फत्ते करून शाहादानें वाजवीत खेतीवर उभे राहिले आणि आपले [भले लोकाचे] मुरदे जमा करून [त्यांस] आग्नप्रसाद दिल्हा. घायाळांच्या जखमा बांधोन परम खुशाली केली. तो आनंद पत्रीं लेहून कलवावा तो काय ? तेथें असतील ते आनभव[३७] जाणतील. **सिंदे** यांसी आसें जालें कीं, **मल्हारराव** यांजपासून निघालियास ईश्वरें आबरू राखिली. जलमाचें सार्थक जाले. म्हणोन रात्रौ तेथें मुकाम केला. रात्रौ छबिन्यास[३८] राऊत उभे केले. **मारवाडियांस** वेढा द्यावयास[३९] आवसान राहिलें नाहीं. त्यांची फौज सिकस्त जाहाली. **हिंदुस्थानांतील** स्वधर्म[४०] कीं फौज ोडली तरी दोन च्यार गांवें पळावें लागत नाहीं. खेती म्हणजे रण सोडून गेलियास याचे नामोहरकी जाली.[४१] **मारवाडी** यांनीं अपजय जाणून रात्रौ **नागुरांत** पोचले. [ज्या] मारवाडियांस समोरच जखमा होत्या त्यांच्या स्त्रियांनीं काया कुरवंडी करून जयजयकार केला. ज्यांस पाठीवर जखमा होत्या त्यांच्या स्त्रियांनीं पतींचे त्याग केले. मारवाड प्रांतीं दस्तुर हाच कीं सनमुख[४२] घाव घेतला तरी उत्तम, नाहीं तरी पुरुषांचें स्त्रियांनीं मुखावलोकन करूं नये स्त्रियांचीं हिंमत या रीतीची, तेथें पुरुषांची सिपारस[४३] कोठवर ल्याहावी ? अस्तु. राजा शाहूच्या पुण्यप्रतापाचा फलादेश.

१४. [मेडत्याच्या विजयानंतर] एक दोन रोज दम खाऊन, हुषार होऊन, [लष्करासह जयापा शिंदे] **नागुरा**भोंवताले उतरले. शहर थोर. तीस हजार गलीम आणखी त्या प्रांतांतील **रामसिंग** वगैरे राजे राजवाड दाहा हजार होते. परंतु[४४]

---

३२. 'रिसाला' **साने** प्रत.

३३. 'धूर' **भाइसं** प्रत. 'धुरोळा' **सगजो** प्रत.

३४. 'गनीम यांचा उत्कर्ष. चढती सद्दी' **साने** प्रत.

३५. 'पोचविली' **भाइसं** प्रत. 'पोचली' **मंडळ** प्रत.

३६. 'माघारे निघाले' **साने** प्रत.

३७. 'अनुभविक' **साने** प्रत.

३८. 'रात्रौ छबिने उभे केले. **भाइसं** प्रत.

३९. 'मारवाडी यांस वेढावयास' **साने** प्रत.

४०. 'धम' **शेंबवणें** प्रत.

४१. **साने** प्रतींत पुढील पाठ आहे. 'रण सोडून गोळीची स्वास्त निघाले तरी नामोहरम जाले.'

४२. 'समोर' **कल्याण** प्रत.

४३. 'शिकारस' **साने** प्रत.

मालाप्रमाणें[१८] जाहाला. मोठा कडाखा[१९] जाहाला. झुंजांत धुराची व धुळीची[२०] येकदांच गर्दी धुंदी जाहाली. कोणाचें तोंड कोणाचे द्रष्टीस पडेनासें जाहलें. यंत्रांच्या धडाकियाखालीं घोडीं मनुष्यें[२१] बधीर जाहलीं. क्षणभर आसी गर्दी होऊन दोनीकडून हर हर म्हणोन घोडीं घातलीं. दोहीकडून घोडियांचीं तोंडें आंत शिरकलीं[२२]. ते समईचें लाघव[२३] तेथील आनभविले आसेल त्यास ठाऊक आसेल. ऐसी आग जाहाली. नंतर आगीचा मार राहून तरवारीची खणाखणी[२४] जाहाली. त्यांत ते आधींच रजपूत, त्यांत मारवाडी[२५] हाडे, त्यांची मरदुमी,[२६] नवल नाहीं. परंतु मराठियांनीं फारच शर्त केली. एकच गर्दी जाहाली[२७]. आसें युद्ध जिवापरती अधिक केलीं गलिमांत कोणीं केलें[२८] नाहीं. मल्हारराव यांचे इरेनें[२९] मोठेमोठे स्वस्तीस येऊन मोठा प्रलय जाहाला. तो न भूतो न भविष्यति. पांचसातशें गलीम चांगलें ठार जाहाले[३०]. तसेंच जखमी घायाळ दोन अडीचशें[३१] मनुष्यें जालीं. पांच सातशें घोडींही पडलीं. मारवाडियाकडील

---

१८. 'मेघाप्रमाणें' **साने** प्रत, **शेंबवणें** प्रत. 'मेघकाळाप्रमाणें' पु. प्रत. 'मेघवृष्टीप्रमाणें' **क.** प्रत.

१९. 'कडड' **भाइसं** प्रत.

२०. 'धुक्याची' **सगजो** प्रत, एकच गर्दी धुराची होऊन धुंदी जाली.' **क.** प्रत.

२१. 'घोडीं मनुष्यें बाहेर गेली' **भाइसं** प्रत.

२२. 'शिरलीं' **साने** प्रत.

२३. 'कडाखा' **साने** व शेंबवणें प्रत.

२४. या वाक्याबद्दल साने प्रतींत कल्याण प्रतीचा पाठ दिला आहे तो असा. 'अग्नीचा वर्षाव जाहल्यानंतर उल्हाटयंत्रें बंद होऊन तरवारेची हातघाई चालली.'

२५. 'हाटेले' १८७९ **साने** व **सगजो** प्रत.

२६. 'त्यांचें मर्दुमीचें नवल नाहीं' **साने** प्रत.

२७. हें वाक्य साने प्रतींत नाहीं, **शेंबवणें** प्रतींत आहे.

२८. मल्हाररावाच्या जुगांतून फुटल्यावर जयाप्पा शिंद्यानें मारलेली मेडत्याची ही पहिलीच मोठी लढाई, ता. १५ सप्टेंबर १७५४ रोजीं झाली. बखरकारानें मेडतें व नागोर या दोनच लढायाचें वर्णन केलेलें आहे. मारवाडी राठोड मोठे लढवय्ये, त्यांचीं तरवार महशूर' ते अत्यंत गर्विष्ठ, मराठी फौजाशीं गांठ पडून ते 'श्रमग्रस्त' झाले नव्हते (काव्यें १२५, १३१). त्यामुळें मेडत्याची लढाई जिंकल्यावर जयाप्पावर स्तुतिवर्षाव झाला. (पहा. फा. ३।५४, ५५, ५८, ६०, २७०, २८२, २८३). ही लढाई जिंकल्यानें जयाप्पास स्वसामर्थ्याची बरोबर कल्पना आली व पेशवा, राघोबा, सखाराम बापू वगैरेंचा संशय नष्ट झाला. मेडत्याच्या लढाईसंबंधीं आधार—पहा फा. १।११५, ११६, ११८; काव्यें १४३, १२२, १२४; रा. खं. १।३९. फा ३।१५३, २०७.

२९. या पुढें साने प्रतींत पुढील पाठ आहे. 'दांत निकसीस येऊन मोठमोठे खेतास येऊन जिवाअधिक केली.'

३०. **साने** पाठ 'पांच सातशे भले, चांगले लोक गलिमाकडील ठार जाले.

३१. 'दोन अडीच हजार' १८७९ **साने** प्रत, **भाइसं** प्रत.

दोन हजार मनुष्यें ठार जाहाली. तोफा व रेखले[३२] कांहीं पाडाव केले. आसा प्रलय जाहाला. परंतु धन्य ? रजपुताची माय रजपुतास व्याली ! आसें गलिमास होत तरी धुरोळा[३३] द्रिष्टीस पडो न देते. गलीम याची उत्कृष्ट चलती[३४] जाली. मारवाडियांत तंबीं पोहोचवावी[३५] असें नव्हतें. त्यांतही हाटेलें रजपूत जैसा मोटेचा बैल सरतो तैसे मार खातच खेती सोडून, आपले मुरदे सांभाळोन, दोन कोश माघारे निघोन[३६] गेले. [सिंदे] यांणीं ती जागा फत्ते करून शाहादानें वाजवीत खेतीवर उभे राहिले आणि आपले [भले लोकाचे] मुरदे जमा करून [त्यांस] आग्नप्रसाद दिल्हा. घायाळांच्या जखमा बांधोन परम खुशाली केली. तो आनंद पत्रीं लेहून कलवावा तो काय ? तेथें असतील ते आनभव[३७] जाणतील. **सिंदे** यांसी आसें जालें कीं, **मल्हारराव** यांजपासून निघालियास ईश्वरें आबरू राखिली. जलमाचें सार्थक जाले. म्हणोन रात्रौ तेथें मुकाम केला. रात्रौ छबिन्यास[३८] राऊत उभे केले. **मारवाडियांस** वेढा द्यावयास[३९] आवसान राहिलें नाहीं. त्यांची फौज सिकस्त जाहाली. **हिंदुस्थानांतील** स्वघर्म[४०] कीं फौज ोडली तरी दोन च्यार गांवें पळावें लागत नाहीं. खेती म्हणजे रण सोडून गेलियास याचे नामोहरकी जाली.[४१] **मारवाडी** यांनीं अपजय जाणून रात्रौ **नागुरांत** पोचले. [ज्या] मारवाडियांस समोरच जखमा होत्या त्यांच्या स्त्रियांनीं काया कुरवंडी करून जयजयकार केला. ज्यांस पाठीवर जखमा होत्या त्यांच्या स्त्रियांनीं पतींचे त्याग केले. मारवाड प्रांतीं दस्तुर हाच कीं सनमुख[४२] घाव घेतला तरी उत्तम, नाहीं तरी पुरुषांचें स्त्रियांनीं मुखावलोकन करूं नये स्त्रियांचीं हिंमत या रीतीची, तेथें पुरुषांची सिपारस[४३] कोठवर ल्याहावी ? अस्तु. राजा शाहूच्या पुण्यप्रतापाचा फलादेश.

१४. [मेडत्याच्या विजयानंतर] एक दोन रोज दम खाऊन, हुषार होऊन, [लष्करासह जयापा शिंदे] **नागुराभोंवताले** उतरले. शहर थोर. तीस हजार गलीम आणखी त्या प्रांतांतील **रामसिंग** वगैरे राजे राजवाड दाहा हजार होते. परंतु[४४]

---

३२. 'रिसाला' **साने** प्रत.

३३. 'धूर' **भाइसं** प्रत. 'धुरोळा' **सगजो** प्रत.

३४. 'गनीम यांचा उत्कर्ष. चढती सद्दी' **साने** प्रत.

३५. 'पोचविली' **भाइसं** प्रत. 'पोचली' **मंडळ** प्रत.

३६. 'माघारे निघाले' **साने** प्रत.

३७. 'अनुभविक' **साने** प्रत.

३८. 'रात्रौ छबिने उभे केले. **भाइसं** प्रत.

३९. 'मारवाडी यांस वेढावयास' **साने** प्रत.

४०. 'धम' **शेंबवर्णे** प्रत.

४१. **साने** प्रतींत पुढील पाठ आहे. 'रण सोडून गोळीची स्वास्त निघाले तरी नामोहरम जाले.'

४२. 'समोर' **कल्याण** प्रत.

४३. 'शिकारस' **साने** प्रत.

शहरास वेढा पडेना.[४४] लस्कर यक बाजूस राहिलें. सबब[४५] जागोजाग मोर्चे दिले[४६]. तमाम मोर्चे कायम जाहाले. परंतु रान केवल रेतीचें. सुरंगाचा यत्न नाहीं. आसें पाहून युक्तीनें[४६] मोर्चेबंदी केली. परस्परें तोफांचा वगैरे रेखलियाचा[४७] भडिमार होऊं लागला. आसे सात आठ महिने[४८] जाहाले. यावर **जयाजी सिंदे** यांणीं मनसोबा केला कीं, "दुर्ग तो आसाध्य आणि येक जागा आवघी फौज राहिली[४९] असतां पृथवी-दिगविजय होणार नाहीं." म्हणोन **रामसिंग** व आपला पुत्र **जनकोजी सिंदे** यांज समागमें दाहा हजार फौज देऊन **मेडतियासी** रवाना[५०] केले. **मेडतियासि** मोर्चे लाऊन राहिले आसे बारा महिने पूर्ण जाले,[५१] **मारवाडी** दमास येईनात. यांसि तो मोहरा इरेस पडला तसेच हेही इरेस पडले.[५२]

१५. [इकडे] **नागुरांत बिजेसिंग** यांणीं विचार केला कीं, "**मल्हारराव** याच्या इभ्रतीवर[५३] आम्हीं हा[५४] आंगिकार केला. परंतु कागदीं पत्रीं मात्र समाधान करितात. आम्ही दम कोठवर धरावा? येक[५५] वर्ष समग्र जाहाले. पांच मनुष्यांची कुमक नाहीं." तेव्हां आपले वकिलासमागमें पत्र **मल्हारराव** यांस देऊन पाठविलें कीं, "पादशाही उमराव आथवा भुमे राजवाडे यांच्या भरंवशावर आम्हीं ही मसलत[५५] केली नाहीं. तुम्हीं भरंवसा दिल्हा म्हणोन आम्हीं या गोष्टीचा आंगीकार केला. आतां आमची गती काय?" म्हणोन **मल्हारराव** यांसीं वर्तमान

---

४४. हें वाक्य १८७९ व १८८६ प्रतींत नाहीं. नव्या उपलब्ध प्रतींतही नाहीं.

४५. हें वाक्य १८७९ व १८८६ प्रतींत नाहीं.

४६. 'कळाशीनें' हा शब्द 'युक्तीनें' या शब्दापुढें **साने** प्रतींत आहे. 'असो. कळाशी करून' **सातारा** प्रत.

४७. 'रिसालियाचा' **साने** प्रत.

४८. 'सात आठ रोज' **भाइसं** व **मंडळ** प्रत हा पाठ जास्त बरा असें वाटतें.

४९. 'राहालियास' साने प्रत.

५०. बखरकाराची ही चूक दिसते. मेडतें आधींच घेतलें असल्यानें जनकोजीस रूपनगर अगर अन्य ठाणें घेण्यास पाठविलें असावें.

५१. जयाप्पानें ता. ६ ऑगस्टला मेडत्यास मोर्चे लावले व ता. १५ सप्टेंबरला तो किल्ला घेतला. ही गोष्ट लक्षांत घेतां बखरकाराची बारा महिने ही कालगणना बरोबर दिसत नाहीं. तसेंच 'एक वर्ष समग्र जाहाले' हेंहि. मात्र यानंतर थोड्याच दिवसांत ता. २५ जुलै १७५५ ला जयाप्पाचा खून झाला. ही घटना लक्षांत घेतली तरीही बखरकार चूक ठरतो.

५२. हें वाक्यार्ध साने प्रतींत नाहीं.

५३. 'भिस्तीवर' सां. व क. प्रती.

५४. 'हा जागा' भाइसं प्रत.

५५. 'हिंमत' **साने** प्रत.

सांगतांच **मल्हारराव**[५६] यांणीं उत्तर केलें कीं, "**शिंदे**[५७] व आम्ही येका खावंदाचे चाकर. यास्तव उघड तुमची कुमक करितां येत नाहीं. परस्परें या रानांतील उमराव व रजवाडे यांसी पत्रें देऊन तुमची कुमक करवितों." म्हणोन तमाम[५८] पत्रे **माधोसिंग जयनगरकर** व **सिवसिंग** राणे **उदेपूरकर** व **उमेदसिंग बुंदीकर** व **मारवाडी**[५९] **भीमसिंग** आणखी बहुत छोटे मोठे सरदार यांसी साहित्यपत्रें दिलीं आणि वकिलास हिंमत देऊन सांगितलें कीं, "तुम्हीं ठांसून[६०] राहावें म्हणजे त्यांच्यानें रोमांच[६०] वांकडे होणार नाहीं. आसें करितां कोणीं कुमक[६१] न करीत तरी तुम्हीं मोंगलाई मसलत[५९] करून यश संपादावें." आसें सांगोन **बिजेसिंगाकडे** वकिलास रवाना केलें. भुमे राजवाडे यांसी पत्रें प्रविष्ट केलीं. तीं मारवाडी यांचें पारपत्य जाहालें येणें करून सर्वत्रांची छाती फुटोन[६२] गेली. कोणी कुमक करीनात.[६३]

१६. आसे चवदा महिने जाहाले. लस्करांत धारण इस्तकबीलपासून सात शेर आठ शेर व वैरण चोविस पंचवीस[६४] पुलें आसी माहागाई. परंतु सरदार केवळ कुबेर. रोजमुरे व आजबाब[६५] आदेहून[६६] ज्याजती पाहून केला.[६६] लोक आराम [६७]राखिले. धारण महाग[६८] आहे असें कोणास सुचों दिलें नाहीं. फौजेंत येक मनुष्य बेदिल[६९] नाहीं. आसे तमाम लोक येकदील. आवघियांची होड[७०] कीं **बिजेसिंगाचें** पारपत्य करावें. या प्रकारें गलिमाचें मानस.[७१]

१७. तिकडे **नागुरांत बिजेसिंग** याणें आपले उमराव बोलावून मसलत केलीं कीं, "आतां आमची कोणी कुमक करीत नाहीं. **मल्हारराव** याणें इरेस

---

५६. बखरकाराच्या या लिहिण्यास अजून कागदोपत्रीं कोठेंच आधार मिळत नाहीं. त्याचा 'मोंगलाई मसलतीचा' सल्लाहि असाच असत्य भासतो. निरनिराळ्या राजपूत राजांस त्यानें पत्रें दिल्याचें वृत्तहि असंभवनीय वाटतें.

५७. 'ते' **भाइसं** प्रत.

५८. 'मारवाड़ांतील' **भाइसं** प्रत.

५९. 'रोखून' **सगजो** प्रत; 'रोखून राखावें' **तुं** प्रत.

६०. 'रोमहर्षण होणार नाहीं' **साने** प्रत.

६१. 'हिंमत' **सगजो** प्रत.

६२. 'फाटोन' साने प्रत.

६३. 'कोणी कुमक करीत नाहींत' **भाइसं** प्रत.

६४. 'पेंढ्या' **शेंबवणें** व **सगजो** प्रत.

६५. 'अर्जबाब' **भाइसं** प्रत.

६६. 'पाहून खर्ची पावती केली' साने प्रत; 'आद्याहून जास्ती पावती केली' सगजो प्रत.

६७. 'पावले' मंडळ प्रत; 'जाहाले' सगजो प्रत.

६८. 'धारण अशी आहे हें कोणास ठाऊक नाहीं' मंडळ प्रत; 'धारणशी कोणास सुचों दिल्ही नाहीं' सगजो प्रत; 'धारण महाग आहे अशी कोणास सुचों दिल्हे नाहीं' शेंबवणें प्रत.

६९. 'दिलगीर' मंडळ प्रत.

७०. 'वोढ' साने प्रत, भाइसं प्रत.

७१. 'मसलतींत आहे.' सगजो प्रत.

घातलें,[७२] परंतु त्यांच्यानें उघड साहित्य होत नाहीं. समग्र सवा वर्ष जाहालें.[७३] आम्हीं आतां कोंडून कोठवर राहावें? महागाई बहुत आणि गलीमहि शह सोडून जात नाहीं हा पूर्ण भरंवसा कलला.[७४] आतां मोंगलाई मसलतीनें[७५] होईल तें करावें." म्हणोन तिघे मारेकरी[७६] सिध केले. धन्य[७७] ते रजपूत[७७]! सतीचें वाण घ्यावें[७८] तसे तयार जाहाले. त्यांणीं आपला जीव मुठींत धरिला. मग त्याणें त्यांस कांहीं देऊं केलें असेल तें न कले.[७९] अस्तु. मारेकरी[७६] च्यार घटका रात्रीस बाहेर लावून[८०] दिल्हे आणि आंत आपले फौजेंत ताकीद करून सिध्ध होऊन उभे राहिले.

१८. तों मारेकरी लस्करांत पोहचले. तों च्यार घटका दिवस आला. पागेचे[८१] डेरियापुढें स्नानास **जयाजी सिंदे** गेले. तों नजीक घोडचाची पागा होती. मारेकरी केवल कंगाल, भिकारियाचा वेष घेऊन, आंगावर जीर्ण वस्त्रें व गुप्त सुऱ्या, आसे घोडियापुढें दाणे वेंचीत होते. तो **जयाजी सिंदे** यांणीं स्नान करून चौरंगावर उभे राहिले. खिसमतगार हांडाबासन[८२] सांभालावयास गुंतले. अबदागिऱ्या मात्र डोईवर छाव धरून उभा होता. **जयाजी सिंदे** यांस संवय[८३] आसी होती कीं स्नानानंतर मुखावर धोतर घेऊन क्षणभर डोळे चोळीत राहावें. तों जसा राजा नलाचे द्वारीं कली वृषभरूप[८४] धरून तिष्ठत होता. तैसेच मारेकरी जपून होते. इतक्यांत संधि सांपडतांच मारेकरी यांणीं उठोन येकायेकींच दोन्हीकडून [८५] कुशीस सुऱ्यांचा मार केला. काम कारेगार[८६] होतांच **जयाजी सिंदे** चौरंगावरून खाले जमिनीस[८७] आले. तेव्हां नजीक आबदागिऱ्या शरिरानें धष्ट-पुष्ट होता, त्याणें कब घालून एक धरिला. तो डेरियापुढें व पागेंत गलबल[८८]

---

७२. या गोष्टीस ऐतिहासिक पुरावा नाहीं.

७३. मागील टीप नंबर ५१ पहा.

७४. 'कळोन आला' **साने** प्रत.

७५. 'मोंगलाई मसलत होईल' **भाइसं** प्रत.

७६. 'मारवाडी' **भाइसं** प्रत.

७७. हें वाक्य **भाइसं** मंडळ प्रतींत नाहीं.

७८. 'घेऊन जावयास' **भाइसं** प्रत.

७९. "तिघे मारवाडी यांस बक्षिसें वगैरे देऊन, सिद्ध केलें. त्यांनीं लोभावर नजर देऊन, जिवाची आशा सोडून, सतीचें वाण घेऊन, सिद्ध होऊन बाहेर पडले." **कल्याण** प्रत.

८०. 'काढून' **शेंबवणें** प्रत.

८१. 'देवाचे' **साने** प्रत.

८२. 'हांडा बासन घेऊन कोठीकडे ठेवावयास गेला' **कल्याण** प्रत. खिसमतगार घोडा घेऊन कोठीकडे गेला'. **सांगली** प्रत.

८३. 'आदत' भाइसं प्रत व १८७९, १८८६ प्रत.

८४, 'वृषभाचें रूप' **साने** प्रत. 'तों जसा राज्यानें लाचेर करून बलीचें रूप धरून' **मंडळ** प्रत, **भाइसं** प्रत.

८५. 'चोंहोंकडून' **भाइसं** प्रत.

८६. 'कारगर' **साने** प्रत.

८७. 'जमिनीवर' **साने** प्रत.

८८. 'गडबड' **साने** प्रत.

जाहाली. जिकडे तिकडे 'मारा ! मारा !' आसे होऊन जसी ससे-होलपट होती[८९] तसे होऊं लागले. येक[९०] ठार जाहाला. येक आशा आरिष्टांतून प्राण घेऊन नागुरांत पोचला. मागें **दत्ताजी सिंदे** यांणीं वर्तमान ऐकोन बंधूजवळ धांवत आले. त्यांची आवस्था आशी पाहून त्यांणीं केवल धाय मोकलून घायाल उचलून डेरियापुढें आणिलें. तों तिकडे मारेकरी गांवांत[९१] पोहोंचतांच **बिजेसिंग** सिधच होता. त्याणें तमाम सरदार यांस बोलाऊन सांगितलें कीं, "यार हो ! आतां गलीम आहेत ते काय ? 'मुरगी मारी बचे दानादान'[९२] तैशी गत होईल." म्हणोन बहुत संतोष मानून फौजेनिसीं[९३] सिध होऊन युधास निघाला. तों आधींच हे गडबडोन तमाम मोर्चे उठऊन गोटांत आणिलेच[९४] होते. फौज बाहेर आलियावर लस्करांत आसी गडबड जाहाली कीं पृथ्वीप्रलय होतो तैसा विच्यार[९५] जाहला. तों **जयाजी सिंदे** मोठे हिंमतीचे सरदार डोले उघडोन पाहिलें तों जवल[९६] बंधू **दत्ताजी सिंदे**[९७] केवल धाय मोकलून शोक करितां देखिला. गडबड एकोन हस्त-संकेत भावास [हिंमत देऊन] बोलतां जाहाला कीं, "वैरी युध्यास आला आणि तूं रांडेसारिखा रडतोस ? हे क्षेत्रीय धर्मास उचित कीं काय ? आतां मजला कांहीं होत नाहीं. तुम्हीं शत्रुपराभव करावा."

१९. आसें ऐकतांच **दत्ताजी सिंदे** यांणीं नगारा करून फौज घेऊन युधास गेले. दोन्ही सैन्याच्या गांठी पडल्या. मोठें तुंबल युध पूर्ववतप्रमाणें जाहालें. मागें **दत्ताजी सिंदे** यांणीं सिरजोरा[९८] करून **मारवाडी** मागें सारून गांवांत घातले. दोन तीनशें मनुष्यें ठार जाहालीं. मोर्च्यापासी येऊन मागती जेथील तेथें मोर्चे कायम करून शाहादानें वाजवीत ढालेपासी आले. तों मागें **जयाजी सिंदे** यांचा प्राण गेला. **दत्ताजी सिंदे** यांणीं हें वर्तमान ऐकोन घोडियावरोन* खालीं घालून घेतलें. अतिशय शोक करितां जाहाला. "**आपासाहेब** ! आम्हांस आतां कोणाचे हातीं निरऊन जातां ? आतां **अप्पासाहेबांसारिखा** भाऊ कोठें द्रिष्टीस पडेल ?

---

८९. 'ससेहोलपट होऊन' **साने** प्रत.

९०. या वाक्याऐवजीं 'एक धरला तो मारला' असा पाठ **साने** प्रतींत आहे.

९१. 'धावत' **भाइसं** प्रत.

९२. 'मुरगी मरे बचडे दानादान' **सगजो** प्रत–'मुरगी मारे बचे दानादान' **शेंबवणें** प्रत.

९३. या शब्दापुढें 'सिध होऊन' असा **सगजो** व मंडळ प्रतींचा पाठ आहे, तो **साने** प्रतींत नाहीं.

९४. 'उधळोन गांवांत आलेच होते' असा '**सगजो**' चा पाठ आहे.

९५. 'प्रकार' **शेंबवणें** प्रत.

९६. जयाप्पाच्या निधनाच्या वेळीं दत्ताजी त्याच्याजवळ होता कीं नाहीं याबद्दल शंका आहे. मागाहून लौकरच तो आला असावा.

९७. या शब्दापुढें 'मोठे हिंमतीचे' असा 'मंडळ' प्रतीचा पाठ आहे.

९८. 'शिलेजोरानिशीं' **साने** प्रत. 'शरजोरा' असा कल्याण, **भाइसं** वगैरे प्रतींचा पाठ आहे.

*. 'घोड्याखाली' **भाइसं** प्रत.

घातलें,[७२] परंतु त्यांच्यानें उघड साहित्य होत नाहीं. समग्र सवा वर्ष जाहालें.[७३] आम्हीं आतां कोंडून कोठवर राहावें? महागाई बहुत आणि गलीमहि शह सोडून जात नाहीं हा पूर्ण भरंवसा कलला.[७४] आतां मोंगलाई मसलतीनें[७५] होईल तें करावें." म्हणोन तिघे मारेकरी[७६] सिध केले. धन्य[७७] ते रजपूत[७७]! सतीचें वाण घ्यावें[७८] तसे तयार जाहाले. त्यांणीं आपला जीव मुठींत धरिला. मग त्याणें त्यांस कांहीं देऊं केलें असेल तें न कले.[७९] अस्तु. मारेकरी[७६] च्यार घटका रात्रीस बाहेर लावून[८०] दिल्हे आणि आंत आपले फौजेंत ताकीद करून सिध्ध होऊन उभे राहिले.

१८. तों मारेकरी लस्करांत पोहचले. तों च्यार घटका दिवस आला. पागेचे[८१] डेरियापुढें स्नानास **जयाजी सिंदे** गेले. तों नजीक घोडचाची पागा होती. मारेकरी केवल कंगाल, भिकारियाचा वेष घेऊन, आंगावर जीर्ण वस्त्रें व गुप्त सुऱ्या, आसे घोडियापुढें दाणे वेंचीत होते. तो **जयाजी सिंदे** यांणीं स्नान करून चौरंगावर उभे राहिले. खिसमतगार हांडाबासन[८२] सांभालावयास गुंतले. अबदागिऱ्या मात्र डोईवर छाव धरून उभा होता. **जयाजी सिंदे** यांस संवय[८३] आसी होती कीं स्नानानंतर मुखावर धोतर घेऊन क्षणभर डोळे चोळीत राहावें. तों जसा राजा नलाचे द्वारीं कली वृषभरूप[८४] धरून तिष्ठत होता. तैसेच मारेकरी जपून होते. इतक्यांत संधि सांपडतांच मारेकरी यांणीं उठोन येकायेकींच दोन्हीकडून[८५] कुशीस सुऱ्यांचा मार केला. काम कारेगार[८६] होतांच **जयाजी सिंदे** चौरंगावरून खाले जमिनीस[८७] आले. तेव्हां नजीक आबदागिऱ्या शरिरानें धष्ट-पुष्ट होता, त्याणें कव घालून एक धरिला. तो डेरियापुढें व पागेंत गलबल[८८]

---

७२. या गोष्टीस ऐतिहासिक पुरावा नाहीं.

७३. मागील टीप नंबर ५१ पहा.

७४. 'कळोन आला' **साने** प्रत.

७५. 'मोंगलाई मसलत होईल' **भाइसं** प्रत.

७६. 'मारवाडी' **भाइसं** प्रत.

७७. हें वाक्य **भाइसं** मंडळ प्रतींत नाहीं.

७८. 'घेऊन जावयास' **भाइसं** प्रत.

७९. "तिघे मारवाडी यांस बक्षिसें वगैरे देऊन, सिद्ध केलें. त्यांनीं लोभावर नजर देऊन, जिवाची आशा सोडून, सतीचें वाण घेऊन, सिद्ध होऊन बाहेर पडले." **कल्याण** प्रत.

८०. 'काढून' **शेंबवणें** प्रत.

८१. 'देवाचे' **साने** प्रत.

८२. 'हांडा बासन घेऊन कोठीकडे ठेवावयास गेला' **कल्याण** प्रत. खिसमतगार घोडा घेऊन कोठीकडे गेला'. **सांगली** प्रत.

८३. 'आदत' भाइसं प्रत व १८७९, १८८६ प्रत.

८४, 'वृषभाचें रूप' **साने** प्रत. 'तों जसा राज्यानें लाचेर करून बलीचें रूप धरून' **मंडळ** प्रत, **भाइसं** प्रत.

८५. 'चोंहोंकडून' **भाइसं** प्रत.

८६. 'कारगर' **साने** प्रत.

८७. 'जमिनीवर' **साने** प्रत.

८८. 'गडबड' **साने** प्रत.

जाहाली. जिकडे तिकडे 'मारा ! मारा !' आसे होऊन जसी ससे-होलपट होती[८९] तसे होऊं लागले. येक[९०] ठार जाहाला. येक आशा आरिष्टांतून प्राण घेऊन **नागुरांत** पोचला. मागें **दत्ताजी सिंदे** यांणीं वर्तमान ऐकोन बंधूजवळ धांवत आले. त्यांची आवस्था आशी पाहून त्यांणीं केवल धाय मोकलून घायाल उचलून डेरियापुढें आणिलें. तों तिकडे मारेकरी गांवांत[९१] पोहोंचतांच **बिजेसिंग** सिधच होता. त्याणें तमाम सरदार यांस बोलाऊन सांगितलें कीं, "यार हो ! आतां गलीम आहेत ते काय ? 'मुरगी मारी बचे दानादान'[९२] तैशी गत होईल." म्हणोन बहुत संतोष मानून फौजेनिसीं[९३] सिध होऊन युधास निघाला. तों आधींच हे गडबडोन तमाम मोर्चे उठऊन गोटांत आणिलेच[९४] होते. फौज बाहेर आलियावर लस्करांत आसी गडबड जाहाली कीं पृथ्वीप्रलय होतो तैसा विच्यार[९५] जाहला. तों **जयाजी सिंदे** मोठे हिंमतीचे सरदार डोले उघडोन पाहिलें तों जवल[९६] बंधू **दत्ताजी सिंदे**[९७] केवल धाय मोकलून शोक करितां देखिला. गडबड एकोन हस्त-संकेत भावास [हिंमत देऊन] बोलतां जाहाला कीं, "वैरी युध्यास आला आणि तूं रांडेसारिखा रडतोस ? हे क्षेत्रीय धर्मास उचित कीं काय ? आतां मजला कांहीं होत नाहीं. तुम्हीं शत्रुपराभव करावा."

१९. आसें ऐकतांच **दत्ताजी सिंदे** यांणीं नगारा करून फौज घेऊन युधास गेले. दोन्ही सैन्याच्या गांठी पडल्या. मोठें तुंबल युध पूर्ववतप्रमाणें जाहालें. मागें **दत्ताजी सिंदे** यांणीं सिरजोरा[९८] करून **मारवाडी** मागें सारून गांवांत घातले. दोन तीनशें मनुष्यें ठार जाहालीं. मोर्च्यापासी येऊन मागती जेथील तेथें मोर्चे कायम करून शाहादानें वाजवीत ढालेपासी आले. तों मागें **जयाजी सिंदे** यांचा प्राण गेला. **दत्ताजी सिंदे** यांणीं हें वर्तमान ऐकोन घोडियावरोन* खालीं घालून घेतलें. अतिशय शोक करितां जाहाला. "**आपासाहेब** ! आम्हांस आतां कोणाचे हातीं निरऊन जातां ? आतां **अप्पासाहेबांसारिखा** भाऊ कोठें द्रिष्टीस पडेल ?

---

८९. 'ससेहोलपट होऊन' **साने** प्रत.

९०. या वाक्याऐवजीं 'एक धरला तो मारला' असा पाठ **साने** प्रतींत आहे.

९१. 'धावत' **भाइसं** प्रत.

९२. 'मुरगी मरे बचडे दानादान' **सगजो** प्रत–'मुरगी मारे बचे दानादान' **शेंबवणें** प्रत.

९३. या शब्दापुढें 'सिध होऊन' असा **सगजो** व मंडळ प्रतींचा पाठ आहे, तो **साने** प्रतींत नाहीं.

९४. 'उघळोन गांवांत आलेच होते' असा **'सगजो'** चा पाठ आहे.

९५. 'प्रकार' **शेंबवणें** प्रत.

९६. जयाप्पाच्या निधनाच्या वेळीं दत्ताजी त्याच्याजवळ होता कीं नाहीं याबद्दल शंका आहे. मागाहून लौकरच तो आला असावा.

९७. या शब्दापुढें 'मोठे हिंमतीचे' असा 'मंडळ' प्रतीचा पाठ आहे.

९८. 'शिलेजोरानिशीं' **साने** प्रत. 'शरजोरा' असा कल्याण, **भाइसं** वगैरे प्रतींचा पाठ आहे.

*. 'घोड्याखाली' **भाइसं** प्रत.

'सभाग्य साधून जाय निधी आणि अभाग्य मागें मृत्तिका[९९] शोधी' तैसी आमची गत जाहाली. आमचें छत्र, केवल मायबाप !"[१००] असा बहुत प्रकारें शोक केला तो पत्रीं काय[१०१] ल्याहावा? ज्याचें आंतडें त्यास साक्ष देत आसेल.[१०२] तेव्हां राजश्री **रामाजीपंत भाऊ** दिवाण व आणखी लाहान थोर सरदार मिलोन बहुत प्रकारें शांतवन केलें कीं, "हा[१०३] मृत्युलोक आहे. आला प्राणी राहात नाहीं. परंतु इहलोकीं कीर्त करून परलोक-साधन करावयाचें हेंच दुरलभ वस्तु.[१०४] **जयाजी बाबा** काय घेऊन गेलें? दुनिया,[१०५] दौलत, खजिना, मुलेंबालें,[१०६] हती, घोडे, पाहिजे तितकी संपदा, ठेऊन गेले. आतां त्यांचे पुत्र **जनकोजी बाबा** आहेत. त्यांस वडीलपणें[१०७] महत्त्व देऊन आपण हें राज्य[१०८] चालवावें आणि पहिलेपेक्षां आधिकोतर करून दाखवावें. आतां शोक करणें उचित[१०९] नाहीं. शत्रू जवळ. हिंमत सोडली[११०] म्हणतील." आसें शांतवन करून **जयाजी सिंदे** चंदनकाष्ट व बेलकाष्ट व तुलसीकाष्ट आणोन[१११] आग्नप्रसाद दिल्हा. नंतर[११२] **जनकोजी सिंदे** यांसी पत्रें पाठविलीं.[११२] त्यांणीं तेच दिवसीं **मेडतें**[११३] सर केलें होतें. त्यांस पत्रें पावतांच तेही त्वरेनें येऊन पोहोचलें. उभयतां चुलते-पुतणे एकत्र जाहलियावर तो शोक 'न भूतो न भविष्यति' या प्रकारचा जाहला. असो. गत गोष्टीस यत्न[११४] नाहीं. असा सारासार[११५] विचार करून विवेक[११६] केला. यथाविधि उत्तरक्रिया तेरा दिवस संपूर्ण जाहाली.[११७] आधींच **सिंदे** केवळ रणशूर, दानशूर, [त्यानीं] दान-धर्मही बहुत प्रकारें केला.

---

९९. 'अभाग्य मागें भ्रांतिक' असा **भाइसं** व **मंडल** प्रतींचा पाठ आहे.

१००. 'आमचें छत्र केवळ मायबाप' हें वाक्य **शेंबवणें** प्रतींत नाहीं. 'केवल मायबाप गेला' **भाइसं** प्रत.

१०१. 'कोठवर' **साने** प्रत.

१०२. 'देतें' **साने** प्रत.

१०३. 'ईश्वरें हा' असा पाठ **भाइसं** व **मंडळ** प्रतींत आहे.

१०४. 'अस्तु' **साने** प्रत.

१०५. 'देश दुर्ग' **भाइसं** प्रत.

१०६. 'मुलुख' **साने** प्रत.

१०७. 'वडीलपणचें' **साने** प्रत.

१०८. युवराज्य' **साने** प्रत.

१०९. 'उतम' **भाइसं** प्रत.

११०. 'सांपडली' **भाइसं** प्रत.

१११. या शब्दापुढें 'अष्ट सुगंधें करून देहसार्थक केलें' असा **सगजो** चा पाठ आहे. 'देहसार्थक केलें असा **साने** प्रतीचा पाठ आहे.

११२. 'ते वेळेस जनकोजी सिंदे जवळ नव्हते' असें **साने** प्रतींत या वाक्याबद्दल वाक्य आहे.

११३. मेडतें नव्हे, तें आधींच सर झालें होतें. जनकोजीनें हें कोणतें गांव घेतलें तें नीट समजत नाहीं.

११४. 'विच्यार' **भाइसं** व **मंडळ** प्रत.

११५. 'सावरा सावर' **भाइसं** प्रत.

११६. **विवेकें** उत्तरक्रिया यथाविधि' असा **शेंबवणें** प्रतीचा पाठ आहे.

११७. 'लाखांचा पालनेवाला' पेश-व्यांचा 'अर्जुन', 'उमदा सरदार' वगैरे विशेषणांनीं ज्याचा कागदोपत्रीं उल्लेख केलेला आढळतो व ज्यानें सरदारीपेक्षां शिपाईगिरीवरच आपलें लक्ष जास्त स्थिर केलें असें खुद्द नानासाहेब पेशव

२०. हें वर्तमान तमाम भुमे राजवाडे यांस कळलें. **इंदुरास मल्हारराव** यांणीं ऐकोन बाहचार्थ श्रमी जाहाले कीं, "आमचें जूग विसकटतांच नरद ठार

म्हणतो (काव्ये० १४१) त्या जयाजी शिंद्यास बिजेसिंगानें दगा करून ठार मारलें हें बखरकारांचें म्हणणें बरोबर आहे. हा खून ता० २५ जुलै १७५५ रोजीं झाला. मारवाडी दगेबाज आहेत त्यांचा विश्वास धरूं नये (पेद २७। ११६) अशी पूर्वसूचना जयाजीस होती. जयापा आपल्याला आवरत नाहीं असें पाहून बिजेसिंगानें सन १७५५ च्या जुलैत त्याच्याशीं तहाची वाटाघाट करण्यास सुरुवात केली (फा० ३।२१४) व बिजेभारती गोसावी, जगनेश्वर राणावत व राजसिंग चव्हाण यांस त्याकरितां पाठविलें. या सर्व गोष्टींत बखरकार म्हणतो त्याप्रमाणें मल्हारावाचा हात नसावा. उपरोक्त मंडळीस बिजेसिंगानेंच 'मोगलाई मसलतीचा' उपदेश केला असावा; कारण त्याचे वकील बिजेभारती गोसावी, जगनेश्वर व चव्हाण 'यांच्या अंगभूतें मारेकरी माणसें होतीं (पेद २७।११६) जयापा मृत्यु पावलियावर लक्षाचा पटा कुटुंबास चालवावा असाहि करार झाला. (पेद २।४८). ता० २५ जुलैला वरील वकील आपल्या मारेकऱ्यांसह अत्यंत सावधपणें जयापाच्या गोटांत शिरले. मारेकऱ्यांस दक्षिणी थाटाचा वेश दिला होता (फा १।१४०), त्यामुळें त्यांचें कापट्य कोणाच्याहि लक्षांत आलें नाहीं. प्रातःकाळची वेळ, आपल्या डेऱ्यापुढें जयापा चौकीवर बसून स्नान करीत होता. त्याचवेळीं संधी साधून [कांहीं संशोधक प्रार्थना करीत असतां असें म्हणतात तें चूक आहे] मारेकऱ्यांनीं जयापाच्या उघड्या शरिरावर सुऱ्या चालवून प्राणघातक हल्ले केले [फा. ३।३२० पेद २७।११६; पेद २। ४८; फा. १।१४०–४१; फा. ३।६८ काव्ये० १४३] व त्यामुळें तो अखेर मृत्युवश झाला. मराठी कागदांच्या आधारें ही हकीकत सत्य ठरते.

पंडित रेऊकृत मारवाडका इतिहास भाग १ पृ० ३७४ वर "उन्होने खोखर केसरखां को और एक गहलोत वीर को जयापा को छलसे मार डालने के लिये नियत किया। इस पर वे दोनो बनियों का सा वेश बना कर आपसमें लड़ते झगड़ते जयापा के शिबिरमे जा पहुँचे। उस समय वह स्नान कर रहा था। परंतु उनको लड़ता हुआ देख जिस समय उसने कारण जानने के लिये उन्हे अपने पास बुलाया, उस समय मौका पाकर उन्होंने उसे मार डाला।" असा मजकूर आहे. तो किंवा खालील मजकूरहि दंतकथेसारखा भासतो. 'चौहाण सांईदास कीं जमइयत के खोकर केसरखां और एक गहलोत सर्दारने महाराजा बिजयसिंह के निर्मित कूट प्रबंधानुसार मरहटी फौजमें जाकर बनियेकी दुकान की। उन्होंने एक दिन परस्पर कृत्रिम कलह की जिसे देख कर सब कोइ हँसते थे। ये न्याय कराने को लड़ते लड़ते आप्पाजी की ड्योढी पर पहुँचे और जब अन्दर बुलाए गए तो इन्होंने बहियाँ फेक पेशकब्जो से आप्पाजी को मार डाला और आप भी वही मारे गये। (नागरी प्र० पत्रिका संवत् १९८४, भाग ८ वा. पृ० २४१ वरील टीप) जगदीशसिंह गेहलोतकृत मारवाडचा इतिहास पृष्ठ १७४ वर 'खोखर बडो खुराकी, खादी आपा सारिखो डाकीं' अशी उक्ति असल्याचें श्री. फाळके भाग १ पृ. १२६ च्या टीपेंत लिहितात. सर जदुनाथ आपल्या

मेली." बाहेर लौकिकीं[११८] या प्रकारें बोलून श्रमी जाहाले. आंतरयामी ज्याचें तें जाणत असतील.[११८] हें वर्तमान **पुण्यास नानासाहेब व भाऊसाहेब** यांस कळतांच बहूत श्रमी जाहाले. "आमचा आर्जुन आज गेला. येक बाजू खचली," म्हणोन बहुत कष्टी जाहाले. "आसो. **जनकोजी सिंदे** याचे पुत्र आहेत त्यास सवाई जयाजी करून दाखऊं, चिंता काय आहे?" म्हणोन समाधानाचीं पत्रें **दताजी सिंदे** यांस पाठविलीं. **मल्हारराव** आपल्या **वांफगांवास**[११९] निघोन गेले.

२१. इकडे **नागुरावर** पूर्ववत् प्रमाणें गोलागोली होतच होती. आसें पूर्ण आठरा[१२०] महिने येक जागा मेख गाडली होती. **बिजेसिंग** यांसी पुर्तें समजलें कीं, "**जयाजी सिंदे** गेले, तरी उर्णे पडलें नाहीं. आणि आमची कोणी कुमक कांहीं करीत नाहीं[१२१] **सिंदे** पुर्ते इरेस पडले. पारपत्य आमचें करतील." आसी खातरजमा राखून वकील सल्याचें बोलण्यास पाठविले. यांसीहि आसें जाहालें कीं कोणते तरी रीतीनें यश संपादावें आणि निघोन[१२२] जावें. बाहचार्थ कारण

'फॉलमध्यें' पृ. १८१ वर, फारशी साधनांचा आधार घेऊन लिहितात कीं "ब्राह्मणाचे जोडे उचलणाऱ्याच्या वंशांत जन्मणाऱ्या जयाप्पानें चंद्र-सूर्याच्या कुळांत जन्मास आलेल्या राजपूत सरदारांचा मोठ्या बेमुर्वत-खोरपणें व उद्दामपणें, सल्ल्यासंबंधीं ते बोलण्यास आले असतां, शिव्या देऊन अपमान केला व म्हणून रागास येऊन संतापाच्या भरांत त्यांनीं जयाप्पाचा खून केला!" हें मराठी कागद-पत्रा-वरून खरें वाटत नाहीं. तावसर, समीप नागोर, येथें जयापाचा खून झाला, त्या जागेवर एक छत्री बांधली होती. तिचा जीर्णोद्धार एका मारवाडी जोधपूरच्या राजवंशांतील गृहस्थानें केला. दुसरी एक छत्री पुष्कर येथेंहि आहे.

जयाप्पा-खुनानंतर सांत्वनपर पत्रें आलीं तीं पहा (फा.३।३२४,३२५,३२०; हिंगणे १।१६३, १६९; काव्ये. १३९, १४१; पेद २।५२; पेद. २१।६९; पेद २१।७०; फा ३।६८.

११८. 'बाहेरलापिका या प्रकारें बोलून श्रमी जाहाले, अंतरलापिका ज्याची ते जाणत असतील.' असा साने प्रतीचा पाठ आहे. सगजो पाठही तसाच आहे. मल्हाररावासंबंधानें बखरकारानें काढलेल्या या उद्गारास कागदोपत्रीं आधार सांपडत नाहीं. बखरीच्या सुरवातीपासून लेखकाचें मत मल्हाररावा-संबंधीं कलुषित दिसतें. मात्र पुढें पुढें तो त्याचे गुण गाऊं लागला.

११९. 'वाणगावास' शेंबवणें प्रत. मल्हारराव दादाबरोबर दक्षिणेंत आला होता. (फा.३।३२६).

१२०. मागीलप्रमाणेंच (५१) ही कालगणना चूक आहे.

१२१. जयापाच्या वधानंतर जय-पूरकर माधोसिंग यानें बिजेसिंगास लष्करी मदत केली होती. (फा.१।१४३; पेद २१।७४,७७) फा. ३।१७२, १७५. तेव्हां पेशव्यानेंहि अंताजी माणके-श्वरास शिंद्याच्या मदतीस नागोरला पाठविलें. (फा. ३।७१; काव्ये. १४३; हिंगणे १।१६३ पेद २१।७०; पेद २।५२, ५४) गोविंदपंत बुंदेलेहि गेला पेद २।५६.

१२२. हें खरें नाहीं. उलट दत्ताजीस जोर चढत चालला होता. कारण पेशव्यांकडील मदत येत होती. (फा० ३।२१६, हिंगणें १।१७२.)

मात्र बोलत होते[१२३] कीं, "बारा वर्षें लागलीं तरी शह सोडणार नाहीं."[१२४] मग उभयपक्षीं सला[१२५] केला. येक क्रोड रुपये खंडणी घेऊन **नागुरापासून** अलीकडे मुलूख **आजमेर**, व **मेडतें** व **भिकानेर** अैसीं ठाणीं **रामसिंग** यास देवविलीं. याप्रमाणें खंडणी व मुलूख घेतला. त्यांत अर्ध मुलूख **रामसिंग** यास दिला, अर्धा मुलूख आपणाकडे करून ठाणे याची बंदोबस्ती करून, तेथून कच करून, मजल दर मजल **उज्यनीस** आले.

२२. उज्यनीस आलियावर तमाम सिबंदीचा हिसेब केला. तीन क्रोड रुपयांचा मोहिमेचा जमाखर्च जाहाला. झाडन ऐवज मालवे वगैरे प्रांतांतील नेऊन खर्च केला. दाहा पांच लक्ष रुपये कर्जवाम जाहालें. तों **तिलक** खजिन्यांत पैसा राहिला नाहीं जामदारखान्यांतही कांहीं शिल्लक नाहीं[१२६] आणि सिलेदार लोकांचा हिसेब केला तो तीन सालां हिसेब लोकांस महागाईमुलें झाडून पावला. शेवट कोणाकडे फाजीलही निघालें. आसें जाहलेयावर सिंदे केवल सालस,[१२७] मोमदिल, च्यार मनुष्यें एक विच्यारे, त्यांणीं चितांत विचारणा केली कीं, माहागाईमुळें लोकांनीं झाडून रुपये खर्च[१२८] केले, आम्हांकरितां लोक खराब जाहाले. तीन वर्षें राहून रिक्तहस्तें लोक घरास गेलिया त्यांचीं मुलेंमाणसें दुवे देणार नाहींत.[१२९] त्यांचे तलतलाट घेऊं नयेत. आतां सरासरी लोकांस झाडून येक सालां रुपये द्यावे." आसें निच्ययांत आणिलें, तों पदरीं पैसा नाहीं.[१३०] मोठें संकट पडलें. दिवसां आन गोड लागेना, रात्रौ निद्रा येईना. केवल ईश्वरावरच[१३१] तवकल करून होते. तों त्यांची क्रिया शाबूत. 'अजगरका दाता राम.' भाग्य अभाग्य कालपरत्वें येतें जातें. परंतु निश्चयांत मात्र अंतर करूं नये.[१३२] त्यांत ईश्वर

---

१२३. 'बाह्यार्थ मात्र युद्धाची उमेद ठेविली होती' **सांगली** प्रत.

१२४. हें वाक्य **साने** प्रतींत नाहीं. टीपेंत आहे.

१२५. मारवाडचा तह पेद २१।८२; पेद २७।१२८; पेद २१।८३. फा० ३।२१८–१९; काव्ये. १४३; इ. सं. ऐ. टि. २।४१). हा तह १७५६ च्या फेब्रुवारींत झाला. खंडणी ५० लक्ष (बखरीप्रमाणें कोट रुपये नव्हे) व अर्धा मुलूख घेतला हें बरोबर. रामसिंगानें अजमेर शिंद्यास दिलें. जयापाच्या मुंडकटाई दाखल शिंद्यांस १० लक्ष रुपये मिळाले (फॉल २ पृ. १८१).

१२६. 'जामदारखाना कुल खालीं जाहाला' **साने** व **शेंबवणें** प्रत.

१२७. 'सालसूद' **भाइसं** प्रत.

१२८. 'रुपये खादले' **साने** व **सगजो** प्रत.

१२९. 'गेले म्हणजे मुले माणसें बोल ठेवतील' **मंडळ** प्रत. 'देणार'बद्दल 'घेणार' असा पाठ.

१३०. या पुढें 'मनु तरि या रितीचा जाहाला' असें **कल्याण** प्रतींत वाक्य.

१३१. 'ईश्वरावरच बोल ठेवूं नये' **मंडळ** प्रत.

१३२. 'निश्चय मात्र चलूं नये' **मंडळ** प्रत.

साहय होतो. जैसी क्रिया धरावी तैसें फल पावावें.[१३३] प्रत्यक्षास प्रमाण पाहावें नलगे. **सिंदे** यांणीं शुध वासना धरिली यास्तव ईश्वरें तेथें कौतुक केलें कीं, येकाएकीं बुंधीचा[१३४] राजा होता तो मृत्य पावला. तेव्हां त्याचा दायाद चुलत[१३५] भावाचा पुत्र होता. तो राज्याभिलाष[१३६] करावयाचे विच्यारास आला. राज्याचें मूल नेणतें होतें. तेव्हां राजस्त्रीनें ताबडतोब वकील पाठविले, ते **उजनीस सिंदे** यांजकडे आले [व बोलले] कीं, "तुम्हीं तेथें येऊन, मुलास तख्तीं बसऊन टिळा लावावा. म्हणजे तुम्हांस पाऊण[१३६] क्रोड रुपये देतों" आसें ऐकतांच, हें आधींच[१३७] आतूर होते. त्यास आसे जाहाले कीं दुकालियास मिष्टान मिळतें तसें जाहालें. यांणीं ऐकतांच तेच क्षणीं नगारा करून कूच्य केलें. तेथें जाऊन जबरदस्तीनें त्याचा दायाद होता त्यास कैद करून मुलास तख्तीं बसविला.[१३८] राजस्त्रीनें बोलिल्याप्रमाणें पाऊण क्रोड रुपये देऊन बहुमान हती घोडे, अमोल्य रत्नें, सिरपेच, जवाहीर, मोत्याचे तुरे, पदकें व मोत्याच्या माला, कापड, वस्त्रें येणें-प्रमाणें दिल्हें. तीं घेऊन उज्जनीस येऊन पोहोचले. तमाम लोकांस हिसेब न[१३९] करितां झाडून येकसालां येवज पदरीं घालून निरोप दिल्हा. तमाम लोकहि खुशाल होऊन आसीरवाद देते जाहाले.

२३. याप्रमाणें वर्तणूक करून **दत्ताजी सिंदे**[१४०] व **जनकोजी सिंदे चांभार-गोंदियास**[१४१] आले. मुलें-माणसें यासी भेटते समई पुन्हां नवें दुःख जाहालें. आसो. सर्वज्ञांनीं विवेक करून, **जनकोजी सिंदे** याजवर नजर देऊन राहिले. हें वर्तमान **नानासाहेब** व **भाऊसाहेब** यांस **पुण्यांत** कळतांच **सिंदे** यांचे समाधानास **चांभार-**

---

१३३. 'पावावें' **साने** व **सगजो** प्रत.

१३४. 'बुंदीचा' ही बखरकाराची चूक असून त्याच्या ऐवजीं 'कोटचाचा' असें पाहिजे. हा कोटचाचा राजा महाराज दुर्जनसाल १७५६ मध्यें मरण पावला. त्याची राणी दुर्गावतजी, उदेपूरची राज-कन्या. निपुत्रिक वारल्यानें गादीबद्दल तंटे माजले. राणीनें आपल्या चुलत घराण्यांतील अजितसिंहास दत्तक घेतलें. त्याबाबत तिनें दत्ताजीची मदत घेऊन त्याला चाळीस लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें. (पेद २।६५,६६; फा० १।१७९, १८०; फा. ३।७४; काव्ये. १४४) बखरकाराचा खंडणीचा आंकडा चूक आहे. 'नेणतें' मूल नव्हतें, दत्तक पुत्र राणीपेक्षां वयानें मोठा होता.

१३५. 'दायाद पितृव्य पुत्र' **साने** व **सगजो** प्रत.

१३६. 'राज्यास अभिशेक करावा' **भाइसं** व **शेंबवणें** प्रत.

१३७. 'आधिकच' **भाइसं** प्रत.

१३८. 'तख्तीं बसवून कार्य करून दिल्हें' **शेंबवणें**.

१३९. 'हिशेबाशिवाय' **कल्याण** प्रत.

१४०. जनकोजी एकटाच चांभार-गोंद्यास गेला होता दत्ताजी मागाऊन आला.

१४१. 'उज्जनीस' हा शब्द 'चांभार-गोंदियास' या शब्दाच्या आधीं **साने** देतात. तो सन १८७९, १८८६ प्रतींत व **भाइसं** प्रतींत नाहीं.

गोंदियास[१४२] आले. भेटून बहुता प्रकारें पोटसी धरून सर्वत्र लहानथोरांचें समाधान केलें. सुभ्याचे [१४३] सिके **जनकोजी सिंदे** यांचे नांवें करून दिल्हे. समजाविसीस आधीं **मारवाड** काबीज केलें होतें तें दरोबस्त त्यांजकडेसच दिल्हें. त्यांत कोणाची वांटणी कर्पादिक[१४४] नाहीं.

२४. येणेंप्रमाणें समजाविसी[१४५] करून श्रीमंत **सावनूरचे**[१४६] मोहिमेस गेले. **मुरारराव घोरपडे** व **मुश्फरजंग** मिलोन **सावनूरचा** पठाण त्यासी तंबी पोहोचऊन, त्याजपासून खंडणी घेऊन, **बंकापूरचा** किला आपणाकडे करून घेतला आणि देशास आले. तों **सिंदे** [**चाभारगोंदियास**] घरींच[१४७] होते. **मल्हारराव** यांणीं घरास येऊन समाधान करावें अशा रदबदल्या घातल्या. परंतु सिंदे यांणीं मानिलें नाहीं. "आतां त्यांची भेट स्वर्गीं" म्हणौन निष्ठुर जाबसाल सांगितला. त्याजवरून **मल्हारराव** आपले जागा खजिल[१४८] होऊन राहिले. त्याजवर मागती **नानासाहेब** यांणीं **रघुनाथराव** दादा व **मल्हारराव** होलकर यांस साठ हजार फौजेनिसीं हिंदुस्थानचे मोहिमेस रवाना केलें.[१४९]

---

१४२. पहा फा. ३।२२०.

१४३. 'प्रांताचे व सरंजामाचे व सुभ्याचे' **कल्याण** प्रत.

१४४. 'त्यांत सरकारची वांटणी किंवा होळकर यांची किमपि कोणाची नाहीं' **कल्याण** प्रत.

१४५. 'समज' **भाइसं** प्रत. 'समजी' **शेबवणें** प्रत.

१४६. 'शाहापूरचे' **भाइसं** प्रत. सावनूरवरील मोहीम सन १७५६ च्या जानेवारींत सुरू झाली. खंड ३।४७६, ४७७, ४८१ (यांत तहाच्या अटी आहेत. त्यावरून बखरकारानें बंकापुरसंबंधीं केलेला उल्लेख बरोबर ठरतो. ता. १८ मे १७५६ ला तह होऊन नंतर पेशवा पुण्यास आला.)

१४७. या वेळीं जनकोजी एकटाच श्रीगोंद्यास होता. त्यावेळीं त्याचें लग्न माघ वा ८ स व्हावयाचें होतें (फा. ३।२२०). तें पुढें सप्तमीस झालें. (ता. ३ फेब्रु. १७५७) स्त्रीचें नांव कासीबाई. दत्ताजी लग्नास हजर नव्हता.

१४८. 'फिके' **साने** व **सगजो** प्रत.

१४९. रघुनाथरावाची ही दुसरी स्वारी ता. २९ नोव्हेंबर १७५६ पासून ता. १६ सप्टेंबर १७५८. अगदीं त्याच सुमारास अबदाली पंजाबवर चालून आला. योगायोग असा कीं, दादासाहेब उत्तर हिंदुस्थानांत पोचावयाच्या सुमारास अबदाली त्या प्रदेशाचा सर्व नाश करून व अगणित लूट घेऊन स्वदेशीं परत गेला. (ता. २४–३–१७५७).

प्रकरण तिसरें

प्याद्यानें बार भरला

२५. तों **हिंदुस्थानांत** आसें वर्तमान जालें[१] कीं, आलमशा[२] पादशाई करीत आसतां वजिरी धाकटा **गाजुदीखान** करीत होता. त्याजपासी **नजीबखान** रोहिला प्यादेपणाची जमादारी करीत होता[३]. तो दिवसेंदिवस भर घेऊन घोडे घेऊन सिलेदारी करूं लागला[४]. सिलेदारी करितां दैवयोगें करून हजार पांचसहे लोक बालगून **गाजुदेखान** याची कुल येख्तत्यारी करूं लागला. सावकारांतहि पत भारी जाली[५]. त्यायोगें **कुरुक्षेत्रापासून** आलीकडील परगणा व **आंतरवेद** प्रांत आगदीं इजारा करून च्यार पांच हजार फौज बालगून मातबरी चांगलीच करून होता. तों पुढें होणार भवितव्य [तें झालें]. **आमदशाहा**[६] **पातशाहाची** स्त्री **मलकाजमानी** तिची कन्या **चंदाजमानी** ऐसी **लालगडी**[७] नजीक लगत **यमुनेचे** बेटावर **सलीमगड** म्हणौन आहे. थोर किल्यांतून पाण्यास पूल बांधला आहे. त्या पुलावरून दोही किल्यास येण्याजाण्यास वाट आहे. त्या किल्यांत पादशाहाज्यादे व त्याच्या स्त्रिया जितक्या तितक्यांनीं तेथें राहावें, आणि आनआछादन देतील तितके घेऊन बंदीवानाप्रमाणें आसावें. त्यांत **मलकाजमानी** होती. तिच्या पोटा-पाण्याची बहुत तंगचाई[८] जाणून आपले जागीं विच्यार करिती जाहली की, " मी **अहमदशाहा**[६] याची पादशाहाज्यादी-आटके आलिकडील मुलूख देखील दक्षिण देशास समुद्रवलयांकित पृथ्वीचें स्वामित्व केलें. आसें आसतां मी आनआछादनास

---

१. 'असें वर्तमान ऐकलें कीं **शें.** प्रत.

२. दुसरा आलमगीर (३-६-१७५४. ते २९-११-१७५९).

३. 'करून होता.' **सगजो.**

४. 'तो' दिवसेंदिवस वजीर याची मर्जी संपादून प्यारींत येत चालला." **क. प्र.**

५. 'पडली' **सगजो.**

६. 'महंमदशहा' पाहिजे; बखर चूक. मलिका अज्जमानी ऊर्फ बादशहा बेगम ही फरुखसेयर बादशहाची मुलगी व तिचें लग्न महंमदशहाशीं झालें होतें. तिचा मृत्यु १७८८.

७. 'लालगडी' **शें. प्र.**

८. 'तसदी' **सगजो**; सा. प्र.

यजित आले ? हें दुःख कोणापासीं सांगावें ? **आलमशाहा**[7] पादशाई करितो[8] त्यास सांगावें तरी तो आम्हांहून बंदिवान. **गाजुद्दीखान** वजीर यास सांगावें तरी तो दिवाना आणि गलीमाचा पुत्र. वर्कड अष्टाधिकारी केवळ निर्मल्यवत्[10] आतां येक मात्र विच्यार आहे. एक काबिल मनुष्य[11] **नजिबखान** रोहिला आहे. तो **गाजुद्दीखान** याचा वाढविलेला[12]. परंतु त्यास तरी सांगोन पाहावें. " म्हणौन

---

२. पृ. २६ टीप २ पहा. ९. बखरकार बादशहांच्या नांवांचा चुकीचा उल्लेख वारंवार या प्रकरणांत करतो. ती वंशावळ अशी—



१०. ' निर्माल्य ' सगजो.

११. ' कांहीं मनुष्यानिसी ' शें. प्र.

१२. ' वळविला ' भाइसं. प्र.; ' वकील आहे ' मं. प्र. ' यानें वाढविला ' क. प्र.

विच्यार करून आधीं खोजे **गाजुदीखान** याजकडे पाठविले. त्याणीं संपूर्ण तात्पर्य[१३] विदित केलें. त्याणें उत्तर केलें कीं, " मजकडे कांहीं गुंता नाहीं, गिर्दनवाजी गलिमांकडील **अंताजी माणकेश्वर** आहे त्यास पुसावें". म्हणौन टाळा[१४] दिल्हा. तेथून खोजे **अंताजी माणकेश्वर** याजकडे गेले. त्यासहि तसेंच निवेदन केलें. त्याणें उत्तर केलें कीं, " **गाजुदीखान** याजकडे जाऊन सांगावें". तसें खोजे माघारे येऊन [त्यांणीं] **मलकाजमानीस** [सर्व वृत्त] निवेदन केलें. तिणें आपल्या नेत्रांस पाणी आणून परम खेद करिती जाहाली. तदोत्तर खोजे गुप्तरूपें **नजीबखान** रोहिल्याकडे पाठवून त्यास आपणांकडे बोलाऊन नेला. तो **गाजुदेखान** याचे जिवाल्याचा[१५] होता. त्यास किल्यांत जाण्यायेण्यास कांहीं आटक[१६] नवती. तो **मलकाजमानीकडे** जाऊन खुर्निसात[१७] करून आदपसीर उभा राहून आधोमुखें उत्तर केलें कीं, "मा साहेब ! मे तेरा खानाजाद, गुलामकी क्या तक्षीर? क्या हुकूम ?" म्हणौन बोलतांच **मलकाजमानी** इजला दुःखाचा उमाळा[१८] येऊन आति आक्रोशें हांवरडा फोडून[१९] रुदन करूं लागली आणि **नजीबखान** यास सांगितलें कीं, " कुळ पातशाई बुडाली. त्यामुळें पातशाई उमराव जिकडील तिकडे आपले जागा गलिमास मिळोन आपली आबरू रक्षून आहेत. आतां रोहिले याचे वीर्याचा[२०] असलास तरी पातशाईस फिरोन आवसान घालसील. केवल मुसलमानीस तांबेरा[२१] आला आणि बेमानी[२२] पातशाई जाहाली तूं येक आतां आबरू राखिलीस तरी राखसील ही खातरजमा राखोन तुला मात्र दुःख सांगितलें. हे पातशाई दुसऱ्यास आपले हातून द्यावी, परंतु आसे निर्माल्यवत् राहावें[२३] हे उचित नव्हे." आसें **नजीबखान** याणें वर्तमान ऐकोन मागती खुर्निशी[२४] करून आर्ज केला कीं, " तकसीर माफ. मी येक आर्ज करितो. तमाम पातशाई उमराव व राजे रजवाडे आगदीं गलिमाचे[२५] आज्ञेंत. बल कोणाचे भिस्तीवर बांधावें? आम्ही ज्याचे पदरीं, तो केवळ गलिमाचा ठेवणाईत. बादशाहा तो दिवाणा[२६]. आतां तुम्हीं मजला आज्ञा केली तरी

---

१३. ' तापत्रय ' **सा. सगजो.** प्र. ; ' मजकूर ' **मं.** प्र.

१४. ' जाब ' **सा.** प्र.

१५. ' जिव्हाळियाचा ' **सा.** प्र.

१६. ' अटकाव ' **शें.** प्र.

१७. ' खुरनिशा ' **भाइसं.** प्र.

१८. ' उभाडा ' **सा.** प्र., **सगजो** ' उबळा ' **भाइसं.** प्र.

१९. ' हांबरडा फोडूं लागली आणि' **भाइसं.** प्र.

२०. ' कुळाचा ' **सगजो** ' तुखमाचा' **सा.** प्र.

२१. ' तोबरा ' **भाइसं**; ' तांब्रा '. १८७९, १८८६ **सा.** प्र.

२२. ' बामणी ' **सा.** प्र., **शें.** प्र.

२३. ' राहाणें ' **सा.** प्र.

२४. ' खुर्निसात ' **सा.** प्र.; ' कुरनिशा ' **शें.** प्र.

२५. ' स्वाधीन आहेत ' **शें.** प्र.

२६. बंदिवानाप्रमाणें आहे ' **सा.** प्र.

मजला साहेबीं सानकरोटी द्यावी कीं मी जें करीन[२७] त्याप्रमाणें वर्तावें." तेव्हां तिणें ते समई सानकरोटी दिल्ही, आणि विच्यारती जाहाली कीं, "कामाची सुरत मजला सांगावी[२८]."

२६. [असें] म्हणतांच **नजीबखान** रोहिला बोलतां जाहाला कीं, "पूर्वी **महंमदशाहा**[२९] पादशाहाचे समई वजिरी **सुज्यायतदौला** याचा बाप **मनसूर**[२९] अली याजकडे होती. तो **महंमदशाहा** हक्क जाहालियावर तुमचा भ्रतार **अहमदशाहा**[२९] यास पातशाई जाहाली. तो केवल नाकाबिल. त्याणीं दक्षिणचा सुभा मुंढा[३०] पातशाहा साडे साहा सुभे दक्षण खाऊन होता. तो साठ हजार फौजेनिसी दिलीस चाकरीस आला होता. आसे आणखी दहा पांच उमराव दोन लक्ष घोडेनसी **दिलींत** होते. तों पूर्व[३१] परंपरागत तमाम उमराव याणीं जर्से खिजमतगार आदपसीर उभे राहातात, तसें त्याणीं उभें राहावें. त्यांत **किलीजखान** नबाब **निज्यामलुख** होता. तों पातशाहास तख्ती बसोन[३२] फळफळावळ हर जिन्नस पुढें असल्यास[३३] त्याजकडे पाहावें. त्याजपुढें असेल[३३] त्याणीं खुरनिशा करीत पुढें येऊन हात पसरावे. त्यास काय जिनस आसेल तो कृपा करून द्यावा[३४]. तसेंच **किलीजखान** याचे तोंडाकडे पाहिलें. तो खुरनिशा करीत पुढें आला. तों पादशाहानीं हात आंखडून विनोद केला कीं, "यार हो! दक्षणी बंदर या नाचता है क्या [हें] देखो." आसें पांच सात वेल केलें. तेव्हां **किलीजखान** यास विषाद आला. तलव्याची आग्न मस्तकास जाऊन बोलला कीं, "निशा आकताला हुकमत परवरदिगर! आजपासून सहा महिन्यांत पातशाहा[३५] आदि करून कुल दिलीस बाबका[३६] बीजका हो तर कर दिखलाऊ, तरीच हुशामरे बेग; नही तो ज्यारोका[३७] बेटा मुछा उखाडणा.[३८]" म्हणौन प्रतिज्ञा केली. पातशाहा बेहोष. त्याणें सारासार विच्यार ध्यानांत राखावा[३९]

---

२७. 'मी जो अर्ज करीन' **सा.** प्र.

२८. 'सांगणें' **शें.** प्र.

२९. 'महंमदशाह' हेच बरोबर. त्याचीच बायको मलिकाजमानी. अहंमदशाहा हा तिचा मुलगा, बाप मेल्यावर ता. १५–४–१७४८ रोजीं गादीवर आला. मनसूर अली ऊर्फ सफदरजंग हा सन १७४८ मध्यें वजीर झाला, आधीं नाहीं. त्याचा चुलता व सासरा सादतअलीखान, महंमदशहाच्या अयोध्या प्रांताचा सुभेदार.

३०. 'मुडी' **धो.** प्र.

३१. 'पूर्वापार' **सा.** प्र.

३२. 'बसऊन' **भाइसं.** प्र.

३३. 'जिकडे पाहावें, त्याजपुढें असेल.' **सा.** प्र.

३४. या पुढें 'अशी चाल होती' **सा.** प्र.

३५. 'पादशाही आम्ही' **भाइसं.** प्र.

३६. 'बंदरका बिकार दिखलावूं' **सा.** प्र.; 'बहादरका बिकार दिखलावूं' **सगजो.** या एकंदर 'बंदर' प्रकरणास अजून ऐतिहासिक आधार मिळत नाहीं.

३७. 'नफरोका' **मं.** प्र.

३८. 'उखाटणा' **शें.** प्र.

३९. 'राखावें' **भाइसं.** प्र.

ते न राखिलें[४०], बेफाम राहिला. **किलीजखान** यानें **रूमचा** पातशाहा **नादरशाहा** याजकडे सूत्र[४१] लाऊन त्याची चढाई[४२] दिलीवर करविली. **रूमचे** पातशाहीखालीं दिलीची पातशाई; तीन लक्ष फौज **दिळीपत** पातशाहा व पांच लक्ष फौज **रूमचा** पातशाहा. याजहून [तो] जबरदस्त पातशाहा. त्याणें दोन लक्ष फौजेनिसीं मजल दरमजल आटक उतरून, **लाहूरच्या** सुभ्यास तंबी पोहोचऊन **सत्रंजी**[४३] नदी उतरून आलीकडे आला. हें वर्तमान **महंमदशाहास**[४४] कलतांच त्याणीं तमाम वीर उमराव[४५] यासी ताकीद करून फौज सिध्ध करून पुढें रवाना केले. **दक्षणची** फौज भारी म्हणौन **किलीजखानं** यास मात्र जवल ठेऊन घेतलें. पुढें **मनसूरआली**[४६] व **जर्यासिंग** राजाचा पुत्र व मारवाडी राठोड व **छत्रसाल** जाठ[४७] व **सुरजमल** जाठ याचा बाप[४८], **आमेरखान**[४९] **बलोच** व **सारखान**[५०] व **बहादरखान**[५०] असे सरदार[५१] बहूत दीड लक्ष फौजेनिसीं पुढें सडे रवाना केले. झाडून पातशाही रिसाले च्यारसेहे तोफा व दोनसेहे गंजिफियाच्या गाडचा व हस्तनाले व सुतारनाला व जेजाला व रेखले व बंदुखा व बाणांच्या कैच्या आसे कुल दारूखाना **किलीजखान** याजसमागमें देऊन **पाणपत कर्नाळ** पावेतों पुढें रवाना केले. पुढील फौजेची [इराणीशी] गांठ पडली. तों **नादरशाहा** पातशाहा **रूमचा** याची फौज भारी बेमुबलग, जुरतहि भारी. त्या पुढें यांस टिकाव[५२] होईना. याणीं मोंगलाई मसलत करून पाठीवर घेतलें आणि फौज घेऊन **दिलीकडे** येते जाहाले.[५३] पुढें **किलीजखान** यास इशारत केली कीं, "आम्ही **नादरशाहास** घोळवीत घोळवीत तुम्हांवर[५४] घेऊन येतों. तुम्हीं रिसाल्यांत दारूगोली घालून सिध असावें. तुम्हांवर येतो. [येतांच] तुम्ही येकदांच सरबती देऊन मागून हौद्यावर चालून घ्यावें. आम्ही इकडून हौदे चालवितों." असा मनसुबा

---

४०. 'तें न करतां' **सा. प्र.**

४१. या विधानास ऐतिहासिक आधार अजून मिळत नाहीं; मात्र शहास त्यानें विरोधलें नाहीं हें सत्य होय.

४२. 'लढाई' **भाइसं. प्र.**

४३. 'शतद्रू' (सतलज) **सा. प्र.**

४४. अहमदशहा असा पाठ कांहीं प्रतींत आहे, तो चूक आहे.

४५. 'उमराव, वजीर' **सा. प्र.**

४६. मागील टीप २९ पहा. येथें सादतअली पाहिजे.

४७. छत्रसाल ता. १४ डिसें. १७३१ त मरण पावला होता, नादिरशहाच्या वेळीं तो जिवंत नव्हता.

४८. बदनसिंग सुरजमलचा बाप होय.

४९. 'अकबरखान' **सा. प्र.**

५०. सादलखान व बादलखान **सा. प्र.**

५१. कमरुद्दिनखान, खानडौरान, सादतखान वगैरे बादशाही सरदार नादिरशहावर चालून गेले होते. अर्थात् बखरकारानें दिलेलीं नांवें बरोबर दिसत नाहींत. आमेरखान, सारखान, बहादरखान वगैरे नांवें **मं.** व **सगजो. प्र.** मध्यें नाहींत.

५२. 'ठिकाणा' **भाइसं. प्र.**

५३. या लढाईचें वर्णन रा. खं. ६। १३१ मध्यें पहा. पेद ३०।२२५; इ. सं. ऐ. च. (वर्ष १, अंक ९) १–९.

५४. 'तुम्हाकडे' **भाइसं प्रत.**

करून **नादिरशहास** वेढून आणिलें. तों **किलीजखानाचें** व **नादिरशहा** याचें सूत्र एकच[५५] होतें. **नादरशहा** बेलाशक फौजेचे पाठीवर आला. तो **किलीजखान** आधींच जपून[५६] सिधच होता. **मनसूरअली**[५७] याजपासीं आग भारी म्हणौन भडभुंजे[५८] अभिधान होतें. तेहि आग **किलीजखान** याजपासीं राहिली होती. [तिची] **किलीजखान** यार्णे **दिलीपदपातशाहाची** फौज तोंडापुढें येतांच येकदांच सरबती केली. त्याजवर जसे भडभुंजे लाह्या भाजतात तैशी गत केली. तोफांचा व हस्त-नालांचा व जेजालाचा व रेखले व गंजिफियाच्या गाडयांचा व बाणांचा भडमार येकदांच जाहाला. फौज भाजून काढिली. केवल धुंदी जाहाली. पांच सात हौदे खालीं जाहाले. आपला रिसाला म्हणौन फौज बेफाम उभी राहिली होती. तों घरकलह होऊन विनाशकालीं विपरीत बुध्धी अनभवास आली. पदरचा तमाशा आनभवास आला. घरकलह लागला म्हणजे विनाशकाल जाणावा. आसी गती होतांच फौज भाजून काढिली. त्याजवर **नादरशहा**कडील उमराव व इराणी, दुराणी, तांम्रमुखें[५९] व सीख[६०] आदिकरून यांणीं हौदे चालविले.[६१] **दिलीपद**पातशहाची फौज मारून[६२] धुंमधार[६३] केली. कांहीं रणांत मेली. कांहीं राहिले ते रानोरान देशावरास गेले. त्यांणीं फिरोन **दिली** पाहिली नाहीं. **नादिरशाहाची** फौज चढे घोडयानिसी **दिलीस** पोहचली.[६४] तों पुढें फौज गेली म्हणौन शहाची बंदोबस्ती न करितां शहरपन्हां खालींच होता. चढे घोडयानिसीं शहर घेतलें. तों शहरास

---

५५. पेद. ३०; २२६, २२९; पेद १५; ७१, ७५. ता. १२–२–१७३९ ला कर्नाळचे युद्धांत बादशाही फौजेचा पराभव. सादतखान जखमी पाडाव, निजाम तटस्थ व खानडौरान मेला.

५६. 'जाणून' **साने** प्रत.

५७. 'मनसूर अली' बद्दल सादत-अलीखान पाहिजे.

५८. हें उपनांव कागदोपत्रीं आहे. पेद ३०, २२३.

५९. 'तांम्र मुखें' **सा.** प्र., **मं.** प्रत.

६०. 'अलिख' **भाइसं** व **शें.** प्रत.

६१. 'चालिले' **भाइसं** प्रत.

६२. 'जमा करून' **भाइसं** प्रत.

६३. 'धुमाधार' **साने** प्रत; 'धुवा-धार' **सगजो.** 'घुमधाम' **शेंबवणें** प्रत.

६४. 'कांहीं राहिली ती रानोरान देशत्याग जाहाली' **साने** प्रत.

६५. पेद १५, ८०, नादिरशहा दिल्लीवर चालून येण्यासाठीं ता. ८–१–१७३९ ला चिनाब उतरून आला. ता. १२–२–१७३९ ला कर्नाळचें युद्ध होऊन बादशहाचा पराभव झाला. या वेळीं निजाम तटस्थ राहून दोघांमध्यें तह घडवून आणण्याची तो खटपट करीत होता. ता. २८–२–१७३९ ला महंमद-शहास कैद करून नादिरशहा तख्ती-बसला व पुढें त्यानें दिल्लींत ता. ७–३–१७३९ प्रवेश केला व तेथें ४।५ महिने पर्यंत राहून असंख्य लूट घेऊन स्वदेशीं परत गेला. (पेद. १५, ८०; इ सं वर्ष १, अं. ९ ऐ च ले. ९; रा. खं. ६, १३३).

कधीं उपद्रव ऐसा ठाऊक नवता. केवल **द्वारके**प्रमाणें दिली नांदत[६६] होती. ऐसा शहरचा चिंधीचोला केला.[६७] इराणी, दुराणी आरबुज जात, कितेक लोक यानीं जीव दिल्हे व कितेक लोकांच्या स्त्रियांच्या **इराणी** याणीं आबरू घेतल्या.[६८] शहरची गत[६९] या रीतीची केली.[७०] फौज **लालगडीं** किल्यास लागली. तों **दिलीचा** किला आपेसी, दोहोचोहो रोजांत किला हस्तगत जाहाला. **महंमदशाहा** पातशहास धरून कैद केलें.[७१] पादशाही तोशीखाना झाडून लुटला. पातशाही-जादीची देखील आबरू राखिली[७२] नाहीं. किल्यांतून वस्त्रहरण करून पातशाई तख्त देखील काढिलें. तख्तावरील कच्येरीस रुप्याचे छत होतें, तेव्हढें मात्र[७३] मर्यादा राखिली. अवध्या शहराचा विनाश करून पादशा कैद करून **नादरशहा** याणें **मजमूचे टिळियावर**[७४] मुकाम करून राहिला. **किलीजखान** याजकडे रिसाला व तोफा व फौज मागून बाहचार्थ[७५] कृत्रिम सिष्टाई करून **नादरशाहास** भेटून पातशहास सोडविलें. ऐसी **नादिरशाई** जाहाल्यावर तो आपल्या **रुमाकडे** गेला. पादशाई उमराव जिकडील तिकडे आपआपले ठिकाणास गेले. ते फिरोन हा[७६] दिवसपर्यंत कोणी आले नाहींत. **मनसूर आली गंगापार** गेला.[७७] तो **अयोधेचा** सुभा सांभाळून तिकडेच राहिला. पुन्हां **भागीरथी** उतरून अलीकडे आला नाहीं. तेव्हां **महंमदशाहा**[७८] सहजच निर्माल्यवत् [जाहाला]. येक **किलीजखान** मात्र जवल भारी ते वेलेस होता. **किलीजखान** पातशहाप्रति बोलता जाहला कीं, " दखनी बंदर किस तऱ्हेसे नाच्या[७९] हें साहेबाचे खातरेस आलें किंव्हा नाहीं ? " म्हणोन बोलतांच बादशाहास परम विषाद आला. 'जोर थोडा, घुसा बडा,' काय करील.[८०] **किलीजखान** याणें आपला पुत्र **गाजुदेखान** होता. त्यास वजिरी देऊन आपण बंदोबस्त करून **किलीजखान** दक्षिणेस आला. याप्रमाणें वर्तणूक जाहाली. हें तुम्हांसहि वर्तमान सर्व माहीत आहे. " म्हणोन **नजीबखान** रोहिला सविस्तर

---

६६. 'जशी द्वारका नांदत होती तशी दिल्लीतील प्रजा नांदत होती. **कल्याण** प्रत.

६७. रा. खं. ६, १६६ पहा.

६८. 'त्याणीं कित्येक तरुण स्त्रियांची अबरु घेतल्या' एवढाच **सा.** प्रत पाठ.

६९. 'गती' **भाइसं, सा.** प्रत. १८७९, १८८६. 'रीति' **शेंडवणे** प्रत.

७०. 'जाहाली' **भाइसं** प्रत.

७१. यापूर्वीच तो कैद झाला होता.

७२. 'राहिली' **भाइसं** प्रत.

७३. 'ठेवून मर्यादा' **सा.** प्रत.

७४. 'मजमूचे किल्याजवळ' **भाइसं** प्रत.

७५. 'कोरे' **भाइसं** व क. प्रत.

७६. 'आज' **सा.** प्रत.

७७. मनसूर अलीचा हा उल्लेख बरोबर आहे; सादतअली विषप्राशन करून ता. ९-३-१७३९ रोजीं मेला.

७८. हा उल्लेख बरोबर. इतर कांहीं प्रतींत अहमदशाहा असा चुकीचा पाठ आहे.

७९. 'नाचता है ?' **साने** प्रत.

८०. 'करतील' **साने** प्रत.

बोलतां जाहाला, "आतां त्या तागाईत पातशाई उमराव गलिमास मिळोन आपली आबरू रक्षून आहेत. त्यांत **मनसूरआली** ज्याचा पुत्र **सुजायत-दवला** यास मात्र वजिरीचें दुःख[८१] आहे. त्याजपासीं पनास साठ हजार फौज व तीनशें तोफा आहेत. तो मात्र लगामीं लागेल.[८२] **मारवाड** प्रांतांतील **विर्जेसिंग** राठोड तो गलिमासीं मिलताव[८३] नाहीं. तोहि प्रयत्न केलियास हास्तगत होईल. **माधवसिंग जयनगरकर** याचाहि दोहों डगरीवर हात आहे. **सुरजमल** जाट तो आपला नव्हे. तसेच **बुंदीले** व आणखी उमराव आपले नव्हेत. परंतु[८४] त्यांस आधीं येक निमित्य घ्यावें लागेल.[८५] तें निमित्य जर म्यां घेतलें तर मजला जरा आश्रय पाहिजे. आतां उपाय येक आहे. **खंदारचा** बादशहा **आबदुल आली** दुराणी येक मातबर आहे. त्याचा पुत्र **तैमूरशहा**[८६] यास तुमची कन्या **चंदाजमानी** द्यावी. दिलीचा बादशा **आदमशाहास**[८७] मारून पातशाही **तैमूरशहासच** द्यावी व वजिरी **सुजायत दवला** यांस द्यावी आणि बक्षीगिरी मजला द्यावी. असा करार होत असल्यास हुकूम जाहालियास प्रयत्न करून पाहीन." म्हणोन बोलोन खुरनिसी[८८] केली. हें **मलकाजमानीनें** ऐकोन मान्य करिती जाहाली. 'स्त्रीबुद्धिः प्रलयं गता!' तिचें यांत काय जातें[८९]?

२७. याप्रमाणें तिचा याचा करारमदार होऊन **नजीबखान** याणें ठिकाणास येऊन वकील याजबरोबर **सुज्यात-दवले**[९०] याजकडे पत्र पाठविलें. त्याणें पत्र पाहून, परम खुशाली मानून वकिलापासीं इमान सानकरोटी[९१] दिली कीं, "मी सर्वस्वीं तुमचा आहें. हिंमत धराल[९२] तर फौज, लागेल तितका पैसा पुरवीन.[९३] परंतु वजारत येक वेळ करीन" म्हणोन बोलिले. याप्रमाणें वकिलानें खचीत करून माघारें आले. तसेंच **जयनगरकर** व **अमदखान**[९४] लंगडा व **बिर्जेसिंग** यांजकडीलहि इतला[९५] घेतला. [मग] आपला **भाऊ सुलतानखान**[९६] रोहिला यास **आबदल**

---

८१. 'मुख' भाइसं प्रत; 'मुखत्यारी' मंडळ प्रत.

८२. 'लागल्यावर' सा. १८७९.

८३. 'मिळता दिसत नाहीं' साने प्रत.

८४. 'यास आधीं निमित्यास धनी पाहिजे' साने प्रत 'परंतु यास आधीं निर्माल त्यास धनी पाहिजे' सा. प्रत; 'यास आधीं एक निमित्य घेतलें पाहिजे.' क. प्र.; 'निमित्य घ्यावें लागतें.' शें. प्र.

८५. 'तंबूरशाह' असा पु. क. भाइसं, प्रतींचा सर्वत्र पाठ आहे.

८६. 'आलमशाहा' असा चुकीचा पाठ कांहीं प्रतींत आहे.

८७. 'खुर्नीस केली' सा. प्र.

८८. 'गेलें' सगजो प्र.

८९. 'याजबरोबर सुजायत दवले' हे शब्द सा. प्रतींत नाहींत.

९०. 'सानकरोटीची शपत दिली' भाइसं प्र.

९१. 'धरावी' सगजो.

९२. 'देईन' शें. प्र.

९३. 'हामदखान' **साने** प्र.

९४. 'सूत्र ठीक करून' सा. प्र.

९५. 'तमनखान' **भाइसं** प्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थलप्रत.

आलीकडे खंदारास पाठविलें कीं, " **दिलीचा** पातशाहास तुमचे हस्तगत करून तुझा पुत्र **तैमूरशाहास** पादशाई देऊन **मलकाजमानीची** कन्या **चंदाजमानी तैमूरशाहास** देईन. दिलीचा भेद झाडून मजपासी आहे. चढत्या घोडयानिसीं **दिलीचा** किला हस्तगत करून देईन[९६]. " म्हणोन भावास **खंदारास** पाठविला. हें वर्तमान **गाजुदीखान** यास रतिमात्र ठाऊक नाहीं. इकडे तो **नजीबखान** रोहिला केवल हितशत्रूप्रमाणें [**गाजुदिखान** यास] जाबसाल करून, केवल त्याचा उपक्रम राखून[९७], तमाम गारुडी रान भारितो तसा प्रकार [त्यानें] केला. **सुलतानखान खंदारास** जाऊन पोहोंचला. **अबदुल आलीस** भेटून येथील[९८] वृतांत निवेदन केला. तोहि आधींच इकडे यावयास आतुर[९९] होता. " वजिरी **सुज्यातदौला** यास द्यावी[१००], **मलकाजमानीची** कन्या **चंदाजमानी तैमुरशाहास** देऊन **दिलीची** पातशाई **तैमुरशाहास** द्यावी आणि बक्षीगिरी **नजीबखान** यास द्यावी[१००] " या प्रमाणें करार करून[१०१] ऐशीं हजार फौजेनिसीं **दिलीवर** चाल केली. **लाहूर, मुलतान, पंजाब** कुल मुलुख काबीज करून **व्यासगंगा** व **चिनाब** व **शतद्रु** नदी उतरून सरंदेस मुकाम केला[१०२].

---

९६. अशा रीतीचा करार झाला असावा. पेद. २१, १००; रा. खं. ६, ३६५.

९७. 'करून' **साने** प्रत.

९८. 'तेथील' भाइसं प्र.

९९. कारण, यापूर्वी त्यानें हिंदुस्थानावर एकदोन स्वाऱ्या केल्या असूनहि फारसें साधलें नव्हतें.

१००. 'दिली' मं. प्र.

१०१. अबदालीस बोलावण्याचें सर्व कारस्थान नजीबखानानें केलें व त्याप्रमाणें अबदालीनें आपली पहिली स्वारी सन १७४८ मध्यें केली असा बखरकाराच्या वर्णनावरून भास होतो. तें सर्वस्वीं खरें नाहीं. अबदालीस बोलावण्यांत पंजाबच्या माजी सुभेदाराची बायको—मीरमन्नूची बायको—मुघलानी बेगम हिचाहि हात होता. मलिका अज्जमानी व बादशाही जनानखान्यांतील स्त्रियांची व्यवस्था गाजिउद्दीन वजीर रास्तपणें ठेवीत नसे. त्यामुळें त्यांनींहि नजीबखानास हातीं धरून मराठे व वजीर यांविरुद्ध कारस्थान उभारिलें व त्यांच्यातर्फे अबदालीस स्वारी करण्यास भर दिली. ही सर्व घटना रघुनाथराव आपली पहिली स्वारी संपवून दक्षिणेंत परत आल्यावर सन १७५६ त झाली. अबदालीच्या ५ स्वाऱ्या येणेंप्रमाणें :—

१ ली स. १७४८ मार्च–एप्रिल.
२ री स. १७४९ जाने. ताबडतोब परत.
३ री स. १७५१ मार्च लाहोर प्रांत घेतला.
४ थी स. १७५६ नोव्हेंबर—१७५७ मार्च २४.
५ वी स. १७५९ ऑक्टोबर—१७६१ मार्च २७.

१०२. सरहिंदेस ता. ६–१–१७५७ ला अबदालीची फौज आली.

प्रकरण चवथें

प्याद्याचा बार उडाला; पण वाया गेला.

२८. [अबदाली सर्‌हिंदेस आल्याची] पकी बातमी **दिलीस गाजुदीखान** वजीर यास कलली कीं, "दुराणीची दौड निश्चयें करून **दिलीवर** आली." तेव्हां **नजीबखान रोहिला** मात्र चार हजार फौजेनिसीं मातबर माणूस वजिराजवल होता. तसेंच गलिमापैकीं **आंताजी माणकेश्वर** शहरचे गिर्दनबाजीस पांच हजार फौजेनसी होते. ते समई **गाजुदीखान** याणें पातशाई कारभारी **नागरमल** व **बहादरखान बलोचे** व **आंताजी माणकेश्वर** व **नजीबखान** रोहिला आसे मिलोन[1] परम आजीद होऊन मनसुबा पुसता जाहला कीं, "दुराणीची दौड भारी,[2] दक्षणच्या फौजा गलीम झाडून दक्षणेस गेले, आसतां येक **नजीबखान** रोहिला व **आंताजीपंत** हे दोघे मातेबर आहेत. तेहि झाडून दाहा हजार[3]. यासी उपाय काय करावा ?" हें वर्तमान ऐकोन आवघे दंग जाहले. येकमेकांस कोणी कोणास बोलेनात. आसे मुहूर्तमात्र स्तब्ध[4] राहिले[5]. तों **नजीबखान** रोहिला, केवल मात्रागमनी, याणें उठोन खुरनीस करून अर्ज आर्ज केला कीं, "मी साहेबांचे पदरीं आहें तों वजिरांनीं कांहीं फिकीर न कराबी. आतां त्याजपासीं युध्द करावयास सामर्थ्य नाहीं; तर मजला हुकूम करावा. आडवा जाऊन त्यांस भेटून कलेल तैसा साम, दाम, दंड, बुद्धिभेद[6] त्यासी करून **दिलीस** न येतां तेथूनच माघार फिरऊन लावीन." म्हणोन हितशत्रुपणें बोलतांच **गाजुदीखान** यांस वाटलें कीं **नजीबखान** केवल प्राणाचाहि प्राण, प्राणाहून परता, त्याजवर काया करवांडी करावी. म्हणोन बहुत प्रकारें [त्याचें] समाधान करून, त्यास हती व घोडा व सिरपेंच व तुरा देऊन त्याची रवानगी केली.

२९. तों **आबदुल** आली तेथून कूच करून **कुरुक्षेत्रावर** आला. तेथील तीर्थ विध्वंस करून ब्राह्मणांचीं घरें[6] पाडून आठ मुकाम तेथें केलें. त्या मुकामीं **नजीबखान** रोहिला जाऊन पोहोंचला. ते समई **आबदुल आलीकडील** वजीर व सैमद-

---

१. 'मिळवून' साने प्र.
२. 'बदनजर धरून दिलीवर चाल करून येत आहे' असें वाक्य 'भारी' पुढें क. प्र. देते.
३. 'हजारानिशीं' शें. प्र.
४. 'बसले' सा. प्र.
५. 'भेद' भाइसं. प्र.
६. 'अग्रहारें' तुं. प्र.

आलीकडे खंदारास पाठविलें कीं, " **दिलीचा** पातशाहास तुमचे हस्तगत करून तुझा पुत्र **तैमूरशाहास** पादशाई देऊन **मलकाजमानीची** कन्या **चंदाजमानी तैमूरशाहास** देईन. दिलीचा भेद झाडून मजपासी आहे. चढचा घोडयानिसीं **दिलीचा** किला हस्तगत करून देईन[९६]. " म्हणोन भावास **खंदारास** पाठविला. हें वर्तमान **गाजुद्दीखान** यास रतिमात्र ठाऊक नाहीं. इकडे तो **नजीबखान** रोहिला केवल हितशत्रूप्रमाणें [**गाजुदिखान** यास] जाबसाल करून, केवल त्याचा उपक्रम राखून[९७], तमाम गारुडी रान भारितो तसा प्रकार [त्यानें] केला. **सुलतानखान खंदारास** जाऊन पोहोंचला. **अबदुल आलीस** भेटून येथील[९८] वृतांत निवेदन केला. तोहि आधींच इकडे यावयास आतुर[९९] होता. " वजिरी **सुज्यातदौला** यास द्यावी[१००], **मलकाजमानीची** कन्या **चंदाजमानी तैमुरशाहास** देऊन **दिलीची** पातशाई **तैमुरशाहास** द्यावी आणि बक्षीगिरी **नजीबखान** यास द्यावी[१००] " या प्रमाणें करार करून[१०१] ऐशीं हजार फौजेनिसीं **दिलीवर** चाल केली. **लाहूर, मुलतान, पंजाब** कुल मुलुख काबीज करून **व्यासगंगा** व **चिनाब** व **शतद्रु** नदी उतरून सरंदेस मुकाम केला[१०२].

---

९६. अशा रीतीचा करार झाला असावा. पेद. २१, १००; रा.खं. ६, ३६५.

९७. 'करून' **साने** प्रत.

९८. 'तेथील' भाइसं प्र.

९९. कारण, यापूर्वी त्यानें हिंदुस्थानावर एकदोन स्वाऱ्या केल्या असूनहि फारसें साधलें नव्हतें.

१००. 'दिली' मं. प्र.

१०१. अबदालीस बोलावण्याचें सर्व कारस्थान नजीबखानानें केलें व त्याप्रमाणें अबदालीनें आपली पहिली स्वारी सन १७४८ मध्यें केली असा बखरकाराच्या वर्णनावरून भास होतो. तें सर्वस्वीं खरें नाहीं. अबदालीस बोलावण्यांत पंजाबच्या माजी सुभेदाराची बायको—मीरमन्नूची बायको—मुघलानी बेगम हिचाहि हात होता. मलिका अज्जमानी व बादशाही जनानखान्यांतील स्त्रियांची व्यवस्था गाजिउद्दीन वजीर रास्तपणें ठेवीत नसे. त्यामुळें त्यांनींहि नजीबखानास हातीं धरून मराठे व वजीर यांविरुद्ध कारस्थान उभारिलें व त्यांच्यातर्फे अबदालीस स्वारी करण्यास भर दिली. ही सर्व घटना रघुनाथराव आपली पहिली स्वारी संपवून दक्षिणेत परत आल्यावर सन १७५६ त झाली. अबदालीच्या ५ स्वाऱ्या येणेंप्रमाणें :—

१ ली स. १७४८ मार्च–एप्रिल.
२ री स. १७४९ जाने. ताबडतोब परत.
३ री स. १७५१ मार्च लाहोर प्रांत घेतला.
४ थी स. १७५६ नोव्हेंबर—१७५७ मार्च २४.
५ वी स. १७५९ ऑक्टोबर—१७६१ मार्च २७.

१०२. सरहिंदेस ता. ६–१–१७५७ ला अबदालीची फौज आली.

प्रकरण चवथें

प्याद्याचा बार उडाला; पण वाया गेला.

२८. [अबदाली सर्‌हिंदेस आल्याची] पकी बातमी **दिलीस गाजुदीखान** वजीर यास कलली कीं, "दुराणीची दौड निश्चयें करून **दिलीवर** आली." तेव्हां **नजीबखान रोहिला** मात्र चार हजार फौजेनिसीं मातबर माणूस वजिराजवल होता. तसेंच गलिमापैकीं **आंताजी माणकेश्वर** शहरचे गिर्दनबाजीस पांच हजार फौजेनसी होते. ते समई **गाजुदीखान** याणें पातशाई कारभारी **नागरमल** व **बहादरखान बलोचे** व **आंताजी माणकेश्वर** व **नजीबखान** रोहिला आसे मिलोन[1] परम आजीद होऊन मनसुबा पुसता जाहला कीं, "दुराणीची दौड भारी,[2] दक्षणच्या फौजा गलीम झाडून दक्षणेस गेले, आसतां येक **नजीबखान** रोहिला व **आंताजीपंत** हे दोघे मातेबर आहेत. तेहि झाडून दाहा हजार[3]. यासी उपाय काय करावा ?" हें वर्तमान ऐकोन आवघे दंग जाहले. येकमेकांस कोणी कोणास बोलेनात. आसे मुहूर्तमात्र स्तब्ध[4] राहिले[4]. तों **नजीबखान** रोहिला, केवल मात्रागमनी, याणें उठोन खुरनीस करून अर्ज आर्ज केला कीं, "मी साहेबांचे पदरीं आहें तों वजिरांनीं कांहीं फिकीर न करावी. आतां त्याजपासीं युध्ध करावयास सामर्थ्य नाहीं; तर मजला हुकूम करावा. आडवा जाऊन त्यांस भेटून कलेल तैसा साम, दाम, दंड, बुद्धिभेद[5] त्यासी करून **दिलीस** न येतां तेथूनच माघार फिरऊन लावीन." म्हणोन हितशत्रुपणें बोलतांच **गाजुदीखान** यांस वाटलें कीं **नजीबखान** केवल प्राणाचाहि प्राण, प्राणाहून परता, त्याजवर काया करवांडी करावी. म्हणोन बहुत प्रकारें [त्याचें] समाधान करून, त्यास हती व घोडा व सिरपेंच व तुरा देऊन त्याची रवानगी केली.

२९. तों **आबदुल** आली तेथून कूच करून **कुरुक्षेत्रावर** आला. तेथील तीर्थ विध्वंस करून ब्राह्मणांचीं घरें[6] पाडून आठ मुकाम तेथें केलें. त्या मुकामीं **नजीबखान** रोहिला जाऊन पोहोंचला. ते समई **आबदुल आली**कडील वजीर व सैमद-

---

१. 'मिळवून' साने प्र.
२. 'बदनजर धरून दिलीवर चाल करून येत आहे' असें वाक्य 'भारी' पुढें क. प्र. देते.
३. 'हजारानिशीं' शें. प्र.
४. 'बसले' सा. प्र.
५. 'भेद' भाइसं. प्र.
६. 'अग्रहारें' तुं. प्र.

खान[७] कतलबाज आडवे येऊन बहूत सन्मानें घेऊन गेले. पातशहाची भेट जाहाली. तेथें सुकाणू सुलतान[८] होता. भेट होतांच दारमदार करून पूर्ववत् प्रमाणें करार-मदार करून त्याची सानकरोटी यास आली. याणें आपली सानकरोटी त्यास दिल्ही. ते समईंच तेथून कूच करून **पाणिपत-कर्नाल** येथें आले. ते समई **बाहादरखान बलोचे** याचा पुत्र, **बाहादरगड** येथें होता तो, रातोरात **दिलीस** येऊन पोहोंचला. इकडून **नजीबखान** याणीं स्वारांसमागमें[९] वरचेवर पत्रें पाठविलीं कीं, "वजिरांनीं कांही फिकीर न करावी." त्याजवरून हे आपले जागां स्वस्थ होते. **बाहादरखान** याचा पुत्र येऊन, वजिरास भेटून, तेथील सर्व सविस्तर सांगितलें कीं, "**नजीबखान**[१०] त्यांजकडे मिळाला[१०]. येक दोन रोजांत येऊन पोहोंचतो[१०] तुम्ही त्या मात्रागमनीवर विश्वासून स्वस्थ कसे राहिला ?"

३०. हें वर्तमान वजिरानें ऐकोन बहूत घाबरा जाहाला. "मात्रागमनीनें निमखहरामी केली. यास यत्न काय करावा ?" म्हणोन **आंताजी माणकेश्वर** यांस बोलावून सांगितलें कीं, "तुम्ही शहरची गिर्दनबाजी करावी, मी किला सांभाळतो." हें **आंताजीपंतांनीं** ऐकोन साफ उत्तर केलें कीं, "शहरपन्हा थोर. फौज थोडी, आम्हांस हे हिंमत होत नाहीं." म्हणोन कूच करून **बालमगडा**-वरीं जाऊन मुकाम केला, तों दुराणीहि दुसरे दिवशीं येऊन पोहोंचला. आधींच शहर खालीं आणि **नजीबखान** तो केवल भेद्या[११] ! चढते घोडचानिसीं शहर घेतलें. तों गिलज्याची ताकीद भारी. शहरांत दाहा हजार गिलज्यांनीं मारिलें.[१२] केवल धुंदी जाहाली. शहरचा नाश केला. पूर्वी **नादरशाई** जाहली त्याहून भारी प्रलय जाहाला. तों **आबदुल आली** दुराणी जिमा[१३] मशिदीस येऊन आपला स्वधर्म उजूतवाजू करीत होता. तों आर्जबेगांनीं आर्ज केला कीं, "शहरांत गर्दी होऊन दुराणीची बहूत कत्तल जाहाली." तों **नजीबखान** रोहिला व **सैमदखान** कतल-बाज जवल होता. तों **आबदुल आलीनें** त्यांचे तोंडाकडे पाहून जवल निमच्या होता तो अर्धा ओढून जवल ठेवितांच 'कतल' म्हणोन[१४] पुकार जाहाला. ते

७. 'सय्यद अब्दलखान' शें. प्र.; 'समदखान कत्तलबाज' तुं. प्र.; 'शहा-मतखान' पाठभेद.

८. 'सुका सुलतान' तुं. प्र.; 'सूत्र-धार' सां. क. प्रती. 'सुभवली' शें. प्र.

९. 'सांडणीस्वारांसमागमें' सा. प्र.

१०. 'नजीबखान याजकडील वकील येक दोन रोजांत येऊन पोहोंचतात' भाइसं व मं. प्रती.

११. 'हकहरामी' सगजो. 'नजीब-खान तो हकहरामी बहूत आहे. तेव्हां जें करणें ते साभाळून करावें. नाहींतर त्याजला धरून आणावें. अशी ताकीद बादशहानें केली.' सां. व तुं., सगजो. प्रती.

१२. 'तों शाहरात दाहा पांच हजार गिलचे मारले गले. केवळ धुंदी जाली' असा तुंगार प्रतीचा पाठ आहे.

१३. 'जुम्मा' शें. प्र.

१४. कत्तल करण्याचा इषारा देण्याची ही पद्धति त्यावेळीं रूढ असावी.

समई त्यांची कतल काय कीं पुरुष मारावे आसा नेम[१५] नाहीं; पुरुष, पोर, स्त्री, कुतरीं, घोडीं, गाढवें, गुरूं वगैरे हातांखालीं जें सांपडेल तें मारावें[१६]. आसी साडे तीन घटकापर्यंत कतल जाहाली. **आबदुल आलीनें** निमाज करून करांचली वोढून ठेविली होती, तीस मेण करून ठेविलें. मेण करितांच 'द्वाहीं' म्हणोन पुकार जाहाला. तों मिलज्यांची कैद भारी. ताकीद म्हणतांच मानेवरी सुरी ठेविली आसली तरी सोडावें. साडेतीन घटिकांत अठरा हजार मनुष्य कतल झाले[१७]! तो प्रलय लिहून कळवावा—याप्रमाणें नाहीं! शहरचा चिंधीचोळा[१८] करोन, किल्यास येऊन लागलें. दो चहों दिवसांत किलाहि घेतला. पातशहा **आलमशाहा** होता तो कैद केला. **गाजुदीखान** यासी धरून त्यासीहि कैद केलें. त्याची मावळण[१९] व बहीण व त्याच्या कलवांतिणी वगैरे **नजीबखान** मात्रागमनी याणें आपल्या घरांत घातल्या. **नजीबखान** मात्रागमनी तो या प्रकारचा! **मलकाजमानीची** कन्या होती ती **चंदाजमानी तैमूरशाहास** दिल्ही[२०]. दोन च्यार रोज तेथें राहून[२१] पुढें **आगरियाचे** रोखें चाल केली. समागमें कैदेंत **गाजुदीखान** ठेविला होता त्यासहि घेतलें; **आलमशाहा** बादशाहास किल्यांतच कैद करून ठेविलें.

३१. तों **आंताजी माणकेश्वर** (येऊन) पलवलावर राहिले. **नजीबखान** याणें **गाजुदीखान** याचा सिरच्छेद करावा म्हणोन बहूत केला; परंतु ते समई **आबदुल आलीनें**[२२] राखिलें. **आंताजीपंत** यांची बातमी पलाल्याची[२३] कलतांच **सैमदखान कतलबाज** पंधरा हजार फौजेनिसीं त्याजवर गेला. **आंताजी माणकेश्वर** यांणीं हिंमत धरून येक वेल फौजेचा मोकाबला घेतला[२४]. तों यांची जड काया, धाकटे घोडीवर थोर घोडा टाकवा,[२५] तो धाकटा दबून राहतो, तैसा प्रकार जाहला.

---

१५. 'अर्थ' सा. प्र.

१६. 'त्याची कतल करावी' सा. प्र.

१७. 'मनुष्यांची कत्तल जाहाली' सा. प्र.

१८. 'चोप करून' भाइसं. प्र.; 'चोकला' मं. प्र.

१९. त्याचे मामास धरिला. वजीर याची बाईल व कळवंतीण वगैरे क. प्र. 'त्याचा मावळा' भाइसं. प्र.

२०. चंदाजमानी ऊर्फ महंमदी बेगम हिचें लग्न तैमूरशहाशीं १७५७ च्या फेब्रु. झालें.

२१. अबदलीनें दिल्लीवर केलेला जुलूम. बखरीचें वर्णन अपुरें. पहा, रा. खं. १, ६३; पेद. २१, ९८, ९९, १०४, ११८; पेद. २७, १४४, १५२; पेद. २, ७१ इ. सं. वर्ष २, अंक ८, ऐ. टि. ३१.

२२. 'कैदेंत आहे म्हणून' असे शब्द 'अलीनें' पुढे सा. प्र. मध्यें आहेत.

२३. 'पलवल्याची' सगजो. शें. मं.प्र.

२४. 'गांठ पडोन अंताजी माणकेश्वर यांणीं हिंमत धरून लढाई देऊन त्यांचा मोहोरा फिरवून देऊन आपण निघोन रेवाडीचें रोखें [निघाले] दोन घटका मोठी कराचलीची हातघाई जाली. क. प्र. अंताजी माणकेश्वराशीं झालेला मोकाबाला. पेद. २१; ९५, ९६, ९९, १०५; रा. खं. १, ६३.

२५. 'सोडावा' मं. प्र.

दोन घटका मारामारी[२६] जाहली. तों **आंताजीपंतास** साहेनासें जाले. **आंताजी माणकेश्वर रेवाडीचें** रोखें[२७] निघोन गेले. पांच हजार फौजेतून आडीच हजार फौजेची कतल जाहाली. जितके निवडक मनुष्य होते तितके ठार जाहाले. तों खांसा **आबदुल अलीचा** मुकाम **पलवलावर** जाहाला. पुढील आघाडीची फौज होडलवरून छयाचे सराईवर जाऊन पोहोंचली. तेथून **मथुरा-वृंदावन** कचे सोळा कोस राहिले. **मथुरेंतील** ब्राह्मण व बहिरागी यांसी गलिमाची फौज इतबारी म्हणोन आसावध होते. तों येकायेकीं झाडून दौड येऊन पोहोंचली. **वृंदावनांत** आठ[२९] हजार बहिरागी होते ते हात्यार धरून मेले. गिलज्यानें **गौघाटांत**[३०] दाहा पांच बहिरागी सत्पुरुष* होते त्यांसहि बसले ठिकाणीं जेब[३१] केले. दुराणी केवल निर्दय[३२], त्यांस मनुष्याची परवा नाहीं. तसेच **मथुरेंत** हजार दीडहजार ब्राह्मण मारिलें. तरुण ब्राह्मणी व आन्यत्र जातीच्या स्त्रिया होत्या, त्यांस बंधन करून नेल्या.[३३] त्यांत कितेक पतिव्रता स्त्रिया होत्या. त्याणीं जिवावर उदार होऊन यमुनेंत जीव द्यावा म्हणोन डोहांत चालिल्या. तों ' संकटीं ईश्वर साह्य ' तसें जाहालें. प्रत्यक्षास प्रमाण. डोहांत पाणी भालाभर असतां बायकांस मांड्याइतके लागोन नदीपार जाहाल्या. त्यांच्या मागें गिलजे यांणीं घोडीं घातलीं तों ते बुडों लागले ! ईश्वरानें कौतुक केलें. ही गोष्ट कोणी मिथ्या मानावी आसी नाहीं. बहूत साक्षी आहेत.

३२. या प्रकारें या क्षेत्राची चिंधीचोला करून गोकुल पलीकडे **गौघाट** [आहे]. पूर्वी देव गाई त्या डोहावर[३४] पाणी पाजावयास आणीत होते म्हणोन ' गौघाट ' नांव पडलें.[३५] तेथून कचे सात कोश **आगरियाचा** किला होता. तेथून **यमुनेचे** तीरानें मुकाम दुराणीचा जाहला होता. **गाजुदीखान** कैदेंत होता. त्याची

---

२६. ' खणाखणी, हाणाहाणी, सणासणी ' तुं. सां. सगजो.

२७. ' मुकामीं ' पु. प्र.

२८. ' होडेववरू ' शें. प्र.; ' होडले कडोन छऱ्याचें राईस ' जाऊन राहिली.' सां. प्र. ' होडळेवरून छयार्त राइस '; ' तुं. प्र.; ' हाडवावरून छारेसराईस ' धों. प्र.; ' होडेवरून छाती सराहीवर ' सां. क. प्र.

२९. ' साठ ' भाइसं–पु. सां. प्रती ' सात आठ ' शें. क. प्रती.

३०. ' गोधूत ' सगजो., गोखडींत सा. प्र.

*अबदालीचा मथुरेवर अनर्थ : पेद २१, १०७, १०८. पेद. २७, १५२. फा. ३. ३५४. रा. खं १, ६३. बखरींतील मजकूर पत्रांशीं जुळता आहे.

३१. ' जर्ब ' पु. प्र. ' लंबे ' सा. १८७९ व १८८६.

३२. ' दयेची जात त्यांजपासीं नाहीं दैत्यच ते ! त्यांजला मनुष्य म्हणजे मत्कुणप्राय ' अशीं ' निर्दय ' शब्दांपुढें क. प्र. वाक्यें.

३३. ' त्या धरून ठेविल्या ' सा. प्र.; ' बांध धरून नेल्या ' तुं. प्र.; ' बंद धरून ' सगजो.

३४. ' घाटावर ' सा. भाइसं. प्र.

३५. ' पावला ' सगजो.

राऊटी[३६] नदीचे कडेस होती. भोंवताले रखवालीचे रोहिले सावधच होते. पाणियाचे रोखें पाणी भारी म्हणोन गैरसावध होते. ते समईं **गाजुद्दीखान** यास पाणियांत पोवावयाचा सराव चांगला होता. त्याणें राखणदार याची नदर चुकाऊन रात्रीचे ठायीं डोहांत गेला. पोवत नदीचे तीर सुटून मध्यभागीं कांहीं पोवत कांहीं ठाव घेत आसें आगरियास जाऊन पोहोंचला. कडेस पोहोंचले[३७] तों रात्र च्यार घटका पाहांटेची राहिली होती. ते समईं उघडा बोडकाच किल्याचे दरवाजियापासीं जाऊन पोहोंचला. तों जवल शह लस्करचा भारी म्हणोन किलाहि सावधच[३८] होता. तेव्हां दरवाजियाचे लोकांस हांक मारून सांगितलें कीं, "मी **गाजुद्दीखान** आस्या आरिष्टांतून पार पडोन तुमचे पाठीसीं निघावयास[३९] आलों आहे. आजिचे समईं मजला किल्यांत घेऊन जीवदान द्यावें, आसें किलेदार यांस सांगावें." हें वर्तमान किलेदारास दरवाजेकरी याणीं सांगतांच किलेदारानें मशाल लाऊन दरवाजियाच्या खिडक्यांतून[४०] बाहेर आला.[४१]

३३. आगरियाचा किला **यमुनेच्या** तीरीं आहे. येकीकडून **यमुनेचा** खंदक व येकीकडून खाणून दोंहि तोंडीं **यमुनेस** मिळऊन खंदकांत पाणी विपुल.[४२] दरवाजियापुढें खंदकावरील फल्यांवरून[४३] जावें-यावें. फल्या काढल्यावर यत्न नाहीं. तो किला केवल आसाध्य. येकांत येक पांच परीघ किल्यास. दर परिघास दोनसहे तोफा व सिवाय धाकटीं यंत्रें. आस्या किल्यावरी बारासें तोफा वगैरे [यंत्रें] दारूगोळी वगैरे सरंजाम पोक्त. केवल दुर्ग आवघड. **आगरियाप्रमाणें** भुईकोट किला, कोठें उपमेस नाहीं. ज्या वेलेस **अकबरशाहा** पातशाहा यांणीं किला बांधिला त्या वेलेस किलेदार व आंतील सामान यंत्रधारी व गोलंदाज ठेविले. ते वंशपरंपरें किल्यांत राहात आले. वरकड[४४] **आवरंगजेब** माहाबळी आदिकरून पातशाहा जाहाले आणि गलिमाची प्रबलता जाहाली. पलीकडे **आटकेपर्यंत** मुलूक गलिमांनीं काबीज केला. परंतु किला कोणास आला नाहीं. **सुरुजमल जाठ** यास सैन्याचा गर्व होता.[४५] त्यास शहराची गिर्दनवाजी दिली होती. परंतु त्यासहि किला आला[४६] नाहीं. त्याचें वतन, ज्यांणीं **आगरियाचे** महालाचें स्वामित्व करावें,

---

३६. 'राहावटी' भाइसं. प्र.
३७. 'निघोन' सा. प्र.
३८. 'किल्याचे लोक सावधच होते.' भाइसं.
३९. 'रिघावयास' मं. प्र.
४०. 'खिडक्या उघडून' सा. प्र. 'दिडच्या उघडून' क. प्र. 'दिडचांतून' मं. प्र.
४१. गाजीउद्दिनाच्या पलायनाची ही हकीगत चित्त्य वाटते.
४२. 'बेमुबलक' सा. प्र.
४३. त्या दादरावरून किल्यास जाण्या येण्यास मार्ग' क. प्र.
४४. 'अलीकडे' सा. प्र.
४५. 'जाठ फौजे करून मोठा बलिष्ठ आणि गर्वही बहूत होता.' सा. प्र.
४६. 'असाध्य' सा. प्र.

त्यांणीं किल्यांतील पोटापाण्याची वंदोबस्ती करावी. तो किला **अकबर पातशाहा** यांणीं कांहीं पृथिवी-दिग्विजय करून द्रव्य मिळऊन बांधला नाहीं. त्यास किमया आवलिया फकिरापासून प्राप्त जाहली होती. त्या किमियाचे द्रव्येंकरून येवढें असाध्य दुर्ग निर्माण[४७] केलें होतें. दारूगोळा, यंत्राचें साहित्य, याजप्रमाणें कोणत्याहि किल्यावर नाहीं.

३४. तेथे **गाजुदीखान** पोहोंचतांच किलेदार बाहेर येऊन वोलख घेतली, तों **गाजुदीखान** प्रमाण. त्यांणीं जीवदान मागतांच किलेदार बोलता जाहाला कीं, "ज्यापासून[४८] आम्हांस किल्याची किलेदारी त्यापासून कधीं परकी[४९] मनुष्य कधीं आंत येऊं दिल्हा नाहीं." आसे म्हणतांच **गाजुदीखान** यांणें उतर केलें कीं, "तुमचा आश्रय धरून[५०] जीव जगवावयास हृदयीं निश्चय करून[५०] येथवर आलों. **यमुनेनेंहि**[५०] तारिलें. आतां आपले हातून मारून टाकणें किंवा किल्यांत घेणें." ऐसें ऐकोन किलेदार यांणें चितांत विचार[५१] केला कीं, "येक पुरुष आंत आल्यास काय होते ? या समई यासी रक्षावें हेंच उचित.[५२]" म्हणोन किल्यांत घेतला. वस्त्रें देऊन समाधान केलें. मुदारतीनें ठेविलें.[५०]

३५. तों मागें **गाजुदीखान** गेला म्हणोन हांक जाहाली. **नजीबखान** रोहिला यांणें चौकीदार यांचा शिरच्छेद केला. **गाजुदीखान** याचा शोध[५३] केला. तों वजीर **आगरियाचे** किल्यास दाखल जाहाला हे ऐकोन नजीबखान मनगटें चावूं लागला. कूच करून, **आबदुल आली यमुना** पार होऊन **आगरियाचे** किल्यानजीक मुकाम करून राहिला. पांच गिलजे व पत्रें किलेदारास लिहिलीं कीं, "**गाजुदीखान** यासी आमच्या हातीं देणें आणि किला खालीं करून देणें. नाहींतर मी खंदारचा पातशाहा **आबदुल आली** आहे. किला खाणून यमुनेंत टाकीन आणि तुझा सिरछेद करून तुझीं बायकांमुलें[५४] ढाणकास[५५] देईन." म्हणोन रवाना केलें. ते किल्यास पोहोंचले. किलेदार यांणीं पत्रें वाचून पाहिलीं. चितांत विच्यार केला कीं, "**आबदुल आली** पातशाहा शाहाणा म्हणोन ऐकतो.[५६] आसें आसतां आसा प्रकार लिहिला. त्याचा खावंद **नादरशाहा** आला होता. त्याणें केलें काय ? तें याच्या हातें होणें काय ? तथापि हुशारी केली पाहिजे." म्हणोन किलेदार

---

४७. 'एकशेहें आठ दुर्ग बांधले' क. प्र.

४८. 'आतांपर्यंत ज्यापासून' मं. प्र.

४९. 'पारखी' सा. प्र.

५०. हें वाक्य १८७९ व १८८६ प्रतींत नाहीं.

५१. 'योजना' सा. प्र.

५२. 'उत्तम' भाइंस. प्र.

५३. 'तपास' सा. प्र.; 'तलास' सगजो.

५४. 'रांडापोरें' सा. प्र.

५५. 'ढानकास देईन' सां. प्र.

५६. यापुढें 'या पत्रावरून सूकरच दिसतो. मस्ती फार असे' असा सां. प्र. चा पाठ आहे.

याणें शहरांतील शोध केला.[५७] शहर निखालस उज्याड जाहालें, कीं वस्ती आहे? तों शहरांतील थोरथोर मनुष्य भारधडी झोडून परागंदा जाहाली होती. गोरगरीबें मात्र राहिलीं होतीं.[५८] किलेदार याणीं शाहाणपण केलें कीं, "गिलज्या आम्हांस बुडवितो. त्यास धुडावूं तरी जी गत **दिलीची** व **मथुरेची** जाहाली तीच गत **आगरियाची** होईल." आसें म्हणोन दोघे गिलजे दरवाजियांत ठेऊन घेतले, तिघे मात्र उतर देऊन माघारे पाठविलें कीं, "पातशाहानी च्यार दिवस कृपा करून सांभाळावें.[५९] चौं दिवसीं किला खालीं करून देतों आणि **गाजुदीखान** बजीरहि हावालीं[६०] करतों" म्हणोन लिहून पाठविलें.[६१] [आणि किल्यांत मोठमोठे लोक कबिलेसहित होते व गोरगरीब होते त्यांस सांगितलें कीं, तुम्हीं च्यार दिवस बाहेर जावे, किल्यांत राहण्याचें प्रयोजन नाहीं. अशी ताकीद करून धांडोरा पिटवून काढून दिलें. कारणिक लढाऊ लोक मात्र किल्यांत ठेविले, बाकीचा खेळखाना काढिला.[६१]]

३६. हिकडे तमाम शहरांत ताकीद करून शहर चौं रोजांत बेचिराख केलें. **आगरियांत** कुत्रेंहि राहिलें नाहीं, तेथें मनुष्य कोठून राहील? आसें जाहलियावर किलेदार यांणीं ज्या रोखें गिलज्याचा मुकाम होता त्या रोखें च्यारशें तोफा दारूगोळा भरून सिध करून **आबदुल आलीस** येक चिठी लिहिली कीं, "आज आमचा खुशालीचा[६२] दिवस आहे. जलद कूच करणें, नाहींतर तोफांची सिलक[६३] झडेल." म्हणोन चिठी लिहिली. येक गिलज्यास तोफेचे तोंडीं देऊन उडविला. येक चिठी देऊन पाठविला. हें वर्तमान **आबदुल आलीस** व **नजीबखान** यास कळून मनगट चाऊन[६४] किल्यावर हला करावा म्हणोन फौज सिध केली. तों किलेदार याणेंच च्यारशें तोफांची येकदांच सरबती केली. [गिलज्याच्या] फौजेंत च्यारशें गोला येऊन पडला, तों मोठा प्रलय जाहाला. जलदीनें लस्कर तयार होऊन पलों लागलें. दोन तीन कोश जाऊन दम खादला. तेथेंहि लांब पल्याच्या तोफांच्या गोल्यापुढें टिकाव होईनासा जाहला. तेव्हां [गिलज्यानें] पांच कोसांवर मुकाम केला. **नजीबखान** रोहिला यांसी **आबदुल आलीनें** मसलत विच्यारिली कीं, "कसें करावें?" तेव्हां **नजीबखान** याणें उतर केलें कीं, "**आगरियाचा** किला भारी.

---

५७. हें वाक्य १८७९ व १८८६ सा. प्रतींत आहे; पण तें पुढील आवृत्तींत पादटीपेंत दाखल आहे.

५८. हें वाक्य भाइसं. व मं. प्र. मध्यें आहे.

५९. 'सांभाळून घ्यावें' शें. प्र.; 'चार दिवस कृपा करावी.' सा. प्र.

६०. 'हजर' सा. व शें. प्र.

६१. चौकटी कंसांतील सर्व मजकूर सान्यांच्या १८७९ व १८८६ प्रतींत नाहीं, पुढील प्रतींत आहे. भाइसं व मंडळ प्रतींतहि तो आहे.

६२. 'सणाचा आनंदाचा' सां. प्र.

६३. 'सिलक होईल' सा. शें. प्र. 'शिस्त होईल' सां. प्र.

६४. 'चोळून' क. प्र.

तेथें कोणाचा यत्न चालावयाचा[६५] नाहीं. तेथें शहास गुंतूं नये. देशाहून[६६] गलिमाच्या फौजा **रघुनाथराव दादासाहेब** व **मल्हारराव होळकर नर्मदा** आलीकडे आले आहेत. अशी बातमी तहकीक आली आहे. ह्या शहास गुंतून[६७] उपयोग ताहीं." म्हणोन कूच करून **कुंभेरीचे** रोखें चाल[६८] केली.

३७. [तिकडे गेल्यावर] **सुरजमल जाट** यास चिठी लिहिली कीं, "क्रोड रुपये खंडणी घेऊन हुजूर भेटीस येणें." त्याजवरून **सुरजमल जाट** याणें **रूपराम कटारी** यासी बोलाऊन मनसोबा[६९] विचारिला कीं, "**आबदूल आली खंदारचा** पातशाहा चालून आला, सामान्य नव्हे, यास जाबसाल काय करावा?" **रूपराम कटारी** मोठा मनसोबाबाज. याणें उत्तर केलें कीं, "देशींहून पेशव्या गलिमांच्या फौजा **नर्मदा** उतरून आल्या. यास शहास गुंतावयास[७०] दम निघत नाहीं. मेजवानी म्हणोन दाहा लक्ष रुपये देतो, घेत आसल्यास उत्तम, नाहीं तर झुंजास उभें राहावें. तोंपावेतों गलीमहि येऊन पोहोंचतील." हा मनसोबा **सुरजमल जाट** याचे ध्यानास आला. **आबदुल आलीस** पत्राचें उत्तर लिहिलें कीं, "दाहा लक्ष रुपये मेजवानी देतों. हे घेऊन स्नेह राखून जावें, नाहींतर युध्यास उभें राहावें. आम्ही सिध आहों" म्हणोन पत्र येतांच यांणींहि गलिमाच्या धास्तीवर मान्य[७१] केलें. दाहा लक्ष रुपये परस्परें कागदोपत्रीं स्नेह संपादून **दिलीस** पोंचले.

३८. [त्यावेळीं] **सुज्यादौला** यास आणून वजारत द्यावी, **तंबूरशाहास तख्ती** बसवावें, हा मजकूर होता तो राहिला. **आबदुल आलीनें** चितांत विचार केला कीं, "हा **नजीबखान** मात्रागमनी. ज्याचें हातें[७२] वाढला त्याची गत या प्रकारची केली. याचे भरंवशेवर पुत्रास येथें ठेवणें उचित नाहीं." म्हणोन आंतरी मजकूर आणून **नजीबखान** यांस समजाविलें कीं, "प्रस्तुत आम्ही **खंदारास** जातो. पेस्तर सालीं येऊन आवघा बंदोबस्त करितों, तोंपावेतों तुम्हीं **दिलीचा** किला

---

६५. 'यत्न...नाहीं' यापुढें सा. प्र.त पुढील वाक्यें आहेत. पण तीं १८७९ व १८८६ प्रतींत नाहींत. "किला मोठा बिकट आहे. फितुरीशिवाय किमपि यावयाचा नाहीं. येथें आम्हांस गुंतणें भलें नव्हे."

६६. 'दक्षिणेकडून' सां. प्र. 'देशींहून' सा. प्र.

६७. 'गुंतणें भलें नाहीं' सा. प्र.

६८. आग्र्याच्या किल्ल्यासंबंधींची बखरीची माहिती चूक आहे. रा. खं. १, ६३ वरून शहर लुटलें व किलाहि हस्तगत केला असें ठरतें.

६९. 'सल' (सला) पाठांतर,

७०. 'पडावयास' शें. सा. प्र.

७१. बखरीचें हें एकंदर वर्णन बरोबर नाहीं. अबदालीनें पांच लाख व स्वतःच्या सरदारांसाठीं दोन लाख सुरजमलाजवळ मागितलें. प्रथम त्यानें ते देण्याचें कबूलहि केलें होतें; पण शेवटीं एक 'कवडी न दिली.' पेद. २७, १५५; पेद. २, ७२.

७२. 'येथें' सा. प्र.

राखावा.[७३]" म्हणोन **नजीबखान** यांस पांच हाजार फौजेनिसीं **दिलीस** ठेविला. पातशाहा **आलमशाहा**[७४] यास जिवें मारावें तें न करितां, जीवदान देऊन, रक्षून कूच करून **कुरुक्षेत्रा**कडून सरदेत **सैमदखान कतलबाज** दाहा हजार फौजेनिसीं ठेविला आणि समागमे **मलकाजमानी** व तिची कन्या **चंदाजमानी** नेली.[७५] **तैमूरशाहास** वीस हजार फौजेनिसीं **लाहुरास** ठेवून **आबदुल आली खंदारास** गेला. मागोन **तैमूरशाहाहि** गलिमाचे धास्तीमुळें निघोन आपले ठिकाणास गेला[७६].

३९. हें वर्तमान **रघुनाथराव दादा** व **मल्हारजी होळकर** यांणीं ऐकोन दबत दबत धीरानें चालिले होते[७७] ते मजल दर मजल चालिले व **च्यमेली** नदी उतरून **आगरियान**जीक आले. इकडे **आंताजी माणकेश्वर** यांणीं **दताजी सिंदे** यास पत्रांवर पत्रें पाठविलीं[७८] कीं, "**हिंदुस्थान** हातचें गेलें. जलदीनें फौजबंदी करून येऊन पोहोंचावें." त्याजवरून **सिंदे** यांणीं नालबंदीचे दिवस नसतां वैशाखमासीं चालीस हजार फौजेस नालबंदी दिल्ही. तयार होऊन जावें तों **दिलीच्या** वकिलाचीं पत्रें आलीं कीं, "दुराणी आपले फौजेसुद्धां आपले प्रांतांत गेला. राजश्री **दादासाहेब** यांची फौज **च्यमेलीपार** जाहाली. तुम्ही तूर्त यावयाचें न करावें." म्हणोन पत्रें येतांच च्यातुर्मास पर्जन्यकाल दम खाऊन राहिले.

४०. इकडे **दादासाहेब आगऱ्या**नजीक येऊन **सुरजमल जाट** याजपासीं खंडणी घेऊन, **आगरियांत गाजुदीखान** होता त्यास काढून आपणापासीं आणिलें. तेथून मजल दर मजल कूच करून **गाजुदीखान** यास घेऊन **दिलीस** पोचले. शहराचा विनाशकाल. ज्याणें आधीं यावें त्याणें वस्त्रहरण करून मग पुढें काय करणें[७९] तें करावें. असा शहराचा सत्यनाश करून किल्यास मोर्चे लाविल्ये. पंधरा दिवस **नजीबखान** किल्यांतून लढला[८०]. त्यास पुर्तपणें कललें कीं, "आतां गलीम कांहीं मजला सोडीत नाहीं आणि **आबदुल आली**चीहि कुमक होत नाहीं. आतां आपला बच्याव करावा." म्हणोन अंतस्थ वकील **मल्हारराव** यांजकडे पाठविला; आणि जाबसाल केला कीं, "मी तुमचा धर्मपुत्र[८१] आहे. माझा बच्याव करावा. शरण

---

७३. 'सांभाळावा' मं. प्र.

७४. 'आदमशाहा' असा चुकीचा पाठ कांहीं प्रतींत आहे.

७५. पे. द. २, ७१ प्रमाणें हें विधान बरोबर.

७६. हें वाक्य १८७९ व १८८६ प्रतींत नाहीं.

७७. रघुनाथरावाची ही दुसरी स्वारी. ता. २९ नोव्हें. १७५६ ते ता. १९ सप्टें. १७५८. दादा पुण्याहून निघाला त्याच सुमारास अबदाली पेशावरावरून भारतांत शिरला!

७८. 'पत्रांवर पत्रांचा सूर चेतविला' तुं प्र.

७९. 'तें कर्तृत्व' सा. शें. प्र.

८०. 'झुंजला' सा. प्र.

८१. 'धाकटा' भाइसं. प्र. धर्मपुत्र कल्पनेस आधार रा. खं. १ ले. ४८; पेद २, ७७. (यांत नजीबच्या अटी)

आलिया मरण चिंतूं नये. हें समर्थास उचित होय." आसें म्हणतांच **मल्हारराव** केवळ साभिमानी होता. त्यास ईर्[८२] पडली कीं, "**नजीबखान** यांनीं धर्मपुत्र म्हणविलें तेव्हां याचा बच्चाव करावा." म्हणोन **मल्हारराव होळकर** राजश्री **दादासाहेब** यांजकडे जाऊन बहूत प्रकारें भीड खर्चून, पदर पसरोन, **नजीबखान** यास बक्षीस मागितले. **दादासाहेब** याचे चितांत **नजीबखान** हा केवल मात्रागमनी[८३] यास जिवें सोडूं नये; परंतु **मल्हारराव** यांची भीड भारी, उलगडेनासीं जाहली. तेव्हां मान्य करणें प्राप्त जाहालें. **मल्हारराव** यांणीं **नजीबखान** यास किल्यांतून काढून आपणापासीं आणून ठेविला.[८४] मागती **आलमशाहास नजीबखान** व **आबदुल आली** यांणीं कैद करून ठेविला होता. त्यास तख्तीं बैसवून, वजिरी **गाजुदीखान** यांस देऊन, शहराची गीर्दनबाजी **आंताजी माणकेश्वर** यांस सांगोन, पूर्ववतप्रमाणें बंदोबस्त करून, **कुरुक्षेत्रास** येऊन पोहोंचले.

४१. तेथें तीर्थविधी यथा पद्धतीनें करून, कांहीं तुळादानें करून, सरदेस[८५] जाऊन पोहोंचले. तों श्रीमंतांचा काळ उत्कर्ष. त्यायोगें **सैमदखान कतलबाज** यानें तोंड न दाखवितां पलून[८६] **लाहूराकडे** जात होता, तो [होळकर यांजकडील[८७]] पेंढारी यांणींच लुटून टाकिला, फौज मजल दर मजल **शतद्रू** व **व्यासगंगा** व **चिनाब** उतरून **लाहूरास** पावले. तेथील सुभा **संदीपबग** होता. तो दुराणीनें मारून त्याची स्त्री व मुलें कैदेंत ठेविलीं होतीं. **तैमूरशाहा** लाहूर सोडून खंदारास गेला [होता]. त्याचीहि फौज थोडी बहूत लुटली.[८८] **लाहूरचा** सुभा **संदीपबेग** याचा पुत्र कैदेंत होता त्यास पांच हाजार फौजेनिसीं चाकरीस ठेवून त्याचा दिवाण **लक्ष्मी-नारायण** म्हणोन जातीचा कायस्थ होता, बरा कर्ता मनुष्य होता, त्याचे स्वाधीन करून **पंज्याब** व **मुलतान** सुधा **आटकेपर्यंत** मुलूख काबीज करून ढाला माघाऱ्या केल्या.[८९] लुटीनें पेंढारी व लष्कर कुबेर जाहालें. **रघुनाथराव** व **मल्हारराव होलकर** यांणीं मोठें यश संपादिलें. तें सालीं तिकडेसच छावणीस राहिले.

४२. तों देसीं **नानासाहेब** व नबाब **निजामअलीखान** यांचा[९०] कांही बिघाड जाहाला.[९०] ते समईं **नानासाहेब** यांणीं **जनकोजी सिंदे** व **दत्ताजी सिंदे** यांस नेऊन

---

८२. 'वीरश्री' क. प्र.

८३. 'मादरचोद' क. प्र.

८४. नजीबखानास काढून दिला. पे. द. २१, १४४, १४८.

८५. ता. ८ मार्च, १७५८; लाहोर २० एप्रिल.

८६. 'गाशा गुंडाळून' क. प्र.

८७. कंसांतील शब्द १८७९, १८८६ व भाइसं. प्र. त नाहींत.

८८. पेद. २७; २१८, २२०. फा. ३; ९३, ९४.

८९. मराठे अटकेपार गेले; पहा पेद २७, २१८; पेद. २१, १६३; चंद्र द. १, ४९; चंद्र. २ पृ. ४ व भा. इ. सं.मं. त्रै. वर्ष २४ अं. १, पृष्ठें २ ते ८.

या वेळीं सलाबतजंग निजाम होता

९०. "नानासाहेब यांची स्वारी पैठणास लग्नाकरिता गेलेली होती" असें क. प्र. अधिक वाक्य आहे.

सांगितलें कीं "तुम्ही हिंदुस्थानांत पराक्रम बहूत केले मारवाडियासारिखे राठोड यांजपासून सकल राज्य सोडविलें,[९१] तें आम्हीं कानीं मात्र ऐकून त्रप्त जाहालों; परंतु आपले द्रिष्टीनें पाहिलें नाहीं. प्रस्तुत मोगलांचा व आमचा बिघाड जाहला आहे, आमची फौज बहुतकरून **दादासाहेब** यांजसमागमें हिंदुस्थानांत गेली. तुम्हीं फौज **आबदुल आलीचे** आवईवर ठेविली आहे. प्रस्तुत आम्ही तुमचे जिवावरी बिनघोरी आहों. साल मजकुराची मसलत तुमचे जिवावरी आहे." आसें म्हणतांच **सिंदे** मर्द व च्यार माकूल[९२] मनुष्य पदरीं, यांणीं मान्य करून [जलदीनें सांडणीस्वार पाठवून फौज आणविली[९३]] फौजसुधां नबाब **औरंगाबाजेसच** गांठिला[९४]. नबाबाजवळ फौज आंगदीं मराठे **व्यंकटराव निंबालकर** व **जानराव निंबालकर** व **गोपालसिंग** राजा **खंदारकर** व **इभ्रामखान** गारदी; यक **जाधवराव**[९५] निराला करून करोल तीस हजार फौज होती. तिजवर चाल करून **सिंदे** गेले आणि भोंवतालें गलीम उभे[९६] राहिले. परंतु **भोंगल** बाहेर येईना. त्यास मराठे **निंबालकर** वगैरे यांचा फितुरीचा संशय जाहाला होता. तें मराठेयांस ईरे[९७] पडली कीं "आमचा आभाव नबाबास पडला आहे, हें उतम नव्हें. युध करावें." म्हणोन तमाम फौज सिध होऊन शहरानजीक [बाहेर बागांत[९८]] उभे राहिले. तों **दत्ताजी सिंदे** व **जनकोजी सिंदे** व **नानासाहेब** यांचा पुत्र खासा **विश्वासराव** यांणीं फौज सिध करून चालून आले. नबाब **निजामअली** तयार होऊन या फौजेंत न मिलतां दुरून तमाशा पाहात उभा राहिला. यांणीं तीन टोळचा करून तिहींकडून[९९] उठले. **जानराव निंबालकर** यांजवर **दताजी सिंदे** व **व्यंकटराव निंबालकर** यांजवर **जनकोजी सिंदे** व वरकड उमराव यांजवर **विश्वासराव** ऐसी फौज उठली. **व्यंकटराव** याची बहीण **जनकोजी सिंदे** यांस दिल्ही होती. सोइरें जाहाले तरी येकमेकांचे येथें जेवणास जावेंयावें; परंतु क्षत्रिय धर्मांत अंतर करितां येत नाहीं. म्हणोन मराठियांचें गोड हत्यारीची तरवारींची येक घटका खणाखणी, मारामारी जाहाली. तों **व्यंकटराव** याचे मेहुणे आणि इकडे **जनकोजी सिंदे** यांचे साडू, **नागोजी माने म्हसवडकर**, यांणी आवघे फौजेंतून उठून **जनकोजी सिंदे** यांसच गांठ घातली. परंतु **सिंदे** यांजपासी करोलीचे सामान[१००]

९१. "मारवाड राठोडे म्हणजे बहूत पराक्रमी, लढाईंत पडोन सिरछेद जाहला तरी त्याचें कबंध रणांत नाचतें त्यांसारिख्यास देखील तुम्ही जेर करून आपली छाप त्याजवर ठेवून त्याजवळून राज्य हरण करून घेतलें." असा क. प्र. चा पाठ.

९२. 'काबील' सा. प्र.

९३. कंसांतील मजकूर १८७९ व १८८६ प्रतींत नाहीं.

९४. 'गांठावा' भाइसं प्रत.

९५. 'माधवराव' भाइसं. प्र.

९६. 'गुप्तरूपें राहिलें. भाइसं. प्र.

९७. 'वीर' भाइसं. प्र.

९८. हे शब्द १८८६ भाइसं. प्रतींत नाहींत.

९९. 'तीन फौजा करून तिन्हीकडून तिघे उठले' सा. प्र. 'उठावले' भाइसं प्र.

१००. 'बल' सगजो.

भारी. करोलाकडून मार देवविला. त्यांत **नागोजी माने** यांस गोळी लागून ठार पडले. गैबतच मारा जाहाला.[१०१] ईश्वरें चितांतील हिंमत पुरती केली नाहीं.[१०२] आस्तु. इहलोकीं कीर्ति करून परलोकीं साधन केलें. **नागोजी माने** यांचा मुडदा काढून नेला. त्याजवर सायंकाळहि जाहाला. **व्यंकटराव** यांस मेहुणे यांचे परम दुःख जाहालें. मुलें-माणसेंहि समागमें होतीं. मायाजाळें सर्वत्रांस परम दुख जाहालें. त्यांचे देहाचें सार्थक केलें. नबाब **बंदेगान आली** डेरियास येऊन त्यांचें मूल **दत्ताजी माने** यांचें समाधान केलें. ते वेळीं नबाब यांचे चितांतील विकल्प निघाला.[१०३]

४३. तों राजश्री **रामचंद्र जाधवराव** पांच हजार फोजेनिसीं नबाबास मिळावयास ताबडतोब येत असतां तें वर्तमान **दताजी सिंदे** यांस कलतांच त्यांणी त्याजवर दाहा हजार फौज रवाना केली. फौजेची गांठ पडावी तों **रामचंद्र जाधवराव** हे **सिंदखेडचा** आश्रय करून **सिंदखेडांत** राहिले. फौजेचे व त्यांचे युधप्रसंग नित्य होतच होते. दिवसेंदिवस **जाधवराव** पाण्याचे[१०४] तसदीनें जेरीस येत चालिले.[१०५] हें वर्तमान [*निजाम आली] यांणीं ऐकून भोवताला तोफांचा आराबा देऊन गोल बांधून बाहेर निघाले. बहूत मोंगल होऊन गेले, परंतु याजसारिखा काबिल[१०६] कोणीच जाहाला नाहीं. तों राजश्री **नानासाहेब** यांजकडून फौजा **गोपालराव** व **रास्ते** व **पोवार** व आणखी फौज येऊन **सिंदे** यांसी सामील जाले. मध्यें मोंगल व भोंवताले गलीम वेढून हां हूं करीत दोन कोस[१०७] झुंजत भांडत मजली करून **सिंदखेडास** दाखल जाहाले. तों खासे **नाना** व **भाऊहि** येऊन पोहोंचले. ते दिवसीं **दताजी सिंदे** इरेस पडून आपण उडी टाकून[१०८] करोल व तोफा व जेजाला व सुतरनाला व हस्तनाला आसें ढासणें धरून मार दिल्हा. तों मोंगलांचे फौजेचा गोल. याजमुळें घोडी, मनुष्यें पलूं लागलीं. ते समईं दुतर्फा यंत्रांचा कडाखा ऐसा जाहाला कीं, 'न भुतो न भविष्यति.' भडभुंजे लाह्या भाजतात तेसीं गत जाहाली. धुराचे गर्दींत कोणी कोणास दिसेनासें जाहालें. **दताजी सिंदे** केवळ[१०९] डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून

---

१०१. 'गैबीचा' सा. प्र.

१०२. 'पुरों दिली नाहीं.' सा. प्र.

१०३. या परिच्छेदांत वर्णिलेली शिदखेड मोहीम (१२ डिसें. ते १७ डिसें. १७५७). यांतील दत्ताजींच्या पराक्रमाचे वर्णन पेद. १।१शी जुळतें. पहा. पेद २५; १८३, १८४, फा. ३, १७९, १७८. कागदपत्रावरून बखरींतील व्यंकटराव हें नांव चूक असून त्याऐवजीं हणमंतराव असें पाहिजे. तो कोणत्या निंबाळकरांपैकीं ?

१०४. 'पोटाचे' तुं. प्र.

१०५. 'जेरीस आलो' सा. प्र.

१०६. 'काविसदार' (कावेदार ?) तुं. प्र.

१०७. 'मास' सगजो.

१०८. 'उठून' १८८६ व १८७९ प्र. नाहीं.

१०९ 'जसा' सा. प्र.

*या वेळी सलाबतजंग निजाम होता.

मारामार केली. तों **नबाब** केवळ *हातखाईस आला. **भाऊसाहेब** यांचे नेत्र संतोष जाहाले. तारीफ केली कीं, '**दताजी सिंदे** यांचे मर्दुमकीची शर्थ आहे![११०] जसें ऐकण्यांत आलें तसें कर्तव्य करून दाखविलें.' आसें वोलून मोठे संकटें **दताजी सिंदे** यांस उखळोन काढिले. सेंदोनसें खांसे ठार पडले. **नबाबासहि** आसें जाहालें कीं, "गलिमांशीं झुजें बहुत केलीं परंतु याप्रमाणें निधडा सरदार मराठियांत नाहीं" म्हणोन त्यानेंहि स्तुति करून आपले जागां मुकाम करून राहिले. मानकरी लोकांचे समाधान करून नांवाजिलें. पुढें सल्याचें सूत्र आरंभिलें. तेव्हां आठ[१११] दिवसांत मोंगलांचा व गलिमांचा सला **साखरखेडलियाचे**[११२] मुकामीं जाहाला.[११३]

४४. नंतर श्रीमंतांनीं राजश्री **जनकोजी सिंदे** यांस **हिंदुस्थान**चे मोहिमेस आज्ञा दिल्ही. **दताजी सिंदे** खासा **चांभारगोंदियास** लग्नाकरितां गेले. श्रीमंत निघोन **पुणियास** गेले. **जनकोजी सिंदे** च्याळीस हजार फौजेनिसीं मजल दर मजल **हिंदुस्थानांत** चालिले. **जनकोजी सिंदे** यांची उमर तो लहान. परंतु पराक्रमास[११४] केवल वृधाप्रमाणें; स्वधर्मशील, भक्त–परापण क्षेत्रीयासी औदार्य सहनशील[११५] [होते. ते] **नर्मदापार** होऊन **उज्यनीस** दाखल जाहाले. तेथून पुढें **बुंदीस** गेले. तों त्या राज्यांत तेथें **हरिगड**[११६] म्हणोन होता. तेथें **गुजालसिंग**[११७] म्हणोन गिराशा होता. त्याणें संपूर्ण मालवियांत धशत लाऊन गुप्तरूपें खंडण्या घेत होता. त्या गडास एकाएकींच जाऊन पोहोंचले. तो गड उगाच माळासारिखा होता; परंतु भोंवताली झाडी[११८] बहूत व चढण भारी होती. तो कांहीं गांवांत सांपडला नाहीं. दोन अडीचसें सामान[११९] व बायका होत्या. तेव्हां जातींचे गिराशी, त्यांणीं रात्रीं मध्यें बायका व भोवताली गिराशे घालून जरीपटक्याचे निशाणावर चालोन घेतलें. मारामार करीतच मोर्चियांतून पार पडून गेले. तेथें **बाळोजी सिंदा** म्हणोन पालक लेक होता. नामी सरदार जाहाला होता. त्यास गोली लागोन ठार जाहला. त्यासमागमें त्याचे स्त्रीनें सहगमन केलें[१२०].

४५. तेथून पुढें **खेचीवाडा व राजगड, पाटण व बुंदी**, कोट यांच्या खंडण्या घेऊन **जयेनगरचे** प्रांतांत[१२१] गेले. तेथें **माधवसिंग** राजा याणें च्यार दिवस हिंमत धरली होती. त्यास झुंजावयास पुरवेना. आसे जाणोन वीस लक्ष रुपये खंडणी

---

११०. दत्ताजीचा पराक्रम पेद. १,१.

१११. 'आठपंधरा' सगजो.

११२. 'साखर-खंडाळियाचे' सां.प्र; साकर-खंडालियाचे' तुं. प्र.

११३. या परिच्छेदांत सर्व मजकूर पु. क. सां भाइसं मं. प्रतींत नाही. सा. सगजो तुं. वगैरे प्रतींत आहे.

११४. 'कर्तव्यास' भाइसं. प्र.

११५. 'पोक्त बुद्धि आणि गंभीरता, स्वामीसेवेसीं अति तत्पर, त्यांचे उपमेस कोणींच नाहीं' असा जास्त मजकूर क. प्र. त आहे. *हातघाईस ?

११६. 'हरगड' सा. शें. प्रत.

११७. 'खुशालसिंग' भाइसं.; 'गुमानसिंग' सा. प्र.

११८. 'झाडीची डांग' सा. प्र.

११९. 'लोक' सां. प्र.

१२०. 'सयागमन घेतले' सगजो.

घेऊन तेथून पुढें मारवाड प्रांतीं जावें तो **उदेपूरकर** राणा यांजकडील **सिवसिंग सिसवदे** येऊन जाबसाल केला कीं, "**शिवपुरियाचा** राजा आमचा चाकर आसतां त्याणें घोंटाळा केला. किले व गढिया बळकाऊन आम्हांसी बेबदल[१२२] होऊन आपले प्रांतांत धामधूम करितो. येविसीं सांप्रतकालीं च्यातुर्मास बरसातकालचे दिवस आहेत.[१२३] **शिवपूरनजीक छावणी** करावीं.[१२४] वीस लक्ष रुपये तुम्हांस देतों. **सिवपूर** व गढी हस्तगत करून द्यावी". तेव्हां **जनकोजी सिंदे** यांणीं मनसुबा केला कीं, "**दताजी सिंदे** गांवास स्वदेसीं गेले आहेत. ते येईपावेतों च्यातुर्मास उगाच येकादे ठिकाणीं राहावें, त्यास हें उत्तम आहे. 'येक पंथ दो काज' आसें ध्यानांत आणोन मान्य केलें. खांसा आपण **सिवपुरास** मोर्चे लाऊन[१२५] राहिले. **राणोजी भोइटे**, सरनोबत बरे कर्ते मनुष्य होते; त्यांणीं फौजेनिसीं ढेकळचाचे[१२६] गढीस मोर्चे लाविले होते. तों येकायेकीं मोर्च्यांत **राणोजी भोइटे** यांस गोली लागून ठार जाहाले. हें वर्तमान **जनकोजी सिंदे** यांणीं ऐकोन बहूत कष्टी जाहाले. तों त्या स्थलीं दीपवालीहि जाली, **सिवापुरचे** राजास हस्तगत करून **उदेपूरकर राणे** व त्याचें ऐक्य करून दिल्हें. **राणाजीचे** आज्ञेंत शेवावृत्तीनें राहावें. याप्रमाणें करून आपले करारप्रमाणें ऐवज घेतला.

४६. तों **लाहूराकडून रघुनाथराव दादा** मसलत[१२७] फते करून देशास जात आसतां मार्गीं **जनकोजी सिंदे** यांस भेटावयास आले.[१२८] **दादासाहेबहि** दोन कोश मुकामापासून आडवे आले. उभयतांच्या भेटी जाहल्या. नंतर **जनकोजी सिंदे** यांचे डेरियास येऊन येकांतीं **जनकोजी सिंदे** यांस मसलत[१२९] दिल्ही कीं, "आंवदांची मसलत बुडाली तरी पुर्वेल.[१३०] क्रोड रुपये सिबंदी वाढली तरी चिंता नाहीं. (ती) देऊं. परंतु **नजीबखान रोहिला** याचें पारिपत्य करून त्यास जिवें न सोडावें. येवढी आम्हांस जोड द्यावी. आम्हींच त्याचें पारिपत्य केलें असतें,[१३१] परंतु **मल्हार-**

१२१. पहा पेद २, ९६; फा. ३. २३०

१२२. 'बदल' सा. प्र.; 'बेमान' सां. क. प्रत.

१२३. 'बरसातकाळ आहे' सा. प्र.

१२४. 'राहावी' भाइसं. प्र.

१२५. 'मोर्चे लावून शह देऊन' सा. प्र.

१२६. 'सडकोळचाचे शाहास' क. प्र.; 'सडकोळचाचे गढीस' भाइसं, प्र. 'टेकाळे' १८७९, १८८६ प्र.

१२७. 'स्वारी' क. प्र.

१२८. 'गेले' सा. प्र.

१२९. 'मनसबा' सा. प्र.

१३०. 'मसलत बुडविली तरी पुरवेल' सा. प्र.

१३१. यापुढे क. प्र. जादा मजकूर आहे तो; 'परंतु मल्हारराव यांस तो शरण आला याजमुळें त्यांस अभिमान पडोन त्याचा त्यांणीं आंगीकार केला. आम्हांजवल सक्त भीड खर्चून बक्षीस मागून घेतला. आमचा त्यांचे भिडेपुढें उपाय नाहींसा जाहाला. त्यांस तो दुष्ट नफर आहे. मातृस्थानीं लघुशंका करणारा असा मनुष्य आहे. आमची बालंबाल खातरी जाहाली आहे." हा मजकूर भाइसं. सगजो. मंडळ प्रतींत नाहीं.

राव यांसी आगत्य त्याचें पडलें. त्यांचा धर्मपुत्र म्हणोन त्यांणीं आगत्य धरून आपले तर्फेनें आंतरवेद प्रांत व कुरुक्षेत्रापासून कुंजपूर देखील चालीस लक्षांची मामलत त्याचे स्वाधीन केली. यास मल्हारराव यांसी माधवसिंग जयनगरकर व बिजेसिंग मारवाडी व आणखी बहुत [पुत्र] आहेत. त्यांत हा नजीबखान रोहिलाहि पुत्र जाहाला आहे! जितके यांणीं पुत्र म्हणविले[१३२] त्यांचा फलादेशहि भोगीतच आले.[१३२] परंतु त्यांचा अभिमान जाईना. त्यांचे जितके धर्मपुत्र आहेत तितके मात्रागमनी आहेत.[१३३] आम्हीं त्यांस पिसाल्या कुतरियाची गत केली आसती. परंतु तुपाचे घागरीवर उंद्राचें पिटकुलें[१३४] बसतें तैसा प्रकार जाहाला आहे. आतां तुम्हांस पदर पसरोन जोड येवढीच मागतों." आसें म्हणतांच जनकोजी सिंदे तसलीम करून आर्ज केला कीं, "दादासाहेब बारगिरास आज्ञा कराल त्याप्रमाणें वर्तणूक होईल. नजीबखान म्हणजे कोण जिनस? त्याचें पारिपत्य आम्हांकडे लागलें. पण आपण लाहूर, मुलतान, पंजाब देखील अटकेपावेतों मुलूख काबीज केला. आतां आम्हांस मोहिमेस रान कोणतें? आसें म्हणतांच दादासाहेब यांणीं उतर मागुती केलें कीं, "नजीबखान याचा सिरछेद केल्यास आम्हास तुमची सर्व जोड पावली." याप्रकारें तीन वेलां जाहालें. मग परस्परें बहुमान हती, घोडे, जडजवाहीर देऊन रघुनाथराव देशास आले.

४७. तों आठपंधरा दिवसां मागाहून [त्याच मार्गानें[१३५]] आले. त्यांस बारा कोशांचें आंतर होतें. [सिंदे होळकर यांची चितशुद्धता नवती.[१३५]] तेव्हां मल्हारराव यांणीं गंगाधरराव तात्यांस बोलाऊन आणून विच्यारिलें कीं, "सिंदे यांची जन्माची सांगड होती, तोंपावेतों ब्राह्मणांसहि[१३६] आमचा वचक[१३७] होता; व कितेक कामेंकाजें केवल आसाध्य तीं साध्य केलीं. आतां आमचें येक मूल आहे, तेंहि पिशाचवत आहे. आणि आमचें वार्धिक्यपण जाहालें. त्यापेक्षां हर यत्न करून जनकोजी सिंदे यांस भेटून त्यांचे चितांतील किलमिष[१३८] काढून त्यांचे हातीं आपलें मूल द्यावें." आसें बोलून गंगोबा तात्यांस जनकोजी सिंदे यांजकडे पाठविलें. गंगोबा तात्या भेटून सविस्तर वर्तमान ममतापुरस्कर केवल आजीद होऊन जाबसाल केला कीं, "सुभेदार यांचें म्हातारपण आणि तुम्हीही सुज्ञ मनुष्य आहां. सुभेदार भेटावयास येतात, तुम्हीं आव्हेर न करावा." म्हणोन बोलतांच जनकोजी सिंदे यांस

---

१३२. 'तितके यांणीं दाखले प्रत्यक्ष भोगविले.' भा. इ. सं. प्र.

१३३. 'सर्पास दूध पाजीत असले तरी त्याचा दुष्ट स्वभाव जाणार नाहीं.' असें सां. प्र. मध्यें जास्त वाक्य.

१३४. 'पिलूं बसविलें' भाइसं. प्र.; 'पिलूं बसलें' शें. प्र.

१३५. कंसांतील मजकूर १८७९, १८८६, भाइसं. मंडळ वगैरे प्रतींत नाहीं; सा. प्र. मध्यें आहे.

१३६. 'श्रीमंतासहि' सां. प्र.

१३७. 'वाजर' तुं. प्र.

१३८. 'किलमिष' 'भाइसं. प्र.

तिरस्कार[१३९] आला आणि उत्तर केलें कीं, " त्यांची आमची पुन्हा भेट आतां स्वर्गीं. अजूनहि तुम्हांस जितके करावयाचे उचित दिसेल तितकें करावें. " तों **गंगोबा तात्या** केवळ चांगलाच गळां पडला. तेव्हां **जनकोजी सिंदे** यांणीं जाबसालाची तोड केली की, " प्रस्तुत **दताजी सिंदे** प्रसंगीं नाहींत. त्यांच्या विचारासिवाय आपणास भेटावयास पुरवत नाहीं. " आसें बोलून **गंगाधरपंत** यांस वाटेस लाविले.

४८. मल्हारराव यांणीं वर्तमान ऐकोन आधिक उणा जाबसाल ध्यानांत न आणितां, " मूल आहेत " म्हणोन कूच करून **सिंदे** यांचे लस्करानजीक दोन कोशांवर मुकाम केला. मान, महत्त्व ध्यानांत न आणितां **मल्हारराव** तयार होऊन **जनकोजी सिंदे** यांचे डेरियास चालिले. हें वर्तमान **जनकोजी सिंदे** यांणीं ऐकोन निश्चय केला कीं, " आतां आडवें जावें हें उत्तम. [१४०] नाहींतरी आश्लाघ्यता येईल. " म्हणोन **जनकोजी सिंदे** तयार होऊन आडवें जाऊन भेटले. [त्यांस डेऱ्यास आणोन सत्कार केला.*] नंतर आठ-पंधरा दिवस **मल्हारराव** यांणीं तेथें रात्रंदिवस राहून त्यांचे चितांतील विकल्प[१४१] काढून मनाचा मळ तोडिला.[१४२] मुलास हातीं देऊन देशास जावयास निरोप मागितला. ते समई **जनकोजी सिंदे** यांणी आर्ज केला कीं, " सुभेदार तुम्हीं आम्हांस वडील आहां. तुम्ही **अटके**पावेतों मुलूख काबीज केला. आतां आम्हांस मोहिमेस रान आसुदें कोणतें ? " तेव्हां **मल्हारराव** यांणीं उत्तर केलें कीं, " तुम्हांस रान येक आहे. **भागीरथीस** पूल बांधोन **आयोध्येस** जावें **सुज्यातदौला** यासी तंबी पोचऊन पाहिजे तितके रुपये मिळतील. रान आसुदें आहे. **जनकोजी सिंदे** यांणीं उत्तर केलें की, " **भागीरथीस** पूल बांधणें कसें घडेल ? " तेव्हां **मल्हारराव** यांणीं सांगितलें कीं, " **नजीबखान** रोहिला यास हातीं धरून त्याचे हातून हें काम[१४३] करून घ्यावें. " हें वचन ऐकतांच **जनकोजी सिंदे** यांणीं जाबसाल केला कीं, " **नजीबखान रोहिला** मात्रागमनी आहे. जलमस्थानीं मैथून[१४३] करणार. **गाजुदीखान** याचे घरीं वाढला, त्याचें सार्थक केलें ! हें तुम्ही जाणतच आहां. त्यांत कार्यातुर[१४४] होऊन कामावर[१४५] नजर द्यावी तरी खावंदांचे द्रोही व्हावें. त्यांणीं आम्हांस मोहीम **नजीबखान** याजवरच नेमून दिल्ही आहे. आसें असतां हें कर्म केलियास श्रेष्ठ[१४६] स्वामीद्रोही व्हावें. त्यांत आम्हांकडे केवल सिलेदारी कर्म

---

१३९. ' रोष ' क. प्र.
१४०. ' उचित ' सा. प्र.
*१३५ टीप पहा
१४१. ' किलाफ ' सा. शें. प्र. ' किल. मिष ' दूर करून चित्तशुद्धता करून घेऊन येखलाशी जाहाल्यानंतर त्यांचे हातीं ' असा क. प्र. अधिक मजकूर.
१४२. ' कार्य ' शें. प्र.
१४३. ' लघुशंका ' सा. प्र.
१४४. ' कामातूर ' भाइसं. प्र.; १८७९, १८८६ प्र.
१४५. ' काळावर ' सा. प्र.
१४६. ' भ्रष्ट ' ? ' स्पष्ट ' असें पाठांतर.

नाहीं. आम्ही सरकारचे पागेचे बारगीर. आम्हांकडून हा विचार घडूं नये. असें बोलतांच **मल्हारराव** यांणीं उतर केलें कीं, " बाबा, तुमचा मूलस्वभाव.[१४७] **आटके**पासून **रामेश्वर**पर्यंत येकछत्री राज्य जाहालें. हिंदुस्थानांत एक **नजीबखान** मात्र खणू[१४८] राहिला आहे. त्याचे पारिपत्य केलिया **पेशवे आटके**पासून जासुदाचे हातें पैसा आणवितील. मग तुम्ही आम्ही सहजच निर्माल्यवत जाहालों. मग कोणी पुसणार नाहीं. यास्तव येवढे खणू रक्षून जें कर्णें तें करावें," याप्रमाणें सांगोन **मल्हारराव होळकर** यांणीं आपला पालक पुत्र **तुकोजी होळकर** दोन हजार फौजेनिसीं [सिंदे याजपासीं] ठेऊन,[१४९] निरोप घेऊन देशास चालिले.[१५०]

४९. तों [इकडे] **दत्ताजी** सिंदे गांवीं होते, त्यांणीं लग्न[१५१] करून समागमें **नारो शंकर** च्यार हजार फौजेनिसीं घेऊन **जनकोजी सिंदे** यांजकडे चालिले. तों वाटेस राजश्री **दादासाहेब** यांची भेट जाहाली. बहूत प्रकारें गौरव करून **जनकोजी सिंदे** यास **नजीबखान** याजविसीं सांगितलें होतें तसेंच पदर पसरून यांसही सांगितलें. **दत्ताजी सिंदे** यांणीं मान्य करून **दादासाहेब पुण्यास** पोहोचलें. **दताजी सिंदे** उज्यनीस आले तों **मल्हारराव उज्यनीस** गेले. **जनकोजी सिंदे** यांचे व **मल्हारराव** यांचें ऐक्य जाहालें, हें **दताजी सिंदे** यांस पूर्वी सूचना होतीच. मग **दताजी सिंदे** आडवे जाऊन बहूत सन्मान करून उज्यनीस घेऊन गेले. दोनच्यार रोज राहून उपच्यार मेजवान्या जाहाल्या. उपरांतिक **दताजी सिंदे** यांणीं **मल्हारराव** यांस प्रश्न केला कीं, "सुभेदार तुम्ही **आटके**पावेतों मुलूख काबीज केला. आतां आम्हांस मोहिमेस आसुदें रान[१५२], कोणतें आहे ? " तेव्हां **मल्हारराव** यांणीं सांगितलें कीं, येविसीं सूचना **जनकोजी सिंदे** यांस सांगितली आहे आणि तुम्हांसहीं सांगतों कीं, **नजीबखान** रोहिला यास हातीं धरून **भागीरथीस** पूल बांधोन पलीकडील[१५३] **आयोध्या** व **टाका बंगाला** व **माहूर**[१५४] देशपावेतों मोहीम करावी. रानहि आसुदें आहे व पैसाहि पाहिजे तितका मिळेल आणि **सुज्यातदौला** यास तंबी[१५५] पोहचऊन **भागीरथी** पलीकडील अर्धा मुलूख घ्यावा, त्यांत दाहा पांच किले भारी असतील, त्यांत ठाणीं घालावीं, म्हणजे चितास येईल तेव्हां श्वेतवंधासारखें जावयास–यावयास येईल. हें न करितां तुम्ही **नजीबखान** यांचें परिपत्य कराल तरी तुम्हांस पेशवे धोत्रे बडवावयास

---

१४७. ' बाबा, तुमचा स्वभाव फार चांगला, एकनिष्ठ आहां ' सां. प्र. ' कुलस्वाभाव ' भा. इ. सं. प्र. ?

१४८. ' खूळ ' सा. प्र.; ' खली ' पु. प्र. ' खाडू ' सां. प्र.

१४९. ' टाकून ' सा. प्र.

१५०. ' निघाले ' शें. प्र.

१५१. दुसरें लग्न सां. व क. प्र. या वेळीं दत्ताजी आपल्या मुलीच्या लग्नासाठीं श्रीगोंद्यास गेला होता (का.३, १८४)

१५२. ' जागां ' भाइसं प्र.

१५३. पुलापलीकडील' सा. प्र.

१५४. काऊर किंवा काहूर; सा. प्र. हा प्रांत कौरकुरा असावा असें प्रा. पोतदार सुचवितात.

१५५. ' जरब देऊन' क. प्र.

लावतील[१५६]. आसें स्पष्ट सांगितले. तेव्हां **दत्ताजी सिंदे** यांचे ध्यानांत गोष्ट ठसली. खांवंदांनीं सांगितलें तें मिथ्या [असा] भास जाहाला; **मल्हारराव** यांणीं सांगितलें हेंच पुर्तेपणें खरें प्रत्ययास आलें आसें जाहालें. लोभियाचे ध्यानांत धन बसते तैसें जाहालें. **मल्हारराव** यांणीं मंत्र [१५७] सांगोन देशास आले. तसेच मागून **विठ्ठलराव सिवदेव** देशांस जात होते. त्यांनीं हीच गोष्ट सांगितली. आग्नीवर आज्य टाकावें तसेंच पुर्तेपणें ठसलें. **जनकोजी सिंदे** यांचे चितांत **मल्हारराव** यांचा मनसोबा ठसला [१५८] नाहीं. सुभेदार याचें ऐकावें तरी निमकहरामी पदरास येते. आणि धनियाची इतराजी होईल. खावंदाची आज्ञा ज्याप्रमाणें त्याप्रमाणें **जनकोजी सिंदे** यांची वृत्ती जहाली होती. इकडे **दत्ताजी सिंदे** यांणीं [मल्हारराव होळकर बोलले[१५९]] मजकूर प्राधान्य केला.

---

१५६. या विधानाला अजून पक्का आधार नाहीं. दत्ताजीनें तो मानला असेंहि पुढील इतिहास सांगत नाही.

१५७. मात्र भाइसं. प्र.

१५८. ठरला' भाइसं. प्र.

१५९. कंसांतील मजकूर १८७९ १८८६ प्रतींत व भाइसं. मध्यें नाहीं.

प्रकरण पांचवें

प्याद्यानें क्रोड रुपयांचे आशेस गोविलें !

५०. **जनकोजी सिंदे** यांणीं **मारवाड** प्रांतींचा बंदोबस्त करून **दिलीकडे** चालिले. **रेवाडीवर** जाऊन पोहोंचले, तों **दताजी सिंदेहि** तेथें जाऊन मिळाले. चुलत्या पुतण्याच्या भेटी जाहाल्या. यांस त्या रानांत भय कोणाचें नवतें. यास्तव **दताजी सिंदे** यांणीं आपली स्त्री **भागीरथीबाई** व **जनकोजी सिंदे** यांची स्त्री **कासीबाई** यांस बरोबर घेऊन आले. तेथून कूच करून **दिलीस** पोहोंचलें. **दिलीपार लाहूर-दरवाजाकडे मजमूच्या**[1] **टिलियावर यमुनातीरीं** मुकाम करून राहिले. **गाजुदीखान** वजीर याची भेट जाहाली. **जनकोजी सिंदे** यांचा मानस कीं, "वजिरास समागमें घेऊन **नजीबखान** याचें पारपत्य करावें." **गाजुदीखान** याचे चितांतील भावार्थ हाच होता. बाह्यार्थ **दताजी सिंदे** वजीर यांसी **नजीबखान** याचे पारिपत्याचें बोलत. परंतु चितांत तो आर्थ नाहीं.[2] निदान **गाजुदीखान** यांणीं पंधरा लक्ष रुपये कबूल केलें: आपणहि समागमें यावयास सिध्ध जाहाले. याप्रमाणें वजिरासी निश्चय जाहाला. तों **दताजी सिंदे** यांणीं विच्यार केला कीं, "हरयेकविसीं कवाईत करून हा मजकूर राहाता करावा." म्हणोन वजिराकडील वकील यास आज्ञा केली कीं, "पातशाई रिसालेयांतील दोन तोफा पूर्वी **आकबरशा** पातशहाचे जिलबीस चालत होत्या, त्याप्रमाणें येक आटक व येक फतेलस्कर व आणखी एक किले-कुशाद ऐशा तीन तोफा देणें." वर्कड जिकडील तिकडे गेल्या होत्या. परंतु भारी म्हणावयासी तीन तोफा मात्र राहिल्या. पंचरस सुवर्णासारिख्या तेजस्वी, चौदा हात लांबी व पेटीस[3] रुंदी सात हात लागत होती. तोंडीं च्यार हात दोरी[4] लागत होती. याप्रमाणें आणखी येक मातबर नव लक्षांची होती. आशा तोफा मागतांच **गाजुदीखान** वजीर यास परम विषाद आला आणि "प्राण गेला तरी पुरवेल, परंतु तोफा द्यावयास आनकूल पडत नाहीं." म्हणोन उतर होतांच **दताजी सिंदे** यांणीं फौज सिध करून पातशाई रिसालियाकडे जाऊन[5] पाहिलें,

---

१. 'मनूच्या टिल्यावर' भाइसं. प्र.

२. यापुढें सां. प्रतींतील मजकूर असा "गाजुदीखान वजीर याचे मनांत नजीबखान याचें पारपत्याकरितां सिंदे यांसी जो लागेल तो पैसा मी पुरवीन, परंतु या नफराचें पारपत्य करावें. तूर्त पंधरा लक्ष...वगैरे."

३. 'पेदीस' भाइसं. प्र.; 'पेघीस' तुं. प्र.

४. "सात हात वर्तुळ व तोंडास चार हात वर्तुळ" सां. प्र.

५. 'चालोन गेले.' सा. प्र.

तों **गाजुदीखान** याजकडील सामान चालोन आले. तेव्हां थोडीबहूत गोलागोली जाहाली. तों वजिराचें सामान थोडकें, लयास गेलें. त्यांस यांची उपट सोसेनासीं जाहाली.[६] मग सामान सरून ठिकाणास माघारे गेले. गपीत गपीत[७] **दिलीचा** पुरा **जगांसिंगपुरा** म्हणोन होता, त्याचा सत्यानाश जाहाला. शहर लुटलें. एवंच शहराचा विनाशकाल! आसो.

५१. **सिंदे** यांणीं दोन तोफा आटक व किलेकुशाद आशा दोन तोफा काढिल्या[८]. आटकेची जोडकरीण फतेलस्करी तोफ होती, तेवढी मात्र **सिलिमगडचे** किल्यांत राहिली. आटक तोफेस साडेतीनसें बैलांच्या तीन माला वोढावयास लाविल्या, दोन हती लाविले; परंतु तोफ जागेवरून हालेना. तेव्हां येक मनुष्य शहरांतून धरून आणून तोफेवर जेब केलें. बकरीं व कोंबडीं व नारळ व लिंबें यांसी गणती नाहीं. मोठें संकटें तोफ लस्करांत आणिली. **उज्यनीस** तोफ लस्करांत लाऊन द्यावयाची विवंचना केली, तों निभावणीचें संकट. **सिंदे** याचें मानस होता कीं, "येक वेल आणखी **नागुरास बिर्जेसिंग** याजवर जाऊन तोफ लावावी." आसी उमेद[९] बहूत करून होती. तों तोफेची निभावणीची बुधी कुंठित जाहाली. तेव्हां जाटाकडील **रूपराम कटारी** समागमें होता, त्याणें आपले खंडणीपैकीं दोन लक्ष रुपये सूट मागितली आणि तोफ उज्जनीस पोंचती करावी, असा करार करार-मदार करून तोफ त्याचे जिमेस[१०] केली. त्याणें इजारा करून तोफ वाटेस लाविली. तों शेवट तोफ **उज्यनीस** पावली नाहीं. त्यांचा पुढें विनाशकाल आला, तेव्हां तोफ **चमेली**च्या खलियांत[११] येऊन **आचेरीच्या**[१२] घाटाखालीं राहिली. किलेकुशाद तोफ समागमें घेतली. **गाजुदीखान** वजीर यांचे चितांत किलाप आल्यामुळें वजीर दिलींतच राहिला. **दताजी सिंदे** यांणीं कूच केलें ते मजल दर मजल **पाणिपता**-वरून **कुरुक्षेत्रास** गेले. तेथें आठ मुकाम करून, च्यार तुलादानें करून, पुढें मजल दरमजल **शतद्रु** नदीपावेतों गेले. तों **लाहूरांतील** सुभा **संदीपबेग** याचा पुत्र व **लक्ष्मी नारायण** त्याचा दिवाण, आसे येऊन भेटले. त्यांचे यांचे विचारें **साबाजी सिंदे** व **त्रिंबक बापूजी** आसे पंधरा हजार फौजेनिसीं पुढें लाहूर, **मुलतान** व **पंजाब** व **काश्मीर आटकेपर्यंत** मुलूख जप्तीस पाठविले.[१३] आपण खांसा तेथून कूच

---

६. ही लढाई इ. स. १७५९ ता. १९ जानेवारीस झाली असें सरकार म्हणतात. (फॉल २, पृ. २०१).

७. 'ते गर्दीत' सा. प्र.

८. अटक तोफेचा गाडा मराठ्यांनीं जाळला असें सरकार म्हणतात (फॉल २, पृ. २०१); तोफा नेल्याचा उल्लेख ते करीत नाहींत.

९. 'हुटहुट' सगजो; 'हुटहुटी' तुं. प्र.

१०. 'स्वाधीन केली' सगजो.

११. 'घाटाखालीं' भाइसं. प्र.

१२. 'अटेरीच्या' तुं. प्र., सगजो; 'आचोरीचे' क. प्र.

१३. हिंगणे १, १९९; पेद. २, ११०.

करून **कुंजपुरानजीक** मुकाम केला. चितांत योजना केली कीं, " **नजीबखान** यास हस्तगत[१४] करून त्याचे हातून **भागीरथीस** पूल बांधून महत्कार्य करावें." **जनकोजी सिंदे** व **नारोशंकर** व **आंताजी माणकेश्वर** यांचे चितांत कीं, " श्रीमंतांनीं आज्ञा केली त्याप्रमाणें वर्तावें. **नजीबखान** याचें पारपत्य करावें, ठेवूं नये, " हें सर्वत्रांचें आनुमतें होतें.[१५]

५२. इकडे **गोविंदपंत बुंदेले** यांचा व **नजीबखान** यांचा स्नेह होता.[१६] त्याणें **गोविंदपंत** याजकडे सूत्र लाविलें कीं, " **गोविंदपंत दाजी**, तुमचे हातीं आम्हांस सुभेदार **मल्हारराव होळकर** देऊन गेले. प्रस्तुत राजश्री **दताजी सिंदे** यांचा शह भारी आला[१७] आहे. निभावणी होणें कठिण आहे." हें **गोविंदपंत बुंदेले**[१८] यांणीं ऐकून त्यास आभय दिलें कीं, " तुम्ही आपले जागा स्वस्त राहावें. उभयपक्षी रदबदली आम्हांकडे लागली." आसें बोलून **गोविंदपंत बुंदेले** येऊन **दताजी सिंदे** यांसी भेटले. **सिंदे** यांणीं **गोविंदपंत बुंदेले** यांस मनसोबा **भागीरथीस** पूल बांधावयाचा विच्यारिला. **गोविंदपंत** यांणीं जाबसाल केला कीं, " **पाटीलबाबा** विना **नजीबखान** यास हातीं घेतल्यासिवाय हें कार्य होत नाहीं." तों याचेहि चितांत तोच भावार्थ होता. त्यांणींहि हाच संदर्भ[१९] लाविला. ती गोष्ट यांच्या चितांत ठसली. **गोविंदपंत बुंदेले** यांसी वचन दिलें कीं, " **नजीबखान** यांस बेलाशक बोलावून घेऊन यावें. तुमचे आमचे आनुमतें कर्तव्य तेंच करूं," म्हणोन सांगितलें. मग **गोविंदपंत** यांणीं वकील **नजीबखान** याजकडे पाठविले. तों तो आगोदरच आतुर[२०] होता. च्यार हजार फौजेनिशीं **नजीबखान** रोहिला भेटावयास आला. दोन कोसांवर येऊन मुकाम केला. हें वर्तमान **दताजी सिंदे** यांस कललें व **बुंदेले** यांणीं सागितलें. [तेव्हां] त्यास आडवे जावयास सिध जाहाले. तेव्हां **जनकोजी सिंदे** व **नारो शंकर** व **आंताजी माणकेश्वर** व

---

१४. ' सामील ' सा. प्र.

१५. खुद्द नानासाहेब पेशवे यांचे नजीबखानासंबंधीं मत असें. "नजीबखान पुरा हरामखोर बाट आहे. बेमोन. त्यास वाढविणें सर्पास दूध पाजण्यासारखें आहे. त्याचें पारपत्य करावें." (काव्ये. १६७) "नजीबखान बाट, **अर्धा अबदाली**, त्याचें राजकारण न करावें." (काव्ये. १७१)

१६. गोविंदपंतांबद्दलसुद्धां बखरकारांचेंहि मत कलुषित दिसतें. गोविंदपंत नजीबाच्या प्रांतांवर हला करीत होता, (रा. खं. १, १३८–१४२; पेद २; १००, १०२) आणि उलट दत्ताजीच्या सांगण्यावरूनच बुंदेले शुक्रतालावर पूल बांधण्याबद्दल नजीबाशीं बोलाचाली करीत होता.

१७. ' सिंदे यांची बदनजर आम्हांवर दिसते. आपले हातीं मल्हारराव देऊन गेले,याची शरम आपल्यास असावी, म्हणोन बोलणें लाविलें'असा क. प्र.मधील पाठ यापुढें आहे.

१८. ' यांणीं आणि वरकड यांणीं ऐकून ' भा. प्र.

१९. ' संदर्प ' भाइसं.

२०. ' शूर ' भाइसं. 'व त्यांतून शूर' क. प्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

तों **गाजुद्दीखान** याजकडील सामान चालोन आले. तेव्हां थोडीबहूत गोलागोली जाहाली. तों वजिराचें सामान थोडकें, लयास गेलें. त्यांस यांची उपट सोसेनासीं जाहाली.[६] मग सामान सरून ठिकाणास माघारे गेले. गपीत गपीत[७] **दिलीचा** पुरा **जगतसिंगपुरा** म्हणोन होता, त्याचा सत्यानाश जाहाला. शहर लुटलें. एवंच शहराचा विनाशकाल! आसो.

५१. **सिंदे** यांणीं दोन तोफा आटक व किलेकुशाद आशा दोन तोफा काढिल्या[८]. आटकेची जोडकरीण फतेलस्करी तोफ होती, तेवढी मात्र **सिलिमगडचे** किल्यांत राहिली. आटक तोफेस साडेतीनसें बैलांच्या तीन माला वोढावयास लाविल्या, दोन हती लाविले; परंतु तोफ जागेवरून हालेना. तेव्हां येक मनुष्य शहरांतून धरून आणून तोफेवर जेब केलें. बकरीं व कोंबडीं व नारळ व लिंबें यांसी गणती नाहीं. मोठें संकटें तोफ लस्करांत आणिली. **उज्यनीस** तोफ लस्करांत लाऊन द्यावयाची विवंचना केली, तों निभावणीचें संकट. **सिंदे** याचें मानस होता कीं, "येक वेल आणखी **नागुरास बिर्जेसिंग** याजवर जाऊन तोफ लावावी." आसी उमेद[९] बहूत करून होती. तों तोफेची निभावणीची बुधी कुंठित जाहाली. तेव्हां जाटाकडील **रूपराम कटारी** समागमें होता, त्याणें आपले खंडणीपैकीं दोन लक्ष रुपये सूट मागितली आणि तोफ उज्जनीस पोंचती करावी, असा करार करार-मदार करून तोफ त्याचे जिमेस[१०] केली. त्याणें इजारा करून तोफ वाटेस लाविली. तों शेवट तोफ **उज्यनीस** पावली नाहीं. त्यांचा पुढें विनाशकाल आला, तेव्हां तोफ **चमेली**च्या खलियांत[११] येऊन **आचेरीच्या**[१२] घाटाखालीं राहिली. किलेकुशाद तोफ समागमें घेतली. **गाजुद्दीखान** वजीर यांचे चितांत किलाप आल्यामुळें वजीर दिलींतच राहिला. **दताजी सिंदे** यांणीं कूच केलें ते मजल दर मजल **पाणिपता**-वरून **कुरुक्षेत्रास** गेले. तेथें आठ मुकाम करून, च्यार तुलादानें करून, पुढें मजल दरमजल **शतद्रु** नदीपावेतों गेले. तों **लाहूरांतील** सुभा **संदीपबेग** याचा पुत्र व **लक्ष्मी नारायण** त्याचा दिवाण, आसे येऊन भेटले. त्यांचे यांचे विचारें **साबाजी सिंदे** व **त्रिंबक बापूजी** आसे पंधरा हजार फौजेनिसीं पुढें **लाहूर, मुलतान व पंजाब** व **काश्मीर आटकेपर्यंत** मुलूख जप्तीस पाठविले.[१३] आपण खांसा तेथून कूच

---

६. ही लढाई इ. स. १७५९ ता. १९ जानेवारीस झाली असें सरकार म्हणतात. (फॉल २, पृ. २०१).

७. 'ते गर्दींत' सा. प्र.

८. अटक तोफेचा गाडा मराठ्यांनीं जाळला असें सरकार म्हणतात (फॉल २, पृ. २०१); तोफा नेल्याचा उल्लेख ते करीत नाहींत.

९. 'हुटहुट' सगजो; 'हुटहुटी' तुं. प्र.

१०. 'स्वाधीन केली' सगजो.

११. 'घाटाखालीं' भाइसं. प्र.

१२. 'अटेरीच्या' तुं. प्र., सगजो; 'आचोरीचे' क. प्र.

१३. हिंगणे १, १९९; पेद. २, ११०.

करून **कुंजपुरानजीक** मुकाम केला. चितांत योजना केली कीं, " **नजीबखान** यास हस्तगत[१४] करून त्याचे हातून **भागीरथीस** पूल बांधून महत्कार्य करावें." **जनकोजी शिंदे** व **नारोशंकर** व **आंताजी माणकेश्वर** यांचे चितांत कीं, " श्रीमंतांनीं आज्ञा केली त्याप्रमाणें वर्तावें. **नजीबखान** याचें पारपत्य करावें, ठेवूं नये, " हें सर्वत्रांचें आनुमतें होतें.[१५]

५२. इकडे **गोविंदपंत बुंदेले** यांचा व **नजीबखान** यांचा स्नेह होता.[१६] त्याणें **गोविंदपंत** याजकडे सूत्र लाविलें कीं, " **गोविंदपंत दाजी**, तुमचे हातीं आम्हांस सुभेदार **मल्हारराव होळकर** देऊन गेले. प्रस्तुत राजश्री **दताजी शिंदे** यांचा शह भारी आला[१७] आहे. निभावणी होणें कठिण आहे." हें **गोविंदपंत बुंदेले**[१८] यांणीं ऐकून त्यास आभय दिलें कीं, " तुम्ही आपले जागा स्वस्त राहावें. उभयपक्षी रदबदली आम्हांकडे लागली." आसें बोलून **गोविंदपंत बुंदेले** येऊन **दताजी शिंदे** यांसी भेटले. **शिंदे** यांणीं **गोविंदपंत बुंदेले** यांस मनसोबा **भागीरथीस** पूल बांधावयाचा विचारिला. **गोविंदपंत** यांणीं जाबसाल केला कीं, " **पाटीलबाबा** विना **नजीबखान** यास हातीं घेतल्यासिवाय हें कार्य होत नाहीं." तों याचेहि चितांत तोच भावार्थ होता. त्यांणींहि हाच संदर्भ[१९] लाविला. ती गोष्ट यांच्या चितांत ठसली. **गोविंदपंत बुंदेले** यांसी वचन दिलें कीं, " **नजीबखान** यांस बेलाशक बोलावून घेऊन यावें. तुमचे आमचे आनुमतें कर्तव्य तेंच करूं," म्हणोन सांगितलें. मग **गोविंदपंत** यांणीं वकील **नजीबखान** याजकडे पाठविले. तों तो आगोदरच आतुर[२०] होता. च्यार हजार फौजेनिशीं **नजीबखान** रोहिला भेटावयास आला. दोन कोसांवर येऊन मुकाम केला. हें वर्तमान **दताजी शिंदे** यांस कललें व **बुंदेले** यांणीं सागितलें. [तेव्हां] त्यास आडवे जावयास सिध जाहाले. तेव्हां **जनकोजी शिंदे** व **नारो शंकर** व **आंताजी माणकेश्वर** व

---

१४. 'सामील' सा. प्र.

१५. खुद्द नानासाहेब पेशवे यांचे नजीबखानासंबंधीं मत असें. "नजीबखान पुरा हरामखोर बाट आहे. बेमान. त्यास वाढविणें सर्पास दूध पाजण्यासारखें आहे. त्याचें पारपत्य करावें." (काव्ये. १६७) "नजीबखान बाट, **अर्धा अबदाली**, त्याचें राजकारण न करावें." (काव्ये. १७१)

१६. गोविंदपंतांबद्दलसुद्धां बखरकाराचेंहि मत कलुषित दिसतें. गोविंदपंत नजीबाच्या प्रांतांवर हला करीत होता, (रा. खं. १, १३८–१४२; पेद २; १००, १०२) आणि उलट दत्ताजीच्या सांगण्यावरूनच बुंदेले शुक्रतालावर पूल बांधण्याबद्दल नजीबाशीं बोलाचाली करीत होता.

१७. 'शिंदे यांची बदनजर आम्हांवर दिसते. आपले हातीं मल्हारराव देऊन गेले,याची शरम आपल्यास असावी, म्हणोन बोलणें लाविलें'असा क. प्र.मधील पाठ यापुढें आहे.

१८. 'यांणीं आणि वरकड यांणीं ऐकून' भा. प्र.

१९. 'संदर्प' भाइसं.

२०. 'शूर' भाइसं. 'व त्यांतून शूर' क. प्र.

मराठी ग्रंथ संग्रालय, ठाणे. स्थळप्रत.

जानराव बांवळे[२१] व आणखी छोटे मोठे सरदार एकत्र मिळून विच्यार[२२] केला कीं, "**नजीबखान** रोहिला, जसा ससा भाणवसांत चुकोन सांपडतो तसाच हा सहज आला आहे. त्यास आजचे समई सोडूं नये." म्हणोन बोलून **दताजी सिंदे** यांजकडे गेले. त्यास हें वर्तमान बोलतांच **दताजी सिंदे** यांणीं आव्हेर* केला आणि उत्तर केलें कीं, आपले कार्याकरितां वैरी मित्र करणें प्राप्त आहे[२३]. यांत आम्ही खावंदाचे वाईट काय करितों?" म्हणोन धिकारिलें. **जनकोजी सिंदे**[२४] आपले जागां परम श्रमी जाहाले कीं, "नकटें आसावें पण धाकटें नसावें." यत्न कोणाचा न चाले. बायका-मुलेंबालेंदेखील कोणाचे चितीं **नजीबखान** यास सोडावें आसें नाहीं. आसो. कोणाचे न ऐकतां **दताजी सिंदे** आडवे जाऊन भेट घेऊन आले. ते समईची ममता आणि जिवाळा सांगावा असा आर्थ नाहीं. [एकमय चितें उभयतांचीं जाहालीं[२५].] त्यांणीं **नजीबखान** यांसी जाबसाल केला कीं, "आम्हास **भागीरथीस** पूल बांधून द्यावा. आघाडी तुम्हांस देतों. पलीकडील रुपया मिळेल त्यांत दहावी तक्षीम देऊं. तुम्ही आम्ही एका खावंदाचे चाकर येकनिष्ठ होऊन सेवा करावी," म्हणोन बोलिले. **नजीबखान** यांणें तें मान्य केलें आणि बेलभंडार इमान त्यासी दिल्हे. त्यानें आपली सानकरोटी यांस दिल्ही. केवल येकदील जाहाले. आठ-पंधरा रोज येक जागां राहिले.

५३. तिकडे **भागीरथीपार सुज्यातदौला अयोध्येंत** होता. त्याजकडे गुप्तरूपें **चेतराम**[२६] वकील यासी **नजीबखान** यांणें पाठविलें. तो बोलिला कीं, "**दताजी सिंदे** यांचा निश्चय, मोहीम तुम्हांवर आहे. आम्ही येकवेल मनसोबा केला आणि **आबदुल अलीस** घेऊन आलों. तुम्हीं चौकडून उफराळा केला नाहीं. तो मनसोबा या रीतीचा जाहाला. आम्हीच सर्वत्रांचे दोषी जाहालों आणि वाईटपणा घेतला. आतां येक वेल आपणास पुसावें याकरितां सांगून पाठविलें आहे. याचें उत्तर काय तें करावें." म्हणोन वकिलानें जाबसाल केला कीं, "**अनूपशहरकर आमदखान** लंगडा पठाण मात्र ममतेंत आहे. तुमचा निश्चय काय तो सांगावा." मग **सुज्यातदौला** यांणें उत्तर

---

२१. 'सांबले' शें. भा. क. भाइसं. प्रती.

२२. 'इत्यर्थ' भाइसं.

*'मोंगलाई' मसलतीस दत्ताजीनें विरोध केला, यांतच मराठ्यांच्या स्वभाव-धर्माचें सार आलें. याच्या उलट सरकार मात्र मराठ्यांचा मोंगलाई मसलतीचा प्रयत्न होता असें फारशी लेखांच्या आधारें खरें मानतात! (फॉल २ पृ. २०४)

२३. आपले कार्याकरितां वैरी वोळखिजे याचें....' तुं. प्र.; 'वैरी जेरीस असला तरी' कल्याण प्रत तसेंच 'आपले कार्याकरणें वैरी आसला तरी समेट करून कार्य करणें.' भाइसं.

२४. यापुढें मजकूर आहे तो असा. 'यांणीं वडिलास सुचविलें कीं, यास हातीं धरल्यास परिणाम शुद्ध लागणार नाहीं. आसें निखालस सांगितलें; याज उपरीं वडिलांचे मर्जीस येईल तें खरें. आसें सांगोन' क. प्र.

२५. कंसांतील मजकूर १८७९ व १८८६ भाइसं प्रतींत नाहीं.

२६. 'जतराम' शें. प्र. 'जयतराम' भाइसंप्र.

केलें कीं, "आपला बाप **मनसूर आली** याची वझिरी जाऊन इकडे कालक्षेप करून आहों. येथेंहि सुखरूप राहूं देत नाहींत. मरणाहून आपेश खोटें.[२७] आतां आपला कांहीं दुसरा आर्थ नाहीं. **नजीबखान** यास सांगावें कीं, मी सर्वस्व तुजला साहच्य आहे; पन्नास हजार फौज व तीनशें तोफा तुझे जिमेस करितो व पांच[२८] कोट रुपये लागले तरी चिंता नाहीं[२९]. परंतु गलिमास नदीपार होऊं देऊं नये." याप्रमाणें सानकरोटी इमानप्रमाण घेऊन वकील आला.

५४. इकडे **आबदुलआलीचें** सूत्र वरचेवर ठिकच होतें. इतक्यांत **सुज्यातदौला** याजकडून आश्रय खातरजमेचा होताच. **नजीबखान** रोहिला **दताजी** सिंदे यांचे डेरियास येऊन बोलिला कीं, "साहेब तुम्ही **गण**[२९] **मुक्तेश्वरी** जाऊन तीर्थविधी करावा. मजला आज्ञा द्यावी. मी **मिरापुरा**नजीक **मुक्ताल** आहे तेथें जाऊन **भागीरथीस** पूल बांधून ठीक करितों. तोंपावेतों येक महिन्यानें आपणहि मागाहून यावें." **नजीबखान**[३०] यानें आगोदर महिना-पंधरा दिवस राहून कलेल[३१] तसे आर्जव करून आकृत्रिम भाव दाखविला होता. याजकरितां सिंदे यांस खरेंसें भासलें. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रें बहुमान देऊन **गाजदीपुऱ्याचें**[३२] मुकामाहून रवानगी केली. ते समईं **जनकोजी सिंदे** व सर्वांनीं सांगितलें कीं, याचें पारपत्य करावें तें न केलें. आस्तु. आतां यासी जवल ठेवूनच कार्य करून घ्यावें. यांस निरोप देऊं नये." म्हणतांच **दताजी सिंदे** यांणीं जाबसाल केला कीं, "तुम्ही[३३] आवघे कर्तव्याचे मनुष्य आणि आम्हीच एक नाकर्ते.[३४] तस्मात आम्हांस कांहीं एक सुचत नाहीं. नजीबखान याचें अंतर[३५] शुध [असल्याचें] आम्हास पुर्तेपणें प्रत्ययास आलें. तेव्हां आम्ही त्यास निरोप दिल्हा." या प्रकारें उतर होतांच दुसरें कोणी[३६] न बोलतां सर्वत्रांनीं कल्पना केली कीं, "मुंगीस पक्ष फुटतात तसी गत जाहाली." उपाय नाहीं; म्हणोन आपले जागां स्तब्ध[३७] राहिले.

---

२७. 'कठीण' भाइसं.; 'वोखटें' सा. प्र.

२८. 'पांच कोट रुपये खर्च लागला तरी इतका खर्च पुरवितों' सा. प्र.

२९. 'ऋणमुक्तेश्वरी' भाइसं. प्र. गडमुक्तेश्वरीं' १८७९ व १८८६ प्र.

३०. या शब्दापुढें क. प्र. पाठ असा– 'कपटवेश करून, माया दाखवून, केवळ जीवप्राणतुल्य भासवून, अकृत्रिमपणा दाखविला.'

३१. 'केवळ आर्जव करून' सा भाइसं. प्र.

३२. 'गाजदीपूरचे मुकामीं हुजूर रवानगी केली.' सगजो.

३३. "तुम्ही सर्वत्र शहाणे, आम्ही केवळ मूर्ख; मला कांहींच ज्ञान नाहीं" सां. प्र.

३४. 'नाकाबील' सा. प्र.

३५. 'याचा आंतर शोध आम्हांस' भाइसं. प्र.

३६. 'दुसरें कोण बोलतो' सा. प्र.

३७. 'अजुर्दे होऊन' क. प्र.

५५. [त्यानंतर] **नजीबखान** यानें कूच करून **शुक्रताला**स गेला. **शुक्रताल** म्हणावयास कारण कीं, **शुक्राचार्य** स्वामीनी **परिक्षीती** राज्यास भागवत श्रवण करविलें होतें. तें [हें]स्थल आणि तें स्थलीं **परिक्षिती** राज्यास शापानलें **तक्षक** दौंश होऊन भस्म[३८] जाहाला. त्या स्थलीं जाऊन राहिले तें स्थल परम गूढ, **भागीरथी** उतर-वाहिनी येऊन पालखीचे दांडीसारखें नदीचें वलण येऊन दक्षणावाहिनी गेली. ते स्थलीं **नजीबखान** यानें लस्करचा मुकाम केला होता. आलीकडील तोंडीं खळचा[३९] भारी, दोन डोंगरगण्यासारिख्या[४०], भारी, जावयास सुदामत वाट नाहीं, कोठें कोठें सुमार्ग चांगले सुगम होते तेथें खंदक खणूं लागला त्यावरी तोफा व वरकड रिसाले ठेऊन बंदोबस्त ठेवन केवल दुर्ग आसाध्य केलें. तों इकडे **दताजी सिंदे भागीरथीस गणमुक्तेश्वरीं** येऊन तीर्थविधी केला. आधींच **सिंदे** दानशूर व रणशूर होते त्यांत आलभ्यलाभ **श्रीभागीरथी** प्राप्त जाहाली. मग ज्यास जसे ईश्वरें आनकूल दिल्हे तसे दानधर्म केलें. ये अर्थी दोहरा[४१] आहे—

जलकी शोभा कमल है, दलकी शोभा पील ।
धनकी शोभा धरम है, कुलकी शोभा शील ॥

[असो.] तों **नजीबखान** याजकडील पत्राची मार्गप्रतीक्षा करीत होते. तों आकस्मात **नजीबखान** याजकडील हालकारे यांणीं पत्रें दिल्हीं. खुशाली जाहाली. नंतर येकांतीं जाऊन[४२] पारशी पत्रें मुनसीकडून वाचून पाहिलीं. त्यांतील अनवय ध्यानांत आणून पाहिला. तो **नजीबखान** यानें पत्रें लिहिलीं कीं, "तूर्त वरसातकाल, नदीस पाणी भारी, तूर्त पूल सिध होत नाहीं. तुम्ही या समईं कोणीकडे तरी मोहीमेस जावें. बाजत बरसात देख लेऊं." याप्रमाणें उत्तर आलें. तरी यासीं कृत्रिमभाव उमजला नाहीं. जाबसाल दिल्हा कीं, "तूर्त राहिले तर राहूं द्यावें; तुम्ही फौजेसुधा यावें." म्हणोन **नजीबखान** यास पत्रें लिहिलीं. रोहिल्यानें साफ उतर केलें कीं, "आपणास यावयास आनुकूल पडत नाहीं. तुम्ही देखिली बुधी करावी."

५६. आसें साफ उत्तर देतांच **दताजी सिंदे** यांची मर्जी केवल दिक जाहाली, लहान थोर यांणीं व भाववंदांनीं व खाववंदानीं सांगितलें तें न केलें. **मल्हारराव** यांचे मनसोव्यावरून सर्वत्राचा आव्हेर केला त्याचा फलादेश या प्रकारचा जाहाला. **नजीबखान** यानें मात्रागमन केलें. म्हणून [दताजी सिंदे] केवल दिक[४३] होऊन

---

३८. 'निधा (ध) न पावला' क. प्र. शुकाशीं संबंध असतां शुकाचें शुक्र होऊन 'शुक्र' ताल झालें.

३९. 'खडचा' शें. प्र.

४०. 'डोंगरगण्यासारिख्या' भाइसं प्र.; 'डभोरगणें' सगजो.

४१. हा दोहरा सगजो, मंडळ, भाइसं प्रतींत नाहीं.

४२. 'जाऊन' च्या पुढें "पारसनीस" पारसी कागद वाचणार समागमें होतांच त्यास बोलावून कागद त्याजकडन वाचून पाहिले. असा क. प्र. पाठ.

४३. 'दंग' सा. व भाइसं, प्र.

एक दोन दिवस आनं–पाणी देखील वर्ज केलें. मग **जनकोजी सिंदे** यांणीं हिमतीची मसलत[४४] दिल्ही कीं, आधींच लाहानथोराचें आईकिलें नाहीं. आतां 'हिंमत मर्दा मदत खुदा' मार्तां मार्तां मरावें. **नजीबखान** म्हणजे कोण जिनस[४५]? चढते घोडयानिसीं उडऊन टाकूं.[४६]" [जनकोजीनें असें] म्हणतांच **दताजी सिंदे** यांसहि आवेश आला. तेच क्षणीं नगारा करून कूच करून मजल दर मजल **भागीरथीतीरीं हस्तनापुरीवर** मुकाम केला. तेथून **दिली इंद्रप्रस्त** कचे चालीस कोस. **हस्तनापुरीं** कांहीं वस्ती नाहीं. साक्षा मात्र जुनी पांढरवस्ती; उगीच दिसती मात्र आहे. तिथें टेकाडें मात्र आहे. तेथें तीर्थाचा कूप व वटवृक्ष मात्र आहेत. साक्षा मात्र सांगतात कीं, या स्थलीं हस्तनापूर होतें. तेथें मागती रोहिल्यांकडील वकील **चेतराम** येऊन भेटला. वटवृक्षाखालीं येकांतास[४७] बसल्यावर त्याणें जाबसाल केला कीं, "प्रस्तुत तुम्ही आलियानें काम कारागर[४८] होत नाहीं; आतां माघारें जावें." [असें] म्हणतांच **दताजी सिंदे** यांणीं उत्तर केलें कीं, **सुज्यातदौला** व तुम्हीं मिलोन क्रोड रुपये खंडणी देणें. म्हणजे माघारें जातों." म्हणतांच वकिलानें उतर केलें कीं. "**कौरवपांडव** यांचा घरकलह लागला ते समईं भगवान **श्रीकृष्ण** परमात्मा याणें आपले आंगें येऊन याच वटवृक्षाखालीं सिष्टाई केली. ते समईं **दुर्योधन** याणें उतर केलें कीं, "सुईचे आग्रावरील मृतिका प्राप्त व्हावयाची[४९] नाहीं. तेथें **इंद्रप्रस्त** कैचें व वरुणवंत कैचें? साक्षात् भगवान याची सिष्टाई याच जागीं सिधीस गेली नाहीं तेथें तुमचा मनसोबा काय सिधीस जातो? पुरवेल तरी कूच करून जावें नाहीं तरी युध्धास आपण सिधच आहों." या प्रकारें त्याचें निष्ठुर उतर होतांच वकील यांस वेडेंवांकडें बोलून पिटून लाविलें. आपण कूच करून शके १६८१ भाद्रपद[५०] शुा १० शुक्रवारी **शुक्रतालास** जाऊन पोहोंचले. चढते घोडयानिसीं चालोन जावें अशी हिंमत धरून गेले. ते वेलेस पाहतात तों जाग केवल आसाध्य. कोसपर्यंत उभे राहूं देईनात. खळयांचा[५१] आश्रय करून तोफांचा

---

४४. 'हिंमत दिल्ही आणि मसलत सांगितली कीं' शें. प्र.

४५. 'नजीबखान याचा केवा काय?" क. प्र.

४६. 'घोडयाच्या पायाच्या ठोकरीखालीं उडवून देऊं' सां. व क. प्रती.

४७. 'सांवलीस' सगजो. व सा.प्रती.

४८. 'कामगारी होत नाहीं' भाइसं. प्रत.

४९. 'होणार' भाइसं. प्र.

५०. 'वैशाख शु।। १० स' असाहि पाठ कांहीं प्रतींत आहे भाद्रपद शुा १० मीस (ता. २ सप्टेंबर १७५९) मोडक जंत्रीप्रमाणें शुक्रवार येत नाहीं. जुन्या शक १६८१ च्या पंचांगांत श्रावण शुा १० मीस शुक्रवार येतो. जदुनाथांच्या मतें ही तारीख १५ सप्टेंबर १७५९ आहे. पण फॉल. च्या पृ. २०८ च्या टीपेंत दिल्ली बखर १–९–१७५९ अशी तारीख देते. तो तारीख बखरीच्या तारखेशीं बरीच जुळती आहे.

५१. 'खडपाचा' भाइसं. प्र.; 'खडयाचा' शें. क. मं. प्र.

व बाणांचा मार देऊं लागले. च्यार घटिका उभे राहून सायंकालीं तेथून कोसभर मार्गें सरून; **मिरापुराकडे**[५२] **शुक्रतालापासून** दोन कोस, जेथें **परिक्षिती** राज्यास रुषीचा श्राप जाहाला म्हणोन[५३] धनवंती यास समजल्यावरून उठवावयास जात होता तों मार्गीं **तक्षक नागराज** यार्णे ब्राह्मणाचा वेश धरून धनवंतरी याचा पराक्रम पाहून, धनवंतरी यास अमोल्य[५४] द्रव्यें देऊन माघारा फिरविला, तें स्थलीं साक्षी कूप म्हणजे आड आहे; तेथें **सिदे** याचे डेरे जाहाले. तमाम **आंतरवेद** प्रांतीं रोहिल्याचीं ठाणीं होतीं तीं घेतलीं. **मिरापुराचे सैंदहि**[५५] येऊन भेटले. पूर्वी **दक्षिणेसहि सैंद** आला [होता] तो त्या **मिरापूरचा**. तेथें **सिदे** राहून प्रातःकालीं नगारा करून, फौज सिध करून चालोन गेले. [त्यांजकडून तोफांचा व बाणांचा मार होऊं लागला. यांणीं मनसोबा त्यांजवर तोफा चालू कराव्या असा केला.[५६]] घ्यावें. [व] दुरोन तोफा लावाव्या. तों इकडील तोफा लावीत तो गोला कारागर होईना. खालीं तोफा लागू केल्या तों खल्यांत[५७] गोला पडूं लागला. वरती तोफ लाविली तों **शुक्रतालावरून** गोला पार **भागीरथींत** पडे. आसी गत जाहाली. त्यांजकडील तोफांच्या व बाणांच्या मारानें दाहा पांच घोडीं व मनुष्यें ठार पडलीं. आसा प्रकार जाहाला. या प्रकारें नित्यानित्य भाद्रपदमासपर्यंत गोलागोली होत गेली. **नजीबखान** यार्णे **भागीरथीस** पूल बांधून **कुतुबशाहा** गुरू दाहा हजार फौज व बुणगे नदी पार राहिले होते, वीस हजार फौज व तोफा **नजीबखान** याजवल ते स्थलीं होत्या. त्यांजला रस्ता नदीवरून होऊन नदीपलीकडून रसद पुलावरून रोहिले यांस पोचत[५८] होती. गहूं, तांदूल कमोदी, तीस बत्तीस शेर पके याप्रमाणें

---

५२. 'मिरापुरापुढें' सगजो.; 'मिरापुरास' भाइसं. प्र.

५३. 'म्हणोन' पुढें कल्याण प्रतीचा पाठ असा आहे.—"धनवंतरी यास समजल्यावरून आला कीं श्रापयोगे करून राजा मृत्यु पावेल. त्यास लक्षावधि मरावे परंतु लक्षावधींचा पाळणवाला न मरावा, असें समजोन आला, कीं याचा मृत्यू टाळावा. तेव्हां ऋषीचा पुत्र सानिध्य होता. धनवंतरी यास ऋषीचे पुत्रानें पृच्छा केली कीं, तुम्हीं कोठील कोण? तेव्हां धनवंतरी यानें उतर केलें कीं, राजास ऋषीनें श्राप दिला तेणेंकरून राजा मृत्यु पावेल; त्यास निधान पावो देऊं नये म्हणोन आलों. त्याजवरून ऋषिपुत्रानें त्यास पृच्छा केली कीं पाहूं तुझा पराक्रम. मृ यू पावला यांस तूं कसा उठवितोस? म्हणोन एक वृक्ष सांनिध्य होता, त्यास ऋषिपुत्रानें तो वृक्ष शापून दग्ध केला. धनवंतरी यार्णे मत्रसामर्थेंकरून वक्ष जसा होता तसाच केला. तेव्हां ऋषिपुत्रास समजलें कीं, राजास निधान पावों देणार नाहीं. ही खातरजमा होऊन त्याजला अपरिमित द्रव्य देऊन वाटेस लाविला. ते स्थलीं साक्षीस कूप आहे. कूप म्हणजे विहीर' इत्यादि.

५४. 'अमूप' सा. प्र.

५५. 'सय्यदबंधूपैकीं.'

५६. हा कंसांतील मजकूर १८७९ व १८८६ व भाइसं. प्रतींत नाहीं.

५७. 'खड्यांत' शें. प्र.

५८. 'चालत' भाइसं. प्र.

सवंगाई होती. गलिमाचे लस्करांत आठ शेर नऊ शेर धारण व वैरण रुपयास साहा[५९] पुलें. याजमुलें घोडीं व उंटें अस्तिचर्म जाहाली; हाती उठवणीस आले.[६०] याप्रमाणें भाद्रपदमासपर्यंत जाहाले.

५७. तों एके दिवसीं फौज सिध होऊन, फौजेंत **जनकोजी सिंदे** येऊन, **जानराव बांवळे** व **नारो शंकर** व **जिवाजी भोईटे** व **दिलीची** कुमक व **नागरमल** व **बहादरखान बलोच** असे प्रथक[६१] दुसरेकडे ढांसण[६२] धरून गोलागोली करीत होते, त्या फौजेंत **दताजी सिंदे** गेले. तेव्हां त्या लोकांस अधिक हिंमत चढून पुढें खळ्यांकडे मार देत चालिले. तों **नजीबखान** रोहिला यांजकडून फौज सिध होऊन खळ्या[६३] सोडून आलीकडे आले. त्याजवर **दताजी सिंदे** यांचें व त्यांचें झुंजास तोंड लागलें. तों **जनकोजी सिंदे** यांचे बाजूस रोहिलियांचें सामान होतें, तेहि खळ्याबाहेर[६४] निघाले. तों त्यांची तोफांची व बाणांची वगैरे यंत्रांचा भडिमार **दताजी सिंदे** याजवर होऊं लागला. परंतु वाट[६५] चालेना. रोहिलियांचीं आग भारी. आणि ही गोडी फौज, घोडींहि उठवणीस आलेलीं, या रीतीचें वर्तमान होतांच सांडणीस्वार **जनकोजी सिंदे** यांजकडे आला. त्यांणीं सुचविलें कीं, "**पाटीलसाहेब** यांणीं घोडे घातले. मारामार जाहाली." हें वर्तमान **जनकोजी सिंदे** यांणीं ऐकोन नगारा केला. उभयतां चुलते पुतणे यांची हिंमत सारखीच आणि येकमेकांचे आंचहि[६६] बालगुण होते. मग घोडयास तंगवार करून खांसा **जनकोजी सिंदे** 'हर हर' शब्द करून उठले. तोफांचे माऱ्यांत आले, तोहि मार खाऊन बाणांच्या व हस्तनालांच्या व सुतरनालांच्या व जेजाल्यांचा मार खाऊन बेलाशक रोहिल्यांत मिसळले. मोठा धडाका[६७] जाहाला. क्षणभर तरवारीची टिपरघाई जाहाली. तों हें वर्तमान **दताजी सिंदे** यांणीं ऐकोन दांतनिकर्षास[६८] येऊन तिकडून घोडीं घातलीं. त्यांणींहि मिसळून मारामार[६९] केली. दोहीकडून मार सोसून रोहिले यांचें सामान निघोन खंदकापार जाहालें. यांचें फौजेचें ढांसण खंदकास लागलें.[७०] तों पुढें मार्गहि नाहीं आणि त्यांकडील

---

५९. 'दाहा पुलें' शें. प्र.

६०. 'घोडीं व उंटें उठवणीस येऊन अस्थिचर्म जाहालीं' सा. प्र.

६१, 'प्रत्येक' सा. व भाइसं. प्र.; 'प्रत्यक्ष' मं. प्र.

६२. 'ठांसून' भाइसं. प्र.; 'ढासण' सा. प्र.

६३, 'खंडणीकडे' शें. व भाइसं. प्रती; 'खडीकडे' मं. प्र.

६४. 'खड्याबाहेर' मं. व शें. प्रती; 'खंडण्याबाहेर' भाइसं. प्र.

६५. 'धांव होईना' सगजो.

६६. 'अचपल गुण' सा. व सगजो. प्र.

६७. 'कडाका' सगजो. 'कडाखा' सा. प्र.

६८. 'दांतनिकसीस' सा. प्र.

६९. 'त्यांनींहि मिसळ होऊन घाव केला' सा. प्र.

७०. याच्या पुढें 'पाहून चडावडीनें खंदकास गेलें' असा भाइसं. प्र.त पाठ आहे.

आगीनें केवल भाजून काढिलें. **दताजी सिंदे** यांजखालील घोडी खंदकाच्या तोंडावर ठार पडली. **पाटील** पायउतारा खंदकाचे तोंडीं उभे राहिले. हातांत तरवार होती. मोठ्या हिंमतीचा पुरुष. त्याजवर घाव तरवारेचा करावयास हात पोंचेना. मग हातांत तरवार होती ती झुगारून[७१] मारिली. पलीकडे रोहिला ठार पडला. इकडे **जनकोजी सिंदे** यांणीं मार खाऊन खंदकास तटून[७२] उभे राहिले. ते समईं **जनकोजी सिंदे** यांची उमर वीस वर्षांची होती,[७३] परंतु मर्दुमी,[७४] मसलत[७५] भारी. **जनकोजी सिंदे** यांचे खालील खांसा घोडी ठार पडली; व **जनकोजी** यास मनगटावर तरवारीची जखम लागली व भालेची जखम कानपटीस लागली, परंतु हालकी होती. तसेंच **दताजी सिंदे** यास भाल्याची जखम व गोळीची मानेस कातरती गेली. ते समईं भले लोकांनीं दोघेहि सरदार बलें वोढून काढिले. **सिंदे** यांजकडील मनुष्यें खांसे साडे सातसें ठार पडलें. केवल धारच खचली. बारासें घोडीं ठार पडले. दोन हजार[७६] घोडें मनुष्यें जखमी घायाळ जाहालीं. **सिंदे** यांजकडील सरदार **जिवाजी सिंदे** म्हणोन बरा मातबर मनुष्य, तीन हजार पागा त्याचे जिमेस होती, तो ठार पडला. त्याचा पुत्र **हणमन्तराव सिंदे** तेहि कामास आले. दोन अडीचसें मुडदे खंदकापासी राहिले, काढावयास फावलें नाहीं. फौज माघारीं सरून गोटांत आली. लष्करांत जिकडे तिकडे प्रलय जाहाला. ते समईं कितेक लोकांचे लौकिक जाहाला. कितेकांनीं स्थित[७७] होती ती आबरू गमावली. आठ पंधरा दिवस जखमा बऱ्या व्हावयास लागल्या. परंतु **नजीबखान** यांस कांहीं चैन पडों दिलें नाहीं. नित्य गोलागोली होतच होती.* तों दसरा§ जवल आला.

५८. मग **नजीबखान** याणें आपला भाऊ **खंदारास** आगोदर पाठवून **आबदुल आलीस** सिध केलेंच होतें. इकडे **सुज्यातदोला** हास्तगत होताच. तैसाच **आमदखान लंगडा** पठाणहि त्याचे मेळणींत[७८] होताच. तसाच **माधवसिंग जयनगरकर व बिजयसिंग मारवाडी**. आगदीं हिंदुस्थान भारून टाकिलें होतें[७९]. हें आगदींच **दताजी सिंदे** यास माहीत[८०] नाहीं. [असा काट नजीबखान यानें

---

७१. 'झिडकारून' सा. प्र.
७२. 'थेटून' सा. प्र.
७३. 'लहान वय होत्साता, मोठें धैर्यवान, मर्दुमकी मोठी, ते समईं त्यांचाहि घोडा पडला' क. प्र.
७४. 'हिंमत' सा. प्र.;
७५. 'मतलब' शें. प्र.
७६. 'दोन अडीचशें' भाइसं. प्र. व क. प्र.
७७. 'रुदित' सगजो.

* दत्ताजी शुक्रतालास. पेद. २९,५६
§ १ ऑक्टोबर १७५९.

७८. 'मलईंत' मं. प्र. 'मळींत' भाइसं. प्र.

७९. 'हिंदुस्थानांत जाळें घालून त्याची दोरी रोहिल्यानें आपले हातीं धरली होती' असा सां. प्र. पाठ.

८०. 'दृश्य नव्हतें' सा. प्र. 'ठाऊक नव्हतें' मं. प्र.

केला.][८१] **खंदारचा** पातशाहा **आबदुल आली** चालीस हजार फौजेनिसीं आटक उतरून लाहूर प्रांतीं आला. तों त्या प्रांतीं **साबाजी सिंदे** होते. त्यांणीं येक मोठें आरिष्ट केलें. **कमाऊचे**[८२] पहाडानजीक ज्वालामुखी म्हणून महाजाग्रीत स्थान शक्तीचें पीठ होतें. तें महाक्षेत्र. तेथील ब्राह्मण केवल आवघे **हिंदुस्थान** प्रांतीं प्रतिसूर्य होते. त्या क्षेत्रांत जाऊन **साबाजी सिंदे** यांणीं त्याचा विध्वंस केला. तेव्हां तेथील ब्राह्मणांनीं शक्तीपुढें सहस्र चंडीचा होम केला. प्रथम आहोती **दताजी सिंदे** यांचे नावें टाकिली. पूर्णाहूती **नानासाहेब** याचे नांवें दिल्ही. पुढील भवितव्य तैसेंच होणार. आसो. **साबाजी सिंदे** यांणीं दुराणीस तोंड न देतां[८३] निघोन आले. **पंज्याब मुलतान** प्रांतीं **त्रिंबक बापूजीचें**[८४] पथक होतें. सात[८५] हजार फौज होती. ते केवल कुबेर जाहाली होती. **पंज्याब** मुलूख केवल गरीब, निशस्त्री.[८६] त्या रानांत जे चाकर मनुष्य [होते] त्यांणीं मात्र हत्यार धरावें.[८७] वरकड कोणीं न धरावें. या प्रकारें तो मुलूख गरीब. पांच रावतांनीं गांवांत जाऊन चावडीस बसावें आणि गांवांतील मालमत्ता[८८] ज्याची त्याजकडून आणवावी. शेवटीं त्याचेच डोईवर देऊन लष्करापावतों येऊन पोंचवावें. ऐशा सुखांत होते. केवल गरीब खासदार यांजपासीं हजार पांचसें रुपयांची मालमत्ता[८९] बालगून होते. गिलज्याचे कवेंत[८९] सांपडले. निघों पावले नाहींत. **साबाजी सिंदे** मात्र निघाले होते.

५९. इकडे दसरा[९०] जाहाल्यावर **दताजी सिंदे** यांणीं लहान थोर सरदार मिलऊन मनसोबा केला कीं, " च्यार महिने या स्थलीं मोहीम केली परंतु **नजीबखान** रोहिला जेरीस येईना. दिवसोंदिवस शेणामेणाचे [होते ते] लोखंडाचे होत चालिले. त्यास यत्न कोणता काय करावा ? आतां येक मात्र तजवीज करावी. हर इलाज **भागीरथीपार** फौज घालवावी. म्हणजे पलीकडे रोहिल्याचे बुणगे व खजीना आहे, तो लुटून टाकावा. आणि नदीस पूल बांधला आहे तो तोडून टाकावा. आणि फौज पलीकडे ठेवावी. म्हणजे सहजच वैरी अप्रयास जेरीस येईल." ते समईं कितेक लोकांनीं दिकत घेतली कीं पलीकडे **सुज्यातदौला** पन्नास हजार फौजेनसीं असतां हें कसें घडेल ?" **दत्ताजी सिंदे** बोलिले कीं, " **सुज्यायतदौला** याचा व आमचा स्नेह भारी. पूर्वी **मनसूर आली** याचे कामास आमचे बाप

८१. १८७९ व १८८६ प्रतींत नाहीं.
८२. ' लाहूरचे ' भाइ सं.प्र. व क.प्र.
८३. नाहीं, दुराणीशीं लढन पराभूत होऊन आले. रा. खं. १, १४१ व १४२.
८४. हा ' अत्रे ' असावा.
८५. ' दहा हजार ' सा. प्र. ' सातआठ ' क. प्र.
८६. ' निशक्ती ' शें. प्र.
८७. ' बांधावें ' सा. व सगजो. प्र.
८८. ' मालियत ' सा. प्र.; शें. प्र
८९. ' काव्यांत ' भाइसं. प्र.
९०. दसरा, १ ऑक्टोबर १७५९लां होता. एकूण शुक्रतालाची मोहीम पावसाळ्याचे चार महिने चालली.

आगीनें केवल भाजून काढिलें. **दताजी सिंदे** यांजखालील घोडी खंदकाच्या तोंडावर ठार पडली. **पाटील** पायउतारा खंदकाचे तोंडीं उभे राहिले. हातांत तरवार होती. मोठ्या हिमतीचा पुरुष. त्याजवर घाव तरवारेचा करावयास हात पोंचेना. मग हातांत तरवार होती ती झुगारून[७१] मारिली. पलीकडे रोहिला ठार पडला. इकडे **जनकोजी सिंदे** यांणीं मार खाऊन खंदकास तटून[७२] उभे राहिले. ते समईं **जनकोजी सिंदे** यांची उमर वीस वर्षांची होती,[७३] परंतु मर्दुमी,[७४] मसलत[७५] भारी. **जनकोजी सिंदे** यांचे खालील खांसा घोडी ठार पडली; व **जनकोजी** यास मनगटावर तरवारीची जखम लागली व भालेची जखम कानपटीस लागली, परंतु हालकी होती. तसेंच **दताजी सिंदे** यास भाल्याची जखम व गोळीची मानेस कातरती गेली. ते समईं भले लोकांनीं दोघेहि सरदार बलें वोढून काढिले. **सिंदे** यांजकडील मनुष्यें खांसे साडे सातसें ठार पडलें. केवल धारच खचली. बारासें घोडीं ठार पडले. दोन हजार[७६] घोडें मनुष्यें जखमी घायाळ जाहालीं. **सिंदे** यांजकडील सरदार **जिवाजी सिंदे** म्हणोन बरा मातबर मनुष्य, तीन हजार पागा त्याचे जिमेस होती, तो ठार पडला. त्याचा पुत्र **हणमन्तराव सिंदे** तेहि कामास आले. दोन अडीचसें मुडदे खंदकापासी राहिले, काढावयास फावलें नाहीं. फौज माघारीं सरून गोटांत आली. लष्करांत जिकडे तिकडे प्रलय जाहाला. ते समईं कितेक लोकांचे लौकिक जाहाला. कितेकांनीं स्थित[७७] होती ती आबरू गमावली. आठ पंधरा दिवस जखमा बऱ्या व्हावयास लागल्या. परंतु **नजीबखान** यांस कांहीं चैन पडों दिलें नाहीं. नित्य गोलागोली होतच होती.* तों दसरा§ जवल आला.

५८. मग **नजीबखान** याणें आपला भाऊ **खंदारास** आगोदर पाठवून **आबदुल आलीस** सिध केलेंच होतें. इकडे **सुज्यातदोला** हास्तगत होताच. तैसाच **आमदखान लंगडा** पठाणहि त्याचे मेळणींत[७८] होताच. तसाच **माधवसिंग जयनगरकर व बिजयसिंग मारवाडी**. आगदीं हिंदुस्थान भारून टाकिलें होतें[७९]. हें आगदींच **दताजी सिंदे** यास माहीत[८०] नाहीं. [असा काट नजीबखान यानें

७१. 'झिडकारून' सा. प्र.
७२. 'थेटून' सा. प्र.
७३. 'लहान वय होत्साता, मोठें धैर्यवान, मर्दुमकी मोठी, ते समईं त्यांचाहि घोडा पडला' क. प्र.
७४. 'हिंमत' सा. प्र.;
७५. 'मतलब' शें. प्र.
७६. 'दोन अडीचशें' भाइसं. प्र. व क. प्र.
७७. 'रुदित' सगजो.

* दत्ताजी शुक्रतालास. पेद. २९,५६
§ १ ऑक्टोबर १७५९.

७८. 'मलईत' मं. प्र. 'मळींत' भाइसं. प्र.
७९. 'हिंदुस्थानांत जाळें घालून त्याची दोरी रोहिल्यानें आपले हातीं धरली होती' असा सां. प्र. पाठ.
८०. 'दृश्य नव्हतें' सा. प्र. 'ठाऊक नव्हतें' मं. प्र.

केला.][८१] **खंदारचा** पातशाहा **आबदुल आली** चालीस हजार फौजेनिसीं आटक उतरून लाहूर प्रांतीं आला. तों त्या प्रांतीं **साबाजी सिंदे** होते. त्यांणीं येक मोठें आरिष्ट केलें. **कमाऊचे**[८२] पहाडानजीक ज्वालामुखी म्हणून महाजाग्रीत स्थान शक्तीचें पीठ होतें. तें महाक्षेत्र. तेथील ब्राह्मण केवल आवघे **हिंदुस्थान** प्रांतीं प्रतिसूर्य होते. त्या क्षेत्रांत जाऊन **साबाजी सिंदे** यांणीं त्याचा विध्वंस केला. तेव्हां तेथील ब्राह्मणांनीं शक्तीपुढें सहस्र चंडीचा होम केला. प्रथम आहोती **दताजी सिंदे** यांचे नावें टाकिली. पूर्णाहूती **नानासाहेब** याचे नावें दिल्ही. पुढील भवितव्य तैसेंच होणार. आसो. **साबाजी सिंदे** यांणीं दुराणीस तोंड न देतां[८३] निघोन आले. **पंज्याब मुलतान** प्रांतीं **त्रिंबक बापूजीचें**[८४] पथक होतें. सात[८५] हजार फौज होती. ते केवल कुबेर जाहाली होती. **पंज्याब** मुलूख केवल गरीब, निशस्त्री.[८६] त्या रानांत जे चाकर मनुष्य [होते] त्यांणीं मात्र हत्यार धरावें.[८७] वरकड कोणीं न धरावें. या प्रकारें तो मुलूख गरीब. पांच रावतांनीं गांवांत जाऊन चावडीस बसावें आणि गांवांतील मालमत्ता[८८] ज्याची त्याजकडून आणवावी. शेवटीं त्याचेच डोईवर देऊन लष्करापावतों येऊन पोंचवावें. ऐशा सुखांत होते. केवल गरीब खासदार यांजपासीं हजार पांचसें रुपयांची मालमत्ता[८९] बालगून होते. गिलज्याचे कवेंत[९०] सांपडले. निघों पावले नाहींत. **साबाजी सिंदे** मात्र निघाले होते.

५९. इकडे दसरा[९०] जाहाल्यावर **दताजी सिंदे** यांणीं लहान थोर सरदार मिलऊन मनसोबा केला कीं, " च्यार महिने या स्थलीं मोहीम केली परंतु **नजीबखान** रोहिला जेरीस येईना. दिवसोंदिवस शेणामेणाचे [होते ते] लोखंडाचे होत चालिले. त्यास यत्न कोणता काय करावा ? आतां येक मात्र तजवीज करावी. हर इलाज **भागीरथीपार** फौज घालवावी. म्हणजे पलीकडे रोहिल्याचे बुणगे व खजीना आहे, तो लुटून टाकावा. आणि नदीस पूल बांधला आहे तो तोडून टाकावा. आणि फौज पलीकडे ठेवावी. म्हणजे सहजच वैरी अप्रयास जेरीस येईल." ते समईं कितेक लोकांनीं दिकत घेतली कीं पलीकडे **मुज्यातदौला** पन्नास हजार फौजेनसीं असतां हें कसें घडेल ?" **दत्ताजी सिंदे** बोलिले कीं, " **मुज्यायतदौला** याचा व आमचा स्नेह भारी. पूर्वी **मनसूर आली** याचे कामास आमचे बाप

८१. १८७९ व १८८६ प्रतींत नाहीं.
८२. ' लाहूरचे ' भाइ सं.प्र. व क.प्र.
८३. नाहीं, दुराणीशीं लढन पराभूत होऊन आले. रा. खं. १, १४१ व १४२.
८४. हा ' अत्रे ' असावा.
८५. ' दहा हजार ' सा. प्र. ' सातआठ ' क. प्र.
८६. ' निशक्ती ' शें. प्र.
८७. ' बांधावें ' सा. व सगजो. प्र.
८८. ' मालियत ' सा. प्र.; शें. प्र
८९. ' काव्यांत ' भाइसं. प्र.
९०. दसरा, १ ऑक्टोबर १७५९ला होता. एकूण शुक्रतालाची मोहीम पावसाळ्याचे चार महिने चालली.

राणोजी सिंदे बहूत प्रकारे आले[९१] होते. प्रस्तुतहि त्याजकडील वकील आम्हापासीं आहेत. त्याचे बोलणियांत व स्नेहांत अंतर दिसत नाहीं." म्हणून बोलिले. परंतु 'मोंगलाई मसलत' आसी यास उमजलें नाहीं. एक सुज्यातदौला याचे बलावर तर नजीबखान यांणें हिंमत बांधिली. आसें आसतां यांस कालगतीमुळें झांपड पडली. " जैसी देवाची उजरी तैसी बुधी उपज शरीरीं," असा प्रकार घडला. आसो.

६०. [दत्ताजी सिंदे] "नदी उतरावयासी यत्न पाहावा" म्हणोन बोलिले. तो नजीक मिरापूर होते तेथील सिंदी सैंद हे नजीबखान याचे द्रोही होते. त्यांस बोलाऊन नदी उतरावयाचा[९२] विचार पुसला. ते समई सैंद यांणीं सांगितलें कीं, " हरिद्वाराजवल जैता गुजर म्हणोन गिराशा भारी आहे. त्यास मात्र चोर वाट विदित आहे. त्याजसिवाय दुसऱ्यास ठाऊक नाहीं." मग हर इलाज करून जैता गुजर यास आणून, त्यास बहुमान करून, हती, चौघडा, जडजवाहीर, जडावाची कंठी दिल्ही. त्यास पांच लक्षांचा मुलूख द्यावा असा करार केला. तेव्हां त्याणें " वाट दाखवितों" म्हणोन मान्य केलें. मग यांणीं आपले फौजेची चौकसी करून निवड करून गोविंदपंत बुंदेले व अन्ताजी माणकेश्वर यांचा पुत्र तात्या व जिवाजी भोईटे व तुकोजी होळकर, आसे वीस हजार फौजेनिसीं निवोन जैता गुजर या समागमें दिल्ही. कार्तिक शुद्ध[९३] प्रतिपदेस हरिद्वारास जाऊन पोहोंचले. तेथें खलाल भागीरथीस होता. नाभी परयंत पाणी होतें. दाहा हात निभावलें म्हणजे पार पडलें. नाहीं तर चार हात गेलें म्हणजे डोहांत पडलियावर समुद्रांत गेल्याची गत ! मग यत्नच नाहीं. ऐशा संकटांतून फौज भागीरथीस पार गेली. हें वर्तमान दत्ताजी सिंदे यांणीं ऐकोन परम खुशाली केली. तोफाहि जाहाल्या.

६१. हें वर्तमान नजीबखान रोहिले यांणीं येकतांच तेच क्षणीं कुतुबशाहा पांच हजार फौजेनिसीं पुलावरून बुणगियांत लाऊन दिल्हा. दुंदेखान रोहिला तो आगोदरच नदीपार होता. दुंदेखान व कुतुबशाहा येकत्र जाहाले. इकडून नजीबखान रोहिला यांणीं तावडतोब सांडणीस्वार सुज्यातदौल्याकडे रवाना केला कीं, " तुमचे

९१. हें खरें आहे; परंतु त्यामुळें सुजाउद्दौला आतां दत्ताजीस सामील होईल हें खरें नव्हतें.

९२. 'नदीचा उतारा विचारावा' सगजो.

९३. 'वद्य प्रतिपदा' भाइसं. क. सां. प्रती. व 'शुा १' असा सगजो. सा. शें. प्रतींचा पाठ आहे. राजवाड्यांना शुा १ मान्य खं. १ पृ. २२०, टीप पहा.

नजीब व दत्ताजी :— शुक्रतालावरील लढा. फा. ३, १९०; चं. द. १,१३७; पेद २७, २४३; पेद २, १०९, १११, पेद २१, १७८. रा. खं. १, १४७, १५० १५७, १४०, १४१, १४२; पेद ४०, १२६.

भरवशावर आम्हीं हें कर्म पतकरिलें. आतां गलिमाची फौज नदीपार जाहाली. माझा जीव जगत नाहीं. अजूनहि तुम्हीं जलद कुमक करितां तरी[९४] उतम आहे. नाहीं तरी **दताजी सिंदे** यास भेटून आम्ही पुलावरूनच पार होतों. तुम्हांसाठीं म्यां येवढें दुर्घट काम अवलंबिलें आहे." म्हणोन सांडणी **सुज्यातदौला** यांजकडे पाठविली. **गंगापार सिंदे** यांची फौज गेली. त्यांणीं **नजीबखान** याचे बुणगे व मुलें-माणसें व खजिना गांठला. तेच दिवसीं आगदीं हस्तगत व्हावें; परंतु **गोविंदपंत** यांचा व **नजीबखान** यांचा चांगला स्नेह होता. म्हणून पांच लक्ष रुपये घेऊन[९५] त्याची बाजू मारून नेली. **कमाऊचे** पहाडांत भारी किला होता तेथें जाऊन आगदीं भारधडी पोहोंचली. निमित्य टाळावें म्हणोन **गोविंदपंत** यांणीं पिछाडी गांठिली. त्यांत दोन लक्ष रुपये व पांच हत्ती व दोन च्यारसें उंट व च्यारसें घोडीं सांपडलीं. तीं घोडीं घेऊन पुलाकडे यावें तों **सुज्यातदौला** फौज पन्नास हजार व दीडसें[९६] तोफा घेऊन चालून आला. याचे कहीची व त्याची आकस्मात गांठ पडली. कांहीं कहीं लुटली गेली. हें वर्तमान गलिमांनीं ऐकून ते क्षणीं माघारें पलूं लागले. कोठें दम न खातां दोन रात्रीं दोन दिवस चालोन खलाल[९७] उतार होता, तेथें पोहोंचले. झाडून[९८] नदी उतरून आलीकडे आले. त्या गडबडींत हजार बारासें मनुष्यें वाहून गेलीं. दम खाऊन उतरते तरी इतके मनुष्य वाहून न जाते. असो.

६२. दताजी सिंदे यांस वर्तमान कळतांच यांची खुशाली होती ती मोडली. निर्वाणसमय भासला. **सुज्यातदौला** याजकडील वकील **प्रीतीराज**[९९] होता; त्यास बोलाऊन आणिलें आणि पुसलें कीं, "तुम्ही आम्हासी मसलत काय करीत गेलां आणि काय कर्तृत्व केलें[१००] ?" म्हणोन वकिलाची अप्रतिष्टा करून दवडून[१०१] दिल्हा फौज येऊन मिळाली. **गोविंदपंत** यांजवर बहुतच श्रमी 'मसलतीस धका लाविल' म्हणोन जाहाले. 'आसो पुढें पाहून घेऊं' म्हणोन उगेच राहिले. सुज्यातदौला याचा मुकाम[१०२] भागीरथीचे पलीकडे जाहाला, याजकडील कोणी तीर्थाचे स्नानास जाऊं न पावें आसें जाहालें. तों फौजेंतून तोफाचे गोले मारूं लागले.[१०३] आस्तु.

---

९४. 'तर माझी निभावणी होईल, नाहीं तरी परिणामास लागत नाहीं. क. प्र.

९५. गोविंदपंतासंबंधीं बखरकार येथेंहि कलुषित दिसतो. उलट गोविंदपंत दत्ताजीच्या सांगण्यावरूनच दोघांमध्यें मध्यस्थी करतांना दिसतो.

९६. 'तीनसें' सा. प्र.

९७. 'खलालास' सगजो. 'खळाल उतरून आलीकडे पोचले' सा. प्र. पाठ.

९८. 'झडून पडून' शें. प्र.

९९. 'प्रीतिराम.' क. प्र.; 'प्रीतराज' सा. प्र. 'प्रतिराज' मं. प्र.

१००. 'दाढी धरून पाय तुडवावे हें कर्म तुमचें' असा क. व. सां. प्रतींचा पाठ.

१०१. 'लावून' मं. प्र.

१०२. 'मलूख' भाइसं. प्र.

१०३. येथें 'गलीम यांणीं तो तळ बळकाऊन तेथेंच राहिले. त्या जाग्यावरून हालले नाहींत' असा सां. प्र.त व क. प्र.त अधिक पाठ आहे.

६३. पुढें **सुज्यातदौला** याची **नजीबखान** यांणें एकांतीं भेट घेऊन मनसोबा केला कीं, " [तुमचा व शिंदे यांचा स्नेह पूर्वीपासून आहे. तरी त्यासी[१०४]] तुम्ही भेटीस आणावें व दगा करून **दताजी शिंदे** यांसी भेटीचे समईं दगा करून जिवें मारावें." म्हणोन मनसोबा करून **दताजी शिंदे** यांजकडे **राजगीर**[१०५] गोसावी याचा लेक[१०६] **उमरावगीर** गोसावी, **सुज्यातदौलायाकडे** होता, त्याचे पदरीं पांच हजार फौज होती, उमर तो पंचवीस वर्षांचे खालीं; परंतु कर्ता[१०७] मनुष्य होता. त्यास **सुज्यातदौला** याणें कांहीं चितांतील कापट्य कलों न देतां वरकर्णीनें ममतापूर्वक बोलोन **दताजी शिंदे** यांजकडे पाठविलें. मनसुबियांत दाहा पांच येरझाऱ्या केल्या. निदान मनसुब्यांत ठरविलें कीं, " **सुज्यातदौला** यांजकडील क्रोड रुपये खंडणी घ्यावी. **नजीबखान** यानें व तुम्हीं पाहून घ्यावें.[१०८] **नजीबखान** भेटीस येऊन सलामामला होईल तों स्वस्त राहावें.[१०९] **नजीबखान** याचे लस्करांतून[११०] येकीकडे हजार फौजेनिसीं येऊन भेटून जावें.[१११] " याप्रमाणें **दताजी शिंदे** व **जनकोजी शिंदे व नारो शंकर** व **आंताजी माणकेश्वर** याचा पुत्र आसे मिलोन ठरविलें.[११२] इमान-प्रमाणें बोलून करारांत आणिलें. तों इकडे **शिंदे** यांस बोलण्याचे भरीस लाऊन **आबदुल आलीकडे** वरचेवर पत्रें[११३] पाठविलीं कीं, " **सुज्यातदौला** येऊन पोहोंचला. **आमदखान लंगडा** पठाण दाहा हजार फौजेनिसीं सिधच आहे. **माधवसिंग जयनगरकर** हा केवल आम्हांस आप्ताहून आप्त. याणें स्वतां[११३] येक बाजू आटपलीच आहे. **मल्हारराव होळकर** देशींहून तीस[११४] हजार फौज घेऊन मजल दरमजल **दताजी शिंदे** यांस मिलावयास येत होता. तो **माधवसिंग** यांणीं शहास गुंतऊन[११५] पाडिला आहे. महत् कार्य त्याणें केलें. याप्रमाणें आज केवल ससा भाणवसीस सांपडतो तैसी शिकार अनायासें सांपडली आहे. सत्वर येऊन पोचावें. म्हणजे **दक्षणेस** येक

---

१०४. 'कंसांतील मजकूर १८७९ व १८८६, भाइसं. व मंडळ प्रतींत नाहीं.

१०५. 'राजेंद्रगीर' पाहिजे.

१०६. 'चेला' सा. व भाइसं. प्र.

१०७. 'शाहाणा, चतुर' क. प्र.

१०८. "नजीबखान यास तुम्हीं पाहून घ्यावें. नजीबखान याचा जाबसाल आम्हांकडे नाहीं किंवा रोहिला याशीं सख्य करणें असल्यास आपण स्वस्थ राहावें. त्याचाहि समेट करून देतों." क. व सां. प्र.

१०९. "व नजीबखान याणें भेटीस यावें जावें. हजार फौज घेऊन यावें." सां. प्र.

११०. 'नजीबखान याची फौज एकीकडे सोडून' सां. व क. प्रत.

१११. या मजकुराचा २२ सा. प्र. तील पाठ असा 'तुम्ही हजार फौजेनसीं नजीबखान याचे फौजेंतून उभयतां दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे व नारो शंकर व अंताजी माणकेश्वर याचा पुत्र आसे मिळोन भेटावयासी यावें.'

११२. 'पाईक व' सगजो.

११३. 'संवती' सां. प्र.

११४. 'सहा हजार' भाइसं. प्र.

११५. "'गोऊन' सगजो.; 'गुंतोन' सा. प्र.

मनुष्य जाऊं पावणार नाहीं." याप्रमाणें पत्रें पाठविलीं आणि **आबदुल आलीस** जलदीनें आणविला. तसेंच **दिलींत आलमशाहा** पातशाई करीत होता, त्याचें भवितव्य[११५] होणार, त्यासहि बुध्धविपर्यास निर्माण जाहाला. त्याणेंहि फितुराचीं पत्रें **सुज्यातदौला** याजकडें पाठविलीं कीं, "तुम्हीं सर्वत्र मिलोन दक्षिण लोकांचें पारिपत्य करावें. **गाजुदीखान** याचा शिरच्छेद करावा. वजिरी तुम्हांस देईन आणि बक्षीगिरी **नजीबखान** रोहिला यास देईन." म्हणोन पत्र पाठविलें. इकडे **आबदुल आली खंदारचा** पातशाहा यासहि पत्रें पाठविलीं कीं, "**नजीबखान व सुज्यातदौला** यांणीं गलिमाची फौज इरेस गुंतविली[११७] आहे. तुम्हीं थोर थोर मजली करून **दिलीस** येऊन पोहोंचावें. **दिली** हास्तगत करून **गाजुदीखान** याचें पारपत्य करून मग चौंकडोन **दताजी सिंदे** यासी ससे होलपट करून खबर सांगावयास दक्षणेस मनुष्य जाऊं देऊं नये." म्हणोन **आबदुल आलीकडे आलमशाहा** पातशाहानीं दिलीहून पत्र पाठविलें.

६४. तों इकडे **दताजी सिंदे** क्रोड रुपयेचे आसेस लागून[११८] भेटीस पुलावर जावें आसा इत्यर्थ जाहाला.[११९] मग **जनकोजी सिंदे व नारो शंकर, भागीरथीबाई, दताजी सिंदे** यांची स्त्री, होती. त्यांणीं येकांतीं जाऊन भीड सोडून जाबसाल केला कीं, "**आबदुल आली** दुराणी याची फौज च्याळीस हजार **आटक** उतरून **लाहूर** प्रांतीं आली. आमची फौज होती ती कांहीं उधलली. कांहीं **पंजाबांत** होती तिची गत काय जाहाली ती समजत नाहीं. हें वर्तमान प्रसिधच ऐकत आहां. दुसरें **आमदखान** लंगडा पठाण दाहा हजार पंधरा[१२०] हजार फौजेनिसीं जमून रोहिला व ते येक विच्यारें[१२१] आहेत. **सुज्यातदौला** हि पनास हजार फौजेनिसीं---[त्याची] कुलीहि दैत्याची--- व तीनसें तोफा घेऊन पुलावर उतरलाच आहे. **नजीबखान** वीस हजार फौज व दाहा हजार पायदळ, प्रत्यक्ष वैईरी, युध्ध करीतच आहे. आसें चौहूकडून जालें पसरलें आहे. तुम्ही आपले ऐश्वर्यानें व हिमतीनें व ईरषेनें धुंद जाहाला[१२२] आहां. परंतु आम्हीं मुलें बायकांनीं येथें[१२३] दुराणी यास सांपड़ोन मरावें किंवा वैरीयाचे घरीं कुलबिणी[१२३] व्हावें. इतकें मात्र उरलें[१२४] आहे. प्रत्यक्ष वैरी **नजीबखान** याचे फौजेंत

११६. 'त्यास मृत्यूनें ओढिलें. याज मुळें त्यास वासना फितुरीची होऊन' असें वाक्य क. प्र. त आहे.

११७. 'गोविली' सगजो. 'इरेस पाडिली' सा. प्र.

११८. 'लागले' सगजो.

११९. 'ठरविला' मं. प्र.

१२०. 'पंधरा हजार' हा पाठ सा. प्र. त नाहीं.

१२१. 'एकत्र मतें' सगजो.

१२२. 'धूम जाहाला' भाइसं. प्र. 'ऐश्वर्यानें' बद्दल 'आश्रयानें' असा भाइसं पाठ आहे.

१२३. या वाक्याबद्दल 'मुलेंबायकांनीं तुरुकहोडीस पडावें' असा सा. प्र. पाठ आहे.

१२४. 'राहिलें' सां. प्र.

पुलावर जाऊन भेटावें ही मसलत, हा मनसोबा, केवल नेणतें मूल आसेल त्याचे [फारतर] ध्यानांत[१२५] न येईल आणि तुम्हांस काळाची झापड कसी पडली[१२५] हें न कले." असें ऐकून **दताजी सिंदे** यास परम विशाध आला आणि बोलता जाहाला कीं, " **जनकोजी बाबा**, तुम्हांस जिवाची आस्ता आहे, तुम्हीं फौजेंत राहावें. आम्ही भेटीस जातों. दैवी आसेल तें होईल." म्हणोन बोलतांच **जनकोजी सिंदे** बोलिले कीं, " तुम्हीं फौजेंत राहावें. आपण भेटीस जातों,[१२६]" म्हणोन गलां पडले. मग **नारो शंकर** माकूल[१२७] मनुष्य बोलिला कीं, " तुम्हांस भ्रांती कां पडली" हें न कले. आधींच **नजीबखान** याचे फौजेंत गेल्यावर तो कांहीं प्राणानिसीं माघारां येऊं देत नाहीं. कदाचित त्याणें हें कर्म न केलें तरि पुलावर **सुज्यातदौला** यासी भेटावयास जाल.[१२८] तेव्हां तो केवल मनुष्य नव्हे. प्रत्यक्ष जातीचे[१२९] दैत्य व कुळीहि[१३०] दैत्याची. फौजहि भारी, आग केवल. हा हतीचे मागले पायावर पाय देऊन शेपूट ओढून धरितो तेव्हां हाती जाऊं पावत नाहीं. तैसेंच **भागीरथी**सारखी मोठी नदी, [तिचें] मोठें विस्तीर्ण पात्र, तें **सुज्यातदौला** याणें सहज हात-पोहणीनें आडसांगडीनें[१३१] सहज रिकामें जावें यावें[१३२]. नदींत बुडी देऊन सुसर ओढून काढावी ! उमर तो पहिली पंचविसी, परंतु शक्ति येवढी ! " तेव्हां जवल कोणी ग्रहस्त होते त्यांणीं विच्यारलें कीं, " मनुष्य व्यवतीमाजी येवढा पराक्रमी व्हावयास कारण काय ?" **नारो शंकर** यांणीं उतर केलें कीं, " **मनसूर आली** यासी पोटीं पुत्रसंतान नव्हतें. म्हणोन, येवढें राज्य, केवल दुसरी पातशाई. आसें सुख आसतां **मनसूर आली** केवल पुत्राविना[१३३] [दीन] जाहाला. हळहळ वाटून चितांत योजना केली कीं, " धिक् जिणें ! याहून फकिरी बरी; परंतु हे जिकीर कामाची नाहीं." म्हणोन उदास व्रतीनें आतीत अभ्यागत, फकीर-फुकरा यांसी धर्म करून, उदास मानून, फकीर व फक्रा यांसी द्रव्यदान व वस्त्रदान व आंनदान करून आपण जात्या स्वकर्म उजूतवाजू करून सावध जाहाले. पुत्रउदेशें **आयोधेंत** ब्राह्मण व बहिरागी यांस आनुष्ठानास घातलें. ते समईं त्याच्या[१३४] दैवयोगें, केल्या कर्माचे सार्थक, ईश्वरावर भार जाहाला. मग त्याचें कुलदैवत मिलून[१३५] त्याची रोज

१२५. ' मनसबा [वाईट असें] केवल नेणतें मूल असेल त्याचे ध्यानांत येईल आणि तुम्हांस काळाच्या गतीमुळें झापड कैसी पडली, ' असा सा. प्र. पाठ आहे.

१२६. ' जनकोजीस ही मसलत औवघड पडली आसें दिसतें. म्हणोन गलां पडले ' असा **भाइसं.** पाठ.

१२७. ' काबील ' **सा. प्र.**; ' उमदा मनुष्य, बहुत पाहिलेले आणि शाहाणा ' **क. प्र.**

१२८. ' आणिले ' भाइसं.; ' आले ' पु. प्र.

१२९. ' आंगींहि दैत्य ' सा. प्र.

१३०. ' मुळीहि ' भाइसं. प्र.

१३१. ' बिनसांगडीनें ' क. प्र.

१३२. ' येतो जातो ' भाइसं. प्र,

१३३ ' पुत्राविसीं ' शें. प्र.

१३४. ' त्याचा दैवयोग ' भाइसं.प्र.

१३५. ' मक्केहून' सा. प्र. 'मेलऊन शें. प्र. व भा. प्र.

बंदगी करितां येक आवलिया फकीर आला. त्याणें स्वप्नीं फळ दिलें कीं, " तूं पुत्राचे उदेशें श्रमी आहेस. तरी मी तुजला फल देतों. हें आपले स्त्रीस भक्षावयास द्यावें.[१३६] " म्हणोन फळ हातीं दिल्हें. आसें स्वपनांत पाहिलें. तां सूर्यउदई[१३७] प्रत्यक्ष फकीर आला. त्याणें येऊन फळ दिल्हें; आणि दुवा देतां जाहाला, " फल आपले स्त्रीस भक्षावयास देणें. चांगला बलवान पुत्र तुजला होईल." म्हणोन सांगतांच त्यास रात्रौं आधींच स्वपनांत साक्षातकार जाहालाच होता. मग **मनसूर आली** यार्णे फल नेऊन स्त्रीस भक्षावयास दिलें आणि बाहेर आला, तो फकीर गैब जाला. मग **मनसूर आली** यार्णे चितांत विच्यार केला कीं, " आवलिया फकीर आला आसतां मी मोहास[१३८] गुंतोन सेवाचोर[१३९] जाहालों." म्हणून खेद बहूतच करितां जाहाला. आसो. 'या प्रकारें ईश्वरकृपेचें देणें ! फल स्त्रीनें भक्षण करितांच पुत्र जाहाला, तोच **सुज्यातदौला.**' आसें म्हणतांच तेथें कोणी पाखंडी[१४०] होते त्यांणीं उतर केलें कीं, " प्रालब्धीं नसतां पुत्र देवानें कोठून दिल्हा ? यास प्रमाण भारतीं आहे कीं नाहीं ?" [त्यांणीं उतर केलें कीं,] " भक्ताचे प्रालब्धीं पुत्रसंतान नसतां [ईश्वर] नवेंच निर्मून देतो. त्यास सिध्धी असे साक्ष देत[१४१] आहे." त्यांत कोणीं कल्पना घेतली कीं, " याजकडे भक्तपणाचें कर्म काय ? प्रत्यक्ष म्लेंच्छ योनीस जन्म आला, अमंगल तप त्याचे कश्मल[१४२] फल, म्हणोन दिकत घेतली." " तेव्हां **नारोपंतांनीं** प्रत्योतर केलें कीं, " भक्तपणा कांहीं पाहतां यास लागत नाहीं.[१४३] दैत्यकुळीं भक्त **प्रल्हाद** जाहाला कीं नाहीं ? तसेंच राक्षसकुळीं बिभीषण जाहाला कीं नाहीं ? तसें आविंदी मतलबासी[१४४] कारण नाहीं. तो केवल नेकजात पुरुष[१४५] होता. आसें दुवा दिल्हा त्याचें फल. या योगें करून बल उतकृष्ठ प्राप्त जाहालें. आसो. त्याणें दंगा[१४६] न करितां सहज दोघांस बगलेस धरून गंगेंत नेऊन बुडविलें,[१४७] तरी त्याचें काय करावें ?" आसे बहुत प्रकारें बुधीवाद सांगून, दृष्टांत द्रष्टांत देऊन, भेटीची मसलत राहाविली. उमरावगीर गोसावी बाहेर डेरियांत होता, त्यास साफ सांगितलें कीं, " आम्हांस पुलावर भेटावयास आनकूल पडत नाहीं. तुम्हांस भेटीचें आगत्य आसेल तर तुम्हीं हजार फौजेनिसीं **नजीबखान** याचे फौजेचे

---

१३६. 'देणें' भा. प्र.

१३७. 'प्रत्यक्ष दिवस उगवलियावर' सा. प्र.

१३८. 'लोभास' भाइसं. प्र.

१३९. 'सेवाचाकरी केली नाहीं' भाइसं. प्र.

१४०. 'पाषांडी' सा. प्र.; 'पाहाडी' भाइसं. प्र.

१४१. 'असें सिद्ध आहे, शास्त्र साक्ष देत आहे.' सा. प्र.

१४२. 'त्याचें कसें फल' भाइसं. प्र.

१४३. 'भक्तपणास कांहीं यातायात लागत नाहीं.' तुं. प्र.; 'भक्तपणा पाहतां यास कांहीं लागत नाहीं.' क.प्र.

१४४. 'अविंधाशीं मसलत नाहीं.'

१४५. 'प्राप्त पुरुष' सा. प्र. 'पुण्य पुरुष' सगजो.

१४६. 'दगा' सा. भा. शें. प्रती.

१४७. 'गंगेंत उडी पुलावरून टाकिली' सा. प्र.

आलीकडे यावें. आम्ही इकडून येतों. परस्परें भेटी होतील. हें न घडेल तर तुमची आमची कागदोपत्रीं भेट. इमानप्रमाण करून आमची क्रोड रुपयांची हुंडी उतरोन[१४८] द्यावी. तुम्हीं मित्रवादें जाऊन आयोधें स्वस्त राहावें. **नजीबखान** याची कुमक करूं नये." याप्रमाणें बोलतांच उमरावगीर यास परम विशाद आला. "आम्हीं[१४९] तुम्हीं हिंदु आसतां दगादुगा होऊं देऊं आसें नाहीं. हें चितांत काय आणिलें?" म्हणोन क्षणभर रदबदली केली. परंतु यांणीं खातर[१५०] न केलें, मसलद मोडली. **उमरावगीर** याणें **सुज्यातदौल्यास** वर्तमान सांगितलें. तेव्हां तो आपले जागा फिके होऊन राहिले. मागती **नजीबखान व नबाब सुज्यातदौला** एकत्र होऊन मसलत केली कीं, "हा तर मनसोबा राहिला. आतां एक करावें. क्रोड रुपयाचे लटके आशेस गोंवून[१५१] पाडावें. तो **आबदूल आलीहि** येऊन पोहोंचत[१५२] आहे. दुराणी आलियावरी मराठे यांस उठो न द्यावें, बसले जागीं मारावें." म्हणोन या प्रकारें मसलत करून 'आज रुपयेची निशा देतों, उद्यां निशा करतों,' म्हणोन आशा लाविली.[१५३]

---

१४८. 'करोन' भाइसं. प्र.
१४९. 'आम्हीं' सा. प्र.
१५०. 'खातरजमेनें मसलत मोडली.' शें. व भा. प्रती. 'खातरजमेशीं मसलत मोडिली' सा. प्र.
१५१. 'गुतवून' मं. प्र. 'नेऊन' भाइसं. प्र.
१५२. 'दुराणीहि येऊन पोंचेल' सा. प्र.
१५३. 'आशेस लाविलें' सा. प्र.

प्रकरण सहावें

'मरणाहून अपेश वोखटें'

६५. इकडे **आबदुल आली** लाहूरास पोहोंचला, तों **साबाजी सिंदे** व **संदीपबेग** याचा पुत्र यांणीं रान[१] सोडोन **कुरुक्षेत्राचे** रानांत[२] आले. **दताजी सिंदे** यांसी पत्रें पाठविलीं कीं, " तुम्ही आजून तेथें कां राहिला ? दुराणी गिलज्याची फौज भारी आली. तुम्ही निघतां[३] तरी उत्तम, नाहीं तरी तुम्हांस[४] कोणी **यमुना** उतरूं देणार नाहीं. " म्हणोन पत्रें येतांच यांस निर्वाण समय[५] भासला. मग डोलियावरील पडल[६] निघतें तैशी गत जाहालीं. परंतु द्रव्याचा लोभ सुटेना. फौजेंत मोठीसी खलबल[७] जाहाली. तमास उंटे घोडीं वैरणीमुळें[८] मेलींच होतीं. त्याणीं उंटें घोडीं घेतलीं. मग **दताजी सिंदे** यांणीं बुनगी काढून **मिरापुरावर**[९] तेरा कोसांवर ठेविले.[१०] आपण सडे फौजेनिसीं तलावर राहिले.

६६. तों इकडे फितुराचीं पत्रें दिलीहून **आलमशाहा** याचीं **सुज्यातदौला** यास गेलीं होतीं. त्याचीं उतरें **आलमशाह**[११] यांजकडे जात होतीं तीं आकस्मात **गाजुदीखान** याचे चौकसीस[१२] सांपडलीं. पत्रें वाचून पाहिलीं तों त्यांत आपला घात व्हावयाचा प्रसंग देखिला.[१३] ते समई **गाजुदीखान** बेलाशक किल्यांत येऊन **आलमशाहा**[११] याचा सिरच्छेद करून, दिलींत मुडदा तैसाच टाकून, प्रहररात्र उजाडावयाची आहे तों आगोदरच **गाजुदीखान** व **नागरमल** व **बहादूरखान बलोच** आसे च्यार हजार फौजेनिसीं निघोन च्यालीस कोस तिसरें दिवसीं[१४] येऊन **आंतरवेदींत** पोहोंचले. **आंतरवेद** म्हणावयास हेंच कारण कीं, **यमुना** व **भागीर्थी** या दोहींचे मध्यभागीं

---

१. 'जंगल' भाइसं. प्र. 'राज्य' १८७९ व १८८६ प्र. 'लाहूर' सा. प्र.

२. रा. खंड १, १३९, १४०, १४१ १४३.

३. 'निघाल' शें. प्र.

४. 'आम्हांस' भाइसं. प्र.

५. 'संकट' सगजो. 'धाबें दणाणलें' क. प्र.

६. 'पडल राज्यमदाचें निघालें आसें होऊन जागे जाहालेसारखी गती जाहाली' भाइसं. प्र.; 'पडदे' मं. प्र.; 'पील' भा. प्र.

७. 'हलाखल' मं. शें. भा. प्रती.

८. 'वैरणीच्या दुष्काळामुळें' सा. प्र.

९. 'मिरापुरावरले कोशावर' सा.प्र. 'मिरापुराचे तळापासून तेरा कोश' क. प्र.

१०. 'राहिले' भाइसं. प्र.

११. 'आदमशाहा' असा पाठ आहे. पेद २७, २४५ व पेद २, १०७ पहा.

१२. 'चौकीस' भाइसं. व सा. प्र.

१३. 'पाहिला' सा. व भाइसं. प्र.

१४. 'प्रहरीं' सा. प्र.; सगजो. प्र.

कचे च्यालीस[१५] कोसांची, मर्यादा, या नामें **आंतरवेद.** तेथें **गाजुदीखान** वजीर **सिंदे** जेथें होते तेथें येऊन पोहोंचले. तों आडवें यावें जावें याचाहि मान पाहिला[१६] नाहीं. आकस्मात गोटाजवळ येऊन दाखल जाहाले. **सुज्यातदौला** याजकडील **मुसेखान**[१७] व **गफूरखान** व **उमरावगीर गोसावी** आसे येऊन [**सिंदे** यांचे डेरियांत] मसलत करितात तों येकायेकींच पाईक[१८] येऊन मजुरा केला कीं, "साहेब, वजीर तो आन[१९] पोंहोंचे." आसें म्हणतांच **पाटीलबाबा** बाडाच्या बाहेर येऊन पाहतां **गाजुदीखान** याच्या आंबाऱ्या देवडीस[२०] येऊन पोहोंचल्या. **दताजी सिंदे** यांणी विस्मय केला कीं, "याणीं मान महत्त्व न पाहतां येकायेकींच येवढें निकडीनें यावयासी प्रयोजन काय ?" आसें म्हणतात तों वजीर हतीवरून उतरोन **दताजी सिंदे** यास हातीं धरून तेच क्षणीं येकांतीं जाऊन साफ सांगितलें कीं, "आवघें **हिंदुस्थान** फिरलें. **आबदुलआलीची** फौज[२१] **पाणिपत कर्नाल** रोखें येथें आली. **सुज्यातदौला** व **नजीबखान** व **आमदखान लंगडा** हे पाऊण लक्ष ऐसी हजार फौज घेऊन आहेत. तुम्ही क्रोड रुपयेचे आषेस लागलां आहां. तुम्हांस क्रोड रुपये कोण देतो ? [आवघी भूलथाप आहे. **आबदुल आलीचा** मार्ग लक्षीत आहेत.[२२]] आता आवघा मनसोबा येकीकडे ठेऊन या समईं कूच करून जावें." आसें ऐकतांच सर्वत्रांचें तोंडाचें पाणी पळालें.[२३] होणार पुढें, परंतु आजच जाहालें आसें भासलें. कूच करावें आसा निश्चय जाहाला. सांडणीस्वार व पत्रें **मल्हारराव होळकर** यांजकडे पाठविलीं कीं, "तुम्ही **जयनगरचा** शह सोडोन[२४] लौकर येतां तर उत्तम आहे. नाहीं तर तुमची आमची पुन्हा भेट होत नाहीं." म्हणोन निदानचीं पत्रें पाठविलीं.

६७. तों **लाहूराकडून साबाजी सिंदे** पळोन आले. तेहि येऊन पोहोंचले. ते समईंच **उमरावगीर** गोसावी यांसी सांगितलें कीं, "**आबदुलआलीची** फौज[२१] नजीक आली. आतां नबाब **सुज्यातदौला** यांस सांगावें कीं, 'प्रस्तुत आम्ही त्याचे पारिपत्यास जातो. तुम्हांस इमान आमचें आसे, आमचा स्नेह राखणें असलियास आजचे समईं क्रोड रुपयांची चिठ्ठी[२५] उतरून देणें, व तुम्हीं कूच करून आयोध्येस जावें." म्हणोन बोलोन त्याज समागमें हती व घोडा व सिरपेंच व मोतियांचा तुरा देऊन वरस्त्रेंहि दिल्हीं. आणि याप्रमाणें सांगितले. ते समईं

---

१५. 'मुलूख एकशेहेंचाळीस' सा. व क. प्र.
१६. 'राहिला' भाइसं.
१७. 'हुसेनखान' सा. प्र.
१८. 'रोहिला' शें. व भाइसं. प्रती.
१९. 'आयें चलो' भाइसं.
२०. 'डेऱ्यास' सगजो.
२१. 'दौड' सा. प्र.
२२. कंसांतील मजकूर १८७९, १८८६ प्र. भाइसं. प्रतींत नाहीं.
२३. 'वाळलें' शें. व भा. प्रती; 'आळलें' भाइसं.
२४. 'अति निकडीनें सोडोन' क. प्र.
२५. 'हुंडी' सा. प्र.

उमरावगीर गोसावी यास उमजलें[२६] कीं, "अविधांनीं मोंगलाई मसलत केली होती, परंतु **दताजी सिंदे** भेटीस आले नाहींत म्हणोन उतम. नाहींतर आम्हांस जन्माचें आपेश येतें. ईश्वरेंच [२७]अरिष्ट वारिलें." म्हणोन संतोष पावोन **उमरावगीर सुज्यातदौला** याजकडे आला. इकडील वर्तमान सविस्तर सांगितलें. ते समईं **सुज्यातदौला** याणें चितांत विस्मय केला कीं, "आशा आरिष्टांतून आजचे समईं **दताजी सिंदे** निभाऊन चालिले! आमची केली मसलत तसीच राहिली."

६८. दुसरे दिवशीं **दताजी सिंदे** यांणीं कूच करून मजल दरमजल **कुंज्यपुरा**नजिक जाऊन **यमुना** उतरून आलीकडे आले. तों **गिलज्या कुरुक्षेत्रावर** आला. याची बातमी **कुरुक्षेत्रावर** आली. मग **दताजी सिंदे** यांणीं मुलेमाणसें व बुनगे व **जनकोजी सिंदे** व **गाजुदीखन** यांस **दिलीकडे** वाटेस लाविलें. आपण सडे होऊन कोणी येक कुमकेस[२८] मिळाले नाहीं तों **आबदुल** आली गांठावा [व त्याचा रेच मोडून टाकावा[२९]] म्हणोन **पाणपतावर** गेले. तों तेथून सोळा कोशांवर गिलच्या आहे म्हणोन बातमी आली. **दताजी सिंदे** यांणी तमाम लहानथोर सरदार यांस मसलतीस बोलावून सांगितलें कीं, "**खंदारचा** पातशाहा **आबदुलआली** चालोन आला आहे. मी तर पेशवे यांचा बारगीर. माझी कांहीं आबरू विशेष नाहीं. परंतु तुम्ही सर्वत्र राज्यांतील मराठे सरंजामी[३०] सरदार. तुम्हांस 'मरा' म्हणवत नाहीं[३१]. तरी 'देईन मान व देईन प्राण[३२]' या अर्थी दोहरा[३३] आहे तो सांगतो.

मारूं तो मरजाऊंगा, हटूं तो जनोकी[३४] लाज।
ये खुदा परवर दिगार, दोनो कठीण काज[३५]॥

आसा समय प्राप्त जाहला आहे. त्याचें उत्तर काय? म्हणोन बोलतांच सर्व सरदार नामी व मातबर व कुलीन होते. त्यांणीं निसटूर[३६] उत्तर केलें कीं,

---

२६. 'उमगलें' सा. प्र.

२७. 'आम्हांवरील अपेश टाळिलें' क. प्र.

२८. रा. खं. १, १४७; पेद २, १०९; पेद. २१, १७८, १८३; पेद. २७. २४२, २४३.

२९. कंसांतील मजकूर १८७९, १८८६ व भाइसं. मध्यें नाहीं.

३०. 'मराठे नामीं सरदार' सा.प्र,

३१. 'मरा म्हटलियास कोणी मरत नाहीं' सगजो.

३२. 'देय मान देय प्राण' पु. प्र.; 'लेजे दे दान की लेजे दे प्राण' तुं. प्र.; 'लेजे दान की दीजे प्राण' सा. प्र.; 'लज्य दे दान की लज्य दे प्राण' सगजो.

३३. हा दोहरा शें. प्रतींत नाहीं.

३४. 'जनकी' पाठांतर.

३५. क. व भाइसं. प्रतींत या दोह-ऱ्याचा अर्थ दिला आहे तो असा– "रणांत शूरांस मारूं, नाहीं तर आपण मरून जाऊं. बच्याउन माघारे येऊं हा भरंवसा नाहीं. अगर समरांगणीं पळून जाऊं तर सर्व लोक निंदा करितील. तोंड जनास कसें दाखवावें? म्हणोन. श्री भगवंतास प्रार्थना हीच कीं, दोनी कर्में कठीण. यांतून कसें पार पाडशील. असा समय प्राप्त जाहला आहे."

३६. 'निरोतर' सा. शें, सगजी. प्र

" **पाटील**, तुम्ही फौजेचे पाठीवर उभे राहाल[३७] तर आम्हीं इरेनें युध्द करूं. तुम्ही फौजेस टाकून पुढें जाल तर आम्ही शत्रूवर उठणार नाहीं. मग जें होणें तें होऊं. आम्ही गलिम जातीचे. पाठीवर काठी उडती तोंच जें होणें तें होईल. नाहींतर आम्ही मराठे, झाडास बांधिले तर झाड घेऊन जावें, हा आमचा स्वभाव. बोलावयाचा मात्र धर्म आहे कीं 'जेथें साहेबांचे पाय[३८] पडतील, तेथें आमचें डोसकें पडेल.' परंतु त्याचे वांटेकरी थोडके.[३९] नाहीं तर 'जेथें साहेबांचें डोचकें पडेल, तेथें भल्यांचे पायहि[४०] पडणार नाहींत;' आसा विचार आहे. त्यांत तुम्ही खावंद आहां. आसें म्हणतांच **दताजी सिंदे** बोलिले कीं, " तुम्ही ज्या रीतीनें सांगाल त्याप्रमाणें वर्तणूक करूं." म्हणोन बोलून रात्रीं मुकाम करून राहिले. **गिलज्याची** बातमी आणविली. तो तेथून कचे वीस कोसांवर **आबदुलआली** येऊन पोहोंचला.* ही बातमी येतांच **सिंदे** यांणीं पुढें हारोळीस[४०] फौज **जिवाजी भोईटे** व **नाईकजी भोईटे** व **गोविंदपंत बुंदेले** व **अंताजी माणकेश्वर** यांचा पुत्र पंधरा हजार फौजेनिशीं पुढें रवाना केलें. त्यांणीं जाऊन सोला कोसांवर दुराणी यास गाठिलें. परंतु ईश्वराचें कर्तव्य, गलिमाचा विनाशकाल. नाहीं तरी दुराणी लोक पके मर्द नवते. यांची गांठ पडतांच **आबदालीनें** कूर्मवत फौजेचें आकर्षण करून गोल बांधून **कुंजपुरियाचा** रस्ता सोडून, **कमाऊचे**[४१] पहाडाचे सुमारें **यमुनातीरीं** आडचण होती तिकडे तडाखा पलूं लागले. तेव्हां पुढें हारोलीस[४०] गेले होते त्यांणीं चितांत योजना केली कीं, " दुराणी केवळ नामर्द,[४२] आम्हांस भिऊन तडाखा पलतो. **दताजी सिंदे** मागेंच आहेत तों आपण घोडे घालून येवढें यश [४३]घ्यावें. " म्हणोन मोठी कडनिकड मांडिली. **आबदुलआली, नजीबखान**[४४] यास न मिले पावेतों गुध्द करावें म्हणोन मनसोबा केला.

६१. तों इकडे **दताजी सिंदे** यांणीं प्रातःकालीं उठोन, फौजेस ताकीद केली आणि शंख वाजविला आणि शिंगें वाजविलीं. सेला, भाला आणि अनीन तंग सिध्द करून, आंगांत बक्तरें व चिलखतें, टोपपेटचा, जिरे दस्तानें, टोपास बिन्या, दंडास बावन बिरदें वगैरे निसीं सिध होऊन गोटाबाहेर निघाले. तों आकस्मात पंज्याब प्रांतीं **त्रिंबक बापूजीचें** पथक गेलें होतें तें दुराणीनें बुडऊन तमाम मनुष्यें[४५] बंद

३७. 'राहिले' सगजो.
३८. 'पायपोस' सा. प्र.
३९. 'धडके' भाइसं.
४०. 'आरोलीस' भाइसं.
४१. 'लाहूरच्या' भाइसं. सगजो. भा. प्रती.
४२. 'च्योकल चाकल' भाइसं.; 'पोकल' मं. व भा. प्रती.
४३. 'संपादावें' मं. प्र.
४४. 'नजीबखान यास मिळाला नाहीं' सा.प्र. *दत्ताजीच्या हालचाली—रा. खं. १, १५०, १५२, १५६, १५७; पेद. २१, १७७; पेद. २, १०७, १०९ १११, ११२.
४५. 'मनुष्यांचा बंद धरून' सा.प्र.

धरून भोंवतालीं राखणदार[४६] ठेविले. सायंकालीं आदशेर आन्न द्यावें, आंगावर वस्त्र नाहीं. परंतु ते समई त्यांणीं जीवदान देऊन सोडिले हेंच अधिकोत्तर. त्यांणीं पंज्याबची संपदा मिळविली होती ती जाऊन दैवहत[४७] जाहाले. जसें स्वप्नीं दरिद्री राजा होतो आणि जाग्रत होतांच चरणसंपुष्ट[४८] आणावयाचें संकट पडतें, तसी गत जाहाली. असो. त्यांणीं जीव जगविले[४९] हेंच मिळविलें. कुरुक्षेत्राचे तल्यावरून जगदोधारास गेले. त्यांसमागमें पांच गिलजे देऊन रवाना केले. ते दोन आडीच हजार माणूस नागवे उघडे, केवल मोठे मोठे सरदार होते. ते ओलखूं येईनात; आसे आवस्तेनें[५०] आले. तों यांणीं तल सोडून बाहेर युध्यास जावें म्हणोन ठिकाणाबाहेर निघाले, तों ते पुढें नागवे उघडे घायाल आले. ते वेलेस सर्वत्रांचे मुखावरील पाणी उतरलें. माहा आपशकून आसी सर्वत्रांची कल्पना जाहाली. **दताजी सिंदे** यांस वाईट वाटलें.[५१] परंतु मागती विवेक केला कीं, "ज्या ज्या कालीं जें जें होणार होणें, तें होतच आहे." म्हणोन दोन घटिका घोडयावरून उतरोन सर्वत्रांस भेटून, त्यांचें समाधान करून, खांशास पोषाख व लहान मनुष्यांस दोन दोन वस्त्रें व सरसकट[५२] पनास रुपये खर्चास देऊन आपण घोडयावर स्वार जाहाले. **सिंदे** केवल खजानपूर[५३] सरदार, द्रव्यवान[५४] होते. त्यास कांहीं द्रव्याची परवा नाहीं. आसो.

७०. पुढें गेले तों गिलज्या जाऊन **यमुनातीरीं** आडचणींत येकीकडून पालवे[५५] व शेरणीचीं बेटें व पाणीयाची झील आसे आडचणींत उतरले. गिलज्यानें जातेक्षणींच हतीवर व उंटावर झडत पडत बुनगे नदीपार केले. आपण सडे पंचवीस हजार फौज व पांचसातशें उंटावरील सुतरनाला व पांचच्यारशें उंटावरील बाणांच्या कैच्या व जिलबींतील हलक्या तोफा पंनास ऐसा जमून उभा राहिला होता. तों दताजी **सिंदे** यांचे फौजेचा धुरला दृष्टीस पडों लागला. ते समई **नाईकजी भोईटे** व **जिवाजी भोईटे** व **गोविंदपत बुंदेले** यांणीं आपण येश घ्यावें म्हणोन त्या आडचणींत शिरोन घोडीं घातलीं. ते समई **आबदुलआली** याणें

---

४६. 'राखण' भाइसं. प्र.

४७. 'दरिद्री' भाइसं. प्र.; 'धनविरहीत' भा. प्र.

४८. 'तृणकाष्ट' सा. प्र.; 'त्रिबकपंतास चरणसंपुष्ट घेण्यास सामर्थ्य नाहीं असा कंगाल केला.' क. प्र.

४९. 'जगले' शें. प्र.

५०. 'खास्तीनें' मं. शें. भा. प्रती. हे लोक पांचशें होते असें रा. खं. १।१४६ मध्यें आहे.

५१. 'भासलें' भाइसं. प्र.

५२. 'सकट' भाइसं., १८७९ व १८८६ सा. प्रती.

५३. 'खजिन्यानें पुरें' मं. प्र.; 'खजानपूर' सा. प्र.

५४. 'द्रव्यदृष्टी' सा. प्र., भाइसं. प्र.

५५. 'पाल' शें. व भा. प्र.; 'पानें' सा. प्र.; 'पाणी' शें. प्र.

हुशारी[५६] करून सुतरनालाचे व बाणांचे उंट बसवून तोफांचा व सुतरनाले यांचा व बाणांचा येकदांच मार केला. तों पुढें होणार भवितव्य. **भोईटे व बुंदेले** यांचे द्रष्टीस काय पडलें हें न कले! येवढे पराक्रमी होते; परंतु त्यांच्या पोटांत हरणाची कालजी सिरली आणि निशाणें माघारीं फिरऊन तडाखा पळों लागले. त्यांचे मागें फौजहि भरधांव पळों लागली. बापास पुत्र व पुत्रास बाप पुढें उभे राहीनात, तेथें दुसरें कोण उभें राहातो? आसा पळ सुटला. तेव्हां गिलजे पाठीस[५७] लागोन, तमाम जसा कुणबी विल्यानें शालवाचें[५८] पीक कापितो त्याप्रमाणें गलिमाचे लोकांचीं सिरें कापूं लागला[५९]. गिलजे केवल बेहोष[६०]. येका शरिराचे[६१] तीन भाग याप्रमाणें आवस्ता केल्या. येकानें पुढें डोचकें कापावें, येकानें मागें सैती[६२] मारावी व येकानें डोचकें कापून न्यावें, तें सरकारांत रुजू करावें. त्याणें इनाम दर सिरास पांच रुपये देऊन नाक कापावें. आशा येक शरीराच्यां[६३] तीन आवस्ता करून येक क्षणांत आडीच हजार खाशांचीं सिरें छेदिलीं[६४]! दुराणी व गलीम सरमिसल जाहाले आणि पलत येतात तो **दताजी सिंदे** फौजेसुद्धां जाऊन[६५] पोहोंचले. येवढे **सिंदे** आंगें मर्द व हमेशा लढती फौज आसतां, ज्या फौजेनें मारवाडी राठोड हटविले आणि येकदिल आसी फौज आसतां, पुढील सोहाळा पाहून केवल दिपतात तैसे दिपोन **दताजी सिंदे** वगैरे उभे राहिले. तोंडें कालीं खापरासारखीं दिसों लागलीं. लोकांची इरेश्री उतरली. आंगे **दताजी सिंदे** उभे राहिले; परंतु त्यांची कुमक करविली नाहीं. **दताजी सिंदे** इकडे तोंड करतात तों इकडे फौजेचे सेले तोंडापुढे[६५] येईत आणि फिरोन दुसरीकडे तोंड करीत तों इकडील सोगे तोंडापुढें येईत[६५]. आसी आपलें जागीं गडबड जाहाली; परंतु कुमक करविली नाहीं. त्यांणीं आपले स्वइच्छेकरून सिरें कापून दुराणी आपले लष्करांत निघोन गेले. तमाम सिरांचीं नाकें कापून डेरियापुढें कलवड जसा गोवऱ्यांचा उडव[६६], त्याप्रमाणें

---

५६. 'गडबडोन' १८७९, १८८६ सगजो व शें. प्र.

५७. 'उठवणी करून' पाठलाग करून' सा. प्र.

५८. 'जोंधळ्याचीं कणसें' सा. व सगजो.

५९. 'सिरछेद करूं लागले' सा. व शें. प्र.

६०. 'बेवकूब' सगजो.

६१. 'सिराचे' भाइसं प्र.

६२. 'बृहती' सगजो. क. प्र.

६३. 'कापिलीं' सा. प्र.

६४. 'येऊन' सा. प्र.

६५. 'दताजी सिंदे इकडे तोंड करतांना इकडील फौजेचे तोंडासन्मुख सेले फिरविले, इकडील फौज इकडे येत अशी' तुं. प्र.; 'दताजी बाबा वोढ करून पुढें त्यांजवर जाण्याची हिंमत करीत. परंतु शेल्याचे सोगे डोळ्यावर पुढें येत आणि दुसरीकडे तोंड करून पाहात तो हिकडील सोगें तोंडापुढें येत' क. व सां. प्र.

६६. 'हुडव' मं. प्र.; 'उडव्या' शें. प्र.

काल–चावडींतील चौथरा घातला. आडीच हजार लोकांचीं डोचकीं[६७] कांहीं थोडीं नव्हेत[६८]! [६९]आसो.

७१. दताजी सिंदे तिसरे[७०] प्रहरपर्यंत तेथें उभे राहून, माघारे फिरोन पुलानजीक उतरले. **आबदुल आली** सडा होता. तो आगदींच नदीपार गेला. दुसरे दिवसीं दुराणी यांणीं ताबडतोब **नजीबखान** यासी **मिरापुरचे** तलावर मिलाला. तिकडून **सुज्यातउदौलाहि** पन्नास हजार फौज व तीनसें तोफा **भागीरथी**-पार उतरून आलीकडे आला व **आनूपशहराहून आमदखान** लंगडा पठाण दाहा हजार फौजेनिसीं येऊन मिळाला. आसो येक लक्ष चाळीस हजार फौज येक जागां मिलाली.

७२. इकडे दुसरे दिवसीं **दताजी सिंदे** यांणीं कूच करून दुराणीचे तलावर आले, तों सिरांचा गंज[७१] पाहिला. आणि डोल्यांस पाणी आणिलें. येक क्षणांत पंधरा हजार फौजेंतील निवडक मनुष्य गेले. ओळख्या कोणी द्रष्टीस[७२] पडेनासा जाहाला. फौजेंत मोठा प्रलय. फौजेंत जिकडे तिकडे रुदंती जाहाली. मोठा प्रलय. क्षणभर तेथें उभे राहून **सोमाजीबाबा भोंसले फलटनांत** राहत होते, ते केवल साधु मनुष्य होते, त्यांणीं ते दिवसीं क्षणभर क्षत्रिय धर्म केला. परंतु विनाशकाल! त्यांचेंहि सीर कापून नेलें होतें. मोठ्या प्रयासें त्यांचें धड मात्र हुडकून काढिलें. त्या धडास आग्नप्रसाद दिल्हा. मोठी मजल करून **बाहदरगडाचे** नजीक बुणगे व **जनकोजी सिंदे** यांची गांठ घातली. तेथून मजल दरमजल तिसरे दिवसीं **दिलीवेनजोक मजमूचे** टिल्यानजीक[७३] मुकाम करून राहिले. कित्यांतून **गाजुदीखान** वजीर आला आणि "आम्हीं कोठें राहावें?" म्हणोन विच्यारलें. तेव्हां **दताजी सिंदे** यांणीं सांगितलें कीं, " तुम्हीं स्वस्थ राहावें. दुराणी नामर्द, त्याच्यानें आमचें काय होणें आहे? आम्ही गनिमी काव्यानें राहातों. तों पावेतों **मल्हारराव** [**होळकरहि** येऊन पोहोंचतात*] यांचीं पत्रें आलीं आहेत. त्यांणीं या उदेशें **जयनगरचा** शह सोडून येतात. तेहि येक दोन दिवसांत येऊन पोहोंचतील." आसें त्यांचें समाधान करून त्यास कित्यांत जावयास सांगितलें. आपण स्वस्थ राहिले.

---

६७. ' नाकें 'सगजो.

६८. शिद्यांच्या आघाडीवरील ही झटापट ता. २४ डिसें. १७५९ रोजीं स्थानेश्वरीं झाली. पेद २,११२,११७.

६९. पेद. २१, १७८. बखरीचें वर्णन राजवाडे खरें मानीत नाहींत. (खं. १ पृ. २४५ टीप २२९), शेजवलकर खरें मानतात (पानिपत पृ. १७.)

७०. 'तीन प्रहर रात्रपर्यंत' क. प्र.

७१. 'शिरांगण' पाठांतर.

७२. 'ओळखावयास कोणी दृष्टीस पडेनासे जाहाले' सा. प्र. (टीप) 'ओळख पडेनासी जाहली' सा. प्र.

७३. ' मजूचे टेकडीवर' सगजो.; 'यमुनेचे कडेवर' क. प्र

मराठी ग्रंथ संग्रालय, ठाणें. स्थळप्रत.

७३. ते समई **भागीरथीबाई** यांणीं **नारो शंकर** यांस सांगून पाठविलें कीं "आजपावेतों आमचा साह्य काल होता.[७४] आसाध्य कर्म तें साध्य होत होतें, आतां जी गोष्ट योजावी ती विपर्यास होते. प्रस्तुत सर्व **हिंदुस्थान** येक जाहालें. दीड लक्ष फौजेची गणती.[७५] दुराणी व आवघेंहि झाडून जमले आहेत. तुम्हापासीं पन्नास हजार फौजेची गणती[७६] नाहीं. **पाटील** तो दुराग्रहास प्रवर्तले. आपण मरावें आणि जग बुडवावें आसा विच्यार घडला आहे. तुम्ही मरावें आणि आम्ही तुरुलधाडीस[७७] पडावें आसेंच आमचें प्रालब्धीं ईश्वरें योजिलें होतें म्हणोन ईश्वरें आम्हांस जलमादारभ्य[७७] या रानांत आणिलें. तुम्ही **पाटील** यांस विवेक करून सांगावें" म्हणून सांगून पाठविलें. ते समई **नारो शंकर** यांचींहि मुलेंमाणसें समागमें होतीं त्यांणीं चितांत योजना[७८] केलीच होती कीं, "सर्वत्र मिलोन पाटीलबावांस सांगोन पाहूं" मग **नारो शंकर व जानराव बांबले व गोविंदपंत बुंदेले**[७९] **व जनकोजी सिंदे** [असे] येकत्र होऊन **दताजी सिंदे** यास त्रिवर्ग मिलून साफच जाबसाल केला कीं, "तुम्हीं मरावयास सिध्ध जाहाला,[८०] परंतु मुलें लेकरांनीं पाप काय केलें? याजकरितां आपण सडे या स्थलीं राहून बुणगे व कबिले चमेलीपार लावून द्यावें, मग तुमचे दैवीं असेल तें घडेल." म्हणोन एकतांच **दताजी सिंदे** यांस बिषाद येऊन बोलते जाहाले कीं, "**नाना**, तुम्ही काय समजोन हा आर्थ बोलिलां? आम्हांसहि पुरतेपणें समजलें आहे कीं, आमचे आयुष्याचा अन्त जाहाला. मग मुलेंमाणसें जगून[८१] काय करावीं? कोणी आपण तरावें व जग तारावें, कोणी आपण बुडावें व जग[८२] बुडवावें. मुलेंमाणसांची शाका[८३] करून हातीस आंदू घालून मारतां मारतां मरावें. मरणाहून आपेश वोखटें.[८४] आपजय घेऊन **नाना**-

---

७४. 'होता काळ होता' सा. प्र.

७५. 'गणीत' सगजो.

७६. 'तूर्त धाडीस' भा. प्र.; 'तुरक बंदीस' सा. प्र. 'बिदीस' सगजो.

* कंसांतील मजकूर १८७९व१८८६ व भाइसं. प्रतींत नाहीं.

७७. 'या जन्मांत या रानांत' मं. प्र.

७८. 'विवंचना' सगजो.

७९. गोविंदपंत या वेळीं शिंद्यांच्या परवानगीनेंच त्याचा गोट सोडून गेला होता. त्या वेळचे "आज लढाई अगर प्रातःकालीं होईल; ईश्वर ज्यास यश देईल त्यास सुखें देऊं" (रा. खं. १।१४७) हे विचार चिंतनीय आहेत

८०. 'तुम्ही मरावयास उदार जाहालां परंतु मुलांमाणसांचीं काय वाट? त्याणीं काय पातक केलें आहे कीं, असते आयुष्यांत प्राण द्यावा? आयुष्याची मर्यादा जाहालियावर ठीकच आहे, मग कोणाचाच उपाय नाहीं. आज त्यांचे धाडीस पडतील." क. प्र. 'ते तुरुकधाडीस पडतील' शें. प्र.; 'ते तूर्त बिडीस पडावें' सगजो.

८१. 'जमऊन' भाइसं. प्र.

८२. 'कोणी आप तरावें आणि जग तारावें; कोणी आप बुडावें व जग बुडवावें' सा. प्र.

८३. 'सीमा' भाइसं. प्र.

८४. 'आपेश वाईट' भाइसं. प्र.; 'वोखटें' बद्दल 'वेळाचे' तुं. प्र.

साहेब व **भाऊसाहेब** यांस तोंड काय दाखवावें? म्हणोन आतां मरावें[८५] हाच निश्चय, याहून दुसरी कल्पनाच नाहीं." आसे ऐकून **नारो शंकर** यांणीं उतर केलें कीं, "**पाटील**, तुम्ही बोलिलां हें पुर्ऊन घ्यालच यांत संदेह नाहीं. तुम्ही बोलिलां हें कराल परंतु मुलेंमाणसें मारवत नाहींत. हें कर्म येक दोन वेळां शाका[८६] **मंडलियाचे** राजयानें केल्या आणि **हिंदुस्थानांत बुंदेकोटियाचे** राजे हाडे रजपूत यांणींच हीं कर्में[८७] करावीं. **मराठियांस** मायाजाल सुटत नाहीं. या गोष्टी घडणार नाहींत. तुम्ही वाटेस लावाल तर उतम, नाहींतर आम्ही आपलीं मुलेंमाणसें वाटेस लावतों." म्हणोन आपले डेरियास आले. **दताजी सिंदे** उठोन बाडांत स्त्री **भागीरथीबाई** यांजकडे गेले. त्यांचे चितांतील काळजी ध्यानांत आणिली, तों त्याचे चितांतहि निघतां उतम. त्यांत **भागीरथीबाई** गरोदर, नऊ[८८] महिने पूर्ण भरत आले होते. मग **दताजी सिंदे** यांणीं चितांत योजना केली कीं, "पोटीं पुत्र नाहीं[८९] स्त्री गरोदर आहे, तेव्हां वाटेस लाविलां उतम आहे." म्हणोन बाहेर येऊन **जनकोजी सिंदे** यांस बोलाऊन सांगितलें कीं, "बुणगे, मुलेंमाणसें घेऊन तुम्ही **चमेलीपार** व्हावें आणि आम्ही येथें राहून जें होईल तसें पाहून घेऊं" आसें आईकतांच **जनकोजी सिंदे** यांणीं जाबसाल केला कीं, "**काकासाहेब**, तुम्ही राहतां आणि मीं जाऊन काय करावें? मजकडून ह्या गोष्टी घडावयाच्या नाहींत. तुम्ही मुलेंमाणसें पाठवितां तर उत्तम आहे. नाहींतरी आम्ही आग्रह करीत नाहीं." आसा [**जनकोजीचा**] राहावयाचा दुराग्रह ऐकोन **दताजी सिंदे** यांणीं डेरियांत येऊन मुलामाणसांस च्यार गोष्टी विवेकाच्या सांगितल्या: त्याजवरून त्या समई बाईकांचा शोक, ज्याप्रमाणें मनुष्य मरतें, त्या प्रकारचा जाहाला. **भागीरथीबाईस** आसें जाहालें कीं, "**पाटील** आजच आपणास आंतरले. भगवंते आजच आमची तोडातोड केली." म्हणोन बहुत प्रकारें शोक केला. आगदीं बुणगे व मुलेंमाणसें यांस पोचवावयास दहा हजार फौज समागमें व **सुरजमल** जाट याजकडील वकील **रूपराम कटारी** यास समागमें देऊन वाटेस लाविली. तेथून **हुलकाबाजे**[स] बारा कोस बुणगे जाऊन पोहोंचले.

---

८५. 'हला करावा' भाइसं. प्र.

८६. 'सोळा मंडळी यांणीं' मं. व भाइसं. प्रती. त्यापुढें भाइसं. प्रतीचा पाठ आहे तो असा "या रानींच केले ते दिवस ते केलेस तसेंच गुदरले आणि हिंदुस्थानांत धुंदी केली."

८७. 'कृतीमें' भाइसं. प्र.; कृत्रिम भा. प्र.

८८. हें विधान सर्वस्वीं बरोबर नाहीं.

८९. 'आपणांस पुत्र संतान नाहीं.' सगजो.

९०. 'फरकाबादेनजीक' सा. प्र.

प्रकरण सातवें

'बचेंगे तो औरबी लढेंगे'

७४. तों तेच दिवशीं **आबदुल अली** दुराणी व **सुज्यातदौला** व **नजीबखान** रोहिला व **आमदखान** लंगडा व **कुतुबशहा** व **दुंदेखान** रोहिला आसे **यमुने**पलीकडे **शाहाघडा** म्हणोन मोठा पुरा होता, तो **आंतरवेदीची** उतरती पेठ [ती पेठ] व **पंचगण**[1] आसे दोन पुरे मिळून आर्धी दिल्ली होईल. ते दोनी पुरे मारून त्यांचा सत्यानाश केला. येक लक्ष चालीस हजार फौज होती. पौष[2] शु० १४ स संक्रांतीची भोगी होती. ते दिवशीं **यमुना**तीरीं दुराणीचा मुकाम जाहाला. **यमुनेचे** आलीकडील तीरीं गलीम पाणी पीत होते व पलीकडील तीरीं दुराणी पाणी पीत होते. दोनी सैन्यें येकमेकांनीं पुर्तेपणें पाहिलीं. तों सिंदे यांजकडील फौज भारी पाहोन [दुराणी] फारच संकटांत पडले. ते दिवसीं **दताजी सिंदे** यांणीं दिलीसमीप **राजघाट** होता. तेथें हाती घालून **यमुनेस** ठाव पाहिला. तों ठाव लागला नाहीं. तसेंच **मजमूचे टिळियान**जीक[3] घाट होता त्याच्याहि नजीक जाऊन ठाव पाहिला. तों तेथेंहि ठाव नाहीं. तों केवळ सायंकाल जाहला. रात्रीचे रात्र आपलाले जागा. पहिले[4] प्रहर रात्र उरली. मग **दताजी सिंदे** यांणीं **जानराव वांबले** यांसी नजीक घाट होता तेथें घाट राखावयास जावें, म्हणोन सांगून पाठविला. [5]**मालोजी सिंदे** म्हणोन बरा उमदा[6] मनुष्य होता, तो हजार फौजेनिसी **दिलीनजीक राजघाट** होता तेथें घाटावर त्यास पाठविला. दिवस उगवला. समागमें नामी पांच सात हती व सडे

---

१. 'पटपंचगण' सा. प्र.; 'पंचगण आसे तीन पुरे मारून सत्यानाश केला' भाइसं. प्र.

२. 'शुा ४' सगजो. हा पाठ व शुा १४ हाहि पाठ चूक आहे. भोगीची तिथि जुन्या पंचांगाप्रमाणें पौष वद्य ७ शक १६८१ अशी येते व मकरसंक्रातीची गुरुवार, पौष वा ८ अशी आहे. त्या गुरुवारींच दताजी व दुराणी यांची लढाई झाली [ता. १० जाने. १७६०. फा. १, २२०; पेद. २७, २४७. सय्यद नूरुद्दिन या लढाईची तारीख ९–१०–१७६० अशी देतो (ऐ. प. पृष्ठ २५२). मुसलमानी चंद्रामुळें तो एका दिवसाचा फरक असावा.]

३. 'यमुनेचे कडेनजीक' भाइसं. प्र.

४. 'पहांटेची रात्र प्रहर उरली' सा. प्र.

५. 'वाल्होजी' तुं. व सगजो.; 'मल्हारराव' भा. शें. सां. व क. प्रती.

६. 'उमराव' भाइसं. प्र.

बुणगे व तीन[७] लक्ष रुपये समागमें होते. त्यांत हती नामी जव्हेरगर्ज व पटागज व कृष्णगज व रामबाण आसे च्यार हती आमोल्य. त्यांजवर महातहि थोर आबरूचे. चौघांस खडीताजीम होत होती. त्यांस **दताजी सिंदे** यांणीं ताकीद केली कीं, "यार हो! निदान समय येऊन पडला[८] आहे. आमचे आवरूवर आलें आहे. आमचे मनांत आहे कीं, "निदान समईं हतीस आंदू घालून लढावें." आसें माहातांनीं ऐकून उतर केलें कीं, "**रावसाहेब,** आम्हीं बहूत दिवस तुमचें आन्न भक्षिलें आहे. येक वेळ आपण इरे सोडूं नये.[१०] आमचा प्राणांत समय आला आहे. आम्ही कांहीं बांचत नाहीं." आसें ऐकन येकमेकांनीं निरवानिरव करून समागमें हतीवर घटकाहि वाजत होती. तीन घटका दिवस आला तों तमाम फौज जेऊन खाऊन, तिलगूल वांटून, जीन सामान सिद्ध करून बसलेच होते. तों **आबदुल आलीची** फौज व तोफखाना सिध्ध होऊन कांहीं **राजगडचे** घांटें चालिले व कांहीं **मजमूचे टिळि[११]-याचे** घाटें व कांहीं **रेवा[१२]डीचे** घाटें चालिले. इतकियांत किल्यांतून **गाजुदीखान** वजीर आला. तो **दताजी सिंदे** यांस बोलतां जाहला कीं, " तुम्ही[१३] गलीम आहां, तुम्ही घाट धरले, ते (अशास) हीं मोगलांचीं कर्में. त्यांणीं घाट धरले, तेव्हां आपलेकडील लोकांस घाट धरणें होणार नाहीं. तुम्ही घाट सोडून दुरोन गनिमी काव्यानें राहाल तर आम्ही किला राखतो; किंवा तुम्हापासी राहतों." आसें म्हणतांच **दताजी सिंदे** यांणी सांगितलें कीं, "तुम्ही बिनघोरी किल्यांत जावें. आम्ही आज कांहीं घाट धरून झुंज करीत नाही." असें सांगून वाटेस लाविलें.

---

७. ' दोन ' सगजो.

८. जवाहीर पटावर, आपबाप, वरासबाब ' अशीं हत्तीचीं नांवें सगजो. प्रत देते. ' जवाहीरगज, पोटागज, रामबाण, मदनमस्त कृष्णगज; त्यांत चार हती बहूत थोर ' क. प्र.

९. 'बालखादम ' 'बाजखादान' (?) पु. व तुं. प्रत.

१०. " आपण हें रण सोडून निघाला तर " सा. प्र. ' आपण इरेस पडलां त्यापेक्षां आमचे प्राण वांचत नाहींत. परंतु प्राणाची आशा धरून आज्ञा उल्लंघन करून आम्हीं तोंडें मागें मात्र फिरवणार नाहीं. " सां. प्र. येथें संहितेंत घतलेला पाठ क. भाइसं. भा. वगैरे प्रतींत आहे.

११. हा पाठ भाइसं. प्रतींत नाहीं.

१२. ' चमेलीचे घाटें ' हा पाठ सा. व सगजो-प्रतींत आहे. ' रेवाडीचे घाटें ' हा पाठ भाइसं., धो., सां. व क. प्रतींत आहे.

१३. या वाक्याबद्दल पाठ आहेत ते असे–"तुम्ही गनीम आहां. तुम्ही घाट धरले. ते हीं कर्में मोंगलांचीं. तुम्हांस घाट बांधणें सोसणार नाहीं. तुम्ही घाट सोडून दुरून गलिमी काव्यानें रहाल तर आम्ही किला राखतो " सा. व सगजो. प्रत. शेवटच्या वाक्याबद्दल शें. प्रतीचा पाठ असा–' गलिमी काव्यानें राहिला तरी ठीक नाहीं.' भाइसं. प्रतीचा पाठ असा–' त्यांणीं घाट धरिले तेव्हां आपलेकडील लोकांस घाट धरणें होणार नाहीं. तुम्ही घाट सोडून दुरोन गलीम कोठें राहिला तरी ठीक नाहीं. आम्ही किला राखतों. "

७५. तों दुराणीयाची फौज व तोफा[१४] पलीकडील तीरीं येऊन दाखल जाहाल्या. गलिमाचा काल आनकूल नाहीं, प्रतिकूल जाहला; म्हणोन **यमुनेनें** वाट त्यास दिल्ही. पलीकडील[१५] तोफांचा मार जाहला. तेव्हां **जानराव बाबल्यांचा** घाटावर दम निघेनासा जाहला. उंटावरील सुतरनाला व हतीवरील हस्तनाला पुढें घालून मागें फौज तडाखा उतरू लागले. तों पांच घटका दिवस आला होता. इतकियांत **जानराव बांबले** याजकडील स्वार धांवत आला कीं, "**पाटीलबावा**, तुम्ही काय म्हणोन स्वस्थ बसला ? दुराणीची फौज आर्धी यमुनापार जाहालीं.[१६] आम्हांस घाटावर ठरूं[१७] देत नाहीं. तोफांनीं शंभर दीडशें मनुष्यें ठार जाहालीं." आसें वर्तमान ऐकतांच **दताजी सिंदे** यांजपासी **साबाजी सिंदे** यांचा पुत्र बयाजी सिंदे बसले होते. त्यांस आज्ञा केली कीं, "बयाजीबाबा, तुम्ही **जानराव बांबले** यांची कुमक करावी." असा हुकूम होतांच **बयाजी सिंदे** यांणीं उठोन तसलीम केली आणि जाबसाल केला कीं, "**पाटीलसाहेब**, आम्ही लाहूराहून आलों [तें] गिलज्यासीं युद्ध करून पलून आलों[१८] म्हणोन आपल्या चितांत सौंषय आला होता. चालीस हजार फौज दुराणीची. [त्या] फौजेपुढें आम्हीं च्यार[१९] हजारांनीं काय करावें ? आस्तु. आतांहि प्रसंग आहे. खावंदहि जवल आहेत. बहुत दिवस साहेबाचें निमक भक्षिलें आहे. शेवा घडेल ती रूबरू[२०] द्रष्टीनें पाहावी." आसें म्हणतांच **दताजी सिंदे** यांणीं प्रत्योतर केलें कीं, "**बयाजीबाबा**, तुम्ही हमेशा लढाया करितां. नव्यानें झुंज करीत नाहीं. केलियाचें नवल नाहीं न केलियाचें मात्र नवल. आतां बोलावयास फुरसत[२१] नाहीं, त्वरा करावी." म्हणोन बोलिले. **बयाजी सिंदे** यांणीं पांचसात हजार फौज घेऊन [२२]नदीची झील उतरोन घाटास गेले. तों **दुराणी** वगैरे फौज अलीकडील तीरीं[२३] निम्मी आली. ते समईं **बयाजीबावा** याणीं चितांत योजना केली कीं, "दुराणीची फौज तों नदी उतरली. आतां **दताजी सिंदे** यांस तोंड काय दाखवावें? म्हणोन पांच सात हजार फौजेंतून पंधरा खाशांनिसीं **बयाजी सिंदे** यांणीं घोडे

---

१४. 'दिलीकडील' शें. व भाइसं. प्रती.

१५, 'आलीकडील' भाइसं. प्र.

१६. 'उतरली' सा. व सगजो.

१७. 'येऊं' भाइसं. प्र.

१८. 'युद्धप्रसंग न करतां चुकावून आलों.' सा. प्र. बयाजी सिंदे साबाजीचा पुत्र.

साबाजीस सिंद्यांनीं पंजाबांत 'लाहोरचे नायब करून ६००० फौजेसह पाठविलें होते' (हिंगणें १, १९९) तेथें आबदालीशीं ते लढून पराभूत होऊन परत आले (रा.खं.१; १४०,१४१,१४२).

१९. 'दाहा हजार' सा. प्र.

२०. 'उरुबुरु' सगजो.; 'रूबेरूब' पु. प्र.

२१. 'पुरवत' सा. प्र.

२२. 'यमुना उतरोन' भाइसं. प्र.

२३. 'तों दुराणीची फौज आलीकडील तोंडीं आली. सा.प्र. आलीकडील तीरानजीक' सगजो.

घातले[२४]. त्यांणीं त्यांजवर[२५] घाव घातला. तों **बयाजी सिंदे** यांस गोली लागोन ठार जाहाले. आर्धा मुर्दा वाळवेंत आणि आर्धा पाण्यांत पडला. त्यासमागमें दाहा मनुष्य ठार पडलीं. गलिमाचे फौजेनें आगदींच घाट सोडिला.[२६]. रोहिले व दुराणी यांणीं घाट घेऊन आलीकडील बाजूस उभे राहिले. तोंपर्यंत दताजी सिंदे यांचा दुराणीस धाक सलाबत होती.

७६. इकडे **बयाजी सिंदे** यांजकडील स्वार धांवत आला आणि **दताजी सिंदे** यांसी बोलिला कीं, "पाटीलबाबा, बयाजी सिंदे ठार पडले. मुर्दा त्यांणीं नेला आणि घाट घेऊन फौज जमून[२७] पुढें उभी आहे." आसें ऐकतांच नगारा करून **दताजी सिंदे** घोड्यावर स्वार जाहाले. तों फौज आगोदरच सिध्ध होती. **जनकोजी सिंदे** यांणीं आंगांत बखतर घातलें. **दताजी सिंदे** यांणीं रागास येऊन आंगांतील सामान काढविलें[२८] आणि बोलिले कीं, "आज कांहीं आम्ही युद्ध करीत नाहीं. **मल्हारराव होळकर** नजीक आले आहेत. ते येक दोन दिवसीं येऊन पोहोंचणार, तोंपावेतों काव्यानेंच दुरून राहावें." म्हणोन आपण घोड्यावर स्वार जाहाले. घाटाचे सुमारे चालिले, तों फौज जमून मुजऱ्यास आली. मुजरा करितांच[२९] आज्ञा केली कीं, "निशाणाबराबर चालावें." आसें सांगोन फौज निशाणाबरोबर लाविली. तों यमुनातीरीं आडचण भारी. शेरणीचीं बेटें[३०] होतीं, तीं दिसेनात, आशा आडचणींत शिरले. *मराठियांस पाठीवर काठी उडत[३१] आसली तरी हिंमत* होत नाहीं[३२]. त्यांस दैवयागें करून दडणें(स)[३३] शेरीचीं बेटें सांपडलीं. वीरश्रीची कोणाची शरम कोणास नाहीं. तों निशाणें जाऊन युध्धास तटलीं. ते समईं दोनी तरफानें तोफा व हस्तनाले व सुतरनाले व जेजाला व गंजिफियांच्या गाड्या व रेहेकले

---

२४ 'उठवून दुराणीचे लोकांवर घोडे घातले' सा. प्र. हा पाठ १८७९, १८८६ व भाइसं प्रतींत नाहीं.

२५. 'त्यांनीं त्यांचेकडेस घाव घातला' सा. प्र.

२६. 'गलिमाचे फौजेनें आघाडी घाट सोडून दिल्हे. सगजो प्र.

२७. 'जमावून' सा. प्र.

२८. 'काढिले' भाइसं. प्र.

२९. 'मुजरा करीत त्यांस आज्ञा करीत कीं, तुम्हीं निशाणाबरोबर चलावें.' तुं.प्र.

३०. 'का (मा) ऊस व शेरण्यांचीं बेटें' तुं. प्र.

३१. 'पडत' सगजो.

* "दक्षिणची फौज म्हणजे मऊ लागलें म्हणजे बेजरब घेणार, कठीण लागलें म्हणजे फिरोन मागें पहाणें नाहीं, एशी पूर्वापार या राज्यांतील तऱ्हा," (काव्ये. ले. ३१, पृ. ५२ पहा). हें वर्णन बखरीच्या वर्णनाशीं जमतें. याच्या उलट दुराणी फौजेचें पहा. "आबदाली व रोहिले वरकड मोगलांसारखे नव्हेत, कजाक आहेत. धावावयास व जुंजायास बळकट आहेत." पेद २१, १८८.

३२. 'पाठीवर काठी उडत आसली तरी हिंमत होते.' सा. प्र.

३३. 'दडण भारी' सा. प्र.

७५. तों दुराणीयाची फौज व तोफा[१४] पलीकडील तीरीं येऊन दाखल जाहाल्या. गलिमाचा काल आनकूल नाहीं, प्रतिकूल जाहला; म्हणोन **यमुनेनें** वाट त्यास दिल्ही. पलीकडील[१५] तोफांचा मार जाहला. तेव्हां **जानराव बाबल्यांचा** घाटावर दम निघेनासा जाहला. उंटावरील सुतरनाला व हतीवरील हस्तनाला पुढें घालून मागें फौज तडाखा उतरू लागले. तों पांच घटका दिवस आला होता. इतकियांत **जानराव बांबले** याजकडील स्वार धांवत आला कीं, "**पाटीलबावा**, तुम्ही काय म्हणोन स्वस्थ बसला? दुराणीची फौज आर्धी यमुनापार जाहालीं.[१६] आम्हांस घाटावर ठरूं[१७] देत नाहीं. तोफांनीं शंभर दीडशें मनुष्यें ठार जाहालीं." आसें वर्तमान ऐकतांच **दताजी सिंदे** यांजपासी **साबाजी सिंदे** यांचा पुत्र बयाजी सिंदे बसले होते. त्यांस आज्ञा केली कीं, "बयाजीबाबा, तुम्ही **जानराव बांबले** यांची कुमक करावी." असा हुकूम होतांच **बयाजी सिंदे** यांणीं उठोन तसलीम केली आणि जाबसाल केला कीं, "**पाटीलसाहेब**, आम्ही लाहूराहून आलों [तें] गिलज्यासीं युद्ध करून पलून आलों[१८] म्हणोन आपल्या चितांत सौंषय आला होता. चालीस हजार फौज दुराणीची. [त्या] फौजेपुढें आम्हीं च्यार[१९] हजारांनीं काय करावें? आस्तु. आतांहि प्रसंग आहे. खावंदहि जवल आहेत. बहुत दिवस साहेबाचें निमक भक्षिलें आहे. शेवा घडेल ती रूबरू[२०] द्रष्टीनें पाहावी." आसें म्हणतांच **दताजी सिंदे** यांणीं प्रत्योतर केलें कीं, "**बयाजीबाबा**, तुम्ही हमेशा लढाया करितां. नव्यानें झुंज करीत नाहीं. केलियाचें नवल नाहीं न केलियाचें मात्र नवल. आतां बोलावयास फुरसत[२१] नाहीं, त्वरा करावी." म्हणोन बोलिले. **बयाजी सिंदे** यांणीं पांचसात हजार फौज घेऊन [२२]नदीची झील उतरोन घाटास गेले. तों **दुराणी** वगैरे फौज अलीकडील तीरीं[२३] निम्मी आली. ते समईं **बयाजीबावा** याणीं चितांत योजना केली कीं, "दुराणीची फौज तों नदी उतरली. आतां **दताजी सिंदे** यांस तोंड काय दाखवावें? म्हणोन पांच सात हजार फौजेंतून पंधरा खाशांनिसीं **बयाजी सिंदे** यांणीं घोडे

---

१४. 'दिलीकडील' शें. व भाइसं. प्रती.

१५. 'आलीकडील' भाइसं. प्र.

१६. 'उतरली' सा. व सगजो.

१७. 'येऊं' भाइसं. प्र.

१८. 'युद्धप्रसंग न करतां चुकावून आलों.' सा. प्र. बयाजी सिंदे साबाजीचा पुत्र.

साबाजीस सिंद्यांनीं पंजाबांत 'लाहोरचे नायब करून ६००० फौजेसह पाठविलें होते' (हिंगणें १, १९९) तेथें आबदालीशीं ते लढून पराभूत होऊन परत आले (रा.खं.१; १४०,१४१,१४२).

१९. 'दाहा हजार' सा. प्र.

२०. 'उरुबुरु' सगजो.; 'रूबेरूब' पु. प्र.

२१. 'पुरवत' सा. प्र.

२२. 'यमुना उतरोन' भाइसं. प्र.

२३. 'तों दुराणीची फौज आलीकडील तोंडीं आली. सा.प्र. आलीकडील तीरानजीक' सगजो.

घातले[२४]. त्यांणीं त्यांजवर[२५] घाव घातला. तों **बयाजी सिंदे** यांस गोली लागोन ठार जाहाले. आर्धा मुर्दा वाळवेंत आणि आर्धा पाण्यांत पडला. त्यासमागमें दाहा मनुष्य ठार पडलीं. गलिमाचे फौजेनें आगदींच घाट सोडिला.[२६]. रोहिले व दुराणी यांणीं घाट घेऊन आलीकडील बाजूस उभे राहिले. तोंपर्यंत दताजी सिंदे यांचा दुराणीस धाक सलाबत होती.

७६. इकडे **बयाजी सिंदे** यांजकडील स्वार धांवत आला आणि **दताजी सिंदे** यांसी बोलिला कीं, "पाटीलबाबा, बयाजी सिंदे ठार पडले. मुर्दा त्यांणीं नेला आणि घाट घेऊन फौज जमून[२७] पुढें उभी आहे." आसें ऐकतांच नगारा करून **दताजी सिंदे** घोड्यावर स्वार जाहाले. तों फौज आगोदरच सिध्ध होती. **जनकोजी सिंदे** यांणीं आंगांत बखतर घातलें. **दताजी सिंदे** यांणीं रागास येऊन आंगांतील सामान काढविलें[२८] आणि बोलिले कीं, "आज कांहीं आम्ही युद्ध करीत नाहीं. **मल्हारराव होळकर** नजीक आले आहेत. ते येक दोन दिवसीं येऊन पोहोंचणार, तोंपावेतों काव्यानेंच दुरून राहावें." म्हणोन आपण घोड्यावर स्वार जाहाले. घाटाचे सुमारे चालिले, तों फौज जमून मुजऱ्यास आली. मुजरा करितांच[२९] आज्ञा केली कीं, "निशाणाबराबर चालावें." आसें सांगोन फौज निशाणाबरोबर लाविली. तों यमुनातीरीं आडचण भारी. शेरणीचीं बेटें[३०] होतीं, तीं दिसेनात, आशा आडचणींत शिरले. *मराठियांस पाठीवर काठी उडत[३१] आसली तरी हिंमत* होत नाहीं[३२]. त्यांस दैवयागें करून दडणें(स)[३३] शेरीचीं बेटें सांपडलीं. वीरश्रीची कोणाची शरम कोणास नाहीं. तों निशाणें जाऊन युध्धास तटलीं. ते समईं दोनी तरफानें तोफा व हस्तनाले व सुतरनाले व जेजाला व गंजिफियांच्या गाड्या व रेहेकले

---

२४ 'उठवून दुराणीचे लोकांवर घोडे घातले' सा. प्र. हा पाठ १८७९, १८८६ व भाइसं प्रतींत नाहीं.

२५. 'त्यांनीं त्यांचेकडेस घाव घातला' सा. प्र.

२६. 'गलिमाचे फौजेनें आघाडी घाट सोडून दिल्हे. सगजो प्र.

२७. 'जमावून' सा. प्र.

२८. 'काढिले' भाइसं. प्र.

२९. 'मुजरा करीत त्यांस आज्ञा करीत कीं, तुम्हीं निशाणाबरोबर चलावें.' तुं.प्र.

३०. 'का (मा) ऊस व शेरण्यांचीं बेटें' तुं. प्र.

३१. 'पडत' सगजो.

* "दक्षिणची फौज म्हणजे मऊ लागलें म्हणजे बेजरब घेणार, कठीण लागलें म्हणजे फिरोन मागें पहाणें नाहीं, एशी पूर्वापार या राज्यांतील तऱ्हा," (काव्ये. ले. ३१, पृ. ५२ पहा). हें वर्णन बखरीच्या वर्णनाशीं जमतें. याच्या उलट दुराणी फौजेचें पहा. "आबदाली व रोहिले वरकड मोगलांसारखे नव्हेत, कजाक आहेत. धावाबयास व जुंजायास बळकट आहेत." पेद २१, १८८.

३२. 'पाठीवर काठी उडत आसली तरी हिंमत होते.' सा. प्र.

३३. 'दडण भारी' सा. प्र.

व गरनाला वगैरे गारभांडीं व बंदुखांची मारगिरी गिलज्यांनीं केली; कीं, जैसे भडबुंजे लाहचा भाजतात, कीं विद्युलतापात होतो, तैसा येक धडाका जाहाला; मोठी गरदी जाहाली. बाणांचा वर्षाव परजन्यधारांप्रमाणें[३४] जाहाला. घोडीं माणसें धुंद जाहालीं. धुराची गरदी जाहाली. कोणी कोणास वोलखीनासा जाहाला.[३५] मोठे मोठे वीर, त्यांच्या वीरश्रिया उतरल्या. आलीकडे मराठे यांणीं झुंज याप्रमाणें पाहिलें नाहीं. 'न भूतो न भविष्यति' आसी गरदी जाहाली. त्याप्रसंगीं जे आसतील त्यास मात्र तो आनुभव ठाऊक आसेल. चौहूंकडून धडाका येकसारिखा दोन घटकांपर्यंत होत होता. तेथून दोन कोशांवर घाट होता. तेथें **गोविंदपंत बुंदेले** होते. तिकडून त्यांणीं **यमुना** उतरून परस्परें मार ऐकून रानभरी[३६] जाहाले. यांजकडे यावयास फुरसत जाहाली नाहीं. पांचसातसें खाशियांचीं डोचकीं कापून न्हेलीं. तसेंच **दिली राजघाटावर मालोजी सिंदे** [होते] तेहि घाटावरून उधळून[३७] **शाहाघड्यानजीक** घाट उतरून, बाणाचे खास्तीवर आले. तिकडूनहि फौजा आल्या. **मालोजी सिंदे** यांची फौज झाडून यांसीं पोटासी सांपडली. त्याजमुळें ज्यांचें आयुष्य सरलें नाहीं[३८] ते मात्र निभाऊन आले. खांसा **मालोजी सिंदे** बाणाच्या खास्तीनें[३९] निघाले होते. त्याणीं चितांत योजना केली कीं, "**दताजी सिंदे** आम्हांदेखतां बहुतांची टीका करितात. आतां आम्हीं त्यांस तोंड काय म्हणोन दाखवावें?" म्हणोन याणीं घोडे घातले.[४०] हे त्यांतच गैरबात[४१] जाहाले. त्यांचा मुरदा कोणी ष्टीनें देखिला नाहीं. इकडे **दताजी सिंदे** यांजकडे तुंबल युध्ध होतच होतें निशाणापाशीं पांचशेंहि स्वार[४२] नाहींत. त्यांत आधींच मराठ फौज; हिंमत पकी[४३] नाहीं. त्यांत आडचण होती. त्या योगेंकडून आडचणींतच फौज गैबत[४४] जाहाली. चालीस हजार फौज; थोडी न्हवें. परंतु आडचणींतच; कांहीं दिसेनासें जाहालें. इकडे निशाणाकडे **जनकोजी सिंदे** झोंबतच[४५] होते. **दताजी सिंदे** निशाणाचे

---

३४. 'मेघमालांप्रमाणें' सा. व सगजो प्रत.

३५. 'तेणेंकरून कोणी कोणास दिसेनासे जाहाले' असा पाठ सा. प्र. मध्यें आहे; परंतु तो १८७९ व १८८६ सां. मध्यें नाहीं.

३६. 'गोविंदपंत बुंदेले यांस तिकडेच ताण बसविला. ते तिकडेसच रानभरी जाहाले' सा. प्र.

३७. 'उतरून' मं. प्र.

३८. 'आयुष्य पुरतें ते मात्र वांचले, सा. प्र.

३९. 'खास्तीनें खालीं होते.' भाइसंप्र.

४०. 'असें मनांत आणून घोडा उठवून दुराणीचे लोकांवर जाऊन पडले' क. प्र.

४१. 'गैबत' सा. प्र. 'गैब' शें व सगजो.

४२. 'फौज' सा. व सगजो; 'पांच हजार स्वार' शें. प्र.

४३. 'भारी' सा. प्र.

४४. 'मैगत' भाइसं प्र.

४५. 'झटतच' सा. प्र. टीप.

बाजूस[४६] उजवेकडे होते. दिलीचे बाजूस उजवेकडे पंचवीस खांसे व आपण उभे होते. गिलज्यांस त्यांची दहशत[४७] होतीच. फौज भारी[४८]. परंतु हिंमत धरून बेलाशक आंगावर कोणी येईनात. परस्पर झोटधरणी होतच होती. हतीवरील घटका वाजत होती. आठ घटका पूर्ण भरल्या.[४९] त्याच आडचणींत पांचशें मनुष्यें ठार जाहाले. तैसी घोडींहि पडलीं. तैसेंच जखमीहि जाहाले. केवल शेणसडा होऊन गेला! ते समईं जवल **तानाजी** खराडा म्हणोन सरदार होता, त्यांणें आर्ज केला कीं, "पाटीलबावा, दुराणीची फौज झाडून उतरली, **गोविंदपंत बुंदेले** तों तिकडेच बुडविले. तसेंच **मालोजी सिंदे** यांचा ठिकाण नाहीं. निशाण उघडें पडलें. आबरू जाणेचा प्रसंग. निशाण काढतां उतम आहे." आसें म्हणतांच **दताजी सिंदे** यांणीं उतर केलें कीं, "आप मेला जग बुडालें. आबरू जाते आणि वांचतो कोण? आजून निघावयाची काय बाकी राहिली आहे? सफेजंगी[५०] होऊन गेली, आतां निशाण काढाल तर फौज पळूं लागेल. मग म्यांहि पलावें? मग देशीं तोंड मीं **दताजीनें** काय म्हणोन दाखवावें?" आसें बोलिल्यावर **तानाजी खराडे** मागती बोलिले कीं, "पूर्वीपासून देव, दैत्य, दानव काय करीत आले?[५१] त्यांत आम्ही मृत्य पावलों. मृत्यलोकीचीं माणसें पडलों. आल्या वेळेस मान द्यावा. या समईं काळावर नजर देऊन निघावें." म्हणोन बोलिल्यावर **दताजी सिंदे** यांणीं साफ सांगितलें कीं, "हा **खंदारचा** पातशाहा **आबदुल आली** चालोन आला आहे. या रानांत ईश्वरें मृत्यु आणिला तरी उतम आहे. योगी, संन्यासी, तपस्वी नाना प्रकारचें देहदंडण करितात कीं, मोक्षसाधन व्हावें. त्यांत आम्हां क्षेत्रियां स्वधर्म[५२] हाच कीं रणांत विनमुख होऊं नये[५३] म्हणोन सर्व साधनें साधिलीं. तेंहि कर्म ईश्वरें दाटून वोढून[५४] आणिलें. आशांत कोणी आभाग्य आसेल तो विनमुख होईल. रण सोडून निघाल्यास दोंहीसहि मुकावें; इकडे नर्कसाधन, इकडे आपेश; मरणाहून[५५] वोखटें; यांत मरतांच उतम" म्हणोन गाडून[५६] उभे राहिले.

---

४६. 'बादलेस उभें होते' सगजो. 'ब प केस उजवे' सां. व तुं. प्रत.

४७. 'धास्त' सा. प्र.

४८. 'इतकी फौज हिंमत सोडून होती; परंतु तेहि लोक बेलाशक आंगावर येईनात.' सा. प्र.

४९. 'जाहाल्या' पाठभेद. 'आठ घटका दिवस आला.' क. प्र.

५०. 'सबगहा' सगजो.

५१. 'गेले' सा. प्र.

५२. 'स्वकर्म हेंच कीं' तुं. प्र.

५३. 'रणांत विन्मुख न होतां मृत्यु आल्यास' सा. प्र.; 'रणांत सन्मुख मृत्यु आल्यास' सा. प्र. टीप.

५४. 'चालून' भाइसं. प्र.

५५. 'इकडे आपेश मरणाहून निंद्य' सगजो.

५६. 'गांठून' तुं. प्र.; 'मनाचा खंबीर करून' क. प्र.

७७. तों इकडे **जनकोजी सिंदे** निशाणापासीं झोंबत होते. त्यांचे उजवे दंडास येकायेकीं गोली लागोन दंड मोडला, हाड बाहेर आलें.* **जनकोजी सिंदे** यांस कलम[५७] येऊन घोडयाखालीं आले. तों जवळ खिजमतगार उभा होता. तो धांवत **दताजी सिंदे** यांजकडे आला आणि घाबरेपणें वर्तमान सांगितलें कीं, "**बाबासाहेब** गोळी लागोन पडले." आसें वर्तमान ऐकतांच **दताजी सिंदे** यांणीं जवळ लोक उभे होते त्यांस बोलिले कीं; "**बाबा** आम्हांस सोडून गेले. आतां आम्हांस देशीं तोंड दाखवावयाचें कारण नाहीं. रणांत[५८] मृत्यु आला तर उतम[५८] आहे; नाहीं तर विष खाऊन प्राण द्यावा." आसें बोलोन **दताजी सिंदे** यांजपुढें दाहा[५९] हजार **कुतुबशाहा** व दुराणीचे लोक उभे होते, त्यांजवर अठरा असामींनीं[६०] घोडीं घातलीं. घोडयांचीं[६१] तोंडें सिरतात तों आकरा खांसे ठार पडले. जात्या खाशांनीं धाव केला. निघावयास जागा नाहीं. तेथून माघारे गोळियाचे माऱ्यांत निघाले. तों **यशवंतराव जगदाळे थोराळकर**[६२] यांस गोली लागोन ठार पडले. त्यांचा भाऊ **पिराजी जगदाळाहि** समागमेंच होता. त्याणें भावाचे मुर्द्यासाठीं बहूत प्रत्नें, काढावा म्हणोन केला. **पाटील** यांणीं लालमणी[६३] घोडयाचें तोंड किंचित माघारे फिरऊन 'मुडदा ओढा ओढा[६४]' म्हणोन बोलतात तों येकायेकींच ये (आ) काशाची दोरी तुटली, तसी गोली बगलेस बरगडीस[६५] लागोन (**दताजी पाटील**) घोडीखालीं[६६] आले. तों नजीक **तानाजी**[६७] व **राजाराम चोपदार** व **राघोबा शेणवी** पागनीस जवल होते. त्यांणीं इत्यर्थ केला कीं, "बहूत दिवस यांचें आन्न भक्षिलें आणि पाहिजे तितके विलास[६८] यांच्या जिवावर केले. आतां यांस टाकोन जावें याहून मरण बरें."

---

* जनकोजी जखमी–पेद २, ११४; पेद २७. २४७, पेद २१, १८२; १८५; रा. खं. ३, ५१६.

५७. 'तव' सा. प्र.; 'तवई, सगजो.=घेरी, भोवळ, मूर्च्छा.

५८. या सर्व वाक्याबद्दल भाइसं. प्रतींत 'मरावें' एवढाच शब्द आहे.

५९. हा शब्द शें. व भाइसं. प्रतींत नाहीं.

६०. 'असामीनिसीं' सा. प्र.

६१. "त्यांचे फळींत घोडयांची तोंडें फिरतात तों अकरा असामी ठार पडले. खाशास निघावयास जागा नाहीं. तेथून गोलीचे टप्यावर फळींतून पार पडून निघाले" असा क. प्रतीचा पाठ.

६२. 'थोराळेकर' सा. प्र.

६३. 'कल्याणी' असेंहि वाचतां येईल.

६४. 'वोलखावा' भाइसं. प्र.

६५. दत्ताजीस गोळी कोठें लागली ? 'मानेवर' रा. खं. १, १६५; नुरुद्दिन म्हणतो 'डोळयांत.' ऐ. प. पृ. ४५२; बखर 'बरगडीस'.

६६. 'घोडयाखालीं' सा. प्र.

६७. तानाजी खराडयाचें नांव भाइसं. शें., क., सां. वगैरे प्रतींत आ सा. प्र. देत नाहीं.

६८. 'सुख' भाइसं. प्र.

म्हणोन घोड्यावरून उतरले. तों [दताजी] घायाल होते, प्राण कांहीं गेला नवता*. घायाल काढावा तरी त्यांजकडील फौजेनें निकड बसविली.[६९] घायाल काढावयास फुरसत[७०] नाहीं. तों **नजीबखान रोहिला** याचा गुरु **कुतुबशाहा** आंबारींत बसोन आला. त्यास **राघोबा पागनीस, राजाराम चोपदार**[७१] यास म्हणाला कीं, "तुम्हीं **कुतुबशाहा** याजपावेतों जावें आणि **'दताजी सदे** घायाल रणांत' म्हणोन सांगावें कीं, 'तुम्ही यांचा बचाव कराबा.' नाहीं तरी **आबदुल आली** दुराणी हरामी याची गांठ पडली तरी आमचीं व पाटील यांचीं सिरें कापून नेतील, त्यापेक्षां त्याजकडे पाडाव सांपडले तरी उत्तम." म्हणून **राजाराम चोपदार** यास पाठविला. तों **कुतुबशाहाची** आंबारी जवल नजीक आली. त्यास **राजाराम चोपदार** याणें मुजरा केला. रात्रंदिवस येणेंजाणें सहजच होतें. ओलख पूर्वीचीच होंती[७२]. तेव्हां त्याणें पुसिलें कीं, "**राजाराम**, तुम उदर काहां[७३] ?" म्हणोन अविधी भाषेनें पुसलें. त्याणेंहि खरें वर्तमान सांगितलें कीं, "साहेब, पटेल घायाल पडा है, या बचावे.' आसें म्हणतांच **कुतुबशाहास** बहूत आनंद जाहाला· इक्षुदंडांतूनच शर्करा सांपडते किंवा तु प गी च[७४] नवनीत सांपडतें, तेंसा आनायासें करून लाभ जाहला; आणि बोलिला कीं, "पटेल कहां है ? दिखलाव." म्हणोन तैसेच आंबारीसुद्धां **राजाराम** याणें जेथें **दताजी सिंदे** घायाल पडले होते तेथें आले. अंबारींतून उतरून जवळ आला.[७५] तों **दताजी** सिंदे उताणे पडले होते तेथें **कुतुबशाहा** याणें जाबसाल केला कीं, "**पटेल** हमारे साथ तुम और लढेंगे ?[७६] म्हणोन पुसले **दताजी**

---

* घाटावरील ही लढाई ता. १० जानेवारी १७६० रोजीं झाली. तींत दत्ताजीचा वध झाला. श. १६८१ पौष व. ८ गुरुवार सकाळीं प्रहर दिवसास.

आधार:—रा. खं. १, १५६, १६५, रा. खं. २ पृ. १५४. पेद. २७, २४७; पेद, २, ११४; पेद. २१, १८१, १८२, १८५; रा. खं. ३, ५१६; फा. १, २२०; खरे १, १४.

६९. 'फौजेची निकड बसली' सा.प्र.

७०. 'फुरसत पडेनासी जाली' सा.प्र.

७१. 'राजाराम चोपदार याचें नांव कागदोपत्रीं सांपडतें' असें ग्वाल्हेरीहून श्री. फाळके कळवितात.

७२. 'ओलखीचे होते' भा. प्र.

७३. 'राजाराम तुम कहो' सगजो. 'तुम्ही उपर कहाँ ?'' भाइसं. प्र. 'तुम उदर कहां ?'' शें. प्र. 'तूं कहां?' सा. प्र. याच्यापुढें क. प्र. चा असा पाठ आहे. "कुतुबशाहास बोलिला कीं तुम्ही उपकारी आहां, म्हणून आविधी भाषेनें नेकजात पुरुष आहां-याजकरितां तुम्हांकडे आलों."

७४. 'दुधांतून नवनीत' असें घेतलें, तरच याचा अर्थ स्पष्ट होईल असें साने लिहितात.

७५. या वाक्याऐवजीं सां. प्रतीचा पाठ असा. "कुतुबशाहा अंबारींतून दताजी सिंदे यांस बोलिला की, पाटील आमचे अंबारीचे पुढें बसावें. शत्रूस शरण जावयाचे नाहीं म्हणून दताजीने उत्तर केलें कीं, 'यांतून वांचलों तरी तुमचे अंबारीपुढें बसवीन.'

७६. 'पटेल तुम आगे बैटंगे' भाइसं. व भा. प्रति. 'पटेल, हमारे पास अंबारीके आगे बैठना म्हणून बोलला.' क.प्र.

सिंदे सावध होते. त्यांस पुर्ते उमजले कीं, हें कांहीं आपणांस वाचवीत नाहींत मग व्यंग[७७] गोष्टी सांगणें हें विहीत नव्हे." म्हणोन दम बांधोन जाबसाल केला कीं, "[इन्]शा अला- -ताला ! **बचेंगे तो औरबी लढेंगे.**" आसे ऐकतांच **कुतुबशाहा** याणें कमरेचा सुरा काढोन, लाथेनें ढकलून, पालथा घालून, **दताजी सिंदे** यांचा सिरछेद केला. **राघोबा पागे** व **राजाराम** चोपदार यांणीं बहूत ग्लानता केली कीं, "साहेब इसको बच्चाव करना, क्रोड रुपये पाहिजे तरी देऊं." म्हणोन बोलिले. परंतु यांणीं न ऐकून आपले महत्कार्य[७८] साधलें. तों आठ घटिका दिवस आला होता. तों **कुतुबशाहा** याणें सीर भाल्यास टोंचून[७९] साहादानें वाजवीत जाते जाहाले. फते जाहाली म्हणोन **नजीबखान** याजकडे वर्तमान गेलें. तो **कुतुबशाहाहि** जाऊन पोहोंचला. आणि सीर त्यांणीं काढून रुमालांत घातलें.[८०]

---

७७. 'वेग' भा. प्र. 'वयग येऊन' भाइसं प्र.

७८. 'मतलबे कार्य' भाइसं. प्र.

७९. 'खोऊन' सा व सगजो प्रती. 'ठेऊन' मं. प्र. 'जोडून' शें. प्र.

८०. राजवाडे म्हणतात कीं, 'कागदपत्रांत दताजीचें शिर कापल्याचा कोठेंच उल्लेख नाहीं. तेव्हां बखरीचें हें हृदयद्रावक वर्णन काल्पनिक आहे' (रा. खं. १ पृ. २५६ टीप)

प्रकरण ८ वें

जनकोजी शिंदे ससैन्य कोटपुतळीस पळत येतात.

७८. तों इकडे **दताजी सिंदे** घायाळ खालीं[१] आले. त्यांजवल[२] त्यांचेखालील लालमणी[३] घोडा होता तो, **तानाजी खराडे**[४] यांणीं घेऊन निशाणाकडे आले. तों निशाणापासी लोक बहुतकरून झोंबत होते. ते समईं निशाणाजवळ दोन च्यार सरदार होते त्यांस **तानाजी खराडे** यानें जाबसाल केला कीं, "यार हो, आतां निशाण* काढावें. नाहींतर[५] निशाण निघत नाहीं." लोकांनीं जाबसाल केला कीं, "निशाण येथें आहे म्हणोन दम पडला आहे. निशाण निघालियावर कोणी कोणाचे द्रष्टीस पडणार नाहीं." असें ऐकोन **तानाजी खराडे**[६] यांणीं साफ सांगितलें कीं, "तुम्ही कोणाचे भिस्तीवर झुंजता ! **दताजी सिंदे** तों रणीं पडले!! **जनकोजी सिंदे**हि पडले म्हणोन ऐकतों; मग त्यांची गत काय जाहाली असेल ती असो. प्रस्तुत **दताजी सिंदे** यांजखालील घोडा लालमणी, हा आम्हीं आणिला' म्हणोन प्रत्यक्ष दाखवितांच लोकांनीं अवसानें सोडिलीं; आणि दम खातखात निशाण§ आडचणींत झील उतरून मइदानांत आले[७]. तों **जनकोजी सिंदे** यांसी घायाळच घोडीवर घातले. तों झाडून फौज झुरेमुरेनें[८] बाहेर मइदानांत आली[९]. दुराणी व रोहिला पाठीवरच आला. पांच हती व सडे बुणगें‡ खासे, वरकड[१०] लोकाकडील हती आठरा[१०], वरकड सारे बुणगे तळावर[११] उभे होते. त्यांत **सदी[प]बेग** याचीं मुलें बुणगियासमागमें होतीं, परंतु त्याचा दिवाण **लक्ष्मी नारायण** व पांच हजार फौज तळावर[११] उभी होती. त्यांजवर[१२] चहोंकडून दुराणी याची

१. हा शब्द भाइसं.मध्यें नाहीं.
२. हा शब्द सा. १९२२ मध्यें नाहीं.
३. 'घोडी पंचकल्याणी पुठ्यावर डागिली होती. तिचें नांव कलमणी' सा १९२२. कलमणी शें. प्रत
४. खंडेराव भाइसं. प्रत. [निशाण * शेषचिन्हांकित जरीपटका. सिंदे–
५. मग शें. प्रत.
६. सिंदे भाइसं. प्रत
§ लहान खणखणीत, चर्मवाद्य.
७. आणिले शें.
८. झुरूमुरून मं.; झुरमुरून भा. झुरेमुरे सा.; झुमरून शें. = सरासरी जीव धरून, झुरतपडत. मोठ्या कष्टानें,
९. येथें'तों पाईचे लोक' हे तीन शब्द भाइसंमध्यें असून 'रोहिला' हा शब्द सा. व सगजो प्रतींत आहे. सा. १९२२ मध्यें 'पाईचे लोक' हें नाहीं. = पायदळ.
‡ सैन्यांतील गैरलढाऊ लोक.
१०. हे चार शब्द सा. १९२२ मध्यें नाहींत; भाइसं. मध्यें आहेत.
११. तटावर भाइसं.
१२. हा शब्द साने प्र. त नाहीं व भाइसं.मध्यें आहे.

व रोहिले याची मिठी पडली[१३]. मग भले§ लोकांनीं एकदांच[१४] घोड्यांस चाबूक लाविले[१५]. तीस हजार फौज आर्धकोसपर्यंत ताफाच्या ताफा[१६] एकदांच[१४] आरडाओरडा जाहाला. कोणी कोणास पुसेनासें जाहालें. बाप लेक भाऊ एकमेकास[१४] उभे राहिनात. दे माय[१७] धरणी ठाव, असा प्रकार गिलच्यानें केला. ते समयीं **येसाजी भोइटे** व **जानराव वांबले** याणी निकड[१८] करून **जनकोजी सिंदे** यांस घोड्यावर बसवून दोन्ही बाजूंस[१९] धरून फौज तडक[२०] पळूं लागली. घायाळ याणी 'पाणी' म्हट-ल्यास पाणी द्यावयास दम निघेना. एवढा तालेवार याचा दैवयोग या रीतीनें[२१]! असो. गिलज्या पाठीवर चढोन[२२] डोचकीं कापीत चालिला. चांगला[२३] भला मनुष्य याची कोणी कुमक[२४] करीनात.

७२. इतकियांत इकडे तळावर बुणगे व **लक्ष्मीनारायण** व हत्ती[२५] उभें होते. त्यांजवर मिठी येऊन पडली.[२३] ते समयीं हतीवरील माहात आबरूचे होते. त्याणीं क्षणभर फौजेंत रणखंदल[२६] करून मारामारी केली. तों महात यास मानेस गोळा लागोन खालीं येतांच हती मोकळा जाहाला. तों ते त्यांजकडे सहजच हस्तगत जाहाले. त्यांत येक **बडेखान** महात याणे **जव्हारगज** म्हणोन बरा नामी हती जलद व मर्द होता, तो दोन कोसपर्यंत काढिला.[२७] तळावर सडे बुणगे व हती व अंबारी व खजिना निघूं पावला नाहीं. तीं तळावरच लुटलीं. बहुतकरून मनुष्य व खिस-मतगार व पालखीचे भोई यांचा सिरच्छेद जाहाला[२८]. कोणी[२९] दैवयोगेंकरून थोडके वाचले असतील[२९]. **लक्ष्मीनारायण लाहूरचा** सुभा[३०] तळावर होता. त्याणी गलिमाची कीर्ति ऐकत होते. गनिमानीं पलावें, मागती उलटून[३१] घोडे घालावें, म्हणोन ऐकत होते. त्याजवरून **लक्ष्मीनारायण** आपले लोकांस[३२] सांगत की, "यार

---

१३. बसली सा. १९२२

§ पथकप्रमुख; सरदार.

१४. हा शब्द भाइसंमधील आहे.

१५. केले सा. १९२२

१६. तोफामुळें भाइसं.

१७. साने १९२२ मध्यें हा शब्द नाहीं.

१८. कडनिकड सा. १९२२ प्रतींत.

१९. येथें 'सावरून' हा शब्द भाइसं मध्यें आहे; सा. २२ मध्यें नाहीं.

२०. फौजेंत सा. २२ मध्यें आहे.

२१. या रीतीची गत जाली सा. २२ मध्यें आहे.

२२. हा शब्द भाइसं मध्यें आहे. = चढ करून, चालून जाऊन.

२३. सांडवला सा. २२ मध्यें आहे.

२४. हुकूम मानीनात क. प्रत.

२५. हा शब्द भाइसं मध्यें नाहीं.

२६. रणखुंदल सा. १९२२.

२७. 'होता' असा शब्द सा.२२ मध्यें अधिक आहे.

२८. केले असा पाठ सा२२मध्यें आहे.

२९. हा शब्द भाइसं मध्यें नाहीं.

३०. सुभा हा शब्द भाइसं.मध्यें नाहीं.

३१. उठून भाइसं.

३२. वरचेवर सांगत कीं, हे शब्द सा. १९२२ मध्यें आहेत.

हो, भागो मत; मराठियाचे गलिमी काम आहे[३३]; सारे जमले म्हणजे माघारे उलटतात; ते आतां येतील; मारु, मारु[३३]; म्हणोन त्याणी क्षणभर तट घालून मारामार केली. त्याची जमा[३४] थोडी. मराठे याणीं पुरताच[३५] कावा केला असे[३६]. **लक्ष्मीनारायण**[३७] याची फौज तलावर मारामार करून खतल जाहाले. पांचशे[३८] फौज पांच हजारांत याची उरली[३८]. तों गनिमांचा धुरळा द्रष्टीस पडेनासा जाहाला. पांचशें खाशांनिसी दोन कोसांवर **जव्हरगज**[३९] हती निघाला होता. दुराणीची मिठी भारी बसली होती. मराठे हती सोडून चालिले. **बडेखान** महात बोलिला कीं, "यार हो, तुम्ही दम खात निघावें. या वेळपर्यंत येथवर आणिले;[३९] आतां निभावून नेणें." म्हणोन बहुतप्रकारें सांगितलें. परंतु मराठे मनुष्य पळूं लागलियावर कोणाची इरा* कोणास नाहींशी जाहाली[४०]. जें रांडेनें सावलें[४१] हुसकलें तरी बारा गांव पळणार.[४२] तेथें हतीची गत काय? खासा **जनकोजी शिंदे** येवढा सरदार घायाल 'पाणी पाणी' म्हणोन बोलत; परंतु वाटेनें कोणी दम धरून पाणी पाजीनात. तेथें हती कोण जिनस! मग **बडेखान** माहात याणें जाबसाल केला कीं, 'यार हो, तुम्ही तों दम खात नाहीं. परंतु क्षणभर उभे राहून माझा तरी तमाशा पहावा." म्हणोन मागें फौज दुराणीची होती. त्यांत हती चालवून क्षणभर मारामार केली.[४३] मग त्यांणीं भाले लावून हती व माहात पाडाव करून चालविला.

८०. इकडे **शिंदे** यांची गत ही[४४] जाली; तों **दिलीचे** किल्यांत **गाजुदीखान** वजीर होता; त्याणीं किला टाकून **कालिका भवानी**कडून तडक[४५] पळून पाचसात कोसांवर **जनकोजी शिंदे** यांची फौज गांठिली. तोहि त्याचे समागमें पळूं

---

३३. 'अब सायतमें उलट आन पोचतात. मारो मारो, अब सायतमें उलटे' हें वरील ऐवजीं सा. १९२२ प्रतींत आहे. साजत-सायत म्हणजे तास, घटका.

३४. 'जमा थोडी' बदल 'जड काय' सा. १९२२. प्रत.

३५. गनिमी हा शब्द सा. १९२२ प्रतींत अधिक आहे.

३६. असो. शें. प्र.; असे भाइसं.

३७. 'दंगा होऊन,' असें लक्ष्मीनारायण हचा जागीं सा. २२ प्रतींत आहे.

३८. मग लक्ष्मीनारायण पांचशें खाशांनिशीं सा. १९२२.

३९. हती सा. प्रत १९२२

* (ईर्षा) आस्था; पर्वा.

§ हलक्या प्रतीचें लुगडें. 'स्तेन भले, न स्त्रीचा नग्न करुनि हरुनि सावले काय' मोरोपंत, सोवले. शें. पळतील सा.

४०. होते सा. २२

४१. हुसकटले सा. १९२२.

४२. येथें 'असें हवालदिल जाहाले' हें वाक्य सा. १९२२ मध्यें आहे.

§ पराक्रम.

४३. शेपन्नास दुराणी ठार पाडिले. सा.

४४. 'कसी' भाइसं. 'असी' शें.

४५. तडक सां. व भाइसं. तडका

लागला. असो. दुराणीची(अ) तीस हजार फौज गनिमाचे पाठीलागास(आ) गेली. लहानथोर सात आठ हजार मनुष्याचीं सिरें कापून नेलीं.

८१. इकडे **दताजी सिंदे** यांचे तळावर दुराणी व रोहिला व **सुजायतदौला** व **अहमदखान लंगडा** पठाण व **कुतुबशाहा** आसे येऊन उभे राहिले. तों **नजिबखान** यानें[४६] **दताजी सिंदे** याचे सीर अंबारींत[४८] घालून **अबदुलअली** दुराणी यांजकडे आला. अंबारीस अंबारी तटली. अंबारींतूनच **नजीबखान** यानें कुरनिस करून हातावर रुमाल घेऊन वर डोचकें ठेऊन[४९] पुढें केलें. आणि अर्ज केला कीं, " पादशाहा अलमपन्हा, साहेब, सदाकत[५०] नजर असो " म्हणोन शीर पुढें ठेविलें. ते समयीं पादशाहाचा आनंद अति उत्कृष्ट जाहाला.[५१] शाहाजणें वाजवून 'शहाका बोलबाला' म्हणोन येकच[५२] आरोळी जाली. **अबदुलअली दुराणी**[५३] व **नजीबखान** परम खुशाल होऊन रोहिला याचा बहुमान हती व घोडे दिल्हे. जवळ येऊन[५४] पाठ थोपटली या प्रकारें गौरव केला.

८२. [तदनंतर **राजाराम चोपदार**, जिवानिशीं जगोन गेला होता, त्याणें **नजीबखान** यास अर्ज केला कीं, ' **दताजी सिंदे** याचें सीर कापून आणिलें.[५५] जें जाहालें तें[५५] प्रारब्धानुसार जाहालें. तुम्ही आपला[५६] धर्म करावा तो केला. आतां, हिंदु धर्म आहे. शीर ठेविलियांत नफा नाहीं. **उमरावगीर गोसावी** याजपासीं बहुत मराठे आहेत. धड सीर एकत्र करून त्यांचे सार्थक करतील[५७] या प्रकारें बोलिला. तो **नजीबखान** मान्य करीना. मग **राजाराम चोपदार, उमरावगीर गोसावी** याजकडे जाऊन अर्ज केला कीं, " तुमचा हिंदुधर्म आहे. दक्षिणचा सुभा **दताजी सिंदे** यांचे सीर अविधांनीं[५८] नेलें तें **उमरावगीर गोसावी**[५९] याणीं सोडविलें एवढें

अ. हा शब्द भाइसां. मध्यें नसून सा. मध्यें आहे.

आ. येथें ' रुमालांत ' शब्द भाइसं. मध्यें व 'अंबारींत' शब्द सा. मध्यें नाहीं.

पाठीस गेली. भाइसं. पाठिलागास शें. लागली सा.

४८. हा शब्द भाइसं. मध्यें आहे.

४९. 'पुढें आला' आणि 'शिर पुढें ठेविलें' हें सा. मध्यें अधिक आहे.

५०. ' साहेबास हें प्रथम नजर आहे' हें भाइसं. मधील वाक्य. संदेकत सा.

५१. 'जाहाला'हा शब्द सा. मध्यें नाहीं.

५२. 'उल्हासाची'हा अधिक शब्द सा. मध्यें आहे. हारोली असाहि पाठ आहे.

५३. व हा शब्द भाइसं. मध्यें आहे.

५४. आणून सा. व सगजो. प्रतींत आहे.

ह्या ८२ परिच्छेदामधील हकिकत केवल चित्य व निराधार वाटते. कारण, सुजाउद्दोला, उमरावगीर हे त्या वेळीं अबदालीच्या शिबिरांत नव्हते.

५५. 'असो.' 'त्यांचें' असे शब्द सा. व सगजो. प्र. मध्यें आहेत.

५६. 'जो वाघ-मान करावा तो करून घेतला.' पु. तुं. प्रत 'बोध,' 'धर्म' हे शब्द सां. व धो. क. प्रतींत आहेत.

५७. 'मी करीन' भाइसं. प्र.

५८. 'कापून' सगजो प्र.

५९. 'येथें असतां त्याचा सद्वियोग होऊं नये हें चांगलें नाहीं. तरी ' अेवढे अधिक वाक्य सा. मध्यें आहे.

भूषण ईश्वर तुम्हास[६०] देईल[६१]; आणि सीरधड येकत्र करून आग्नप्रसाद दिल्हा तर दक्षण देशापर्यंत तुमची कीर्ति होईल.[६२] ईश्वरबलेंकरून घर पुसत येश आणिलें तरी[६३] पदरीं घेणें." तों **उमरावगीर गोसावी** याणे चितांत[६४] आणिलें कीं, 'सायास केल्यानें हें घडून[६५] येणार नाहीं' म्हणोन **उमरावगीर गोसावी, सुजायतद्दौला** याजकडे येऊन अर्ज केला कीं; "साहेब, आमचा हिंदुधर्म[६६] आहे. त्यास आम्ही साहेबाचे पदरीं आसतां **दताजी सिंदे** याचें देहेसार्थक न होय तरी आम्ही पदरीं राहिल्याचें सार्थक नाहीं." असें ऐकताच **सुजातदवला नजीबखान** याजकडे जाऊन **दताजी सिंदे** याचें सीर मागितलें. त्याणीं उतर केलें कीं, "आम्हीं सीर **आबदल आली** पादशाहा यास नजर केलें. आम्हास मागतां येत नाहीं. तुम्ही[६७] परस्परें पादशहास अर्ज करून कलेल[६८] त्या रीतीनें सीर मागून घ्यावें." हें ऐकोन **सुजातदवला** यासहि संकटच जाहालें आणि **नजीबखान** यासी बोलिला कीं, 'माझा बाप **मनसूर आली** पूर्वी गनिमाचे पेचांत आला. ते समयीं **मनसूर आलीनें** आपली दाढी **राणोजी सिंदे** याचे हातीं दिल्ही कीं, 'इची शरम राखावी' असें बोलिलियावर **राणोजी सिंदे** याणी आबरू रक्षून **गंगापार** करून दिल्हें. त्या तागाईत राज्य तिकडील[६९] खाऊन आम्ही सुखरूप आहों. त्या **राणोजी सिंदे** याचा पुत्र **दताजी सिंदे**. वरकड आवघी बेमानी आम्हाकडून घडली. परंतु,[७०] एवढे[७१] तरी उत्तीर्ण व्हावें." म्हणोन **आबदल आली**पासी जाऊन स्वत:[७२] रदबदली केली.[७३] तें समयीं पातशाहा याणी निदान दोन[७४] लक्ष रुपये मागितले. ते समयीं **उमरावगीर गोसावी** याणीं दोन लक्ष रुपयाची निशा करून सीर आपलेपाशीं घेतलें. डेरियास येऊन **दताजी सिंदे** याचे धड[७५] आणिलें आणि आपणाकडील मराठे होते त्यांस आणून साहित्य उत्तम प्रकारें करून चंदन-काष्ठें व बेलकाष्ठें व तुळशीकाष्ठें[७६]

---

६०. आम्हांस भाइसं. प्रत.
६१. देत आहे सा. प्रत.
६२. हा शब्द शें. प्रतींत आहे.
६३. हे तीन शब्द सगजो. व सा. मधील, व त्याऐवजीं 'तसें होईल' हें भाइसं. मध्यें आहे.
६४. 'प्रत्ययास आलें' असें सा. व सगजो. प्रतींत आहे.
६५. कार्य घडणार नाहीं. भाइसं.
६६. स्वधर्म सा. प्रत.
६७. तुम्ही भाइसं. व सा. प्रत.
६८. हे तीन शब्द भाइसं. मधील आहेत.
६९. हा शब्द भाइसं. मधील.
७०. हा शब्द सा. प्रतींतील.
७१. उत्तीर्णता तुं. वरील पाठ पु. व भाइसं. व क. प्रतींतील आहे.
७२. 'सक्त' भाइसं. व तुं. प्रत
७३. 'करून शिर मागितलें सा.
७४. तीन पु. व सां. प्रत.
७५. हि सा. प्रत.
७६. हा शब्द सा. व शें. प्रतींतील.

मेळवून[७७] यथाविधियुक्त[७८] **यमुनातीरीं** दहन केलें. तीन[७९] हजार रुपये धर्म[८०] केला.[८१] असो.

८३. इकडे **दिलीचा**[८२] किला सहज खालीं होता. त्यांणी[८३] घेऊन आलीकडे येऊन मुकाम केला. तों इकडे **जनकोजी सिंदे** घायाळ भग्न[८४] फौजेनिसी पळत असतां आठरा कोसपर्यंत गिलचे यांणी पाठिलाग केला. मग दुराणी माघारे फिरून गेले. **जनकोजी सिंदे** यांस घोडियावर बसावयास अवसान पुरेनासें जालें. [८५]मग खेडियांतील खाटलें काढून, खाटल्यावर[८५] निजऊन चालविलें. इतकियांत दुराणी याणें गडबड केली. खाटलें भुईस उतरावयास फुरसत पडली नाहीं. तेव्हां उभियानेंच खाटलें टाकिलें. **जनकोजी सिंदे** जखमी भारी. शरिरास परम दुःख जाहाले. मागती घोड्यावर खाटलेंसुद्धां[८६] घालून तीनचार कोशपरियंत निघोन[८७] आले. सायंकाल जाहाला.[८८] दुराणी[८९] निघोन माघारे गेले. **नजीबखान** यानें मोठें यश मिळविलें.[९०] इकडे **सिंदे**[९१] यांचे बुणगे व कबिले[९१] चोवीस कोसांवर उतरले होते. त्यांत **जनकोजी सिंदे** तीन प्रहर रात्रीं दाखल जाले. तों बुणगे आधींच तयार होऊन निघाले[९२] होते.[९३] वाटेनें लोकांस **जनकोजी सिंदे** पुसत कीं, '**काकासाहेबाची** गत काय जाहाली' लोकांनीं **दताजी सिंदे** पुढें गेले म्हणोन चाळवीत चाळवीत बुणगियांत आले. कचेरीचे डेऱ्यानजीक बाडापुढें खाटलें उतरलें. तों **रामाजीपंत दिवाण व रूपराम कटारी** धांवत आले. त्यांजसमागमें पांच सात मशालीहि होत्या. **जनकोजी सिंदे** येईत तोंपावेतों बायकास **दताजी सिंदे** यांची आवस्था कळली[९४] नव्हती. बाडांत वर्तमान कळतांच **भागिरथीबाई** व **जनकोजी सिंदे** यांची स्त्री **कासीबाई** अशी उभयतां मराष्ट्र[९५] धर्म विसरून धांवत बाडाचे बाहेर आली. तों **जनकोजी सिंदे** खाटल्यावर घायाळ पाहिलें. तोंड उघडून पाहिलें तों **जनकोजी सिंदे** यांणी डोळ्यांस पाणी आणून चुलतीस विचारिलें कीं, 'बाई,

७७. आणून भाइसं.
७८. 'युक्त' हा अधिक शब्द भाइसं.
७९. पांच हजार सां. प्र.
८०. दान सा. प्रत.
८१. 'खैरातहि वांटली' सा 'अस्थी काशीस पाठविल्या' सां. प्र.
८२. येथें 'किला' शब्द अधिक सा.
८३. 'व भग्न असे फौजसुद्धां' सा.
८४. 'पालख्यांच्या जागी पालख्या राहिल्या.' सा. प्रतींतील वाक्य.
८५. आणून खाशियांनीं उडचा टाकून (टाकीत) घायाळ' सा. खाटलेसुध्धा हा शब्द तुं. प्रतींत नाहीं.
८६. हा शब्द भाइसं प्रतीमधील,
८७. 'निघाले' सा. प्रत.
८८. ह्या शब्दापुढें 'दुराणीचे कांही हस्तगत जाले नाहींत.' क. प्रतींतील शब्द
८९. 'हि झाडून' सा.
९०. 'संपादिलें.' सा.
९१. हे पांच शब्द सा. प्रतींत आहेत. भाइसं. प्रतींत नाहींत.
९२. व ९३. 'निघाले' शें. 'होते' सा.
९४. 'ठाऊक' सा. 'बायकांस' क.प्रत
९५. मराठी धर्म सा. प्र.

काका कोठें आहेत ?' ते समयीं **भागिरथीबाईस** पुरते उमगलें कीं, **पाटील** निश्चयें रणांत पडले ! बाईस[९६] दुखाचा उभाडा[९७] आला. मागती विवेक केला कीं, जात्यांतील रडती, सुपांतील हसती[९८], त्यांची[९९] गत तों त्या रीतीची जाहाली. हा तो घायाल, जगावयाचा कठीण. दुराणीचा मागें[१००] पेंच भारी असतां मी शोक करित्यें तरी याची गति काय ?[१०१] म्हणून उभाडा आला तो विषासारखा घोटून[१०२] **जनकोजी शिंदे** यासी बोलिली कीं, " बाबा[१०३], तूं रांडेसारखा रडतोस[१०४] ? **जयाजी शिंदे** याचे पोटीं चौघी लेकी जाहाल्या, तसीच तूं येक जाहाली असतीस तरी आणखी येक जावाई येता. **पाटील** काय घेऊन गेले[१०५] ? दौलत, महाल, मुलूक, खजिना, हाती, घोडे, सर्व तुम्हापासीं ठेऊन गेले. तुम्ही हिंमत धरून त्याचें सार्थक[१०६] करावें. आतां रडून होणें काय." म्हणोन हिंमत धरून गोष्ट बोलतांच **जनकोजी शिंदे** स्वस्थ राहिले.

८४. रामाजीपंत दिवाण व **रूपराम कटारी** यासी बाईनीं आज्ञा केली कीं, " रात्रीचे रात्र लष्करचा[१०७] मुकाम करावा[१०८]. प्रातःकालीं कूच करून जावें." असें ऐकोन नगारचीस सांगोन शाहादानें [मुकामाचीं] केलीं[१०९]. परंतु लष्करचा घर सुटला. खावंदाची देखील कोणी आवस्था धरीनात[११०]. मग लष्कर तडक **रेवाडीचे** रोखें चालिलें. धरण फुटलेसारखें जाहालें. मग यांणींहि हितून[१११] कूच करावें म्हणोन इत्यर्थ करून[११२] निघावें तों पोतनीस व जामदार यांणी आर्ज केला

---

९६. 'बाई समागमें उभयतांस' हे शब्द भाइसं. मध्यें आहेत. सा. प्रतींत नाहींत.

९७. ' उमाळा ' शें. प्रत.

९८. ल-विरहित सा. प्रत व ल-सहित भाइसं प्रत. रडतात, हंसतात असा पाठ क. प्रतींत आहे.

९९. 'त्याप्रमाणें हा मृत्यलोक अशाश्वत; आला प्राणी राहावयाचा नाहीं. याप्रमाणें असतां व्यर्थ शोक केलियानें काय होतें ? जें ज्या वेळेस होणार तें घडोन. ईश्वरइच्छेस उपाय नाहीं.' मंडळ प्रत.

१००. 'मागें पेंच'बद्दल 'दोष' भाइसं. मध्यें व 'द्वेष' हा शब्द शें. व मं. प्रतींत आहे.

१०१. 'गत काय' ह्यापुढें ह्याविषयीं दोहरा आहे.मेरे मन में कछ और। कर्ता के कछ और । उधो माधो कहे। झूटी मनकी दौर ॥ हें कवन साने १९२२ मध्यें आहे. पण मंडळ प्रतींत तसेंच १८७९ च्या साने प्रतींत नाहीं.

१०२. घोट गिळून, दुःखाचा आवंडा आवरून.

१०३. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं

१०४. 'काय' शब्द सा. २२त आहे भाइसं. मध्यें नाहीं.

१०५.'तुमची' मं. प्रत. 'तुझी' भाइसं-'दुनिया'सा.प्रतींत आहे पण भाइसं. मध्यें नाहीं.

१०६. साह्य भाईसं.

* 'देऊन' मं. शे. सा. प्रतींत.

१०७. लवकर भाइसं.

१०८. 'करणें' सा.

१०९. 'करविली' शें.

११०. 'धरली नाहीं.' मं.

१११. तिथून सा. १९२२

११२. केला. सा.

कीं, "खजिना व कापड, नरमीना[११३], उंटावर चालत होतें; वरकड[११४] साध कापड छकडियावर चालत होतें.[११४] आतां छकडचाचे जागां छकडे राहिले. ओझियाची[११५] आज्ञा काय?' असें म्हणतांच **भागिरथीबाई** यांणी उतर केलें कीं, 'आम्ही कारभार कधीं केला नाहीं. तुम्हीं **रामाजीपंत** यांस विचारावें.' तों जवळ **जनकोजी सिंदे** याची स्त्री* **कासीबाई** होती. तिची उमर तों आठरा वर्षांची; परंतु बुद्धि[११६] मोठी पोक्ताप्रमाणें. मोठी हिमतीची बायको. तिणें जाबसाल केला कीं, "एवढाले जीव[११७] गेले, दौलतीची आस्था कोणास आहे? तुम्ही खजिना व नरमीना कापड असेल[११८] तें उंटावर घ्यावें[११९]. थोर[१२०] साधी कापडे यासी आग्न लावून द्यावी." म्हणोन त्यास सांगितलें. मग तसेच जामदार व पोतनीस यांणी सांगितल्याप्रमाणें[१२१] वर्तणूक केली. जितकें आगत्य आगत्य[१२२] ओझें होतें तितकें मात्र घेतलें. वरकड बाडे व कचेरीचे डेरे व सामान व खासे महालांतील डेरे व जामदारखान्याचे[१२३] डेरे व साधी कापडे यांस[१२३] आग्न लाऊन दिल्ही. मोठा प्रलय जाहला. **जनकोजी सिंदे** यास **बाईचे** पालखींत घातले. सारे[१२४] भुई एके पालखीस लाविले[१२५]. बायास[१२६] घोडा बसावयास पाहावयास गेला तों धुंदींत ज्याचे हातास जें घोडें आलें [तें] त्या बारगीर याणें नेलें. मग भलतीसी रोड[१२७] दोन घोडीं होतीं, त्यांजवर बायका स्वार केल्या. तों **भागीरथीबाई** गरोदर, नऊ महिने पूर्ण भरले. घोड्यावर बसावयाचें संकट. उपाय नाहीं. एवढे तालेवार मेले परंतु रडावयास फावलें नाहीं.[१२८] **जनकोजी सिंदे** याच्या जखमा बांधावयास[१२९] फावलें नाहीं. असो; या

११३. हा शब्द सा. प्रतींत अधिक.

११४. हे सहा शब्द साने, शेंबवणें व सगजो प्रतींत आहेत.

११५. 'बुरजी वगैरे छकडचांची' भाइसं.

* लग्न शें. १६७८ माघ वद्य ७।८ इ. १७५७. फेब्रु. ११ लग्नांत वय १४.

११६. हें वाक्य भाइसं.मध्यें नाहीं.

११७. भ्रतार मं.

११८. हा शब्द सा.

११९. हा शब्द १८७९ व ८६ प्रतींतील.

१२०. 'डेरे' सा. येथें–आहे ते, अशा सारखे (भा.) जें उचललें जाईल ओझ्यासारखे भाइसं. असेहि पाठ आहेत.

१२१. सांगितलें त्याप्रमाणें सा.

१२२. आगत्याचे सा.

१२३. 'नगारखान्याचे' व 'कडबा घालून' हे अधिक शब्द सा. १९२२ मध्यें आहेत. १८७९, ८६ मध्यें नाहींत.

१२४. दोन्ही बायांच्या पालखीचे सा.

१२५. ह्यापुढे क. प्रतींत असा मजकूर आहे.–"कारण कीं समय आहे. यास्तव जनकोजीस पालखींत घालोन जलदीनें निभावून गेलें पाहिजे. एका पालखीच्या भोयांनीं निभावणी होणार नाहीं. यास्तव लाविलें. जनकोजी जखमी भारी आणि दुराणीचें भय. मजल काटून जावयाचें. बत्तीस असले म्हणजे हां हां म्हणतां निभावून नेतील. या प्रसंगीं दुसरे कोठून मिळणार.

१२६. बायकांस. सा.

१२७. बळगी तुं. रोड क. व सा.

१२८. घायाळ सा.

१२९. दुराणीच्या दहशतीमुळें अधिक शब्द सा. प्रतींत.

रीतीनें कूच केलें. बहुतकरून तोफखाना तळावरच राहिला. अडीच प्रहर रात्रपावेतों तेथून दहाबारा कोस कच्चे गेले. जखमी याजसमागमें येकदिल पाचसेंहि[१३०] खासे नाहींत. जिकडील तिकडे रानोरान [होऊन] कोणी कोणास पुसेनासे जाहले. तों **रूपराम कटारी** यांणें पालखी उतरली.[१३१] मनसुबा करितां जाला कीं,[१३२] "आतां दुराणी कांहीं[१३३] या फौजेस निभाऊं देत नाहीं. उभयतां बायका व **जनकोजी शिंदे** व **रामाजीपंत** यांस[१३४] न कले तों, नेऊन **भरतपूर** आथवा **रामगड** आथवा **कुंभारींत** कोणत्या तरी किल्यांत नेऊन[१३५] ठेवावी. इतक्यांत दुराणीची दौड आली तरी आम्ही कांहीं हातीं[१३६] देणार नाहीं. वरकड फौजेचें दैवी असेल तसें होईल." असें म्हणतांच **जनकोजी शिंदे** यांणी उतर केलें कीं, 'बाईस[१३७] विच्यारावें[१३८].' बाईनीं सांगितलें कीं, 'मनसोबा मला कांहीं सुचत[१३९] नाहीं, तुमचे चित्तास येईल तसें करावें.' असें म्हणतांच **कासीबाई** याणी भीडमर्यादा सोडून बोलिली कीं, "तुम्ही हा मनसोबा काय करता ? जाट आमचे बापभाऊ **व्यंकटराव**[१४०] नव्हे; किंवा मावळा **भापकर**[१४१] नव्हे. याणींच जर बंदीस घातलें तरी पेशवे यांस आमचें अगत्य काय ? दुसरें, लोक **दक्षण** देशचे[१४२] आमचे जिवासाठीं या रानांत आले; त्यांस मोकलून आम्ही आपले जीव जगवून काय करावें ? सोक्षमोक्ष चवघांत होईल तें होऊं. परंतु हा[१४३] मनसुबा उत्तम[१४४] नाहीं." आसें म्हणतांच **भागीरथीबाई** यांनीं आज्ञा केली कीं, 'पालखी चालूं देणें.' असें म्हणताच तडका लष्कर चालों लागलें. दिवस उगवावयास रेवाडीनजीक आलें. दिवस उगवला.

८५. तों गांवकरी खेडयापाडयाचे लोक[१४५] उंटे तटें घोडीं ओढूं लागले. आणि 'गिलचा आला' म्हणोन[१४६] मागती गडबड जाहली. ते समयीं मोठा प्रलय जाहला. पळतीयाणीं[१४७] बायकामुलें टाकून[१४७] दिल्हीं तेथें वरकड काय पाहावें !

---

१३०. पांचशेंहेहि लोक नाहींत. एवढी फौजेंची दुर्दशा होऊन गेली क.

१३१. थोपवून क., उतरून सा., उतरली भाइसं.

१३२. दुराणीची दौड भारी. हें वाक्य १८७९ व ८६ त नाहीं.

१३३. हे दोन शब्द मं. प्र. मध्यें नाहींत.

१३४. कोणास न कळतां शें., सा. व मंडळ.

१३५. पण शें., ठेऊन भाइसं.

१३६. कोणासहि मं.

१३७. काकुबाईस सां.

१३८. हचापुढें त्याप्रमाणें बाईस विचारलें. हें वाक्य अधिक मं. प्रत.

१३९. दिसत शें.

१४०. 'बाप' भाइसं. प्रतीतील हें नांव मं. प्रतींत नाहीं. मागें पृ. ४५ पहा.

१४१. 'बाप' भाइसं.

१४२. दक्षणचे भाइसं. दुसरे लोक मं.

१४३. हा सा. 'लाहान' भाइसं.

१४४. उपयोगी शें.

१४५. लोकांनीं भाइसं.

१४६. म्हणोनच्या पुढें 'आवाई घालून लुटूं लागले' हें वाक्य सा. १९२२ प्रतींत अधिक.

१४७. पडती, पडरी, पेंढारी पु. सां. क. टाकूनच्या पुढें तडाका पळों लागलीं. अंगावर वस्त्र आहे कीं नाहीं याची शुद्ध राहिली नाहीं. हा मजकूर सां. व क. प्रतींत अधीक आहे.

आंगावरील वस्त्रें कोणी ठेवीनात. असे पळूं लागले. तों पालखीजवळ दोघी बायका होत्या. पालखींत जखमी **जनकोजी सिंदे** होते. भोई घाबरे होऊन पालखी टाकावयाचे विचारांत आले. ते समयीं **जनकोजी सिंदे** यांस नेटें पालखी चालली तर[१४८] सोसेना. ते वेळेस **भागीरथीबाई** याणी भोई यांस प्रार्थना केली कीं, "बत्तीस आसामी तुम्ही आहां. तुम्हांवर घाव[१४९] पडे तोंवर पालखी न टाकावी. तर मी दर आसामीस शेर शेर सोन्याचें कडें देईन;" या प्रकारें हिंमत दिल्ही. तों पळावयाची गडबड फार जाहाली. जिवाचे धास्तीनें बावन बिरदांचे धनी[१५०] देखील दीन जाहले. भले भले सरदार घोडे सोडून[१५१] पाहाडांत सिरले. जीव द्यावा त्यापेक्षां जितरब* गेलें तरी उत्तम" म्हणोन घोडीं सोडलीं. खेडचाचीं[१५२] रांडापोरें घोडीं धरूं लागलीं. ते समयीं **भागीरथीबाई** यांणी **जनकोजी सिंदे** यांस सांगितलें कीं, "बाबा, मजला आतां घोडियावर बसून पळावयाची[१५३] निभावणी पडत नाही तुम्ही[१५४] झाडून पुढें चालावें. माझें समागमें निभावयाचे[१५५] मनुष्य असेल तें द्यावें. गिलच्या द्रिष्टीस पडे तोंपावेतों मजला रक्षावें. निदान दृष्टीस[१५६] पडून निभावणी दिसेनासी जाहाली म्हणजे माझे दोन तुकडे करावे." असे बोलिल्यावर त्याप्रमाणेंच **मालाजी**[१५७] **आरणराव** म्हणोन वरा मर्दाना व जिव्हाळियाचा होता त्यास **जनकोजी सिंदे** यांणी सांगितलें कीं, 'बाई समागमें दम खात यावें. निदान दुराणी द्रष्टीस पडल्यावर बाईचे दोन तुकडे करावे. आशा न धरावी. यांस जिवें मारावें; मग तुमचें दैवी आसेल तें पाहावें." याप्रमाणें सांगोन त्यास **भागीरथीबाई** समागमें दिल्हें. तसेंच **कासीबाई** याजपासीं **कुसाजी सिंदे** यांणी असावें.[१५८] म्हणोन नेमून त्यास दिल्हें. परंतु **भागीरथीबाई** पोटशीं;[१५९] नऊ महिने पूर्णतेस आले. त्यास पळावयाचें संकट. **कासीबाई** सडी होती. तिणें[१६०] पालखी सोडली नाहीं. याप्रमाणें[७] पालखी घेऊन भोई तीन कोस पळाले. जखमी आंत परम कष्टी.[१६१] प्राण गेला तरी पुरवला[१६२] परंतु दुःख सोसवेना. म्हणोन भोई यांस शिव्यागाळी करीत. परंतु

---

१४८. तर–च्या पुढें यातना हा शब्द सा. प्रतींतील.

१४९, व गाठ सगजो.

१५०. हा शब्द सगजो प्रत.

१५१. सोडूनच्या पुढें 'जींव जगविण्याकरितां हे शब्द सा. १९२२ त आहेत,

१५२. (जनावर = घोडें इ.), हा शब्द भाइसं.

१५३. हाकावयाची भाइसं.

१५४. हा शब्द सा.

१५५. कोणी तरी सगजो; जिव्हाळियाचा सा.

१५६. हे दोन शब्द सा. प्रतींतील.

१५७. आवजी आनंदराव सा. मालजी आनंदराव सगजो. वरील पाठ भाइसं. प्रत.

१५८. असावे शें. सांगावें भाइसं.

१५९. पोटाशी सा. १९२२.

१६०. तिणें सगजो व भाइसंमध्यें नाहीं.

१६१. संकट भाइसं. कष्ट शें. कष्टी सा.

१६२. पुरवला सगजो. परंतु भं.

कोणी ऐकेनात. मग पळतां[१६३] पळतां एक गांव मातबर होता. तेथील हजार दीड हजार मूलें बाइका पुरुष दांडगे[१६४] लष्करास ओढाओढी करूं लागले; तों पालखी-जवळ दिवस उगवलियावर पाचसातशें खांसा जमला होता. ते वक्तीं **कासीबा**-यांनीं जाबसाल केला कीं "तुम्ही एवढे मनुष्य आणि दुराणी तों द्रष्टीस पडे-नात. रांडापोरें घोडीं ओढितात. तुमच्या पोटांत हरणाची काळजी[१६५] शिरली आहे!" असें ऐकून **जनकोजी सिंदे** भोई यांजवर रागास आले कीं, "पालखी थोपावी घोडें बसावयास द्यावें." असें म्हणतांच लोकांस विरे पडून दांडगियावर घोडे घातले. पांच सात[१६६] मनुष्य कापून काढिलीं. मग हुल्लड शांत जाहाली. सायंकाळ जाहाला. लस्कर जिकडे[१६७] तिकडे पळोन गेले; येके ठिकाणी जमा जाहाले[१६७] नाहीं. जातीनिशीं **जनकोजी सिंदे** खांसा दहा हजार एकीकडे व **नारो शंकर** दहा[१६८] हजार एकीकडे, **साबाजी सिंदे** येकीकडे. कोणी कोणास पुसेनात. सर्व[१६९] लस्करांत **जनकोजी सिंदे** असतां हरोली[१७०] जाहाली कीं, '**जनकोजी सिंदे कुंभारीस** जाटांनीं नेले. आम्हांस रानांत मोकलिले." म्हणोन लोक दिलगीर[१७१] जाहाले. असो. तेवढी रात्र घोडियावर[१७२] जीन, उंटावर ओझीं तसींच [ठेऊन] लस्कर जिकडील तिकडे उभें राहिलें. दुसरे दिवसी **दिल्लीहून** कचे ऐसी कोस ***कोटपुतळी** येथें **जनकोजी सिंदे** राहिले. तमाम डोंगरांत सांडणी स्वार[१७३] पाठवून लस्कर जमा केलें.

८६. तों तेच दिवशीं **मल्हारराव होळकर** यांसी[१७४] निकडीचीं पत्रें गेलीं होतीं त्याचीं उत्तरें आलीं. **मल्हारराव** याणीं **जयनगरचा** शह टाकोन मजल दर मजल मोठ्या मजली करून मिळावयास येत होते. तों १७४अ इकडील यांची अवस्था अशी जाली हें **मल्हारराव** यांस माहीत[१७५] नव्हतें. त्यास तेहि मुकामास **कोट-पुतळी**पासून दोन कोसांवर आले. बुणगियाचा पुढें[१७६] मुकाम जाहाला. मागून

---

१६३. हे शब्द सा. प्रतींतील.

१६४ हा शब्द सा. मधील.

१६५. काळजें सा. १९२२.

१६६. सें शब्द अधिक सगजो. व मं.

१६७. जिकडील, पलो लागले होते, जमा जाहाले भाइसं. नाहीं सगजो. व मं.

१६८. दहा पांच हजार सगजो.

१६९. तमाम सा., मोकल सगजो. लष्करांत=प्रत्यक्ष.

१७०. आरोळी सा.

१७१. दिगर भा., दिलगीर सा. शें. दिलहवाल मं.

१७२. हे शब्द सा. व सगजो.

* रेवाडीचे वायव्येस २४ कोस. जन-कोजी ता. १४–२–६० व मल्हाराव ता. १५ ला कौटपुतळीस आला असावा. पेद २७, २४७; फा. १.२२०.

१७३. हा शब्द १८७९ व १८८६ सा. या प्रतींत नाहीं.

१७४. यांची सा. मागें. पु. ७७परि ७२ पहा. कीं ऐवजीं म्हणोन सा. होळकर हा शब्द सा. मध्ये ज्यास्ती आहे. १७४अ तो हा शब्द शें. व सा. प्रतींतील.

१७५. विदित सा.

१७६. पुढें सा. प्रत

मल्हारराव सडी[१७७] स्वारी अस्तमानास मजलीस शाहाजणें वाजवीत[१७७] आली. तों **सिंदे** यांच्या लस्करचे पलाचे राऊत जाऊन तेथें पोंचले. **मल्हारराव** याणीं जवळ बोलावून वर्तमान विचारिलें. सारें वर्तमान स्वारांनीं सांगितलें कीं, **दताजी सिंदे** यांचा सिरछेद जाहाला.[१७८] **जनकोजी सिंदे** जखमी व बायकामुलें लुटल्या ! लस्करचा येथून[१७९] तीन कोसांवर **कोटपुतळीवर** मुकाम राहिला.[१८०] हें वर्तमान **मल्हारराव** याणीं[१८१] ऐकतां क्षणींच अंबारींतच[१८२] घालून घेतलें व **गंगाधरतात्यांनीं** शाहजणें वाजवीत होते तें मना केलें; असे डेरियास आले. डेरियांत जाऊन शोक करिते जाले. ते समयीं त्यांची स्त्री **गौतमाबाई**[१८३] होती. तिणें निषेध[१८४] केला कीं, 'सुभेदार, तुमचें वृधपण जाहलें. **सिंदे** यास मूल म्हणोन.[१८५] अधिक काय ? त्याचा तोंडचा जार वाळला नाहीं, तों त्यांनीं एवढा पराक्रम करून[१८६] मारतां मारतां मेले. एऱ्हवीं मृत्यलोकास आला प्राणी वांचत नाहीं. परंतु इहलोकीं[१८७] कीर्ति करून परलोकी[१८७] साधन करणें हेंच दुर्लभ.[१८८] हें मूल **जनकोजी सिंदे**, यांणी एवढा पराक्रम केला. [१८९]तुमचे दिवस समीप[१८९] आले; तरी हिमंत धरून मारतां मारतां[१९०अ] मरावें. हा प्रलाप[१९०आ] स्त्री जातीनें करावा; असें पुरुषास बोलले[१९०ई] नाहीं. प्रस्तुत जवळ जखमी व मुलें बायका[१९०] आलीं आहेत. तरी आतां[१९१] जाऊन भेटून त्यांचें समाधान करावें." म्हणोन बोलतांच[१९२] **मल्हारराव**[१९३] यांसी विषाद

---

१७७. 'सडी० वाजवीत' एवढें सा.
१७८. केला भाइसं. जहाला सगजो.
१७९. तेथून भाइसं.
१८०. जाहाला मं.
१८१. हे दोन शब्द सा. प्रतींतील.
१८२. मल्हारराव बसले होते तेथेंच सगजो.
१८३. गौतुमाबाई तुं. गोदूबाई असाहि पाठ आढळतो.
१८४. निषित्ध–ध्ध सगजो. व मं. प्रतींत.
१८५. याची मुलें म्हणजे काय सगजो.
१८६. केला. आपण तरी आज पावेतों बहुत लढाया केल्या व आपली हिमतहि मोठी असून असा शोक करतां! हा स्त्री जातीनें करावा सां. प्रत.
१८७. इतकी कीर्ति वर परलोकीं साधन भाइसं.
१८८. चांगलें, भाइसं.; मुख्य शें.
१८९. आणि तुमचे डेऱ्या समीप.
१९०अ. हा दुसरा 'मारता' शब्द शें. व सा. प्रतींतील आहे.
१९०आ. प्रताप भा. खेद शें.
१९०. ई. साजत भाइसं.
१९०. बाळे सा., शें.
१९१. ऐसेंच सा.
१९२. बोलली तुं. प्रत. येविशीं दोहरा आहे––
'उजले उजले सब भले, उजले भले न केस । नारी न नवे, न रिपु डरे, न आदर करे नरेस ॥'
(इतर सर्व वस्तु उजळ म्ह. पांढऱ्या झालेल्या चालतील. पण केस पांढरे न व्हावे; कारण तें म्हातारपण होय. व त्यास शत्रु भीत नाहींत, बायकाहि मान देत नाहींत आणि राजाहि त्याचा आदर करीत नाहीं.) तुं.
१९३. वृद्धास सा.

आला. आणि **गौतमाबाईस** बोलिला कीं, "[१९४]तुझे चितांत आम्हीं मरावें असें आहे." त्याजवर बाईनें उतर केलें कीं, "पती[१९५] असता कोणी वैधव्याचीं आशा[१९६] धरील असी कोणींहि[१९७] नाहीं. अहेवपणें हळदकुंकुमंडित असावें[१९८] हीच सर्वांची[१९९] इच्छा[२००]. परंतु जैसें पूर्वाचरण असतें तसेंच ध्यावें लागतें.[२०१] आपले पदरीं लौकीक भारी. तुम्ही आपलें *विणावयाचें स्वकर्म करीत आसतां तरी सहजच वांचावयाची आस्था धरावी. वाटा तरी शूराचा[२०२] उचलिला आहे. वाण[२०३] सतीचें घेतलें आहे हें सांभाळावें; असेंच धर्मशास्त्र." याप्रमाणें बाईचें बोलणें ऐकोन रागास[२०४] येऊन तसेंच घोडियावर स्वार जाहाले. हत्ती[२०५] व फौज तयार होऊन **जनकोजी सिंदे** यांजकडे चालली.[२०६] 'जसी दैवाची उजरी तसी बुद्धि उपजे शरीरीं' बरोबरीला तमाम फौजेची छबी* पळाली. एकमेकांस बोलों लागले कीं, 'सिंदे यांची एवढी लढती फौज; तिची ही गत जाहली, आमची कोण दशा![२०७] खानदेशी फौजेची बहुतकरून तीच गत होईल असें दिसतें.' असो.

८७. या प्रकारें बोलत **सिंदे** यांच्या लस्करास **मल्हारराव** आले. तों **भागीरथीबाईहि** फौजेंत येऊन मिळाली. दीड प्रहर रात्र जाहाली. **भागीरथीबाई** व **कासी** ई यांस राहुटी देखील नाहीं.[२०८] तेथें **गौतमाबाई** आली. ते समयीं उभयतां बायांच्या[२०९] भेटी जाहाल्या. तेव्हां त्यांचे भाषणाचा[२१०] येकच कोल्हाळ जाहाला.

---

१९४. तुमचे शें.

१९५. सुवासिनी सा. १८७९ व १८८६ सदैव (सधवा) शें.

१९६. आस्था सा. शें.

१९७. चांडाळीण सगजो.

१९८. मरावे सा.

१९९. स्त्रियांची सा.

२००. आस्था, आवस्था भाइसं, आस्ता भा. इच्छा सा. शें. मं. पण हे ४ शब्द १८७९ व १८८६ प्र.त नाहींत.

२०१. असेल तसें घडेल सा. व सगजो. *घोंगडी सा.

२०२. तुम्हीं क्षत्रिय कर्म आरंभिलें आहे. सगजो. जसे सोहळे भोगावे तैसेच धर्मशिलेस पाय द्यावा. तुं.

२०३. मग जीवित्वाची आस्ता धरूं नये. असा शास्त्रीय धर्म आहे. मं.

२०४. रागें भरून सगजो.

२०५. हत्तीवर निशाणें सगजो.

२०६. चालले सा. १९२२

* छबी तेज, पाणी. 'फौजेची तोंडें काळीं खापरासारखीं दिसों लागलीं.' भाइसं. 'बरोबरीला छ० पळाली' हें भाइसं.मध्यें नाहीं.

२०७. हे शब्द भाइसं. मध्यें आहेत. इतरत्र नाहींत.

२०८. 'झाडावर माळा घालून वर शेल्याचें पाल करून दीनासारखी बसली होती.' भाइसं. मधील वाक्य. यापुढें 'झाडास वस्त्रें गुंडाळून बसली होती.' सा; सगजो.

२०९. व मानसिणी (= दासी, कुणबिणी) भासणी तुं. भेटी जाहल्या हें सा. १९२२ त आहे.

२१०. भाषणाचा भाइसं. मध्यें आहे. परंतु सा. १९२२त नाहीं. शोकाचा मं.

तीन दिवस दम खादला होता तितक्याचा उभाडा[२११] जाहला. तो[२१२] आकांत पत्रीं काय ल्याहावा[२१३]. "भगवंतें आम्हांवर येवढा गजप [गहजब] केला. आम्हीं देवाचे घरीं काय चोरी केली! तेव्हां आम्हांवर येवढें निर्वाण दाखविलें! आमचा वियोग केला! आतां पाटील कोठें पाहूं!" म्हणोन[२१३] ऊर बडवून, तोंडी माती घालून घेऊं लागली. ते समयीं **गौतमाबाई** यांणीं बहुत प्रकारें करून शांतवन[२१४] केलें. मायाजाळ, स्मशानवैराग्य दुसरेयास सांगावें. परंतु ज्याचा उभाड[२१५] तोच जाणत आहे. हा आनभव मनुष्यदेही सर्वत्रास[२१६] आहेच.[२१७] तसेंच **मल्हारराव** व **जनकोजी** या उभयतांस दुःख, आई मुलाविसी विलाप[२१८] करते तसी गत जाहली[२१९]. उफराटे **जनकोजी सिंदे** यांणींच[२२०] **मल्हारराव** यांचें समाधान केलें कीं, "सुभेदार, हा मृत्युलोक आहे. यांत केव्हांहि मरणें[२२१] खरें. वडील कीर्ति करूनच गेले[२२२]. आपणहि किती दिवस जगणें आहे. त्यांत अवकाशहि नाहीं. 'सुपांतील हंसती व जात्यांतील रडती' दृष्टीस आणावे[२२३]. प्रस्तुत आमचे हातांत घास आहे जातच आहे[२२४]" म्हणोन शांतवन[२२५] केलें. **मल्हारराव** यांणीं आपलें सामान[२२६] देखील डेरा व बाडाच्या कनाथा व बिचोवे व खाजगीचे[२२७] डेरे आणोन देऊन जखमास[२२७] तबीब आणोन शेकावयास लाविले[२२७] आणि आपण तेथेंच राहिले. दोन्ही सैन्यें येक जागां राहिलीं[२२८]. तेव्हां लोकांस आसें जाहालें कीं, शरिरांतून[२२९] प्राण जातां जातां माघारा राहातो आसें जाहालें. **मल्हारराव** आले म्हणोन ते दिवशीं सैन्य

---

२११. उमाळा आला. शें. उभडा सा.

२१२. हें वाक्य भाइसं. प्रतींत आहे.

२१३. धाय मोकलून हे शब्द १८७९, ८६ मध्यें नाहींत. परंतु सा. १९२२ व भाइसं. मध्यें आहेत.

२१४. समाधान शें. शांतवन सा. १९२२.

२१५. उभाड भाइसं. अनुभव तुं.

२१६. प्राणिमात्रास सा.

२१७. असेल सा. व शें.

२१८. प्रलाप भाइसं. विलाप श. करते सा. व शें. ऐवजीं करतील भाइसं.

२१९. हेंच वाक्य क. प्रतींत 'मल्हारराव व जनकोजी बाबा या उभयतांस दुःख मातेचें अपत्य मृत्य पावतें आणि माता रुदन करून विलाप करते. तशी गत उभयतांस जाहली' असें आहे. सा. प्रतीमध्यें हेंच वाक्य मल्हारराव यांची जनकोजी सिंदे यांस पाहून माय० इ. ह्या फरकानें आहे.

२२०. हा च शें. प्रतीमधील

२२१. जाणें सगजो.

२२२. गेले शें. सा.; मेले भाइसं.

२२३. हाहि दृष्टांत जाणावा. सा. १९२२.

२२४. हातांतील ग्रास जात्यांतील आहे. सा. व सगजो. जात्यास शें. 'जसा प्रसंग आहे त्याप्रमाणें हिमत धरून असावें' असें मं.प्र.त प्रस्तुतच्या पुढें आहे.

२२५. शांत सा. १९२२

२२६. सामानापैकीं शें.

२२७. हें सा. १९२२ मध्यें व भा. इ.सं. मध्यें आहे.

२२८. जाली सा. १९२२

२२९. कुडींतील प्राण व्याकुळ जाला असतां परततो तसें घडलें सा. १९२२.

स्वस्त राहिले.[२३०] तों **मल्हारराव** यांचे लष्करांत तीन वेळां "दुराणी आले आले" म्हणोन गडबड जाहाली.

८८. दुसरे दिवशीं जाटाची बातमी आली कीं, 'दुराणीची फौज तुम्हांवर सडी होऊन येणार, तुम्ही स्वस्थ कसे राहिलां.' म्हणोन पत्रें आलियावर **मल्हारराव** व **जनकोजी सिंदे** व **गंगाधरपंततात्या** व **रामजीपंत** दिवाण असे येकत्र होऊन **जनकोजी सिंदे** यांस विचार सांगते जाहाले कीं, "बाबा, तुम्ही जखमी आहां; दुराणीची दौड भारी; सहज चालणें कचे चाळीस कोस. यांत तुमची निभावणी पडणार नाहीं. यास्तव बुणगे व[२३१] बायका व[२३१] तुम्ही आम्ही चमेलीपार जाऊन माघे[२३२] सडी फौज **रामाजीपंत** व आमचे **गंगाधरपंत** बराबर येतील.[२३३]" याप्रमाणें **मल्हारराव** यांचें वचन ऐकोन **जनकोजी सिंदे** यांणीं उतर केलें कीं, "सुभेदार, तुम्ही वडील आहां. मुलेंमाणसें व[२३४] बुणगे घेऊन जावें. माझा नेम[२३५] आहे कीं, जेथें पाटील मृत्य पावले त्या स्थानीं आपला देह टाकावा; असा माझा नेम[२३६] आहे. आपणास राहाणें नाहीं." असें ऐकोन **मल्हारराव** यांणीं वडीलपणें बहुत धिःकार करून सांगितलें; परंतु **जनकोजीराव सिंदे**[२३७] यांचे युक्तीस[२३८] पडेना. मग रागानें **मल्हारराव** आपले डेऱ्यास आले आणि **गौतमाबाई**[२३९] यासी वर्तमान सांगितलें कीं, "**जनकोजी सिंदे** आम्हांस सर्वत्रांस घेऊन बसतात. ऐकत नाहींत." तेव्हां **गौतमाबाई** बहुत हिमतीची बायको. तिणें मागती **मल्हारराव** यांसी बोलिली[२४०] कीं, 'सुभेदार, तुमची साठ[२४१] वर्षांची उमर जाली. यामुळें बुधीस चळ जाहला आसा विच्यार दिसतो. या पृथ्वीवर[२४२] कीर्त[२४३] मिळवून किती पंनाशा जगणें आहे. बहुत रोज गुदरले; थोडे दिवस राहिले आहेत. **जनकोजी सिंदे** मूल होत्साता त्याची एवढी[२४४] हिमत आणि तुम्ही हा विच्यार[२४५] काय म्हणोन ध्यानास आणिता[२४५]! असे ऐकोन **मल्हारराव** यास बहुतच विषाद येऊन दातानें ओठ चावून[२४६] बोलता जाहाला कीं, "तुझें चित पाहिलें.' आसें बोलोन तसेंच **जन-**

---

२३०. सैन्यांत स्वस्त राहिले भाइसं.
२३१. व सा.; शें.; प्रत
२३२. माघे भाइसं. मध्यें आहे. सा. मध्यें नाहीं.
२३३. सडे, फौजेंत (सा.) बराबर भाइसं. राहतील सा.; शें., सगजो. व मं.
२३४. व सा. प्रत.
२३५. हाच शें. प्रत. व सा. सगजो,
२३६. कृतनिश्चय अन्यथा होणार नाहीं सगजो. व तुं.
२३७. शिंदे सगजो.
२३८. बुद्धीस उतार पडेना. सा. १९२२
२३९. वगैरे तमाम मंडळी शें.
२४०. विचार करून सांगितले सा. १९२२
२४१. साठी बुद्धि नाठी तैसा विचार झाला आहे. सा.
२४२. कोणी चिरंजीव राहिला नाहीं मं.
२४३. अपकीर्ति सा.
२४४. एवढी सगजो, सा.; ही शें.
२४५. हा विचार तुम्ही ध्यानांत आणोन काय बोलणें तें बोलावें. मं.
२४६. चावून कोपरानें लोड फाडिले. तुं. प्रत.

कोजी सिंदे यांजकडे[२४७] येऊन खचित जावसाल केला कीं, तुम्ही आम्ही सडया[२४८] फौजेंत राहून बायका मुलें व बुणगे झाडून माळव्यांत जाऊन द्यावी आणि तुम्ही आम्ही सडे होऊन गलिमी काव्यानें दुराणी भवताले राहून गिलच्या हारीस[२४९] आणावा." म्हणोन बोलून बुणगे ते समई कूच करविलें. **सिंदे** इमानाचे शाबूत; अशाहि आकांतांत[२५०] फौजेस रोजमुरे[२५१] दिल्हे. बुणगियांचा बंदोबस्त करून वाटेस लाविले. **केरोलीचे** जाटाचा[२५२] व **मल्हारराव** यांचा स्नेह म्हणोन +**केरोलीचे** घाटे बुणगे वाटेस लाविले.+ **केरोली**कडून[२५३] **सिंदे** यांचे बुणगे दाहावे दिवसीं **चमेलीस**[२५४] पोहोंचले. **होळकर**[२५५] यांचींहि मुलेंमाणसें बरोबरच होतीं. कोसभऱ्याच्या छाटचानें[२५६] **तमाबाईचा** तळ होता.[२५५] तेथें उत्तरक्रिया करून कूच करून **कुवारी**[२५७] नदीवर मुकाम केला. तेथें तेरावा दिवस करून राहिले तों तेच रात्रीं **भागिरथीबाई** गप्रसूत[२५७]§ जाहली. पुत्र जाहला. ते समयीं तोफा वगैरे[२५८] यंत्रें सुटलीं. **दताजी सिंदे** यांचें दुख येकीकडे ठेऊन बहूतच खुशाली[२५९] केली. सूर्योदय जाहल्यावर **मल्हारराव** यांची स्त्री **गौतमाबाई** व तिची सून **खंडेराव** यांची स्त्री **आहिल्याबाई** आशा उभयतां डेरियास आल्या. त्यांणीं खुशाली करून हत्तीवरून[२६०] साखरा पाठविल्या. मोठचा संकटानें[२६१] पांच दिवस तेथेंच मुकाम करून साहावे दिवसीं कूच केलें. ते **मालव्यांत** येऊन पोहोंचले. **सिंदे** यांचीं मुलें व बायका बुणगे **उजनीस** राहिले. **मल्हारराव** यांचीं भारधुडी[२६२] इंदुरास राहिली.

---

२४७. यांचे डेरियास सा. सगजो.
२४८. सर्वत्र सा. १९२२
२४९. जेरीस भाइसं.
२५०. सावध हा शब्द सा. १९२२ त अधिक आहे.
२५१. आठ शें. आठवडा सगजो.
२५२. जाटाचा सगजो व तुं; मल्हारराव यांचा शें. सा. प्रत. पे. द. २१.१८५ राज्याचा भाइसं.
\+ ह्या खुणेंतील वाक्य भाइसं. प्रतींतील आहे.
२५३. वरून १८७९ व १८८६ सा. १९२२.
२५४. चोळीस भाइसं; चमेली सा. चंचोरीस सगजो.
२५५. हीं दोन्हीहि वाक्यें भाइसं, प्रतींत व १८७९ व ८६ प्रतींत नाहींत.
२५६. चमेलकुंवार नदी असा उल्लेख खं. १ ले १९६.
२५७. तेरावा दिवस करावा तो तेच रात्रीं–भाइसं. 'करून राहिले' सा. २२ आणि ३२.
२५८. वरकड व सुटलीं सा. १९२२.
२५९. 'आनंद जाहल' सा. १९२२ आहे. १८७९–८६मध्यें नाहीं.
२६०. गजांवर शर्करा सा. १९२२.
२६१. संकटी सा. संकटांतून तेथें चालूं काम करून भा.
२६२. धारधुडी सगजो. स्त्री शें. मुलेंमाणसें भारधडी सा. सर्व मंडळी, मं.

प्रकरण ९ वें

मल्हारराव होळकरांचें अहमदशहा अबदलीशीं गनिमी युद्ध

८९. इकडे **मल्हारराव** व **जनकोजी सिंदे** यांणीं कूच करून **मारवाड** प्रांतांत गेले. तों दुराणीनें पाठलाग केला. गिलज्या तिकडे येतांक्षणींच गनीम[१] **पाणपत कर्नालिकडे** गेले. दुराणी[२] तिकडे जातांच गमीन **दिलीस** पोहोचले.[३] पाठिलागास अबदली दुराणी दिल्लीस येतांच सिंदे होळकर **आगऱ्यास** आले. आविंध **आगऱ्यास** येतांच गनीम[४] **जयनगर** प्रांतांत गेले. तिकडे दुराणीची[२] दौड जाऊन पोंचतांच गनीम[४] **उदेपूरचे** सुमारास आले. गिलज्या तिकडे गेला तों गनीम तिकडे नाहींत.[५] या प्रकारें हे गनीमी कावा[६] करूं लागले. गिलज्या हारीस आणावा म्हणोन उपाय केला, परंतु दुराणीची सलाबत आणि हिकमत[७] भारी. फौज कुबल्यामुळें[८] गनीमच पिटूनच[९] दमास आणिले. या[९] पिटविण्यांत गनिमांनीं अन्नाविणें मरावें[९]. परंतु रानांत सुबत्ता[१०], हरभरे[११] व गहूं[११] पुष्कळ. याजकरतां अन्नाची

---

१. गनीम हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं; पण पाहिजे. पेद २ पृ. १३२. (हरिभक्त शब्द खं. ३ ले. ५१६).

२. मोगल भाइसं. (अबदली, नजीबखान दुराणी ह्या प्रतिपक्षीयांस उद्देशून. मोगल ही संज्ञा पेद २. १२० मध्यें आहे.)

३. यापुढें 'गाजुदीखान वजीर जंगलांत होता तो सुरजमल जाट याचे आश्रयानें कुंभारीस राहिला' हें अधिक वाक्य सां व क. प्रतींत आहे.

४. गनीम भाइसं. हे सा. प्रत.

५. यापुढें 'गनीम केवळ सडे, नादार.' हें वाक्य सा. मध्यें आहे. (नादार = बिनसंग्रही) नझुर सगजो. तिकडे नाहींत. ह्यामध्यें 'येत' हा शब्द शें. प्रतींत अधिक आहे.

६. कट भाइसं.

७. 'हिमत' व 'याजहून' असे शब्द सा.

८. तुंबल्यामुळें शें. भा.

९. पळूनच भाइसं; पिटवून मं.; चंदीवांचून भा. पिटून शब्द हिंद. २.४२ पृ. ३९ वर आहे. 'या० मरावें.' हें वाक्य १८७९,८६ त नाहीं.

१०. रान सुबत्ता सा. भारी अधिक शब्द भाइसं.; सुभिक्षेचें तुं. प्रत.

११. 'ओलें हर०', 'गाजरे' सा.

परवा नव्हती.[१२] या प्रकारें फाल्गुन शुद्ध[१३] १४ दिल्लीस येऊन गनीम पोचले. पौर्णिमेचे दिवशीं थोर मजल करून **शिकंदरा**[१४] म्हणोन शहर **आंतवेद** प्रांतीं होतें तेथें यमुना उतरून पोहोंचले. **शिकंदरियास** खबर नव्हती. येकायेकीच गनीम येऊन[१५] घाला घातला. शहर लुटून सत्यानास केला. ते समयीं लूट भांडीं वस्त्रें, मैदा, तूप, तांदूळ साखर कोणी घेईनात[१६] असें जाहालें. लष्कर केवल सडें, आधिक येक तांब्या ध्यावयास आनकूल पडेना. तेथें थोर हांडे बासनें कोण घेतो ?§ आसो. ते दिवसी सिमगी पौर्णिमा होती. सर्वत्र अन्नास[१७] मिळाले.

१२. यापुढें 'अवांतर मुलुख असता तर अन्नाविणें मरती आणि दमहि न पुरता. हें वाक्य सगजो. व सा. मध्यें अधिक आहे; आणि ह्याहि वाक्यापुढें 'माहाल मुलूक ठाणीं झाडून नर्मदेपर्यंत दुराणीची जाहाली.' भाइसं. व 'दुराणीनें घातली.' सां. व क. प्रतींत अधिक मजकूर आहे.

१३.=इ. १७६० फे. २९. ही मिती पेद २. १२० हचा गंगाधर यशवंत चंद्रचूड ह्यांच्या पत्राधारें बरोबर आहे.

१४. सिदपूर, सिवंदपूर, सिखरापूर, सिवदरापूर व सिकंदराबाद शें., भा., मं. व भाइसं. प्रतींत नामांतर आढळतें. सा. प्रतींत शहरच्यापुढें 'मोठें' हें विशेषण आहे. हचा शहराजवळ येणें व शहराची लूट करणें ह्या हालचालींचा बखरींत दिलेला काल पेद. २.१२०, २१.१८६ ह्यावरून बरोबर आहे.

१५. यांणी जाऊन सा. १९२२.

१६. वस्तुयादींत 'कणीक' मं. प्रतींत खाईनात भाइसं. प्रत

१७. सर्वत्रांनीं ते दिवशीं अन्नपाणी केलें. सा. १९२२

§ टीप :—एथपासून तों पुढें पृष्ठ १०७ पर्यंत सातारा प्रतीचा पाठ निराळा आहे. तो असा :—असो,''ते दिवशीं येथें मुकाम करून दिल्लीवर आले. दुसरे दिवशीं तेथून कूच करून दिल्लीवर आले. तों दुराणीची दौड यांजवर येण्याची बातमी येतांच दिल्लीवर अवसान न खातां तेथून मागती ग्वाल्हेर, कुंभेर, दीग, भरतपूर या रोखें चालिले. दुराणीची दौड यांचे पिछाडीस येत चालली. पळतां पळतां खराब जाले. घोडे मनुष्य थकले. दर मुक्कामास शेंपन्नास घोडीं व उंटें थकून राहात. कोणी मनुष्य थकलें असतां दुराणीनें नेऊन शिरच्छेद करावा असा अनर्थ जाला. गनिमांचा हर्ष उडून गेला. बहुत फिकिरींत पडले. हमेषा हिंदुस्थानांत गनिमांनीं दिग्विजय करून संतोषांत कालहरण करून होते. प्रस्तुत काळीं काळ फिरला. यांची गत होऊन फार जेरीस आले. फौजेंत कोणावर होष राहिला नाहीं. शह सोडून दक्षिणेस येतां न ये. शिंदे अभिमानास पोंचले. तेव्हां होळकर यांसहि शहास गुंतून पडणें प्राप्त जालें. एरवीं होळकर मतलबी, ते इतके खराब न होते. अशा संकटानें रोज कूच करून वीस-पंचवीस कोसांचा चाटा पाडावा. पुनः दुराणीनें येऊन गांठावें असें होत चालिलें. देशीं श्रीमंतांस वर्तमान वरचेवर लिहून पाठवीतच होते; परंतु इकडून कुमक गेली नाहीं. कारण श्रीमंतांचा व बंदेखान निजामअल्ली यांचा बिघाड होऊन श्रीमंत फौजेसुद्धां त्याजवर चढाई करून गेले होते. यामुळें हिंदुस्थानांत फौज पाठवावयाची तर्तूद जाली नाहीं व श्रीमंतांचे

(पुढील पानावर)

हुताशनी पूजन केलें. तों येकायेकीच **सुरजमल जाट** याचा सांडणी स्वार धावत सिंदे यांजकडे येऊन[१८] बातमी पोंचविली[१९] कीं, "दुराणीची फौज **दिल्ली**नजीक **यमुना** उतरून आंतर्वेद प्रांतें तुम्हांवर आली, तुम्ही देखत सांडणी[१९] पुढें कूच जलदी करणें" म्हणोन कळविलें.[२०] **जाट** यांणीं शिंदे यांचा उपकार ध्यानांत आणोन बातमी[२०] वगैरे खर्चास सर्व प्रकारें वरचेवर[२०] साहित्य करीत होते. **जनकोजी सिंदे** याणीं **मल्हारराव** यांसीं सर्व वर्तमान सांगितलें. तेव्हां **मल्हारराव**[२२] **जनकोजीस** बोलले[२३] 'या दिवसपर्यंत आम्ही तुमचे[२३] आवाईवरच पळत होतों.[२३] **दुराणी** केवळ आकाश[२४] फाडून आला नाहीं. आम्ही उगेंच व्यर्थ पळत आहों. अद्यापि दुराणीचें तोंड आम्हीं पाहिलें नाहीं. आमचें तोंड त्यांनीं पाहिलें नाहीं. कोठवर[२५] पळावें. या प्रकारची **सिंदे** यांचे फौजेची हेटाळणी[२६] **होळकराचे** लोक करीत होते.

(मागील पानावरून)

चित्तांत शिंदे होळकर उभयतां त्या प्रांतीं आहेत ते मसलतीस धक्का बसूं देणार नाहींत. या खातरीवर (श्रीमंत) स्वस्थ होते. इकडे शिंदे व होळकर पराकाष्ठा करीतच होते. तत्रापि दुराणी गिलच्यांचा शह भारी. उपाय चालेना. गनिमांची फौज जेरीस आली. सन्मुख साम्ना होऊन लढाई करण्याची हिंमत गनिमांची राहिली नाहीं. गनिमांचे फौजेंत महागाई फार जाली. हिंदुस्थान प्रांतींचें राजे-रजवाडे कोणी यांची कुमक करीनात. कुंभेरीकर जाट मात्र गनिमांचें संधान राखून होता; परंतु त्यासहि उघड कुमक करण्याची हिंमत नव्हती; गिलच्याची जरब होती. असे कांहीं दिवस लोटले; इतक्यांत गनिमांनीं आपणांत विचारणा केली कीं, "असे किती दिवस पळावें? एक वेळ साम्ना करून मारावें किंवा मरावें." ऐशी योजना करून फौजेंतील निवडक फौज वेगळी करून एके तोंडावर शिंदे व एकीकडे होळकर उभे राहिले. इतक्यांत दुराणीची दौड येऊन पोंचली. त्यांचा यांचा मुकाबला होऊन लढाई सुरू जाली. ते दिवशीं गनिमांनीं मोठी शिकस्त करून गिलच्यांचें तोंड मागें हटविलें. परन्तु गिलच्यांची फौज भारी व अविचारी लोक; बेलाशक मारामार करून गनिमाचे फौजेंत मिसळले. सिंदे यांनीं जागा सोडली नाहीं. होळकर यांची फौज खानदेशी पाठ देऊन पळों लागली. गिलच्यांनीं मिसळोन जो सांपडेल त्याचा शिरच्छेद केला. असें करितां पंधरा कोस पाठलाग केला. मल्हारराव यांजकडील महिपतराव होता त्याचें शीर कापून नेलें." इत्यादि.

१८. आला कीं साने प्रत.

१९. 'देखत चिठी झुरतीं करणें व 'म्हणोन आली' सा. १९२२. दे० सांडणी पुढें कूच करणें क. दे. चिठी कूच करून जलदीनें जाणें भा.

२०. हे तीन शब्द व वरचेवर हा शब्द सा. २२ मध्यें नाहींत.

२१. चिठी घेऊन मल्हारराव याजकडे आले सा. २२

२२. हे तीन शब्द १८७९,-८६ सा. मध्यें नाहींत.

२३. 'आमचे' व 'आहों' भाइसं.

२४. अस्मानाची गांड फाडून सा. १८७९ गाठ भाइस.

२५. हें वाक्य भाइस.मध्यें नाहीं.

२६. 'भागाडे म्हणोन' हें भाइसं. मध्यें नाहीं.

हें कर्णोपकर्णीं **सिंदे** यांनीं वर्तमान ऐकिलेंच होतें. त्यांत **होळकर** यांनी बळ बांधोन गोष्टी सांगितल्यावरून **जनकोजी** यांनी साफच[२७] उत्तर केलें कीं,[२८] "**सुभेदार** आमचे लोकांनीं धास्त खादली आहे. **दुराणी** आलियावर झाडास बांधले तरी झाडच घेऊन जातील. वरकड गोष्टी काय सांगावयाच्या आहेत ? आमचा हवाल[२९] या रीतीचा आहे. आमची फौज तुमचे फौजेंत राहिली तरी तुमचे फौजेंत अपाय होईल. येक पळालियावर दुसरियाची हिंमत कमी होते. यास्तव आपण या स्थलीं राहून येक वेल **दुराणी** याचा मोकाबला घ्यावा." असें बोलून सिंदे यांणीं नगारा करून कूच केलें. तों **मल्हारराव** यांजकडील लोकांस हुटहूट होती कीं, येक वेल झुंज करावें. दुसरियाची आवई ऐकून कोठवर पळावें. मग **मल्हारराव** यांणीं **गंगोबा तात्या** यांस आज्ञा केली कीं, " फौजेंत तुम्ही राहून युद्ध करावें. जखमी मूल आहे. त्या[३०] जखमा पळणीमुळें अद्यापी सेजेस आल्या नाहींत. त्यापेक्षां तुम्ही राहून[३१] बहुत युक्तीनें युद्ध करावें. म्हणून चार मोठमोठे अध्वर्यु[३२] होते त्यांसहि सांगितलें. आणि आपण निघोन **जनकोजी सिंदे** यांसी गांठिलें. ती तेवढी रात्र [व] दुसरे दिवशीं तिसरा प्रहरपर्यंत **आगरिया** नजीक येऊन पोंचलें. तों **यमुनेस** उतार सांपडेना.[३३] घोडे घालून पाहिलें तों ठाव लागेना. तेव्हां **मल्हारराव** बहुत घाबरे जाहले. आणि **जाटा**कडील वकील **रूपराम कटारी** यांस बोलावून पुसिलें कीं, 'बाबा जखमी आहेत. त्यांस पार करून द्यावें.' म्हणोन अजीज होऊन गोष्ट सांगितली कीं, 'कठीण समय वैरियास न यावा.' **मल्हारराव** या प्रकारें बोलतांच **रूपराम कटारी** यांणें मर्यादा सोडून उत्तर केलें कीं, 'डोखरे[३४] रोता है क्यों ? तुम्हारा जान खाली आम्हारा जान उपर है, फिकीर न करावी' असें निष्ठुर बोलतांच कठिण शब्द प्रसंगोपात्त साहाणें पडलें.[३५] असें **रूपराम कटारी** यानें बोलोन दोन नावा[३६] आणून दोन राहुटियानजीक खुंटविल्या. 'निदान दोन खासे यांस पार करून **आगरियाचे** किल्यास पोचते करून देणें' म्हणोन[३७] सांगितलें. ते समयीं

---

२७. हा शब्द सा. २२ मध्यें नाहीं.

२८. 'सुभेदार, तुम्ही एक वेळ यद्ध करणें. आम्हांस आज्ञा देणें. आम्ही तुमचे फौजेंत राहिल्यास उत्तम नाहीं. मल्हारराव यांनीं 'तुम्ही आम्ही राहून युद्ध करावें म्हणून बहुतसा दुराग्रह केला.' हीं चार वाक्यें सा. २२ मध्यें अधिक आहेत.

२९. आस्था साने २२

३०. हे सात शब्द भाइसं. व क. मध्यें आहेत.

३१. यापुढें 'कोणी आल्यास' हे शब्द सा. २२ मध्यें अधिक. हे १८७९,–८६ मध्यें नाहींत.

३२. मोठे मोठे गृहस्थ भाइसं.

३३. होईना भा.

३४. ठाकूर हा भाइसं. मध्यें अधिक शब्द.

३५. 'डोखरा म्हणोन हिंदुस्थानी भाषेंत म्हाताऱ्यास म्हणतात.' भाइसं. व सा. मध्यें अधीक वाक्य.

३६. जाट भाइसं.

३७. गाठल्या सा. गाडल्या भाइसं.

तमाम फौजेस गैर इतबार जाहला कीं, निदानीं हे दोघे[३८] आम्हांस मोकलून यमुनापार जातील. म्हणोन रात्रीचा रात्र शोध करून दोन कोसांवर[३९] पेंढारी[४०] याणीं पुढें छातीबरोबर पाणी उतारास ठिकाण लाविला. लष्करांत खबर कळतांच कोणी खावंदाची देखील वाट पाहिली नाहीं. रात्रीस फौज नदी उतरावयास लागली. मग **मल्हारराव** व **जनकोजी सिंदे** त्याच[४१] घाटे नदी उतरून दिवस उगवावयास **आगरे** येथें येऊन शहरांत[४२] राहिले.

९०. इकडे मागें **गंगाधरपंतीं, शेटियाजी खराडे** व **संताजी वांबळे**[४३] पांच हजार फौजेनिसी पुढें बातमीस पाठविलें. आपण जीनसामान बांधून सिद्ध होऊन बसले. तों उजाडावयास जाहलें. तोंडास तोंड दिसों लागलें. ते समयीं गिलजाची फौज येऊन पोहोंचली. बातमीचे लोक सावधच होते. तयार होऊन घोड्यावर बसतांच तों गिलजे सरमिसळ होऊन फौजेंत मिळाले.[४४] ते समयीं गंगाधरपंत कडनिकड करून, पुढें सरळ[४५] आले होते त्याजवर घोडी घालून एकवेळ घाव केला. आणि दुराणीचे लोक सारे माघारे घातले. . तों रोहिले व दुराणी दुसरे[४६] झाडून यऊन पोचले[४७]. क्षणभर बरीच मारामारी जाहली. घाया(वा)स हजार पांचशें मनुष्य ठार पडतांच मल्हारराव यांची फौज तडक आगरियाचे रोखें पळूं लागली. गिलच्यांचा कावा[४८] गनिमाहून अधिक (अधिकोत्तर). झुंझास इकडे आरंभ होतांच दहा-पांच हजार फौजेनें[४९] पळावयाची वाट धरावी आणि गनीम पळूं लागतांच मागून डोकीं कापीत पाठीं लागावे. [तेव्हां] पुढें वाट धरून उभे होते ते सहजच मध्यें शिरून मारामारी करूं लागले. **होळकर** यांचे फौजेंत मोठा[५०] प्रलय जाहाला. 'दे माय धरणी ठाय' तैशी गत जाहली. कितीएक लोक जिवाची आस्था धरून दांतीं तृण धरून उभे राहिले[५१]. दुराणी केवळ कठोर, निर्दय, 'गौ घास खाती; बेजान[५२] करो. अल्लाका डेरा दिखलाव.' म्हणोन सिरच्छेद करावा. असें करीत पंधरा कोसपर्यंत पाठलाग केला. **मल्हारराव** यांजकडील **महिपतराव** म्हणोन दिवाण होता. तो घायाळ होतांच त्याचें शीर कापून नेलें.

---

३८. दोघे भाइसं. साने–२२ मध्यें नाहीं.

३९. कोसावर भाइसं. मध्यें नाहीं.

४०. मडरी भाइसं.

४१. उदन भाइसं. उपन क. उदल मं. हें घाटाचें नांव.

४२. सराईत सा. २२.

४३. साबळ सा. व क.

४४. पोचले सा. २२.

४५. सरले सा. २२. पेद २१ पृ. १०८.

४६. हा शब्द भाइसं. प्रतींत नाहीं.

४७. होळकर यांचे लोकांनीं हे शब्द सा. २२ मध्यें ज्यास्त. सा. १८७९, ब–८६ मध्यें नाहींत.

४८. काट भाइसं.

४९. फौजेनिसी भाइसं.

५०. मोठासा सा.

५१. राहतात सा.

५२. बेकार भाइसं. 'करो' भाइसं. मध्यें नाहीं. जबा करो शें. प्र.

तैसेच **शेटियाजी**[५३] **खराडा** म्हणोन मातबर सरदार होता. त्यासहि जखमा भारी लागतांच तो घोडियाखालीं आला. ते समयीं त्याचा **शिवाजी खराडा** केवळ सत्पुत्र होय; त्याणें पित्याकरितां जिवास[५४] उदार होऊन घोड्यावरून उडी टाकून पित्याच्या[५५] डोक्यास[५५] मांडी देऊन बसला. तशांमध्यें दैवयोगेंकरून एक पठाण नेकजात थोर माणूस होता त्याची गांठ पडली[५६]. तो जवळ येऊन उभा राहिला. तों शेटियाजी खराडे यास[५७] जीव होता. पठाण यास उत्तर केलें कीं, "तूं थोर भला मनुष्य दिसतोस. मी शेटियाजी खराडा आहें.[५७] हा माझा पुत्र आहे[५८]. घरीं संपत्तीहि थोडीबहुत आहे; परंतु वंशीं संतान पुरुष एवढाच. माझी तो आयुष्याची मर्यादा जाहली. परंतु एवढा कृतोपकार करावा कीं, माझा पुत्र वांचवावा. निदान पार पाडून गनिमाचे फौजेंत पोचतें कराल तरी तुम्हास लाखपन्नास हजार रुपये पावते करूं[५९]." हें ऐकोन पठाणासहि करुणा आली.[६०] त्याणें आपले दाहा पठाण राखणीस जवळ ठेविले. [आणि] त्यांस[६१] ताकीद केली कीं, 'हलाली-हरामीची गांठ पडली तर यास मारूं देऊं नये.' असें सांगोन पुढें गेला. वीस कोसपावेतों पाठीस लागले. पांच-सात हजार मनुष्यांचीं शिरें कापून नेलीं. तें समयीं खानदेशी लोक म्हणों लागले कीं,[६२] 'तिकडे गंगोबा तात्या पळाले[६३]. अजुनी तरी काय पाहातां.' असें बोलतांच, शिंदे यांचे फौजेस हांसत होते त्यांची मोडशी उतरली; उभयतां[६४] समदुःखी जाहले. आसो. याप्रकारें **मल्हारराव** होळकर यांचे फौजेची पोळजत्रा जाहली. त्यांत[६५] वांचले ते[६६] दाहांनीं पांचांनीं आगरियास पोंचले. जो

---

५३. सटवाजी भाइसं.

५४. जिवास जीव देणेंस भा. जिवित्वास सा. २२

५५. हे दोन शब्द सा. २२ मध्यें आहेत, भाइसं. मध्यें नाहींत.

५६. ह्यापुढें क. प्रतींत 'खराडे याचे मनांत कीं, आम्हास मारील आणि पुत्रासहि मारील आणि सीर घेऊन जाईल हें भय हृदयीं. पठाण याणें पाहिलें कीं रणांत घायालास मांडी देऊन कोण बसला आहे ?' हा मजकूर अधिक आहे. आणि 'तो जवळ येऊन' त्या ऐवजीं 'तेथें' क. प्रतींत आहे.

५७. हा मजकूर भाइसं. मध्यें नाहीं सा. २२ मध्यें आहे.

५८. 'घरहि आहे' हें वाक्य भाइसं. आहे.

५९. होतील सा. २२

६०. त्याची अबदुल अली पावेतों भीड भारीच होती, हें अधिक वाक्य सा. २२ मध्यें जाहे.

६१. हे वाक्य भाइसं. मधील. सा. मध्यें नाहीं.

६२. 'कीं' पुढें 'माय जि भाऊ हिसाय नय' (माझे बाबा हिंसू नकोस. असें म्हणतांच दुसरें म्हणों लागले' हा मजकूर सा. मध्यें व 'माये जि', भाव सोनें न जालब धोडूं' हें तं. प्रतींत आहे. 'माये जि-नि-भाऊ साशेन' स्व. १८७९ प्रतींत आहे.

६३. या धाडले पु.,धाडले सा. २२, पडल क. प्रत.

६४. हा शब्दभा . मजो ल.

६५. लष्करांत भाइसं. प्रत.

६६. त्यांचा पळ सा. २२.

पुढें येई त्यास[६७] वाटे कीं आपण जगून आलों. आन[६८] आवघे[६९] कतल जाहाले. इकडे शेटियाजी खराडा घायाळ होता त्याचा प्राण निघोन गेला. पठाण यांणें शिवाजी[७०] खराडे यास आपले लष्करांत घेऊन गेले. दुराणींनीं थोर यश पावोन सिकंदरियावर मुकाम केला. इकडे मल्हारराव यांणीं आग्र्याहून[७१] जयनगरचे रोखें निघोन गले. गंगाधरतात्या[७२] यांचे वृषण घागरीएवढें जालें. घोडियावर बसतां न येई असें जाले. कोठवर पळतील. गिलचियांनीं शिकंदरियाहून[७३] कूच करून आग-रियाचे नजीक यमुना उतरून मागती गनिमाचे पाठलागास गेले.

---

६७. त्यास 'विस्मय' व 'आहों' भा. आपणच सा. २२.

६८. आन भाइसं. आणि शें. 'व' हा शब्द सा. मध्यें नाहीं.

६९. वरकड मं. प्रत.

७०. सिवजी भाइसं. जिवाजी मं.

७१. 'कूच करून' हें सा. २२ मध्यें अधिक.

७२. गंगाधर तात्या ह्यांचे आंगांत अंतर्गलाचा विकार होता. घोडयावर बसोन पळतां पळतां तो रोग फार वाढला. सां. प्रत.

७३. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि: ...

प्रकरण १० वें

उत्तर हिंदुस्थानांत जाण्यासंबंधीं वाटाघाट आणि भाऊंचा जाण्याचा निश्चय.

९१. इकडे पूर्वील वर्तमान **दताजी सिंदे** पडल्यावर **जनकोजी सिंदे** यांणीं पत्रें **नानासाहेब भाऊसाहेब** यांस पाठविलीं होतीं. त्यांत सविस्तर जाहालें[1] वर्तमान साद्यंत[2] लिहिलें होतें. तों **भाऊसाहेब** याणीं **तांडुळज्याच्या** मुक्कामीं नबाब **निजामअली** यांसी लढाई केली होती. तेथें तुंबळ युद्ध करून यश संपादिलें होतें कीं असें गनिमांनीं कधीं मोंगलासी युद्ध करून मोगल सिकस्त केला नव्हता. केवल मोगल जेरीस आणून त्याजपासून मुलूख व किले **देवगिरी** व **अशेरी** आणखी अवांतर किले यांच्या सनदा करून घेतल्या. ते समयीं **भाऊसाहेब** यांसी गर्व[3] बहुत जाहाला. त्या येशानें फंदांत[4] निमग्न जाहाले होते. तों गर्वाचे घर खालीं. ईश्वरास असह्य[5]. अशा[6] आनंदांत असतां अकस्मात **सिंदे** यांचीं पत्रें येऊन पोचलीं.[7] ते समयीं पत्र वाचून पाहिलें आणि **भाऊसाहेब** ह्यांचा आनंद होता तो नाशाते पावून दुःखीं निमग्न पडतें[8] जाहाले. दुधाचे रांजणींत[9] कांज्याचे शितोडे [पडतात] किंवा धनलोभियाचें धन जातें आथवा राजा **दशरथास** कैकयेचे शब्दबाण किंवा जानकीहरणें रामचंद्र; किंवा **रुक्मिणीसंवराचे** ठायीं राजा शिशुपाल[10] तैशी[11] गत **भाऊंची** जाली. विजयी जालियाचे अति[12] उत्कर्षें समाधान मानून होते, तों येकायकींच **दताजी सिंदे** यांजकडील मेल्याचें[13] वर्तमान आलें. पत्र वाचून पाहिलें; आपले जागां मुहूर्तमात्र दंग होऊन बसले. जसा टाक्यानीं दगड[14] फोडावा किंवा

---

१. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं.
२. साकल्यें सा.
३. 'परम आनंद होऊन' हे शब्द सा. २२ प्रतींत अधिक.
४. वाउदात तुं. आनंदांत सां. फुंदांत
५. साहेना सा., असाह्य शें., आसाध्य भाइसं.'
६. ईश्वरास साहीनातशा तुं.
७. आली कीं दताजी शिंदे लढाईंत पडले. ईश्वरें मोठा गहजब आम्हावर केला. क.
८. हा शब्द भाइसं. मधील
९. पाणी भाइसं.
१०. रुक्मियाचा अपमान जाला. पु. प्रत.
११. हया शब्दापूर्वी 'जैशी गत अपमान झाला.' हे शब्द सा. २२ मध्यें अधिक आहेत.
१२. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं.
१३. पराजयाचें सा.
१४. पाषाण
तुं. काष्ठांगाचे पु.

निर्जीव काष्ठाचा पुतळा तैसी देह-अवस्था[१५] होऊन तटस्थ बैसले. ते समयीं जवळ बळवंतराव गणपत[१६] व गोविंदराव शिवराम[१७] व गोपाळराव गोविंद[१८] व आपले जिव्हाळियाचे दहापांच मुत्सद्दी[१९] बसले होते. त्यांत **बळवंतराव** यांणीं जाबसाल केला कीं, 'भाऊसाहेब, गोमीस[२०] पाय बहुत. त्यांत एक पाय मोडला तर उणें पडत नाहीं.' आधींच मोगल[२१]–पराभवाचें वारें होतें. त्या फंदांतच **बळवंतराव** यांणीं अग्नीवर घृत टाकावें तैसा जाबसाल[२२] केला कीं, "दुराणी म्हणजे काय जिन्नस ? साहेबीं खासा स्वारी हिंदुस्थानांत करावी. **सिंदे होळकर** यांणीं[२३] त्या रानांत बहुत दिवस सुख अनुभविलें आहे. एकमेकांत कलह करून स्वामिकार्याची[२४] नुकसानी[२५] केली. आतां ऐशीच फौज घेऊन हिंदुस्थान काबीज करावें. दुराणी बहुतकरून त्या रानांत येतो. त्याची येक वेळ खोड मोडून द्यावी कीं, पुनः अटक उतरू[२६] न ये." असें बोलतांच तेच क्षणीं मिशीस[२७] पीळ घालून अति उत्कर्षें बोलते जाहाले कीं, "आम्ही हमेशा देशी[२८] मोगलांशीं लढाई करतों; परंतु नर्मदा पार जाऊन[२९] कोठें दिग्विजय केला नाहीं. येक वेळ हिंदुस्थानांत जाऊन **अबदुल अलीचें** पारिपत्य करावें; म्हणजे **सिंदे होळकर** द्वयांचा गर्वपरिहार होईल आणि आमचाहि[३०] पुरुषार्थ होईल. नाहींतर आपकीर्ति लौकिकांत होईल. कीं, ज्याचा सेवक गांजिला त्याचे जालेपणाची[३१] निर्फलता. यास्तव लक्ष मसलती येकीकडे ठेऊन हिंदुस्थानाचे मसलतीस[३२] जावें."

९२. हाच[३३] निश्चय करून नानासाहेब यांजकडे* गेले. तों तेहि **सिंदे** यांचें वर्तमान ऐकोन दुःखांत[३४] होते. तों **भाऊसाहेब** यांणीं जाऊन विनंती केली कीं,

---

१५. देवभाव तटस्थता जाली सा.
१६. मेहेंदळे
१७. खाजगीवाले लिमये.
१८. पटवर्धन. हे नांव मंडळप्रतींत नाहीं.
१९. सर्वहि हा शब्द भाइसं. मध्यें अधिक.
२०. इंगळीस तुं. प्रत.
२१. ताम्र पराभवाचें सा.
२२. चढाचा हा शब्द सा. २२ मध्यें जास्त.
२३. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं सा. व शें. मध्यें आहे.
२४. कार्यास भाइसं. प्रत.
२५. नुकसानी सा. व सगजो. लुकसानी भा.
२६. उतरून येऊन न पावे सा. २२ न पावेत सगजो.
२७. स्मश्रु पिळून सा.
२८. हा शब्द सा व सगजो मधील.
२९. अद्याप हा शब्द सा.मध्यें जास्त.
३०. आमचे पुरुषार्थाचें सार्थक सा.
३१. भलेपणाचें सा. १८७९ व ८६
३२. मनसुबे सा. २२ प्रत व सगजो.
३३. ऐसा चित्तांत सा. २२.
* नानाभाऊंच्या गाठीं आंबे–पडदूर मुक्कामीं फाल्गुन वद्य ५ (१७६० मार्च ७) रोजीं, उदगीरच्या लढाईनंतर एक महिना चार दिवसांनीं पडल्या. खं. १ ले. १६८, १६९.
३४. प्रलापांतच सा. व सगजो प्रत; दुःखसागरांत क. प्रत.

प्रकरण १० वें

उत्तर हिंदुस्थानांत जाण्यासंबंधीं वाटाघाट आणि भाऊंचा जाण्याचा निश्चय.

९१. इकडे पूर्वील वर्तमान **दताजी सिंदे** पडल्यावर **जनकोजी सिंदे** यांणीं पत्रें **नानासाहेब भाऊसाहेब** यांस पाठविलीं होतीं. त्यांत सविस्तर जाहालें[१] वर्तमान साद्यंत[२] लिहिलें होतें. तों **भाऊसाहेब** याणीं **तांडुळज्याच्या** मुक्कामीं नबाब **निजामअली** यांसी लढाई केली होती. तेथें तुंबळ युद्ध करून यश संपादिलें होतें कीं असें गनिमांनीं कश्मीं मोंगलासी युद्ध करून मोगल सिकस्त केला नव्हता. केवल मोगल जेरीस आणून त्याजपासून मुलूख व किले **देवगिरी** व **अशेरी** आणखी अवांतर किले यांच्या सनदा करून घेतल्या. ते समयीं **भाऊसाहेब** यांसी गर्व[३] बहुत जाहाला. त्या येशानें फंदांत[४] निमग्न जाहाले होते. तों गर्वाचे घर खालीं. ईश्वरास असह्य[५]. अशा[६] आनंदांत असतां अकस्मात **सिंदे** यांचीं पत्रें येऊन पोचलीं.[७] ते समयीं पत्र वाचून पाहिलें आणि **भाऊसाहेब** ह्यांचा आनंद होता तो नाशाते पावून दुःखीं निमग्न पडते[८] जाहाले. दुधाचे रांजणींत[९] कांज्याचे शितोडे [पडतात] किंवा धनलोभियाचें धन जातें आथवा राजा **दशरथास** कैकयेचे शब्दबाण किंवा जानकीहरणें रामचंद्र; किंवा **रुक्मिणीसंवराचे** ठायीं राजा शिशुपाल[१०] तैशी[११] गत **भाऊंची** जाली. विजयी जालियाचे अति[१२] उत्कर्षें समाधान मानून होते, तों येकायकींच **दताजी सिंदे** यांजकडील मेल्याचें[१३] वर्तमान आलें. पत्र वाचून पाहिलें; आपले जागां मुहूर्तमात्र दंग होऊन बसले. जसा टाक्यानीं दगड[१४] फोडावा किंवा

---

१. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं.
२. साकल्यें सा.
३. 'परम आनंद होऊन' हे शब्द सा. २२ प्रतींत अधिक.
४. वाउदात तुं. आनंदांत सां. फुंदांत
५. साहेना सा., असाह्य शें., आसाध्य भाइसं.'
६. ईश्वरास साहीनातशा तुं.
७. आली कीं दताजी शिंदे लढाईंत पडले. ईश्वरें मोठा गहजब आम्हावर केला. क.
८. हा शब्द भाइसं. मधील
९. पाणी भाइसं.
१०. रुक्मियाचा अपमान जाला. पु. प्रत.
११. हया शब्दापूर्वी 'जैशी गत अपमान झाला.' हे शब्द सा. २२ मध्यें अधिक आहेत.
१२. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं.
१३. पराजयाचें सा.
१४. पाषाण
तुं. काष्ठांगाचे पु.

निर्जीव काष्ठाचा पुतळा तैसी देह-अवस्था[१५] होऊन तटस्थ बैसले. ते समयीं जवळ **बळवंतराव गणपत**[१६] व **गोविंदराव शिवराम**[१७] व **गोपाळराव गोविंद**[१८] व आणखी जिव्हाळियाचे दहापांच मुत्सद्दी[१९] बसले होते. त्यांत **बळवंतराव** यांणीं जाबसाल केला कीं, 'भाऊसाहेब, गोमीस[२०] पाय बहुत. त्यांत एक पाय मोडला तर उणें पडत नाहीं.' आधींच मोगल[२१]–पराभवाचें वारें होतें. त्या फंदांतच **बळवंतराव** यांणीं अग्नीवर घृत टाकावें तैसा जाबसाल[२२] केला कीं, "दुराणी म्हणजे काय जिन्नस ? साहेबीं खासा स्वारी **हिंदुस्थानांत** करावी. **सिंदे होळकर** यांणीं[२३] त्या रानांत बहुत दिवस सुख अनुभविलें आहे. एकमेकांत कलह करून स्वामिकार्याची[२४] नुकसानी[२५] केली. आतां ऐशीच फौज घेऊन हिंदुस्थान काबीज करावें. दुराणी बहुतकरून त्या रानांत येतो. त्याची येक वेळ खोड मोडून द्यावी कीं, पुनः अटक उतरूं[२६] न ये." असें बोलतांच तेच क्षणीं मिशीस[२७] पीळ घालून अति उत्कर्षें बोलते जाहाले कीं, "आम्ही हमेशा देशी[२८] मोगलांशीं लढाई करतों; परंतु नर्मदा पार जाऊन[२९] कोठें दिग्विजय केला नाहीं. येक वेळ **हिंदुस्थानांत** जाऊन **अबदुल अलीचें** पारिपत्य करावें; म्हणजे **सिंदे होळकर** हयांचा गर्वपरिहार होईल आणि आमचाहि[३०] पुरुषार्थ होईल. नाहींतर आपकीर्ति लौकिकांत होईल. कीं, ज्याचा सेवक गांजिला त्याचे जालेपणाची[३१] निर्फलता. यास्तव लक्ष मसलती येकीकडे ठेऊन हिंदुस्थानाचे मसलतीस[३२] जावें."

९२. हाच[३३] निश्चय करून नानासाहेब यांजकडे* गेले. तों तेहि **सिंदे** यांचें वर्तमान ऐकोन दुःखांत[३४] होते. तों **भाऊसाहेब** यांणीं जाऊन विनंती केली कीं,

---

१५. देवभाव तटस्थता जाली सा.
१६. मेहेंदळे
१७. खाजगीवाले लिमये.
१८. पटवर्धन. हे नांव मंडळप्रतींत नाहीं.
१९. सर्वहि हा शब्द भाइसं. मध्यें अधिक.
२०. इंगळीस तुं. प्रत.
२१. ताम्र पराभवाचें सा.
२२. चढाचा हा शब्द सा. २२ मध्यें जास्त.
२३. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं सा. व शें. मध्यें आहे.
२४. कार्यास भाइसं. प्रत.
२५. नुकसानी सा. व सगजो. लुकसानी भा.
२६. उतरून येऊन न पावे सा. २२ न पावेत सगजो.
२७. स्मश्रु पिळून सा.
२८. हा शब्द सा व सगजो मधील.
२९. अद्याप हा शब्द सा.मध्यें जास्त.
३०. आमचे पुरुषार्थाचें सार्थक सा.
३१. भलेपणाचें सा. १८७९ व ८६
३२. मनसुबे सा. २२ प्रत व सगजो.
३३. ऐसा चित्तांत सा. २२.
* नानाभाऊंच्या गाठीं आंबे–पडदूर मुक्कामीं फाल्गुन वद्य ५ (१७६० मार्च ७) रोजीं, उदगीरच्या लढाईनंतर एक महिना चार दिवसांनीं पडल्या. खं. १ ले. १६८, १६९.
३४. प्रलापांतच सा. व सगजो प्रत; दुःखसागरांत क. प्रत.

"हिंदुस्थानांतील वर्तमान तों या रीतीचें जालें. आवघें हिंदुस्थान येकत्र जालें आहे. 'पाण्या[३५] आधीं वळण बांधितां उत्तम; नाहींतर शेणामेणाचे,' लोखंडाचे जालियावर पुढें भारी पडेल. यास्तव दादासाहेब यांची रवानगी साठ हजार फौजेनिसीं करावी; ते पुढें जातील. जडभारीच[३६] पडल्यासारखे जाहल्यास[३६] आणखी साहित्य करावयास येईल." असें ऐकोन नानासाहेब यांणीं उत्तर केलें कीं, 'तिघां खाशियांनीं ठिकाणीं राहून झाडून देशीच्या फौजा पाठवून द्याव्या हें उत्तम[३७]; परंतु खासा स्वारी गेली असतां आब जाईल.[३८]' असें बोलिल्यावर भाऊसाहेब मर्यादा सोडून बोलिले कीं, "नानासाहेब, येवढें कर्म एक कीर्तीसाठीं करावें, दुराणीचा शह भारी. फौजेनें कार्य होणार नाहीं. या कार्यास खासा स्वारी[३९] गेली पाहिजे. मग दैवीं असेल तसें घडेल. मृत्यु[४०] स्वदेशीं परदेशीं सुटत नाहीं. अथवा मेलें तरी वाळवून ठेवीत नाहीं." असें वर्मभेद[४१] ऐकतांच नानासाहेब आपले जागा कुंठित[४२] जाहाले. चित्तांत पुरतां भाव समजला कीं, भाऊसाहेब दुराग्रहास पडले. हे[४३] कोणाचें ऐकत नाहींत. म्हणोन क्षणभर भाऊसाहेबांस शांत[४४] करून सांगितलें कीं, "दादासाहेब यांची रवानगी करतों." याप्रमाणें सांगोन[४५] भाऊसाहेबांस लाऊन दिल्हे. जवळ स्त्री गोपिकाबाई होती तीस बोलिले कीं, 'भाऊसाहेब यांचा दुराग्रह कीं, दुराणीचें पारिपत्य करावयास दादास रवाना करावें. अबदुल व नजीबखान रोहिला व मुजायतदौला अहमदखान लंगडा पठाण व माधवसिंग जयनगरकर व बिजेसिंग मारवाडी व दुंदेखान रोहिला समग्र हिंदुस्थान एकच[४६] जाहालें आहे. येवढी सिंदे यांची लढती फौज तिची कोण[४७]

---

३५. हें न्यायवाक्य भाइसं. मध्यें नाहीं. सा. २२ मध्यें आहे. उत्तम आहे. सगजो.

३६. जड भारी सारखे सा. २२ प्रत.

३७. 'हे उत्तम' हे शब्द भाइसं. मधील, ते सा. मध्यें नाहींत.

३८. तुटेल सा. २२. हें व ह्यामागील अशा दोन वाक्यांऐवजीं क. प्रतींत असा पाठ आहे–'फौज त्यांचे पुस्तपन्हाचास पाठवून द्यावी हें उत्तम. खासा स्वारी गेली असतां बोज राहणार नाहीं. भ्रम जाईल कीं, खासा आला. यश किंवा अपेश कोणाचे स्वाधीन नाहीं. यास्तव याप्रमाणें करावें.'

३९. ह्या शब्दापुढें 'कोणीतरी' हे शब्द १८७९, ८६ सा मध्यें नाहींत. २२ त आहेत.

४०. मृत्यु शब्दापूर्वी आशा-न-ज-शी हीं अक्षरें १८७९-८६सा. प्रतींत व सगजो प्रतींत आहेत (शी-सी) निशी पु. प्रत.

४१. 'वर्मभेदें उत्तर' सगजो. वर्मभेदक सा. २२.

४२. खिन्न क. प्रत.

४३. तेव्हां सा. २२ 'हे' हा शब्द शें. प्रत.

४४. शांतवन भाइसं.

४५. उत्तर सांगितलें आणि भा. प्र.

४६. 'हिंदुस्थान' हा शब्द शें. सा. २२ मं. व भा. ह्या प्रतींत आहे. भाइसं. मध्यें नाहीं. एकत्र सा. २२.

४७. काय गती जाहली होती भाइसं.

गत जाली ! मुलास आपले हातें वोपून[४८] द्यावें असें जालें आहे.' ऐकोन **गोपिकाबाईनीं** उत्तर केलें कीं, "**दादासाहेब** यास रवाना करावें.[४९] दैवी असेल तसें होईल." असें ऐकतांच **नानासाहेब** यांस विषाद आला आणि म्हणाले कीं, "स्त्रीबुद्धिः प्रलयंगता[५०]..... स्त्रीजातीस मनसुबा पुसावा याहून अश्लाघ्यता[५१] दुसरी नाहीं." म्हणोन बोलोन निवान्त राहिले.

९३. दुसरे[५२] दिवशीं **भाऊसाहेब** व **नानासाहेब** येकत्र होऊन दादासाहेब यांस पाठवावें असा **भाऊचा** दुराग्रह पाहून **दादासाहेब** यांस बोलिले कीं, "हिंदुस्थानांत सिंदे यांची फौज बुडाली. तुम्ही फौज घेऊन **हिंदुस्थानांत** जावें आणि तांम्रांचा[५३] पराभव करावा." असें ऐकोन **दादासाहेब** यांनी उत्तर केलें कीं, 'हिंदुस्थानांत जाणेची मला आज्ञा करावी[५४] तरी ऐसी हजार फौजेस भर नालबंदी देऊन समागमें बरोबर[५५] क्रोड रुपये खजिना द्यावा; म्हणजे आम्ही **हिंदुस्थानांत** जातों. मग दुराणी व आम्ही पाहून घेऊं. हें तुम्हास आनकूल पडत नाही[५६] तर आम्हाला साफ जावयासी[५७] पुरवत नाहीं." म्हणोन बोलोन उठोन गेले. आसें एकदोन दिवस मनसुब्याची गडबड जाहाली. तों **रघुनाथराव** ह्यांचा पुरता दुराग्रह[५८] दिसोन आला.

९४. मग [५९]**भाऊसाहेब** व **बळवंतराव गणपत**[६०] येकान्तीं बसोन मनसबा केला कीं, "**दादासाहेब** समागमें खजिना मागतात. दुसरें[६१] **नानासाहेब** यांचे चित्तांत[६१] निखालस **दादासाहेबांस** पाठवावें असें नाहीं, **नानासाहेब** जावें न[६२] जावें

---

४८. ओपून सा. आणूं न द्यावें भाइसं. आणूं न द्यावें हीं गोष्ट नीट नव्हे मं. प्रत,

४९. हचापुढें 'यांत हित आहे' सा. २२ सगजो. प्रत.

५०. आत्मबुद्धिर्हितार्थाय गुरुबुद्धिर्विशेषतः । परबुद्धिर्विनाशाय स्त्रीबुद्धिः प्रलयंगता ॥ हा सबंध श्लोक सगजो व तुं. प्रतींत आहे.

५१. लाज भाइसं प्रत.

५२. उपरांतिक सा व सगजो प्रतींत आहे.

५३. ताम्र पराभवाते पाववावे सा. २२. ताम्रमुखी क. प्रत.

५४. कराल तर सा. व सगजो. प्रत.

५५. हा शब्द भाइसं. प्रतींत अधिक आहे.

५६. 'नाहींतर' हचा ऐवजीं 'नसल्यास' सा. २२.

५७. 'जाणें' सा. २२. जावयासी शें. व भा. प्रत. द्यावयास भाइसं. प्रतींत आहे.

५८ दुराग्रहसा सा. २२

५९. राजश्री सा.

६०. 'गणेश' भाइसं. व १८७९ व ८६ सा. मध्यें आहे.

६१. हे चार शब्द सा २२ व सगजो. प्रतींत आहेत. हचा सबंध वाक्याऐवजीं क प्रतींत 'त्यापेक्षां निखालस त्यास पाठवूं नये' हें वाक्य आहे.

६२. 'जावें न जावें' हें शब्द सा. २२ त नाहींत. भाइसं. प्रतींत आहेत.

६३. त्यापेक्षां भाइसं व 'तो तरवार मारून यश संपादून काय येणार आहे हें कळतच आहे हा मजकूर क. प्रतींत अधिक आहे. [पृ. ११६ ओळ १ पहा.]

या जुलमांत. त्यांत[६३] रडतराऊत घोडियावर बसविलीया पुढें जय[६४] कशास इच्छावा ? **नानासाहेब** व **गोपिकाबाई** यांचें बोलणें येकान्तीं जाहलें तेंहि कर्णोपकर्णी **भाऊस** कळलें[६५] होतें. **भाऊसाहेब** यांचें वचन ऐकोन **बळवंतराव गणपत**[६०] यांनीं हितशत्रुपणें निरोत्तर केलें कीं, 'बाहेर पैसा मिळवून घरास खजिना आणावा; तों घरचा खजिना नेइलियावर बाहेर[६६] यांणी[६६] काय मिळवावें ? आयत्या पिठावर रेघा कोणीहि ओढील.[६७] यंदा[६८] **दादासाहेब** खातरजमेनें जात नाहींत,' आसें[६९] ऐकोन **भाऊसाहेब** बोलिले कीं, 'आतां आवघा मनसबा एकीकडे ठेवावा आणि आम्हींच जाणेचें करावें. **नानासाहेब** यांचा **दादासाहेब** सखा भाऊ आणि आम्ही चुलतभाऊ, आमचे[७०] मनांत असें आणि त्यांचे मनांत तसें. यासी महत् अंतर आहे. पुढील भवितव्य असेल[७१] तसें घडो[७१]. त्यास किलाफ[७२] बुद्धि निर्माण जाहली. धैर्यसमुद्र ढवळला. **भाऊसाहेबांनीं** आपणच जावें असा पुर्तेपणीं निश्चय केला.

९५. मग **भाऊसाहेब** **नानासाहेब** यांजकडे जाऊन बोलते जाहले कीं, "**दादासाहेब** यांस जावयास आनकूल पडत नाहीं. त्यांस[७३] खजिना पाहिजे. आतां आम्हांस जावयाची आज्ञा व्हावी. आम्ही[७४] **हिंदुस्थानांत** जातों." म्हणोन निक्षून बोलिले.[७५] नंतर **नानासाहेब** आपले जागीं मुहूर्तमात्र उगेच[७६] राहून **भाऊस** बोलिले कीं[७७], "आम्ही आपले जागां म्हणतों[७८] कीं, राम-लक्ष्मणाचा जोडा तुमचा[७९] आमचा भाऊपणा. तुम्हीं आजपर्यंत जितकें पाणी पाजिलें तितकें प्यालों. कधीं तुमचा शब्द उल्लंघन केला नाहीं. आम्हांस मोकलून जाऊं म्हणतां. तेव्हां

---

६४. पराजय सा. २२ व क. प्रतींत 'जय'.

६५. कानोपकानीं श्रुत जालेंच होतें सा.

६६. बाहेरचा १८७९–८६ सा. 'खजिना' सा. २२

६७. ओढतील भाइसं.

६८. 'एवंच' सा.

६९. 'बळवंतराव यांचें बोलणें' हे शब्द आसेच्या पुढें सा २२ मध्यें पण ते १८७९–८६ सा. मध्यें नाहींत.

७०. 'त्यांचे आमचे ममतेंत महत् अंतर, हें सा प्रत. 'नात्यांत मात्र अंतर सगजो. प्रत. वरील पाठ भाइसं. व क. प्रतींत आहे.

७१. हचा तीन शब्दांऐवजीं 'विपर्यांस सा. प्रतींत.

७२. हें वाक्य क. व भाइसं. प्रत.

७३. हा शब्द सा. त नाहीं. भाइसं. मधील.

७४. मी सा. १८७९,–८६

७५. जाबसाल केला सा.

७६. निवान्त सा. प्रत.

७७. तुम्ही १८७९–८६ भाऊसाहेब सा. २२ 'हें चित्तांत काय आणलें' हें वाक्य सा. मध्यें अधिक आहे.

७८. म्हणवितो सा. 'आम्ही' शब्द सा. मध्यें नाहीं.

७९. हे तिन्ही शब्द (तुमचा आमचा भाऊपणा) सा. मध्यें नाहींत. तुम्ही–च्या पूर्वी भाऊ हें संबोधन सा. मध्यें आहे.

आम्हांस दशरथाची गत जाहली[८०]. तुमच्या वियोगानें[८१] आम्हांस कांहींच सुचणार नाहीं." असें बोलोन डोळ्यांस पाणी आणिलें. ज्या ज्या कालीं जें जें होणार तें चुकत नाहीं. नानासाहेबांनीं मायाजालांत बहुत[८२] गोविलें; परंतु[८३] भाऊंचें चित्त चलेनासें[८४] जालें. पुरता जाण्याचा द्रढ निश्चय जाहला.

९६. नानासाहेब गोपिकाबाईकडे जाऊन बोलिले कीं, "भाऊंनीं जावयाचा चित्तांत निश्चय[८५] आणिला. बहुत ग्लानी[८६] केली;, परंतु निष्ठुरच[८७] बोलतात. तस्मात् तुम्हांस* आम्हीं सहजीं उत्तर केलें होतें तें त्यांचे कानावर गेलें कीं काय हें न कळे. आमचा सांगावयाचा यत्न राहिला.[८७] तुम्ही त्यांस बोलावून कळेल त्या रीतीनें शांतवन करावें; म्हणून[८८] सूचना केली. यावर बाईनीं भाऊंस बोलावून आणिलें आणि[८९] बोलतो जाहली जे[९०] "भाऊसाहेब[९१], आम्ही तुमचे जिवावर सुखरूप आहों. आणि तुम्ही हिंदुस्थानांत जावयाचें काय म्हणोन मनांत आणिलें ? आपण शाबूद तो दुनिया शाबूद. तुम्हांस जाणें तरी आमचें देहसार्थक[९२] करून जाणें." असें ऐकतांच भाऊसाहेब यांस सतीची गत जाहली. सतीनें जावयाचा निश्चय केल्यावर मग पुढें मुलेंबाळें व संपत्ति जरी आणिली तरी वमनप्राय होतें[९३] तसें जाहलें. उत्तर केलें कीं, "बाई, तुम्ही व नानासाहेब व दादासाहेब शाबूद असल्यावर आम्हांसारिखे शतशा कारभारी होतील. आजपावेतों बरेंवाईट जें करणें तें केलें. आतां येक वेळ आम्ही हिंदुस्थानांत जाऊन येतों. तुम्ही लक्ष गोष्टी सांगितल्या तरी आम्ही जाण्याचें[९४] राहात नाहीं. असें ऐकतांच बाईस असें

---

८०. आली सा.

८१. 'वियोगानळ' 'साहणार नाहीं' सा; वियोगें करून भा; वियोगानळें मं.

८२. बहुत दोनदां सा. 'मायाजाळ' टाकून' तुं.

८३. ह्यापुढें 'भाऊचे चित्तांत उदासीनता भरली हें वाक्य सा. मध्यें अधिक.

८४. चोखाळेनासे सा. हलेनासे सगजो प्रतींत आहे. वरील पाठ १८७९ व १८८६ सा. मध्यें आहे. 'व चित्त स्वच्छ होईना सां. ' स्थिर न होई क. प्रत.

८५. निश्चयरूप आणिलें सा. व सगजो. प्रत.

८६. पु. व भाइसं व १८८६ सा मध्यें आणि ग्लांती सा. २२ ग्लानता भा. ग्लानी = विनवणी*. निक्षून सगजो. निष्ठुर सा. व भाइसं. आम्हासी भाइसं तुम्हास शें. सा. व भा. प्रतींत.

८७. राहिला नाहीं पु. प्रत

८८. 'म्हणून' च्या पुढें 'गोपिकाबाईस' सा. २२.

८९. हा शब्द भाइसं. मधील; सा. २२ मध्यें नाहीं.

९०. 'कीं' सा २२

९१ साहेब सा २२

९२ आमची विल्हेवाट करून मग जावें' क प्रत

९३ दिसतें भाइसं.

९४. 'आम्हास जावयाचें' सा व 'राहवयास अनुकूल पडत नाहीं.' हें वाक्य अधिक सा. २२ मध्यें आहे.

जाहालें कीं, काळजांत[९५] घाव पडतो[९५] तशी आवस्था जाहाली. क्षणभर आक्रोश[९६] करून अंगावरील शालजोडी पुढें टाकली आणि उभी राहिली कीं **भाऊ**, आम्हांस सोडून*[९६] न जावें." असें बोलतांच **भाऊ** विषादास येऊन निरुत्तर केलें कीं, "तुम्ही जातीच्या स्त्रिया. तुम्हास हा मनसबा कशास पाहिजे. तुम्ही आपले घरांतील कामधंदा¶[९७] करून असावें." असें बोलून अव्हेर[९७] करून रागें रागें उठोन गेले. तेव्हां **गोपिकाबाईस** पुर्तें कळोन आलें कीं, **भाऊ**[९८] दिल्लीस निश्चयें जातात.[९९] मग **गोपिकाबाईनीं नानासाहेब** यांस सांगितलें कीं **भाऊसाहेब** राहात नाहींत, जावयाचा निश्चय केला. आतां मिथ्या वाचा शिणविण्यांत सार्थक नाहीं. आतां एकच मनसबा आहे कीं, समागमें **पार्वतीबाईस**[१००] घेऊन जाणार. तेव्हां मागें त्यांचें काय आहे. दिल्लीस गेले आणि तिकडेसच राहिले तरी यत्न राहिला.[१०१] यास्तव समागमें पायगुंता **विश्वासराव** यास द्यावें, असा दोघांचा संकेत जाहला. येकच[१०२] भाऊंचा जावयाचा पुर्ता मनसबा[१०३] ठरला. तोंपावेतों बाहेर कोणास कळों दिल्हें नाहीं.[१०४]

९७. तों[१०५] फाल्गुनमास[१०६] आला होता. म्हणोन तमाम मराठे व ब्राह्मण अवघे[१०७] सरदार लहान थोर सर्व[१०८] रंग खेळावयास आणिले. तमाम डेरे छबिने[१०९]

---

९५. सुरी घालावी मं. प्रत

९६. क्रोध येऊन क. प्रत

९६*. ओलांडून सा.

९७¶. कामधाम सा. 'राहावें' भा.

९७. 'अव्हेर करून' हे शब्द शें.,सा. व मं. प्रतींतील.

९८. 'भाऊ खास' भा. 'भाऊ'–शब्दापुढें 'आमची गोष्ट ऐकत नाहींत' मं. प्रत.

९९. 'ब्रह्मदेवहि आला तरी ऐकत नाहींत.' क. प्रत.

१००. 'सौ.' 'बाई' भाइसं. प्रतींत नाहीं. सा. मध्यें आहे.

१०१. 'यत्न नाहीं' सा. 'यत्न काय आहे.' शें. व मं. प्रत.

१०२. एवंच सा.

१०३. 'एकांतीं घरांतच' हे शब्द 'मनसबा' ह्या शब्दांपूर्वी सा. मध्यें आहेत. व तें बरोबर. पहा खं. १ पृ. २७१

१०४. दिला नाहीं सा.

१०५. 'मग' सा. 'पुढें' १८८६ सा.

१०६. 'माघमास जाऊन' असें 'फाल्गुन'च्या पूर्वी सां. व क. प्रतींत आणि 'म्हणोन'च्या जागीं 'हुताशनी करून रंगपंचमीचे दिवशीं' हाहि अधिक मजकूर सां. व क. प्रतींत आहे. मं.प्रतींत 'फाल्गुन वद्य पंचमी' असें आहे.

१०७. अविधी सा.

१०८. 'सर्व मुत्सद्दी' सा. २२. १८७९–८६ सा. मध्यें नाहीं. 'सर्व मराठे वगैरे मानकरी सर्वत्र पदरची मंडळी रंगपंचमीस रंग खेळावयास बोलाविली होती' मं. प्रत.

१०९. बिछाने शें. प्रत.

देऊन जागोजाग[११०] आरास केली. रंग[१११] खेळावयास आरंभ केला. नृत्य,[११२] गाणें दोहींची गाठ पडली. रंगराग[११३] येकत्र जाहाले. सायंकाळ मर्यादा जो रंग होणें तो रंग जाहला.[११४] उपरांतिक हिंदुस्थानांतील वर्तमान श्रुत केलें आणि सर्वस्वें **भाऊंनी** आपला[११५] जाण्याचा निश्चय सांगितला.[११५*]

९८. **भाऊसाहेबांनीं** मुहूर्त निकडीचा पाहिला. तों जवळ मुहूर्त निघेना मग¶ सिवालिखिताचे मुहूर्तानें रात्रीस बाहेर निघाले. समागमें सरदार **दमाजी गायकवाड** व **यशवंतराव पवार** व **समशेर बहादूर** व **इभ्रामखान गाडदी** व **हरि दामोदर** व **सोनाजी भापकर** राणोजी सिंदे[११६] यांचे राखेचे पुत्र **तुकोजी सिंदे** व महादजी[११७] सिंदे आणखी लहान थोर सरदार शिवाय हुजरातीची[११८] पन्नास हजार फौज नेमिली. **भाऊसाहेबीं** सरदार लोकांचे चित्तांत किलाफ होता त्याचा संशय दूर केला.[११८अ] **दमाजी गायकवाड** डावे* हातीं **श्रीमंतास** मुजरा करीत होते. जाते समयीं त्याचे गळा पडोन त्यास वचन दिल्हें कीं, "हिंदुस्थानांतून फिरोन आल्यावर तुमचा[११९] गुंता संपूर्ण उकलून देतों" म्हणोन त्याचें

---

११०. 'जागा चांगली आराम केली' भाइसं. आरास हा पाठ सगजो. व मं. प्रतींत आहे.

१११. 'रंग' शब्दापूर्वी 'रमणीय बैठक करून' हे शब्द सा. २२ मध्यें आहेत. पण ते सा. १८७९–८६ मध्यें नाहींत.

११२. नृत्यांगना सा. २२. नृत्य–च्या पूर्वी.

११३. 'रागरंग' 'जाहले'च्या पुढें 'पण्यांगनांनीं केवळ अप्सरांप्रमाणें गायनकला मांडिली' हें वाक्य सा. २२ मध्यें आहे व १८७९–८६ सा. मध्यें व सगजो. मध्यें पण्यांगनांनीं हा शब्द वगळून इतर चार शब्द आहेत.

११४. 'सायंकाळ' इ. ह्या वाक्याऐवजीं 'नृत्य गाणें वगैरे संध्याकाळपर्यंत उरकलेवर' हा मजकूर आहे. उपरांतिक शब्द नाहीं. मं. प्रत.

११५. 'हिंदुस्थानचे मोहिमेस' हे दोन शब्द सा. २२ मध्यें भाऊंनीं ह्या शब्दापुढें जास्त आहेत. ते १८७९–८६ सा. मध्यें नाहींत.

११५*. केला भा. प्रत

¶ शिवपार्वतीनें वर्तविलेल्या = प्रदोषकालच्या = सूर्यास्तानंतरच्या दोन घटकापर्यंतचा वेळ.

११६. राणोजी सिंदे सा.

११७. विठोजी पु. क. सां. शें. प्रत. महादजी सगजो. व तुं. प्रत.

११८. 'हजेरीची' शें. सा. सगजो. प्रत. हुजूरची = हुमरीची. क. प्रतींत 'हुजरातीची' व 'नेमिली' असे पाठ आहेत. 'जमली' भा.

११८अ. 'करून' इ. १८७९ व १८८६ सा.

* छत्र० शाहू मृत्यु पावल्यानंतर कोल्हापूरकर ताराबाईनीं पेशव्यांचे विरुद्ध चालविलेल्या खटपटींत दमाजी गायकवाड यांचा हात होता. दमाजीचा बंदोबस्त नाना पुरंदरे यांच्याकरवीं झाला; पण ह्या वेळेपासून दमाजी पेशवे मंडळींना डावे हातानें 'रामराम' करूं लागला.

११९. 'गुजराथ' सा. व सगजो. प्रत. 'तुमचें मन काय आहे तें पूर्ण करून देऊं' क. प्रत.

समाधान करोन त्यास उजवे हातें 'रामराम' करावयास सांगितलें.[१२०] तसेंच **यशवंतराव पवार** याचाहि गौरव केला आणि कित्येक लहान थोर सरदार यांचे वृत्तीचे उच्छेद केले होते; कोणाचे सरंजाम जहागीरीस खलील[१२१] केल्या होत्या त्यांस वचन दिलें कीं, 'तेथून आलियावर तुमचे तुम्हास करून[१२२] देऊं' म्हणोन समाधान केलें. **इब्रामखान** गाडदी **भाऊसाहेबांस** बोलिला कीं, "तुम्ही गलीम लोक दाखवाल आणि पळाल,[१२३] आम्ही गाडदी लोक केवळ पायउतार[१२४] आम्हांस पळावयास पाय नाहींत. आणि गांठ तों दुराणी[१२५] रोहिल्यांची पडणार. याची आज्ञा काय?" ते समयीं **भाऊसाहेब** यांनीं इमान दिली कीं, "निदान प्रसंग पडला तरी तुम्हांस सोडून निघणार नाहीं. जेथें तुम्ही गाडून उभे राहाल तेथें मी राहीन. यास अंतर करणार नाहीं. म्हणोन त्यास बेल-भंडार दिल्हा. त्याजपासून सानकरोटी आपण घेतली आणि कूच केलें. ते समयीं **गोपिकाबाईनीं** बळें करून **विश्वासराव** हातीं[१२६] दिल्हा. त्याजला[१२७] समागमें घेऊन निघोन चालिले. ते समयीं **नानासाहेब** व **गोपिकाबाईस** असें जाहालें कीं, **बाळ**[१२८] आजच आपणास अंतरलें. सर्वत्रांचें मायाजाल सारखेंच. पुढें होणार भवितव्य[१२९] विचित्र होतें. यास्तव तमाम लष्करास निरवानिरव करून येकमेकांचे गळां पडोन निघाले. यात्रकारें[१३०] जाहालें. अस्तु. [भाऊसाहेब] फौज व चांगली घोडी चांगले मर्द व उंच वस्त्रें व उष्टरखाना[१३०] व तोफखाना[१३०] व कांहीं खजिना घेऊन कूच केलें. इकडे **नानासाहेब**[१३१] कूच करून पुण्यास आले.

---

१२०. 'लाविलें' सा. व सगजो. प्रत. 'करावा म्हणोन सांगितलें' मं. प्रत.

१२१. 'खाली' भा. पु. व १८७९ व ८६ सा. प्रत. जप्त सा. १९२२ व मं. प्रत. खालसा तुं. व सगजो. 'खलेल' शें.

१२२. 'मोकळचा' करून सा. १९२२ पण १८८६ सा. त नाहीं.

१२३. 'दहा वेळ पळाल, दहा वेळ उभे रहाल' सगजो व सा. प्रत. दाखवाल एक व कराल एक, त्यास असें होऊं नये. बरगे लोकांची चाल लढण्यास तोंड द्यावें आणि कमजोर जाला म्हणजे पळून जावें ही रीत आहे. क. प्रतींतील पाठ.

१२४. हा शब्द भा. प्रतीमध्यें नाहीं.

१२५. 'दुराणी इ. १८७९ व ८६ सा. मध्यें नाहीं. १९२२ मध्यें आहे. 'तों' हा शब्द शें. व सा. व भा. प्रतींतील.

१२६. 'विश्वासराव यास त्यांचे हातीं' सा. २२. 'त्यांचें' १८७९ व ८६ मध्यें नाहीं.

१२७. हे दोन शब्द १८७९ व ८६ मध्यें नाहींत.

१२८. 'भाऊसाहेब व मूल' क. प्रत.

१२९. 'भवितव्य' सा. १८७९ व ८६ त नाहीं.

१३०. हे शब्द इ. १८७९ व ८६ सा. प्रतींत नाहींत.

१३१. तेथून कूच सा. २२ प्रतींत आहे. हें १८८६ सा. प्रतींत नाहीं. तेथून = आंबेपडदुराहून.

प्रकरण ११ वें

भाऊसाहेबांची दिल्ली घेऊन कुंजपुऱ्यावर स्वारी.

९९. **भाऊसाहेब** मजल दरमजल करून **बऱ्हाणपुरास** गेले[१]. **अशेरी** किल्ल्यावर पांज हजार फौज भोंवतालीं ठेवून आपण[२] पुढें विंध्याद्रिपर्वत ओलांडून **नर्मदापार** जाहाले. **विंध्याद्रिसच सातपुडा** प्राकृत अभिधान आहे. संपूर्ण देश **खानदेश, बागलाण, नेमाड** ओलांडून **माळवियाच्या** घाटास गेले. घाट **बोडसे**[३] यांचे नजीक चढून **माळवे** प्रांतीं **सुरंज-भेलशियानजीक** मुकाम केला. तेथून **जनकोजी सिंदे** व **मल्हारराव** यांसी पत्रें लिहिलीं कीं, "आम्ही मजल दरमजल यावें किंवा दम खात यावें?" म्हणोन.[४] त्याजवरून[५] **मल्हारराव** यास विषाद आला कीं, "हे थोर खावंद असतां यांणीं ठिकाणीं राहून फौजेचा पुरावा करावयाचा होता. त्यांत[६] **भाऊसाहेब** कर्ते मनुष्य. ते निघोन आले. तेव्हां साऱ्या गोष्टी यांत आटपल्या. पुढें **नानासाहेब** यांस कांहीं उपराला करावयाची हिमत[७] होणार नाहीं. असो. खावंद आले त्यांस उपाय नाहीं." म्हणोन पत्राचें उत्तर लिहिलें कीं,[८] "आधीं येण्याचें करूं नये. मनसुबा[९] पुढें थोर आहे. **रोहिला** व **सुज्यातदौला, आमदखान** लंगडा पठाण व दुराणी व हे[१०] कांहीं सामान्य नाहींत. यास्तव मोहरा इरेस पडावा[११] असा अर्थ नाहीं. याजकरितां साहेबीं माळवे प्रांतीं राहून[१२] छावणी करावी. आणि सडी फौज पुढें रवाना

---

१. 'आलें' सा. प्रत. 'गेले' भाइसं.

२. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं. सा. व सगजो. मध्यें आहे.

३. 'वोडसियाचे' सा. २२ 'नजीक मुकाम केला. तेथून घाट' तुं. प्रत. 'भेलयानजीक' भाइसं. मध्यें आहे.

४. 'म्हणोन' ह्यापुढें 'पत्रें जासूद याजबराबर पाठविलीं' हें वाक्य सा. २२ मध्यें अधिक आहे.

५. 'मल्हारराव याणीं पत्र पाहून त्यांस' असा बदल सा. २२ मध्यें आहे.

६. 'त्यास' सा. प्रत, त्यांत भाइसं.

७. 'मदत' भाइसं. प्रत.

८. ह्या वाक्याबद्दल 'हा संदर्भ पत्रीं सुचवोन पत्राचीं उतरें पाठविलीं कीं येण्याचा बेत करावयाचा नव्हता. पुढें प्रकरणें बहुत आहेत.' हा मजकूर क. प्रतींत आहे.

९. 'ज्यांनीं मनसुबा दिला ते थोर आहेत' सा. प्रतींत.

१०. 'व हे' हे दोन शब्द भाइसं. मध्यें अधिक आहेत.

११. 'पाडावा' सा. प्रत.

१२. 'जाऊन' भाइसं. प्रत,

करावी. आम्ही साहेबांचे[१३] दबाबावरच काम उरकून घेतों." म्हणोन उत्तरें आलीं. तीं **भाऊसाहेब** यांणीं वांचून पाहिलीं. आणि आपले लहानथोर मुत्सद्दी बोलावून त्यांस विचार पुसला. ते समयीं **बळवंतराव गणेश** यांणीं जाबसाल केला कीं, " **भाऊसाहेब, सिंदे-होळकर** या रानांत बहुत दिवस रमून[१४] राजे[१५] जाहाले. त्यांस आम्ही आलियाचें सुख काय आहे? आम्हास दमावणी[१६] मात्र देतात. **भाऊसाहेब**, आपली सलाबत कांहीं सामान्य नाहीं. आपला पुण्यप्रताप या प्रकारचा आहे कीं, गिलजा स्वामींनीं कानीं मात्र ऐकिलें. परंतु द्रष्टीस पडणार नाहीं. ही खातरजमा असो द्यावी. [१७]ते निवारण होऊन जातील असा निश्चय करून कूच करून दिल्लीस पोंचावें."

१००. इकडे दुराणी गनिमांचे[१८] पाठीस लागून हैराण जाहाले. गनीम[१९] यांणीं कावे देत देत अंतरवेद प्रांतीं गेले. तों दुराणीहि अंतरवेद प्रांतीं गेला. मागती **यमुना** उतरोन आलीकडे आले. दुराणी नदीपारच राहिला. तों ज्येष्ठ मास संपूर्ण होत आला. **यमुनेस** पाणी आलें. मग सहजच दुराणी **काळजळेश्वरा**-जवळ[२०] राहिले. इकडे **मल्हारराव** व **जनकोजी सिंदे केरोलीचे**[२१] सुमारें **चमेलीपार** राहिले.

१०१. इकडे **भाऊसाहेब** खंडण्या करीत करीत **नरवर** वोलांडून[२२] **ग्वालेरीचे** सुमारें आले. तेथून **ढऊळपूर**[२३] **चमेली घाट** धाकट्या[२४] तीन मजली राहिला. निदान **कुवारी** नदीवर मुकाम केला. तेथून मागती **सिंदे होळकर** यांस पत्रें लिहिली कीं

---

१३. 'साहेबाचें काम दमानेंच उरकून घेतों' भाइसं. प्रत. 'दमावरी' सा. व 'दबावावर' सगजो. प्रत.

१४. 'क्रमून' सा. प्रत.

१५. 'शिंदे-होळकर यांणी ह्या रानांत बहुत दिवस केळें खादलीं. आपणच ह्या रानांतील राजे जाहाले. तुं. व सगजो. प्रत.

१६. 'दबावणी' सा. व सगजो प्रत. 'दटावणी' भा.

१७. 'ते निवारण होऊन जातील' हें वाक्य भाइसं. मधील.

१८. हा शब्द भाइसं. व १८७९–८६ सा. प्रतींत नाहीं.

१९. ह्या ठिकाणीं तुं. व सगजो. प्रतींत पुढील वाक्य अधिक आहे. 'गलीम यांणीं धुरोला दृष्टीस पडों देईनासें जाहालें.'

२०. 'कोलेजलेस्वाराजवळ' भाइसं. 'कालजेश्वरा०' तुं. 'कौळजलेश्वरां०' क. प्रत. वरील पाठ सगजो व सा. २२ प्रतींतील.

२१. 'कारलीचे' भाइसं. केरौली सा. प्रत.

२२. 'नरवराकडून' भाइसं. व वरील पाठ सा. २२ व सगजो प्रतींतील.

२३. 'ढवळपूरचे मळीचा घाट' शें. प्रत. वाचनाची चूक इतकेंच. ढोलपूर १८७९,–८६; घोटें १८८६ सा. प्रतींत.

२४. 'धाकट्या' हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं.

"**ढऊळपूरचे** घाटें उतरावें किंवा **अचरी**कडून[२५] यावें याचा निश्चय करून पाठविणें." म्हणोन पत्रें **सिंदे-होळकर**[२६] यांस येतांच पत्रें वाचून पाहिलीं. पत्रांतील भावगर्भ[२७] ध्यानांत आणिला. तों **भाऊसाहेब** क्षेपनिक्षेप आले. तेव्हां **मल्हारराव** याची तळव्याची आग्न मस्तकास जाऊन भाऊसाहेब यांस पत्र लिहिलें कीं, "तुम्हास माळवे प्रांतीं राहावें[२९] म्हणून लिहिलें असतां येथपर्यंत यावयाचें कारण काय? तस्मात् सर्व भवताले नूतन नव्या उमरीचे[३०] मिळाले ते तुमच्या हिताचे आणि आम्ही वृद्ध, आमची साठीमुळें बुद्धी नाठी झाली. आम्ही आजपावेतों जितकें केलें तितकें साहेबांचें अनहितच केलें. आतां त्या सर्वांनीं मिळोन स्वहित करावें."[३०अ] याप्रमाणें **मल्हारराव** यांणीं पत्र लिहून **भाऊसाहेब** यांस पाठविलीं.[३०ब] त्यांत लिहिलें "अतःपर[३१] तरी **चमेलीचे** पार **ग्वालेरी**नजीक छावणी करावी."[३२] त्याजवरून[३३] **भाऊसाहेब** आपले जागच्या चार कारभारी यांस बोलावून त्यांस विचार पुसला कीं "कसें[३४] करावें?' त्याजवरून[३५] **बळवंतराव** यांणी मसलत दिली कीं, "मजल दर मजल **दिलीस** जाऊन पोचावें." असें ऐकोन **विठलराव शिवदेव**[३६] यांणीं जाबसाल केला कीं 'समागमें मुलें, माणसें आहेत. तुमचें निर्भय राज्य, म्हणोन तमाम कुटुंबें समागमें[३७] घेतलीं. **जनार्दनपंत फडणीस** यांची स्त्री[३८] **काशीस** जाण्याचें

---

२५. 'अटेरी' तुं. व सगजो प्रतींत. 'आशेरी' भाइसं. प्रत. अचेरी सा. २२ प्रत.

२६. 'मल्हारराव यांस हरकारे यांणी दिलीं. त्यांणी' सा. २२ प्रत.

२७. 'गर्भभाव' सा. व सगजो. प्रतींत.

२८. 'तें ऐकून' सा. २२ प्रतींत.

२९. 'छावणीस' सा. २२ मध्यें अधिक शब्द.

३०. 'उमदीचे 'भाइसं. 'उमरीचे' शें. प्रत. 'नूतन वय' सा. २२ 'नूतन नवे मिळाले' सा. प्रत.

३०. अ 'हित' सा. २२ प्रत. 'करावे' ह्यापुढें 'तुमचें हित करितील असें तुम्हांस वाटतें. बरें असो.' हें वाक्य मं. प्रतींत अधिक आहे.

३० ब. 'पाठविली' ह्यापुढें 'पुन; पत्रांत लिहिलें की, जें जालें तें उतमच जालें.' असा मजकूर सा. २२ मध्यें अधिक आहे.

३१. 'अजून तरी' मं. प्रत.

३२. ह्यापुढें 'इकडे येण्याचें करूं नये' हें वाक्य मं. प्रतींत जास्त आहे.

३३. 'म्हणोन पत्रें पाठविलीं' सा. २२ प्रत. 'त्याजवरून' हा शब्द सा. २२ प्रतींत नाहीं. भाइसं. मध्यें आहे.

३४. हे तीन शब्द भाइसं. मधील आहेत. सा. प्रतींत नाहींत.

३५. 'मागती' हा शब्द 'त्याजवरून'च्या जागीं सा. २२ मध्यें आहे.

३६. हें नांव सां. व तुं. व सगजो प्रतींत नाहीं.

३७. हा शब्द १८७९ व १८८६सा. मध्यें नाहीं.

३८. 'नाना फडणीस यांची मातोश्री तुं. प्रत.

उद्देशें आली. तसेंच **धायगुडे**[३९] यांचे कुटुंब व आणखी कित्येक लहानथोर[४०] कुटुंबें समागमें; आणि शत्रूची फौज[४१] भारी. यास्तव **मल्हारराव** यांणीं लिहिलें तें मान्य करून या स्थलीं छावणी करून राहावें.'[४२] असें ऐकोन सर्वत्र मिळोन त्यांनीं हास्यवदन[४३] करून विनोदें जाबसाल उडवून दिला कीं, **सिंदे-होळकर व अंताजी माणकेश्वर** व **विठल शिवदेव** व **गोविंदपंत बुंदेले** व **नारो शंकर** असे सर्वत्र या रानांत सुख पावले. त्यांस आम्ही आल्याचें सुख नाहीं." म्हणोन हेटाळणी करून कूच केलें.

१०२. ढवळपूरचे[४४] घाटें **चमेलीपार** जाले. **ढवळपुरानजीक मुचकुंद** म्हणोन तीर्थ आहे. जे समयीं देवसाह्यार्थ **कालयवन** दैत्यास बहुत काल रात्रंदिवस युद्ध करून [मुचकुंदानें] दैत्य पराभविले, त्यांत **कालयवन** दैत्य मात्र चुकोन[४५] राहिला होता. त्यासि बहुत रात्रीं[४६] झोप नाहीं. दिवसां उसंत[४७] नाहीं. याप्रकारें **मुचकुंद** युद्धें करून श्रमला होता. यास्तव **ब्रह्मा, विष्णु, महेश्वर** यांणीं **मुचकुंदास** वर देते जाहाले कीं, " तूं आमचे कारणीं बहुत श्रमलास. यास्तव पाहिजे तो पदार्थ उचित[४८] मागावा." असें म्हणतांच **मुचकुंद** देवापाशीं वर मागता जाला कीं, " मी युद्ध करून फार श्रमलों आहे. यास्तव बहुत काल इच्छा पुरे तों पावेतों, मजला झोंप द्यावी. " असें ऐकोन **ब्रह्मदेवानें** हस्त मस्तकीं ठेविला कीं, " सख्या,[४९] तुजला निद्रा दिल्ही. तूं निजला असतां कोणी उठवील त्याणें[५०] जळोन भस्म व्हावें. " म्हणोन वर देऊन त्यास **ढवळपुरापासून** कोसावर लहानसा पहाड आहे तेथें गुहा आहे त्यांत निद्रा करविली होती. असे बहुत दिवस जाहाले होते. तों कोणें कालेंकरून **विष्णूचें** व **कालयवन** याचें युध्य जाहालें. ते समयीं ब्रह्मराक्षस **कालयवनाचें** बळ भारी. ते समयीं बळ भारी म्हणोन **विष्णूस** बहुत संकट प्राप्त जाहालें कीं, " **कालयवन** आपणांस आटपत नाहीं. त्यास यत्न काय करावा "

---

३९. ' पायगुडे ' सा. व सगजो प्रत. इतर प्रतींत धायगुडे आहे.

४०. ' सरदार ' हा शब्द सा. २२ मध्यें जास्त आहे.

४१. ' प्रबलता ' सा. २२ व सगजो. वरील पाठ पुणें व भाइसं. प्रतींत आहे.

४२. ' राहावें ' ह्यापुढें ' हें चांगलें ' असें सा. २२ मध्यें आहे.

४३. ' हास्य करून ' सा. २२ प्रत व ' हास्यवदन ' भाइसं. प्रतींत.

४४. हें वाक्य सा. २२ मध्यें अधिक आहे.

४५. ' झंजला होता ' भाइसं. प्रत. ' चुकावुन ' सा. २२ प्रत. ' चुकोन ' हा पाठ सा. (मागील) व सगजो प्रतींतील आहे.

४६. ' दिवसरात्रीं ' भाइसं., ' बहुत रात्रीं ' सा. २२ प्रत.

४७. फुरसत ' भा. प्रत.

४८. ' इच्छित ' सा. २२.

४९. ' संख्यारहित ' (वर्षे) सा. २२ ' शंकारहित ' तुं. व भा. सगजो प्रतींत.

५०. ' तूं निजला असतां तुला कोणी उठवील त्याजवर तुझी दृष्टी पडतांच ' हें शब्द सा. २२ मध्यें अधिक आहेत. ' त्याजवर तुझी दृष्टी पडतांच ' सगजो. प्रत.

म्हणोन ध्यानांत आणिलें. **विष्णु** नाटकी[५१] मूर्ति. कौशल्य[५२] केलें. **कालयवन** याच्या श्रमानें[५३] भागून **मुचकुंद** यानें निद्रा केली होती तेथें पळत येऊन आपला पितांबर होता तो **मुचकुंदावर** पांघरूण घालून आपण[५४] गुप्त जाहाले. तों **कालयवन** मागें धावत गुहेंत आला. तों निद्रागत पितांबर पांघरून **विष्णूच** निजला, असें[५५] भासलें. मग **कालयवन** दैत्य[५६] यानें रागानें लाथ हाणोन त्यास जागा केला. आणि बोलिला कीं, "चोरा, पळून येऊन दडला आहेस. आतां तुजला वाचों कसा देतों" म्हणोन लत्ताप्रहारें ताडण केलें. **मुचकुंद** यानें डोळे उघडोन पाहिलें तों[५७] दैत्य भस्म जाहाला. **मुचकुंद** आपले जाण्यास संकोच[५९] होऊन बसला. तों **विष्णूचा** धांवा केला कीं, "मजला हत्या[६०] घडली. यास यत्न काय?" ते समयीं प्रत्यक्ष **विष्णु** प्रकट होऊन त्याचें समाधान केलें कीं, "आमचें महत्कार्य केलें. आतां तुजला ब्रह्महत्येचा दोष घडला म्हणोन चिंतातुर होऊं नको. तुजला[६१] यत्न सांगतों. येथून अर्धकोस **दक्षणेस** तीर्थ आहे.[६२] त्या तीर्थीं स्नान केल्यास ब्रह्महत्येचें पातक जातें." या प्रकारचें सांगोन त्याजकडून स्नान करवून ब्रह्महत्येपासून मुक्त केला.[६३] त्या तीर्थास **मुचकुंदतीर्थ** असें म्हणों लागलें. त्या तीर्थीं दानें स्नानें **भाऊनीं** करून कूच करून **आगरियाचे** रोखें **गंभीरा** नदीवर मुकाम केला.

१०३. त्या[६४] मुकामीं **मल्हारराव होळकर** व **जनकोजीराव सिंदे** व **नारो शंकर** असे[६५] भेटावयास आले. भेटी जाहाल्या. **जनकोजी सिंदे** यांचे बहुत प्रकारें

---

५१. 'मूर्ति' हा शब्द सा. २२ मध्यें जास्त. 'मुहूर्तीं' सगजो.

५२, 'कसें केलें' भाइसं. प्रत. 'कोसल्य' सगजो.

५३. 'भयें' सा. २२ प्रत.

५४. 'तेथेंच' सा. २२ प्रतींत आहे. व १८७९–८६ सा. प्रतींत नाहीं.

५५. 'असें भासलें' हें वाक्य सा. २२ प्रतीमध्यें आहे. तुं. प्रतींत 'तो निद्रागत' हें वाक्य येथें असून 'विष्णुशोधार्थी लागला' असाहि मजकूर आहे.

५६. 'दुर्वृत्त' सा. २२ प्रत. 'दुरावर्त' सगजो.

५७. 'लाडानें' येथें आला आहेस. भाइसं. 'लपून येऊन दडाला आहेस' सगजो. प्रत. 'पळून' इ. पाठ मं. प्रत. व सा. २२ प्रत आणि भा. 'लपून पडला आहेस' सा. १८७९ व ८६ प्रतींत.

५८. 'ब्रह्मवरदें करोन' हे शब्द व सा. २२ मध्यें अधिक आहेत. 'जळोन' हाहि शब्द सा. २२ मध्यें जास्त आहे.

५९. 'संचित' सा. २२; 'अजुर्दा' सगजो. व तुं.; 'संकोचित' क. व शें. प्रतींत.

६०. 'ब्रह्महत्या' सा. २२. 'ब्रह्म' हा शब्द १८७९–१८८६ सा. प्रतींत नाहीं.

६१. 'येक' यत्न सा. २२ प्रत.

६२. 'होते' पु, वतुं. प्रत.

६३. 'त्या दिवसापासून' सा. २२ मध्यें आहे.

६४. हा शब्द सा. २२ मध्यें जास्त.

६५ 'खावंदास' हा अधिक शब्द सा. २२ मध्यें.

समाधान करून त्यांस हत्ती घोडे व वस्त्रें दिलीं. ते समयीं **मल्हारराव**[६६] यांणीं **भाऊंची** मर्यादा कांहीं ठेविली[६७] नाहीं. भर[६८] सभेंत गर्जो[६९] लागले कीं, " **भाऊसाहेब**, तुम्हास[६९] **चमेली** नदीपार राहाणें म्हणोन लिहिलें असतां, पुढें[७०] यावयास कारण काय ? चार भोंवते लोक मिळाले ते केवळ बेवकूब. मोहरा इरेस आणून घातला. आतां[७१] यासी काढावयास यत्न नाहीं.[७१] " म्हणोन गालिप्रदानें बहुत केलीं. परंतु कोणी मुखांतून शब्द काढीनात.[७२] या प्रकारें **होळकर** बोलिले. परंतु गोष्ट गुदरली.[७३] उपाय नाहीं.[७४] मग तेथून **आगरियावर** येऊन मुकाम केला. दुराणी, **सुज्याउद्दवला**,[७५] रोहिले वगैरे यांच्या फौजेचा भरणा[७५] भारी, असें ऐकोन, मुलेंमाणसें समागमें आहेत, यांसी कांहीं आश्रय करावा[७६] म्हणोन, **आगरियावा** किलेदार होता त्यासी स्नेह करोन दाहा हजार रुपये दारूगोळीस दिल्हे, आणि त्याजपासून[७७] इमानप्रमाण घेतलें कीं, " निदान संकट[७८] प्राप्त[७९] जालें तरी बायका[८०] आहेत, त्यांस या किल्यांत स्थळ द्यावें. " याप्रमाणें बंदोबस्त करून **गोघाटावर** मुकाम केला. तों गिलज्या पलीकडे **यमुनेचें**[८१] तीरीं नदीपार **कोळजळेश्वराजवळ** मुकाम होता. त्याणें कूच करून **यमुनापार** यांच्या बरोबरीस राहिला. परंतु **यमुनेस** पाणी भारी. यास्तव त्याचा यत्न यांजवर चालेना. यांचें[८२] कूच जालें

---

६६. ' मल्हारराव यांणीं ' हे शब्द भाइसं. मध्यें नाहींत. आणि शें. सा. २२ भा. प्रतींत आहेत.

६७. 'धरिली' सगजो व. सा.२२ मध्यें आहेत.

६८. 'भरले' सा. २२.'भर कचेरींत' क. प्रत.

६९. 'गर्जोन बोलों' शें. 'तुम्हास' व 'चमेली' हे शब्द भाइसं. मध्यें नाहींत. 'चमेली' शब्द १८७९ व १८८६ सा. मध्यें नाहींत.

७०. 'पुढें' हा शब्द भाइसं. व सा.२२ मध्यें नाहीं शें. मध्यें आहे.

७१. 'आतां.' ह्या वाक्याबद्दल 'परंतु आपणांस काढण्याचा यत्न कोणाचे हातून होणार नाहीं' असें वाक्य सां. प्रतींत आहे.

७२. 'मुखांतून' सा. २२ मध्यें नाहीं. ह्या वाक्यापुढें 'खिन्न होऊन सर्व तटस्थ बसले' हें वाक्य क. प्रतींत आहे.

७३. 'तों गुदरली' असें सा. २२ मध्यें. तुं. प्रतींत 'गुदस्त' शब्द आहे.

७४. 'राहिला नाहीं' सा. २२ व शें. प्रतींत आहे.

७५. हे सहा शब्द भाइसं. मध्यें व १८७९ व १८८६ सा. प्रतींत नाहींत. सा. २२ मध्यें आहेत.

७६. येथेंच 'थांग्यास ठेवावी' हे शब्द १८७९–८६ सा. मध्यें नसून सा. २२ मध्यें आहेत.

७७. हा शब्द भाइसं. व १८७९ व ८६ मध्येहि नाहीं. सा. २२ मध्ये आहे.

७८. निदानसमय सा. २२ प्रत.

७९. 'प्रकट जाले' सा. २२ प्रत.

८०. 'बायकामुलें' सा. २२.

८१. 'गंगेचे' भाइसं. पु. तुं प्रत व १८७९ व ८६ सा. मध्येंहि आहे.

८२. 'या प्रकारचें' याचें सा. २२ प्रतींत.

म्हणजे त्याणेंहि कूच करून बरोबरीस उतरावें.[८३] याप्रमाणें[८४] हे आलीकडून व गिलज्या पलीकडून येतच होते.[८५] **भाऊसाहेब** तेथोन निघोन **यमुनेचे** व **वृंदावनाचे** मध्यें[८६] मुकाम करून राहिले. तेथें तीर्थविधी यथाविधी करून **छायाती** सराईवरून **होडा**[८७] **पलवलावरून दिलीस** पोंचले.

१०४. तों **दिलीचे** किल्यांत **रोहिले** व **गारदी, नजीबखान** याजकडील चार हजार लोक[८८] किल्यांत होते. तें समई शहरचें वस्त्रहरण[८९] करून किल्यास मोर्चे लाविले. आणि **जनकोजीराव**[९०] यास सांगोन **होळकर** व **सिंदे** याचें इमान-प्रमाण देऊन **सुरजमल जाठ** यांस[९१] भेटीस घेऊन आले.[९२] **भाऊसाहेबीं** यास[९३] आडवें जाऊन सन्मान करून घेऊन आले. तों **दिलीचा** किल्ला अपेशी. पांचसात दिवसांत हला करून मोर्चे[९४] लावून हस्तगत करून[९५] त्यांत सामान[९६] व लोक होते त्यांस जीवदान देऊन सोडिले. आणि किल्यांतील **अलमशहा** पादशहा होता तो **गाजुद्दीनखान** यानें मारून [तो] **सिंदे** यांजकडे गेला होता. त्या तागाईत कोणी पादशहा तख्तीं बैसविला नव्हता. मग **भाऊसाहेब** यांणीं **अलीगौर चकते**[९७] याचा

८३. 'राहावें' सगजो व सा.२२ मध्यें.

८४. हें वाक्य (८शब्द) भाइसं. मध्यें आहे. सा. २२ प्रतींत नाहीं.

८५. 'मथुरा वृन्दावनांत' सां प्रत.

८६. 'होडल' सा. २२ प्रत.

८७. 'सामान' भाइसं; 'सामायेन' तुं.; लोक' क. व सां.

८८. 'वस्त्राहरण' सा. २२ व भाइसं. प्रत.

८९ 'जनकोजी सिंदे व मल्हारराव होळकर यांणीं' सा. २२ व सगजो. असा बदल आहे.

९०. ' पांचसात हजार फौजेनिसीं सा. २२ प्रत.

९१. या वाक्याबद्दल 'आणि सिंदे यांस सांगितलें होळकर यांचें व सुरजमल जाट यांचें सौरहस्य नाहीं त्यास व सुरजमल जाट यांचे सख्यत्व करून देऊन होळकर याजपासून त्याजविशीं इमान घेऊन सुरजमल जाट यास भेटीस आणविला.' हें वाक्य सां. व क. प्रतींत आहे.

९२. यांस–च्यापुढें 'पांच-सात हजार फौजेनिशी' हे शब्द सा. प्रतींत आहेत. त्यांतील फरक हा कीं 'सुरजमल जाट यास त्याच्या ५,७ हजार फौजेसह सिंदे होळकर यांनीं भाऊसाहेबांच्या भेटीस आणिले' आणि दुसऱ्या यास–च्या पुढील मजकुरानें फरक हा कीं, भाऊसाहेब ५।७ हजार फौजेसह सुरजमल जाट यास सामोरे गेले.' वस्तुतः मुळांत वर लिहिलें तें व तसें असावें.

९३. 'माळा लावून' सा. २२, 'हलका करून मोकळा होऊन पु. हला–चें हलका व माळा–चें मोकळा असें झाले कीं काय न कळे ?

९४. 'केला' सा. प्रत.

९५. त्यांत–च्या पुढें ' रोहिले वगैरे माणसें होतीं. ' असें सा. प्रतींत आहे. 'सामान होतें व लोक होते' पु. प्र. व सा. १८७९ व ८६ प्रतींत आहे.

९६. 'चेमकत' पु. प्रत.

पुत्र चौदा वर्षांचा शहाजादा[९७] होता त्यास तख्तीं बसवून त्याचे नांवें शिक्के[९८] व मोहरा व रुपये केले. **सुरजमल जाट** याजपासीं **गाजुदीखान** होता.[९९] त्यास वजारत[१००] द्यावी असा **सुरजमल जाट**[१०१] याचा आग्रह भारी पडला. तसाच **सिंदे** व **होळकर** यांचाहि पडला. परंतु **बळवंतराव** कोणाचे चालूं देईनात. **नारोशंकर** यांस बहादरपणाचा[१०२] किताब देऊन वजिरी त्यास सांगून किल्यांतील व शहरांतील कुल[१०३] पारिपत्य त्यांचें स्वाधीन केलें. त्याजपासीं पांच हजार फौज ठेविली. ते समईं **सिंदे** व **होळकर** यांचे चित्तांत संशय आला कीं, "**भाऊसाहेबीं** आमचे मानिलें नाहीं. तेव्हां **सुरजमल जाट** यानें काय चित्तांत आणिलें असेल तें असो.[१०४] या प्रकारें या **हिंदुस्थानांत** आमची[१०५] अप्रतिष्ठा जाहाली. यांवर[१०६] पुढें आमचा परिणाम काय ! म्हणोन **मल्हारराव** यांणीं **जनकोजी सिंदे** यांस विचारिलें. मग **जनकोजी सिंदे** यांणीं जाबसाल केला कीं, "आपलें चालेनासें दिसोन[१०७] आलें, तेव्हां हरएक मसलत आपण[१०८] सांगों नये. आपले जागा प्रतिष्ठेनें राहावें." म्हणोन बोलिले. तैसेंच **सुरजमल जाट** यांणीं[१०९] **रुपराम चौधरी** यांसीं बोलिला

---

९७. शहाजादा शहाअलम' तुं. प्रतींत नाहींत; पण भाइसं. मध्यें आहेत. 'शहा अलम म्हणून' हे शब्द सा. १८७९ व ८६ प्रतींत आहेत. 'शहाजादा' सा. २२.

९८. 'शिकेकटार मोर्तब व रुपये' भा.

९९. क.प्रतींत–शिंदे यांजवर, दताजी शिंदे पडल्यामुळें, वख्त गुदरला. तेव्हां जाट याचा आश्रय करून जाटाजवळ होता.' असें वाक्य आहे.

१००. हा शब्द सा. २२ व सगजो. मध्यें आणि 'वजीरी' हा शब्द भाइसं. प्रतींत आहे.

१०१. 'जाट' ह्यापुढें सगजो. मध्यें 'व शिंदे' हे शब्द अधिक असून 'याचा' ह्या शब्दापुढें 'बहुत करून' हा शब्द आहे. सा. २२ मध्यें 'म्हणोन बहुतकरून आग्रह सुरजमल जाट याचा व शिंदे होळकर ह्यांचा होता. त्यांतील 'होळकर' हा शब्द तुं. प्रतींत नाहीं.

१०२. 'राजेबहादर' सा. शें. भा. प्रतींत आहे. सा. २२ मध्यें 'रा. ब अैशी किताबत' व 'किताब' असा शब्द सा. १८७९ व ८६ मध्यें आहे.

१०३. 'कुल मुकत्यारी' क. प्र.

१०४. 'काय' हा शब्द भाइसं. प्र. मध्यें नाहीं. शें, सगजो, भा. व सा.२२ मध्यें आहे. तसेंच 'तें असो' हे शब्द सा. २२ मध्यें नाहींत.

१०५. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं; सगजो व सा. २२ मध्यें आहे.

१०६. 'यांत' सा. २२प्रतींत आहे; पण पुढें हा शब्द नाहीं. 'आमचा' ऐवजीं 'आपला' सा. प्रत.

१०७. 'दिसों लागलें' भा. प्र.

१०८. हा शब्द सा. २२ मध्यें आहे. भाइसं. मध्यें नाहीं.

१०९. 'आपला वकील' हे शब्द भाइसं. मध्यें नाहींत; सा. २२ मध्यें आहेत. 'रूपराम कटारी' सा. व रूपराम चौधरी' भाइसं.

की, " गाजुद्दीखान याचे वजीरीविसीं आम्ही रुबरू[११०] भाऊसाहेब[१११] यांस विनंती केली. तसाच सिंदे व होळकर यांणीं आर्ज केला. मग त्यासहि[११२] मानलें नाहीं. तेव्हां या स्थळीं राहिलों;[११३] मग, याणें स्वरूपनाश, अपाय होईल. यास्तव येथून हरयत्न करून निघतां उत्तम आहे." म्हणोन मनसबा केला. परंतु सिंदे व होळकर यांचे नजीक राहाणें.[११४] जावयाचा उपाय नाहीं. म्हणोन[११५] चिंतातुरच होते.

१०५. तों 'विनाशकालीं विपरीत बुद्धि' तैसा विचार घडला. गोविंदपन्त बुंदेले यासीं तगादा[११६] करून पंनास लक्ष रुपये भाऊसाहेबांनीं[११७] मागितले. त्यांणीं समय जाणून आणावयास जातो म्हणून पाराजीपन्त वाघ व आपण बुंदेलखंडांत गेले. यांहीं खर्चाची तंगताई, म्हणोन पादशहाचे तख्तावर[११८] रुप्याचें छत होतें, त्याजवर सोनेरी वर्खी मुलामी काम होतें, त्याजवर भाऊंची नजर होती.[११९] मनांत[१२०] विचार केला कीं, हें छत आहे हें काढून फौजेस रोजमुरा द्यावा म्हणौन मसलत ठीक[१२१] केली. छताचे जाग्यास उगाच[१२२] फळ्या द्याव्या; म्हणोन

---

११०. 'रुबेरुब' सा. २२ 'उरुबरु' तुं. प्रत.

१११. 'भाऊसाहेब यास' यापुढें 'आम्ही' हा शब्द सा २२ मध्यें अधिक आहे.

११२. 'मग त्यांसहि' ह्याऐवजीं 'परंतु त्यांणीं' हे शब्द सा. २२ मध्यें आहेत.

११३. 'राहिल्याचें स्वरूप नाहीं.' सा. २२ · राहणें नीट दिसत नाहीं, हें मं. प्रत; 'राहिल्यानें' शें. प्रत.

११४. 'राहणें' या पुढें क. प्रतींत 'तेव्हां निघोन जाण्याचा योग कसा घडेल ? ते उभयतां एकाच खावंदाचे चाकर. आपला स्नेह उभयतांचा खरा. परंतु न कळे. त्यांस विचारिल्याशिवाय आपण जाण्याचा योग केला आणि त्यांस समजलें असतां आपले पदरीं बेमानी येईल. आणि तें फौजबंद. एखादे त्याणीं पिच्छा आपला केल्यास जड जाईल. परिणाम लागणार नाहीं.' असें आहे.

११५. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं, सा. २२ व सगजो मध्यें आहे. आणि मं. प्रतींत 'या प्रकारें' हा शब्द आहे.

११६. तसदी सा. २२; व क. व भाइसं. प्रतींत 'तगादा.'

११७. हा शब्द इ. १८८६ सा. व भाइसं. मध्यें नाहीं व सा. २२ मध्यें आहे.

११८. 'वरचे कचेरीस तळहाता इतका [पत्रा] मोठा होता' सा. 'झाडून छत्र रुप्याचे होतें. तळहाता इतका मोठा [थर] होता' सगजो.

११९. गेली सगजो व सा. २२.

१२०. चित्तांत सा. २२; त्यांत विचार भा. प्र.

१२१. ठरविली मं. प्रत. सा. २२.

१२२. क्रमानें लाकडी सा. २२, फुल्या, मं., फुलें सा.; घालाव्या भा. हे शब्द असून तिन्ही शब्दांबद्दल उगेंच पुलें द्यावीं, सगजो प्रतींत आहे. 'छताचे जागीं ० द्याव्या' हें वाक्य १८७९ व १८८६ सा. मध्यें नाहीं.

सिंदे, होळकर यास व सुरजमल जाटास विचारणा केली. ते समयीं सुरजमल जाट याणें अर्ज केला कीं, "भाऊसाहेब, पादशहा तख्ताची जागा मर्यादेची आहे. पूर्वी नादरशाई जाहाली होती ते वेळेस तख्तावर कवच[१२३] सोनेंचें होतें तें नेलें. परंतु छतास हात लावला नाहीं. त्याजवर खंदारचा पादशहा आबदल आली दोन वेळा चालोन[१२४] आला. त्याणें तोफा देखील[१२५] नेल्या. परंतु याची मर्यादा राखिली. प्रस्तुत[१२६] पादशाहो उमराव तुम्हापासीं आहे. आम्हां देखत ह्या गोष्टी होऊं नयेत. ह्या गोष्टीनें आम्हास येश येणार नाहीं आणि स्वामिद्रोहो पदरीं पडेल.[१२६] यास्तव आजीचे[१२७] प्रसंगीं एवढी जोड मजला द्यावी. तुम्हांस खर्चास टंचाई जाहाली[१२८] तरी मजला आज्ञा करावी मी पांच लक्ष रुपये साहेबांस देतों." असें ऐकतांच[१२९] भाव जाहाला कीं, पांच लक्ष रुपये देतो तेव्हां कांहीं अधिक[१३०] असेल. म्हणौन[१३१] त्याचा अव्हेर करून[१३२] कचेरीचे संपूर्ण छत काढिलें.[१३३] झाडून रुपये वजन केले. तों तीन लक्ष रुपये भरले. ते समयीं भूमिकंप जाहाला. जन[१३४] वाईट शब्द बोलूं लागले, आणि उल्कापात जाहाला म्हणतात. ते समयीं बहुतांस वाईट वाटलें. सुरजमल जाट याणें हुजर जाऊन विनंती[१३५] केली कीं, "भाऊसाहेब, आम्ही जवळ आसतां तुम्ही[१३६] तख्त विध्वंस केलें. तेणें[१३७] आम्हांस दूषण. ज्या गोष्टीचा तो आर्ज आम्ही साहेबांस करावा ते समयीं आपण अव्हेर करावा[१३८]

---

१२३. कळस तुं. व १८७९ व ८६ सा. प्रतींत आहे.

१२४. हे दोन शब्द भाइसं. मध्यें नाहींत.

१२५. काढून सगजो. गाळून पु. प्रत.

१२६. हालीं आपले जवळ बादशाही उमराव आहेत. त्यापेक्षां आम्हां देखतां हा विचार घडूं नये. याणें आपलें यश येणार नाहीं आणि आमचे पदरीं स्वामिद्रोह येईल. क. व सां. प्रत.

१२७. अर्ज करतो कीं सगजो. आर्जाचे भाइसं. आजचे शें. व सा.

१२८. टकशाही जाहाली. सगजो. तंगचाई सा. जाहाली असली सा. २२ व असली शब्द १८७९ व १८८६ सा. मध्यें नाहीं.

१२९. अधीकच यासी अभाव सगजो.

१३०. 'यांत द्रव्य' हे मं. प्रतींत दोन शब्द आहेत.

१३१. भाऊंनीं शें.

१३२. आधीं सगजो.

१३३. कचेरीचा छत काढिला असा पुल्लिगी प्रयोग तुं. प्रतीचा सर्वत्र आहे.

१३४. जनवदंता उल्कापातहि जाले म्हणतात. सा. २२. म्हणतात हा शब्द सा. व मं. प्रतींत नाहीं.

१३५. अर्ज सा. २२.

१३६. आपण मं. प्रत.

१३७. तेणें करून शें. येणें करून सा. २२ तेणें भाइसं.

१३८. तों सा. २२ मध्यें नाहीं व करतात हा शब्द करावा–बद्दल आहे सा. २२ व भा. प्रतींत आहे.

आमचे चित्तांत हिंदुधर्म[१३९] आहे. राज्य स्वस्थ राहावें. तुमके आमचे इमान राहावें.[१४०] यमुनेचें पाणी हातांत घातलें[१४१] त्याचें सार्थक हेंच कीं काय ?"

१०६. ते समयीं ती गोष्ट भाऊसाहेबांनीं[१४२] टाकून सिंदे-होळकर समस्त[१४३] बोलाऊन मनसुबा केला कीं, "यमुनेस पाणी भारी. दुराणी नदीपार[१४४] राहिला. सध्यां कुंजपुऱ्यांत[१४५] राहिण कुतुबशहा व आमदखान[१४६] कतलबाज असे पंधरा हजार फौजेनिसीं बलाऊन[१४७] राहिले आहेत. प्रस्तुत त्यांचें पारिपत्य[१४८] काय करावयाची तजवीज काय ?" असें म्हणतांच मागती सुरजमल जाट याणें प्रत्योत्तर केलें कीं, "आमचें ऐकाल तरि छताचें[१४९] रुपें काढिलें[१५०] तरी तें मागती छत स्थापित[१५१] करावें. तेणें[१५२] करून आपला जय होईल. दुसरें, गाजुदीखान याची वजिरी त्याची त्यास द्यावी. ये विसीं सिंदे व होळकर यांचें व आमचें इमानप्रमाण गुंतलें आहे. पुढें आणखी छोटा-मोठा आर्ज ऐकत जावा. म्हणजे मी सर्वस्वीं तुमचे पदरीं आहें. लागेल तो दाणा व साहित्य[१५३] पुरवीन. दिली [तू] न[१५४] जाऊं नये. येथूनच सर्व माार[१५५] मसलती कराव्या. कदाचित्[१५६] कुंजपूरचें पारिपत्य करणें तरी करूं.[१५६] आपण[१५७] तेथें शहास गुंतूं नये." या प्रो मसलत दिली. पुढील[१५८] होणार बल-

---

१३९. ह्या ऐवजीं 'कीं हिंदुधर्म राज्याधिकारी आहेत तें स्वस्थ असावे हें आमचे चित्तीं.' क. प्रत

१४०. जाहालें शें. भा. मं. सगजो. प्रतींत.

१४१. घेतले शें. प्रत.

१४२. 'जाट यास उत्तर कांहींच केलें नाहीं. तसेंच ठेविलें.' क. प्रत.

१४३. समग्र सा. १९२२.

१४४. यमुनेपार सा. १९२२.

१४५. हा शब्द सगजो. व सा. १९२२. कुंजपुर व जुन्या पुऱ्यांत भाइसं.

१४६. सैयद महमद क. प्रत. सलाबतखान शें. प्रत. महमदखान. सा. १९२२, अहमदखान सा. १८७९ व ८६

१४७. बलकावून सगजो. मं. प्रत.

१४८. पारिपत्य करावें. त्याची तजवीज काय ? सा. १९२२.

१४९. छत यथास्थित करावें. सा. १९२२ व टीपेंतील पाठभेद "छताचें छतास लावावें."

१५०. काढिलें आहे. सा. व शें.

१५१. यथास्थापित सगजो.

१५२. येणें करून सा. १९२२.

१५३. तोफासुद्धां भा.

१५४. दिली सोडून सा. व शें.

१५५. माार = मजकूर. मनसबा सा, १९२२. मनसबा व मसलती शें.; सर्व कार्य मसलती क. प्रत.

१५६. कदाचित तुम्हांस कुंजपुरियाचें पारिपत्य करणें तरि लक्ष प्रकारे करावें' सा. १९२२ 'तुम्हांस' च्या जागीं 'आम्हांस' पुणें प्रत.

१५७. खांसा स्वारी खुद्द सां. व क. प्रतींत. 'आपण' च्या 'जागीं 'परंतु' हा शब्द असून 'शहास' हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

१५८. या शब्दापूर्वी 'परंतु' हा शब्द शें. प्रतींत आहे.

वोतर.[१५९] **भाऊसाहेब** यांणीं उतर[१६०] केलें कीं, " आम्ही कांहीं दक्षण सोडून[१६१] तुमचे बलावर आलों नाहीं. आमचे चितास येईल तें[१६२] करूं. तुम्ही राहाल[१६३] तरी राहावें. नाहीं तर आपले ठिकाणास जावें. गिलज्याचें पारिपत्य केल्यावर तुम्ही आम्ही पाहून[१६४] घेऊं. " आसा निष्ठुर जाबसाल होताच **सिंदे, होळकर** यांस वाईट वाटलें.[१६५] आणि आपले जागा स्तब्ध राहिले. उपरांतिक **सुरजमल** आपलें जागा अजुरदा होऊन आपल्या डेऱ्यास गेला. चितांत योजना[१६६] करिता झाला कीं, " मी आलों हेंच मूर्खपण केलें. आता[१६७] जाण्याची तजवीज कोणत्या[१६८] अर्थें होईल ?" म्हणोन महासंकटीं पडला.

१०७. इकडे **भाऊसाहेब** यांणीं **कुंजपुरावर** जाण्याचा निश्चय[१६९] केला. **मल्हारराव** व **जनकोजी सिंदे** डेऱ्यास आले. ते येकत्र येकांतीं बसून[१७०] मनसबा केला कीं, **जाटास** आम्हीं इमान देऊन आणिलें. **भाऊंची** मर्जी तों अति[१७१] कठीण. **बळवंतराव** व **भाऊसाहेब** यांणीं पुरता[१७२] मनसबा केला कीं, **सुरजमल जाट** यांस[१७३] कैद करून त्याचा गोट लुटून टाकावा. हा मार[१७४] खचित जाहला. आतां हरतऱ्हें यत्न करून **सुरजमल जाट** यासी काढून द्यावा.[१७५] मग या निमित्यें[१७६] आम्हासच काय करितील तें करोत. असें बोलून[१७७] **रूपराम कटारी सुरजमल जाट**

---

१५९. या शब्दापुढें 'तदनुसार' हा शब्द शें. प्रतींत आहे. 'बलवोतर' या जागीं 'बलोत्तर' सा. १९२२.

१६०. जाबसाल सा. १९२२.

१६१. दक्षिणेकडून भाइसं.

१६२. तसें. सा. १९२२.

१६३. राहावेल. सा. १९२२. 'राहवेल तोंवर तुं. प्र.

१६४. समजून घेऊं सा. २२०; पाहून घेऊं भाइसं.; पु. भा. व क प्रती.

१६५. भासलें. सगजो.

१६६. विवंचना सा. १९२२.

१६७. येथून जाण्याची सा. १९२२. पण सा. १८७९ व १८८६ त नाहीं.

१६८ 'कोणत्या रीतीनें होईल सा. १९२२. निभावणी कोण अर्थीं होईल' तुं. प्रत.

१६९. कृतनिश्चय सा. १९२२.

१७०. हा शब्द सा. १९२२ त नाहीं भाइसं. त आहे.

१७१. केवळ. सा. १९२२ व शें.

१७२. पूर्ण सा. १९२२.

१७३. या शब्दापुढें " धरून' हा शब्द सा. १९२२ त अधिक आहे.

१७४. या शब्दापुढें "यांचे मनांतील" हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत; सा. १८७९ व १८८६ त नाहींत.

१७५. यापुढें 'म्हणजे आपलेकडे बेमानाचा दोष येणार नाहीं' हें वाक्य सा. १९२२ त अधिक आहे. १८७९ व १८८६ त नाहीं.

१७६. यापुढें 'खावंद' हा शब्द सा. १९२२ त अधिक आहे.

१७७. 'असा विचार ठरवून' सा. १९२२.

याजकडील वकील, यांस बोलावून आणोन सांगितलें कीं,[१७८] "तुम्ही आज रात्रौ हर तरा[१७९] करून कूच[१८०] करून निघोन जावें. **भाऊसाहेब** यांचा गोट लांब[१८१] आहे. त्यांस कळों न देतां निघोन जावें. इतक्यावर तुमचें आमचें इमान उगवलें. इतःपर[१८२] आम्हावर शब्द नाहीं." म्हणोन कानांवर हात ठेविले.

१०८. याप्रमाणें बोलणें[१८३] ऐकून **रूपराम कटारी** आपले गोटास गेला. सविस्तर अर्थ **सुरजमल जाट** यास सांगितला. त्यानें[१८४] उत्तर केलें कीं, "दोहींकडून अवघड आहे. आजचे प्रसंगीं दैवयोग करून निभाऊन गेलों तरी सर्वस्वें **भाऊसाहेब** यांचे द्रोही जाहलों. गिलज्यांचें पारिपत्य दैवयोगें जाहलें तरी आम्हांस पुरताच क्षय[१८५] आला. आधींच **भाऊसाहेब** बहुतच[१८६] आग्रही; मग आम्हांस आश्रयहि कोणाचा नाहीं. या गोष्टींचें भय धरून राहावें तरी सध्यांच बंदी पडावें. या दोही संकटांचा अर्थ काय करावा ?" **रूपराम कटारी**[१८७]अ यानें उत्तर केलें कीं, "येक आणी चूक[१८८] तो बारा बरसकी हयात" असा पूर्वीपार बोल[१८९] प्रसिद्ध आहे. प्रस्तुत बचाऊन जावें. पुढें इकडे **भाऊसाहेब** आणि तिकडे **आबदुलअली** दुराणी.[१९०] दोनीहि बलिष्ठ आणि दोघांचीं सुकृतेंहि[१९१] ताजव्यांत घातलीं आहेत. थोडेंच[१९२] दिवसांत याचा निवाडा दिसोन येईल.[१९३] तों पावेतों आम्ही आपले जागां दम बांधोन[१९४] स्वस्थ राहावें. पुढे जयरामजीचे[१९४] चित्तास येईल तें सुखरूप होऊं.

---

१७८. यापुढें क. प्रत. म्हणते "येथील दरबारचा रागरंग पाहाता ठीक दिसत नाहीं. तुम्हास तरी आम्ही इमान प्रमाण देऊन आणिलें. तुम्ही देखली वाट पहावी."

१७९ यत्न सा. १९२२.

१८०. हे दोन शब्द सा. १९२२ त नाहींत. भाइसं. मध्यें आहेत.

१८१. दूर सा. १९२२.

१८२. अतःपर सा. १९२२.

१८३. बोलोन भाइसं. व सा. १८७९ व १८८६. "सिंदे-होलकर यांचें वोलणें ऐकून' सा. १९२२. पण हे शब्द सा. १८७९ व १८८६ त नाहींत.

१८४. सुरजमल जाट यानें सा. १९२२.

१८५. क्षेप भा. प्रत.

१८६. पुरतेंच सा. २२.

१८६.–(अ) या शब्दापूर्वी 'तेव्हां' हा शब्द शें. आहे.

१८७. 'चुके' शें. 'चुकी' सा. व भा.

१८८. 'आहाणा' सा. 'बोल' क. व भाइसं.

१८९. हा. शब्द सा. व शें. त आहे.

१९०. सबळ अनुष्ठानी सा. १९२२.

१९१. 'सुकृतेंहि' यापुढें 'सध्यां' हा शब्द सा. २२ त अधिक आहे.

१९२. या वाक्याबद्दल "न्यून पूर्ण थोडकिया दिवसांत दिसोन येईल" हें वाक्य सा. २२ त आहे.

१९३. ठांसून क. प्रत.

१९४. जे रामजीचे' शें. व सा. 'जें रामजीचें' सा. २२.

उद्याची फिकीर[१९५] आज कशाला ? सध्यां निभावणी होईल अशी निघण्याची मात्र मसलत फते[१९६] करावी.''[१९७] तेव्हां[१९८] आज रात्रीस निघावें म्हणोन निश्चय केला. मग[१९९] प्रहर रात्र गुदरलियावर गुप्तरूपें हातीच्या घांटा काढून, डेरे दांडे[२००] पाडून झाडून निघाले. जवळ **सिंदे-होळकर** होते,[२०१] त्यांणीं काळा डोळा करून चार कोस[२०२] गेलियावर मग **होळकर**[२०३] यांजकडील दिवाण **गंगोबा तात्या** कचेरीस जाऊन वर्तमान सांगितलें कीं, ''**सुरजमल जाट** गुप्तरूपें कोणास न कळतां पळून गेले. आम्हांकडील[२०४] फौज पाठलागास गेली.[२०४] आपणहि[२०५] फौज रवाना करावी[२०५]'' असें ऐकतांच **भाऊनीं** फौज सिध्द केली. फौज[२०६] तयार होईतों[२०६] आणखी चार-साहा घटका लागल्या. इकडे **सिंदे-होलकर** यांची[२०७] फौज निघोन गेली तों **सुरजमल जाट** सडा झाडून **रामगडास**[२०८] पोंचला. मागें थोडेबहूत हजार[२०९]-पांचशें बुणगे सांपडले ते लुटून आणिले. असो. या प्रकारें **जाट** तो निभाऊन गेला. इकडे **भाऊंसहि**[२१०] पुरतें [२१०]समजलें कीं, ''**सिंदे-होळकर** यांचे अनुमताशिवाय **जाट** गेला नाहीं. असो.[२११] आतां गोष्ट[२१२] आपले[२१३] चितांतच राखावी.'' म्हणोन आपले

---

१९५. 'फिकीर' शा. व सा. 'फकरी' भाइसं. 'फिकिरी' भा. 'फिकीरीत' सगजो.

१९६. 'सिद्ध' सा. २२.

१९७. यापुढें जें होईल तें सुखें होऊं' हें वाक्य सा. २२ त अधिक आहे.

१९८. 'परंतु' सा. २२.

१९९. यापुढें ''अवशीची' हा शब्द सा. २२ त आहे; परंतु सा. १८७९ व १८८६ त नाहीं.

२००. 'तडे पासून' भाइसं. 'तली पाडून' भा. प्रत.

२०१. 'होते' यापुढें 'परंतु' हा शब्द सा. २२ त अधिक आहे.

२०२. यापुढें 'भुई' हा शब्द सा. १९२२. त अधिक आहे.

२०३. 'होलकर' क. व सा. १९२२. 'शिंदे-होळकर' पु. व जुं. व भाइसं. प्रती.

२०४. या वाक्याबद्दल ''आम्हांकडील छबिनेवाले यांणीं आम्हांसहि न कळवितां जाट यांचे पाठलागास दौड करून गेले आहेत'' हें वाक्य सां. व क. प्रतींत आहे.

२०५.'आदणही फौजेची रवानगी करावी ' सा. २२.

२०६. ' ताकीद करावयासि व फौज तयार होऊन निघावयासि ' सा. २२.

२०७. ' यांचीही ' सा. २२.

२०८. ' रामगडांत ' सा. २२.

२०९. हा शब्द भाइसं. आहे. सा. २२ त नाहीं.

२१०. ' भाऊसाहेबहि पूरतेपणीं उमजले ' सा. २२.

२११. ' अस्तु ' सा. २२.

२१२. ' ही गोष्ट ' शें. 'गुप्त गोष्ट' भा.

२१३. हा शब्द भाइसं मध्यें आहे. सा. २२ त नाहीं.

जागां राग शांत[२१४] करून राहिले. कचेरीस मात्र बोलिले कीं, "ईश्वर सतेंकरून दुराणीचें पारिपत्य जाहालियावर जाटांचें [२१५]अधिकोत्तर काय आहे ?[२१६]

२१४. 'शांतवन' भाइसं.

२१५. 'अधिक पदार्थ' सगजो.

२१६. येथून तुंगार प्रतीचा पाठ निराळा आहे तो असा:—

"खामाखाय जाट होता कीं नाहींसा करीन तरीच जातीचा ब्राह्मण" म्हणोन प्रतिज्ञा केली. याप्रकारें सध्यां निधान हातीचें गमावलें. उपरांतिक भाऊसाहेबीं नारो शंकर किल्ल्यांत ठेविले. त्याजपाशीं किल्ल्यांत दोन हजार फौज, प्यादे, व हजार गाडदी व शहरचे गिर्दनबाजीस पांच हजार फौज ठेवून मजल दरमजल कूच करून कुंजपुरियास जाऊन पोंचले. तों दुराणीची फौज पलीकडे यमुनातीरींच होती. कुंजपुरियास पोहोंचलियावर दुराणी (यांणीं) नदी उतरावयासि बहूत तल्लास केला. परंतु भाऊसाहेब यांस तेव्हां यश घ्यावयाचें होतें; यास्तव त्यांस यमुनेनें वाट दिली नाहीं. मग रोहिले दुराणी यांनीं मनसबा करून कमाऊच्या पहाडानजीक यमुना उतरावी म्हणोन दोन दिवसांत ऐशीं कोस कच्चे पहाडाच्या सुमारास गेले. तों तिकडेहि उतार सांपडेना! म्हणून तो निवान्त दोन रोज तिकडेच राहिले. इकडे कुंजपुरियाभोंवताल्या फौजा उभ्या राहिल्या. तों कुतुबशाहा व समंदखान कत्तलबाज आंत होता. त्यांणीं कांहीं गांवांत सामान टाकून बाहेर निघावें. तें न करितां झाडून सामान बाहेर काढून युद्धास तोंड लाविलें. बाहेरील गनिमांच्या तोफांचा व हस्तनाला व सुतरनाला व जेजाला व बरखंदाज बाणांचा मार अतिशयेंकरून जाला. तों ते थोडके आणि गनिमांच्या फौजा भारी. शिंदेहोळकर यांजकडील त्यांणीं कत्तल फार वेळां केली होती; यास्तव केवळ हे दांतनिकसीस आले. इब्रामखान गाडदी निजाम अली पाशील रहवाई त्याणें एकीकडून चालोन घेतलें. मोठीशी दोन घटकांपर्यंत मारामारी झाली.

प्रकरण १२ वें

मराठ्यांचा कुंजपुऱ्यावर हल्ला; व पाणिपतावर तळ.

१०९. (मग) खासा **भाऊसाहेब** व **बलवंत गणेश** व **जनकोजी सिंदे** व **मल्हारराव होलकर** व **दमाजी गायकवाड** व **यशवंतराव पवार**[1] व **विठ्ठल**[1] **सिवदेव** व **समशेर बहादर** व **इब्राहमखान गारदी** व आणखी सरदार सर्व[2] मिलोन मनसबा केला कीं, "**कुतुबशाहा** व **सैदखान**[3] **कतलबाज कुंजपुरींत** आहेत. त्यांजकडे जाऊन त्यांचें पारिपत्य करावें व **कुंजपूरचा** किल्ला खणून टाकावा." असी मसलत करून मुहूर्त पाहून कूच दर कूच मजल दरमजल करून **कुंजपुरानजिक** गेले. त्यांची बातमी होती. ते सावधच होते. तयार होऊन शहर सोडून फौजेसुध्दां बाहेर आले. त्यांची यांची गांठ पडली. त्यांजकडील[3अ] व यांजकडील तोफांचा व बाणांचा मार[4] जाहाला. गर्दी होऊन गेली. माणसास माणूस दिसेनासें झालें. मोठी खणाखणी जाहाली. येक प्रहर युद्ध जाहालें. कोणीकडूनहि घोड्याचें तोंड आंत सिरकेनासे[5] जाहालें. ते समयीं **भाऊसाहेब** यांणीं **बलवंतराव** यासी आज्ञा केली कीं, "तीन टोळ्या करून हल्ला करावा." त्याजवरून तीन[6] टोळ्या केल्या. येक बाजूस **दमाजी गायकवाड** व येक

---

१. 'पवार व विठ्ठल' हे तीन शब्द भा. इ. सं. मध्यें नसून सा. १९२२ मधील आहेत.

२. सर्वत्र सा. १९२२.

३. सैमदखान–सा. १९२२ संमदखान –तु. प्र. अहमदखान–पु. प्रत.

३ अ. 'उभयतां लष्करांतील' हे शब्द 'त्यांजकडील व यांजकडील' या शब्दांबद्दल–मंडळ प्रतींत आहेत.

४. 'ऐसा मार झाला कीं' सा. १९९२. 'मारा जाहाला' सा. १८७९ व ८६.

५. शिरेनासें सा. १८७९ व १८८६

६.

	१	२	३
भा. इ. सं.	दमाजी गायकवाड	इब्राहमखान गाडदी व समशेर आली	खासगी फौजेनिसीं बलवंतराव
सा. १९२२	समशेर बहादर दमाजी गायकवाड व नारो शंकर	यशवंत पवार व इब्राहमखान गाडदी	०
कल्याण प्रत–	दमाजी गायकवाड	समशेर बहादर	खासगी हुजुरातीनिशीं बळवंतराव गणेश व इब्रामखान गारदी
तुंगार प्रत–	इब्राहमखान गाडदी	०	०

याप्रमाणें चार प्रतींतील तिन्ही टोळ्यांतील विभागणी होते, सा. १९२२ मध्यें तिसरी टोळीच दर्शित होत नाहीं. आणि नारो शंकर जो दिल्लीस ठेविला तो पहिल्या टोळींत व यशवंतराव पवार हा जो इतर कोणतीच प्रत देत नाहीं तो दुसऱ्या टोळींत दाखविला आहे. कल्याण प्रतींत तीन टोळ्या आहेत, पण व्यक्तींची थोडी अदलाबदल दिसते; म्हणजे इब्राहमखान जो दुसऱ्या टोळींत आहे तो या प्रतींत तिसऱ्या टोळींत दाखविला आहे, आणि तुंगार प्रतींत दुसऱ्या व तिसऱ्या टोळींचा उल्लेखच नाहीं.

बाजूस **इब्राम्खान गारदी** व **समशेर आली** व खाजगी फौजेनिसीं **बलवंतराव** असे तिहींकडून चालून घेतलें. दोन घटिकांपर्यंत मोठी मारामारी होऊन **कुतुबशहा-कडील**[७] चांगले मनुष्य[८] तितके सिकस्त जाहाले. मग गलिमांनीं चहूंकडून 'हर हर' म्हणून घोडीं घातली[९]. ते समयीं मोठी धुंदी जाहाली. बाहेरील सामान[९] गांवांत जाऊन पावलें नाहीं.तों चोहोंकडून[१०] हल्ला होऊं लागला. ते दिवसीं मराठे यानींहि कांहीं चितांत खंत[११] आणली नाहीं. जितके हाताखालीं सांपडले तितके ठार[१२] मारिले. त्या हल्ल्यांत[१३] पांच सात हजार मनुष्यें त्यांजकडील ठार जाहालीं. तैसेंच घायाल जाहाले. मुडदे व घायालांचा ढीग एकच[१४] जाहाला. शहरपन्हा खालीं होता तो हल्ला सरसा चढोन गांवांत[१५] पोहोंचला. गांवांतील चिंधीचोळा केला. **कुंजपुऱ्या-वर** यांची वस्ती आबाद होती.[१६] लूटहि[१७] मुबलक [१८]सांपडली. **नजीबखान** रोहिला याचे व्याही व जांवई **कुंजपुरींत** होते, ते हस्तगत जाहाले. ते धरून आणिले. इकडे **कुतुबशाहा, गायकवाड** यांच्या फौजेंत जिवंत सांपडला तैसाच[१९] **सैद आमंदखान कतलबाज**हि सांपडला. **भाऊसाहेब** व **जनकोजी सिंदे** व **मल्हारराव होलकर** येक जागा[२०] होते. लुटीची गर्दी जाहाली. कोणी घोडी, कोणी उंट, कोणी हाती, कोणी बैल, ज्याचें दैवीं होतें तसें सांपडलें. **दताजी सिंदे** पडले ते समयीं **जवाहर-गज** हती **कुतुबशाहा** यांजकडे सांपडला होता तो **कुंजपुरींत** होता. आनायासें करून **जनकोजी सिंदे** यांजकडे सांपडला ते दिवशींचा **सिंदे** यांचा आनंद कोठवर वर्णावा[२१] ? आसो.

---

७. हे तीन शब्द सा. १९२२ मध्यें अधिक आहेत. भा. इ. सं. मध्यें नाहींत.

८. यापुढें "एकच धौशा केला" हें वाक्य सा. १९२२ मध्यें व "चालोन घेतलें." हें वाक्य शें. प्रतींत अधिक आहे.

९. 'सामान माणूस' सा. १९२२.

१०. यापुढें "तोंडें लागून लांडगे-तोड झाली. मग चोहोंकडून" हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत'

११. करुणा सा. १९२२ व सगजो.

१२. बार–भा. इ. सं. 'जिवें मारा-वयास आळस केला नाहीं.' सा. १९२२

१३. 'त्या हलचांत' या शब्दांबद्दल 'ते समयीं' हे शब्द सा. १९२२ त आहेत.

१४. एकत्र–सा. १९२२.

१५. गांवांत जाऊन पोहोंचले––सा. १९२२.

१६. 'अपूट'—सा. १९२२ 'जाफाट' सगजो. 'चांगली संपन्न' सा. प्रत.

१७. लुटीहि तुं. प्र.

१८. सांपडल्या तुं. प्र.

१९. या शब्दापुढें "फौजेंत" हा शब्द भा. प्रतींत आहे.

२०. 'उभे होते' सगजो. व सा. १९२२.

२१. 'वर्णावा' सा. १९२२ शें. व भा. पुरवावा भाइसं.

११०. इकडे **दमाजी गायकवाड** यांणीं **कुतुबशाहा** हतीवर बसवून **भाऊसाहेब** यांजकडे लावून दिल्हा. पुढें दिवाण येऊन **भाऊसाहेब** यांसी सांगितलें कीं, "**कुतुबशाहा** आम्हांकडे सांपडला, तो आपणाकडे घ्यावा." म्हणोन सांगितलें- तोहि नजीक येऊन पोंचला. त्याजकडे पाहातांच **भाऊसाहेब**[२२] यास रागाचा[२२] आवेश येऊन सर्व अंगास रोमांच आले.[२३] आणि बोलते जाले कीं, "या मात्रागमनि- यास एवढे प्रतिष्ठेनें कशास आणिलें?" असें गालिप्रदान करून "हतीवरून लोटून द्यावा[२४]" म्हणोन आज्ञा[२५] जाली.[२५] ते **कुतुबशाहा** याणें ऐकोन[अ] आपणच हतीवरून उडी टाकिली. ते[२६] समयीं **भाऊसाहेब** यांणीं त्यास विचारिलें कीं, "आतां खबर[२७] काय आहे ती बोलणें," असें म्हणतांच **कुतुबशाहा** याणें विचा- रणा[२८] केली कीं, "आतां आपण यांच्या कबजेंत[२९] सांपडलों आहे. अजीज[३०] होऊन बोलिलों तरी मजला कोणी वांचवीत नाहीं.[३१] म्हणोन प्रत्योत्तर केलें कीं, "तुमचे चितांत काय मजकूर आहे? तुम्हीं सला करणें तरी मजला वांचवावें. म्हणजे मर्जीप्रमाणें **दुराणी** व **रोहिला** यांचा [व तुमचा] सला करून देईन. हें न होये[३२] तरी[आ] पन्नास लक्ष रुपये घेऊन मुक्त करावें. तुम्हांस युद्ध करावयाची हिमत असली तरी खंडणी करावी[३३] आणि घेऊन मजला सोडावें. आजपासून पंधरा

---

२२. हे तीन शब्द सा. १९२२ व सगजो. मधील. 'रागाचा' या शब्दापुढें 'उत्कर्ष' हा शब्द सा. १९२२ त. 'उत्कृष्ट' हा शब्द भा. इ. सं. मध्यें अधिक आहे, तसेंच 'वाघाचा' शब्द भा. इ. सं. मध्यें व 'वाघासारखा' शें. प्रत.

२३. या वाक्याबद्दल "त्याजकडे भाऊसाहेब यांणी पाहतांच व्याघ्रास आवेश येतो तसा भाऊसाहेबांस येऊन सर्वांगास रोमांच उभे राहिले. हें वाक्य सा. व क. प्रतींत आहे. 'आले' याबद्दल 'जाहाले' भा. इ. सं. प्रत

२४. 'देणें' भा. इ. सं.

२५. 'बोलिले' सा. १९२२.

अ—'कानें ऐकून' सा. १९२२.

२६. या शब्दांपूर्वी "धरून जवळ आणिला" हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

२७. 'गत' स. ग. जो.

२८. 'विचारिलें' भा.इ.सं. 'चितांत विचारणा' सा. १९२२. 'विचारणा केली' सा. शें. मं. व भा.

२९. 'कवेंत' सा. १९२२. 'पेंचांत' मं. 'कबजेंत' भा. इ. सं.

३०. 'अजीत' भा. इ. सं. 'आतां आजिज' सा. १९२२.

३१. यापुढें 'मग व्यंगोत्तर कां बोलावें' हें वाक्य सा. १९२२ त अधिक आहे.

३२. 'होय' सा. १९२२ 'करी' भा. इ. सं. 'होये' स. ग. जो. 'कराल' स. ग. जो.

आ, 'मजपासून' हे शब्द 'तरी' पुढें सा. १९२२ त अधिक.

३३. 'करावी आणि' हे शब्द भा. इ. सं. मधील; सा. मध्यें नाहींत.

दिवसांत पंचवीस हजार फौजेनिसीं लढाईस तुम्हासीं सिद्ध आहें." मागती[३४] **भाऊनीं**[३५] विचारिलें कीं, "**दताजी सिंदे** याचा सिरच्छेद तुम्हींच[३६] केला कीं काय?" हें ऐकोन **कुतुबशाहानें** चितांत विचार[३७] केला कीं,[३८] "हें वर्म काढिलें, तेव्हां आपणास प्राणानिसी सोडीत नाहींत. अजीज होणें[३९] हा मूर्खपणा" जाणोन बोलता जाहला कीं, "आम्ही आपला स्वधर्म केला. आनचे कुराणांत निश्चय आहे कीं शत्रूचा शिरच्छेद करून भाल्यास सिर टोंचून[४०] मग शाहादानें वाजवावीं.[४१] या प्रमाणें वर्तणूक केली." असें ऐकून **भाऊसाहेब** यांची तलव्याची आग मस्तकास गेली. अंग रोमांच[४२] जालें. क्रोधाची सीमा[४३] जाहाली. समुद्र ढवळला. आणि आज्ञा करिते जाहाले[४४] कीं, "ढालेपाशीं नेऊन याचा सिरच्छेद करावा." हें ऐकोन **मल्हारराव** व **जनकोजी सिंदे** यांणीं अर्ज केला कीं, "यास वांचवून याचे हातून महत्कार्य संपादून घ्यावें. यास मारलियानें **दताजी सिंदे**[४५] उठत नाहींत" म्हणोन विवेक करून सांगितलें. परंतु **भाऊसाहेब** यांस विषादग्नि शमेनासा जाहाला.[४६] "सिरछेद करणें[४७]" म्हणोन आज्ञा एकदांच दिली. मग ढालेपासीं नेला.[४८] **कुतुबशाहानें** पाणी प्याव्यास मागितलें. तेव्हां पाणी पाजावें हें विहित होय;[४९] परंतु

---

३४. या शब्दापूर्वी 'हें ऐकून' हे शब्द सा. १९२२त अधिक.

३५. यापुढें 'त्यास' हा शब्द शें. त अधिक.

३६. 'तुवांच' सा. १९२२. 'तुम्हीच' पु. व भा. इ. सं. 'तूंच' स. ग. जो.

३७. 'विचारिलें' भा. इ. सं.

३८. 'कीं' यापुढें' यांणीं' हा शब्द सा. १९२२ त अधिक.

३९. 'आजीज होऊन बोलणें हें मूर्खपण आहे' सा. १९२२. 'अजीत न होणें' भा. 'अजीज येणें' शें. 'अजीज न होणें' मं.

४०. 'बोंचून' शें. सा. व भा. 'कापून' स. ग. जो. 'बोंचिलें' भा. इ. सं.

४१. 'वाजवीत जावें' शें. 'वाजवावीं' भा. इ. सं.

४२, 'रोमांचित तनू' शें. 'रोमांच जाहालें' भा. इ. सं.

४३. 'जाहाली' भा. इ. सं.

४४. 'केली कीं' सा. १९२२.

४५. 'कांहीं उठत नाहींत' सा. १९२२.

४६. या ऐवजीं क. प्रत हीं वाक्यें देते. "परंतु भाऊसाहेब यांस क्रोध आलेला, संतप्त केवळ अग्नीप्रमाणें जाहाले. एक वेळ अग्नि हातीं धरवेल; परंतु यांचा राग उपशमन न होई असें जाहालें."

४७. 'करावा' सा. १९२२. यापुढें "आज्ञा करून एकदांच तीन परवानग्या दिल्या" हें वाक्य सा. १९२२.

४८. 'मग ढालेपाशीं नेऊन सिरच्छेदास सिद्ध केलें. ते समयीं तुं. प्रत.

४९. या वाक्यापूर्वी "आधीं पाणी पाजून मग शिरच्छेद करावा" हें वाक्य सा. १९२२ त अधिक.

दताजी सिंदे यांचें वर्तमान ऐकोन सर्वांस विषाद सारखा आला. कोणास करुणा[५०] आली नाहीं. निष्ठुरपणें बोलिले कीं, "या मात्रागमनियास लघुशंका प्राशन करवणें[५१]." असें बोलून तात्काल सिरच्छेद केला. त्यास गोरकफण[५२] प्राप्त जाहालें नाहीं. ढालेपुढें काक जंबूक[५३] यांणीं खाला.[५४] तसाच **सैदखान**[५५] **कतलबाज** सांपडला तोहि याजप्रकारें मारिला. दोनी सरदार पंधरा हजार फौजेचे मारिले[५६].

१११. उपरांत **कुंजीपूरियाचें**[५७] वस्त्रहरण केलें. लूट मुबलक ज्याचे दैवीं जशी तसी सापडली. किल्यांत **नजीबखान** याचा व्याही व जांवई होता. तोहि हस्तगत[५८] करून, त्याचीं मुलें माणसें द्रव्याचे आशेनें बोटांस पलिते लाविलें कीं, '**नजीबखान** याची ठेव काय असेल ती दाखवणें'[५९] म्हणोन फारच हाल केले. तेव्हां पंधरा लक्ष रुपयांची मालिस्त[६०] दाखविली. मग त्यांस कैदेंत[६१] ठेवून[६२] **भाऊसाहेब** यांणीं मुकाम करून तेथें राहिले. कामाठी बेलदार लाऊन[६३] **कुंजपुरीचा** किल्ला व शहरपन्हा ढांसळून टाकिले. ते समयीं **भाऊसाहेब** व **बळवंतराव** यांणीं येश-प्राप्तीचा संतोष मानून परस्परें बोलते जाले कीं, "**सिंदे, होळकर** यांनीं आम्हांस दुराणीची सलावत सांगितली,[६४] ते दुराणी काय जाले?" **बळवंतराव** यांणीं उत्तर केलें कीं, "**सुरंजेचे** मुकामी साहेबांस बोलिलों होतों कीं, '**सिंदे होळकर** आम्हांस धुडावितात.[६५] परंतु गिलजे आम्ही कानीं मात्र ऐकूं. परंतु दृष्टीस पडणार नाहीं. साहेबाचा पुण्यप्रताप थोर."[६६] बोलून संतोष मानिला. मग **सिंदे होळकर** डेरियास येऊन अर्ज केला कीं, "हें महत्कार्य[६७] करून येश संपादिलें.

---

५०. 'आली नाहीं.' शें. 'येईना' सा. १९२२ 'न येतां' भा.

५१. 'करणें' भाइसं, 'करवणें' सा. शें. मं. व भा.

५२. 'गोरकफण' भाइसं.; मं. व भा. 'गोरगपण' सा. १९२२ 'गोरकपन' तुं. प्रत.

५३. 'कुले व कुत्रे' भा. 'कोल्हे जंबूक' भाइसं.

५४. 'खादला' सा. १९२२. यापुढें 'कर्माप्रमाणें फळहि जाहालें' हें वाक्य क. व सा. प्रतींत अधिक.

५५. सैमतखान' सा. १९२२.

५६. 'फौजेनिशीं' पु. प्रत.

५७. 'कुंजपुरींतच' भा. 'कुंजपुरियाचे लोकांचें' मं.

५८, 'सांपडला' हें दोनदां घालून सा. १९२२ त दोन वाक्यें केलीं आहेत.

५९. 'दाखवावी' मं.

६०. 'माया' तुं. 'खजिना' सां. 'दौलत' क. प्रत.

६१. 'त्यांचे हाल या रितीनें करून' हे शब्द यापूर्वी सा. १९२२ त अधिक.

६२. 'ठेवले' सा. १९२२.

६३. 'कडून' भा. 'असे लावून' सा. १९२२.

६४. 'घातली' सा. १९२२.

६५. 'बुडवितात' भाइसं. 'दुराणीची दबकावणी घालितात' क. प्रत.

६६. 'या प्रकारचा आहे' तुं. प्रत.

६७. 'साहेबीं' सा. १९२२.

आतां कूच करून **दिलीस** जाऊन पोंचावें, यांत उत्तम आहे." असें ऐकून **बळवंतराव** यांणीं उत्तर[६८] केलें कीं, "सुभेदार, तुमचे आंगीं दुराणीचें भय,[६९] शाहारे म्हणज हींव आंगांत शिरलें,[६९] तें आद्यापि जाईना![७०]" हें मल्हारराव यांणीं येकोन विषाद येऊन,[७१] तो स्पष्टवक्ता, त्यास कोणाची परवा नाहीं आणि कृत्रिमीहि नव्हे[७२]. मग[७३] बोलिला कीं, "तुम्ही[७४] ब्राह्मण जात, निर्बल,[७५] कांहीं आकाश फोडून[७५] आलां नाहीं. पंचाननाची गांठ पडली नाहीं तों[७६] हें बोलणें बोलतां." म्हणोन बोलोन रागेंरागें डेऱ्यास गेले. **भाऊंनीं** बोलण्याचा विषाद[७७] मानून 'दुराणीचा[७८] फितूर' म्हणोन विकल्प चितांत आणिला. आसो. पुढील होणार बलवत्तर.[७९] कोणाचाहि[८०] उपाय[८१] नाहीं. ते समयीं **दिलीस** प्रविष्ट होते तरी अवघड[८२] न पडतें. **कुंजपुरीस**[८३] खणत्या लावून तेथें स्वस्थ राहिले.

११२. इकडे **नजीबखान** व दुराणी यांणीं **कुंजपुरीचें** वर्तमान **कुतुबशाहा** व **सैदखान कतलबाज** यांचें सिरछेदाचें ऐकोन, दांतांनीं ओंठ चावून मनगटें तोडूं

---

६८. 'जाबसाल' सा. १९२२.

६९. याबद्दल 'शाहारे कां शिरले' हें वाक्य सा. १९२२. 'शेर भरले' मं. 'शेर कां शिरले?' सगजो.

७०. 'जाहाला' भाइसं. 'जाईना' शें., भा., सा.

७१. 'आला' सा. १९२२.

७२. 'अंगीं कृत्रिमहि नव्हतें.' साने १९२२.

७३. 'नव्हतें' सा. 'नव्हेत' शें. सगजो.

७४. याबद्दल 'तुं ब्राह्मण, जातीनें निर्बल.' तुं. प्रत. 'तुम्ही ब्राह्मण आधींच निर्बळ. तुम्ही वेद म्हणावयाचे उपयोगी. या गोष्टींची तुम्हांस माहितीच नाहीं. तुम्हासी काय बोलावें?" सां. प्रत.

७५. 'फाडून' सगजो.

७६. 'तंवर जंबुक गर्जना करतो' सगजो. 'तोंच वल्गना करतां' सा. १९२२ 'तोंवर बोलणें बोलतां' सा. १८७९ त 'गांठ पडलियावर शुद्धहि निघून जाईल' हें वाक्य सा. १९२२ त अधिक आहे; पण १८७९ व १८८६ त नाहीं.

७७. 'त्रास' सा. १९२२ व सगजो. 'विषाद' सां. व भाइसं.

७८. 'दुराणीशीं' सा. १९२२.

७९. 'बलोत्तर' सा. १९२२.

८०. या शब्दापूर्वी 'तेथें' हा शब्द सा. १९२२ त व 'त्यास' सा. १८७९ व १८८६ त अधिक आहे.

८१. 'यत्न' सा. १९२२.

८२. 'अवघडच होते' भा.

८३. या शब्दापूर्वी 'ते' हा शब्द सा. १९२२ त अधिक. 'सिंदे होलकर यांच्या सांगण्याचा अनादर करून' हें वाक्य क. प्रत.

लागले. "आतां[८४] जीव ठेवणें हें उचित नाहीं" म्हणोन[८५] सर्वत्रांनीं मसलत करून तेथून कूच करून, कच्चे साठ कोस भूमी[८६] एक वेळ एक रात्र चालोन, **पाणिपत कर्णोल** येथें **यमुनेस** गचक्या उतार होता, तेथें पुढें हत्तीवर हस्तनाले व उंटावर सुतरनाले व बाणांच्या कैंच्या अशा पुढें घालून सडी फौज झाडून अलीकडे उतरली. मागोन तोफखाना व बुणगे झाडून उतरले. हें वर्तमान **भाऊसाहेबांस** कळलें नाहीं. ऐसा प्रकार. अकस्मात् विघ्न उतरलें. इतकियांत **पाणीपत कर्णोल** यांत भाऊसाहेबांचीं ठाणीं होतीं, तीं पळोन लष्करांत[८७] दाखल जाले. तेव्हां हें वर्तमान भाऊंस कळलें. ते समयीं भाऊंनीं तमाम उमराव **मल्हारराव होळकर** व **जनकोजी सिंदे** व **दमाजी गायकवाड** व **यशवंतराव पवार, विठ्ठलराव सिवदेव** व **अंताजी माणकेश्वर** व **समशेर बहादर** व **इब्राहिमखान गाडदी** व **सोनाजी भापकर** [व] या वितरिक्त आणखी लहान थोर सरदार बोलावून विचार केला कीं, "दुराणी एकाएकींच यमुना उतरून आलीकडे आला. तस्मात् त्याचा जोर[८८] भारी. तेव्हां. उमेदीनें आला. आतां यास यत्न काय करावा?" हें **मल्हारराव** यांणीं ऐकून उतर केलें कीं, "हा विचार **बळवंतराव** यास विचारावा. आम्हांस कांहीं मसलत सुचत नाहीं. आमची साठी बुद्धी नाठी जाली." म्हणोन बोलून कानांवर हात ठेविले. ते समयीं आणखीहि कित्येक शाहाणे तार्किक होते. त्यांणीं मसलत दिली कीं, "**दिलीस** जाऊन पोंचावें. म्हणजे बचाव होईल. परंतु निभावणी होऊन जाण्याची मसलत **इब्राहिमखान गाडदी** यास विचारावी." त्याजवरून **इब्राहिमखान** यांस विचारलें. त्याणें मसलत दिली कीं, तुम्हीं देशचा मोंगल **बंदेखान अली** याजप्रमाणें गोल बांधून चालिला तरि तुमची निभावणी[८९] करून देईन. त्यांनीं गनिमी कावा केला तरी आमचा यत्न राहिला." असो. पेशजीचा[९०] मनसुबा पेशवे यांनीं प्राधान्य करून **कुंजपुरी** सोडून, **दिलीचे** रोखें चालिले.

११३. पुढें बातमीस **बाजी हरी**[९१] व **भगवंतराव कदम** व **सिंदे** यांजकडे **येसाजी भोइटे** असे पांच सात हजार लोक[९२] पाठविले. ते बातमीस निघाले. तेथून

---

८४. हा सर्व मजकूर म्हणजे जवळ जवळ २० ओळी भाइसं.मध्यें नाहीं. सा. १९२२ मधील हा घेतला आहे. आणि सगजो. मध्येंहि हा असावा.

८५. हा शब्द सा. १८७९–१८८६ तील आहे.

८६. 'जमीन' सगजो.

८७. 'मिसळ जाहाले' सगजो.

८८. 'जोरा' सा. १८७९–१८८६

८९. क. प्रतींतील पाठ "आतां जैसे होईल तैसे होऊ. त्यांणीं गनिमी कावा केला तर आमचा यत्न हरला."

९०. 'असें ऐकून तोच' सा. १९२२.

९१. सुभेदार निमकर.

९२. 'फौजेनिसीं' सगजो.

दुराणीची फौज पांच कोस होती. तेथें उभे राहिले. तों त्यांणीहि[९३] मुख[९४] पाहिलें नव्हतें. अस्ताव्यस्त [९४अ]लोक गाशे टाकून झुरझुऱ्या[९५] लावून बसले. कोणी घोडीं बाजरीचे शेतांत[९६] चारूं लागले. कोणी निजले. असें पाहून येसाजी भोइटे यांनीं जाबसाल[९७] केला कीं, "तुम्ही बातमीस आलां.[९८] येथून गिलजा पांच कोसांवर आहे. त्यास, हे कांहीं देशचे मोंगल नव्हत, जें[९९] तुम्ही स्वस्थ राहिलां.[१००] दुराणीची दौड[१०१] भारी. बेफाम[१०२] राहूं नये." मग[१०३] सर्वांनीं त्याची हेटाळणी केली. आणि हातावर हात मारून विनोद करिते जाहाले कीं, "सिंदे होळकर यांचे फौजेनें धासत[१०४] घेतली आहे." जी गोष्ट सांगतात[१०५] ती हिंमत सोडून बोलतात. हें बोलणें[१०६] येसाजी भोइटे यांनीं ऐकोन स्तब्ध राहिले. आणि येक आपला भला माणूस झाडावर टेहेळचा ठेविला.[१०७] आणि आपण घोडचावर स्वार होऊन, उभे[१०८] राहिले. तों येकायेकीं झाडावरून टेहेळचा सांगों लागला कीं, येथून दोन कोशांवर फौजेची गर्दी जाहाली.[१०९] धुरळा दृष्टीस पडों लागला." असें म्हणतांच सिंदे याजकडील लोक हुशार होऊन घोडचावर[११०] स्वार जाहले. आणखी एक वेळ त्यांसी

---

९३. सिंदे होळकरांच्या लोकांशिवाय इतरांनीं.

९४. 'दुःख' सा. १९२२.

९४अ. 'बेफाम' मं. प्रत.

९५. 'झरझऱ्या' सा. १९२२.

९६. 'सजगुरियांत' सा. १९२२.

९७. 'सर्वांस जाबसाल' सगजो.

९८. 'आला आहां' शें. प्रत.

९९. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं. सा. १९२२ त आहे.

१००. यापुढें सां. प्रतींत असा पाठ आहे :—"आपले देशी मोंगल मिजासी. त्यांजला जेरीस आणिलें. त्याप्रमाणें हे लोक नाहींत. प्रसंग पडल्यावर समजेल. त्यांची दौड भारी. चाळीस कोसांची मजल करणारे. सावध राहावें." क. प्रतींतील पाठ असा:—"आपले तिकडील मोंगल लोकांस दाहा कोशांची वळणीची मजल पडिली म्हणजे तोबा म्हणोन हयात सोडून देणार! त्यांची अजगर वृत्ति, या साम्यतेचे हे नव्हत. हे परम कठिण."

१०१. 'होड' तुं. प्रत.

१०२. 'बेफिकीर' सगजो.

१०३. 'हें ऐकून' सा. १९२२.

१०४. 'दहशद खादली' सा. १९२२ व मं.; 'फौजेंत दहशद बसली आहे' भा.

१०५. 'बोलतात' मं. प्रत.

१०६, 'म्हणोन बोलतांच' सा. १९२२.

१०७. 'बसवून' सा. १९२२.

१०८. 'मजबुदीनें उभे राहिले' सा. १९२२.

१०९. 'आली' सा. १९२२ व शें.

११०. या शब्दापूर्वी 'गडबडून' हा शब्द सा. १९२२ त अधिक आहे.

इशारत केली कीं,"घोडियावर[१११] स्वार होणें." मागती त्यांची मस्करी करून दम बांधून तसेंच राहिले.[११२] तों धुरळा दृष्टीस पडला. मग[११३] **येसाजी भोइटे** यांणीं जागा सोडून[११४] पळों लागले. तों येकायेकींच फौज दृष्टीस पडली. मग गडबड करून घोडीं संभाळावयास गेले. तों[११५] ज्याचें घोडें जवळ व आणि [जो] सावध होता[११५] तो स्वार जाला.[११६] वरकड घोड्यांस स्वार प्राप्त होऊं[११७] दिल्हे नाहींत. तों इतकियांत[११८] येऊन [गिलजे] सरमिसळ जाहले. त्याची प्रतिज्ञाच कीं, सांपडले[११९] मनुष्याचें सिर छेदन करून न्याहावें.[११९] ते समयीं **बाजी हरीकडील** स्वार घोड्यावर बसून लष्कराकडे भरधांव पळों लागले. तों आंत गिलजे सरमिसळ जाहाले. लष्करच्या ढाला दिसत[१२०] तोंपर्यंत आले. ढाला पाहिल्यावर[१२१] दुराणी फिरून गेले. ते समयीं बातमीचे स्वारांचीं डोचकीं बाराशें लोकांचीं कापून नेलीं.

११४. हें वर्तमान फौजेंत कळतांच फौजेची छबी मावळली.[१२२] **भाऊसाहेबांची**[१२३] हिंमत **दिलीस** जावयाची होती ती राहिली. **पाणीपत** नजीक राहिल्यास[१२४] भोंवतालें लष्कर उतरून भोंवता खन्दक खाणून सभोंवता आराबा पसरून राहिले. फौजेचे तोंडावर **इब्रामखान** गाडदी राहिला. तेथून **अबदल अली** व **सुजातदौला** व **नजीबखान** रोहिला व **अहमदखान**[१२५] लंगडा पठाण, असे एक लक्ष वीस हजार फौज व तीनशें तोफा **यमुनातीरीं** अडीच[१२६] कोसांवर उतरले. त्यांसहि धास्त होतीच. एकाएकींच कांहीं[१२७] गळां पडले नाहींत. परंतु गनिमाचे फौजेनें धास्त खाऊन

---

१११. 'जलदी स्वार व्हावें' सा. १९२२ 'जलदी स्वार व्हावें म्हटलें असतां' स. ग. जो.

११२. 'बैसलें' सा. १९२२.

११३. 'जवळ आले असें [पाहून]' सा. १९२२.

११४. या शब्दापुढें 'लष्कराचे रोखें' हे शब्द सा. १९२२ त अधिक.

११५. या वाक्याबद्दल भा. इ. सं. मध्यें 'तों सावध, जवळ आणि आपण सावध' असें आहे.

११६. 'जलदीनें स्वार जाहाला' भा. इ. सं.

११७. 'जाले नाहींत' स. ग. जो.

११८. 'यांत येऊन' सा. १९२२.

११९. या वाक्याबद्दल "सांपडेल मनुष्य त्याचा शिरच्छेद करावा" हें वाक्य सा. १९२२ त आहे.

१२०. 'दिसों' भा. इ. सं. 'दिसतात' शें.

१२१. 'दिल्ह्यावर' स. ग. जो.

१२२. 'हडबडला' मं. 'दबला' शें. 'दबकला' भा. 'मावळली' स. ग. जो. व सा. १९२२. छबिगां दबकला क. प्रत.

१२३. हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

१२४. असल्यास' सा. १९२२.

१२५. 'अबदलखान लंगडा' भा. इ. सं. 'अहमतखान' शें. भा. व सा. १९२२.

१२६. 'ती चीं' तुं. प्रत.

१२७. 'कांहीं कांहीं' भा. इ. सं.

कूर्मवत् आकर्षून राहिले. दुराणी भंवता तलावे[१२८] देत फिरों लागला. दाणापाणी याची रसद पोंचेनाशी जाली. सुरजमल जाट हातांतील निधान गमाविलें. त्याची पहिलीच प्रतिज्ञा होती कीं, सरसाल तुम्ही व दुराणी युद्ध केलें तरी पैशास शेरभर पीठ व शेरभर हरभरेहि तसेच पुरवीन. तो आसता तर धान्यास अंतर न पडतें." असो. होणार[१२९] यास उपाय नाहीं. ज्या ज्या काळीं जें होणें तें होतच असतें. त्याप्रो महिना पंधरा दिवस गुदरले.[१३०] गोळागोळी करीत[१३१] राहिले. दिवसें दिवस धान्य महाग होऊं लागलें. वैरण मिळेनासी जाहाली. घोड्याची शक्ति राहिली.[१३२] ते समयीं भाऊसाहेब यांस परम कठिण[अ] भासलें कीं, आतां निभावणी होणें कठीण. आणि देशांतून कुमक व्हावयाची नाहीं "आणि मी नानासाहेब यांसी प्रतिज्ञा[१३३] करून निघून आलों. 'कुमक करा' हें म्हणावें तर उचित नाहीं," असें म्हणोन[१३४] स्वस्थ राहिले.

११५. हें वर्तमान विश्वासराव यांस कळतांच त्यांणीं जनकोजी सिंदे यांसी एकांतीं बलाऊन विचारपूर्वक[१३५] पुसिलें कीं, " भाऊसाहेब तों अभिमानानें पेंचांत[१३६] आले. मनसबा तो भारी पडला.[१३७] निभावणी[१३८] व्हावयाचा प्रकार राहिला.[१३८] आतां नानासाहेब यांस निदानचें पत्र ल्याहावें.[१३९]" हा[१४०] मनसोबा करून पत्रांत[१४१] मजकूर लिहिला[१४१] कीं, "भाऊसाहेब[१४२] तो अभिमानी पुरुष यांत गर्द[१४३] होतील; परंतु व्यंगोक्त[१४४] लिहिणार नाहींत. यास्तव संकट[१४५]; तरी आणखी

---

१२८. 'कावे' सा. १९२२ व स. ग. जो. 'तलावे' क. प्रत.

१२९. 'पहिली' भा. इ. सं. 'पहिलीच' सा. व शें. 'होणार बलोत्तर' सा. १९२२.

१३०. हा १शब्द सा. १९२२ त नाहीं. भा. इ. सं. मध्यें आहे.

१३१. 'करीत राहिले' भा. इ. सं. 'होतच होती' सा. १९२२.

१३२. 'चालली' सा. १९२२ व शें. 'चालल्या' स. ग. जो.

अ—'कष्ट' भा. 'संकट' स.ग.जो.

१३३. 'प्रतिज्ञा पूर्वक' सा. १९२२.

१३४. 'जाणोन' सा. १९२२ व शें.

१३५. 'विचार पुसिला' सा. १९२२.

१३६. 'अभिमानी. चितांत' भा.इ.सं.

१३७. 'मसलत भारी पडली' क.प्रत.

१३८. 'होण्याची नाहीं' भा. यापुढें "भाऊसाहेब तो अभिमानी पुरुष" हे शब्द सा. १९२२त व सगजो. मध्यें अधिक आहेत.

१३९. 'पाठवावें' स. ग. जो.

१४०. 'म्हणोन' सा. १९२२.

१४१. या तीन शब्दांबद्दल 'विश्वासराव यांणीं बापास पत्र लिहिलें' हें वाक्य सा. १९२२ त. अधिक आहे.

१४२. यापूर्वी 'गिलचे यांचा पेंच भारी पडला. निभावणी व्हावयाचा प्रकार राहिला' हीं वाक्यें सा. १९२२ त अधिक आहेत.

१४३. 'गारद' भा.

१४४. व्यंगोप्त 'व्यंगोत्तर' सा. १९२२.

१४५. 'संकटांत' सा. १९२२; 'संकटार्थ' तुं. प्रत. 'संकटांत आहेत शें. व सा. 'संकटाआंतरीं' भा.

पन्नास हजार फौज व क्रोड रुपये खजिना पाठविला तरी तुमचें आमचें दर्शन होईल; नाहींतर पत्र लिहिलें हीच भेट समजावी. **नानासाहेब**, मजसारिखे[१४६] पुत्र आपणांस होतील;[१४७] परंतु **भाऊसाहेबांसारखे** बंधु मिळणार नाहींत." म्हणून **भाऊसाहेब** यांसी अगदीं[१४८] कलों न देतां पत्रें लिहिलीं. तों **भाऊसाहेबांनीं** ऐकून[१४९] **जनकोजी शिंदे** व **विश्वासराव** यांसी एकांतीं बोलावून[१५०] क्रोधें संतप्त होऊन बोलिले कीं, "तुम्हांस जीव जगवणें[१५१] असेल तरी उत्तम आहे. अजून लावून द्यावयास फुरसत आहे. हर यत्न करून तुम्हांस दिल्लीस पावते करतों. तेथून[१५२] पांच हजार [फौज] घेऊन देशास जावें. आमची आस्था धराल तरी आमची शंभर वर्षें[१५३] पूर्ण भरलीं." याप्रमाणें निष्ठुर भाषण ऐकून विश्वासराव यांसी असें जाहलें की, अंगावर कडा कोसळला; कीं मस्तकीं वीज[१५४] पडली. असा प्रकार होऊन अधोवदन तटस्थ राहिले. मर्यादेची सीमा उल्लंघून[१५५] गेली. ते समयीं **जनकोजी शिंदे** यांणीं उत्तर केलें कीं, "**भाऊसाहेब**, तुम्हीं आपले चितांत अंदेशा काय आणिला ? अशा समयास वडिलांस न लिहावें तर शत्रूस लिहावें कीं काय ?" हें ऐकून मागती **भाऊंनीं** उत्तर केलें कीं, "दैव असेल तसें होईल. अतःपर तुम्हीं पत्र लिहिण्याचे वाटेस न जावें." म्हणोन साफ साफ[१५६] सांगितलें. यांणींहि मान्य केलें. पायांवर हात ठेविला कीं, "या उपर आम्ही पत्र लिहिणार नाहीं."

---

१४६. 'आम्हांसारिखे तुम्हांस' सा. १९२२.

१४७. या शब्दापूर्वी 'आहेत व आणखीहि' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत. 'बंधु' हा शब्द भा. इ. सं. मध्यें नाहीं.

१४८. हा शब्द भा. इ. सं. त आहे; सा. १९२२ त नाहीं.

१४९. यापूर्वी 'कर्णोपकर्णी' हा शब्द सा. १९२२ त अधिक आहे.

१५०. 'बसून' भा. इ. सं. 'बोलावून' सा. व शें.

१५१. 'निभावणें' सा. १९२२.

१५२. 'येथून' भा. इ. सं.

१५३. या शब्दापूर्वी 'आजच' हा शब्द भा. मध्यें अधिक.

१५४. 'विद्युल्लता' सा. १९२२.

१५५. 'उल्लंघेनाशी जाली' सा. १९२२ व स. ग. जो.

१५६. हा दुसरा 'साफ' भा. इ. सं. मधील.

प्रकरण १३ वें

बुंदेले व मेहेंदळे यांचा शेवट व मराठ्यांची हलाखी

११६. दिवसेंदिवस[१] गनीम जेरीस येत चालिला आणि शत्रू भर घेत चालिले[२]. जामदारखान्यांत पैका[३] अगदीं नाहींसा जाला. **गोविंदपंत बुंदेले** पैका[४] आणावयास गेले.[५] तेथें तिकडेच **बुंदेलखंडावर** राहिले. सबब[६] त्यांजवर दहा हजार रोा मसाला करून ढालाईत[७] रवाना केला. नंतर **गोविंदपंत बुंदेले** वीस लक्ष रुपये घेऊन **दिल्लीस** आले. तो खजिना त्यांनीं दिल्लीस ठेविला. लष्करांत पैसा पोंचेना.[८] सर्व यत्न राहिला. लष्करांत[९] धारण पांच शेर जाहली. मग **भाऊसाहेब** यांणीं विचार केला कीं, "**अंतरवेद** प्रांतीं फौज[१०] पाठवावी. **भागीरथीचे** पुलावरून दुराणी[११] रसद आणील[११] ती मना करावी." म्हणोन मनसुबा करून **गोविंदपंत बुंदेले** व **रामाजीपंत** (पाराजीपंत) **वाघ** यांसी हातरोखा[१२] वरचेवर पा. अति आग्रहें **अंतरवेदींत** घालविलें. **गोविंदपंत** यांची आयुष्याची सीमा जाहाली म्हणोन त्यांस तैशीच बुद्धि निर्माण जाहली. तारखी[१३]—पारखीनें संभाळून आज ताा होता तसें असावें तें न होतां मुकाम करीत खंडण्या घेत चालिल्यावर[१४] **जैता गुजर** यांणें इक-

---

१. 'असो, या प्रकारें' हे शब्द परिच्छेदाचे प्रारंभीं सा. १९२२त आहेत.

२. याबद्दल "आणि शत्रूची प्रबलता त्यास धान्याचे वगैरे महामुरीमुळें होत चालली" क. प्र.

३. 'पैसा कुल खालीं जाला' सा. १९२२. 'रुपये फारिक' तुं. प्रत.

४. 'खजिना' सा. १९२२

५. 'पाठविले होते' सा. १९२२.

६. याबद्दल "त्यांणीं कांहीं दिवसगत लाविली. म्हणोन त्यांजवर कोपायमान होऊन" सा. १९२२.

७. 'डाकेंत' भाइसं.

८. पाठविला नाहीं' भाइसं.

९. याबद्दल 'रुपयांचा तोटा आणि' हे शब्द सा. १९२२.

१०. 'फौजा पाठवून' सा. १९२२.

११. 'दुराणीस रस्त येती' सा. १९२२. 'आणील' बद्दल 'आणतील' शें. व भा.

१२. 'हातचिठ्या पाठविल्या कीं तुम्हीं फौजसुद्धां अंतरवेदप्रांतीं जाऊन दुराणी वगैरे यांचे लष्करांत भागीरथीचे पुलावरून रस्त आणितात ती बंद करावी, असें लिहिलें असतां तें लक्ष न ठेवितां त्यास बुद्धी, पुढें होणार तशी वासना होती' हीं वाक्यें क. प्रतींत अधिक आहेत.

१३. 'तार्कीकेनीं' संधानें' भाइसं.

१४. 'चालिले' सा. १९२२. या पुढें "जयंता गुजर होता त्याजवरहि खंडणीची जिकीर चालविली. त्याणें रोहिले व दुराणी यांजकडे सूत्र लावून बुंदेले खंडणीचे नादीं गुंतविले." सां. व क. प्रती.

डील[१५] सूत्र ठीक करून **गोविंदपंत** यासी खंडणीचे नादीं लावून गोंविलें. तों **नजीबखान** रोहिला याचा सासरा[१६] **दुंदेखान रोहिला** व **उमरावगीर गोसावी** यांस **सुजातदौला** याजकडील व **आमदखान** लंगडा[१७] यासुधा पंधरा हजार फौज निवड करून **गोविंदपंत बुंदेले** यांजवर पोा. अविधांनीं मोंगलाई मसलत करून, **होळकरांचीं** निशाणें लावून गेले. तों **गोविंदपंत बुंदेले** यांणीं दुरून पाहिलें. फौजेची गडबड जाली. जीनबंदी लोकांनीं केली. तों जात्या आपण उठेनात.[१८] लोकांस म्हणों लागले कीं,"**नारो**[१८अ] **शंकर** याची फौज आली. निशाणें त्याचींच आहेत." असें म्हणतात तों ते जवळ बंध[१९] बांधून येकायेकींच यांजवर अविधांनीं घोडीं घातलीं. ते समयीं **गोविंदपंत** यांणीं गडबड करोन पळों लागले. तों ते सरमिसळ[२०] जाहाले. **गोविंदपंत** यांस घोड्यावर बसावयाचा अवकाश[२१] थोडा[२२] होता. कोस अर्धाकोस पळाले तों **गोविंदपंत** घोड्यावरून खालीं आले. त्यावेळेस कांहीं[२३] मातबर माणसें होतीं त्यांणीं[२४] घोडियावरून उडचा टाकून **गोविंदपंतास**[२५] घोड्यावर घातलें. तेथून[२६] पुढें आणखी कोसपर्यंत संभाळून[२७] नेलें. तों त्यांची दाटी भारी[२८] जाली. तमाम शीर कापीत सुटले. त्यावेळेस मागती **गोविंदपंत** घोड्यावरून खालीं आले[२९] तेव्हां पाय मोडला.[३०] उठावयाची हिंमत राहिली.[३१] लोकांस उडी टाकून काढावयाचें अवसान पुरेनासें जाहलें व त्याचा पुत्र होता तो टाकून गेला. तेथें दुसरियांवर शब्द कशास ठेवावा? त्यावेळेस त्यास **गोविंदपंत** पाडाव सांपडले. त्याच्या[३२] व खाशांच्या गांठी पडल्या. त्यास **गोविंदपंत** अजीज[३३] होऊन बहुत काकुळती येऊन "मजला प्राण-दान देणें; क्रोड रुपये देतों." म्हणोन बोलिला. तेव्हां ते काळ[३४]दत्य त्यांस करुणा कैची?

याबद्दल पृ. ६४ व परिच्छेद ६०

१५ 'तिकडील' सा. १९२२.

१६. यापुढें 'व' हा शब्द सा. १९२२ आहे.

१७. यापुढें 'याचा भाऊ' हे शब्द सा. १९२२ त अधिक.

१८. या शब्दापूर्वी 'ते' हा शब्द सा. १९२२ त अधिक.

१८अ. 'निसबत होळकर' क. व सां. प्रती.

१९. 'दम' सा. १९२२.

२०. या शब्दापुढें 'यांतच' हा शब्द सा. १९२२ त अधिक.

२१. 'सराव' सा. १९२२.

२२. 'थोडकाच' सा. १९२२.

२३. 'कोणी' सा. १९२२.

२४. या शब्दापूर्वी 'दम बांधोन' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

२५. हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

२६. हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

२७. 'सांभाळीत गेले' सा. १९२२.

२८. 'फार' भाइसं.

२९. या पुढें 'निरुपाय जाहाला.' हे शब्द सगजो. मध्यें अधिक.

३०. 'जाया जाला' सा. १९२२.

३१. 'हरली' सा. १९२२.

३२. हे शब्द सा. १९२२ त नाहींत.

३३. 'आजीत' भाइसं. 'आजीज' सा. १९२२.

३४. 'केवळ दैत्य' सा. १९२२.

तात्काळ सिरच्छेद करून धड तेथेंच ठेविलें आणि शीर घऊन गेले. ते समयीं दीड हजार फौजेचीं[३५] शिरें कापिलीं. 'मुरगी[३६] मारी बचडे[३७] दाणादाण' होतात तसें जिकडील तिकडे पळाले. मग त्यांणीं **गोविंदपंताचें** शीर घेऊन आपले फौजेंत आले. **नजीबखान**[३८] रोहिला यांणें शीर पाहून परम[३९] संतोष पाऊन रुमालांत शीर घेऊन **आबदल अलीस** नजर केलें. याप्रमाणें **गोविंदपंत**[४०] कामास आले.[४०]

११७. इकडे **भाऊसाहेब** यांजकडील वर्तमान तर लष्करांत[४१] केवळ[४२] महागाई जाहाली. भोंवताले गिलजे फिरूं लागले. दाणापाणियाची रसद फौजेंत पोंचेनाशी जाहाली आणि जामदारखान्यांतील खजीना झाडून[४३] उडाला. "अन दुष्काळ व दाम दुष्काळ" दोन्ही एक[४४] जाले. मनुष्यास अन्नाचें खोबरें जालें. दिवसामध्यें अर्ध पाव[४५] अन्न मिळेनासें झाले[४६]. तेथें हत्ती घोडे यांचा विचार काय पहावा? लष्कर केवळ जेरीस आलें. घोडेमनुष्यांची हिंमत हरली. तमाम फौजेंत निरवानिरव बोलूं लागले. कोणास जगून जाऊं असा भरंवसा नाहींसा जाहाला. ते समयीं **भाऊसाहेब** यांणीं प्राणान्त समय जाणोन आपले जागीं विस्मय करिते जाले कीं, "आम्ही गनीम. मोगलांचें अन्नपाणी बंद करावें, तें न करतां आमचाच आटा बंद जाहला. तेव्हां सर्व उपाय राहिला. देशीहून कोणी कुमक करावी ही आशा[४७] राहिली नाहीं. समागमें मुलें माणसें आणिलीं एवढें वाईट केलें. असो. 'आपण[४८] मेलों आणि जग बुडालें.' 'ज्याचे दैवीं असेल तसें घडेल' म्हणोन मनांतच[४९] विचार करूं लागले. पण बाहेर व्यंगोक्ति[५०] शब्द बोलेनात. सोनियाचीं कडीं व रुप्याची चीजवस्तू होती तितकी निवडून[५१] टांकसाळचापासून[५२] **भाऊशाही** व **मल्हारशाही** व

---

३५. 'मराठियांची' सा. १९२२ व भा. 'मराठे लोक यांची' मं. व सगजो.

३६. 'मुळारंभीं मारल्यावर' भाइसं. 'मुरगी मारी' शें. व भा.

३७. 'बच्चे' शें.

३८. 'खान रोहिला' सा, १९२२, 'नजीबखान रोहिला' सा. १८७९ व १८८६ व भाइसं.

३९. हा शब्द भाइसं.मध्यें नाहीं.

४०. 'मित्रत्व गोविंदपंत यांचे कामास आलें' सा. १९२२ मित्रत्व शब्दावरील व्याजोक्ति मागें पृष्ठ व परिच्छेद पहा.

४१. 'गिलच्याचे परिवेष्टनामुळें' असें येथें क. प्र. म्हणते.

४२. हा शब्द सगजो. मधील.

४३. 'कुल खालीं जाला' सा. १९२२.

४४. 'दोन्हींस ऐक्य जालें' सा. १९२२.

४५. 'अर्ध पोटी मिळेनाशी जाहाली' पु. 'दिवसापोटीं निमें अन्न' शें. प्रत.

४६. 'होऊं लागली' सा. १९२२ व सगजो.

४७. 'आस्था' सा. १९२२ व सगजो.

४८. 'आप मेला जग बुडाला' सा. १९२२.

४९. 'मनास चढ उतार करूं लागले' सा. १९२२

५०. 'येक युक्ती' भाइसं.

५१. 'मोडून' सा. १९२२.

५२. 'एक टंकशाळा घालून' सा. १९२२ 'साळ' तुं. प्र.; 'मोडून आटणी घालून' सां. प्रत.

जनकशाही तमाम मोहरा व रुपये केले. तरी पैसा पुरेना.[५३] महासंकट.[५४] लमाणाची[५५] खेप आली तरी पांच साहा[५६] शेर धारण; जो आधीं जाईल त्यास मात्र मिळत होती. नाहीं तरी पैसा पदरीं असोन दाणा मिळेनासा जाला. ते समयीं जाट समागमें असता तर अन्नपाण्याची कमती न पडती. **दिल्लींत** खजिना सरकारचा व **शिंदे-होळकर** यांचा चाळीस लक्ष रुपये रोकड व शिवाय कापड होतें[५७]; परंतु लष्करांत पोंचेना.

११८. ते समयीं **गोविंदपंत बुंदेले** यांचा पुत्र व[५८] **पाराजी वाघ** आसे भग्न **फौज** घेऊन **दिल्लींत** होते. त्यांस भाऊंनीं रागास येऊन आसें[५९] पत्र[६०] लिहिलें कीं, "खजिना घेऊन येणें." त्यावरून पाराजीपंत[६१] दीड हजार घोडयांवर खांसी मनुष्य निवड करून घोडयावर पांचशें[६२] रुपयांचें वोझें घालून सूर्यास्ताचे समयीं निघाले. ते कडनिकड करून कचे चालीस कोस भूमी[६३] चार घटका रात्र आहे तों लष्करापासोन दोन कोसांवर दाखल जहाले. तेच दिवशीं दुराणीचे फौजेपैकीं कांहीं[६४] फौज यमुनातीर[६५] सोडून दिल्लीचे रस्त्यावर येऊन राहिली होती.[६६] हें वर्तमान पाराजीपंत यास ठाऊक नव्हतें. येण्याजाण्यास अनभ्यासी होते. यासी लष्करानजीक येतांच आसें भासलें कीं, लष्करानजीक पोंचलों. म्हणोन आपण[६७] दूर उभा राहून गोठ कोणाचा म्हणोन[६८] पुसावयास पाठविलें.[६९] तो गोठ **सुजा-उद्दौला** याचा होता. 'कोणाचा गोठ' म्हणून विचारतांच[७०] त्यांणीं[६९] कृत्रिमपणें

५३. 'पुरेनासा जाला' सा. १९२२.

५४. हा शब्द सा. १९२२ त नाहीं भाइसं. मध्यें आहे.

५५. यापूर्वी 'मोठचा संकटें' हे शब्द सा. १९२२ त आहेत.

५६. 'सात' सा. १९२२.

५७. येथें कल्याण प्रत म्हणते "सरकारचे व शिंदे होळकर यांचे कोटचावधि रुपये रोख होते; परंतु लष्करांत कसे पोंचतात ?

५८. हा शब्द शें. व सा. प्रतींतील.

५९. हा शब्द भाइसं. मधील.

६०. 'पत्रें लिहिलीं' सा. १९२२.

६१. 'पाराजीपंत यांणीं' सा. १९२२ 'पाराजीपंत वाघ' सगजो. व मंडळ.

६२. 'हजार' सां. प्रत.

६३. 'भूई' सा. १९२२, 'भोई' असा तु. प्रतीचा पाठ जेथें तेथें असतो.

६४. हा शब्द मं. व शें. प्रतींतील.

६५. 'जागा' सा. १९२२ 'यमुना' तुं. 'फौजेची एक टोळी यमुना' सां. व क. प्रत

६६. यापुढें क. प्रत म्हणते "इकडून दिल्लीकडून पाराजीपंत खजिना घेऊन येत होते. त्यांपैकीं बाराशें स्वार नीट मार्गानें आले. ते दुराणी जेथें उतरले होते त्या स्थळीं येऊन दाखल जाहाले. खजीना घेऊन स्वार आलेले त्यांस असें भासलें कीं, आमचेंच लष्कर आहे आणि चाळीस कोसांची मजल काढून थकोन उभे राहिले."

६७. हे शब्द सगजो.

६८. हे शब्द सा. १९२२ मधील.

६९. हा शब्द शें. प्रत.

७०. 'लबाडी करून' तुं. व स. ग. जो.

सांगितलें कीं, "**इभ्रामखान गाडदी** याचा गोठ." असें ऐकतांच लोक [यांचे] केवळ[७१] थंडीनें हातपाय आंखडले होते. हिमाचलानजीक हींव भारी. पाणी गोठतें तेथें वरकड गोष्टी काय[७२] सांगाव्या[७२]! माळाचे नजीक.[७३] यास्तव भय याचे चितीं जरी होतें आणि **रामाजीपंतास** (पाराजीपंतास) बातमी सांगत आले कीं, '**इभ्रामखान गाडदी** याचा गोठ' असें म्हणतात तेव्हां निश्चयपणें आले. थंडीमुळें आगटीजवळ घोडीं उभीं केलीं. परवानगीकरितां[७४] नांवनिसी व ठिकाण सांगितला. त्यांणी परवानगी आणितो[७४] म्हणून नादीं लावून उभे केलें. **पाराजीपंत** व दोनतीनशें[७५] स्वार मागें राहिले होते. बाराशें स्वार गेला होता. त्यांजपैकीं एकासहि सोडिलें नाहीं. तमाम घोडीं व खजिना घेऊन सिरें कापिलीं. ब्रातमी सांगावयास कोणी राहिला नाहीं. वरकड दोनतीनशें स्वार व **पाराजीपंत** रात्रीचे समयीं रस्ता चुकून आडवाटेनें गेले ते मात्र जाऊन आपले लश्करांत दाखल जाहले.

११९. नंतर तेच दिवसाचे कचेरीस **सिंदे, होळकर** व **दमाजी गायकवाड** व आणखीहि सरदार थोर थोर होते, तों **बलवंतराव गणपत** यांणीं **सिंदे, होलकर** यांसी आरोप ठेऊन कुरापत[७६] काढिली, आणि बोलिले कीं, "**सिंदे-होलकर** चढते[७६] सरदार असतां त्यांची केवळ हिंमत हरली. वोझें[७७] घेऊन वीस कोस माणूस

७१. हे शब्द स.ग.जो. मधील. 'थकून होते. पाय अडखळले होते' भाइसं. 'केवळ थकले होते' शें. 'थंडीने' हा शब्द 'थकून. च्या पूर्वी सा. १९२२ त अधिक.

'गारठतें होतें' तुं. 'गोठतें' सा. १९२२

७२. या पुढें सा. १९२२ त व सगजोंत खालील वाक्यें अधिक आहेत :— "त्यांतही सावध पुरुष होते त्यांनीं दम राखोन [ते] दूर उभे राहिले. गुडगुडीचे तलबी होते त्यांणीं शेंपन्नास लोकांना घोड्यावरून उतरून हातांत गुडगुड्या घेऊन त्यांचे गोठांत शिरले. तो एकदांच 'लेव ! लेव !' म्हणून पुकार जाहाला. जे घोडियावर सावध होते, ते निघोन गेले आणि तलबे गुडगुडीचे होते ते त्यांजकडे तमाम हस्तगत जाहाले. त्यांत यांणीं एकास सोडिलें नाहीं."

७३. 'मालच' शें.

७४. अ. 'कुशब्द बोलते जाहले' सगजो.

७५. 'हजार नऊशें' सा. १८७९ व १८८६ व पुणें प्रत.

याबद्दल सा. १९२२ त पुढील वाक्यें आहेत :—"आडवाटेनें लष्करांत जाऊन पोहोंचले. बाराशें स्वारांचा ठिकाण पाडितात तों बातमी कळली कीं तें त्यांचे कवेंत सांपडोन त्यांचें मुंडमोचन करून खजिना लुटून घेतला." पण हा भाग सा. १८७९ व १८८६ त नाहीं. क. प्रतींतील वाक्यें :—"पाराजीपंत तीनशेंहे स्वारानिसी होते ते रात्रींच्या ठायीं रस्ता चुकोन आडमार्गे गेले होते ते मात्र आपले लष्करांत जाऊन पोहोंचले."

७६. 'लढते' सा. १९२२ 'एवढे एवढे' पुणें प्र.

७७. 'वेजीं उतरलियाची गत दिसोन आली' सा. १८७९, १८८६ व सा. १९२२.

चालून थकून बसतें ती गत होऊन बसले.[७७] कारण आम्हीं हिंदुस्थानांत आलों, याअर्थीं ध्यानांत आणिनात आसें दिसोन आलें." याप्रमाणें दुरोक्ति शब्द बोलिले. तें **मल्हारराव** यांणीं हास्यविनोदावर टाकून[७८] नेलें. तों **जनकोजी सिंदे** यांस गोष्ट साहिली नाहीं. "**भाऊसाहेब** जवळ असतां तुम्ही आसा जाबसाल केला. **बलवंतराव** तुम्हीं काय पाहिलें ? आमची हिंमत हरली; परंतु तुम्हीं दिग्विजय कोठें केला ? असो. तुम्हांस आमचा तमाशा पाहाणें तरी आम्ही उदयीक युद्ध करितों." [असा] इरेचा[७९] जाबसाल करून तेच समयीं रागानें मुजरे करून उठोन चालिले. **भाऊसाहेब** यांणीं स्नेहानें[८०] बोलून[८०] पाहिलें. तों " मुजरा जाहाला. आतां बसावयाचें नाहीं." म्हणोन गेले. विचार करितां[८०अ] सिंदे यास विषाद[८०आ] येऊन डेऱ्यास गेले, हें समजलें. **सिंदे** यांणीं आपले फौजेंतील तमाम सरदार बोलावून आणून सांगितलें कीं,[८१] " आतां[८२] दताजी सिंदे याचा मजकूर तोच आमचा. **बलवंतराव गणपत** कुरापतीनें बोलतो.[८२] जिती (दी) चा मार आहे. मारतां मारतां मरावें, हें उतम; परंतु वारंवार भग्न फौज घेऊन जाणें[८३] आणि ब्राह्मणानें बोलणें[८३] हें मूर्खपण!" म्हणोन आपली फौज सावध करून पहांटेची[८४] चार घटिका रात्र आहे तों नगारा करून[८५] जेवणें खाणें उरकून सिध होऊन दिवस उगवावयास खंदक सोडून बाहेर गेले आणि **मल्हारराव** यांस सांगून पाठविलें कीं, " तुम्हीं फौज सिध करून बाहेर निघावें. " तों **मल्हारराव** यांसी **भाऊसाहेबांनीं** ताकीद केली होती कीं' "**जनकोजी सिंदे** मूल आहेत. त्यांणीं उतावळी केली. तरी त्यास तुम्हीं माकुलपण सांगून पाहावें आणि तुम्हीं न जावें." असें सांगितलें होतें. त्याजवरून त्यास[८६] 'आडविहीर जाली.' आपण जावें तरी **भाऊसाहेब** रागास येतील न जावें तर पांढरे केंसांस बोल लागतो." आसें सांगोन खासा आपण राहून, **संताजी वाघ व बुंदेले व भोजराव**[८७] **कदम** बारगीर[८८] असे पांचसात हजार फौज तयार करून एका

---

७८. 'टाळून नेले' पु. प्रत.
'टाकून नेलें' भाइसं. प्रत.

७९. 'जिदेचा' सा. १९२२ 'ईरेचा' क. प्रत.

८०. 'होकारून' सा. १९२२. 'बोलावूं पाठविलें' धो. प्रत.

८०–अ–पाहतां, शें. भा. व मं.

८०–आ. 'रागें रागें संतप्त होऊन' सगजो. 'विषाद प्राप्त होऊन' शें.

८१. यापुढें "यार हो" हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

८२. हीं वाक्यें सा. १९२२ त नाहींत.

८३. 'घेऊन जाऊन ब्राह्मणाकडून बोलून घेणें' सां. व क. प्रती 'ब्राह्मणानें' हा शब्द सगजोंत नाहीं.

८४. 'प्रातकाळीं' सा. १९२२.

८५. 'दिवस उगवतांच' हे शब्द 'नगारा करून' या शब्दापुढें स.ग.जो. मध्यें.

८६. यापुढें 'संकट प्राप्त जाहालें' सा. १९२२ त अधिक परंतु सा. १८७९, १८८६ त नाहीं.

८७. 'भानराव' सा. १८७९. 'भोपराव' सगजो. 'जानराव' मं.

८८. बारगल सा. १९२२.

बाजूस उभे केले. हें वर्तमान भाऊसाहेब यांणीं ऐकून **बलवंतराव** यास आज्ञा केली कीं, "हुजरातीची फौज सिद्ध करून, **जनकोजी सिंदे** यांची कुमक करवावी.* सिंदे यांचे वडील आमचे सेवेसीं कामास आले. तो वंश एवढाच राहिला आहे. तोहि तुम्हीं वचनानें पोळून इरेस घातला. हें उतम केलें[८९] नाहीं. सत्त्वर कुमक करणें." म्हणोन आज्ञा करून **बलवंतराव गणपत** यास तयार करून वाटेस लाविला[९०].

१२०. इकडे हें वर्तमान मोगलांस[९१] कळतांच **नजीबखान** रोहिला **आमदखान** लंगडा पठाण व **सुजायतदौला** याजकडील फौज व कांहीं दुराणीकडील फौज निवड करून सिध होऊन समागमें दहा-पंधरा तोफा घेऊन आपली फौज सोडून एका अंगास[९२] जावें याप्रमाणें बाहेर आले. उभयतां दलें सन्मुख द्रष्टीस पडों लागलीं. दुरून तोफांचा व बाणांचा मार होऊं लागला. तिसरे प्रहरपर्यंत मार जाहला. तों **संताजी वाघ** वगैरे **होलकरां**कडील यांणीं गलिमी काव्यानें त्यांजवर तुटले.[९३] हुतुतूची[९३] एक घाई एक घटका[९४] जाहाली. तों त्याचे पाठीवर **रोहिले** व **दुराणी** एकदांच[९५] उठले.[९६] ते समयीं **संताजी वाघ** यांणीं आपले बाजूस निघावें परंतु त्यांस दम पुरला नाहीं. **सिंदे** यांच्या फौजेचे आश्रयास[९७] आले. तों **दुराणी** व **रोहिला** यांचे फौजेवर आदळले. तों **जनकोजी सिंदे** आधींच इरेस पडले होते. ते समयीं त्यांणीं आपला नेम, फौजेआधीं उठून हाणावें, 'उष्टें झुंज[९८] शवतुल्य,' आसा मारा होतो. त्याप्रमाणें[९९] तो सर्वत्रांचें अनुमत सोडून[१००] फौजेचे पाठीवर खासा आपण व तमाम लबेचे खिजमतगार व जासूद व चोपदार व भालेदार[१०१] व कारकून यांणीं हातांत काठचा घेऊन **होलकरांची**[१०२] फौज हांकून लाविली. उभयतां

---

* . 'करावी' सा. १९२२.

८९. 'झालें नाहीं' भाइसं.

९०. हें भाऊंचें बोलणें व करणें तुंगार प्रतींत नाहीं.

९१. 'मोंगलास' हा शब्द शें. सा. व भा. मधील आहे. भाइसं. मध्यें नाहीं.

९२. 'एकांगीस' सा. १९२२ 'एकांतीस' तुं. 'एका अंगास' क. धो. व भाइसं.

९३. 'उठले' सा. १९२२. 'उठून हुडुडीची' सगजो.

९४. हे शब्द शें. व भा.

९५. 'बेलाशक' सा. १९२२ व सगजो.

९६. 'तुटले' भा.

९७. हा शब्द सगजो. मं. सा. व भा. 'आसपास' भाइसं.

९८. 'झुंजास शिवूं नये' सा. १९२२ व सगजो.

९९. हा शब्द शें. ग्रतींत.

१००. यापुढें सांगली प्रत म्हणते "होळकर यांचे व दुराणी यांचे फौजेमध्यें आपण खुद्द शिंदे हे जाऊन होळकर यांची फौज एकीकडे काढविली. तेव्हां शिंदे यांची फौज व दुराणीची फौज एकमेकांवर आदळली."

१०१. हा शब्द सगजो. मधील.

१०२. हा शब्द सगजो., पु. व तुं. प्रतींत नाहीं.

दळें एकमेकांस आदळलीं. वरकड रिसाले यांचा मार राहिला, आणि तरवारीची खणाखणी जाहाली. ती सायंकाळचा एक प्रहर दिवसपर्यंत हातघाई सिंदे होलकर व दुराणीची होत होती. जैसें पूर्वी रामायणीं राक्षस व वानर[१०३] लढले किंवा भारतीं[१०४] कौरव-पांडव[१०५] लढले या प्रमाणें लढाई[१०६] जाहाली. गनिमाचे फौजेंत कजाले[१०७] लोकांनीं तोंडें माघारीं केलीं असतां जासूद व भालदार काठ्या मारीत. लोकांस एकीकडे आड व एकीकडे विहीर आसा प्रकार जाहाला. लोकांस लेजेदे[१०८] दान लेजेदे प्राण[१०८] आसें जालें. 'दोन्ही दळें हटेनात. उभयतां दोन्ही दळांमध्यें अंतर दहा-बारा[१०९] हातांचें. त्यास ज्यास हिंमत त्याणें हटकून उठोन हाणावें, असें परस्परें हटकून मारूं लागले. मोगलांकडील विशेषात्कार[११०] मानावा[१११] तरी त्याचा सहजच स्वभाव. ते असुरच; परंतु मराठे यांची तें दिवशीं शर्थ जाहली.[११२] ते समयीं **बलवंतराव** यांणीं कुमक केली असती तरी **दुराणीचा**[११३] पराभव करून लुटूनच टाकिलें असतें; परंतु **बलवंतराव** याचे चित्तांत मनसुबा कीं, "**सिंदे होलकर** याचे फौजेनें धास्ती खाली आहे, **दुराणी**पुढें दम निघणार नाहीं,[११४] हे माघारे पलोन गेले म्हणजे आपण उठावें.[११४]" ही खातरजमा चितांत आणून आपले जाग्यावर तमाशा पाहात उभे राहिले होते[११५]. ते दिवशीं **सिंदे** केवळ इरेस पडोन रण सोडून माघारें हटेनात. सायंकाळ जाहाला. मशाला लागल्या. तेव्हां **सिंदे** यांणीं एकवेळ 'हरहर' म्हणून एकदांच उठावणी करून फौज गुरानें रेटावें*

---

१०३. 'व वानर' हे शब्द शें. व सा. मधील.

१०४ यापुढें 'राजे' हा शब्द शें. त अधिक आहे.

१०५. या पुढें 'सैन्य' हा शब्द सा. १९२२ व सगजो.

१०६. 'समारंभ' सगजो. व सा. १९२२

१०७. 'भले' सा. १९२२. गनिमाचे फौजेंत कजाले' हे शब्द भाइसं. मध्यें नसून सा. व सगजोमध्यें आहेत.

१०८. 'लजा' शें. लज्या' भाइसं. 'लजा प्राप्त होऊन' भा. हे सर्व शब्द सा. सगजो व भा. मध्यें आहेत.

१०९. पंचवीस' क. व सां, 'थोडें' सगजो.

११०. 'विशेष चमत्कार' सा. १९२२

१११. 'वर्णावा' सा. १९२२.

११२. केली सा. १९२२ वसगजो. या शब्दापुढें तों सायंकाळ होत आला' हे शब्द सा. १९२२ व सगजो. त अधिक आहेत.

११३. 'ताम्राचा' सा. १९२२

११४. हें वाक्य भाइसं. मधील. सा. १९२२ त नाहीं.

११५. या पुढें 'माघारा सारून' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

* 'फौजेनें रेटोन समोर मार देत' मं. प्रत, 'फौजेनें उतार व्हावें तसा मार देत देत' सगजो.

तसा मार देत देत[११६] त्याचे गोटांत नेऊन घातलें. त्याचे गोटाचा खंदक होता तेथपर्यंत घालवून तोफा देखील सोडविल्या. दोनचार ओढून आणिल्या. तोफेचे बैल घेऊन गेले होते; तोफा भारी; माणसांस ओढेनात. माणसें पायचीं सिंदे यांचीं. थोडी रात्र अपरात्र जाली. माणसास माणूस ओळखीनात. ते समयीं चार तोफा आणिल्या. वरकड तोफांत खिळे मारिले,[११७] व कणे मोडिले. मग **जनकोजी** सिंदे प्रहर रात्रीस माघारे फौजसुद्धां फिरले. पांच-सातशें मनुष्यें ठार पडलीं. व कितेक जखमी जाहलीं. घोडीं सिंदे यांचीं सात आठशें पडलीं. व दुराणीचीं हजार-बाराशें घोडीं पाडाव करून आणिलीं. ते दिवशीं दुराणी यांचें[११८] हजार मनुष्य पडलें, आणि खितीस राहिलें. तें मनुष्य आणावयास अवसान राहिलें नाहीं. तसेंच जखमी बहूत जाहलें. याप्रमाणें यश पावलें.

१२१. जनकोजी[११९] शाहादानें वाजवीत आपले[१२०] गोटास चालिले.[१२१] तों **भाऊसाहेब** आडवे आले.[१२२] तों **बलवंतरावहि** येऊन पोहचले. **जनकोजी सिंदे** यांजकडे **बलवंतराव** आले. तें समयीं **सिंदे** यांस क्रोध[१२३] येऊन गालिप्रदानें केलीं

११६. यापुढें सा. १९२२ त खालील वाक्यें अधिक आहेत:—"ही फौज नामोहरम जालियावर* आपण पुढें घोडे घालून मारामार करावी, या अर्थें दम खाऊन राहिले" यापुढें* कल्याण प्रतींत पुढील मजकूर अधिक आहे:—"आपण त्याजवर उठावणी करून त्यांचा पराभव करून यश मिळवावें आणि खावंदाजवळ सर्फराज व्हावें म्हणोन मनांतील धर्म. परंतु मनसा चिंतयेत् कार्यं दैवमन्यच्च चिंतयेत् तसा प्रकार जाहाला. शिंदे यांणीं बलवंतराव यास भर कचेरीस बोलले होते कीं उदयीक आम्हीं युद्ध करतों; तमाशा आमचा पाहावा. तों बलवंतराव यास दाखवन नखरा उतरोन टाकिला."

११७. 'तमाम लष्कर याचा कल्होळ होऊन तमाम बुणगे पळों लागले' हें वाक्य यापुढें धो. प्रतींत अधिक.

११८. याचें या शब्दापुढें "सुध्धां [दैव] फिरलें" हे शब्द शें. प्रतींत आहेत.

११९. यापूर्वी "याप्रमाणें धौशा गाजवून" हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

१२०. 'आपले' हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

१२१. यापुढें "ही बातमी क्षणक्षणां भाऊसाहेब यांजकडे खेळतच होती. तेव्हां खांसा स्वारी" हे शब्द सा. १९२२ मध्यें आहेत, परंतु सा. १८७९–८६ त नाहींत.

१२२. यापुढें सां. व क. प्रती म्हणतात—"मोठे सन्मानें करून सिंदे यांस डेऱ्यास आणिलें. ++ तुम्ही शिंदे यांच्या वंशांत येऊन कुळाचा उद्धार केला. असें बहूत प्रकारें बोलून शिंदे यांचा गौरव केला."

१२३. "क्रोधाचा आवेश" सा. १९२२.

कीं, "तुमचे चितांत आमची फजिती व्हावी असें होतें. परंतु ईश्वरास[१२४] साहिलें नाहीं. आम्ही[१२५] सेवेसीं चोर असतों तरी ईश्वर आम्हांस यश न देता. कौतुक[१२६] तुमचे दृष्टीस न[१२७] पडतें." म्हणोन बोलतांच **भाऊसाहेबांनीं** चार गोष्टी समाधानाच्या[१२८] समजावून[१२९] सांगून शांत केलें.[१३०] घालवीत डेऱ्यापावेतों आले. समाधान करून **भाऊसाहेब** आपल्या डेऱ्यास आले. **जनकोजी सिंदे** यांजकडील भले मनुष्य पडले[१३१]. त्याच्या गोरकफनें मूठमातीचें[१३२] साहित्य करून त्यांचीं सार्थकें केलीं. तों **बलवंतराव गणपत** यास वाईट भासलें[१३३] कीं, "गोष्ट आपणाकडे आली. आमचा घात आम्हीं करून घेतला. आम्ही बोलावयास[१३४] गेलों येक आणि घडलें येक" असें अवघड मानून उगेच[१३५] राहिले. इकडे **दुराणी सुजातदौला व पठाण** हे झुंज झाल्यावर सिकस्त[१३६] जाहाले. आणि आपले जागा दगावले.[१३७] रात्रीं फौजेंत लुटालूट[१३८] जाहाली. एकाचें ओझें येकास आलें. त्यांत [मराठ्यांनीं] कूच केलें असतें तरी दुराणीस पाठी[१३९] लागावयाचें सामर्थ्य नव्हतें. आणि[१४०] दुराणीचें लष्करहि लुटून दुराणी व रोहिला धरले गेले असते; परंतु पुढील होणार भवितव्य. म्हणोन[१४१] **सिंदे** यांची कुमक जाहाली नाहीं. येकटयावरच भार पडला. याजमुळें **दुराणी व गिलजे**[१४१] मागतीं[१४२] दम खाऊन आपले ठिकाणास माघारे येऊन उतरले.[१४२]

---

१२४. "ईश्वर सत्ता प्रमाण" सा. १९२२.

१२५. "सेवेसीं चोर नव्हत" हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

१२६. 'केवळ' पुणें प्रत.

१२७. 'न' हा शब्द सगजो. मधील.

१२८. हा शब्द सगजो. मधील. सा. १९२२ त नाहीं.

१२९. हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

१३०. 'शांतवन' सा. १९२२.

१३१. 'ठार पडले होते' सा. १९२२

१३२. 'गोरकपणेंचीं' सा. १९२२ 'गार खणून' भा.

१३३. 'वाटलें' सा. १९२२ 'भासलें. तुं. प्रत.

१३४. 'करावयास' सा. १९२२. × यापुढें 'जाहालें' हा शब्द शें.त अधिक आहे.

१३५. 'स्तब्ध' सा. १९२२.

१३६. 'शिकस्त खादली होती' सा. १९२२ व सगजो.

१३७. 'मोगल दगावले होते' सा. १९२२, सां. व क. प्रती "त्यांचे फौजेंत शिंदे यांचे धास्तीनें गलबल होऊन लुटालूट आपआपल्यांतच जाली."

१३८. "जाहली" हा शब्द शें. प्र.

१३९. 'गळा पडावयाचें' सा. १९२२ व सगजो.

१४०. हें वाक्य सा. १९२२ त नाहीं.

१४१. हा मजकूर सा. १९२२ नाहीं.

१४२. या वाक्याबद्दल 'मागती दम खाऊन ठिकाणींच राहिले' सा. १९२२

१२२. यासी[१४३] येक दोन दिवस जाहाले तों इकडे[१४४] **गोविंदपंत बुंदेले** यांचें शीर कापून नेलें होतें तें[१४५] सिर व वकील व पत्रें **भाऊसाहेब**[१४६] यांजकडे पाठविलीं[१४६] कीं,[१४७] "तुमचे **गोविंदपंत** पुढें तुम्हांस स्वर्गीं जागा पाहावयास गेले आहेत. आणि तुम्हांस न्यावयास[१४८] शीर पाठविलें आहे होय किंवा नव्हे हें पाहावें." म्हणोन शीर व पत्रें **भाऊंकडे** आली. वकिलांनीं रुमालांतील शीर पुढें ठेविलें आणि पत्र दिल्हें. **भाऊसाहेबांनीं** पत्र वाचून त्यांतील गर्भभाव ध्यानांत आणिला. **गोविंदपंत** याचें शीर ओळखिलें. ते समयीं कचेरीस लहानथोर सरदार होते त्यांची मुखश्री उतरली. तमाम लष्करांत खबर कळतांच फौज थोडीबहुत हिंमत धरून होती त्यांचीं आवसानें गेलीं. तेव्हां **भाऊसाहेब** यांणीं पत्राचें उत्तर दिलें कीं, "तो जागा सर्वांचा आहे. त्याशिवाय दुसरी गती कोणती आहे ? प्रस्तुत तुम्ही थोर, **खंदारचे** पातशाहा, तुम्ही तेथें जाल तेव्हां तुमचे स्वरूपाप्रमाणें मान जाला पाहिजे. सबब तुमचे मेजवानीचे तरतुदीस पुढें गोविंदपंत[१४९] गेले आहेत." म्हणोन उत्तर दिल्हें. शीर होतें तें ठेवून घेऊन, शिरास अग्नि-प्रसाद दिल्हा.

१२३. त्यास पंधरा दिवस जाहाले. लहानथोर बोलूं लागले कीं, "**शिंद** यांची कुमक **बलवंतराव** यांणी न[१५०] करून मसलत बुडविली.[१५१]" हें ऐकून **बलवंतराव** यास आवेश आला. पृथक् युद्ध करावें आसा नेम[१५२] करून **भाऊसाहेब** यांजकडे जाऊन आर्ज केला कीं, "**शिंदे** यांणीं युद्ध केल्यावर शिकस्त दुराणीची जाली होती. त्यास **गोविंदपंत** यांचें सिर कापून आणिल्यावरी गिलजे मागती शेर जाले. आणि भोंवताले फिरों लागले. रस्ता[१५३] मना जाहल्या.[१५३] त्यास मजला आज्ञा करावी. मी हुजुरात घेऊन युध्य[१५४] करितों." बहुतच आतिशय भाऊसाहेब यांजपाशीं केला. नंतर **भाऊसाहेब** यांणीं दुराग्रह जाणून तमाम हुजुरात व लहान[१५५] थोर सरदार[१५५] यांसी आज्ञा केली कीं, "**बलवंतराव** जरीपटका घेऊन युद्धास

१४३. 'पुढें' सा. १९२२.

१४४. "इकडे हा शब्द सा. १९२२ व शें. मधील; भाइसं. मध्यें नाहीं.

१४५. 'नेलें होते तें' हे शब्द शें. व सा. १९२२

१४६. हे शब्द सा. १९२२ मधील.

१४७. येथें सां. व क. प्रती म्हणतात "दुराणी यांणीं 'आपलें अवसान गेलें असें गनीम मनांत आणतील' यास्तव कल्पना करून दाबाचें पत्र व शीर वकिलाबरोबर पाठविलें."

१४८. 'पहावयास' भाइसं.

१४९. यापुढें 'साहित्यास' हा शब्द सा. १९२२ व सगजो. मध्यें अधिक.

१५०. यांणीं या शब्दापुढें "केली असती [तर] गोष्ट फत्ते होती" हे शब्द सा. १९२२ त अधिक.

१५१. 'हा घात बलवंतराव यांणीं केला' सां. प्रत.

१५२. 'चित्तांत मनसबा' सा. १९२२

१५३. 'रस्ता मना जाहला' भाइसं.

१५४. या शब्दापूर्वी 'एक वेळ' हे शब्द सा. १९२२ त अधिक.

१५५. हे शब्द सा. १९२२ त आहेत भाइसं. मध्यें नाहींत.

जातात. तुम्हीं सिद्ध होऊन[१५६] लढाईस जावें. " म्हणून[१५७] ताकीद जाली.[१५७] वरकड सरदार[१५८] कोणी निघाले नाहींत; परंतु **शिंदे होलकर** मात्र इरेनें फौजा सिद्ध करून आपले[१५९] बाजूस उभे राहिले. **बलवंतराव** यांणीं हुजरात सिध करून गिलजास चिठी पाठा आणि[१६०] आपण बाहेर निघाले. मग चितांत विचारणा केली कीं, " यश प्राप्त जालें तरीच **भाऊसाहेबांस** तोंड दाखवूं. नाहीं तरी तिकडेच मरावें[१६१]; " अशी योजना करून[१६२] आपले डेऱ्यांत कुटुंबाचे खबरीस गेले. समागमें स्त्री व मूल आपाराव होते. स्त्रीस जाऊन बोलिले कीं, " ईश्वरें यश दिलें तरि उत्तम, नाहीं तरी पुनः तुमची आमची भेट स्वर्गीं होईल. " म्हणोन बोलोन डोळियांस पाणी आणून निरवानिरव केली. तों **बलवंतराव** यांची स्त्री महापतिव्रता होती. तिणें जाबसाल केला कीं, " उत्तम आहे. शत वर्षांत केव्हां[१६२] तरी मरावें, त्यास या समारंभांत मुक्ती आली तरी बहुत बरें जाहालें. याची क्षीत[१६३] कशास करावी ? " म्हणोन समाधान करून बोलती जाहाली कीं, " तुम्ही लौकिक करून गेलां तरि मीहि वांचणार नाहीं. तुमची सांगातीण होईन. " म्हणोन बोलिली. **बलवंतराव** यांणीं उत्तर केलें कीं, " **आपाराव** मूल नेणतें आहे. समागमें येणें उचित नाहीं. " हें ऐकोन स्त्रीनें उत्तर दिल्हें कीं, " त्याचे प्रालब्धीं असेल तसें घडेल, त्याची आस्था कशास पाहिजे ? " म्हणोन परस्परें बोलोन बाहेर आले.

---

१५६. हा शब्द भा. मधील. 'फौजा' सा. व शें. ' सिद्ध करून ' भाइसं.

१५७. हे शब्द सा. १९२२ मधील.

१५८. या शब्दापुढें ' बहुतकरून ' हा शब्द सा. १९२२ त अधिक.

१५९. ' एके ' सा. १९२२.

१६०. ' कीं निघालों' सा. १९२२.

१६१. ' गर्द व्हावें ' मं. प्रत.

१६२. या पुढे ' निदान समय जाणून' हे शब्द सा. १९२२ त अधिक.

१६३. "केव्हा तरी मरण आहेच हें जाणोन आज्ञा स्वामिसेवेंत अशा समारंभानें थोर तीर्थस्थान जाहल्यास इहलोकीं कीर्ति होऊन अंतीं परलोकीं स्वर्गप्राप्ती आहे. मृत्यूची क्षीत " इ. सां. प्रत; " शंभर वर्षांची भरती होणें कमी. आणि पुढें जगून काय मिळविणें आहे ? वैकुंठ देशाची वाट पाहातच आपणास मिळेल" असें बोलून निरोप दिल्हा. मग बलवंतराव यांणीं गिलज्यास पत्र पाठवून दिल्हें कीं,'आज मेजवानी तुम्हांस रणभूमीजवळ आहे. लवकर फौजेची जमाबंदी करून तयार होऊन यावें.' ऐसें पत्र त्यांस जातांच त्यांणीं फौजबंदी चांगली करून तयार होऊन आले. दोन्ही सैन्यांच्या भेटी जाहल्या. परस्परें लढाई फार चांगली जाहली. परंतु गिलजाच्या तोफखान्यापुढें उपाय चालेना व वायूचे योगें त्याचे तोफखान्याचा धूर बलवंतराव याचे फौजेंत माईना. याजमुळें सर्व मनुष्य धुंद जाहलें. व आपलें व दुसऱ्याचें मनुष्य कांहीं एक समज पडेनासी जाहली. तेव्हां गर्दीच्या योगें मनुष्य पलायमान तडाखा पळों लागले. शिंदे होलकर यांस कांहीं दिसेनासें जाहलें " मं. प्रत.

१२४. [नंतर] नगारा करून फौजेची सिद्धता करून खंदक सोडून निघाले. तों **दुराणी** व **रोहिला** यांची फौज ते दिवशीं भारी चढून आली. **बलवंतराव** व **गिलजे**[१६३अ] यांचें युद्धास तोंड लागलें. मोठा प्रलय जाला. इरेचें काम. बहुतच कडनिकड केली.[१६४] **रोहिले** व **दुराणी** यांणीं केवळ अग्नीनें भाजून काढलें. धुराची व रेतीची व धुरळियाची एकच गर्दी जाहाली. कोणास कोणी दिसेनासें जाहालें. दोन्ही दलांतील यंत्रांचा एकच[१६५] भडिमार जाहला. घोडीं-माणसें धुंद जाहलीं. तो प्रळय मराठे यांसी सोसेनासा जाहाला. मग[१६६] निमें लष्कर[१६६] गोटाचे सुमारें तडक पळों लागलें. त्या धुरळ्याचे गर्दींत शिंदे-होळकर यांस कांहीं[१६७] दिसेनासें जाहलें. म्हणोन फौज पळोन[१६८] धमधम्यापाशीं आली.[१६९] तों तशांत कांहीं वायू[१७०] सुटला. त्यानें धुराळा मना[१७१] जाला. पाहातात तों धमधम्यापाशीं **रोहिल्यांची** निशाणें लालबुंद गेल्यावर **बलवंतराव** यांणीं तोंड काय दाखवावें, म्हणोन माघारे फिरोन मारामार केली. **दुराणी** व **रोहिले** यांचें तोंड थोपून[१७२] राहिलें. तैसेच पळाले[१७३] असते तरी दुराणी[१७४] येऊन गोटांत शिरते. तशांत एकाएकींच **बलवंतराव** यांचे आयुष्याची दोरी स्वर्गींची तुटली. [१७५]आयुष्याची मर्यादा जाली म्हणोन गोळी[१७६] लागतांच घोडचावरच[१७७] प्राण सोडून गेला![१७७] ठार होऊन घोडियाखालीं आले. तों **दुराणीची** गांठ पडली. त्यांणीं **बलवंतराव** यांचें शीर कापावयास उरावर पाय देऊन गळ्याची घाटी सोडविली. तों हें अनुचित पाहून **खंडेराव नाईक निंबाळकर**[१७८] यांणीं केवळ सती पडते तसे जाले आणि त्या मुडद्यावर[१७९]

---

१६३. अ 'युद्धास गेले त्याचे त्याचे' शें. प्रत.

१६४. यापूर्वी 'परंतु' हा शब्द सा. १९२२ त आहे.

१६५. 'च' हें अक्षर शें. व सा.मधील आहे.

१६६. 'गनीम' सा. १९२२ व सगजो.

१६७. 'कांहीं काय होते तें दिसलें नाहीं.' तुं. व सगजो.

१६८. "धबधब्या पाशीं" भाइसं. हा पाठ पुढेंहि लेखक वापरतो.

१६९. यापूर्वी "तों शिंदे होलकर यांजवर मागून उमाळ गोळ्या पडूं लागल्या. हे वाक्य सा. १९२२ त व "गोळ्यांचा उमाळ पडूं लागला" तुं. प्रत. (उमाप १)

१७०. 'उलटा वायू' मंडळ प्र.

१७१. हा शब्द शें. सा. भा. प्रतींतील.

१७२. 'तोफानें रोखिलें' भाइसं.

१७३. 'पळाचे पाठीमागून जाते' शें. 'पळावयाचे असतें' भा.

१७४. 'व रोहिले' सगजो.

१७५. "आयुष्याचा संग्रह सरला. म्हणोन कुटुंबाचा ऋणानुबंध पुरला." हें वाक्य सा. १९२२ त अधिक आहे.

१७६. हे सात शब्द सा. १८८६ त नाहींत.

१७७. हे चार शब्द भा. व भाइसं. मध्यें नाहींत.

१७८. 'निंबाळकर अकळूजकर' सा. १९२२

१७९. 'शत्रूचे अंगावर पडोन' सां. प्रत.

जातात. तुम्हीं सिद्ध होऊन[१५६] लढाईस जावें." म्हणून[१५७] ताकीद जाली.[१५७] वरकड सरदार[१५८] कोणी निघाले नाहींत; परंतु **शिंदे होलकर** मात्र इरेनें फौजा सिद्ध करून आपले[१५९] बाजूस उभे राहिले. **बलवंतराव** यांणीं हुजरात सिध करून गिलजास चिठी पाा आणि[१६०] आपण बाहेर निघाले. मग चितांत विचारणा केली कीं, "यश प्राप्त जालें तरीच **भाऊसाहेबांस** तोंड दाखवूं. नाहीं तरी तिकडेच मरावें[१६१]; " अशी योजना करून[१६२] आपले डेऱ्यांत कुटुंबाचे खबरीस गेले. समागमें स्त्री व मूल आपाराव होते. स्त्रीस जाऊन बोलिले कीं, " ईश्वरें यश दिलें तरि उत्तम, नाहीं तरी पुनः तुमची आमची भेट स्वर्गीं होईल." म्हणोन बोलोन डोळियांस पाणी आणून निरवानिरव केली. तों **बलवंतराव** यांची स्त्री महापतिव्रता होती. तिणें जाबसाल केला कीं, " उत्तम आहे. शत वर्षांत केव्हां[१६३] तरी मरावें, त्यास या समारंभांत मुक्ती आली तरी बहुत बरें जाहालें. याची क्षीत[१६३] कशास करावी ? " म्हणोन समाधान करून बोलती जाहाली कीं, "तुम्ही लौकिक करून गेलां तरि मीहि वांचणार नाहीं. तुमची सांगातीण होईन." म्हणोन बोलिली. **बलवंतराव** यांणीं उत्तर केलें कीं, " **आपाराव** मूल नेणतें आहे. समागमें येणें उचित नाहीं. " हें ऐकोन स्त्रीनें उत्तर दिल्हें कीं, "त्याचे प्रालब्धीं असेल तसें घडेल, त्याची आस्था कशास पाहिजे ? " म्हणोन परस्परें बोलोन बाहेर आले.

---

१५६. हा शब्द भा. मधील. 'फौजा' सा. व शें. ' सिद्ध करून ' भाइंसं.

१५७. हे शब्द सा. १९२२ मधील.

१५८. या शब्दापुढें ' बहुतकरून ' हा शब्द सा. १९२२ त अधिक.

१५९. ' एके ' सा. १९२२.

१६०. ' कीं निघालों' सा. १९२२.

१६१. ' गर्द व्हावें ' मं. प्रत.

१६२. या पुढे ' निदान समय जाणून' हे शब्द सा. १९२२ त अधिक.

१६३. "केव्हा तरी मरण आहेच हें जाणोन आज्ञा स्वामिसेवेंत अशा समारंभानें थोर तीर्थस्थान जाहल्यास इहलोकीं कीर्ति होऊन अंतीं परलोकीं स्वर्गप्राप्ती आहे. मृत्यूची क्षीत " इ. सां. प्रत; " शंभर वर्षांची भरती होणें कमी. आणि पुढें जगून काय मिळविणें आहे ? वैकुंठ देशाची वाट पाहातच आपणास मिळेल" असें बोलून निरोप दिल्हा. मग बलवंतराव यांणीं गिलज्यास पत्र पाठवून दिल्हें कीं,'आज मेजवानी तुम्हांस रणभूमीजवळ आहे. लवकर फौजेची जमाबंदी करून तयार होऊन यावें.' ऐसें पत्र त्यांस जातांच त्यांणीं फौजबंदी चांगली करून तयार होऊन आले. दोन्ही सैन्यांच्या भेटी जाहल्या. परस्परें लढाई फार चांगली जाहली. परंतु गिलजाच्या तोफखान्यापुढें उपाय चालेना व वायूचे योगें त्याचे तोफखान्याचा धूर बलवंतराव याचे फौजेंत माईना. याजमुळें सर्व मनुष्य धुंद जाहलें. व आपलें व दुसऱ्याचें मनुष्य कांहीं एक समज पडेनासी जाहली. तेव्हां गर्दीच्या योगें मनुष्य पलायमान तडाखा पळों लागले. शिंदे होलकर यांस कांहीं दिसेनासें जाहलें " मं. प्रत.

१२४. [नंतर] नगारा करून फौजेची सिद्धता करून खंदक सोडून निघाले. तों **दुराणी** व **रोहिला** यांची फौज ते दिवशीं भारी चढून आली. **बलवंतराव** व **गिलजे**[१६३अ] यांचें युद्धास तोंड लागलें. मोठा प्रलय जाला. इरेचें काम. बहुतच कडनिकड केली.[१६४] **रोहिले** व **दुराणी** यांणीं केवळ अग्नीनें भाजून काढलें. धुराची व रेतीची व धुरळियाची एकच गर्दी जाहाली. कोणास कोणी दिसेनासें जाहालें. दोन्ही दलांतील यंत्रांचा एकच[१६५] भडिमार जाहला. घोडीं-माणसें धुंद जाहलीं. तो प्रळय मराठे यांसी सोसेनासा जाहाला. मग[१६६] निमें लष्कर[१६६] गोटाचे सुमारें तडक पळों लागलें. त्या धुरळ्याचे गर्दींत शिंदे-होळकर यांस कांहीं[१६७] दिसेनासें जाहलें. म्हणोन फौज पळोन[१६८] धमधम्यापाशीं आली.[१६९] तों तशांत कांहीं वायू[१७०] सुटला. त्यानें धुराळा मना[१७१] जाला. पाहातात तों धमधम्यापाशीं **रोहिल्यांची** निशाणें लालबुंद गेल्यावर **बलवंतराव** यांणीं तोंड काय दाखवावें, म्हणोन माघारे फिरोन मारामार केली. **दुराणी** व **रोहिले** यांचें तोंड थोपून[१७२] राहिलें. तैसेच पळाले[१७३] असते तरी दुराणी[१७४] येऊन गोटांत शिरते. तशांत एकाएकींच **बलवंतराव** यांचे आयुष्याची दोरी स्वर्गींची तुटली. [१७५]आयुष्याची मर्यादा जाली म्हणोन गोळी[१७६] लागतांच घोड्यावरच[१७७] प्राण निघोन गेला![१७८] ठार होऊन घोडियाखालीं आले. तों **दुराणीची** गांठ पडली. त्यांणीं **बलवंतराव** यांचें शीर कापावयास उरावर पाय देऊन गळ्याची घाटी सोडविली. तों हें अनुचित पाहून **खंडेराव नाईक निंबाळकर**[१७९] यांणीं केवळ सती पडते तसे जाले आणि त्या मुड्यावर[१७९]

---

१६३. अ 'युद्धास गेले त्याचे त्याचे' शें. प्रत.

१६४. यापूर्वी 'परंतु' हा शब्द सा. १९२२ त आहे.

१६५. 'च' हें अक्षर शें. व सा.मधील आहे.

१६६. 'गनीम' सा. १९२२ व सगजो.

१६७. 'कांहीं काय होते तें दिसलें नाहीं.' तुं. व सगजो.

१६८. "धबधब्या पाशीं" भाइसं. हा पाठ पुढेंहि लेखक वापरतो.

१६९. यापूर्वी "तों शिंदे होलकर यांजवर मागून उमाळ गोळ्या पडूं लागल्या. हे वाक्य सा. १९२२ त व "गोळ्यांचा उमाळ पडूं लागला" तुं. प्रत. (उमाप १)

१७०. 'उलटा वायू' मंडळ प्र.

१७१. हा शब्द शें. सा. भा. प्रतींतील.

१७२. 'तोफानें रोखिलें' भाइसं.

१७३. 'पळाचे पाठीमागून जाते' शें. 'पळावयाचे असतें' भा.

१७४. 'व रोहिले' सगजो.

१७५. "आयुष्याचा संग्रह सरला. म्हणोन कुटुंबाचा ऋणानुबंध पुरला." हें वाक्य सा. १९२२ त अधिक आहे.

१७६. हे सात शब्द सा. १८८६ त नाहींत.

१७७. हे चार शब्द भा. व भाइसं. मध्यें नाहींत.

१७८. 'निंबाळकर अकळूजकर' सा. १९२२

१७९. 'शत्रूचे अंगावर पडोन' सां. प्रत.

पडला. शिपायगिरीची शर्त करून मुडदा सोडविला. शीर कापूं दिलें नाहीं. निदान [१८०]नामांकित खानदान माणूस याप्रमाणें कामास येतें. **खंडेराव नाईक** यांस जखमाहि लागल्या; [१८१] परंतु शीर कापूं दिल्हें नाहीं. असो. त्यांनीं क्षत्रियधर्म यथास्थित केला. तों धुरळियाची गर्दी निघोन गेली. नंतर एकाएकींच **सिंदे-होळकर** यांचे दृष्टीस रोहिल्यांचीं निशाणें धमधम्यापाशीं पडलीं. मग **सिंदे-होळकर** यांणीं मध्येंच घोडीं घालून अगदींच खांडावा[१८२] पाडिला.[१८३] मध्यें शिरून पांच हजार **रोहिला** पाठीशीं चढला होता तो मारून टाकिला. त्यांत खबर सांगावयास एक जाऊं दिला नाहीं. वरकड फौज **दुराणीची** निघोन गेली. पांच हजार मनुष्य त्यांजकडील ठार जाहले. मुडद्यांवर मुडद्यांचे ढीग पडले.[१८४] रक्ताचे ओढे चालिले. याप्रमाणें सफेजंग[१८५] होऊन शांत जाहले. **रोहिले** व **दुराणी** आपले गोटास गेले. **श्रीमंतां**[१८६] कडील भले लोकांचे मुरदे त्या मुरद्यांत सरमिसळ होते ते, ओळखूं येईनात. प्रयत्न करून हुडकून काढिले. आणि त्यांचीं सार्थकें केलीं. **बलवंतराव** यांचा मुडदा **भाऊसाहेब** यांणीं आणून पाहून डोळ्यांस पाणी आणून कष्टी जाहले. "**बलवंतराव** आम्हास टाकून गेले" म्हणोन बहुतच शोक केला. मुरदा डेऱ्यास आणिला.

१२५. हें वर्तमान **बलवंतराव**[१८७] यांची स्त्री बाडांत[१८८] होती तिणें ऐकून तशीच बाहेर आली. मुडदा पाहून क्षणभर[१८९] स्तब्ध होऊन बोलती जाहली कीं, "राव आम्हांस टाकून गेले.[१९०] आतां अहेवपणा हरला. आतां आपण राहणें उचित नाहीं." म्हणोन तशीच[१९१] मुडद्यापासीं बसली. **बळवंतराव** यांचें मुख अवलोकन करून पूर्व सुख आठवून बोलों लागली कीं, "राव![१९२] तुम्ही आम्हांवर कां रुसलां? आमचे हातचा विडा घेतला नाहीं.[१९३] ईश्वरें आम्हांस एवढें निर्वाण कां दाखविलें? राव यांणीं सर्व संपत्ति व आमची आस्था सोडून

१८०. हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

१८१. 'चढल्या' मं.

१८२. 'खडावा' पुणें प्रत.

१८३. 'तोडिला' सा. १९२२ यापुढें सां. प्रतींत–"त्याचे फौजेचा गोट होता. त्यांत शिरून मारामारी करून गोट दुभाग केला. त्या समयीं पांचचार हजार रोहिला कापून काढला" हीं वाक्यें आहेत.

१८४. 'अशुद्धाचे' सा. १९२२ व सगजो.

१८५. 'कत्तल' मगजो.

१८६. 'गनीमांकडील'

१८७. हा शब्द शें. व सा. १९२२.

१८८. 'डेरियांत' सा. १९२२; 'गोटांत' सगजो.

१८९. 'दंग' सगजो.

१९०. 'अतएव' सा. १९२२

१९१. 'रुदन न करितां' सा. १९२२.

१९२. 'आपण' मंडळ प्रत.

१९३. यापुढें सा. १९२२ त "आम्ही तुमचें काय केलें? आम्हांशीं बोलून गेलिया एक प्रहर लोटला नाहीं" हीं वाक्यें अधिक.

गेले[१९४] !" तों जवळ पुत्र **आपाराव बळवंत** हें मूल होतें. बारा वर्षें जाहलीं होतीं. त्यांणीं मातोश्रीचे ओटयांत शिरून दाढीओटी[१९५] धरून बोलिले कीं, "आम्हांस[१९६] सोडून न जावें. आणि तुम्हीं समागमें सहगमनास जाऊं म्हणतां, तेव्हां आम्ही अन्न-पाणी कोणास मागावें? आणि कोणावर रुसावें[१९७] ?" ऐसें ऐकून **बाई** बोलती जाहाली कीं, "बापा, तुम्हीं आनपाणी ईश्वराजवळ मागावें, आणि ईश्वरावर रुसावें.[१९७] आतां आम्हांस मिथ्या मायेंत गोवूं नये." म्हणोन त्यास ढकलून दिला. तों **भाऊ-साहेब** यांणीं येऊन बहुत प्रकारें बोध केला कीं, "पुत्र असतां जाणें उचित नाहीं. **आपाराव** आहे त्यास **'सवाई बळवंतराव'** करीन; तरच जन्मास आल्याचें सार्थक!" म्हणोन समाधान करून बोलिले. नंतर बाईंनीं उत्तर केलें कीं,[१९८] "मूल तुमचे ओटयांत आहे. कळेल तसा परामर्ष करीत जावा. आम्हीं प्रपंचाचें रहस्य पूर्ण आनभविलें. आतां आस्था कांहीं राहिली नाहीं. या समयीं आमचे मायबाप तुम्ही होऊन आमची बोळवण करावी." म्हणोन निश्चयाचें उत्तर दिलें. मग **भाऊसाहे-बांनीं** सहगमनाचें साहित्य करून उभयतां स्त्रीपुरुषांचें दहन केलें. मुलाकडून त्यांचें तेरा दिवसांचें सार्थक केलें.[१९९]

---

१९४. यापुढें सां. प्रतींतील वाक्यें:— "राव यांणीं माझा त्याग केला, त्याचें मला दुःख नाहीं. कारण कीं, त्यांनीं मला सोडिलें तरी मी त्यांस सोडीत नाहीं. परंतु राव, तुमचा या मुलावर भारी लोभ असतां, त्याचा त्याग कसा केलांत? असा शोक करीत आहे."

१९५. 'हनुवटी धरून मुखाजवळ मुख नेऊन' सां. प्रत.

१९६. "आम्हांस सोडून राव निघोन गेले—" सा. १९२२.

१९७. या ऐवजीं सां. प्रतींत पुढील मजकूर आहे:—"माझें पोषण कोण करील? आणि जाऊन माघारी केव्हां येशील? असें बालभाषण करून बोलत आहे, हें ऐकून त्यास बोलली कीं, "बाळा, तुझी आमची ताटातूट ईश्वरानें केली" असें बोलून पाठीवर हात फिरवून चुंबन देऊन (घेऊन) (मला) आतां शिऊं नको म्हणून सांगितलें. परंतु वरचेवर आईचे गळां पडो लागला. ते समयीं आतां हें मायाजाळ कशास पाहिजे?" म्हणून हातानें पलीकडे ढकलून दिला."

१९८. यापुढें सां. प्रत म्हणते "या देहास मुलाची थोडी काळजी होती. तीहि आपण बोललां यावरून तुटली."

१९९. याबद्दल " करून यथाविधि दानधर्म केला." सा. १९२२.

प्रकरण १४ वें

दिल्लीस जाण्याचा बेत बदलून लढाई व विश्वासरावांचा मृत्यु

१२६. याप्रो बलवंतराव यांची समाप्ती जाहल्यावर फौजेनें धास्त बहुतच खादली. बाहेर कोणी निघेनासें जाहालें. दुराणी गलिमांकडील[1] लोकांस मारूं लागले. आन द्रष्टीस पडेनासें जाहालें. मग तमाम लोक **भाऊसाहेब** यांचे डेऱ्यास जाऊन आर्ज केला कीं, "**भाऊसाहेब**, आम्हांस रणांत मारावें; परंतु आनाविणें मारूं नये" आसें बोलिले. यावर **भाऊसाहेब** याणीं **सिंदे-होळकर** व **दमाजी गायकवाड** व **समशेर बहादर** व **विठ्ठल सिवदेव** व **अंताजी माणकेश्वर** व **यशवंतराव पोवार** व **सोमाजी भापकर** व आणखी कितेक सरदार थोर थोर होते त्यांस बोलावून आणिलें. आणि येकत्र होऊन मनसोबा केला कीं, "आतां कुजून मरूं नये. **गिलजांचे** बल दिवसेंदिवस बहुत होत चालिलें; आणि आपलें लष्कर झडत चालिलें. घोडींहि बहुत मेलीं. मातबर[2] मनुष्यें, घोडीं गेलीं. याजकरितां पायउतारा जाहाले. याजकरितां एक वेळ हा मुकाम सोडून बाहेर मोकळे रानीं निघोन जावें. **दिलीचा**[3] रस्ता सोडून दुसरेकडून जावें तरी झाडी मातबर आहे, मार्ग नाहीं. तोफखाना निभावणार नाहीं. यास्तव **दिलीचे** रस्त्यानें जाण्याचा मार्ग उत्तम आहे; परंतु वाटेवरी **गिलजांचा** मुकाम राहिला आहे. ते जाऊं देणार नाहींत. यास्तव बंदोबस्तीनें निघोन जावें. **यमुनेच्या** तीरीं येऊन पांच कोसांवर जाऊन नदी पाठीशीं[4] घ्यावी. पुढें **गिलज्याचे** तोंडावर तोफखाना ठेवावा, **दिली** उजवे बाजूस राखून **दिलीहून** सरंजाम आणवून सारें लष्कर आबाद करावें.[5] हा मुकाम सोडून **यमुना** तीरीं करावा. तेव्हां **मल्हारजी होलकर** बोलिले कीं, "**गिलजे** मार्गावर असतां फारकरून जावयाचा निभाव कसा होईल?" तेव्हां निश्चय केला कीं, "कुल बुणगेसुद्धां झुंज देत, मारीत मारीत जावें. आणि पुढें मुकाम जाहल्यावर तिकडून सरंजामहि येऊन पोंचेल. लष्कर आबादान जाहल्यावर पुनः **गिलजांचें** पारिपत्य करूं." हा सिधांत केला. तेव्हां **जनकोजी सिंदे** यांस[6] **मल्हारराव** यांणीं सांगितलें कीं, "निभावणी जाहली तरी उत्तमच आहे. नाहींतरी निभाव न जाल्यास पुढें गत कैसी होईल? निघण्याचा विचार ठीक

---

१. हा पाठ शें. मधील 'हगियांसि' सा. व भाइसं. 'हग्यास' भा. 'त्यास' सा. १८७९ व १८८६ 'हागायास देखील मारतील असें दुराणी यांचें भय" सां. प्रत.

२. या पुढें 'खांसा' हा शब्द सा. १९२२ त.

३. 'दिलीचा रस्ता' पासून तों खालीं 'हा विच्यार पुसिला' इतका मजकूर २२ ओळी तुं. प्रतींत नाहीं.

४. 'पोटीं' क. प्रत.

५. हें वाक्य क. प्रतींतहि आहे.

६. 'शिंदे यांनीं मल्हारराव यास विचारलें कीं' क. प्रत.

दिसत नाहीं." भाऊसाहेबांचा व सर्वत्र मंडलीचा व सरदार यांचा व लहान थोरांचा आग्रह कीं, कूच करून दिलीचे रोखें[७] जावें. यास्तव उपाय राहिला;[७] परंतु उद्यांच निघून जावें असें नाही. रविवारीं पौष शु. १३, (१८-१-१७६१) कूच करून जाऊं. तेव्हां भाऊसाहेब बोलले कीं, "आज मंगळवार पौष शु. ७ (१३-१-१७६१) आहे. रविवारास साहा दिवस अवकाश आहे तोंपर्यंत लष्करचे लोक कितेक आनाविणें मरतील. व गिलजांचे लष्करांत कितेक जातील; मग जाऊन सार्थक काय? इतके दिवस लष्करांत धीर पुरवत नाहीं. यास्तव उदयीक कूच करून जावें. 'मारावें किंवा मरावें' हाच सिधांत उत्तम," याप्रो मनसोबा ठरवून इब्राहिमखान गाडदी यास बोलावूं पाठविलें. त्यासहि विचार पुसिला तो त्याणें जाबसाल केला कीं, "भाऊसो, तुम्हीं जे समयीं इकडे येण्याची मसलत केली ते समयीं तुमचे आमचे आणभाक जाली आहे. आमचे गैरइमान आहे तर आजपर्यंत येथें न ठरतों.[८] तुम्हांस मिथ्या भासलें तरी प्रचीत दाखवितों" म्हणोन. दुराणी व नजीबखान रोहिला व सुजातदौला यांचीं पत्रें पंचवीस[९] दाखविली[१०] कीं, "तुम्ही आम्ही एक जात; या समयीं आम्हांकडे यावें. तुम्हांस पंचवीस लक्ष रुपयेचा मुलूख देतों. पादशाही उमराव किताबत देतों." म्हणोन पत्रें आलीं होतीं, तीं दाखविलीं. भाऊंनीं वाचून पाहिलीं. तेव्हां इब्रामखान गारदी याची निखालसता देखिली. आणि उत्तर केलें कीं, "आमचें इमान आहे तेंच खरें आहे. परंतु आतां दिलीस जाऊन पोंचावयाची तजवीज कोणती करावी? निभावणी कसी होईल? याची मसलत काय?" याप्रो पुसतांच इब्रामखान गारदी याणें उत्तर केलें कीं, "तुम्ही गलीम लोक. तुम्हांस हिंमत पुरणार नाहीं तुम्ही आम्हांस घेऊन आलां ते आमची कांहींच निभावणी करावयाची दिसत नाहीं. रणांत आम्हांस सोडून जाल. आम्हांस मात्र मृत्यूनें गांठिलें हेंच खरें." असें ऐकून मागती भाऊसाहेब याणीं दुसरें इमान दिलें कीं, "तुम्हांस सोडून आम्ही कदापि जाणार नाहीं. तुम्हीं जेथें उडी टाकून[११] उभे राहाल, तेथें आम्ही कतल होऊन. परंतु रण[१२] सोडून जाणार नाहीं." म्हणोन इमान प्रमाण दिल्हें. तेव्हां इब्रामखान

---

७. 'जाण्याचा उपाय राहिला' भाइसं.

८. 'कधींच मुजरा करून जातों' हें वाक्य सा. १९२२ त यापुढें अधिक, पण सा. १८७९ व १८८६ नाहीं. "गैर इमान असतें तरि तुम्हीं आजपर्यंत येथें न ठरतां" पु. प्रत.

९. 'त्या पत्रांवर त्यांचे शिक्के अशीं' सा. १९२२.

१०. 'प्रविष्ट केलीं' सा. १९२२.

११. 'गाडून' सा. १९२२.

१२. 'तुजला सोडून' 'तूं जेथें ×× उभा राहशील तेथें' असे एकवचनी पाठ तुं. प्रतीचे आहेत.

प्रकरण १४ वें

दिल्लीस जाण्याचा बेत बदलून लढाई व विश्वासरावांचा मृत्यु

१२६. याप्रो बलवंतराव यांची समाप्ती जाहल्यावर फौजेनें धास्त बहुतच खादली. बाहेर कोणी निघेनासें जाहालें. दुराणी गलिमांकडील[1] लोकांस मारूं लागले. आन द्रष्टीस पडेनासें जाहालें. मग तमाम लोक **भाऊसाहेब** यांचे डेऱ्यास जाऊन अर्ज केला कीं, "**भाऊसाहेब**, आम्हांस रणांत मारावें; परंतु आनाविणें मारूं नये" आसें बोलिले. यावर **भाऊसाहेब** यांणीं **सिंदे-होळकर** व **दमाजी गायकवाड** व **समशेर बहादर** व **विठ्ठल सिवदेव** व **अंताजी माणकेश्वर** व **यशवंतराव पोवार** व **सोमाजी भापकर** व आणखी कितेक सरदार थोर थोर होते त्यांस बोलावून आणिलें. आणि येकत्र होऊन मनसोबा केला कीं, "आतां कुजून मरूं नये. **गिलजांचे** बल दिवसेंदिवस बहुत होत चालिलें; आणि आपलें लष्कर झडत चालिलें. घोडींहि बहुत मेलीं. मातबर[2] मनुष्यें, घोडीं गेलीं. याजकरितां पायउतारा जाहाले. याजकरितां एक वेळ हा मुकाम सोडून बाहेर मोकळे रानीं निघोन जावें. **दिलीचा**[3] रस्ता सोडून दुसरेकडून जावें तरी झाडी मातबर आहे, मार्ग नाहीं. तोफखाना निभावणार नाहीं. यास्तव **दिलीचे** रस्त्यानें जाण्याचा मार्ग उत्तम आहे; परंतु वाटेवरी **गिलजांचा** मुकाम राहिला आहे. ते जाऊं देणार नाहींत. यास्तव बंदोबस्तीनें निघोन जावें. **यमुनेच्या** तीरीं येऊन पांच कोसांवर जाऊन नदी पाठीशीं[4] घ्यावी. पुढें **गिलज्याचे** तोंडावर तोफखाना ठेवावा, **दिली** उजवे बाजूस राखून **दिलीहून** सरंजाम आणवून सारें लष्कर आबाद करावें.[5] हा मुकाम सोडून **यमुना** तीरीं करावा. तेव्हां **मल्हारजी होलकर** बोलिले कीं, "**गिलजे** मार्गावर असतां फारकरून जावयाचा निभाव कसा होईल?" तेव्हां निश्चय केला कीं, "कुल बुणगेसुद्धां झुंज देत, मारीत मारीत जावें. आणि पुढें मुकाम जाहल्यावर तिकडून सरंजामहि येऊन पोंचेल. लष्कर आबादान जाहल्यावर पुनः **गिलजांचें** पारिपत्य करूं." हा सिधांत केला. तेव्हां **जनकोजी सिंदे** यांस[6] **मल्हारराव** यांणीं सांगितलें कीं, "निभावणी जाहली तरी उत्तमच आहे. नाहींतरी निभाव न जाल्यास पुढें गत कैसी होईल? निघण्याचा विचार ठीक

---

१. हा पाठ शें. मधील 'हगियांसि' सा. व भाइसं. 'हग्यास' भा. 'त्यास' सा. १८७९ व १८८६ 'हागायास देखील मारतील असें दुराणी यांचें भय" सां. प्रत.

२. या पुढें 'खांसा' हा शब्द सा. १९२२ त.

३. 'दिलीचा रस्ता' पासून तों खालीं 'हा विच्यार पुसिला' इतका मजकूर २२ ओळी तूं. प्रतींत नाहीं.

४. 'पोटीं' क. प्रत.

५. हें वाक्य क. प्रतींतहि आहे.

६. 'शिंदे यांनीं मल्हारराव यास विचारलें कीं' क. प्रत.

दिसत नाहीं." भाऊसाहेबांचा व सर्वत्र मंडलीचा व सरदार यांचा व लहान थोरांचा आग्रह कीं, कूच करून दिलीचे रोखें[७] जावें. यास्तव उपाय राहिला;[८] परंतु उद्यांच निघून जावें असें नाही. रविवारीं पौष शु. १३, (१८–१–१७६१) कूच करून जाऊं. तेव्हां भाऊसाहेब बोलले कीं, "आज मंगळवार पौष शु. ७ (१३–१–१७६१) आहे. रविवारास साहा दिवस अवकाश आहे तोंपर्यंत लष्करचे लोक कितेक आनाविणें मरतील. व गिलजांचे लष्करांत कितेक जातील; मग जाऊन सार्थक काय? इतके दिवस लष्करांत धीर पुरवत नाहीं. यास्तव उदयीक कूच करून जावें. 'मारावें किंवा मरावें' हाच सिधांत उतम," याप्रो मनसोबा ठरवून इब्राहिमखान गाडदी यास बोलावूं पाठविलें. त्यासहि विचार पुसिला तो त्याणें जाबसाल केला कीं, " भाऊसो, तुम्हीं जे समयीं इकडे येण्याची मसलत केली ते समयीं तुमचे आमचे आणभाक जाली आहे. आमचे गैरइमान आहे तर आजपर्यंत येथें न ठरतों.[९] तुम्हांस मिथ्या भासलें तरी प्रचीत दाखवितों " म्हणोन. दुराणी व नजीबखान रोहिला व सुजातदौला यांचीं पत्रें पंचवीस[१०] दाखविली[११] कीं, " तुम्ही आम्ही एक जात; या समयीं आम्हांकडे यावें. तुम्हांस पंचवीस लक्ष रुपयेचा मुलूख देतों. पादशाही उमराव किताबत देतों. " म्हणोन पत्रें आलीं होतीं, तीं दाखविलीं. भाऊनीं वाचून पाहिलीं. तेव्हां इब्रामखान गारदी याची निखालसता देखिली. आणि उत्तर केलें कीं, " आमचें इमान आहे तेंच खरें आहे. परंतु आतां दिलीस जाऊन पोंचावयाची तजवीज कोणती करावी? निभावणी कसी होईल? याची मसलत काय? " याप्रो पुसतांच इब्रामखान गारदी याणें उतर केलें कीं, " तुम्ही गलीम लोक. तुम्हांस हिंमत पुरणार नाहीं तुम्ही आम्हांस घेऊन आलां ते आमची कांहींच निभावणी करावयाची दिसत नाहीं. रणांत आम्हांस सोडून जाल. आम्हांस मात्र मृत्यूनें गांठिलें हेंच खरें. " आसें ऐकून मागती भाऊसाहेब याणीं दुसरें इमान दिलें कीं, " तुम्हांस सोडून आम्ही कदापि जाणार नाहीं. तुम्हीं जेथें उडी टाकून[१२] उभे राहाल, तेथें आम्ही कतल होऊन. परंतु रण[१३] सोडून जाणार नाहीं. " म्हणोन इमान प्रमाण दिल्हें. तेव्हां इब्रामखान

---

७. 'जाण्याचा उपाय राहिला' भाइसं.

८. 'कधींच मुजरा करून जातों' हें वाक्य सा. १९२२ त यापुढें अधिक, पण सा. १८७९ व १८८६ नाहीं. "गैर इमान असतें तरि तुम्हीं आजपर्यंत येथें न ठरतां" पु. प्रत.

९. 'त्या पत्रांवर त्यांचे शिक्के अशीं' सा. १९२२.

१०. 'प्रविष्ट केलीं' सा. १९२२.

११. 'गाडून' सा. १९२२.

१२. 'तुजला सोडून' 'तूं जेथें ×× उभा राहशील तेथें' असे एकवचनी पाठ तुं. प्रतीचे आहेत.

यांणें[१३] आणखी लहान थोर सरदार यांणीं निखालसता मसलत दिली कीं, "हरयत्नें **दिल्लीस** पोंचावें हें खरेंच आहे. आतां जाण्यास उपाय सांगणें. त्या रीतीनें वर्तुं. तुम्हींहि सर्वत्र एकदिलानें वर्तावें. आवघे पार पाडून जाऊं. याची मसलत एक आसे कीं, देशी मोंगल **निजाम अली** नबाब हा तुम्हांसीं लढाई हामेशा करितो. त्याप्रो। गोल बांधून मध्यें बुणगे घालावे. भोंवताला **आराबा** वांटून द्यावा. चहूंकडून चार सरदार मातबर देऊन जिकडील तिकडे बाजू वांटून द्यावी. कोस दोन कोस लढत भिडत **दिल्लीस** जाऊन पोंहोचावें" याप्रो। मसलत सांगितली.हे[१४] सर्वत्रास अनुमतास[१५] आली.

१२७. याप्रो। निश्चय ठरल्यावर दुसरे दिवशीं तमाम फौजेस खर्चास दिल्हें. पहिल्यानें ज्यास बाजारांत आन मिळालें त्यांनीं आणिलें; ज्यांस आन मिळालें नाहीं त्यांनी मिठाया आणिल्या. निदान खोबरें, गूळ, साखर, खारीक[१६] वाणियाची नाहींशी केली. फौजेंत तमाम निरवानिरव जाहली. प्रहर रात्र पहांटेची उजेडावयाची राहिली तों कुचाचा नगारा जाहला. तो दिवस शके १६८२ **सोळाशे ब्याऐंशीं पौष शुद्ध ८ बुधवार**[१७] **विक्रम संवत्सरे** ते[१८] दिवशीं प्रातःकाळीं[१९] स्वारी तयार केली. भालदार, चोपदार व सरकारकून[२०] जागां जागां सरदार यांसी पाठविले कीं,[२१] "लौकर स्वार होऊन निशाणापासीं यावें." या प्रो। सर्वत्रांस ताकीद करून **खासा आपण** व **विश्वासराव** अंबारींत स्वार जाहाले. सौभाग्यवती **पार्वतीबाई** अंबारींत व **नाना फडनवीस** यांची मातोश्री व स्त्री एका अंबारींत[२२], **पार्वतीबाईचे** नजीक होती.[२३] आणि तोफखाना **इब्राहिमखान** गाडदी उजवे[२३] बाजूस **सिंदे होळकर**

१३. यापुढें 'आपले जमातींतील मोठे मोठे जमादार लोक यांस बोलिला कीं' हा मजकूर क. प्रतींत अधिक.

१४. 'ती' सा. १९२२.

१५. 'चित्तास' सा. १९२२. 'अनुमतास' सगजो.

१६. हा शब्द भाइसं मध्यें नाहीं; सा. १९२२ ब सगजो. मध्यें आहे. आणि या शब्दापुढें "आणिली. वाणियाचे घरीं नाहींशी केली" असा पाठ आहे सा. १९२२ त आहे.

१७. हा शब्द तुं. व सां. प्रतींत नाहीं.

१८. यापूर्वी "तमाम फौज सिद्ध होऊन तोफखाना झाडून बाहेर निघाला, तों सूर्योदय झाला" हीं वाक्यें सगजो मध्यें आहेत

१९. 'कारकून' सा. १९२२ 'सरकारकून' पु. प्रत.

२०. 'कीं' हा शब्द शें, व सा. १९२२ मधील.

२१. 'अंबारींत' हा शब्द भाइसं. सा. १८७९ त व १८८६ त नाहीं.

२२. यापुढें तुं. प्रतींत असें आहे:— "रात्रौ मनसबा केला होता जो तो राहिला. पुढें विनाश काल. आराबा मागें टाकून फौजा झाडून पुढें निघाल्या. उजवे बाजूस शिंदे होलकर होते" या कलमाचे अखेरीपर्यंत मजकूर पुणें प्रतींतील होय. सां. प्रतीचा पाठ:— "सर्वांनीं आराबा मागें ठेऊंन निशाण सोडून घोडीदळ फौजेपुढें होऊन गोल मोडून फरा धरून उभे राहिले."

२३. शें.व.सा.'डावे बाजूस' मं. व भा

होते. डावे बाजूस **दमाजी गायकवाड** व **यशवंतराव पवार** व **अंताजी माणकेश्वर** व **विठ्ठल सिवदेव** व **समशेर बहादर** व आणखी लहानथोर पथकें दोन्ही बाजूंस मध्यें **आपण खासे** व हुजुरात होती. कितीएक पथकें पिछाडीस बुणगे मध्यें घालून होते. याप्रो नेमणूक करून गोलाचा गोल सात-आठ घटका दिवस आल्यावर निशाणें हत्तीवर देऊन, नौबत चौघडा सुरू करून, भाराचा भार चालिले. दीड कोसावर जाऊन उभे राहिले. आणि तोफखान्याप्रो मातबर तोफा निवड करून गिलज्यांचे तोंडावर दिल्ह्या[२४]. बाकीच्या हलक्या तोफा सभोंवत्या देऊन त्याचे मागें गाडदी यांचा रिसाला नेमून देऊन, त्याचे मागें सडी फौज, त्याचे मागें बुणगे, त्याचे मागें कांहीं[२५] सडचा फौजा आसा जिकडील तिकडे बंदोबस्त[२६] राखिला. आणि तळ सोडून दीड कोसावर जमावसुधां आले. मागें तलावर गाडे व छकडे व इतर सरंजाम, चालेना तो, जाग्यावरीच टाकिला.

१२८. तिकडे मोंगल[२७] आपले तळावर तयार होऊन जमावसुद्धां गोल[२८] बांधून उभा राहिला. तों **भाऊसाहेब** यांणीं मसलत केली कीं, "आपण नीट चालून जावें आम्हांस **गिलजानें** वाट देऊन[२९] एकीकडे जाहाला तरी[३०] त्यासी[३१] लढाईचें प्रयोजन अगदीं नाहीं. आणि मार्ग मोकळा करीत नाहीं तरी मध्येंच घोडीं घालून मारामार करून उधळून देऊं. मग मार देत नीट निघोन जावें." **आसी** मसलत केली. रात्रीं मनसबा केला होता तो राहिला, आणि पुढें 'विनाशकाल विपरीत बुद्धी' निर्माण जाहाली. ते समयीं सर्वत्रांस सांगून आराबा अवघे मागें टाकून, निशाणें सोडून, फौजा पुढें चालिल्या. तेव्हां फौज जमून जात नव्हती. मुजऱ्यास फरा[३२] धरावा तसा फरा बांधून फौज उभी राहिली. ते समयीं **इब्राहिमखान** गाडदी यानें चितांत विचार केला कीं, "रात्रौ भाऊसो यांणीं मनसबा केला काय ? आणि हालीं हे करतात काय ? आतां मसलतीस धका एकंदर पका बसला. उपाय आवघ्याचा राहिला. **भाऊसाहेबांच्या** बोलण्याची[३३] करण्याची शाश्वती समजली. असो. आम्ही **भाऊसाहेब** यांस इमान दिलें आहे त्यापेक्षां आतां मागें पुढें पाहणें तरी आपले पूर्वजांस बोल ! **भाऊसाहेब** जें करतील, त्यास सादर न होतां गत्यंतर नाहीं. **भाऊसाहेब**

---

२४. 'घातल्या' सा. १९२२.

२५. 'कांहीं' हा श द मं. व सा. १९२२.

२६. यापुढें 'यथास्थित' हा शब्द सा. १९२२ त अधिक.

२७. 'दुराणी व रोहिले व सुजात-उद्दवला' क. प्रत.

२८. 'आंवळून' सा. १९२२.

२९. यापुढें 'बगल मारून' हे शब्द सा. १९२२.

३०. यापुढें 'बरें' हा शब्द भा.प्रत.

३१. येथपासून तुं. प्रतीच्या पाठांत अंतर फार येतें. बहुधा मधील मधील मजकूर गाळलेला आहे, व कोठें कोठें मागेंपुढें झालेला आहे.

३२. 'धारसा' सा. १९२२ 'फरा' क. प्रत.

३३. हा शब्द सा. १९२२ मधील.

थोर आहेत. दैवीं असेल तें खरें. परंतु रणांत विन्मुख व्हावयाचें नाहीं. आसो. आपले आयुष्याची सीमा झाली. शंभर वर्षें पूर्ण भरलीं. 'आपली कांस बळें घालावी, कोणाची आस न धरावी.' आसो. दैवीं असेल तसें घडेल." इब्राहिमखान याणें आराबा सोडून तोहि डावे बाजूस आला. बुणगे व तोफा मागें झाडून मोकळ्या राहिल्या.

१२९. इकडे झाडून मोंगल[३४] युद्धास तयार होऊन उभा राहिला. ते समयीं आबदुल आलीकडील वकील भाऊंकडे आले कीं, "आजचे दिवस युद्धास[३५] तहकुबी करावी. सल्ल्याचें बोलून ठीक करितों. उतावळी करूं नये. आसें[३७] बोलणें आलें.[३७] भाऊसाहेब यांणीं त्या वकिलास माघारें धिःकार[३८] करून लावून दिलें. परस्परें गोळागोळी[३९] सुरू जाहली. त्याजकडील तीनशें तोफा व गनिमाकडील दोनशें तोफांची एकदांच सरवती जाहाली. धाकटीं यंत्रें व हस्तनाला व सुतरनाला व जेजाला व बंदुका व रेखले यांस गणतीच नाहीं. मोठी गर्दी होऊन गेली. धुराचे गर्दीनें सूर्यबिंब आगदी[४०] आच्छादिलें. कोणाची खबर कोणास नाहींशी जाहाली. त्यांत शूर होते त्यांस वीरश्रिया आल्या. भ्याड होते त्यांस आसें जालें कीं, 'दे माय धरणी ठाव,' असे जाहलें. धडाक्याखालीं घोडीं मनुष्यें धुंद जालीं. रणतुरे व रणभेरी व आराबियाचीं वाद्यें एकदांच[४१] कल्होळ[४२] जाला.[४३] तों हुजरातीचे लोक बहुत दिवसांचे[४४] खानदान होते, त्यांणीं कृतसंकल्प केला कीं, "बहुत दिवस आन यांचें भक्षिलें आहे, त्याची उत्तीर्णता[४५] आज आहे" म्हणोन यांजवर हुजरातीनें कडनिकड करून घोडे घातले. युद्धास तोंड लागोन घाव[४६] केला. क्षणभर हुतुतु[४७]-सारखे मोडून घालविलें. त्यांणींहि एकवेळ मोडून घालवीत. अशा पांच सात हिरहिऱ्या[४८] जाहल्या. तों विठ्ठल सिवदेव व यशवंतराव पोवार कांहींसें[४९] पुढें वाढोन गेले.[५०] त्यांचवर झुंज पडलें. तेव्हां हे कच[५१] करून माघारे तोफखान्यांत येऊन उभे

---

३४. 'दुराणी' क. प्रत.
३५. 'झुंजास' सा. १९२२ 'लढाईस' मं.
३६. 'महकुबी' क. प्रत.
३७. 'म्हणोन बोलले' सा. १९२२.
३८. 'दिड काढून' शें. प्रत.
३९. 'गोळागोळीस तोंड लागलें' सा. १९२२, शें. भा. व मं.
४०. हा शब्द सा. १९२२ त नाहीं. भाइसं. मध्यें आहे.
४१. 'एकच' मं.
४२. 'कोलाहल' सा. व मं.
४३. यापुढें 'उभय दळें मिळतीं जालीं' हें वाक्य सा. १९२२, शें. व भा.
४४. यापुढें 'अन्न खादलें होतें' असे शब्द भा. मध्यें.
४५. 'निवाडा' मं. 'उत्कर्षता' भा.
४६. 'घाय' भाइसं. 'घाव' सा., शें. सगजो. व भा.
४७. 'रगडून माघारे' क. प्रत. हुडहुडीसारखे' सगजो.
४८. 'हिराऱ्या' क. प्रत,
४९. यापुढें 'मधींच' हा शब्द शें.त
५०. 'गेले होते' मं.
५१. 'हल्ला करून' शें,

राहिले. तों **दमाजी गायकवाड** यांजवर गिलजांनीं येऊन नेट बसविला. तेहि माघारे येऊन उभे राहिले. मुकामीं गोटाचा गोट राहिला. त्याजप्रो पथकें उभीं होतीं, त्यांजवर खासा **आबदल अली** त्या झुंजावर डावेकडे होता, त्याणें युद्ध भारी केलें.[५२] **भाऊसाहेबां**कडील पथकें माघारी फिरलीं. हलकल्लोळ[५३] जाहला. **इब्राहिमखान गाडदी** याजवर **खास दुराणी** व **रोहिला** चालून आला. याची त्यांची एक रंजक उडाली. तिकडील बहुत पडिले. परंतु जाग्यावरून हालले नाहींत. तसेच नेट धरून मारीत आले. आणि[५४] **इब्राहिमखान** याजवरच पडले. **गाडदी** यास कुमक कोणीच केली नाहीं. तथापि सांभाळून येऊन हुजरातीचे लोक व आपण एकत्र लढूं लागले. तोफाहि सुटत होत्या.[५५] लढाई मातबर एक प्रहर जाहाली.

१३०. इकडे उजवे बाजूस **सिंदे-होळकर** होते. त्यांजवर **सुजायतदौला**[५६] तीनशें[५७] तोफा व पन्नास हजार रिसाल्याचे लोकानिसीं झटून पडला.[५७] युद्ध मातबर होऊं लागलें. तों मध्यें **भाऊसाहेब** व **रावसाहेब** अंबारींत होते ते उतरून घोड्यावर स्वार जाहाले. **भाऊसाहेब**[५८] **बोर** घोड्यावर व **रावसाहेब दिलपाक**[५८] घोड्यावर स्वार जाहाले होते. चहूंकडे[५९] सांभाळून होते. मारामारी होतच आहे, तों मोठेमोठे मातबर खासे पडों लागले. ते समयीं **विश्वासराव** यांणीं हुजरातीच्या लोकांत येऊन घोडा घातला आणि घाव केला.[६०] तों ईश्वरी क्षोभ जाहाला. एकाएकींच छातींत गोळा[६१] लागून **विश्वासराव** घोड्यावरच[६२] ठार जाले. **नानासो**चें निधान ठार[६३] पडलें. तों लोकांनीं कडनिकड करून मुडदा अंबारींत घातला आणि वरती शालजोडी घातली. हें[६४] **भाऊसाहेबां**नीं पाहून अवसान सोडिलें. बहुत[६५] विलाप करून मग[६६] **भाऊसाहेबां**नीं निश्चय केला कीं, "या उपरी **गिलजा** खाशा-

---

५२. यापूर्वी 'कुल' हा शब्द सा. १९२२ त अधिक आहे.

५३. 'हलके बहुत जाले' सा. १९२२ व शें.

५४. यापूर्वी इब्राहिमखान गाडदी याजवरि चालोन आले' हें वाक्य सा. १९२२ त अधिक आहे.

५५. यापुढें 'लढाई मना जाली नव्हती' हें वाक्य सा. १९२२ अधिक आहे.

५६. 'वगैरे' हा शब्द सा. १९२२त.

५७. हें वाक्य सा. १९२२ त नसून "यांणीं येऊन झुंज दिलें" हें वाक्य आहे.

५८. 'हर घोडीवर व रावसाहेब पिल्या घोड्यावर' धो. प्रत. 'पीलबाला' सा. १९२२ व 'दिल पाक' क. प्रत.

५९. 'चहूंकडून खाशांस' क. प्रत.

६०, 'आपला घोडा उठवून शत्रूचे फौजेंत तलवार चालविली' सां. प्रत.

६१. 'तोफेचा गोळा' क. प्रत.

६२. हा शब्द स. ग. जो. मध्यें आहे. सा. १९२२ त नाहीं.

६३. 'हरपलें' सा. १९२२.

६४. 'हें वर्तमान' सा. १९२२,

६५. 'बहुतसा' शें. व सा. १९२२.

६६. 'करूं लागले. मग त्या त्वेषानें सा. १९२२.

निशीं मारीन.'' म्हणोन लोकांस ताकीद केली.[६७] आणि युद्ध केलें. 'हाणा, हाणा' असें मुखानें बोलोन बरोबर **समशेर बहादर** घेऊन पुढें जाऊन तीन वेळां हत्यार केलें. लोकांनीं हिंमत धरून **भाऊसाहेब** पुढें सरसावून सिपायगिरी बहुत केली.[६८] [६९]रोहिला माघारां फिरविला. **आबदुल आली** पळोन नदीतीरास गेला. शर्थ युद्धाची[७०] जाली. पुढें **विठ्ठलराव सिवदेव**[७१] यांणीं पेशजी **गिलजे** चाकरीस ठेविले होते. ते दोन हजार होते. त्यांस इशारतीस भगवा पटा[७२] दिल्हा होता तो डोईस बांधून फिरत होते. ते समयीं **विश्वासराव** पडले ही खबर लस्करांत बुणग्यांत आली. ते समयीं सर्वत्र बुणगे लस्कर गडबडलें होतें. **गिलचे** चाकर यांणीं भगवा पटा[७३] टाकून दिला आणि बुणग्यांत आवई[७३] घालून लुटूं लागले. बुणग्याचा पळ काढिला. बुणगे पळत हें पाहून **विठ्ठल सिवदेव** यांणींहि पळ काढिला. आधींच **विश्वासराव** यांचें वर्तमान ऐकून दहशत खाली होती. कोणी दम धरून बुणग्यांत उभा राहिला नाहीं.[७४] [गिलजे चाकर यांणीं] लुटीची आवई घातली, आणि धुंदाई[७५] मांडिली.

१३१. इकडे **भाऊसाहेबां**कडे युद्ध होतच होतें. **भाऊसाहेबांची** स्त्री **पार्वतीबाई** तेथेंच[७६] होती.[७७] अंबारीस अंबारी तटली होती. युद्धाचे धुंदींत घाबरी होऊन अवघें लक्ष पुढेंच होतें. तों एकाएकीं अंबारींत **विश्वासराव** यांचा मुडदा पाहिला आणि बाईंनीं माहातास पुशिलें कीं, 'हा मुडदा कोणाचा आहे?' त्याणें उत्तर केलें कीं, "**विश्वासरावसाहेब** ठार जाले!" खवासखान्यांत खिजमतगार होता. त्यास सांगोन तोंड उघडून[७८] पाहिलें तों **रावसाहेब** मृत्य पावले, हें **पार्वतीबाईंनीं**

---

६७. 'आणि लढाई मारूं लागले' हे शब्द मं. प्रतींत अधिक.

६८. 'लढण्याची शर्थ केली. त्या शर्थीस उपमाच नाहीं. मर्दुमकी किती वर्णावी?" अशीं वाक्यें क. प्रतींत अधिक.

६९. 'दुराणी व रोहिला' सा. १९२२.

७०. हा शब्द सा. १९२२ त नाहीं. झुंझाची भाइसं. मध्यें आहे.

७१. 'भाऊसाहेबांनीं' सा. १९२२ मधील ८६ टीप. 'यांणीं' च्या पुढे 'बुणगे' असा शब्द पुणें प्रतींत.

७२. 'पटका' सा. १९२२.

७३. 'गिलजे आले म्हणून पुकारा करून आपणच लुटूं लागले' सां. व क. प्रती.

७४. 'राहिनासा जाहाला' शें. व स

७५. 'धुमाळी' शें. व सा. १९२२.

७६. 'तेथें अंबारींत' सा. १९२२.

७७. 'तों विश्वासराव यांचे मुरद्याची अंबारी बाजूस होती ती फौजेचे हेलाव्यामुळें हेलावे खात खात बाईचे अंबारींशीं येऊन भिडली' असा मजकूर क. प्रतींत अधिक आहे.

७८. 'शालजोडी तोंडावरील काढविली' क. प्रत.

पाहून ऊर व कपाळ बडवून घेतलें. शंखध्वनीहि केली आणि बोलती जाली कीं, "ईश्वरें आम्हांस एवढें निर्वाण कां दाखविलें? **रावसाहेबांसारिखें** रत्न हरपोन गेलें." म्हणोन बहुतच शोक करिती जाहली. तों जवळ **नाना फडणवीस** यांची मातुश्री होती, तिणें शांतवन[७९] केलें कीं, 'बाई!' ईश्वरें आम्हांस[८०] ओढूनच आणिलें आहे. एवढ्यावरच मुक्तता जाली नाहीं. अजूनहि सर्वत्र लहानथोरांस[८१] महा अनर्थच[८२] आहे. त्यांत ईश्वरच पार पाडील तरी बरें. नाहीं तरी रडें लागलेंच आहे. तों पावेतों दम खावा." म्हणोन शांत केलें.

---

७९. 'शांत केली' सा. १९२२.
८०. 'र'डें सा. १९२२; 'आम्हास' भा.
८१. हा शब्द सा. १९२२ त नाहीं.
८२. 'अनर्थापात' स. ग. जो. व सा. १९२२.

प्रकरण १५ वें

इब्राहिमखान व भाऊसाहेब यांचा पराक्रम व शेवट

१३२. इकडे हुजरातीनें[1] व **इब्राहिमखान गाडदी** यानें कडनिकड करून एक वेळ त्यास (दुराणीस) मोडून त्याचे जाग्यापावेतों तुडवीत गेले. ते समयीं **आबदल-आली** दुराणी केवळ नामर्द, **यमुनातीरानें** दोन कोसपर्यंत पलाले. हें **नजीबखान रोहिला** यानें[2] पाहून दांतानें ओंठ चावून हवालदील होऊन हावद्यांतून[3] पाय-उतारा जाहाला. तसेंच **बुंदेखान रोहिला** व **आमदखान लंगडा** असे पायउतारा जाहाले आणि **सिंदे होलकर** हे उजवे बाजूस आहेत अशी बातमी आणून, त्यांस सोडून इकडे[4] डावे बाजूवर चालोन घेतलें. आधीं तोंड **समशेर बहादर** यांजवर बसविलें. ते समयीं **समशेर बहादर** यानें मारामार बहुत केली.[5] तोफाहि तशाच सोडिल्या. आणि[6] पाहिजे तितकी मर्दुमी केली. अंगावर जखमाहि बहुत चढल्या; परंतु फौज उठून[7] गेली. तसेंच आनुक्रमें **दमाजी गायकवाड** यांजवर तोंड बसविलें. त्यांणीं क्षणभर मारामार बहुत केली.[8] तेहि बाजूस निघोन गेले. मग तसेंच **विठ्ठल सिवदेव** व **अंताजी माणकेश्वर** व **यशवंतराव पवार** यांजवरहि येऊन मार[9] बसविला. तेव्हां त्यांणीं[10] करावयाची तितकी बहुतच केली. परंतु फौज जमून राहीना.[11] यास्तव सर्वांचेच उपाय राहिले. त्याचेंहि[12] मुंडमोचन जाहालें. **इब्रामखान गाडदी** यांजवर तोंड लाविलें.[13] इकडे **भाऊसाहेब** यांजकडे लढाई होतच होती. होतां होतां मारामारी खणाखणी जाहली. ते समयीं **विश्वासरावसाहेब** यांचें वर्तमान ऐकून **जनकोजी सिंदे** व **तुकोजी होलकर**[14] यांनीं मोठी मर्दुमी[15] करून मारामारी करीत **भाऊसाहेबांपासीं** आले. तों **इब्रामखान गाडदी** यांजवर **दुराणी**

---

१. 'हुजरातींतील' भा सं.

२. यापुढें 'ऐकून व' हे शब्द सा. १९२२ त.

३. हा शब्द सगजो व मं. मध्यें नाहीं.

४. 'इकडे' हा शब्द भाइसं.मधील

५. "समशेर बहादूर यानें मार बहुत देऊन तोफा त्यांजपासून पाडाव करून घेतल्या. अशी फारच मरदुमी केली. अंगावर जखमा" इ. सां, व क. प्रती.

६. यापुढें 'तों फौजेनें हातच सोडिले' हें वाक्य सा. १९२२ त अधिक.

७. 'उपटून' भाइसं; 'फुटून' सा, १९२२ 'उठून' सगजो.

८. यापुढें 'परंतु' हा शब्द सा. १९२२.

९. 'वर्षले' सा. १९२२.

१०. 'त्यांणीं' या शब्दांपुढें 'मर्दुमी' हा शब्द शें.त अधिक.

११. 'नाहीं' सा. १९२२.

१२. 'पवार यांचें' सा. १९२२.

१३. हें वाक्य भाइसं. मध्यें नाहीं.

१४. 'शिंदे' सा. १९२२.

१५. हे २शब्द सा.१९२२ त नाहींत

येऊन पडले. त्याणें जिवाचा निधडा[१६] करून शिपाईगिरी[१७] म्हणावी तैशी केली. कितेक गाडदी खेतीस आले; परंतु कुमक कोणाच्यानें जाहाली नाहीं. मग एक क्षणांत पांच हजार गाडदी ठार जाले.[१८] होते कीं नव्हते असे केले. हुजरातीचे लोक जवलचे[१९] पलों लागले. तोफखाना[२०] बंद जाहला. जातीनिशीं तरवार[२१] सीमा[२२] पुरतीच केली. जाऊन **गिलजाच्या** लस्करांत मिसळले[२३] आणि दहा पांच नामांकित[२४] मारून ठार केले[२५]. भोंवता वेढा गिलजाचा पडला. अंगावर[२६] जखमा भारी चढल्या. दुराणी पलों[२७] लागले होते तेहि माघारे आले. गाडद्यांचे मुडद्यांचे ढीग पडले. **इब्रामखान गाडदी** याचा पुत्र व भाचा होता तो ठार जाहला. खासा **इब्रामखान** गाडदीहि रणांत घायाळ जाहला[२८], असें असतां लढतच होता. यत्न चालेना, तेव्हां हत्यार राहिलें. मग[२९] धरून नेला.

१३३. हें वर्तमान **भाऊसाहेबांस** कललें. चोहोंकडून प्रळय एकदांच जाहाला. मोठी धुंदी जाहाली. **यशवंतराव पवारहि** ठार जाहाले. कोणास कोणी पुसेनासें जाहालें. जाग्यावरच **इब्रामखान** गाडदी होता कीं नव्हता असा[३०] जाहाला. वरकड[३१] **मल्हारराव होलकर** यांचे बाजूवर झुंज मातबर जाहालें. रेटत नाहींसें जालें तेव्हां

---

१६. 'निराशा' क. प्रत.

१७. यापूर्वी 'तटून उभा राहिला' हे शब्द सा. १९२२ त आहेत. पण सा. १८७९ व १८८६ त नाहींत.

१८. 'ऐसें ऐकोन दुराणी पळून गेला होता तोहि माघारा आला' असें वाक्य तुं. प्रत येथें देते.

१९. 'जवळ होते ते' सा. १९२२.

२०. यापूर्वी 'गाडदी ठार झाल्यामुळें' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत पण सा. १८७९, १८८६ त नाहींत.

२१. 'शिकस्त' सा. १९२२.

२२. हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

२३. यापुढें क. प्र. म्हणते "इब्रामखान गारदी व कांहीं लोक असे गोलच्या गोल जाऊन गिलचाच्या लष्करांत मिसळले."

२४. 'नामांकित' या शब्दापुढें 'सरदार दुराणीचे' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत. 'दुराणीचे' हा शब्द शा. १८७९ व १८८६ त नाहीं.

२५. यापुढें 'इतरांची गणतीच नाहीं' हें वाक्य सा. १९२२ त अधिक आहे. पण सा. १८७९ व १८८६ त नाहीं.

२६. यापूर्वी 'इब्रामखान याचे' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत पण सा. १८७९ व १८८६ त नाहींत.

२७. 'पळोन गले' सा. १९२२.

२८. यापुढें "भाऊंनीं कांहीं गिलजे ठेविले होते ते त्यांनीं बुणग्यांत शिरून, बुणगे पिटूं लागले चोंहाकडोन प्रलय एकदांच जाहाला" हा मजकूर सगजो. मध्यें अधिक आहे.

२९. 'मग' यापुढें 'दुराणी यांनीं' हे शब्द सा. १९२२ त असून, सा. १८७९ व १८८६ त नाहींत.

३०. 'होता तो कांहीं नाहींसा झाला' पुणें प्रत.

३१. 'इकडे' सा. १९२२.

ती[३२] बाजू सोडून निघाले. मग केवळ तोंड हुजरातीवर बसविलें. ते समयीं हुजरातीनें शर्थ[३३] करावयाची ती बहुतच केली.[३३] जेथून मराठे यांचें राज्य जाहालें होतें त्यापासून[३४] याप्रमाणें मराठे कधींच झुंजले नव्हते. **भाऊसाहेब** यांणीं नांव-निशीवार आसाम्या हटकून घालविल्या. आपणहि खासा[३५] घोडियावर स्वार जाले होते. **विश्वासराव** ठार जाहाले, त्यापेक्षां, आतां **नानासाहेबांस** तोंड काय दाखवावें? म्हणोन शोकांतच होते. तों अवघा मार **भाऊसाहेबांवरच** पडला. तरवारीची खणाखणी जाहाली. डुकर खळीस येतो तैसा प्रकार जाहाला.[३६] **भाऊसाहेब** लोकांत गर्द[३७] जाल्यावर घोडींमनुष्यांनीं खंदक[३८] भरला. माणसें सर्व खपलिया-वर[३९] दिशाभूल जाहाली. कोणीकडे पलावयाचें सुचेनासें जालें. तों तिसरा प्रहर जाहाला.

१३४. उपरांतिक चार घटिकांपर्यंत **भाऊसाहेबांनीं** हुजुरातीनिशीं मारामार केली; परंतु[४०] डावे बाजूनें हातच[४१] सोडिले. आभाळ फुटते[४२] तेथें ठिगळ[४३] कोठवर लावावें? मग **भाऊसाहेब** घोड्यावरून पायउतारा जाहाले. भाऊसा० यांचे तोंडास 'हाणा हाणा' हेंच करीत असतां खरस[४४] आली. जातीनिसीं मोठा हिया करून बहुतच झुंजले तें कोठवर लिहावें? सरकारचे मुछदी तमाम मातबर कुल एकीकडे पळून गेले. ते समयीं **सोनजी भापकर**[४५] यासी **भाऊसाहेब** बोलिले कीं, "**सोनजी बाबा**, या समयीं निघावयाचें नव्हतें. तुमचा भरंवसा बहूतच धरिला होता." तेव्हां **सोनजी** बाबा बोलिला कीं, "लोक पळतात त्यांस माघारें फिरवितों. साहेबास टाकून आम्ही कोठें जावें?" असें बोलून लोक फिरावयास गेले, तिकडेच

---

३२. 'तेहि' सा. १९२२.

३३. जितकी शर्थ करावी तितकी केली' सा. १९२२. यापुढें क. प्रतींत 'परंतु ईश्वर सहानुकूल नाहीं. तेव्हां करतात काय? ईश्वर सहानुकूल होता तर विप्रीतः सुप्रीतो भवेत्" असें आहे.

३४. यापुढें "युध्य आसें जालें नाहीं परंतु" हे शब्द भाइसं. मध्यें आहेत.

३५. यापुढें 'अगोदरच' हा शब्द सा. १९२२ त अधिक आहे.

३६. 'डुकर खळीस येतो आणि खवळून उभा राहातो तसे राहोन युद्धाचा प्रसंग चालविला होता. भाऊ-साहेब लोकांत गर्द होऊन राहिलेवर घोडीं मनुष्यें सर्व खपलीं" अशीं वाक्यें क. प्रत देते. भाऊनीं केला. १८७९-८६ सा.

३७. "गर्द' सा. १९२२; शें. व भा. 'गर्दी' भाइसं. 'दणगें जालियावर' घोडीं तुं. प्रत. दणगे=गर्दी.

३८. हे दोन शब्द भाइसं. मध्यें नाहींत.

३९. 'सर्व खपलियावर' शब्द सा. १९२२ त नाहींत. शें. व भाइसं. मध्यें आहेत.

४०. हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं. सा. १९२२ त आहे.

४१. 'हातचें सोडावें' भाइसं.

४२. 'फाटलें' सा. १९२२. 'फुटलें' मं.

४३. 'हात' मं.

४४. सा. १९२२.

४५. 'भालदार' मं. व भा.

गेले. तेव्हां **तुकोजी सिंदे**[४६] म्हणों लागले कीं, "महाराज,क्षत्र धर्माची शर्थ जाहाली.[४७] याउपरी निघाल तर उतम आहे." तेव्हां **भाऊसाहेबांनीं** उतर केलें कीं, "तुकोबा, आतां कोणीकडे जावें? काय तोंड **नानासाहेब** यांस दाखवावें? **रावसाहेबांची** गत काय जाहाली ती पाहावी आणि **इब्रामखान** गाडदी यास इमान दिलें हें काय?" आसें ऐकून मागती **तुकोजी सिंदे**[४८] यांनीं उतर केलें 'कीं **भाऊसो**! तुम्ही वांचला तरी आवघ्यांचा सूड घ्याल. नाहीं तरी तुमचें मागें आवघ्याच गोष्टी आटपल्या." असें ऐकून मागतीं **भाऊसाहेब** बोलिले कीं, "**पुण्यांत नानासाहेबांस** तोंड काय म्हणोन दाखवावें? **विश्वासराव**[४९] याची गत असी. त्यापेक्षां निघावयाची[५०] गोष्ट घडणार नाहीं. रणाचे ठायीं ईश्वरसत्तेनें जें घडणार असेल तें घडो. परंतु कदापि नामोहरम व्हावयाचें नाहीं." आसें म्हणतांच **तुकोजीबाबा** यांणीं घोडयावरून उडी टाकिली आणि जातिनिसी हत्यार केलें. तेथें मोठी[५१] मर्दुमी करून मराठी धर्माची शर्थ करून खस्त केली. तो अकस्मात् गोळी लागोन ठार जाहाला जरिपटकियाचे निशाणावर अगोदरच दाटी जाहाली होती. तेव्हां निशाण हत्तीवरून घोडयावर घेतलें, आणि निशाण गुंडाळून[५२] पळों लागले. तेव्हां **भाऊसाहेबांनीं** शाहादानें वाजविण्यास आज्ञा केली.[५३] फते जाली. शाहादानें वाजतात. यामुळें लोक माघारे फिरतील या अर्थें शाहादानें वाजवूं[५४] लागले; परंतु ज्यांनीं पल काढिला त्याप्रो कोणी माघारे फिरले नाहींत. **भाऊसाहेबांचे** तोंडास खरस आली[५५] 'हाणा! मारा!' म्हणावयाचें राहिले. तोंडापुढें कोणी ओळख्या आला तरी हुकार देऊन मानेनें आज्ञा दाखवूं[५६] लागले. अंगावर ब्रह्मांड कोसळलें; परंतु हिंमत हरली नाहीं. **भाऊसो** यांजप्रमाणें पराक्रमी दुसरा होणें[५७] असाध्य[५८] गोष्ट. जाग्यावरी[५९] हजार बाराशें मात्र उभे राहिले. चोहोंकडे एकदांच आभाल पांढरें जाहालें. जिकडे[६०]

---

४६. 'होलकर' भाइसं. 'सिंदे' सा. १९२२.

४७. यापुढें 'चोंहोंकडून आभाळ फाटलें" हे वाक्य सा. १९२२ त अधिक आहे. 'आभाळ फुटलें' असें तुं. प्रत सर्वत्र लिहिते.

४८. 'होलकर' धो. व भाइसं. प्रती 'सिंदे' सा. व सगजो.

४९. हे शब्द भाइसं. मधील.

५०. 'मोठी मातबर' सा. १९२२.

५१. यापुढें 'झाडून' हा शब्द १९२२ त अधिक.

५२. 'दिली' सा. १९२२.

५३. 'वाजतात असें करूं लागले'.

५४. 'गळा वाळला' 'कोरड पडली' हीं वाक्यें सां. व क. प्रतींत अधिक आहेत.

५५. 'मानेचे संज्ञेनें दाखवूं लागले' सा. १९२२.'आज्ञा' हा शब्द सा. १९२२ त नाहीं. 'अवज्ञा' हा चुकीचा शब्द भाइसं. मध्यें.

५६. 'होणें नाहीं' भा.

५७. हा शब्द सा. १९२२ मधील.

५८. 'जिकडील' सा. १९२२.

तिकडे पलों लागले.[५९] भाऊसाहेबांजवळ **जनकोजी शिंदे** व **रावसाहेबांचे** मुर्द्याचे हत्ती जवळ शेंपन्नास लोक उभे होते तेवढे मात्र बाकी राहिले. सभोंवताला वेढा भारी पडला[६०]. युद्ध बहुत केलें. पूर्वी युद्धांत अतीरथी, महारथी झुंजले; त्याप्रमाणें **भाऊसाहेबांनीं** विरथीपणें[६१] शर्थ केली. पुढें कांहीं इलाज चालेनासा जाहाला. **दुराणी व नजीबखान**[६२] रोहिला त्यांणीं चाळीस हजार फौज त्यांतून दहा हजार फौजेनिसी **भाऊसाहो** यांजवर येऊन पडले. तें समयीं मारामार असी जाहाली कीं, 'न भूतो न भविष्यति' एकदांच भोंवता वेढा[६३] पडोन उभे राहिले. नंतर रवंदळारवंदळ[६४] बहुतच केली. यांत **भाऊसाहो व जनकोजी शिंदे** यांची गत कसी काय जाली हें न कळे ! उयभतां खासे दृष्टीनें पाहिले नाहींत गैब[६५] जाहाले किंवा अस्मानांत गेले किंवा पृथ्वींत[६६] गले, हें ईश्वरी कौतुक ब्रह्मादिकांस न कले[६७] तेथें मानवियांस काय कले[६८] ?

१३५. इकडे **मल्हारराव होलकर** याजवरी गुदरली. ते समयीं आभाळास ठिगळ कोठवर लावतील ? उपाय राहिला. मग पंजवीस स्वारांनिसी बाजू घेऊन[६९] निघोन गेले[७०]. **रावसाहेबांच्या** मुर्द्याचा हत्ती व **भाऊसाहेबांची** बसती[७१] घोडी ही **सुजायतदौला** याजकडे सांपडली.

---

५९. यापुढें "सोनजी भापकर यांणें एक वेळ उतर केलें कीं, 'भाऊसाहेब, तुम्ही निघावें' त्यासहि निदानचा जावसाल केलियावर सोनजी भापकर यांणीं रिकीबींतील पाय काढून भाऊमागें अडासनीं (?) पाय दिला आणि उभे राहिले" असें तुंगार प्रतींत अधिक आहे.

६०. 'पुरा' सा. १९२२

६१. 'वीर यांनीं' तुं. व क. प्रती.

६२. 'निजाम अलीखान' भाइसं.

६३. 'वेष्टून' सा. १९२२ 'वेढून' भा.

६४. 'वरकड दल' भाइसं.

६५. 'गयफ' सा. १९२२.

६६. 'पाताळांत' क. प्रत.

६७. या पुढें तुं. प्रतींत पुढील मजकूर आहे :—"त्यांत भाऊसाहेब यांची गत काय जाहाली हें न कळे. तैशीच फौज घेऊन जनकोजी शिंदे यावर पडली. तेथें बहुतच मारामार जाहाली. तों शिंदे याची फौज झाडोन निघोन गेली. खासा भाऊसाहेब कोठें आहेत, म्हणोन हुडकीत गेले. त्यासीहि फिरून देखिलें नाहीं, मग अनुक्रमें मल्हारराव होळकर याजवर अवघीच फौज येऊन पडली."

'खांसा' या शब्दापुढें 'जनकोजी' असा शब्द सगजो. मध्यें आहे.

यापुढें "त्यांनींहि बहुतच कस्त केली; परंतु नाइलाज जाहाला" हा मजकूर सगजो. मध्यें अधिक आहे.

६८. यापुढें सां. व क. प्रतींतील मजकूर "शत्रूचे हस्तगत जाहाले म्हणावें तर त्यांस ब्रह्मांडभर आनंद जाहाला असता. तेंही जाहालें नाहीं."

६९. 'देऊन' सा. १९२२

७०. यापुढें 'तो घटका दिवस राहिला' हें वाक्य सगजो. मध्यें अधिक.

७१. 'यांचो खाशी घोडी बसावयाची' क. प्रत.

भाऊसाहेबांच्या प्रयाणांतील मुक्काम व तारखा

नकाशांत गांवामागें क्रमांक दिले आहेत. येथेंहि तेच क्रमांक देऊन तारखा दिल्या आहेत. ह्यावरून त्या त्या मुक्कामीं भाऊसाहेब केव्हां होते हें कळून येईल. ह्या मुक्कामांचे आधार कालपटावरून समजून येतील.

क्रमांक	ठिकाण	सन	दिनांक
१.	उदगीर	१७६०	फेब्रु. ३
२.	पटदूर	,,	मार्च ७
३.	सिंदखेड	,,	मार्च १५
४.	बऱ्हाणपूर	,,	एप्रिल ४
५.	हंडिया घाटें नर्मदापार	,,	एप्रिल १६
६.	सिहोर	,,	एप्रिल २८
७,८.	बेडसिया–सुरेंज भेडसे	,,	मे ६, ७
९.	अरुण	,,	मे १४
	शाहडवरा	,,	मे १६
१०.	कुलरस ?	,,	मे २२
११.	नरवर	,,	मे २९
१२.	ग्वालेर	,,	मे २९ ते जून २
१३.	कुवारी नदी	,,	जून ४
१४.	चंबळा उत्तर तीर गौघाट	,,	जून ८
	धोलपूर	,,	जून १३
	नजीक आग्रा	,,	जून २५ ते जुलै १
	गंभीर नदी	,,	जुलै ४
१५.	मथुरा	,,	जुलै १५
२०.	दिल्ली	,,	आगस्ट, सप्टें.
२२.	सोनपत	,,	ऑक्टो. १०
	कुंजपुरा	,,	ऑक्टो. १६–२०
२४.	पानिपत	१ नोव्हेंबर १७६० ते १४ जानेवारी १७६१ (शक १६८२ पौष शु. ८ बुधवार)	



नकाशांत भाऊंचा मार्ग–जाड काळ्या रेघेनें (उदगीर ते कुंजपुरा).
अबदालीचा मार्ग–दुहेरी तुटक रेघेनें (बोलनखिंड ते अटक ते बराडी).

प्रकरण १६ वें

मराठी सैन्याची कत्तल व पराभवाची मीमांसा

१३६. यानंतर इकडे **पार्वतीबाईचे** बंदोबस्तास **विसाजी कृष्ण जोगदेऊ**[1] यास पांचशें[2] धनगर नेमून दिल्हे. रखवालीस बारगीर[3] ठेविले होते. त्यांस आज्ञा केली होती कीं, "आम्हीं झुंज[4] पार होऊन निघालों आसें कळलें तरी तुम्ही यांस घेऊन दिलीच्या रोखें आमच्या मागें पिछाडीस निघोन यावें. रणांत पडलों आसें वर्तमान ऐकिल्यावर यांसीं जिवें मारून तुम्हीं निघोन जावें. आसें सांगितलें होतें. **भाऊसाहेब** यांची स्त्री गिलजांचे हातीं[5] सांपडली होती असा लौकिक मात्र न व्हावा; आसें करावें." असें निश्चयरूप सांगून त्यांस रखवालीस ठेविलें होतें. तों मोड जाहाला, लोक[6] पळों लागले. ते समयीं **विसाजी कृष्ण** व लोक यांणीं धास्ती खाऊन बाईची आस्था सोडून आपला जीव वांचवावयाची आशा धरून कोणीकडे गेले हें न कले. **भाऊसाहेबांनीं** सांगितल्याप्रमाणें कांहींच घडलें नाहीं.[7] तों एक घटका दिवस राहिला. ते समयीं **पार्वतीबाई** अंबारींत होती. तिनें हत्ती बसवून पायउतारा होऊन बुणग्याचे सुमारें पलों लागली. केवल भांबावली. घरचा पोरगा कोतवाल घोडी घेऊन उभा होता.[8] तों बाईसाहेबांस घोड्यावर बसावयास देहेभान राहिलें नाहीं. तशांत **जानू भिताडा** म्हणून खिजमतगार येक जवल राहिला होता. त्याणें हिंमत धरून सोबतीस[9] होता. तशा आकान्तांत **बारबेकर**[10] म्हणून होता. मातबर मनुष्य. घोडीहि सख्त पाठाळ[11], त्याची गांठ पडली. तेव्हां त्यास बोलिली कीं, "मी **भाऊसाहेबांची** स्त्री आहें. मजला घोड्यावर घ्यावें" म्हणतांच तोहि मनुष्य भला चांगला होता. तो हिंमत धरून बोलिला कीं, "**बाईसाहेब**, रिकिबीस पाय देऊन घोड्यावर यावें." म्हणतांच तिणें रिकिबीस पाय दिल्हा. मग भला माणूस याणें हात देऊन[12] पाठीवर घेतली. मग तिच्याच साल-

---

१. 'जीगदंड' सा. १९२२. 'जोग' शें. मं. व भा.

२. 'आणि सरकारचे खास पागेचे बारगीर पांचशें." असें क. प्रतींत आहे.

३. 'बरोबर' सा. १९२२.

४. 'झुंजून' सा. १९२२ व भा.

५. 'जिवंत' हा शब्द सा. १९२२ त अधिक.

६. 'लोक' हा शब्द भाइसं. मध्यें नाहीं. सा. १९२२ त आहे.

७. हा जोगदंडाचा, भाऊचे आज्ञेचा वगैरे मजकूर तुं. प्रतींत नाहीं.

८. यापुढें "तो 'बाईसाहेब' घोडीवर बसावें' असें म्हणो लागला." हें वाक्य सा. १९२२ त अधिक

९. 'सोबत दिली' सा. १९२२

१०. 'बारवकर' सगजो. व भा.

११. हा शब्द भाइसं मध्यें नसून, सा १९२२ त आहे.

१२. हे शब्द भाइसं मध्यें नसून सा. १९२२ त आहेत.

जोडीनें कंबरेस पाठीमागें आंवळून बांधिली. भोंवतालें नजर केली तों गिलजे[१३] भोंवतालें. मागेंपुढ ढिगांचे ढीग देखिले. तेव्हां बाईस बोलिला कीं, "बाईसाहेब, निभावणीचें संकट दिसतें. असो. तुमचे सुकृतें तरी पार पडल्यास जाऊं." म्हणोन त्याणें डोळे झांकून फौजेंतून घोडे हांकललें. तों बाईचें पुण्य सबल, म्हणोन आशा अरिष्टांतून पार पडली. तों दिवस अस्तमान जाहाला. कोसभरपर्यंत गिलजे यांणीं पाठलाग केला;[१४] परंतु आशा अरिष्टांतून पार पडलीं. **नाना**[१५] **फडणवीस** यांची मातोश्री श्री**भागीरथीचे** यात्रेस जावयासी आली होती ती गिलजास सांपडली. तिची गत पुढें काय जाहली न कळे.[१६] **नाना फडणवीस** अल्पवयीच होते. ते गडबडींत कोणीकडे उधळून गेले ते निभाऊन पळाबरोबर आले. **नाना** याची स्त्री होती. ती रणांतून बाहेर आलियावर तिणें घोडी टाकून दिल्ही.[१७] ती पायउतारा होऊन अंगावरील वस्ता[१८] काढून फाटकें वस्त्र नेसून अंगास माती लावून दिल्लीच्या रोखें गेली.

१३७. दुसरें वर्तमान झुंज झाल्यावर झुंजांतून मातबर सरदार लहानथोर किती एक लोक आले ते पश्चिमेकडे[१९] झुजांत तळावर खंदकांत येऊन दाखल जाहाले. तों **भाऊसाहेब** माघारे पळोन पूर्ववत्प्रमाणें तल बलकावून राहात्या जाग्याहून[२०] नित्य झुंजास जात, संध्याकाळ जाहाली, माघारें येत, त्याप्रमाणें येतोल म्हणोन बुणगेसुद्धां फिरोन तळावर दाखल जाहाले. तों तेथील बुणगे व फौज पळती तेव्हां तेथेंहि धीर धरवत नाहीं, आसें जाहालें. मग[२१] तेथून जिकडे वाट सांपडली तिकडे पलत चालिले. ज्यांच्या घोड्यांत जीव होता ते खंदकापार जाहाले. आणि **पाणिपत** शहरांत गेले. तेथून जिकडे वाट पडली तिकडे पलत चालिले. ज्यास जसा मार्ग द्रष्टीस पडला तसे निघोन गेले. कितीएक गाडचा[२२]

---

१३. 'गिलजाचे फौजेच्या टोळचांच्या टोळचा देखिल्या' असें येथें क. प्रतींत वाक्य आहे.

१४. यापुढें 'परंतु पाठाळ सक्तशीर होतें' हें वाक्य सा. १९२२ त असून सा. १८७९, १८८६ त नाहीं. 'पाठाळ' च्या ऐवजीं 'पाठबळ' असा शब्द क. प्रतींत आहे.

१५. येथें क. प्रतीचा पाठ :—"नाना फडणीस याची स्त्री व मातोश्री अंबारींत होत्या. त्या अंबारींतून उतरल्या आणि घोड्यावर स्वार जाहाल्या."

१६. 'तिची यात्रा सफळ जाली' सा. १९२२.

१७. 'तिजला घोडीनें टाकोन घोडी उधळून गेली' क. प्रत.

१८. 'दागिनें' सा. १९२२ 'बगलेस मारून' क. प्रत.

१९. 'पश्चिमेकडून' शें.

२०. 'नित्य' शब्दापूर्वी 'या मार्गे' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

२१. या पुढें "निराशा जाणोन" हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत; पण सा. १८७९, १८८६ त नाहींत.

२२. हे शब्द सा. १९२२ त नाहींत.

व छकडे[२२] व बायका वगैरे अवसानरहित होते ते खंदकांत पडले. त्यांस निघावयास आवसान जाहालें नाहीं. ते तेथेंच राहिले. गिलजे डोचकीं कापीत होते. तीं कापावयाचीं सोडून दिलीं. कोठवर कापितील[२३]? मोडली फौज तितकी दिलीस गेली. लोकांनीं[२४] कुरुक्षेत्रास व कोणी आडवे तिडवे मार्ग फुटले तिकडे गेले.[२५] तितकाहि निभाव नाहीं[२६] ते गिलजांस सांपडले[२६]. इकडे गिलजे यांणीं पाणिपत शहराचा बंदोबस्त करून खंदकांतील मालमत्ता लुटूं लागले. बायका धरून नेल्या. कितीएक जिवें मारिल्या. तीच गत पुरुषांची केली.

१३८. प्रातःकालीं चार घटका[२७] दिवसानंतर झुंजास तोंड लागलें तें तीन प्रहर हाणा ! हाणा ! मारा ! मारा ! हेंच[२८]. पृथ्वीनें लोकांचें[२९] अशुद्ध प्राशन केलें. हिंदु[३०] कधीं मागें याप्रो लढले नाहींत व मोडले नाहींत. याप्रो वखत घडला नाहीं. यापुढेंहि होणार नाहीं. आसो. भगवंताची करणी. पृथ्वींतील लोकनेहवून त्या स्थळीं मारावे हें कौतुक निर्माण केलें. मराठे लोक फौज हटले, कधींच मेले नव्हते. आपला भोंवता खंदक खणून कोणी राहिला कीं काय ? हें मराठे लोक यांणीं कधींच केलें नव्हतें. मराठे यांची चांगली गांठ पडली तरी झुंज द्यावें, नाहींतरी पळोन जावें, मराठी धर्म याप्रो पुरातन चालत आला आहे. तेणें करूनच पृथ्वीचें पालन[३१] केलें होतें. तें सोडून अविंध धर्माचा हुदा[३२] केला, तो[३३] मराठी धर्म नव्हे.[३३] म्हणोन आसें वानरतेल निघालें आणि[३४] पृथ्वींतील[३५] दक्षिण प्रांतांचे पुरुष[३५] व बायका बहुत गैब जाहाल्या. ईश्वरसत्ता प्रमाण. त्याप्रो जाहालें. **नानासो** व **भाऊसो** ईश्वरी अंश. आवतार धरून या कलियुगीं उभयतांनीं[३६] चरित्रें केलीं. आसो.

---

२३. यापुढें 'कंटाळले. त्यांची हौस पूर्ण जाली.' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

२४. 'वरकड कोणी' सा. १९२२.

२५. 'तीं कांहीं निभावलीं नाहींत.' सा. १९२२.

२६. 'ते गिलजास सांपडले.' हें वाक्य सा. १९२२ त नाहीं.

२७. "प्रातःकाळच्या प्रहर दिवसानंतर" सा. १९२२.

२८. यापुढें "जाहालें" हा शब्द सा. १९२२ त. "शब्द होऊन" शें.

२९. 'बहुत' सा. १९२२

३०. "हिंदु जात याप्रमाणें कधींच लढले नाहींत व असा मोडहि मागें जाहला नाहीं. याप्रमाणें ईश्वरानें भूभार हरण केला. नानासाहेब व भाऊसाहेब हे ईश्वरी अंश. अवतार धरून या कलियुगीं उभयतांनीं अशा चरित्रानें भूभार हरला." इतकेंच सां. प्रत लिहिते. तुं. प्रतीत असें कांहीं नाहीं.

३१. पलाण' सा. १९२२.

३२. 'अविलंब' सा. १९२२.

३३. हे शब्द सा. १९२२ त नाहींत.

३४. 'पृथ्वीचे' सा. १९२२, 'पृथ्वींतील' शें. 'पृथ्बी' भाइसं.

३५. 'लोक' सा. १९२२.

३६. 'यांणीं' सा. १९२२. 'उभयतांनीं' क. प्रत.

१३९. यानंतर इकडे युद्ध[३७] होतां होतां रात्र जाहाली. लढाई बंद जाहली. हत्यारें राहिलीं. विश्वासराव यांच्या मुडद्यासुध्धां हती अंबारीसुध्धां सुजायतदौला याजकडे नेला होता. ते समयीं सुजायतदौला याजकडील उमरावगीर गोसावी[३८] याणें मागती आणखी तीन लक्ष रुपये देऊन विश्वासराव व तुकोजी होलकर[३९] व संताजी वाघ व येश्वतराव पवार असे चार मुडदे सोडवून आपलेकडे घेतले. ब्राह्मण मराठे मिळवून, त्यांस विधियुक्त अग्निसंस्कार साहित्य उत्तम प्रकारें[४०] करून मुडद्यांस दहन केलें. आणि अस्थीहि वाराणशीस रवाना केल्या.

१४०. वरकड फौज[४१] नाना पुरंदरे व बाजी हरी व अंताजी माणकेश्वर व मल्हारराव होलकर आसे मात्र[४२] दिलीचे सुमारें चालिले[४३]. परंतु तमाम लोकांची हिंमत हरली. गुरांचे[४४] गोवरे जाहले.[४४] रांडांनीं मारिलें तरी कोणी कोणास मिलेनासे[४५] जाहले. रात्रीचे[४६] लढाईंत[४६] अंताजी माणकेश्वर व बाजी हरी ठार जाहाले. त्यांचे मुडदे देखील कोणीं काढिले नाहींत. वेडावल्यासारखीं माणसें जाहलीं. एवढे श्रीमंत त्यांच्या गती या प्रकारच्या जाहाल्या. 'कर्मणो गहना गतिः' असें जाहलें.[४७]

१४१. मग कुतुबशाहा व सैदखान कतलबाज याच्या पुत्रांनीं शाहास आर्ज केला कीं, 'आम्हांस कतल करावयास आज्ञा द्यावी" असें म्हणतांच आबदल आली बोलिला कीं, "मारले यास काय मारावें? यांत काय भूषण?" आसे ऐकोन मागतीं आर्ज केला कीं, "आमचा बाप कुतुबशा फौजसुध्धां कत्तल केले, त्याचा सूड उगवावा लागतो." आसें बोलोन उभे राहिले. तेव्हां आबदल आली बोलिला कीं, "येथून वीस कोसांवर चार घटकांपर्यंत कत्तल करणें. जास्ती न करणें" आसें ऐकल्यावर कुतुबशाहाचे पुत्रानें सोनपतानजीक चार हजार फौजेचें[४८] कतल केलें. तैसेंच आमदखान[४९] लंगडा याचे पुत्रानें बहादर-गडानजीक येऊन

३७. 'झुंज' सा. १९२२.

३८. 'म्हणोन सरदारी करीत होता' हे शब्द सा. १९२२ त अधिक.

३९. 'शिंदे' सा. १९२२.

४०. हे शब्द भाइसं. मध्यें असून सा. १९२२ त नाहींत.

४१. 'मोडकी फौज' सा. १९२२.

४२. 'रात्रौ' सा. १९२२.

४३. "भाऊसाहेब यांची गत काय जाहाली ही यांस शुद्धच नाहीं. आपला प्राण वांचवून निघाले" हीं वाक्यें क. प्रतींत अधिक आहेत.

४४. 'गाईचे गोरे आले' सा. १९२२ 'गाईचे गौर जाले' पु. प्रत. 'गुरांचे गुराखी असतात तसें जाहाले' क. प्रत.

४५. 'मिले असें नाहीं' भाइसं.

४६. 'रात्रौ दांडग्यांच्या हुलडींत' सा. १९२२.

४७. यापुढें तं. प्रत म्हणते :—"भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई यांची व नाना पुरंदरे याची गांठ पडली. मग त्या बारवकरानें त्यांचे स्वाधीन केली."

४८. 'मनुष्यांची' सा. १९२२.

४९. 'सैमदखान कत्तलबाज' सा. १९२२.

पांच हजार मनुष्याचें कतल केलें. पानपत शहरांतील[५०] दरवाजे बंद करून बंदीवान[५१] धरिले.[५२] तेव्हां ताकीद जाहली कीं, 'माणसांस न मारावें. मालमत्ता घेऊन सोडून द्यावें.' त्याजवरून दुसरे दिवशीं कोणी मारिले नाहींत. बंद धरिला, तो वीस हजारपर्यंत आणिला. दोन दिवसपर्यंत लष्करांत[५३] होते. त्यास **सुजायतदौला** याणीं **गिलज्यास** तीन लक्ष रुपये[५४] देऊन धर्मार्थ सोडून दिल्हे. रणांतहि **सुजायतदौला** याणें शोध करून मातबर–मातबराची ओळख ज्याची निघाली त्यास नेऊन[५५] उत्तम गति केली. लष्कराचे लुटीनें **गिलज्याचे** लष्कर कुबेर जाहालें. घोड्यास कोणी पुसेनात, तेथें वरकड लूट कोण घेतो ! ज्यास[५६] गाढव प्राप्त नव्हतें त्यास हती प्राप्त जाहाला !

१४२. यानंतर इकडील पळाचें वर्तमान तरी किती एक घोड्यांचे सामर्थ्यें दिलीस पांच सात हजारास रस्ता ज्यांस सांपडला ते निघाले.[५७] वाटेस दांडग्यांनीं मारामार नागवानागव[५८] करून कितीएकांचीं घोडीं घेऊन सोडिलें कितीएक जिवानिशीं गेले.[५९] त्याहीमध्यें ज्यांचे घोडियास बराच जीव होता, ते सरासरी पांच हजार माणूस वांचून[६०] गुरुवारीं सायंकालीं दिलीस चालीस कोस मजल दर मजल दाखल जाहले. कितीएकांस दुसरा मार्ग सांपडला नाहीं,[६१] ते भकोन[६२] आड मार्गांत[६३] फिरत फिरत जिकडे भगवंतें वाट दिल्ही तिकडे गेले ! ![६४]

---

५०. यापुढें 'दुसरे दिवशीं' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

५१. या शब्दापूर्वी 'पंधरा हजार' हे शब्द सा. १९२२ त आहेत. 'दहा हजार' शें. प्रत.

५२. यापुढें 'व खंदकांतीलहि बंद धरिला' सा. १९२२. 'बंदिवान धरिलें' शें.

५३. हा शब्द सा. १९२२ शे. मं. व भा. प्रतींत.

५४. यापुढें 'खंडणी' हा शब्द सा. १९२२ त अधिक आहे.

५५. 'नेऊन' हा शब्द शें. व सा. १९२२ त आहे.

५६. 'गाढव घेण्याची ज्यास शक्ती नाहीं, त्यास हत्ती प्राप्त जाला" क. प्रत.

५७, 'निघोन जावें' भाइसं.

५८. 'जागोजाग' सा. १९२२.

५९. 'जिवें मारिले' सा. १९२२.

६०. 'वांचून' हा शब्द सा. १९२२ व शें. मधील.

६१. 'नाहीं' हा शब्द सा. १९२२ मधील.

६२. 'भडकोन' शें.

६३. यापुढें 'पडले ते' हे शब्द सा. १९२२ व शें. मध्यें अधिक आहेत.

६४. यापुढें "ज्यांचें आयुष्य बळकट होतें ते मात्र जगले" हें वाक्य सा. १९२२ त अधिक आहे.

प्रकरण १७ वें

मराठी फौजेचा पळ व जाटाचें औदार्य

१४३. यानंतर **पार्वतीबाई** यांजपाशीं **जानू भिताडा** खिजमतगार,[१] बारवेकर[२] याणीं पाठीसी बांधून आणिली. त्यावर तें घोडें थकलें.[३] मग **पिराजी राऊत पुणतांबेकर**[४] याणें पाहतांच आपले घोड्यावर बसवून सोळा[५] कोसपर्यंत आणिली- मग त्याचाहि घोडा थकला. त्याणें उतरून ठेविली. पुढें[६] **जानू भिताडा** खिजमतगार याणें कोस आर्धकोस चालवीत आणिली. आणि बलकट घोडा मातबर पाहून त्याचे पाठीं बसवावी आसें करीत करीत **दिल्लीकडे**[७] तीन मजलीवर **मल्हारराव होळकर** व **नाना पुरंदरे** व कितीएक सरदार व पागेचे बारगीर, शिलेदार[८] शेंपन्नास भेटले, त्यांमध्यें येऊन मिळाली. **बलवंतराव** याचा पुत्र **आपाराव** तोहि निभावून आला. **पार्वतीबाईचे** चित्तांत कीं, भ्रतार दिलीस आले असतील, म्हणोन बहूतच आशा होती.

१४४. तों **दिलीकडील** मार (शक १६८२ पौष शु॥ ८ : १४–१–१७६१ जखर ६ बुधवारीं[९]) तीन प्रहरपर्यंत युद्ध होऊन मोड जाहाले[१०], ते गुरुवारीं (पौष शु॥ ९ ता. १५–१–६१ जखर ७) प्रातःकालीं कितीएक पळत आले. तेथें **नारो शंकर व मीरखान**[११] व **बाळाजी पलांडे**[१२] आसे सहासातसें किलियांत होते. बाकी हुजरातीचीं पथकें **लक्ष्मणराव गावडे** व **हिरोजी शेलके** व **तुकोजी वाघ**[१३] व **बापूजी**

---

१. यापुढें 'व' हा शब्द सा.१९२२ त अधिक.

२. 'बारवकर' तुं.प्रत. 'वाटर्णेकर' भा. इ. सं. 'वारणकर' भा. इ. सं. व मं. 'हर्णेकर' शें.

३. "तेव्हां जानू व वरणकर कोणी मराठा या दोघांनीं बाईस पाठीशीं बांधून चालविली. इतक्यांत पिराजी राऊत पुणतांबेकर आला." अशीं वाक्यें क. प्रतींत अधिक आहेत.

४. 'तांबवेकर' मं. हा शब्द सा. १९२२ त नाहीं; भा. इ. सं.मध्यें आहे.

५. 'साहा' सा. १९२२. 'सोळा' सां. व क. प्रती.

६. 'पुनः' सा. १९२२.

७. 'दिल्ली अलीकडे' सा. १९२२.

८. हा शब्द भा. इ. सं. मध्यें नाहीं.

९. यापुढें "अष्टमीस" हा शब्द सा. १९२२ त अधिक.

१०. येथें क. प्रतीचा पाठ असा :– "तेव्हां फौजेस पळ सुटला. त्यांपैकीं कांहीं लोक गुरुवारीं सायंकाळीं बुधवारची रात्र व गुरुवारचे चार प्रहर चालोन पळत येऊन दिल्लीस दाखल जाहाले."

११. 'मीरखान लेकवळा' सा. १९२२. 'तिरखा नबाब बाळाजीपंत असे सहा सात' धो. प्र.

१२. 'पंत' भा. इ. सं.

१३. 'तलखाजी बांधे' सा. १९२२ 'बहिराजी शळके व तुकोजी वाघ' क.प्रत.

रायाचें पथक व पर्वतराव कदम व गोविंदपंत बुंदेले याचा पुत्र पांचशें स्वारांनिसीं आसे तीन हजार होते. दिलीच्या किल्ल्यांत **नारो शंकर** होते. त्या समयीं त्यांजपाशीं चाळीस लक्ष रुपये खजिना होता.

१४५. पार्वतीबाई दिलीनजीक येतांच **भाऊसाहेब** नाहींत, म्हणोन ऐकतांच आशेची निराशा जाहाली.[१४] पळाचे स्वार तीन हजार बरोबर जमले होते[१५] त्यांस सर्व[१६] पळाचें[१७] वर्तमान कळलें; परंतु तहकीक कळेना. कदाचित् **दिलींत भाऊसाहेब**[१८] आले असतील, [हे] अगोदरच पळाले. आसें जाहलें असल्यास तोंड दाखवावयास जागा नाहीं, यास्तव धीर धरून राहिले. दक्षिण[१९] देशांतील लष्करचे उदमी लोक तितके शहरांत जाऊन राहिले होते. त्यांस शहरचे[२०] लोक लुटूं लागले व मारूं लागले. वाटेस[२१] पथकें होतीं. त्यांणीं गुरुवारीं (पौष शु॥ ९ ता. १५–१–६१) तिसरा प्रहरपावेतों वाट[२२] पाहिली.[२३] मग 'ज्यां ज्यां' करीत निघाले. **नारो शंकर** वगैरे किल्ल्यांत होते. ते गुरुवारीं सायंकाळपर्यंत धीर धरून होते. कांहीं खजिना सरकारचा होता. तो अगोदरच कडेस काढून, बाहेरील पथकें व आपण एकत्र होऊन निघोन गेले असते[२३] तरी निभाऊन जाते.[२३] आतां[२४] तरी निभाऊन जावें[२४] तें न जालें. संध्याकाळीं **होलकर** यांचे दिवाण **गंगोबा तात्या** पळत[२५] आले. **नारो शंकर** यांजकडे त्यानें भोजन[२६] केलें. सविस्तर वर्तमान सांगितलें. "याजउपर "ज्यांस मार्ग भगवंत देईल त्यांणीं निघोन जावें. सुधा विचार[२७] दिसत नाहीं. तुम्हीं कां स्वस्थ[२८] बसलां ?'' असें **नारो शंकर** यांस सांगितलें.[२९] तेव्हां आवसानें गेलीं. खजिना काढावयास आनुकूल पडलें नाहीं. दिलींतील वाणी[१]

---

१४. येथें क. प्रतीचा पाठ असाः– "बाईबरोबर तीन हजार स्वार नेमिले होते, त्यांस पळाचें वर्तमान 'कीं मोड झाला, असें ऐकतांच बाईस टाकून देऊन दिल्लीचा रस्ता घेऊन पळाले ते दिल्लीस आले. त्यांस तहकीक बातमी लागेना. मोठे फिकीरींत पडले. भाऊसाहेब मागाहून आल्यास शब्द ठेवितील कीं, आम्हांस सोडून आलां. असें जाहाल्यास खावंदांस तोंड काय दाखवावें, या फिकीरीस्तव धीर धरून राहिले."

१५. यापुढें "ते बाहेर वाळवंटींत होते" हें वाक्य सा. १९२२ त अधिक.

१६. 'सर्वांस' सा. १९२२. 'अर्धे' शें.

१७. 'पक्कें' मं.

१८. यापुढें 'पळोन' हा शब्द भा.इ.सं. मध्यें अधिक आहे.

१९. 'दक्षिण' हा शब्द सा.१९२२त आहे. सा. १८७९ व १८८६ त नाहीं.

२०. हे शब्द सा. १९२२ त आहेत.

२१. 'वाळवंटीस' सा. १९२२.

२२. 'धीर धरून होते' सा. १९२२.

२३. हे शब्द सा. १९२२ मधील.

२४. हे शब्द सा. १९२२ त नाहींत.

२५. 'दिल्लींत आले' सा. १९२२.

२६. हा शब्द सा. १९२२ मधील.

२७. 'मार्ग' सा. १९२२.

२८. 'डोळे झांकून सा. १९२२.

२९. यापुढें 'आणि ते स्वार होऊन तैसेच निघून गेले' हें वाक्य सा. १९२२ त अधिक.

बकाल, बायका,[३०] लष्करच्या लोकांस मारूं लागल्या. गर्दी करून लुटूं[३१] लागल्या. शहरांत धूम बहुत जाहाली. तेव्हां जिवानिसीं मारामार करीत **नारो शंकर** वगैरे झाडून[३२] निघून गेले. खजिना जाग्यावर राहिला. अगोदर वाळवंटीचीं पथकें निघालीं. तों **फर्दाबाजेस** जाऊन पोहोंचलीं, आणि जीन उतरलें. **नाना पुरंदरे** व **गंगोबा तात्या**[३३] आणखी शेंपन्नास असे तेहि आले. सारे एकत्र होऊन तीन मजला आले. तों **होलकरांची**[३४] व बायकांची गांठ पडली. तेथून मजल दरमजल कूच करून आकरावे (पौष व. ५ मंगळवार ता. २५-१-१७६१) दिवशीं **भिंडीस**[३५] **येऊन दाखल**[३६] जाहले.

१४६. इकडील वर्तमान कितीएकांस **दिलीचा** मार्ग सांपडला, ते यांच्या मागोमाग[३७] **भिंडीवर** आले. वाटेनें कितीएक[३८] जिवें मारिले. कितीएकांस लुटून सोडून दिल्हें. **दिलीचा** मार्ग[३९] न सांपडला आणि भकोन[४०] गेले[४१] ते फिरत फिरत जातां जातां ते चाळीस[४२] हजार जमले. त्यांस पंचवीस पन्नास दांडगे मिळोन लुटून घोडीं हिरावून[४३] घेतलीं. असा अनर्थ होऊन मातबर मनुष्य पायउतारा जाहले. बहुतांस आन्न कोठें मिळालें[४४] कोठें न मिळालें.[४५] मग आवघे जमून **मथुरेस** येऊन एक दिवस दम खाला. तों हजार[४५] मनुष्य थोर थोर नागवे उघडे केवळ भिकारी[४६], भीक[४७] मागत, आन्नरहित व वस्त्ररहित, कळाहीन चीलची[४८] भाजी खात आले. तों जाटाच्या मुलखांत पोहोंचले. तों जाटाचें भय[४९] बहुत होतें; परंतु त्याणें[५०] वर्तमान ऐकोन हिंदुधर्मास भिऊन तमाम मुलखांत सांडणी-

३०. यापुढें 'देखील गांव-कुटार' हे शब्द सा. १९२२ त असून सा. १८७९ व १८८६ त नाहींत.

३१. 'लुटूं' सा. १९२२ 'हसूं' भा. इ. सं. 'पळूं' मं.

३२. यापूर्वी 'कुल' हा शब्द सा. १९२२ त अधिक.

३३. 'बाळकोबा' क. प्रत.

३४. 'होलकरांच्या बायकांची' भा. इ. सं.

३५. 'भिवंडीस' भाइसं.

३६. 'येऊन' हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

३७. 'दिल्लीस [व तेथून]' हे शब्द यापुढें सा. १९२२ त अधिक आहेत.

३८. 'कितीएकांनीं' भाइसं.

३९. हा शब्द शें. व सा. १९२२ मधील आहे.

४०. 'आडमार्गे पायानें (जे) गेले' सा. १९२२.

४१. 'तीस' सा. १९२२.

४२. 'हिरोन घेईत' सा. १९२२.

४३. हे शब्द सा. १९२२ त नाहीं.

४४. 'मिळे' सा. १९२२,

४५. हजारों हजार' सा. १९२२.

४६. 'भणंग. कंगाल' सा. १९२२. 'कंगालासारिखे' शें.

४७. 'भीक मागत' हें शब्द सा. १९२२ त नसून भाइसं. मध्यें आहेत.

४८. 'चालत' भाइसं.

४९. यापुढें 'पूर्वी भाऊंशीं बिघडून गेला असल्यामुळें' हे शब्द सा. १९२२ त अधिक.

५०. यापुढें "तो थोर" हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

स्वार पाठवून ताकीद केली कीं, "कोणास न छळतां ज्यास जसें आनुकूल पडेल तसें आनवस्त्रें द्यावीं." याप्रो ताकीद जाहली. वाटेस एक गांव मातबर होता तेथें एका सावकारानें भिक्षेस खंडीभर उडीद ठेविले[५१] होते.[५१] तेव्हां येकामेकांनीं जसी मिळाली तसी घेतली.[५२] येक दोन मणाच्या[५३] भाकऱ्या करून त्याचे पैशा-एवढे तुकडे येक येक वांटिला. असी भिक्षा घातली. अंगावर वस्त्रें नाहींत. त्या[५४] शहरापावेतों[५४] अकरा दिवस आन्न मिळालें नाहीं. त्यांत पौष मास, थंडीचे दिवस. प्रावरणास[५५] एकंदर अंगावर कांहीं नाहीं. मातबर होते ते दीनाप्रो होऊन पंधरावे (पौष व. १०, ३०–१–१७६१) दिवशीं भरतपुरास येऊन दाखल जाहाले. तेथें जाट याची बायको होती. तिणें धर्म बहुत केला. जागां जागां स्वार पाठवून पळाचे लोक आणिले, आणि पायली प्रो दर माणसास तीस हजार आणोन[५६] जो[५७] आला त्यास[५७] आठ रोजांचें आन्न भरतपुरीं द्यावें, वस्तीस जागा द्यावा, भल्यास आपल्या महालापावेतों दस्तक द्यावें व ब्राह्मण होते त्यांस बोलावून[५८] दूध, पेढे वगैरे मिठाई व सिधे सरंजाम देऊन आठ रोजांची बेगमी केली. दर ब्राह्मणास येक दिवस फराळास व पांच रुपये दक्षणा व येक पागोटें व येक रजई व येक धोतरजोडा व आठ रोजांचा सिधा बहुत प्रकारचा तूप साखर[५९] सुद्धां सिधा[५९] देऊन शहरास ब्राह्मणांस आराम पावावयास राहून घेतलें. आणि शहरांत ताकीद केली कीं, "पळास आन्न द्यावें. राहतील तेथें वस्तीस जागा द्यावा. कोणी छळूं नये." आसें बहुतांस ताकिदी करून मातबर कोणी भेटले त्यांस बसावयास घोडीं दिल्हीं व कोणास पालखी दिल्ही. याप्रो सर्वत्रांस[६०] सरंजाम[६०] करून दहा लक्ष रुपये-पर्यंत खर्च केला. तेणें करून बहुत लोक जगले. तेथून पुढें[६१] येतांना मार्गीं दांडगे यांनीं वस्त्रे हिरोन घेतलीं. लघडे बोडके झडत पडत भिंडेस दाखल जाहाले. पार्वतीबाई व होलकर व नाना पुरंदरे आसे सर्वत्र जमा जाहले होते. तेथें पंधरा मुक्काम जाहाले. तेव्हां सुरजमल जाट याणें रूपराम कटारी यासमागमें लक्ष रुपये ब वस्त्रें मजलीवर[६२] पाठवून दिल्हीं. तेथून मल्हारराव होलकर व नाना

---

५१. 'वांटले' शें. व सा. १९२२.

५२. 'तेथें एक एकास दाहा दाहा दाणे वांटणीस आले' सा. १९२२.

५३. 'मण पीठाच्या' शें. व सा. १९२२.

५४. 'ब्राह्मणांस' सा. १९२२.

५५. 'पांघरावयास' मं. प्रत.

५६. 'काढून' सा. १९२२.

५७. 'सर्वत्रांस' सा. १९२२.

५८. 'निवडून नेऊन' सा. १९२२.

५९. हे शब्द सा. १९२२ त नाहींत.

६०. 'सर्वत्रांचा समाचार' सा. १९२२.

६१. 'तेथून'च्या पुढें 'फिरून' हा शब्द सा. १९२२ त अधिक.

६२. 'मथुरेवर' सा. १९२२.

पुरंदरे व **पार्वतीबाई** वगैरे येक महिना **ग्वालेरीस** जाऊन राहिले. पळाचे लोक होते त्यांस सर्वत्रांस वस्त्रें व पांच रुपये खर्चास बाईंनीं दिल्हे. व **नाना पुरंदरे** यांणीं तेथून बैरागी **भाऊसो** यांच्या शोधास पाठविले; परंतु **भाऊसो** यांचा ठिकाण कोठें लागला नाहीं. घायाल **समशेर बहादर कुंभेरीस** आला. तेथें **सुरजमल जाट** याणें त्याची उठाठेव बहुत प्रकारें[६४] करून घोडीं व पालखी देऊन वाटेस लाविलें. तों **समशेर बहादर** याणें "**नानासो** यांस तोंड काय दाखवावें" म्हणोन, भाऊ! भाऊ! असा शोक करून [तो] निधन पावला.

६३. 'वगैरे' हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

६४. हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

प्रकरण १८ वें

नानासाहेबांचें सहाय्यार्थ आगमन पण शोकाने परत गमन व निधन

१४७. यानंतर दोनचार रोजांनीं **दुराणीहि**[1] **दिलीस** पोंचले. तेव्हां **इब्राम-खान गाडदी** रणांत घायाळ सांपडला. त्यास आपणाकडे चाकरी ठेवावें[2] म्हणोन रदबदली घातली; परंतु चाकरीस राहावयास आनुकूल पडलें नाहीं. आणि[3] बोलिला कीं, "**भाऊसाहेब** यांचें व आमचें वचनाचें इमानप्रमाण जालें आहे. त्यास[4] आसी गोष्ट आपणापासून कदापि घडणार नाहीं" म्हणोन साफच जाबसाल केला.[5]

१४८. यानंतर इकडील मार **पुणेंहून नानासाहेब पैठणावर** आले होते, तेथें आपलें लग्न केलें. आणि **दादासाहेब** यांजसमागमें कांहीं फौज देऊन **निजाम आलीखान** याचे तोंडावर रवाना केलें. आपण दहाबारा हजार फौजेनिसीं कूच करून मजल दरमजल **बराड** देशास **बाळापूरचे** प्रांताचे रोखें येऊन उतरले. तेथें **जानोजी भोंसले** सेनासाहेब सुभा येऊन भेटले. त्यांचें बहुत[6] समाधान केलें. आणि हिंदुस्थानांत जावयास समागमें घेतलें. पांच सात हजारांनिसीं तेहि सामील होऊन समागमें चालिले. **नानासाहेब** यांजबरोबर **बाबूजी नाईक बारामतीकर** व **गोपाळराव गोविंद** व **सदाशिवराव रामचंद्र** व **विठ्ठल विश्राम** व **यमाजी सिवदेव**[7] व खासा स्वारी फौजेनिसीं[8] पौषमासीं शुक्लपक्षीं (जानेवारी १७६१) **तलेगांव**, परगणें **आडगांव**, प्रांत **वऱ्हाड** येथें दाखल जाहले. ते मुकाम करून* **हरि अंणाचा** निघण्याचा करार करून **विंध्याद्री** पर्वत येथील **गोंडाचा** राजा आणून त्यास वस्त्रें, अलंकार, कडीं, शिरपेंच बक्षीस देऊन समाधान करून चालिले. **सातपुड्या**पार होऊन **नर्मदावरी** मुकाम केला. तेथून **जानोजी भोंसले** व हुजराती पथकें, **खेचवाडीकर** बेइमान जाला होता, त्याच्या पारिपत्यास **खेच-वाडी** मुलखांत पाठविलें. **नानासाहेब** आपले फौजेसुद्धां मुकामावर होते. तेथें वर्तमान ऐकिलें कीं. पळाचे लोक उघडे बोडके आले. त्यांणीं **श्रीमंतापाशीं** सर्व

---

१. या शब्दापुढें 'मागें इकडे' हे शब्द सा. १९२२ त अधिक आहेत.

२. 'राहावें' सा. १९२२.

३. हे शब्द सा. १९२२ त नाहींत.

४. 'यास्तव' सा. १९२२.

५. या पुढें "ऐसें जालियावर त्याचा शिरच्छेद केला" हें वाक्य सा. १९२२ त अधिक आहे.

६. 'बहुत प्रकारें' सा. १९२२.

७. 'शिंदे' भाइसं.

८. हा शब्द सा. १९२२ त नाहीं.

* या ठिकाणीं सामान्यतः ज्या प्रतीचें अनुलेखन केलें ती प्रत अशीच अपुरी सांपडली. यापुढें साने प्रतींतील मजकूर उद्धृत केला आहे.

९. तेलगांव सा. १९२२.

सविस्तर वृत्तान्त निवेदन केला. ते समयीं श्रीमंतांनीं ऐकोन खेद बहुत केला. **नानासाहेब** यांचा निश्चय पूर्ण होता कीं, **दिल्लीस** आपण जाऊन **गिलच्यांचें** पारिपत्य करावें. अशी विचारणा करून बंदोबस्त केला होता. त्यांस सौभाग्यवती **गोपिकाबाई** यांणीं बहुत बोध करून माघारें फिरविलें. कूच करोन मजल दर-मजल उतरून **बऱ्हाणपुरास** दाखल जाले. इकडील **ग्वाल्हेरीहून**[१०] **पार्वतीबाई** व **नाना पुरंदरे** वगैरे **श्रीमंतांस** येऊन भेटले. आणि सकल वर्तमान **हिंदुस्थानांतील** सांगितलें. मग पुढें **बऱ्हाणपुराहून** श्रीमंत **नानासाहेब** यांणीं 'भाऊ ! भाऊ !' ऐसा शोक करीत करीत जेवतां व निजतां निजध्यास बहूतच करीत. कूच करून मजल दरमजल **पुण्यास** दाखल जाले. **दादासाहेब निजामअली** याचा बंदोबस्त करून **पुण्यास** दाखल जाले. उभयतांच्या भेटी जाल्या.

१४९. नंतर दिवसेंदिवस **भाऊसाहेबांच्या** शोकें करून **नानासाहेबांचें** शरीर कृश झालें. बुद्धिभ्रंश जाला. लोकांस शिव्यागाळी करूं लागले. कारभार विपरीत होऊं लागला. पुत्रशोक व बंधुशोक [परम कठिण !] श्रीरामचंद्रजी वनवासास गेलियावर मागें राजा दशरथास रघुनाथ-वियोगाचें दुःख होऊन राम ! राम ! म्हणतां शोक करून प्राणत्याग केला, त्याप्रमाणें **नानासाहेब भाऊसाहेबांच्या** शोकें निधन[११] पावले. **शके १६८३ वृषानाम** संवत्सरे, **ज्येष्ठ वद्य सप्तमी**[१२] (ता. २३ जून १७६१) (वद्य ६) **मंगळवासरीं** देवाज्ञा जाली. वैकुंठलोकास गेले.

१५०. नानासाहेब व भाऊसाहेब अवतारी पुरुष, उभयतांप्रमाणें मनुष्य-लोकीं यामागें कोठेंहि जाले नाहींत आणि पुढेंहि होणें कठीण. उभयतांचा ऋणानु-बंध कीं एक मरतांच एकानें मरावें. पूर्वी **बाजीरावसाहेब** मुक्त जाहालियावरि सहा महिन्यांनीं **त्रिमाजी आपा** गेले. तैसेच **भाऊसाहेब** गैब जाल्यावर वर्तमान **नानासाहेब** यांणीं ऐकतांच सहा महिन्यांतच मृत्य पावले. **भाऊसाहेब** मृत्य पावले हें कोणीं ऐकिलें नाहीं व पाहिलें नाहीं.[१३] भगवंत-इच्छेकरून त्या कहरांतून पार पडून वांचून हरएक कोठें असले तरि निर्माण[१४] होतील. बहूत भाऊ आहेत; परंतु **श्रीमंत** लोकांत यांजप्रमाणें **भाऊपणा** कोठें नाहीं. **रामभारताची** साम्यता ! !

१५१. नानासाहेब यांचें देहसार्थक यथाविधी करून राजश्री **माधवराव**

---

१०. गालेरी असा पाठ पु. प्रतीचा सर्वत्र आहे.

११. ' भाऊ भाऊ म्हणोन प्राण सोडिला ' तुं. प्रत. ' निधानास गेले ' पु. प्रत.

१२. अन्यत्र वद्य प्रतिपदा असें आढळतें. नानांचा काळ पर्वतीवर झाला.

१३. ' भगवंत सत्तें करून पुणें प्रत. यंथें पुणें प्रतीचा २०४ था बंद संपला. पुढील मजकूर शेवटपर्यंत धोपेश्वर प्रतीतून घेतला आहे.

१४. या संशयरूप लेखावरून ही बखर हचा लढाईनंतर लौकरच लिहिली असावी असें चांगलें अनुमान करतां येतें.

बल्लाळ यांसी **सातान्यास** नेऊन, मातुश्री **ताराबाईसाहेब** व **राजाराम महाराज** यांसीं भेटून, त्यांजकडून मुख्यप्रधान असे शिक्के करवून [त्यांनीं] वस्त्रें दिलीं. आणि निरोप देऊन वाटेस लाविलें.

१५२. याप्रमाणें वर्तमान जालें. **नजीबखान** प्यादा होता तो फर्जी जाला व त्यानें प्यादेमात केली. याप्रमाणें ही हकीकत जाली, त्याप्रमाणें विस्तार करून लिहिलें आहे. त्याची माहितगारी ते वेळचे कोणी अनुभवी असतील त्यांस मात्र ठाऊक. असा इतरांस दाखला पोंचणार नाहीं. आपण **हिंदुस्थानचें** आद्यंत वर्तमान लिहून द्यावें म्हणून आज्ञा केली होती. त्यास हें वर्तमान माहितगारीनेंच लिहिलें पाहिजे; त्याजवरून विचारणा करून सेवेशीं विस्तारें लिहून [पाठविलें आहे]. ध्यानास आणावें आणि मनन करून मिथ्या असल्यास सोडून द्यावें आणि सत्य असेल तें जमेस धरावें. हें लिहून कळवावें असा विचार नाहीं. सेवेशीं कळावें बहुत काय लिहिणें ? कृपालोभाची वृद्धि करावी हे विज्ञापना. ही बखर समाप्त श्रीदत्तार्पणस्तु, मिति ज्येष्ठ वद्य ७, (७ जून १८५९) शके[१५] १७८१ सिद्धार्थीनाम संवत्सरे ते दिवसीं सायंकाळीं लिहिली. लिहिणार **विष्णु बापूजी निफाडकर** राहणार **धोपेश्वर तालुके राजापूर**, चुकली तरी क्षमा करावी हे विज्ञापना.

१५. ही मिति अर्थात् विष्णू बापूजी निफाडकर यानें केलेल्या नकलेची होय.

समाप्त



हें पानिपत रणभूमीवरील तिसऱ्या म्ह. १७६१ मधील युद्धांत **सदाशिवरावभाऊ** जेथें पडले तेथें उभारलेलें स्मारक आहे.

काल-पट

ह्या बखरींतील मुख्य मजकूर मागील पृष्ठावर–पृ. १८७–संपला. ह्या मजकुरांत इतर बखर-ग्रंथांतल्याप्रमाणें ऐतिहासिक अनेक हालचालींचें कथन पुष्कळ व सरसपणें आलें आहे. पण त्या मानानें त्या हालचालींचा पुरता काल दर्शित केलेला नाहीं. असा काल प्रत्यक्ष दिलेला नसणें हें असल्या ग्रंथांचें वैगुण्य नव्हे. पण शक्य तों नेमक्या व पुरत्या कालासह जर ह्या हालचाली लक्ष्यांत घेतां आल्या तर तें इतिहासवृत्त, इतिहासवाचनाचें जें उद्दिष्ट तें साध्य होण्यास अधिक उपयुक्त ठरतें म्हणून पुढीलप्रमाणें काल-पट देण्याचें योजिलें आहे.

ग्रंथलेखकानें आपला ग्रंथ तर इतिहासकथनार्थ लिहिला आहे हें स्पष्ट दिसतें; म्हणजे कालानुक्रम व स्थानवैशिष्ट्य हीं जीं ऐतिह्याचीं चारांपैकीं दोन प्रमुख अंगें तीं त्यानें लक्ष्यांत घेऊन आपलें लेखन केलेलें आहे. तथापि कथासूत्र ध्यानीं आणून तो तो प्रसंग शब्दसृष्टींत प्रकट करतांना काल दर्शित करण्याचें राहून जातें; नव्हे, कालस्थलादिकांची त्यापासून दूर गेलेल्यांना जितकी आवश्यकता वाटते तितकी, समीपवर्ति लेखकाला वाटत नाहीं. व म्हणून काल देण्याचें राहतें. प्रत्यक्ष पत्रांतूनसुद्धां, पूर्णपणें विश्वसनीय तें पत्र असूनहि, काल-स्थलादिकांचे उल्लेख नसतात, किंवा मोघम असतात. व ह्याचेंहि कारण हेंच. पण ह्याच कारणाकरतां आपणाला आज ते संकेत उलगडणें, एखादा ऐतिहासिक प्रसंग वास्तव ठरण्यासाठीं कालदृष्टया तो बिनचूक ठरणें ह्याची आवश्यकता भासते. असो.

तर ह्या बखर-ग्रथांत हालचालींच्या मानानें पुरता काल दर्शित केलेला नाहीं व अशीं उदाहरणें पुष्कळच आहेत. बऱ्याच ठिकाणीं कालनिदर्शन आलेलें आहे पण तें मोघम आहे. "पौष वद्य १२; दुसरे दिवशीं; आठ मुक्काम जाले; दो-चहों रोजांत; वैशाखमासीं; दसरा जवळ आला; एक महिन्यानें मागून यावें; समग्र दीड वर्ष जाहलें; शिवालिखिताचे मुहूर्तानें रात्रीस बाहेर आले; तों ज्येष्ठमास संपूर्ण होत आला"; इत्यादि. ह्या कालोल्लेखांत व आगेमागें वर्षाचा निर्देश नसल्यामुळें हे उल्लेख पुरते व नेमके लक्ष्यांत येत नाहींत. ऐ० साधन-साहित्यांत, ज्यांनीं प्रत्यक्ष ते प्रसंग घडविले त्यांचीं पत्रें––अस्सल, समकालीन व विश्वसनीय पत्रें–हें अव्वल दर्जाचें व पहिलें साधन होय. संकलित वृत्तांतांतील गोष्टी ह्या पत्रांधारेंच आपण लक्ष्यांत घेतों व नंतर परस्परपूरक हीं साधनें होतात. बखरग्रंथांच्या पुनर्मुद्रणांत, त्या बखरींत आलेल्या प्रसंगांचीं समकालीन अनेक पत्रें प्रसिद्ध झाल्यानंतर, साहजीकपणें फरक पडतो. कारण पत्रें हें त्या संबंधीचें पहिलें व अधिकृत लेखन होय. अर्थात् अशा पत्रांच्या प्रसिद्धीनंतर बखर-ग्रंथाच्या अभ्यासास पत्रांच्या अभ्यासाची जोड ही आवश्यक आहे व हीं दोन्हीं साधनें मग परस्पर

पूरक ठरतात. उघडच बखरग्रंथाच्या मुद्रणांत हचा दृष्टीनें फरक म्हणजे भर पडणें सहज आहे. व प्रस्तुत बखरग्रंथावृत्तींत काल-पट हचाच दृष्टीनें देण्याचें केलें आहे. ह्या बखरींत, मध्यंतरीं इ. स. १७३९, १७४८ मधील कांहीं ऐ० घटना सांगितल्या आहेत तरी, मुख्यतः इ. स. १७५३ ते १७६१ ह्या कालांतीलच कथाभाग वर्णिला आहे. आणि वर सांगितल्याप्रमाणें ह्या कथाभागांत मोघम कालनिर्देश बरेच आलेले आहेत. पुढें पुढें, विशेषतः वीर दत्ताजी शिंदे ह्यांच्या शुक्रतालवरील लढाईपासून पृ. ५१ ते ८२ व पृ. १०६, १०८ ह्या हकिकतींत वर्षाचा निर्देश करून लेखक काल सांगूं लागला आहे. पृ. १६३ पासून तर मुख्य पानिपत-वर्णनच आलें आहे. व ह्या वर्णनांत एकदां शक-वर्ष सांगून नंतर महिना, तिथी व पुढें 'उदयीक', 'अकरावे दिवशीं' असें कालनिदर्शन आलेलें आहे. सारांश, बखरींतील हालचाली व त्याबरोबर इतरहि सहचारी हालचाली आणि त्या सर्वांचा शक्य तों पुरता काल वाचकांच्या लक्ष्यांत येण्यासाठीं प्रकरणवारीनें पुढील कालपट देण्याचें केलें आहे. हे काल-पट हा ह्या आवृत्तीचा विशेष कोणी मानिला तर तें सयुक्तिकच होईल. ह्या योगें तें तें प्रकरण स्वतंत्रहि अभ्यासितां येईल, आणि बखर-प्रसंगांशींहि ते कसे व कितपत बरोबर हें पाहणी करून लक्ष्यांत घेतां येईल. अशी पाहणी करून त्या विवेचनाची जोड ह्याच ग्रंथास जोडणें अवश्य पण तितकेंच अशक्य; हें लिहिणें नलगे, तो विषयहि मग स्वतंत्र होईल. असो. कालपट पुढीलप्रमाणें :—

कालपटांच्या पहिल्या सदरांत बखरींतील पृष्ठ व परिच्छेद दिला असून दुसऱ्या सदरांत प्रस्तुत ओळखीचा म्हणून इ. स. दिला आणि ३ ऱ्या व ४ थ्या सदरांत ऐतिहासिक पत्रांतून येणारा शक व आर्बी म्ह. सुहुरसन, महिना, तारीख सांगून, ५ व्या सदरांत स्थलनिर्देश केला आहे. ६ व्या सदरांत ऐ. घटना दर्शित केली व ७ व्या सदरांत आधार दाखल केले आहेत. बखरींत जो प्रसंग उल्लिखित नाहीं पण आवश्यक वाटला तो दिला व त्या पाठीमागें परिच्छेद अर्थात् दिला नाहीं. तसेंच बखरींतील कालहि येथें दिला नाहीं तो परिच्छेदांत आढळून येईल. पत्रांत कोणचा काल आहे हें कळण्यासाठीं तो कालोल्लेख जाड खिळचांचा दाखविला आहे. जाड खिळचांचा नाहीं तो काल अंदाजी समजावा.

पृष्ठ परि.	इसवी सन	शालिवाहन शक	सुहुर सन	स्थल	हालचाल	आधार
	१७५३	१६७५	११५४			
२–२	सप्टं. १०	भाद्र. शु. १३	जिलकाद १२	थालनेर	रथुनाथराव दादांचें उत्तरेकडील स्वारीस प्रयाण (कुंभेर प्रवास ४।। महिने).	खं. २ पृ. ११९; पेद २७ पृ. ७०; खं. १-२७; हिंद १ पृ. ६७.
,,	सप्टं. २०	भाद्र. वद्य ८	जिलकाद २२	महेश्वर रेवा उत्तर तीर	रघुनाथरावांचा मुक्काम.	पेद २७ पृ. ७१.
,,	आक्टो. १४	आश्वि व. २	जिल्हेज १६	उज्जनी	राघोबा दादांचा मुकाम.	पेद २७ पृ. ७१.
	नोव्हें. ८	कार्तिक शु. १३	मोहरम १२	,,	जयापा शिंद्यांचा मुकाम.	पेद २७ पृ. ९९.
	नोव्हें. २५	मार्ग. शु. १	मोहरम २९ सोमवार	व (प) डाणे, नेवाई	जाळपोळ, लूट, राघोबा व मल्हार०	पेद २७ पृ. ७२; हिंद १–८५; खं. ६–२१५.
	डिसें. ४	,, शु. ९	सफर ८	जयपूर	राघोबा मुक्काम.	पेद २७ पृ. ७२.
	डिसें. १७	,, व. ८	सफर २१	,, नायके	रामसिंग मारवाडकर दादा भेट.	पेद २७ पृ. ७३.
	१७५४		सफर ३०	कुंभेर वेढा	राघोबा, जयापा, मल्हारराव कुंभेर वेढा (४ महिने).	पेद २७ पृ. ७३.
	जाने. २०	पौष व. १२	रवल २५			
२–३	फेब्रु. ८	माघ व. १	रखर १५	,,	जाठवकील रूपराम तहासाठीं येतो.	
					पण राघोबांचा त्यासी अबोला	खंड ६. २९२.
३–२	मार्च ६	फाल्गुन शु. १२ बुधवार	जवल ११	,,	राघोबा व मल्हारराव शाही तोफखान्यांतील आग्रा, झांशीकडील तोफा, दारूगोले इ. मागवितात.	खं. ६–२९४; (म्ह. हो. इ. सा. १–१०९); ५३१; पेद २७ पृ. ८८–८९.

४–५	मार्च १९	फाल्गुन व.११ मंगळ. १६७६	जवल २४	,,	खंडेराव होळकर गोळा लागून मृत्यु.	शिदे सा. ३–२०५; खं. ६ पृ. १०४;
५–९	एप्रिल १७	चैत्र व. १०	जखर २३	,,	जाठ जेरीस आला. सलूख सुरू.	शिदे सा. ३–१४८; १–१११
७	मे	चैत्र वैशाख		,,	जयापा जाठाचा पगडीभाई होतो	हिस्ट्री जाठ पृ. ९०.
९	मे	,,		,,	जयापा राघोबास म्हणतात छावणी हलवावी, तह करावा.	शिदे सा. ३ ले- १४९.
११	मे १७	वै. व. ११	रज २३	शिकंदरा	बादशाही फौजेवर हल्ला.	खं.६-२९९; व पृ.१०७पेद २१-६०;नऔ.
	मे २६	ज्येष्ठ शु. ४।५ रविवार	साबान ३	कुंभेर	तह रु. ३० लक्षांवर तह होऊन वेढा संपला.	पृ. २४९. पेद २७ पृ. ९४; वंद ५–११(१६७६). नानारो १. २२५.

प्रकरण २ रें––शिद्यांची मारवाड–जोधपूरची स्वारी पृ. १२–२५, परिच्छेद १२–२४

११–११	१७५४	१६७६	११५५	दिल्ली–	हून जयापांचें मारवाड प्रांताकडे	ऐपया १२२.
	जुलै २	आषाढ शु. १३	रम. १०		१०–१२ ह. फौजेसह प्रयाण	
	जुलै ६	आषाढ व. २	रम. १४	रेवाडी	४० ह. फौज जथली	शि. ३–१५२.
	जुलै १२	आषाढ व. ८	रम २०	नारनोल–	प्रांतांत जयापांचें वास्तव्य	शि. १–११४.
	जुलै १८	आषाढ व. १३	रम २६	सांबर	जयापा मुक्काम	शि. १–११५; ३–१५३.
	जुलै २५	श्रावण शु. ६	सवाल ४			

पृ.–परि.	इसवी सन १७५४	शालिशक १६७६	सुहुर	स्थल	हालचाल	आधार
	आगस्ट ६	(पूर्वी)श्रा.व.३	सवाल १६	किसनगड	जयांपानीं घेतला	शि. ३–२६५, ४६, ४७.
		,,	११५५	मेडतें	जयापा शिंदे यांचा वेढा	
१६–१४	आगस्ट ६		सवाल १६		(बडगांव खडकी) व लढाई	खं. १–३७.
		शनिवार				
,,	सप्टें. १४	भाद्र. व. १३	जिल्काद २६	मेडतें	सर करून ठाणें बसविलें	शि. ३–२६९.
	आक्टो.	आश्वि. कार्ति.	जिल्हेज		बिजेसिंगाची जयापाशीं सलूखाची	शि. ३–२७७.
					फक्त बोलणीं.	
२०–१९	,,	,,				
	आक्टो.	,,	,,	गंगरडें	घेऊन जयापांनीं अधिक जोरानें	रे.मा.इ. १–३७३; हिं. १–१०९.
					व जखडबंद चढाई : जोधपूर–	
	नवंबर	कार्तिक	११५५ मोह	दिल्ली	जालोद–फलोदी इ.	
१२}१२	१७५५	पौष	रवल	नागोर	बिजेसिंगाचा वकील दादांकडे	शि. ३–६२.
१३}१३	जाने.				भोंवती चौक्या, रसदबंदी व जोध-	खं. १–४४, पेद २१–६७, ६९;
१५–१३	जाने. १८	माघ शु. ६	रखर ५	,,	पुरासंनिध सुरुंग	शि. ३–२१०.
					सलोख्याची बोलणी सुरूं लाबेवाला	
	फेब्रु. २१	भृगु. फाल्गु.	जवल ९	(तिसरे प्रहर)	रजपूत रुजू	
		शु. १०		अजमेर	जयापांनीं जिंकलें. तहाची वाटा-	पेद २७–१०५, १०७;
	मार्च ९	पूर्वी फा.व.१२	जवल २५	जोधपूर,सांबर	घाट चालूंच. रामसिंगानें	सि. ३–२११.
				जालोर		,,
	मार्च	१६७७ चैत्र	जवल	रूपनगरा–	येथें मोर्चे	
					स दादांचा शह बसावयाचा.	शि. ३–२९८, २९९.
					पण जयापांच्या म्हणण्याप्रो तहकूब	

	एप्रिल २७, २९ मे	वैशा. शु. १४ वै. अ. ज्येष्ठ	रजब १२ रजब साबान	ग्वाल्हेर उसर (नागोर)	मल्हारराव, दादा व रूपराम बोलणीं जयापा घेतात	शि. ३–३०२; १– १३३. पेद २७–१०३.
	जून १७	ज्येष्ठ शु. ८	रमजान ६	नागोर	किसनसिंग जयापाख भेट सलूखाची बोलणीं ठीक पण रांगडयांची पुन: लबाडी	शि. १–१६५.
	जुलै १४	आषाढ शु ५	सवाल ४	,,	जेतसिंग व बिजेराम गोसावी जगन्नेश्वर ब्राह्मण व रायसिंग चव्हाण तहाच्या वाटाघाटीस आले	शि. ३–२१४.
१७–१७	जुलै १८	आषाढ शु. १०	सवाल ८	नागोर	बिजेसिंगानें विखुरलेली आपली फौज एकवटून जयापावर हल्ला केला तरी पराभूत	पेद २७–११२,
१८–१८	जुलै २५	(उ.) श्रावण वद्य २ भृगु द.आषाढ व.१	शुक्रवार सवाल १५	,,	जयापांचा दग्यानें खून	शि. १–१४०, १४१; शि. ३–३२०, ऐपया १३८- पेद २–४८.
	आगस्ट १०	श्रा. शु. ३	११५६ जिल्काद १	पुणें	रघुनाथरावदादा परत पोचले	पेद २७ पृ. ७९
१९–१९	आगस्ट १६	श्रा. शु. ९	जिल्काद ७	नागोर (जालोर जोधपुर)	दत्ताजीनें दुष्पट जोरानें लढाई चालविली; मोर्चे कायम.	पेद २–४८.
	आगस्ट २८	श्रा. वद्य ६	जिल्काद १९		बिजेसिंगाचा दिल्लींतील वकील हाकलून द्या	हिद १–१६१.
	सप्टें. २९	भाद्र. वद्य ९	जिल्हेज २२		पुण्याहून दताजीच्या मदतीस समशेर बहादूर व यशवंतराव पवार १० ह. फौजेसह रवाना	हिद १–१७१; शि. ३–३२८.

पृ.–परि.	इसवी सन १७५४	शालिवाहन १६७६	सुहुर	स्थल	हालचाल	आधार
	आक्टो, १	भाद्र. व. ११	जिल्हेज २	नागोर	भोंवतीच्या सर्व गढ्या–चाह, रोहेण, दुगोली, झाडोली, खाटु दोन्ही, काळचा इ. पाडल्या रसदबंद	शि. ३–२१६,
	आक्टो. १५	आश्वि. शु.१०	मोहरम ९	रामगड ते नागोर	अनिरुद्धसिंग बख्तवारमल,	शि, ३–१७२, पेद २१–७४, ७७; २–५ ; २७–११७.
	आक्टो. १६	,, शु ११	मोहरम १०	दाते	शहापूरवाला रूपनगरकर इ. सह	
	आक्टो. २१	आश्वि. वद्य १	मोहरम १४	दौलतपूर,	राणोजी भोइटेकडून पराभूत व	पेद २१–७७.
	आक्टो. ३१	आश्वि.व. ११	सफर २४	दिडवाणा (नागोर) दिडवाणा	अनिरुद्धसिंग शरण येऊन भेट	
	नोव्हें	कार्तिक		गोदोज दिडवाणा	बिजेसिंगाशीं शेवटचें युद्ध व तो पराभूत	पेद २–४९.
२३–२१	डिसें २ १७५६	कार्ति. व. १४	सफर २७	नागोर ते बिकानेर	बिजेसिंग पळ व तहाची बोलणी	पेद २ पृ. ७५, ७६, ९०. पेद २१–८२, ८३; ऐपया पृ, १३८,
	जाने.	पौष	रबल रखर	नागोर, मेडते	तह, तहानंतर मुक्काम	ऐटि २ पृ. ६९; शि. ३–२१८, १७५
२५–२४	जाने	,,	रखर	श्रीगोंदे	नानासो व भाऊसो पेशवे जनकोजी शिंदे भेट	पेद २७–१२७, १२८. शि. ३–३२०.
	जाने.	,,	,,	सावनूर	पेशव्यांचा वेढा हल्ला व जिंकलें	खं. ३–४६९.
	एप्रिल २३	१६७८चै.व.९ ज्येष्ठ शु. ८	रजब २२ रम ७	रूपनगर	दत्ताजींचे मोर्चे समशेर बहादर ससैन्य येतो व जिंकतात १।।म. युद्ध	पेद २–६३, शि, १३६, पेद २१–८७. पेद २–६५, ६६; शि. १–१८०.
	आगस्ट	श्रा. शु.	जिल्काद	कोटा (बुंदी)	दत्ताजी अजितसिंगास गादीवर बसवितात	शि. ३–७४.

२३–२२	,, आगस्ट २१ ,, नौव्हें. २९	,, श्रा. व. १ ,, मार्ग शु. ८	जिल्काद १४ रवल ६	उज्जनी पुणें	जनकोजीची सैन्या–समजावीस रघुनाथरावांचें उत्तर हिंदुस्थानच्या दुसऱ्या स्वारीस प्रयाण	पेद २. ६५

प्रकरण ३ रें : प्याद्यानें बार भरला. पृ. २६–३४ परि. २५-२७

ह्या तिसऱ्या प्रकरणांत आलेला कथाभाग पहिल्या दोन प्रकरणांनुरोधानें (इ. १७५४–५६) पाहतां आडकथा वाटण्याजोगा अहे. कारण ह्यांत मुख्यतः 'पूर्वी' (पृ. २९–२६) ची 'वर्तणूक' (पृ. ३२–२६) म्हणजे इ. १७३९ मधील नादिरशहाची आणविलेली दिल्ली-वरील स्वारी बखर–लेखकांनीं सांगितली आहे. जवळजवळ ह्या स्वारीच्या निमित्तासारखें आतांहि आपणांस 'एक निमित्त घ्यावें लागेल' (पृ. ३३–२६) म्हणजे गुप्त राजकारण करावें लागेल व हें, ज्या प्याद्या करवीं शेवटीं 'भाऊगर्दी' झाल्याचें लेखकांस सांगावयाचें आहे, (पृ. १८२) त्या नजीबखान प्याद्याचें म्हणणें व वृत्ति दर्शित करण्याच्या दृष्टीनें हें प्रकरण ग्रंथलेखकानें दिलें आहे. एका अर्थीं बखर-प्रसंगाचा प्रारंभच हें तिसरें प्रकरण मानितां येईल. पहिलें प्रकरण हें उत्तरीय जें राजकीय धोरण व वातावरण तें सांगणारा, एकाधिक प्रसंगांपैकीं, एक प्रसंग होय. आणि हें प्रकरण भाऊगर्दीतील जी एक मुख्य व्यक्ति त्या व्यक्तीची सूत्रचालना कशी तें सांगणारें आहे. असो. असें हें प्रकरण पूर्ववृत्त–कथनपर आहे व बखरींतील कथनानुरोधानें तें वृत्त सांगतांना आगेंमागेंपणा काल-पटांत येणें साहजिक आहे. व आधार देण्यांतहि वेगळेपणा करावा लागला आहे.

२६ २७ }–२५	१७५४–५९	१६७६–८१	...	दिल्ली	आलमशहा	= आलममीर २ रा–टीपेंत महंम्मदशहा पडलें तें नको.
२९–२६	१७१९–४८	१६४१–७०	...	,,	मुहम्मदशाह–	चा वजीर मनसूर अली म्हटलें तेथें कमरुद्दीन पाहिजे.
,,	१७४८–५४	१६७०–७६	...	,,	अहमदशाह	ह्या बादशहाचे वेळीं निजामुल्मुल्क नाहीं.

पृ.–परि.	इसवी सन १७५४	शालिशक १६७६	सुहुर	स्थल	हालचाल	आधार
२९–२६	१७३८ फेब्रु.	१६५९ माघ	११३८सवाल	दिल्ली	निजामुल्मुल्क	पेद १५.६८
३०–२६	१७३९ फेब्रु.	१६६० माघ	११३९जिल्का	कर्नाळ	नादिरशहा (पूर्व-रोमचा पातशहा)	पेद ३०.२२६; पेद १५.७५
३१–२६	१७३९ मार्च	,, फा.	,, जिल्हेज	दिल्ली	,,	
,,	,, एप्रिल२०	१६६१ चैत्र व. ८।९	,, मोह.२२	,,	,,	७३; ऐच. पृ. १९ ले. ६ ऐच. पृ. २४ ले. ९
३३–२७	१७५७	१६७९		,,	नजिबानें सुजाउदौला, बिजेसिंग, जयेनगरकर सबदालीकडे पत्रें व भाऊ पाठविला.	

